मराठी बखर

र. वि. हेरवाडकर

मराठी बखर

रघुनाथ विनायक हेरवाडकर
एम्. ए., पीएच्. डी.
सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई

मूल्य रुपये ६·००

व्हीनस प्रकाशन : पुणें

पुरस्कार

प्रबंधाची कल्पना बहुधा त्या त्या विषयावरील विवेचनाच्या उणीवेंतून निघते. मराठी बखरी मुंबई विद्यापीठांत आरंभापासून शिकविल्या जात आहेत; परंतु न्यायमूर्ति रानडे, इतिहासपंडित राजवाडे व इतर कांही मंडळी ह्यांनी प्रसंगोपात्त केलेल्या लेखनावरच काम भागविलें जाई. ऐतिहासिक पत्रांच्या अभ्यासामुळे तर बखरींची ऐतिहासिक किंमत शून्यवत् झाल्यासारखीच होती. विद्यापीठांत मात्र होत असलेल्या अभ्यासामुळे बखरींच्या ऐतिहासिक व वाङ्मयीन गुणांची चर्चा व छाननी वेळोवेळीं होत असली, तरी मराठी बखरींची एकत्र व संपूर्ण चिकित्सा मराठी अभ्यासकांस भासतच असे. त्या अनुषंगाने हा विषय मूलतः दृष्टीसमोर आला. डॉ. र. वि. हेरवाडकर ह्यांचा ह्या विषयावरील ग्रंथ आता मुद्रित स्वरूपांत लोकांसमोर आल्यावर हा विषय प्रबंधास कसा योग्य होता, हें सांगण्याची आवश्यकताच राहणार नाही.

डॉ. हेरवाडकर ह्यांनी आपल्या ग्रंथांत बखरींची छाननी दोन दृष्टींनी केलेली आढळेल. ग्रंथाची मूळ बैठक बखरींचा वाङ्मयीन अभ्यास अशीच होती; परंतु तो अभ्यास होत असतांना अनुषंगाने त्यांतील ऐतिहासिक माहितीचा बिनचूकपणा पारखण्याची संधि आपोआपच आली; व हाहि भाग ह्या ग्रंथाचा विषय नसतांनाहि ह्यांत आलेला दिसेल. ह्या विषयावरील डॉ. हेरवाडकरांचे परिश्रम सर्वस्वी मूलग्राही, स्वतंत्र व नवीन आहेत, हें वाचकांस आढळून येईल. ऐतिहासिक माहितीची छाननी मूलतः रियासतकार डॉ. सरदेसाई ह्यांनी सलग लिहिलेल्या रियासती व केंब्रिज हिस्टरी ऑफ् इंडिया ह्या ग्रंथांवरून केलेली असून इतर आधुनिकतम ग्रंथांवरूनहि तें काम सिद्ध केलेलें आहे. वाङ्मयीन चर्चेसाठी स्वतंत्र अशी पद्धति त्यांनी स्वीकारलेली दिसेल. मराठींत अशी चर्चा करणारे ग्रंथ फार नसल्याने ही

उणीव प्रथम फार जाचक झाली; पण त्याची रूपरेषा निश्चित केल्यावर मात्र हें वाङ्मयीन चर्चेचें काम सुलभ व पद्धतशीर झालें. मराठी बखरींचें संपूर्ण विवेचन एकत्र करणारा डॉ. हेरवाडकरांचा प्रबंध सिद्ध झाल्यावर प्रखर अशा परीक्षणांतून सुवर्णवत् बाहेर पडला व इतिहास आणि वाङ्मय ह्या दोन्ही दृष्टींनी महाराष्ट्रांत तज्ज्ञ मानल्या गेलेल्या व्यक्तीची मान्यता त्यास प्राप्त झाली.

डॉ. हेरवाडकर ह्यांच्या ग्रंथाने बखरींच्या अभ्यासास अधिक चालना मिळेल ह्यांत कांहीच संशय नाही. हा ग्रंथ वाचकांना उपयुक्त ठरेल व डॉ. हेरवाडकर ह्यांच्याकडून मराठी वाङ्मयांत मोलाची भर अशीच पडत राहील, अशी आशा व्यक्त करतों.

विलेपार्लें, मुंबई २४
दि. ३-११-१९५७

महेश्वर अनंत करंदीकर

प्रास्ताविक

‘ मराठी बखर ’ हा प्रस्तुत ग्रंथ म्हणजे मुंबई विद्यापीठाच्या डॉक्टरेट-साठी सादर केलेल्या ‘ मराठी बखर वाङ्मय ’ (Literature Called Marathi Bakhars) ह्या प्रबंधाचें छोटेखानी स्वरूप होय. निरनिराळ्या विद्यापीठांतील मराठीच्या अभ्यासक्रमांत कृष्णाजी अनंत सभासदविरचित शिवछत्रपतीचें चरित्र, मल्हार रामराव चिटणीसविरचित शककर्ते श्रीशिव-छत्रपति महाराज ह्यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र, रघुनाथ यादवविरचित पाणिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर अशांसारख्या वाङ्मयीन गुणांनी समृद्ध असलेल्या बखरींचा समावेश झालेला आहे. दुय्यम शाळांतील शालान्त परीक्षेसाठी नेमलेल्या वेंच्यांतहि अधूनमधून बखरींतल्या निवडक उताऱ्यांचा अंतर्भाव केला जातो. ह्याचा अर्थ असा की, मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांस बखरींचा अभ्यास आवश्यक आहे. ह्यावरून ह्या विषयाचें महत्त्व कळून येईल.

बखरींचा अभ्यास सुरू करण्यापूर्वी पहिली जी मोठी अडचण भासली, ती म्हणजे बखरींच्या अद्ययावत् यादीचा अभाव ही होय. मराठींत एकूण प्रकाशित व अप्रकाशित बखरी किती ह्याचा प्रथम निश्चित अंदाज लागेना. हस्तलिखित अशा अप्रसिद्ध बखरींचा प्रश्न बाजूस ठेवला, तरी प्रसिद्ध झालेल्या सर्वच बखरी सहसा उपलब्ध झाल्या नाहीत. त्यांतहि भाऊसाहेबांच्या बखरींसारख्या कांही बखरी स्वतंत्रपणें जशा प्रसिद्ध झाल्या, तशा होळकराच्या थैलीप्रमाणे कांही ऐतिहासिक पत्रान्तर्गत होत्या. त्यामुळे प्रथम बखरींची सूचि करण्याची गरज वाटली. त्याप्रमाणे सुमारें सव्वाशें बखरींची त्यांचे लेखक, लेखनस्थल व लेखनकाल ह्या दृष्टीने अद्ययावत् सूचि तयार करून ती बखर-वाङ्मयावरील एका निबंधासह मुंबई-मराठी-ग्रंथसंग्रहालय, दादर शाखेच्या विद्यमाने प्रसिद्ध केली.

मराठी बखर ह्या ग्रंथाचीं एकूण दहा प्रकरणें आहेत. प्रथम बखर ह्या संज्ञेची अर्थनिश्चिती करून तिच्या उद्गमाची चर्चा केली आहे. मुसलमानी अमदानींतील तवारिखा किंवा तत्सदृश अशा लेखनाचें अनुकरण मराठींत बखरलेखनाच्या स्वरूपांत दिसतें; परंतु इतिहासाची कल्पना व ऐतिहासिक साधनें हीं भारतवर्षांत बरींच जुनीं आहेत ह्यांत शंका नाही. तीं कोणत्या स्वरूपांत होतीं हें प्राचीन कालापासून बखरकालापर्यंत घेतलेल्या आढाव्यांत दाखविलें आहे. बखरींचा विषय इतिहास असल्यामुळे हें विवेचन आवश्यक वाटलें. ह्यानंतर मराठी बखरींचीं गमकें विशेषापासून सामान्य नियम स्थापण्याच्या विगमन पद्धतीने (Inductive Method) दिग्दर्शित केलीं आहेत.

इतिहासशास्त्र आणि साहित्यशास्त्र ह्यांच्या आधारें बखरींतील ऐतिहासिक व वाङ्मयीन अंगाचा विचार करणें इष्ट होतें. त्या दृष्टीने दुसऱ्या प्रकरणांत दाखविलेल्या त्यांच्या स्पष्ट मर्यादा त्यांच्यासंबंधी यथार्थ कल्पना आणून देतील. पुढे कालानुक्रमाने बखरींचे लेखनकाल, लेखक व नामकरण हीं बखरींच्या अंतर्बाह्य पुराव्याच्या आधारें शक्यतों निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आढळेल. बखर-साहित्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा कालानुक्रम उपयोगी पडेल. प्रकरण चार, पांच व सहा ह्यांत ऐतिहासिक कालांतील तत्कालीन विषयांच्या दृष्टीने केलेलें विवेचन उद्‌बोधक होईल. प्रथम इ. स. १६०० पर्यंतच्या शिवपूर्वकालीन विषयांवरील बखरींचें विवेचन असून त्यानंतर इ. स. १६०० ते १७०८ ह्या कालखंडांतील शिवकालीन विषयांवरील बखरींची व त्याचप्रमाणे इ. स. १७०८ ते मराठेशाहीचा अस्त होईपर्यंत पेशवेकालीन विषयांवरील बखरींची चर्चा आहे. ह्या ग्रंथांत पौराणिक, सांप्रदायिक व खिस्तीधर्मविषयक अशा इतिहासेतर बखरींचेंहि स्वरूप विचारांत घेतलेलें दिसून येईल. येथपर्यंत बखर ह्या साधनाची पूर्ण चर्चा झाली असून त्यानंतर बखरींचें शैलीदृष्ट्या मूल्यमापन केलें आहे.

मराठी बखरींचें साहित्याच्या दृष्टीने मूल्यांकन करतांना शैलीगुणाला विशेष महत्त्व दिलें आहे, हें मुद्दाम निदर्शनास आणून द्यावेंसें वाटतें.

शैलीगुणावरच कोणत्याहि वाङ्मयाचा कस लागतो. शैलीविषयक किमान गुणांचें स्वरूप स्पष्ट केल्यामुळे अव्वल दर्जाच्या साहित्यांत त्यांचें अस्तित्व कसें असतें, हें ह्या विवेचनावरून लक्षांत येईल. मराठी बखरींचें लेखन वाङ्मयाच्या भूमिकेने झालेलें नाही; परंतु वाङ्मयनिर्मितीस आवश्यक असणाऱ्या विशिष्ट मनोवृत्तींतून तें झालेलें आहे, हें ध्यानांत घेतल्यास बखरींत साहित्यगुण कां आढळतात, ह्याचें रहस्य सहज उलगडण्यासारखें आहे. विषयाच्या दृष्टीने ही चर्चा उपयुक्त ठरेल.

ह्या ग्रंथांत महत्त्वाच्याच तेवढ्या बखरींचें समालोचन आहे. ह्या विषयाचें विवेचन करतांना प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं कांही निष्कर्ष दिले आहेत. हे सर्व निष्कर्ष निर्लेप वृत्तीने काढण्याचा प्रयत्न केला असून त्यांत एकांगीपणा येऊं न देण्याची शक्य ती काळजी घेतली आहे.

बखरींचा अभ्यास करतांना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, महाराष्ट्र–सारस्वतकार वि. ल. भावे, रियासतकार डॉ. गो. स. सरदेसाई इत्यादि विद्वानांनी ह्यापूर्वी बखरींसंबंधी केलेलें विवेचन विचारांत घेतलें असून त्यांचा आधार योग्य त्या ठिकाणीं घेतला आहे. ह्याप्रमाणे प्रस्तुत ग्रंथांत प्रबंधलेखनाची भूमिका घेतलेली दिसेल. ह्यामुळे बखरींच्या ऐतिहासिक प्रामाण्यावर निश्चित प्रकाश पडेल.

प्रस्तुत ग्रंथाचें स्वरूप ह्याप्रमाणे आहे. महाराष्ट्र–सारस्वतांतील एका विशिष्ट लेखनप्रकाराच्या अभ्यासाची ही एक दिशा आहे. आमचा शब्द आम्ही अखेरचा मानीत नसल्यामुळे एक विशिष्ट दृष्टिकोन म्हणूनच ह्याकडे पाहणें योग्य होय. ह्या दृष्टिकोनाची स्पष्ट कल्पना येण्यांतच ह्या ग्रंथाची सफलता आहे. बखरींचा सहवास अत्यंत प्रिय वाटतो, हें आवर्जून सांगावेंसें वाटतें.

हा अभ्यास करण्याच्या कामीं एल्फिन्स्टन् कॉलेज (मुंबई) मधील गुरुवर्य डॉ. म. अ. करंदीकर ह्यांनी जें पितृतुल्य मार्गदर्शन केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होतील. विषय सुचविण्यापासून तों

प्रबंध स्वरूपांत तो सिद्ध होईपर्यंत त्यांनी अत्यंत आपुलकीने जें साह्य केलें त्याबद्दल त्यांचे ऋणी असण्यांत सानंद अभिमानच वाटतो. प्रेमाचें ऋण कधीहि फिटत नाही हें खरें आहे.

ह्या विषयाच्या अध्ययनाचीं कित्येक साधनें दुर्मिळ असल्यामुळे तीं ताबडतोब उपलब्ध होऊं शकलीं नाहीत; तरी पण बरींचशीं साधनें मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई-मराठी-ग्रंथसंग्रहालय (मध्यवर्ती केंद्र), भारत-इतिहास-संशोधक मंडळ, पुणें व राजवाडे संशोधन मंदिर, धुळें इत्यादि ठिकाणीं उपलब्ध झालीं हें कृतज्ञतापूर्वक नमूद केलें पाहिजे. ह्या साधन-सामुग्रीच्या आनुषंगाने पुण्याचे सुप्रसिद्ध इतिहास-संशोधकद्वय श्री. शं. ना. जोशी व श्री. ग. ह. खरे, फर्ग्युसन् कॉलेजचे प्रा. रा. श्री. जोग व धुळ्याचे कै. मो. रा. जोशी ह्यांनी प्रस्तुत विषयासंबंधी विशेष जिव्हाळ्याने चर्चा करून संशोधनक्षेत्राच्या निबिड अरण्यांतील वाटचाल सुकर केली त्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनाच्या जबाबदारीचें अवघड काम पुण्याच्या सुविख्यात 'व्हीनस प्रकाशन'चे वाङ्मयप्रेमी व्यवस्थापक श्री. सदाशिवराव पाध्ये ह्यांनी सुहृद्भावाने अंगावर घेतलें. त्यांच्याच प्रेरणेमुळे मूळ प्रबंध ह्या स्वरूपांत तयार झाला, म्हणून त्यांचे व अल्पावधींत सुबक मुद्रण करून दिल्याबद्दल चित्रशाळेचे हार्दिक आभार मानतों.

दादर, मुंबई २८
दि. ६-११-१९५७ } र. वि. हेरवाडकर

अनुक्रमणिका

१ : विषय-प्रवेश

प्रस्तुत चर्चाविषय मराठी बखरवाङ्मय हा आहे. मराठी भाषेंतील ऐतिहासिक बखरी हें नामाभिधान प्राप्त झालेल्या लेखन-प्रकाराचें वाङ्मयीन दृष्टीने मूल्यमापन करणें हा या चर्चेचा मुख्य उद्देश होय. बखर या वाङ्मय-प्रकाराचा इतिहास, त्याची परंपरा व त्याचें तंत्र यांचा विचार करून त्याचा विकास निरनिराळ्या कालखंडांत कसकसा होत गेला व मराठी वाङ्मयांतील त्याचें स्थान कोणतें याचेंहि येथे विवेचन करावयाचें आहे.

महाराष्ट्र-सारस्वताच्या इतिहासांत बखरींचें एक विशिष्ट स्थान आहे. ऐतिहासिकदृष्ट्याच केवळ नव्हे तर वाङ्मयदृष्ट्याहि त्यांचें महत्त्व मान्य केलें पाहिजे. मराठेशाहींतील गद्यवाङ्मयाची एक स्वतंत्र शाखा म्हणून बखरींचा विचार करावा लागतो. इतिहासकालांतील तरुण मराठ्याच्या मनाचें यथातथ्य चित्रण बखरींतच केलेलें आढळतें. बखरग्रंथ म्हणजे मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप होत.

मराठी बखरींचा वाङ्मयदृष्ट्या येथे विचार केला असला तरी विषयाच्या पूर्ततेच्या दृष्टीने त्यांच्या ऐतिहासिक स्वरूपाची पाहणी केलेली आढळेल. ही पाहणी अर्थातच स्थूल आहे. बखरींचें एक वेगळें अंग म्हणून इतिहासेतर बखरींचें दिग्दर्शन करणें आवश्यक वाटलें. मराठी भाषेंतील कांहीसें अपरिचित पण एक उत्कृष्ट असें वाङ्मयाचें दालन उघडण्याचा हा प्रयत्न आहे.

बखर–व्युत्पत्ति :

बखर हा शब्द खबर या अरबी शब्दापासून निघालेला असून मूळ अरबी शब्दाचा तो वर्णविपर्यास (Metathesis) म्हणतां येईल. खबर या शब्दाचा अर्थ वार्ता, माहिती, समाचार असा आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मतें " बक = बकणें, बोलणें या धातूपासून बखर, शब्द मराठींत निपजला आहे." ह्यावरून असें अनुमान करावें लागतें की, फार पुरातन कालीं बखरी तोंडाने बोलत असत, हाताने लिहीत नसत. तोंडाने

बखरी बोलण्याचा हा काल दोन अडीच हजार वर्षांपलीकडील असावा."[1] परंतु बखर (स्त्री) या शब्दाचा रूढार्थ राजकीय बातमी, इतिहास असा आहे. 'मुसुलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला' असें स्वतः राजवाड्यांनी म्हटल्यामुळे,[2] तसेंच प्रस्तुत शब्दाचें मूळ स्वरूप व त्यांतील कल्पना (concept) सर्वस्वी परकीय असल्यामुळे राजवाड्यांचें पूर्वोक्त विधान मान्य करणें कठिण आहे. महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणीकारांचेंहि हेंच मत दिसतें.

कोशगत अर्थ :

बखर या शब्दाचे कोशगत अर्थ पुढीलप्रमाणे सापडतातः—

१. तेरीजं गणितं ताळा त्वैक्यमाख्यायिका बखैर. (८ लेखनवर्ग राजव्यवहारकोश).

२. बखर स्त्री. हि. १ प्राकृत भाषेने राजादिकांचें गद्यरूप चरित लिहिलें असतें ती (जगन्नाथशास्त्री क्रमवंत, महाराष्ट्र भाषेचा कोश सन इसवी १८२९)

३. बखर f. Any history, relation, memoir etc. in Prakrit Prose (Molesworth J. T. A Dictionary of Marathi and Engish 1857)

४. बखर (स्त्री) गद्य-इतिहास, चरित्र (वा. गो. आपटे, मराठी शब्दरत्नाकर १९२२)

५. बखर (स्त्री) (अ. खबर) बातमी, हकीगत, इतिहास (मा. त्रिं. पटवर्धन, फार्सी-मराठी कोश)

६. बखर (स्त्री) १ राजा, थोर पुरुष लढाई इ.ची हकीकत (वि. वा. भिडे, मराठी भाषेचा सरस्वतीकोश)

७. बखर-खेर-स्त्री १ देशी भाषेंत, गद्यांत लिहिलेला इतिहास, कथानक अगर चरित्र २ हकीगत, बातमी ३ अर्ज (अर. खबर) (महाराष्ट्र शब्दकोश)

---

१. ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. ३४८

२. सदर, पृ. २

महाराष्ट्र–सारस्वताचे पुरवणीकार म्हणतात : ‘ मराठेशाहींत बखर हा शब्द माहिती देणें या अर्थानें रूढ झालेला दिसतो.’ बखरी म्हणजे चरित्र-ग्रंथ असें साधन-चिकित्साकर्ते श्री. वा. सी. बेंद्रे यांचें मत आहे. या सर्व मतांचा विचार करतां तसेंच बखरींचें एकंदर स्वरूप पाहतां बखर म्हणजे ऐतिहासिक व्यक्ती वा घटना यांची हकीगत हें मान्य होण्यास प्रत्यवाय नाही.

इतिहासविषयक प्राचीन कल्पना :

बखर हा ऐतिहासिक लेखनाचा एक प्रकार असल्यामुळे त्याची चर्चा करण्यापूर्वी प्राक्कालीन इतिहासलेखनाच्या परंपरेचें स्वरूप लक्ष्यांत घेणें आवश्यक आहे, म्हणून त्याचा आधी विचार केला पाहिजे.

इतिहासलेखनाची कल्पना ही भारतीयांना अगदी परकीय नाही. कारण इतिहासविषयक आस्था ही या देशांत फार जुनी आहे. ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांच्या मतें प्राचीनांस इतिहासजिज्ञासा होती. प्राचीनांचें इतिहासविषयक तत्त्वज्ञान अंशतः पुराणाच्या व्याख्येंत आहे.[१] ऋग्वेदांतील दानस्तुति, दाशराज्ञ युद्ध इत्यादि प्रकरणांत इतिहासाच्या कल्पनेचें मूळ दिसून येतें. या दानस्तुति प्रकरणांत आश्रयदाते किंवा राजे यांची केवळ स्तुति नसून त्यांच्या समग्र नांवांच्या याद्याहि आहेत. दाशराज्ञ युद्ध हा एक घटनात्मक इतिहासच होय.

इतिहास व पुराण या संज्ञांचा प्रथम प्रयोग अथर्ववेदांत केलेला आढळतो. याबरोबरच गाथा व नाराशंसी या वीररसात्मक गाण्याच्या प्रकारांचाहि उल्लेख त्यांत केल्याचें दिसतें.[२] छांदोग्योपनिषदांत तर इतिहास-पुराणाला पांचवा वेद म्हटलें आहे.[३] राजसूय आणि अश्वमेध या यज्ञांत आठव्या दिवशीं होत्यानें इतिहासवेदापैकी कांही भाग म्हणून दाखवावयाचा असतो असें शतपथब्राह्मणाधारें म्हणतां येतें.[४] सारांश, वैदिक वाङ्मयांत इतिहास व पुराण हे दोन्ही शब्द बरोबरीनें वापरले आहेत.

वैदिककालांतील इतिहास व पुराण या संज्ञा विशिष्ट ग्रंथांना लावलेल्या

१. ज्ञानकोश प्रस्तावना खंड, विभाग ३, पृ. ४
२. अथर्ववेद ११–६–११
३. छांदोग्योपनिषद् ४–२–१; ७–१–२
४. शतपथब्राह्मण १३–४–३; १२

नसून दंतकथा, आख्यायिका यांच्या समुदायास त्या उद्देशून असत. तसेंच इतिहास व पुराण हा वेदाचा पूरक भाग असून वेदाचा अधिकार नसलेल्या स्त्रिया व शूद्र यांना शिक्षण देण्यासाठीच त्यांची मुख्यतः योजना होती असें सुप्रसिद्ध जर्मन संस्कृतज्ञ एम्. विंटरनिट्झ् म्हणतात.[1] ज्ञानकोशकारांच्या मतें इतिहासवेद या नांवाचा ग्रंथसमुदाय पूर्वी अस्तित्वांत असावा. इतकेंच नव्हे, तर वैदिक वाङ्मयांत इतिहास व पुराण हे स्वतंत्र ग्रंथ होते.[2] एवढें मात्र खरें की, वैदिक वाङ्मयांत इतिहास व पुराण यांतील भेदासंबंधी तज्ज्ञहि साशंक आहेत.

रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथांना इतिहास असें म्हणतात. महाभारताला तर 'इतिहासोत्तम' अशी सार्थ पदवी स्वतः ग्रंथकारानें दिली आहे.[3] इतिहास म्हणजे चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून घेण्यासाठी केलेला उपदेश, अशी पौराणिक कालांतील कल्पना होती.

इतिहास (इति + ह + आस) याचा अर्थ अमरकोशांत 'पुरावृत्त' असा दिलेला आहे. पुरावृत्त म्हणजे मागे घडलेली गोष्ट. पुराणाची कल्पना 'सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च। वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ॥ या श्लोकांत व्यक्त झाली आहे. जगाची उत्पत्ति, चराचरसृष्टि, निरनिराळे वंश व त्यांच्या कामगिऱ्या, कालाचे विभाग म्हणजे मन्वंतरें हे पुराणाचे पांच विषय होत. इतिहास व पुराण या शब्दांचा वरील अर्थ ध्यानांत घेतल्यास या संज्ञा पूर्वी एकत्र कां वापरीत याचा उलगडा होतो.

पौराणिक कालांत इतिहासविषयक कल्पना विशेष स्पष्ट असलेली दिसून येते. धर्मविषयक भावनेच्या साहचर्यानेच इतिहासविषयक कल्पनेचा या कालांत विकास झाला. डॉ. केतकर म्हणतात की, वेदपूर्वकालापासून इतिहास पुराणग्रंथांत लपला आहे.[4] इतिहासाचें स्वरूप हिंदूंच्या धर्मग्रंथांत ज्याप्रमाणे दिसतें, त्याचप्रमाणे बुद्ध आणि जैन धर्मग्रंथांतहि तें दिसतें. यावरून एक अनुमान असें निघतें की, इतिहासाच्या कल्पना या कालांत सर्व पंथांत सारख्याच स्वरूपाच्या होत्या.

---

१. A History of Indian Literature, Vol. I., P. 527

२. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग ७, पृ. १०६, १०७

३. महाभारत आदिपर्व २-३९

४. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, विभाग ३, पृ. ८

भारतीय इतिहासाचीं प्राचीन साधनें :

प्राचीन कालांत इतिहासविषयक लेखन स्वकीयांनी फारसें केलें नसलें तरी मेगॅस्थेनीस (ग्रीस), ह्युएनत्संग (चीन) अल्मसूदी (अरबस्थान), मनूची (व्हेनीस), बर्निअर (फ्रान्स) इत्यादि परकीय प्रवाश्यांनी हिंदुस्थानासंबंधी आपले अभिप्राय नमूद केले आहेत. त्यांचें निरीक्षण फार नसल्याने त्यांचे अभिप्राय सर्वस्वी विश्वसनीय मानतां येणार नाहीत. असें असूनहि आपल्याकडील पुराणग्रंथ व परकीयांनी लिहिलेलीं प्रवासवृत्तें ह्यांचा इतिहास-लेखनाच्या कामीं बराच उपयोग होतो. निवृत्तिप्रधान जीवनदृष्टीमुळे या देशांत इतिहासनिर्मिति होऊं शकली नाही असें कीथ यांचें मत आहे.[1]

गुप्तकालांत चरित्रें आणि स्थानिक इतिहास असे इतिहासाचे दोन प्रकार रूढ झाले; परंतु त्यांचें लेखन काव्याच्या भूमिकेनेच झालेलें आहे. कालिदासाचा रघुवंश याला इतिहास म्हणण्यापेक्षा काव्य म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. ‘ नैषधीय ’ ह्या ग्रंथाची गणना काव्यांतच करावी लागेल. बाणाने लिहिलेलें ‘ हर्षचरित ’ हा इतिहासविषयक काव्यग्रंथ होय. चरित्र-नायकांचा गुणगौरव करण्यासाठीच हे ग्रंथ निर्माण झाले. त्यांत कित्येक ठिकाणीं दैवी घटनांचें वर्णन असल्यामुळे त्यांची गणना काव्यांतच केली जाते.

बाराव्या शतकांतील काश्मीरच्या कल्हणाचा ‘ राजतरंगिणी ’ हा ग्रंथ मुख्यतः ऐतिहासिक दृष्टीने लिहिलेला आहे. ह्या ग्रंथावरून मात्र त्या काळचा व त्याच्या पूर्वीच्या सुमारें पांचशें वर्षांचा इतिहास कळतो. मात्र इतिहास-काराच्या भूमिकेने लिहिलेल्या राजतरंगिणीचें स्वरूप काव्यात्मकच अधिक आहे. काश्मीरप्रमाणे गुजराथेंतहि इतिहासलेखन होत होतें. प्रबंधचिंतामणि, प्रबंधकोश इत्यादि ऐतिहासिक ग्रंथांतून चालुक्यांच्या राजवटींतील गुजराथच्या इतिहासाचें दर्शन होतें.

तेराव्या शतकांत मूळ अरबींतून पर्शियनमध्ये भाषांतरित झालेला ‘ चचनामा ’ हा ऐतिहासिक ग्रंथ सिंध प्रांतांत लिहिला गेला. अरबांनी सिंध प्रांतावर केलेल्या स्वारीचें वर्णन यांत आहे. या ग्रंथाला ‘ तारिखे हिंद ’ किंवा ‘ फतनामा ’ असेंहि म्हणतात. मूळ अरबीचा भाषांतरकार मुहम्मद

१. Classical Sanskrit Literature, P. 61

अली बिन हमीद बिन अबू बकर कूफी हा होय. ह्या इतिहासांतील वंशावळी सर्वस्वी बरोबर नाहीत आणि कालविपर्यासाच्या चुका ह्यांत आहेत. हे दोष असूनहि हा अधिकृत इतिहास मानला जातो.

अरबांनंतर अफगाण, तुर्क इत्यादिकांनी इतिहास लिहिला. त्यांनी विशेषतः अरबांचेंच अनुकरण केलें. गजनीच्या सुलतानाचा समकालीन अबुरिहान किंवा अलबेरुनी याचें इतिहासलेखन बुद्धिप्रामाण्यवादी असल्यामुळे विशेष उल्लेखनीय आहे. तुर्कांच्या कालापासून इतिहासाचें खरें लेखन सुरू झालें. मोगल बादशहांपैकी बाबर, जहांगीर, औरंगजेब इत्यादिकांचीं चरित्रें व आत्मचरित्रें प्रसिद्ध आहेत. दैनंदिन व्यवहारांतील राजकीय पत्रव्यवहारांचें ऐतिहासिकदृष्ट्या संरक्षण, दररोजच्या घटनांची नोंद, ऐतिहासिक घटनांचा सुसंबद्ध इतिहास, बातमीपत्रें हीं मुसलमानी राजवटींचीं वैशिष्ट्यें होत.

नेपाळांतहि स्थानिक इतिहास आढळतात. यांतील याद्यांत काटेकोरपणा नसला तरी इतिहासाचें एक साधन म्हणून त्यांचें महत्त्व आहे. राजस्थानांत भाट किंवा दरबारी कवी यांनी रचलेल्या ‘ रासा ’ नामक ग्रंथप्रकारांत ऐतिहासिक माहिती दिसते. थोर व्यक्तींचें गुणसंकीर्तन ह्या एकमेव हेतूने या ग्रंथांची रचना झाली असल्यामुळे त्यांचें स्वरूप एकांगी झालें. या ग्रंथांपैकी पृथ्वीराज चव्हाण याच्यासंबंधी असलेला ‘ पृथुराजरासा ’ हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. मेवाडच्या रासाग्रंथांत शिवाजीची वंशावळ असल्याचें राजवाडे म्हणतात.[१] बंगाली वाङ्मयांतील धर्ममंगल काव्यें हीं ऐतिहासिक स्वरूपाचीं आहेत. या प्रांतांत प्राचीन वंशावळी उपलब्ध आहेतच. हिंदुस्थानांतील इतर प्रांतांप्रमाणे आसामांतहि इतिहास निर्माण झाले. आसामी इतिहासांना ‘ बुरंजी ’ अशी संज्ञा आहे. अशाच प्रकारचें ‘ याजविन ’ किंवा ‘ रजविन ’ नामक ऐतिहासिक लेखन ब्रह्मदेशांत झालेलें आढळतें. सीलोनमधील बुद्धमठांत लिहिलेल्या महावंसो, दीपवंसो या ऐतिहासिक ग्रंथांत बुद्धधर्माचा इतिहास व निरनिराळ्या राजांनी मठांना दिलेल्या दानांचा उल्लेख आढळून येतो. हें सारें भिक्षुवाङ्मय धार्मिक स्वरूपाचें आहे.

मध्ययुगांत परकीयांनी इतिहासलेखन केलें. हे इतिहासकार म्हणजे मार्कोपोलो, इब्नबतूता, निकोलो डी कॉंटी हे होत. याशिवाय जेसुइट

१. ऐ. प्र., पृ. २३१

मिशनरी लोकांनी लिहिलेलीं वृत्तें, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, व इंग्रज या लोकांनी व्यापारासाठी केलेला पत्रव्यवहार इत्यादि साधनें तत्कालीन इतिहासाची खरी माहिती देतात. सारांश, प्राचीन कालापेक्षा मध्ययुगीन साधनें इतिहासदृष्ट्या महत्त्वाचीं आहेत. आजच्या दृष्टीने प्राचीन किंवा मध्ययुगीन कालांत इतिहासलेखन झालें नसलें तरी उपरिनिर्दिष्ट प्रयत्न हे इतिहासाच्या तीव्र जाणिवेचे निदर्शक मानणें योग्य ठरेल.

मुसलमानी इतिहासाचे विशेष :

इतिहासलेखनाची परंपरा हिंदुस्थानांत फार जुनी असली तरी आजच्या अर्थाने राजकीय स्वरूपाचें लेखन मुसलमानी रियासतींतच झालें. इतिहास-लेखन हा मुसलमानी अमदानीचा विशेष म्हटला पाहिजे. मुसलमानांच्या आगमनानंतर आपल्याकडील इतिहासविषयक कल्पनेंत फरक पडला. इतिहास म्हणजे तत्कालीन राजकारण अशी कल्पना रूढ झाल्यामुळे राजकारण हें इतिहासाचें मुख्य गमक बनलें.

मध्ययुगांत राजा ह्या संस्थेस महत्त्व प्राप्त झाल्यामुळे तिच्याविषयीं आदर-पूर्वक माहिती लिहून ठेवणें हें तत्कालीन राज्यशासनाचें एक विशिष्ट धोरण होतें. मुसलमानी राजवटींतील इतिहास हे तवारिखा, नामे, अखबार इत्यादि स्वरूपांत होते. दैनंदिन इतिहास लिहिण्याची प्रथा बहुतेक सर्व मुसलमानी पादशहांच्या कारकीर्दीत होती. अशा प्रकारचें लेखन करणारे जहूर, अबुल-फजल, मिर्झा मुहंमद, काफीखान हे लेखक महाराष्ट्र व दिल्ली येथील पादशहांच्या आश्रयास होते. त्या पादशहांच्या आज्ञेनेच त्यांनी आपले इतिहास-लिहिले आहेत. हे इतिहासकार एका विशिष्ट पक्षाचे असल्यामुळे त्यांचा इतिहास पक्षपातीपणाने लिहिला जाई. स्वकीयांची स्तुति व परकीयांची निंदा असें त्याचें स्वरूप होतें. असें असलें तरी राजकीय स्वरूपाच्या इतिहास लेखनाची परंपरा या दृष्टीने त्याचें महत्त्व आहे. इराण, अरबस्थान, अफगाणिस्थान या देशांत ही परंपरा फार जुनी होती.

महाराष्ट्रांतील इतिहासलेखन :

महाराष्ट्रांत इतर बाबतीप्रमाणे इतिहासलेखनाच्या बाबतींतहि मुसलमानांचें अनुकरण झालें. राजवाडे म्हणतात की, मुसुलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला. शिवाजीची

राज्यपद्धति अष्टप्रधानात्मक होती. शिवाजीने ही राज्यपद्धति मुसुलमानांपासून घेतली......शिवाजीने केवळ मुसुलमानांचा कित्ता गिरविलेला आहे.[१] ज्या अर्थी पेशवा, मुजुमदार, वाकनीस इत्यादि नांवें मुसलमानांच्या दरबारांतील आहेत, त्या अर्थी शिवाजीने मुसलमानांच्या पद्धतीचें अनुकरण केलें असलें पाहिजे. एवढें मात्र खरें की, मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेचें एकंदर स्वरूप (pattern) मुसलमानी पद्धतीचेंच होतें.

मोंगलांचें साम्राज्य या देशांत पुष्कळ काळपर्यंत टिकलें असल्यामुळे त्यांच्या राज्यपद्धतीस स्थैर्य आलें होतें. पादशहा कोणता का असेना, राज्ययंत्र मात्र एकाच प्रकारचें असे. मराठयांच्यापुढे मुसलमानी राज्यशासनाचा आदर्श असल्यामुळे साहजिकच त्यांचें अनुकरण झालें. मुसलमान हे जेते असल्यामुळे जितांवर त्यांच्या संस्कृतीचा परिणाम होणें स्वाभाविकच होतें. भाषेच्या बाबतींत तर तत्कालीन मराठीवर फार्शीचा परिणाम फार झाला. इतिहास म्हणून लिहिल्या जाणाऱ्या बखरींची निर्मिति ही वर उल्लेखिलेल्या अपरिहार्य कारणामुळे झाली.

बखरपरंपरा :

जींत इतिहासाचा कांही अंश सापडतो अशी अत्यंत जुनी बखर म्हणजे शालिवाहनाची बखर होय, असें राजवाड्यांचें मत आहे.[२] उपलब्ध असलेल्या बखरीची भाषा पुष्कळच अलीकडची दिसते, पण तिचें मूळ फार जुनें असावें. महाराष्ट्र–सारस्वतकार म्हणतात की, हल्ली ज्या ऐतिहासिक बखरी प्रसिद्ध आहेत त्या सर्वांत (९० किंवा) ९६ कलमी बखर ही फार जुनी आहे.[३] केवळ रचनाकालाच्या दृष्टीने पाहिलें तरी महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर ही सर्वांत जुनी म्हणून मान्य करावयास हवी. शालिवाहनाच्या बखरीनंतरच्या बखरी म्हणजे मानभावांनी लिहिलेल्या सिंघणादि यादवांच्या बखरी, हेमाडपंतांची बखर, राक्षसतागडीची बखर इत्यादि होत. शके १४८८ (इ. स. १५६६) त लिहिलेली राक्षसतागडीची बखर ही शिवपूर्वकालीन शेवटली बखर होय.

---

१. ऐ. प्र., पृ. २; १०४

२. ऐ. प्र., पृ. ३४८

३. महाराष्ट्र–सारस्वत (आवृत्ति चौथी), पृ. ७८१

ह्यानंतरच्या कालापासून पुढे लवकरच मराठी राज्याचा काल सुरू झाला. शिवशाही ह्या नांवानें हा काल इतिहासांत प्रसिद्ध असून स्वराज्याच्या मंदिराची उभारणी या कालांत झाली. या कालापासून शके १७४० (इ. स. १८१८) म्हणजे पेशवाईअखेर मराठ्यांच्या इतिहासांतील निरनिराळ्या प्रसंगांवर सुमारें दोन अडीचशें बखरी लिहिल्या गेल्याचें राजवाड्यांनी म्हटलें आहे. राजवाड्यांनी बखर हा शब्द हकीगत या स्थूल अर्थानेच वापरलेला दिसतो; कारण ह्या बखरींत त्यांनी टिपणें, यादी, रोजनिशा हकीगती इत्यादि त्रोटक वृत्तान्तकथनापासून ऐतिहासिक लेखसंग्रह, संतचरित्रें इत्यादि बाडांपर्यंत सर्वांचा समावेश केला आहे.

आंग्लकालांतहि बखरींचें लेखन झालें. या बखरी म्हणजे पौराणिक, मिशनरी-चळवळविषयक व ऐतिहासिक अशा स्वरूपाच्या होत. पौराणिक कथा लोकप्रिय करण्यासाठी बखरींच्या पद्धतीनें लिहिलेल्या बखरी या पौराणिक बखरी आहेत. परकीय मिशनरी लोकांनी आपल्या धर्मप्रसाराच्या इतिहासास बखर हें नांव दिलें. सरकारच्या माहितीकरिता जहागिरदार व सरदार यांच्या घराण्यांच्या संक्षिप्त हकीगती तयार झाल्या त्या ऐतिहासिक बखरी होत. याशिवाय विशिष्ट संप्रदायांचे वृत्तान्त म्हणून सांप्रदायिक बखरी तयार झाल्या.

बखरींचें वर्गीकरण :

बखर म्हणजे बातमी, हकीगत असा मूळचा त्या शब्दाचा अर्थ असला तरी राजकीय स्वरूपाच्या ऐतिहासिक लेखनासच ती संज्ञा मुख्यत्वेंकरून दिली जाते. पुढे पुढे बखर शब्दामागील कल्पना अधिक व्यापक झाल्यामुळे बखरींचे विविध प्रकार निर्माण झाले. ह्या दृष्टीने पाहतां स्थूलमानाने बखरींचे मुख्य तीन वर्ग कल्पितां येतील.

पहिला वर्ग म्हणजे बखर हें नांव असलेल्या राजकारणात्मक किंवा ऐतिहासिक बखरी. या प्रकारच्या बखरींत राजकीय इतिहास असतो. एखादा ऐतिहासिक प्रसंग किंवा एखादी ऐतिहासिक व्यक्ति ह्यासंबंधी माहिती सांगणाऱ्या ह्या बखरींचा एक स्वतंत्र वर्ग आहे. ह्याच खऱ्या अर्थाने बखरी होत. ह्या प्रकारच्या बखरींत समकालीन राजकारणाचा इतिहास असतो. कोणतीहि ऐतिहासिक घटना प्रत्यक्ष डोळ्यांपुढे घडल्याप्रमाणे बखरकार तिची माहिती सांगतो. ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने समकालीन बखरी

बऱ्याच विश्वसनीय असतात. वर्ण्यविषयाशीं लेखकाचा साक्षात् परिचय असल्यामुळे किंवा त्या कालांत तो प्रत्यक्ष वावरत असल्यामुळे या प्रकारच्या बखरींत खरा इतिहास येणें शक्य असतें. कोठे सत्यापलाप झाल्यास बखरनवीसाने तो हेतुपुरस्सर केलेला नसतो.

ह्या प्रकारच्या बखरींचा दुसरा प्रकार म्हणजे पूर्वकालीन राजकारण असलेल्या बखरी होत. एखादी ऐतिहासिक घटना घडून गेल्यावर मागाहून आठवणी, दंतकथा, परंपरागत दाखले इत्यादींच्या आधारें असल्या बखरी लिहिल्या जातात. उत्तरकालीन बखरींत उपलब्ध पुराव्याची छाननी करण्यास तसेंच कथनपद्धति विशेष कलात्मक करण्यास बखरकारास संधि मिळते. ह्यांत कित्येक वेळां कालविपर्यास, स्थलविपर्यास किंवा व्यक्तिविपर्यास होणें साहजिकच असतें; परंतु समकालीन बखरीप्रमाणे ह्याहि बखरींत हेतुपुरस्सर सत्यापलाप होत नाही. बहुतेक बखरींचें लेखन उत्तरकालींच झालेलें असल्यामुळे समकालीन बखरींची संख्या अत्यल्प आहे. भाऊसाहेबांची बखर ही समकालीन असून कृ. वि. सोहनीविरचित पेशव्यांची बखर ही उत्तरकालीन म्हणतां येईल.

बखरींचा दुसरा वर्ग म्हणजे बखर हें नांव प्रत्यक्ष न दिलें तरी बखरसदृश असें ऐतिहाहिक लेखन हा होय. उदाहरणार्थ, वाका, कैफियत, हकीगत, चरित्र, आत्मचरित्र, इत्यादि. नेहमींच्या बखरींच्या मानाने या प्रकारचें लेखन हें त्रुटित किंवा स्फुट स्वरूपाचें असतें. या प्रकारच्या लेखनांत उपरिनिर्दिष्ट पहिल्या वर्गाच्या बखरींचा गाभा असतो. म्हणूनच या प्रकारास प्रत्यक्ष बखर ही संज्ञा नसली तरी याचा अंतर्भाव बखरवाङ्मयांत करणें योग्य होईल. असल्या प्रकारच्या लेखनाचा प्रसार उत्तर मराठेशाहींत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झालेला आढळतो. निरनिराळ्या घराण्यांच्या हकीगती किंवा भिन्नभिन्न व्यक्तींच्या कैफियती या तत्कालीन इतिहास कथन करणाऱ्या बखरीच आहेत. पटवर्धनी वाका, आंग्र्यांची हकीगत, भाऊसाहेबांची कैफियत हीं या प्रकारचीं उदाहरणें होत.

ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या परंतु बखर हें नांव असलेल्या लेखनाचा एक स्वतंत्र वर्ग आहे. या प्रकारांत विशेषतः सांप्रदायिक व पौराणिक बखरींची गणना होते. एका विशिष्ट संप्रदायाची हकीगत,

तसेंच पुराणांतील व्यक्ती व घटना हे या बखरींचे विषय असतात. वस्तुतः खऱ्या अर्थानें या बखरी नव्हेत. याचें कारण असें की, या प्रकारचें लेखन श्रद्धामय असून त्याचें स्वरूप धार्मिक असतें. चमत्कार, अवताराच्या कल्पना, आदर्श जीवन यांनीच त्यांचा देह घडलेला असतो. यांत स्थूल सत्याच्या राईचा अद्भुताचा पर्वत केलेला असल्यामुळे ऐतिहासिक सत्याचें प्रमाण अल्प असतें. समर्थांची बखर, कृष्णजन्मकथा बखर हीं या प्रकारच्या बखरींचीं उदाहरणें होत.

बखरींचें बहिरंग :

राजकीय इतिहासकथन हेंच बखरींचें खरें स्वरूप असल्याचें आपण येथपर्यंत पाहिलें. आता विशिष्ट लेखनप्रकार या दृष्टीने बखरींच्या बहिरंगाचा विचार करणें योग्य ठरेल.

बखरलेखन हें गद्यात्मक आहे. केशवाचार्यादिकृत महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर हाच काय तो अपवाद म्हणतां येईल. याचें कारण म्हणजे या बखरीचें स्वरूप गद्यपद्यमिश्रित असें आहे. गद्यात्मक मजकूर हा पद्यापेक्षा अधिक निश्चित स्वरूपाचा असतो, म्हणूनच बखरनवीसांनी गद्याचा आश्रय घेतला असावा. आंग्ल लेखक जे. मिड्लटन मरी यांच्या मतें गद्यलेखन हें केवळ निश्चित विचारसरणीचेंच निदर्शक नसून यथार्थ वर्णनाचेंहि तें निदर्शक आहे. याशिवाय ते असेंहि म्हणतात की, लेखनाचें माध्यम–मग तें गद्य असो की पद्य असो–तत्कालीन संकेतावर अवलंबून असतें.[1] पत्ररूपात्मक लेखन या संकेतामुळे बखरीचें लेखन गद्यस्वरूपाचें झालें आहे.

बखरीची निर्मिति एका विशिष्ट परिस्थितींतच झालेली असते. कोणा तरी राजकीय पुरुषांच्या आज्ञेने ती सामान्यतः लिहिली जाते. मुसलमानी इतिहासाचा हा विशेष मराठी बखरींत अनुकरणाने आलेला स्पष्ट दिसतो. बहुतेक बखरकारांस राजाश्रय असल्यामुळे तसल्या प्रकारचें लेखन करणें हें त्यांस आवश्यक कर्तव्य वाटल्यास नवल नाही. उदाहरणार्थ, 'साहेबी मेहेरबानी करून सेवकास......आज्ञा केली. त्याजवरून वर्तमान ऐसी जे' अशी सभासदाच्या बखरीची सुरुवात श्रीमंत महाराज राजाराम छत्रपति

---

१. The Problem of Style, P. 57–58

यांना उद्देशून आहे. 'नवी खबर श्रीमंत याजकडून वर्तमान आजपर्यंत झालें तें विदित व्हावें म्हणून आज्ञाधारकास आज्ञा जहाली. त्यास यथामतीने निवेदन करितों. श्रवण केलें पाहिजे' असा पाणिपतचा बखरकार रघुनाथ यादव श्रीमंत गोपिकाबाईसंबंधी उल्लेख करतो. बखर समकालीन असो किंवा उत्तरकालीन असो, तिचें स्वरूप असें आहे. बहुतेक बखरी या पोष्य-पोषकभावाने लिहिलेल्या आढळतात. हें बखरीचें वैशिष्ट्य होय.

बखरीचा दुसरा विशेष म्हणजे तिची सुरुवात पुराणपद्धतीची असते. कोणत्याहि घटनेचा एकदम वृत्तान्त न सांगतां सृष्टीची उत्पत्ति देऊन प्राचीन निरनिराळ्या राजांच्या वंशाची तींत माहिती दिलेली आढळते. शिवकालीन विषयांवरच्या कित्येक बखरींत हा प्रकार दिसतो. उदाहरणार्थ, चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्राचें पूर्वजवर्णन आणि जन्मकथन हें पहिलें प्रकरण अशा स्वरूपाचें आहे. तंजावरच्या भोसलेवंशचरित्र या शिलालिखित बखरीचा लेखक कांहीसें असेंच लिहितो. शिवकालीन विषयांवरील बखरीसंबंधी हा संकेत पुढील कालांतील बखरींत सहसा आढळत नाही.

बखरीचा शेवटहि एका विशिष्ट पद्धतीने झाल्याचें दिसतें. ती पद्धति म्हणजे बखरींची फलश्रुति ही होय, उदाहरणार्थ, 'जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणेप्रमाणे सर्व मनोरथ पूर्ण होतील.' असा सभासदाच्या शिवछत्रपतीच्या चरित्राचा शेवट आहे. चिटणीसविरचित शिवछत्रपतीच्या चरित्राच्या शेवटीं 'हे कथा श्रवण, मनन, पठण केली असतां सर्व विघ्नें दूर होऊन पुण्य व यश प्राप्त होईल आणि सर्वगुणसंपन्नता प्राप्त होऊन, सकल ऐश्वर्यलक्ष्मी तत्काल प्राप्त होईल' असें लेखक म्हणतो.

बखरींचें अंतरंग :

अंतरंगाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली हा बखरींचा एक मुख्य गुण म्हणतां येईल. हा गुण बखरलेखनाच्या प्रौढ पण रसाळ भाषापद्धतींत व्यक्त होतो. भाऊसाहेबांची बखर, चिटणिसांच्या बखरी इत्यादि ज्या कांही वाङ्मयगुणांनी संपन्न अशा बखरी आहेत त्यांचा हा एक प्रभावी विशेष आहे.

फारसी शब्दांचें आधिक्य आणि आजच्या दृष्टीने शिथिल वाक्यरचना हीं बखरींत आढळतात. बखरींतले पारिभाषिक शब्द हे बव्हंशीं फारसी

भाषेंतीलच असतात. हस्तनाला, सुतरनाला, जेजाला, हुजुरात, बरकंदाज, जिलीब इत्यादि पारिभाषिक शब्द फारसीच आहेत. शिथिल वाक्यरचनेच्या बखरीचें उदाहरण म्हणजे श्रीमंत महाराज भोसले यांची बखर (शेडगांवकर बखर) हें होय. दीर्घवाक्यरचनेपेक्षा लघुवाक्यरचनेकडे बखरकारांचा कल अधिक असतो. लहान लहान सुटीं वाक्यें बखरींत आढळतात. सुटीं वाक्यें परिणामाच्या दृष्टीनें अधिक उपयोगी असतात. त्यांत एकच एक कल्पना असल्यामुळे अर्थग्रहणाच्या दृष्टीनेंहि तीं महत्त्वाचीं ठरतात. भाऊसाहेबांची बखर यामुळेच आकर्षक झाली आहे. प्रचलित मराठी भाषेंत ज्या ठिकाणीं 'की' शब्दाची योजना होते तेथे 'जे' या शब्दाचा वापर, तसेंच तृतीयान्त कर्त्यांत वाक्य सुरू करून नंतर तें कर्तरि प्रयोगांत संपविल्याचीं उदाहरणें चिटणिशी बखरींत विशेष दिसून येतात.

कारकुनी म्हणजे जमाखर्चाची पद्धत हा बखरकारांचा सर्वसामान्य संकेत आहे. सैन्य, कोटदुर्ग, सरदार इत्यादींची माहिती बखरींत जमाखर्ची पद्धतीनें म्हणजे बितपशील लिहिलेली आढळते. अशा प्रकारची माहिती चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांत दिलेली आहे. रघुनाथ यादवाच्या पाणिपतच्या बखरींतहि हाच प्रकार दिसून येतो.

बखरकारांची लेखनशैली ही त्यांच्या उत्कृष्ट निवेदनपद्धतीमुळे आकर्षक झालेली आहे. बहुतेक बखरींचा एकंदर थाट हरिदासी पद्धतीचा दिसतो. श्रोत्यांचें भान हरपण्यासाठी हरिदास ज्याप्रमाणे विविध साधनांचा अवलंब करतात, त्याचप्रमाणे बखरकारहि वाचकांचें चित्त वेधण्यासाठी अनुरूप भाषा, काव्यात्म कल्पना, अलंकार, सुभाषितें, म्हणी इत्यादि साधनें वापरतात. हरिदासी भाषेचा अस्खलित ओघ बखरींत स्पष्टपणें आढळतो. भाऊसाहेबांची बखर हें याचें सर्वोत्कृष्ट उदाहरण होय. निवडक प्रसंग, निवडक शब्दांच्या साहाय्यानें प्रभावीपणें व्यक्त करण्याचें बखरकारांचें कौशल्य अप्रतिम आहे.

अत्युक्ति हें बखरींचें एक अंग आहे. वर्ण्यविषयासंबंधी आत्यंतिक जिव्हाळा असल्यामुळे बऱ्याच वेळां बखरकारांच्या हातून अतिशयोक्तिपूर्ण लेखन झालेलें आहे. या प्रकारच्या लेखनामुळे बखरींत एक प्रकारचा अद्‌भुतपणा निर्माण झालेला दिसतो. राक्षसतागडीची बखर, सभासदाची बखर, चिटणिसांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र इत्यादि बखरींत तो विशेषेंकरून

आढळतो. बहुतेक बखरी या गौरवार्थ लिहिलेल्या असल्यामुळे त्यांचें लेखन अत्युक्तिपूर्ण किंवा अद्‌भुतवर्णनात्मक होणें स्वाभाविक आहे. अद्‌भुतवर्णन हें शिवपूर्वकालीन व शिवकालीन विषयांच्या बखरींचें वैशिष्टय होय.

पुढील कालांतील म्हणजे पेशवेकालांतील विषयांवरील बखरींत अद्‌भुत-वर्णन फारसें नसलें तरी अत्युक्ति मात्र सापडते. भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर यांसारख्या समकालीन बखरींत तद्वतच हरिवंशाची बखर, खर्ड्यांच्या स्वारीची बखर इत्यादि उत्तरकालीन बखरींत अत्युक्ति आहे. अत्युक्तिपूर्ण लेखन हा पौराणिक कथांचा परिणाम असावा. स्वतः बखरकार हा कारकुनी पेशांतला असला तरी ज्यांच्यासाठी त्याने बखरी लिहिल्या त्यांच्या दृष्टीने अद्‌भुत व अत्युक्तिपूर्ण अशी पौराणिक पद्धति आवश्यक होती. निवेदनाच्या दृष्टीने ही पद्धति उपयुक्त होय. या पद्धतीमुळेच बहुतेक बखरी वाचनीय झाल्या आहेत.

इतिहासलेखनाचें स्वतंत्र शास्त्र या देशांत निर्माण झालें नसल्यामुळे पौराणिक कथनपद्धतीचा बखरकारांनी आश्रय घेणें स्वाभाविकच होतें. कित्येक बखरींच्या मूळप्रतींचीं जीं अनेक हस्तलिखितें सापडतात तीं या पौराणिक किंवा धार्मिक भावनेनेंच लिहिलीं असलीं पाहिजेत. मुद्रणकलेच्या अभावीं निर्माण झालेलीं हस्तलिखितें केवळ ऐतिहासिक भावनेचीं निदर्शक आहेत असें निदान शिवकालीन विषयांवरील बखरींसंबंधी म्हणतां येणार नाही. पेशवेकालीन विषयांवरील बखरींत शिवकालीन विषयांपेक्षा ऐतिहासिक दृष्टि ठळकपणें दिसते, तरी पण आजची ऐतिहासिक शास्त्रीय दृष्टि त्यांत नाही. पौराणिक पद्धतीमुळे म्हणजेच शास्त्रीय दृष्टीच्या अभावामुळे बखरींतील ऐतिहासिक प्रामाण्य कमी झालेलें आहे. राजवाडे म्हणतात की, एक अस्सल चिटोरें सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस आहे.[१]

बखरलेखनांत परंपरेने आलेल्या माहितीस प्राधान्य दिलेलें असतें. कथा, आख्यायिका, दंतकथा हा बखरींचा कच्चा मालमसाला होय. बखरकार हा सामान्यतः या साधनांवर अवलंबून असला तरी कित्येक वेळां जुनीं बाडें किंवा परंपरागत लिहून ठेविलेली माहिती यांचाहि तो उपयोग करून घेतो. या प्रकारचें उदाहरण म्हणजे चिटणिशी बखरी या होत.

१. ऐ. प्र., पृ. ४

संगतवार इतिहास हा बखरींचा एक गुण आहे. कोणतीहि बखर घेतली तरी तींत इतिहासाची एक संगति असते. बखरींत अनेक घटनांची एक सलग साखळी असल्यामुळे त्यांतील घटनांचा क्रम चटकन लक्ष्यांत येतो. ऐतिहासिक पत्रांतहि इतिहास असतो; पण त्याचें स्वरूप त्रोटक असतें. यामुळे एका विशिष्ट पत्रावरून इतिहासाची संगति समजणें कठिण जातें. त्याचप्रमाणे अनेक ऐतिहासिक पत्रांवरून ऐतिहासिक घटनांची संगति जुळविणें हेंहि काम सोपें नाही. ऐतिहासिक पत्रें हीं तात्कालिक गरजेच्या दृष्टीने लिहिलीं असल्यामुळे त्यांत सर्व प्रकारची माहिती येणें शक्य नसतें. पत्रलेखकाच्या दृष्टीने महत्त्वाचा तेवढा मजकूर त्यांत असतो. कित्येक प्रसंगीं या पत्राचें स्वरूप सांकेतिक असतें. उदाहरणार्थ, काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे यांतील लेखांक ९९ चें नानासाहेबांनी शिंदे-होळकरास लिहिलेलें पत्र हें होय. बखरींचें तसें नाही. घटनानुक्रम, कालानुक्रम इत्यादि बाबींमुळे बखरींतील इतिहासाला एक पद्धति आलेली असते, हा बखरींचा विशेष होय.

बखरींचें लेखन पक्षनिष्ठपणाने झालेलें असतें. या पक्षनिष्ठपणाचा परिणाम म्हणजे इतिहासाचा एकांगीपणा हा होय. कोणाच्या तरी आज्ञेने बखरीचें लेखन झालेलें असल्यामुळे त्या व्यक्तीच्या बाजूने बखरकारास लेखन करणें अपरिहार्य ठरतें. गुणसंकीर्तन ही बखरकाराची भूमिका असते. म्हणूनच त्याचें लेखन एकांगी होतें. सभासदाची बखर, चिटणिशी बखरी, भाऊसाहेबांची बखर, होळकर, दाभाडे, गायकवाड, आंग्रे इत्यादि सरदारांच्या कैफियती व हकीगती यांत दिसून येणाऱ्या एकतर्फी इतिहासाची कारणमीमांसा अशी आहे. पक्षनिष्ठपणा हा ऐतिहासिक सत्याला उपकारक नसला, तरी आवेशादि वाङ्मयगुणांना तो पोषकच होतो. एकांगीपणाचा दोष जमेस धरूनहि इतिहासाची एक बाजू म्हणून बखरींचें ऐतिहासिक महत्त्व मान्य केलें पाहिजे.

आटोपशीरपणा हा वाङ्मयीन गुण बखरींत आढळतो. बखरींतील प्रसंग कोणतेहि असोत. ते थोडक्यांत पण परिणामकारकतेने निवेदन करण्यांत बखरकाराचें चातुर्य प्रगट होतें. चित्रगुप्ताची बखर, सोहनीकृत पेशव्यांची बखर, शिवदिग्विजय, शेडगांवकर बखर इत्यादि कांही बखरींत पाल्हाळ

आढळत असला किंवा त्यांत पुनरुक्ति हा दोष असला तरी सभासदाचें शिवछत्रपतीचें चरित्र, श्रीमंत भाऊसाहेबांची कैफियत, भाऊसाहेबांची बखर, नानांचें आत्मचरित्र, पटवर्धनी वाका इत्यादि बखरींत कटाक्षानें संयम पाळलेला आहे. बखरकारांचें हें कौशल्य त्यांतील लहान पण अर्थपूर्ण वाक्य-रचनेंत दिसतें. वेचक शब्द, मार्मिक व भावपूर्ण वाक्यें, अनुरूप सुभाषितें, अलंकार, यथार्थ रसपरिपोष इत्यादि गुणविशेषामुळे बखरींत सौंदर्य निर्माण झालें आहे. बखरींचें वैशिष्ट्य हेंच की, त्यांतील कोठल्याहि घटकाकडे नजर टाकली तर त्यांत सहजता असल्याचा प्रत्यय येतो. लेखनाचा स्वाभाविकपणा हा बखरींचा गुण होय. या स्वाभाविकतेला लेखकाच्या बहुश्रुतपणाची, मार्मिक निरीक्षणाची व कल्पकतेची अनुपम जोड मिळाल्यामुळे हें सारें लेखन सौंदर्यगंगेंत सुस्नात होऊन तेजस्वी झालेलें आहे.

पौराणिक कथांचे आदर्श बखरकारांच्या पुढे असले तरी त्यांचें केवळ अंधानुकरण न करतां बखरींत त्यांचा योग्य उपयोग करून आपलें स्वतंत्र व्यक्तित्व प्रगट करण्यांत त्यांनी यश मिळविलें आहे. भावनापूर्ण लेखन हें बखरींच्या यशाचें अमोघ साधन होय; किंबहुना भावनात्मकता हा बखरींचा प्राण आहे. निवडक नाट्यपूर्ण प्रसंगांच्या धाग्यांनी बखरींचें महावस्त्र विणण्यांत बखरकारांचें कसब दिसतें. एखाद्या ललितकथाकाराप्रमाणे विशिष्ट दिशेने लेखनाची सुरुवात करून त्याचा शेवट विशिष्ट मर्यादेंत करण्याचें अद्वितीय कौशल्य बखरकारांच्या अंगीं निश्चित आहे.

कालविपर्यास, व्यक्तिविपर्यास व प्रसंगविपर्यास हे बखरींतील दोष आक्षेपक सांगतात खरे; पण सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास तसें घडण्यास कांही कारणें आहेत असें दिसून येईल. बहुतेक बखरी या स्मृतीवर हवाला ठेवून लिहिलेल्या आहेत. दंतकथा, आख्यायिका इत्यादि ऐकीव माहिती हीं बखरलेखनाचीं प्राथमिक साधनें असल्याचें आपण मागे पाहिलें. रंजकत्व हा सर्वसाधारण बखरलेखनाचा हेतु असल्यामुळे तो साध्य करण्यासाठी अत्युक्ति व कल्पकता यांचा आश्रय घेणें बखरकारांस आवश्यक होतें. त्यामुळे ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने त्यांच्या हातून साधनचिकित्सा होऊं शकली नाही. कौटुंबिक व राष्ट्रीय अभिमान यांच्या समाधानार्थ बखरी लिहिल्या गेल्या हें ध्यानांत घेतल्यास बखरींतील कल्पकता समर्थनीय ठरते. इतिहासाच्या

आधुनिक शास्त्रीय दृष्टीच्या अभावीं कालविपर्यास, प्रसंगविपर्यास इत्यादि दोष त्यांत निर्माण झाले आहेत. हे दोष मान्य करूनहि राजवाडे म्हणतात की, ह्या सर्व बखरींत व हकीकतींत असा एक मोठा अद्वितीय गुण आहे की, प्रायः झाल्या प्रसंगाची हकीगत सांगतांना सत्याचा अपलाप जाणून बुजून कोठेहि केलेला नाही.[1]

उपरिनिर्दिष्ट दोष बखरींत आढळत असले तरी त्यामुळे मुख्य कथा-वस्तूची मुळीच हानि होत नाही. एकाच विषयाच्या निरनिराळ्या बखरींचें वाचन केलें असतां बखरींच्या वरील दोषांची संशयनिवृत्ति सहज होण्या-सारखी आहे. या दोषांमुळेच बखर हा स्वतंत्र लेखनप्रकार मानावा लागतो. इतिहास आणि बखर हे याच कारणामुळे भिन्न प्रकार झालेले आहेत. बखरींचें ऐतिहासिक मूल्य कांहीहि असलें तरी वाङ्मयदृष्ट्या हे दोष विचारांत घेण्यासारखे नाहीत हें खरें. ज्या कालांत बखरींचें लेखन झालें त्या कालाचें तें प्रातिनिधिक वाङ्मय आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

कथनपर किंवा आख्यानात्मक स्वरूप हें बखरीचें एक विशेष अंग होय. बखर हा एक प्रकारचा इतिहास असल्यामुळे त्याचें स्वरूप कथनपर होतें. बखरींतील घटना घडलेली खरी; पण वाचकाच्या दृष्टीने ती कथात्मक असते. म्हणूनच बखरकाराची भूमिका ही कथाकाराची होते. कथात्मक पद्धतीने वृत्तान्त-निवेदन हें बखरीचें खरें स्वरूप होय. केवळ विषयामुळे बखर ही कथनपर नाही तर ती ज्या पद्धतीने लिहिली जाते त्या पद्धतीमुळेच ती आख्यानपर होते. चिंतनात्मक किंवा तत्त्वज्ञानात्मक भाग हा बखरींत नसतोच असें नाही; किंबहुना इतर घटकांप्रमाणे बखरींतला तोहि एक लक्षणीय भाग असतो. बखरींत एखादें तत्त्वज्ञान सुभाषिताच्या साहाय्यानें विशद करून प्रसंगाच्या वर्णनाला तें पोषक केलेलें असतें. वर्णनें किंवा तत्त्वज्ञान यांचा उपयोग आख्यान किंवा मुख्य कथासूत्र हें अधिक रमणीय करण्याकडे होत असल्यामुळे बखरी केवळ वर्णनपर (Descriptive) किंवा चिंतनपर (Reflective) न होतां आख्यानात्मक कां होतात हें यावरून कळून येईल.

कलेंतील महत्त्वाचें तंत्र म्हणजे सुंदर मांडणी हें बखरींचें एक अत्यावश्यक अंग होय. यामुळेच कलादृष्ट्या बखरींचें मूल्य वाढलेलें आहे.

१. ऐ. प्र., पृ. ३४९

२ ...म. ब.

केवळ मजकुराच्या बाबतींत एखाद्या विशिष्ट विषयावरील अनेक बखरींत साम्य आढळलें, तरी रचनेच्या दृष्टीने त्यांच्यांत फरक दिसून येतो. हा फरक म्हणजे त्या त्या बखरकारांच्या व्यक्तित्वाचा परिणाम होय. बखरींच्या रचनेंत लेखकांचें व्यक्तित्व प्रगट झालें असल्यामुळे प्रत्येक बखर स्वतंत्र दिसते. या व्यक्तित्वामुळे प्रत्येक बखरीचें वाङ्मयीन मूल्य कमी-अधिक प्रमाणांत प्रतीत होतें.

बखरींचें निर्णायक गमक :

बखरींचें अंतरंग व बहिरंग यांचा विचार केल्यानंतर बखर या संज्ञेची कल्पना येण्यासारखी आहे. बखरींत सर्व प्रकारचा इतिहास असला तरी सामान्यतः राजकीय इतिहासच मुख्यत्वेंकरून आढळतो. या कारणामुळेच राजकीय इतिहास हें बखरींचें एक निर्णायक गमक (Determining factor) मानलें पाहिजे.

बखरींचें पुनश्च वर्गीकरण :

बखर या संज्ञेसंबंधी निश्चित कल्पना स्पष्ट झाल्यावर बखरींचें वर्गीकरण आणखीहि दोन दृष्टींनी करतां येण्यासारखें आहे. पहिलें विषयदृष्ट्या व दुसरें कालदृष्ट्या.

बखर म्हणून समजल्या गेलेल्या वाङ्मयाचें विषयदृष्ट्या पुढील प्रकार कल्पितां येतील: **१. चरित्रात्मक**—उदाहरणार्थ, कृष्णाजी अनंत सभासद-विरचित शिवछत्रपतीचें चरित्र, मल्हार रामराव चिटणीसविरचित शककर्ते श्रीशिवछत्रपति महाराज ह्यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र इ. **२. प्रसंगात्मक**—उदा., रघुनाथ यादवकृत पाणिपतची बखर, खर्ड्यांच्या स्वारीची बखर इ. **३. विशिष्ट घराण्याचा इतिहास**—उदा., दाभाडे सेनापति यांची हकीगत, गायकवाड यांची हकीगत, इ. **४. विशिष्ट काळांतील इतिहास**—उदा., पेशवाईच्या अखेरची अखबार, शक १७३८ सालची हकीगत इ. **५. आत्मचरित्रात्मक**—उदा., नाना फडणविसाचें आत्मचरित्र, बापू कान्हो यांचें आत्मवृत्त. **६. एका विशिष्ट पक्षाची बाजू**—उदा. होळकराची थैली. **७. कलमी बखर**—उदा., ९१ कलमी किंवा ९६ कलमी बखर. **८. केवळ बातमी म्हणून झालेलें लेखन**—उदा., शके १७४०

तील माहिती. ९. उत्पन्न चालूं राहावें यासाठी लिहिलेल्या बखरी—उदा., करीने, सरकारांत गुजरलेल्या कैफियती इ. १०. सांप्रदायिक—उदा., समर्थांची बखर, वडगांवकर जयरामस्वामी यांची बखर इ. ११. शैक्षणिक—उदा., सवाई माधवरावांच्यासाठी मुद्दाम तयार करविलेली बकासुराची बखर. १२. भाषांतरित—उदा., बुंदेल्याची बखर. सोनपत पानपत येथील मराठे-दुराणी युद्ध (काशीराज पंडित) इ. १३. स्थलवर्णनात्मक—उदा., महाबळेश्वराची जुनी माहिती. १४. पौराणिक—उदा., कृष्णजन्मकथा बखर, माघमाहात्म्य इ.,

प्रत्येक युगांतील वाङ्मयांत त्या कालाचें प्रतिबिंब पडलेलें असतें. या न्यायानें बखरींत स्वराज्याच्या व साम्राज्याच्या कालाचें प्रतिबिंब पडलेलें आहे. निरनिराळ्या ऐतिहासिक व्यक्ती व प्रसंग यांच्यावर याच कालांत पोवाडे झाले. या कालांत संतकवी व पंडितकवी यांच्याकडून अध्यात्मपर लेखन झालें. याचें कारण म्हणजे त्यांची भूमिका आध्यात्मिक होती. क्षणभंगुर ऐहिक जीवनापासून मुक्तता प्राप्त करून घेऊन विश्वांतल्या चिरंतन तत्त्वाचा शोध करण्याचें त्याचें ध्येय असल्यामुळे त्यांचें वाङ्मय हा त्या दिशेने जाणून बुजून केलेला प्रयत्न होता. अशाहि परिस्थितींत रामदासासारख्या प्रवृत्तिवादी संतांच्या वाङ्मयांत तत्कालीन परिस्थितीचें चित्र दिसून येतें. बखरींपुरताच विचार करावयाचा, तर ऐतिहासिक विषयावरील हें लेखन तत्कालीन राष्ट्रीय भावनेची साक्ष आहे असें म्हणणें योग्य होईल. राष्ट्राच्या जीवनांतले महत्त्वाचे प्रसंग व व्यक्ती यांचें आपुलकीच्या भावनेने गुणगान करण्यांत देशाभिमान नाही असें कोण म्हणेल? स्वराज्य-साम्राज्याच्या कालांतील प्रत्यक्ष रणांगणांत व्यक्त होणारा देशाभिमान लेखनांतहि प्रगट व्हावा यांत नवल नाही. स्वराज्याच्या उदयाबरोबर बखरींचा जन्म झाला व स्वराज्याच्या नाशानंतर बखरीहि अस्तंगत झाल्या. हा इतिहास जितका रोमहर्षक आहे तितकाच दुःखदायकहि आहे. प्रभाकर शाहिराने म्हटल्याप्रमाणे 'वृथैव वैतागुन। काय त्या गत गोष्टी सांगुन'॥ हेंच खरें.

विषयाप्रमाणे कालदृष्ट्याहि बखरींचें वर्गीकरण करणें आवश्यक आहे. मात्र हें वर्गीकरण निरनिराळ्या कालखंडांत लिहिलेल्या बखरींचें एका विशिष्ट विषयाच्या दृष्टीने करणें योग्य होईल. ऐतिहासिक कालाचे शिवपूर्वकाल,

शिवकाल, पेशवेकाल व आंग्लकाल असे भेद मानले तर शिवपूर्वकालीन घटना वा विषय यांवरील समकालीन व उत्तरकालीन बखरी, तद्वतच शिवकालीन विषयांवरील समकालीन व उत्तरकालीन बखरी आणि पेशवेकालीन विषयांवरील समकालीन व उत्तरकालीन बखरी असे प्रकार मानितां येतील. आंग्लकालांत स्वतंत्र ऐतिहासिक विषय नसल्यामुळे ऐतिहासिक बखरी बहुधा नाहीत. या कारणामुळे व राज्यकर्त्यांच्या शैक्षणिक धोरणामुळे या कालांत पौराणिक बखरींचें लेखन झालें. आंग्लकालांत तत्पूर्वकालीन म्हणजे शिवकालीन, पेशवेकालीन विषयांवर जें कांही बखरलेखन झालें आहे, त्याचा विषयाच्या दृष्टीने उपरिनिर्दिष्ट त्या त्या प्रकारांत अंतर्भाव केला पाहिजे. आंग्लकालांत इंग्रज सरकारने निरानिराळ्या घराण्यांकडून त्यांच्या हकीगती लिहवून घेतल्या. हेंच काय तें तत्कालीन ऐतिहासिक लेखन होय.

बखरलेखन किंवा बखररचना या शब्दप्रयोगाऐवजी 'बखर सजविणें' असा प्रयोग वापरीत. उदाहरणार्थ, रघुनाथ यादव पाणिपतच्या बखरीच्या शेवटीं 'यथामतीने बखर सजवून सेवेशीं पाठविली आहे' असें म्हणतो. बखर सजविणें या शब्दप्रयोगांत हेतुपुरस्सर लेखन हा अर्थ स्पष्ट आहे. इतकेंच केवळ नव्हे, तर त्यांत कलेच्या दृष्टीने ठाकाठिकी, सौंदर्य, प्रमाणबद्धता इत्यादि कल्पना सूचित होतात. बखरलेखकांच्या हातीं अस्सल ऐतिहासिक साधनें कमी असलीं तरी त्यांचें एकंदर लेखन विचारपूर्वक व परिश्रमपूर्वक केल्याचें स्पष्ट दिसतें. समकालीन बखरींपेक्षा उत्तरकालीन बखरींची संख्या अधिक आहे, याचें कारण म्हणजे कोणत्याहि ऐतिहासिक घटनेचें महत्त्व समकालिनांपेक्षा उत्तरकालिनांना अधिक वाटतें हें होय. समकालिनांना ती घटना प्रत्यक्ष जवळून पाहतां येत असल्यामुळे तिचें कल्पनेने रंगविलेलें चित्र पाहण्याची त्यांना विशेष आस्था वाटत नसावी. मात्र उत्तरकालीन पिढीला ती घटना डोळ्यासमोर पाहण्याची सोय नसल्यामुळे तिला कल्पनेच्या साहाय्याने पाहण्यांत स्वारस्य वाटणें साहाजिकच आहे. बखरलेखनाचा उपयोग तत्कालीन ऐतिहासिक पत्रव्यवहाराप्रमाणे दैनंदिन राजकारणाच्या दृष्टीने मुळीच नसतो. ऐतिहासिक पत्रव्यवहाराचें लेखन हें राज्यकारभाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचें असतें. नित्याच्या राजकारणांतली ती एक आवश्यक बाब आहे; पण बखरींचें तसें नाही. कारण बखरलेखन ही एक हौस होय.

बखरकाराची भूमिका :

स्वकीयांसंबंधी अभिमानाची भावना ही बहुतेक बखरकारांची भूमिका होय; किंबहुना ती त्यांची महत्त्वाकांक्षा असते. ती महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी आपल्या दृष्टीने महत्त्वाचा तेवढा मजकूर घेऊन त्यांत कल्पना-सौंदर्य, भाषासौंदर्य इत्यादि निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आपलें पांडित्य, आपलें चातुर्य इत्यादि त्यांचें स्वतःचें जें जें म्हणून आहे तें तें त्यांत उतरविण्याची ते पराकाष्ठा करतात. लेखनकलेचें मुख्य भांडवल म्हणजे तादात्म्य. तें मुळापासूनच त्यांच्याजवळ असल्यामुळे त्यांच्या लेखनांत जिवंतपणा निर्माण होतो. बखर जितकी समकालीन तितकी ती इतिहास-दृष्ट्या अधिक विश्वसनीय मानावयास हवी. याचें कारण असें की, ज्या कालांतल्या घटनांची नोंद तींत असते, तो काल बखरलेखनाच्या कालापासून फारसा दूर नसल्यामुळे ती ज्या आठवणी, आख्यायिकांच्या आधारें लिहिली जाते त्या ताज्या असतात. यामुळेच तींत ऐतिहासिक सत्याचा विपर्यास होण्याची शक्यता कमी असते.

बखरींचें स्वरूप त्रोटक नसून प्रदीर्घ आहे. प्रदीर्घ लेखनास आवश्यक असणारी परिस्थिति म्हणजे मानसिक स्वास्थ्य हें होय. बखरनविसास तें लाभत होतें म्हणूनच त्यांच्या हातून एवढें प्रदीर्घ लेखन होऊं शकलें; परंतु एवढें एकच कारण या प्रकारच्या लेखनास पुरेसें नव्हतें. लेखकांची पात्रता ही बखरींच्या यशास बरीच कारणीभूत झाली आहे. सभासदी बखर, चिटणिशी बखरी यांसारख्या बखरींचें लेखन आपाततः हुकुमी दिसत असलें तरी तें स्वतंत्र असल्याचा प्रत्यय येतो. बखरकार हा स्वेच्छेने किंवा स्वयं-प्रेरणेने लिहीत आहे, याची साक्ष यांत पानोपानीं पटते; किंबहुना बखरलेखकाची वाणी मम्मटाने वर्णन केलेल्या कवीच्या वाणीप्रमाणे ‘ नियतिकृतनियमरहितां ह्लादैकमयीं अनन्यपरतन्त्राम् ’ अशी असल्याचा साक्षात्कार होतो.

बखरलेखनांत रचनेचा प्रयत्न असला तरी त्यांत केवळ बहुश्रुतपणा नाही. बखरींत कलेचा विलास आहे. तींत कलेचें केवळ तंत्र नाही, तर मंत्रहि आहे. बखरकारांचा बहुश्रुतपणा व त्यांची रसिकता यांचा सुंदर संगम बखरींत पाहावयास सापडतो. ऐतिहासिक घटना रमणीयार्थ प्रतिपादक

शब्दांत सांगण्यांत बखरकारांचा हातखंडा आहे. बखर या लेखनप्रकाराचा त्याच्या विशिष्ट शैलीमुळे विकास होऊन त्याला अलौकिक लोकप्रियता लाभली. बखर हा बखरलेखकांच्या उच्च अभिरुचीचा आविष्कार आहे. त्यांत कलावंताचें हळुवार पण रसिक हृदय दिसतें. त्यांत पराक्रमी वीरांच्या विजिगीषु वृत्तीचें दर्शन होतें. राजकारणी पुरुषांच्या मुत्सद्देगिरीचा प्रत्यय येतो. साध्या मराठमोळ्या माणसाच्या भोळ्या पण भाविक मनाची साक्ष पटते. सांसारिक सुखदुःखांची अनुभूति घेण्याची तयारी असलेल्या आदर्श गृहस्थाश्रमी माणसांची कठोर कर्तव्यनिष्ठा दिसते आणि प्रसंगीं 'असारः संसारः' असें मानणाऱ्या एखाद्या योग्याची स्थितप्रज्ञताहि आढळते.

बखर–अस्सल मराठी लेखनप्रकार :

केवळ विषयाच्या (content) दृष्टीने नव्हे, तर लेखनपद्धतीमुळेहि बखर हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार कां मानला पाहिजे हें आतापर्यंत आपण पाहिलें. स्वतंत्र विषय, स्वतंत्र लेखनपद्धति व रम्य भाषाशैली हीं बखरीचीं वैशिष्ट्यें होत. बखरलेखनाची मूळ कल्पना परकीय म्हणजे मुसलमानी असली, तरी मराठींत तो स्वतंत्र वाङ्मयप्रकार होण्याइतका त्याचा विकास झाला होता असें एकंदर बखरींच्या स्वरूपावरून दिसून येतें. मराठीचा पेहराव बखरीने इतक्या कौशल्याने धारण केला आहे की, तिचें मूळ परकीय असेल अशी शंका येण्यासहि जागा नाही. मराठी जीवनाची बखरीची कल्पना इतकी समरस झालेली दिसते की, तिचे मराठीपण हेंच अधिक नजरेंत भरतें. बखरीचें बाह्यांग थोडेंसें परकीय वाटलें, तरी तिचें अंतरंग अस्सल मराठी दिसतें. ज्याप्रमाणे शाहीरांचीं गाणीं हीं मराठ्यांचीं खरीं गाणीं आहेत तद्वतच बखर हा अस्सल मराठी लेखनप्रकार आहे.

बखर-वाङ्मयाचें महत्त्व :

बखर-वाङ्मयाचें महत्त्व दुहेरी आहे. पहिलें ऐतिहासिक व दुसरें वाङ्मयीन. इतिहासाचें साधन म्हणून त्याची जशी योग्यता आहे, त्याचप्रमाणे वाङ्मयाचा प्रकार या दृष्टीने त्याचें विशिष्ट मूल्य आहे. बखरीच्या एका विशिष्ट तंत्रामुळेच तिला योग्यता प्राप्त झाली, या तंत्राची निर्मिति आपोआप झाली हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

मराठी गद्याच्या इतिहासांत बखरी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. प्राचीन मराठी वाङ्मयांत पद्यलेखनापेक्षा गद्यलेखन अल्प झाल्यामुळे बखरींनी गद्याची रिकामी जागा भरून काढली. एवढेंच केवळ नव्हे, तर एका नवीन लेखनप्रकाराची भर टाकून मराठी भाषेचें वैभव वाढविलें. ऐतिहासिक कालांत बखरलेखनाचा कालखंड लहान असला, तरी तेवढ्या कालांतहि बखरींनी आपला संसार सुंदरपणें थाटून यशस्वी केला. आकाशांत क्षणभर चमकून डोळे दिपविणाऱ्या विद्युल्लतेचें तेज बखरींत आहे. बखर-लेखनाचा काल सुरू होतो न होतो तोंच तो संपावा हा दुर्दैवी इतिहास होय. सौंदर्य हें चिरंतन नसतें हें तत्त्व बखरींना तंतोतंत लागू पडतें. एक विशिष्ट प्रकारचें लेखन म्हणून बखरींना मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत स्वतंत्र स्थान आहे यांत शंका नाही. बखरींच्या ऐतिहासिक आणि वाङ्मयीन अंगांची चर्चा पुढील प्रकरणांत करूं.

* * *

२ : बखर : इतिहास की वाङ्मय ?

मागील प्रकरणांत बखरींचें बहिरंग व अंतरंग यांची छाननी करून बखरींची गमकें निश्चित करण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या आधारें बखरलेखनाचें स्वरूप दिग्दर्शित केलें. प्रस्तुत प्रकरणांत इतिहास आणि वाङ्मय यांसंबंधी शास्त्रीय कल्पना स्पष्ट करून बखरींतील इतिहासाच्या अंगाची तसेंच त्याच्या वाङ्मयीन अंगाची तपासणी करावयाची व बखर हा इतिहास की वाङ्मय या प्रश्नाचें उत्तर शोधावयाचें.

इतिहास म्हणजे काय ?

इतिहास म्हणजे काय ? या प्रश्नाचें समर्पक उत्तर देणें कठिण आहे. घडलेल्या गोष्टींचें निवेदन किंवा गतकालांतील घटनांची नोंद ही नेहमीच्या परिचयाची इतिहासाची व्याख्या पुरेशी नाही. या व्याख्येच्या दृष्टीनें पाहिलें, तर इतिहासाचें क्षेत्र अतिव्यापक स्वरूपाचें आढळतें, भूतकालांतील घटनांची नोंद इतिहासांत असते खरी; पण वाटेल त्या घटनांची नोंद त्यांत नसते. त्यांतहि कांही निवड असते. कांही लक्षणीय भाग असतो. इतिहासाचा विचार करतांना एका विशिष्ट कालांतील समाज, त्याचे आचार-विचार तत्कालीन परिस्थिति या सर्वांचा विचार करणें क्रमप्राप्तच ठरतें. यामुळेच इतिहासाची गणना सामाजिक शास्त्रांत करतात. कोणतीहि ऐतिहासिक घटना घेतली, तरी तिचा समाजाच्या दृष्टीनें विचार करावा लागतो. सत्य हें इतिहासाचें अधिष्ठान असल्यामुळे इतिहासांत वस्तुनिष्ठ दृष्टीची अत्यंत आवश्यकता असते. निर्लेप व निरहंकारी वृत्ति ही इतिहासक्षेत्रांत अति महत्त्वाची मानली जाते.

समाजाच्या जीवनाचें चित्र असें जेव्हा इतिहासाचें वर्णन केलें जातें, तेव्हा ज्या विविध अवस्थांतून तो समाज गेला असेल त्या अवस्था, ज्या कल्पनाविचारांनी त्या समाजाच्या कार्याचें स्वरूप निश्चित केलें असेल ते कल्पनाविचार, तसेंच जी जी विशिष्ट भौतिक परिस्थिति त्या समाजाच्या उत्कर्षाला किंवा अपकर्षाला कारणीभूत झाली असेल ती भौतिक परिस्थिति,

इतक्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव त्या वर्णनांत अभिप्रेत असतो. सामाजिक जीवन कंठणाऱ्या मानवाची स्थिति हा इतिहासाचा विषय होय. समाज-पुरुषाची आयुर्मर्यादा ही व्यक्तीच्या आयुर्मर्यादेपेक्षा साहजिकच मोठी असते. त्यामुळे एखाद्या सामाजिक घटनेचा संबंध समाजाशीं जितका निगडित असतो तितका एखाद्या व्यक्तीशीं सहसा नसतो. या सामाजिक घटनेचे परिणामहि दूरगामी असतात. उत्तरकालीन सामाजिक घटनांचें स्वरूप हें पूर्वकालीन सामाजिक घटनांशीं अतिशय संबंधित असतें. या कारणामुळे प्रत्येक कालांतील घटना या पूर्वकालीन व उत्तरकालीन घटनांशीं साखळीप्रमाणे जोडलेल्या असतात. कोणतीहि घटना हा प्राक्कालीन घटनांचा परिपाक असतो. उत्क्रांतीचें तत्त्व हें जीवनामधील प्रत्येक क्षेत्राप्रमाणे इतिहासालाहि लागू पडतें; कारण तें ऐतिहासिक घटनांत जितकें यथार्थपणें दिसतें तितकें तें इतरत्र क्वचित् दिसून येतें.

इतिहासापासून गतगोष्टींचें ज्ञान होतें. उदाहरणार्थ, शिवकालीन पत्र-व्यवहारावरून पूर्वीच्या दिव्यांची माहिती मिळते. गतगोष्टींच्या या ज्ञानाचें स्वरूप आनंदात्मक असतें. उच्च ज्ञान व तज्जन्य आनंद हे इतिहासाचे दोन मुख्य फायदे होत. भूतकालांतील घटना कळल्यामुळे वर्तमानाचा यथार्थ बोध होण्यास सहाय्य होतें. हा इतिहासाच्या अभ्यासाचा एक प्रमुख हेतु होय. भूतकाल हा वर्तमानाशीं कसा निगडित आहे हें ओळखतां येणें हा इतिहासाचा खरा फायदा आहे.

सुप्रसिद्ध आंग्ल इतिहासकार मेकॉले याने इतिहासापासून होणाऱ्या आनंदाची तुलना परदेशांतल्या प्रवासापासून होणाऱ्या आनंदाबरोबर केली आहे.[1] परदेशगमनांत नाना देश, नाना लोक यांच्याशीं संबंध आल्यामुळे नित्य नवीन सृष्टीचा परिचय होऊन नावीन्यापासून निर्माण होणारा एक प्रकारचा आनंद होतो. यामुळे दृष्टि व्यापक होऊन मनाला विशालपणा येतो. परदेशगमनाप्रमाणे ऐतिहासिक विविध कालखंडांतील भिन्नभिन्न समाजांचा परिचय होऊन त्यांच्या सहवासांत काळ आनंदांत जातो.

इतिहासांत सत्य आणि कल्पकता यांचा मधुर संगम झाल्याचें सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे मेकॉले साहेबांचा इंग्लंडचा इतिहास हें होय. प्रस्तुत

१. The Miscellaneous Writings, Vol. I (1880), P. 102

इतिहासाच्या या स्वरूपामुळे तो वाचनीय झाला आहे. इतिहासांतील कल्पकतेमुळे जुन्या घटना सजीव वाटूं लागतात. इतिहासामुळे भूत व भविष्य यांतील अंतर नाहीसें होतें. भवभूतीच्या उत्तररामचरित नाटकांतील रामाप्रमाणे गतायुष्याचा चित्रपट डोळ्यांसमोर दिसूं लागतो. या वेळीं स्थलकालाचीं बंधनें आपोआप नाहीशीं होतात.

इतिहास–आदर्शवादी शास्त्र :

इतिहास हें एक सामाजिक शास्त्र असल्यामुळे त्या शास्त्राचे सर्वसामान्य नियम व अपवाद त्यांत असतात. सामाजिक शास्त्रांचा आधार म्हणजे समाजजीवन हा होय. ज्याप्रमाणे जीवन हें क्षणोक्षणीं पालटणाऱ्या प्रकृतीचें असतें, तद्वतच सामाजिक शास्त्रेंहि असतात. तीं शास्त्रें विज्ञानशास्त्राप्रमाणे विध्यात्मक (Positive) नसतात. सामाजिक शास्त्रें हीं आदर्शवादी (Normative) असतात. म्हणजे कसें असावें या प्रश्नाचीं तीं चर्चा करतात.

इतिहास हें सुद्धा एक आदर्शवादी शास्त्र आहे. गतगोष्टींचें सम्यक् ज्ञान प्राप्त करून देऊन वर्तमान हें कसें आहे व भविष्य कसें असावें, याचेंहि तें मार्गदर्शन करतें. इतिहासाचें ध्येय जीवनविकास हें होय. जीवनाचा विचार करतांना इतिहासशास्त्रांत दोन दृष्टींची आवश्यकता आहे. पहिली बौद्धिक किंवा शास्त्रीय व दुसरी अंतर्ज्ञानात्मक किंवा सौंदर्यवादी. इतिहासाचा अभ्यास व इतिहासाचें लेखन या बाबतींत त्यांचा विशेष उपयोग होतो. या दोन दृष्टींनी केलेलें इतिहासलेखन हें उच्च दर्जाचें होऊन बौद्धिक आनंद निर्माण करतें. इतिहासाची शास्त्रांत गणना करावयाची असेल तर कल्पकतेचें बौद्धिकतेंत पर्यवसान व्हावयास हवें. स्वाभाविकाच्या दृष्टीने नियमिताचें ज्ञान झालें पाहिजे. ज्ञानाच्या जोडीला कल्पकतेचें साहाय्य घेऊन जीवनाचा अभ्यास करणें हें इतिहासाचें मुख्य कार्य होय. जीवन व इतिहास हीं यामुळेच अभिन्न मानलीं जातात.

इतिहासांत नोंद असलेलें गतकालांतील जीवन हें त्या त्या व्यक्तींनी व समाजांनी कंठलेलें असतें. या दृष्टीने पाहतां इतिहास हा मानवी जीवनांतील अनुभवांचा अभ्यास असतो असें म्हणतां येईल. इतिहासकार हा भूतकालीन मानवी जीवनाचें अनुभव कथन करीत असतो; किंबहुना तो त्या अनुभवांची पुनर्निर्मिति करीत असतो. या पुनर्निर्मितीसाठी त्याला कलावंतांची भूमिका

स्वीकारावी लागते. कल्पकतेचा आधार घेतांना इतिहासलेखकाला सत्याशीं प्रतारणा करतां येणार नाही व सत्याचें दर्शन घडवितांना त्याला कल्पकतेला सोडून केवळ रूक्ष सत्यकथनहि करतां येणार नाही. इतिहास हें आदर्शवादी शास्त्र आहे तें यामुळेच.

इतिहास हें शास्त्र आहे काय ?

ऐतिहासिक ज्ञान हें तर्कनिष्ठ शास्त्रीय ज्ञान आहे. ऐतिहासिक घटनांची कार्यकारणपरंपरा ओळखणें हाच इतिहासाचा खरा अभ्यास म्हणतां येईल. या शास्त्राचा जन्म पृच्छेंतून होतो हें जर मान्य केलें, तर इतिहासाची गणना शास्त्रांत केली पाहिजे. केवळ पृच्छा हें इतिहासाचें अंग नव्हे, तर पृच्छेचें उत्तर बुद्धीच्या कसोटीवर तावून सुलाखून घेऊन मगच त्याचा स्वीकार करणें हें इतिहासाचें दुसरें अंग होय. ग्रीक लोकांत इतिहासवाचक Istoria हा शब्द पृच्छेचें बुद्धीला पटणारें उत्तर (Result of an inquiry) या अर्थाचा आहे. समाज हा अनेक घटकांचा व घटनांचा तयार झालेला असतो. या सर्वांचा अभ्यास इतिहासाच्या कक्षेंत येतो.

ऐतिहासिक सत्य ही मुख्य दृष्टि ठेवून व्यक्ति, स्थल, काल इत्यादि घटितांचें परस्परसंबंध जाणण्याचें शास्त्र म्हणजे इतिहास. हें झालें इतिहासाच्या अभ्यासाचें शास्त्र; परंतु इतिहासलेखनाचें शास्त्र हें स्वतंत्र आहे. निवेदन हा इतिहासाचा आत्मा होय. इतिहास हें एक प्रकारचें कथन असल्यामुळे निवेदनकौशल्य हें इतिहासलेखनाचें तंत्र आहे. गिबन, मेकॉले, फेरिस्ता, सरदेसाई इत्यादि नामवंत इतिहासकारांत हा गुण प्रामुख्याने आढळतो.

तत्कालीन सामाजिक कल्पना, भावना, विचार इत्यादींना इतिहासांत मानाचें स्थान असतें. इतिहासाच्या लेखनासाठी मनुष्यस्वभावाचें ज्ञान आवश्यक आहे. हें ज्ञान प्राप्त होण्यासाठी सहृदयी म्हणजे आत्मनिष्ठ दृष्टि हवी. निवेदनासाठी मात्र वस्तुनिष्ठ दृष्टि अधिक उपयुक्त ठरेल. तात्पर्य, या दोन्ही दृष्टींची सारखीच गरज आहे. कारण उपरिनिर्दिष्ट कोणत्याहि एका दृष्टीमुळे इतिहासाचें स्वरूप एकांगी होईल.

इतिहास आणि राजकारण :

राजकारण हें इतिहासाचें महत्त्वाचें अंग होय. आजची राजकारणाची कल्पना ही इतिहासशास्त्रांतील राजकारणाच्या कल्पनेपेक्षा सर्वस्वी भिन्न आहे.

राजकारण या शब्दांचा प्रचलित अर्थ कुटिल नीति हा होय; पण इतिहासशास्त्रांत राजकारण म्हणजे व्यक्तीची सामाजिक वागणूक अशी कल्पना आहे.[१]

राजकारण हा इतिहासाचा आत्मा आहे ही आधुनिक युगांतील कल्पना होय. राजकारणी दृष्टि म्हणजे खरी वास्तववादी दृष्टि. ही दृष्टि म्हणजे परिस्थितीचा अंदाज (Historical understanding) याला राजकारणांत फारच महत्त्वाचें स्थान आहे. इतिहासांत जेथे पराभव किंवा नाश झालेला दिसतो तेथे परिस्थितीच्या अंदाजाचा अभावच असतो. उदाहरणार्थ, पानिपतच्या पराभवाचें मुख्य कारण म्हणजे मराठ्यांना परिस्थितीचा नीट अंदाज घेतां आला नाही हें होय. इतिहासांतील जय आणि पराजय हे या अंदाजावर अवलंबून असतात. यालाच ऐतिहासिक राजकारण असें म्हणतात. इतिहास ही व्यवहारज्ञानाची मोठी शाळा आहे[२] असें जें म्हणतात तें याच अर्थानें.

इतिहास आणि संस्कृति :

इतिहास हें संस्कृतीचें साधन आहे. उच्च आचार व उच्च विचार या दोहों मिळून संस्कृति होते. मानवी जीवनांतील उच्च मूल्यें संस्कृतींत अंतर्भूत होतात. जिच्यामुळे जगावेसें वाटतें ती संस्कृति, अशी टी. एस्. इलियटने संस्कृतीची कल्पना मांडली आहे. याचा अर्थ असा की, संस्कृति हें जीवनविकासाचें मुख्य अंग होय.

भूतकालाचें सिंहावलोकन करून भविष्यकालाचें ध्येय हें इतिहासाच्या साहाय्यानें ठरवितां येतें. कोणत्याहि समाजाला भूतकालाचा विचार केल्याखेरीज प्रगतीचें पाऊल पुढे टाकतां येणार नाही. वर्तमानाची खरी जाणीव ही इतिहासाच्या अध्ययनामुळेच होऊं शकते. इतिहासाची पुनरावृत्ति होते असें म्हणतात. त्याचा अर्थ असा की, होऊन गेलेल्या घटना पुनः अगदी जशाच्या तशाच घडतात असें नसून त्या घटनेला जबाबदार असलेलीं मूळ कारणें सर्व देशांत सर्व कालांत सारखींच असतात. ऐतिहासिक घटना या निमित्तमात्र असतात. इतिहासाच्या ज्ञानानें अनुभवाचें क्षेत्र विशाल होऊन संस्कृतीची जोपासना होते. एखाद्या राष्ट्राची संस्कृति ही त्याच्या इतिहासा-

१. The Use of History. (A. L. Rowse 1946), P. 65
२. Ibid, P. 184

वरून दिसून येते. संस्कृतिमापनाचें गमक म्हणजे इतिहास होय. प्रत्येक कालखंडांतील संस्कृति ही गतकालीन संस्कृतीचें विकसित स्वरूप असतें. संस्कृति ही अनेक शतकांनी घडविली जाते. ती एका विशिष्ट युगाचें फल नव्हे. इतिहास हा संस्कृतीचा आलेख आहे. या कारणामुळेच सुधारलेल्या समाजांत इतिहासाला विशेष महत्त्व देण्यांत येतें.

ज्या समाजाला भूतकाळ नाही त्याला भविष्यकाळ कोठला? विनायक कवीने म्हटलें आहेच की, 'पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ.' इतिहासाची जाणीव असणें म्हणजे स्वतःचीच जाणीव असणें होय. बेकनच्या मतें इतिहासाने माणूस शहाणा होतो. कार्लाईल म्हणतो की, इतिहास म्हणजे थोर लोकांच्या चरित्राचें सार होय. इमर्सनचें म्हणणें असें की, खऱ्या अर्थाने इतिहास म्हणजे केवळ चरित्रच. इतिहासाचा अभ्यास करावयाचा तो आपलें जीवन अधिकाधिक उन्नत आणि उदात्त करण्यासाठीच. जीवनांतील उच्च मूल्यांची जोपासना इतिहासशास्त्र करतें. ही जोपासना म्हणजेच संस्कृति होय. ही संस्कृति इतिहासविषयक वाङ्मयांत दिसून येते. त्यांत बखरींचा अंतर्भाव केला पाहिजे. यावरून इतिहास हें संस्कृतीच्या विकासाचें मुख्य साधन आहे असें सिद्ध होतें.

इतिहास व इतिहाससंशोधन :

इतिहास-संशोधन हा इतिहासरचनेचा पाया होय. इतिहासरचनेसाठी ऐतिहासिक घटनांसंबंधी सत्यसंशोधन होणें अगत्याचें आहे. साधनसंग्रह करणें, त्यांची छाननी करणें, त्यावरून निश्चित निष्कर्ष काढणें, या इतिहास-संशोधनाच्या मुख्य पायऱ्या होत. इतिहासरचनेचें पूर्णत्वाला गेलेलें असें शास्त्र अद्यापिहि तयार झालेलें नाही. राजवाडे म्हणतात की, प्रामाणिकपणा व सशास्त्र पद्धति हे दोन इतिहासाचे केवळ प्राण होत.[1] निःपक्षपातीपणाने लिहिलेला संशोधकीय इतिहास हा राष्ट्रोपयोगी होतो. खरा इतिहास हा संशोधनाशिवाय नाही.

इतिहासलेखकाची दृष्टि निर्मळ असली पाहिजे. नाही तर या दृष्टीच्या अभावीं इतिहासांत गोंधळ उडण्याची शक्यता असते. अर्धवट ग्रहामुळे युरोपियन इतिहासकारांचे इतिहास दूषित झाल्याचें राजवाड्यांनी सिद्ध केलें

१. ऐ. प्र., पृ. ३४५

आहे. निर्लेप चित्तवृत्तीच्या स्फुरणांतच इतिहासाचा जन्म होतो. इतिहासकार हा जसा बहुश्रुत असावा लागतो, तसा तो विशाल दृष्टीचाहि असावा लागतो. ऐतिहासिक व्यक्तींकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन विभूतिपूजेचा नसावा. इतिहास म्हणजे राजघराण्याचें संकीर्तन ही हिंदुस्थानांतील प्राचीन इतिहासलेखनाची पद्धति शास्त्रीय दृष्टीने त्याज्यच मानावी लागेल. महाराष्ट्राचा इतिहास स्वकीयांनी लिहिलेलीं पत्रें व बखरी या स्वरूपांत आढळतो. परकीयांनीहि तो लिहिलेला आहे. या दोन टोकांच्या मध्यभागीं असलेल्या ऐतिहासिक सत्याचा शोध घेणें हें मराठी इतिहासलेखकांचें काम होय.

बखरींचें ऐतिहासिक स्वरूप :

इतिहासाची शास्त्रीय कल्पना याप्रमाणे स्पष्ट झाल्यावर बखरींच्या ऐतिहासिक अंगाचा विचार करणें योग्य होईल. बखरींची निर्मिति इतिहासलेखनाच्या भूमिकेंतून झाली हें निर्विवाद होय. सभासदाचें शिवछत्रपतीचें चरित्र, रघुनाथ यादवाची पाणिपतची बखर, चिटणिसांचीं चरित्रें इत्यादि बखरींचा जन्म राजकीय वातावरणांत झाला हें जितकें खरें, तितकें त्यांचा जन्म एका विशिष्ट ऐतिहासिक गरजेच्या पोटीं झाला हेंहि खरें. बखर हें निवेदन होय; पण त्या निवेदनाच्या मागे एक विशिष्ट उदात्त भावना दिसते. स्वकीयांच्या कर्तृत्वाची प्रामाणिकपणाने केलेली ती नोंद आहे.

बहुतेक बखरींचें लेखन हें सामान्यतः उत्तरकालीं झालेलें असल्यामुळे त्यांपैकी कित्येकांत ऐतिहासिक सत्याचा कांटेकोरपणा नाही. असें असूनहि त्यांचें ऐतिहासिक मूल्य हें मान्य केलेंच पाहिजे. दंतकथा, आख्यायिका, वडिलार्जित कारकीर्दी, दफत्यास बार केलेलें दिनचर्येचें वर्तमान, इत्यादि ऐतिहासिक साधनांच्या आधारें बखरकारांनी निवेदन केलेलें आहे, हें चिटणिशी बखरी, रघुनाथ यादवकृत पाणिपतची बखर इत्यादिकांवरून स्पष्ट दिसतें. बखरींत शास्त्रीय दृष्टीचा अभाव असल्यामुळे त्यांची गणना इतिहासाच्या दुय्यम साधनांत केली जाते; परंतु बखरींचें ऐतिहासिक प्रामाण्य कांही विशिष्ट मर्यादेपर्यंत मानावयास हवें. अस्सल कागदपत्रांनी खोटा ठरविलेला एखाद्या बखरींतला मजकूर हा अविश्वसनीय म्हणतां येईल; पण बखरींतील खोटा न ठरलेला मजकूर हा आज तरी विश्वसनीय समजणें योग्य होईल. इतकेंच

केवळ नव्हे, तर त्यांतील संशयास्पद मजकूर हा देखील तो संपूर्ण खोटा ठरेपर्यंत प्रमाण म्हटला पाहिजे. उदाहरणार्थ, अलीकडील 'सोयराबाई ही शिरक्यांची कन्या की मोहित्यांची ?' या ऐतिहासिक वादाचें उत्तर अद्याप अस्सल कागदपत्रांत मिळालेलें नाही. भिन्न भिन्न बखरींत सोयराबाईचीं हीं दोन्ही नांवें आढळतात असें स्वतः लेखकाने दाखविलें आहे.[1] असा हा संशयास्पद मजकूर निदान आज तरी सत्य मानणें आवश्यक आहे. ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने बखरी अस्सल प्रमाण नाहीत असें समजणाऱ्या राजवाड्यांनी बखरींतील सत्यापलाप हा अहेतुकपणें निर्माण झाल्याचें मान्य केलें आहे, हें आपण मागे पाहिलें आहे. भूतकालांतील ऐतिहासिक घटनांची माहिती बखरकारांना जशी ठाऊक होती तशीच ती त्यांनी लिहिली. केवळ प्रामाणिकपणा या इतिहासशास्त्राच्या गुणाचा विचार केला, तर बखरींतील मजकूर हा बखरलेखकांच्या ज्ञानाच्या दृष्टीने सत्य आहे, हें कबूल करणें अवश्य आहे. म्हणूनच सोहनीकृत पेशव्यांची बखर यासारख्या बखरींच्या अविश्वसनीयतेबद्दल लेखकांना सर्वस्वी दोष देणें असमंजसपणाचें होईल.

चिटणिशी बखरी, भाऊसाहेबांची बखर अशा बऱ्याच बखरींच्या नकला झालेल्या असल्याचा उल्लेख काव्येतिहाससंग्रहकारांनी केला आहे. या बखरींतील सत्याचा अपलाप होण्यास त्यांच्या नकला कांटेकोरपणें झाल्या नसाव्यात व नकलकारांनी कित्येक ठिकाणीं स्वतःच्या पदरचा मजकूर घातला असावा हीं दोन प्रमुख कारणें असावींत. एवढें मात्र खरें की, सत्याच्या अपलापामुळे बखरींच्या प्रामाण्याला धोका निर्माण झाला आहे. सोहनीविरचित पेशव्यांची बखर ही केवळ स्मरणशक्तीवर भरंवसा ठेवून लिहिली असल्यामुळे तिच्या रचनेंत शास्त्रीयपणा नाही. बखरींतील अशा प्रकारच्या विसंगतीची जबाबदारी कोणाची–बखरकारांची की नकलकारांची– हें ठरविणें कठिण आहे. बखरींतील एकदेशीयतेचें मूळ स्वकीयांचा गौरव या बखरलेखनाच्या उद्देशांत आहे यांत शंका नाही. कोणतीहि बखर घेतली तरी तींत ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने शंभर टक्के सत्य सापडणें अशक्यप्राय दिसतें. मोडी वाचनाच्या कित्येक चुकांमुळे बखरींतल्या दोषांत आणखी एक भर पडलेली आहे. उदाहरणार्थ, चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक

१. सह्याद्रि, ऑगस्ट १९५४

चरित्रांत शहाजी महाराज 'बोदेकीर म्हणून तुंगभद्रातीरीं आहे. तेथे शिकारीस गेले' असें म्हटलें आहे. यासंबंधी काव्येतिहाससंग्रहकर्ते म्हणतात की, 'होदिगिरी (रें)' याचें मोडीचें बालबोध करितांना 'बोदेकीर' रूपांतर झालें.[1] सभासदी बखरींत 'लष्कर जडगिरी मार्गाने जावें अशी तजवीज केली' असा उल्लेख आहे;[2] पण अर्थदृष्ट्या हें वाक्य 'लष्कर जड गिरीमार्गाने जावें अशी तजवीज केली' असें पाहिजे. मूळ बखरींचें लेखन मोडी लिपींत झालें असलें पाहिजे; परंतु त्या लिपीचें बाळबोध लिप्यंतर करतांना वरीलप्रमाणे चुका होतात. जुन्या मोडी बखरींत विरामचिन्हें नाहीत. याशिवाय मोडी लिपि एकटाकी स्वरूपाची असल्यामुळे तींत प्रत्येक शब्द वेगळा नसतो व 'क' आणि 'ला' किंवा 'न' आणि 'ज' इत्यादि अक्षरें जवळजवळ सारखींच असतात. मोडी लिपीच्या या वैशिष्ट्यामुळेच वाचनाच्या चुका होतात. मुद्रणकलेच्या अभावीं मूळ बखरींच्या नकला मोडी लिपीमुळे सहज करतां आल्या असल्या पाहिजेत, यांत शंका नाही. बखरींच्या मुद्रित प्रतींत विरामचिन्हांचा उपयोग केलेला दिसतो. त्यामुळे वाचनाच्या दृष्टीने सर्वसामान्य वाचकाचें काम सुलभ झालें तरी अभ्यासकाचें त्या बाबतींत समाधान होत नाही, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. मोडीच्या विशिष्ट लेखनपद्धतीमुळे बखरींत 'ऐसियास' 'इतकियांत' 'निघोन' इत्यादि विवक्षित शब्दांना स्थान मिळालें आहे. बखरींच्या बाबतींत एक मोठी अडचण अशी की, त्यांतील सत्य हें असत्यापासून निराळें काढणें कठिण जातें. शिवाय चिटणिसांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र, भाऊसाहेबांची बखर यांसारख्या बखरींत ते समयी, तेव्हा, नंतर, इकडे, पुढे या अनिश्चित शब्दांनी कालनिर्देश केल्यामुळे घटनांचा कालानुक्रम ठरवितां येत नाही.

इतिहासाचें कलात्मक अंग :

इतिहासाचें जसें शास्त्रीय अंग आहे तसेंच त्याचें कलात्मक अंगहि आहे. ऐतिहासिक घटनांच्या जुळणींत शास्त्रीय व त्यांच्या निवेदनांत कलात्मक अशीं दोन्ही अंगें इतिहासाचीं असतात. इतिहासज्ञानाचा उपयोग कलेच्या दृष्टीनेच होईल व त्या दृष्टीने त्याची उपासना केली पाहिजे, असें तात्यासाहेब

१. सप्त० चरित्र (१९२४), पृ. २५७
२. शिवछत्रपतींचें चरित्र (१९१२), पृ. ९३

केळकरांचें मत आहे.[1] या दृष्टीने पाहतां, इतिहासाचें ज्ञान हा बुद्धिवादी (शास्त्रीय) दृष्टिकोन असून त्याची उपयुक्तता हा सौंदर्यवादी (कलात्मक) दृष्टिकोन आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. सारांश, इतिहासांत कलेचें अंग असल्यामुळे इतिहास ही एक कला आहे असें म्हणतां येईल.

मराठी बखरींचें लेखन हें इतिहासाच्या शास्त्रीय भूमिकेने झालेलें नसलें, तरी विविध साधनांच्या आधारें केलेल्या त्यांतील ऐतिहासिक घटनांच्या जुळणींत इतिहासशास्त्राचें अंग दिसून येतें. ऐतिहासिक सत्यनिर्णय, घटनांचें विश्लेषण व तद्भूत सिद्धान्त हे इतिहासशास्त्राचे गुण मराठी बखरींत प्रत्यक्ष नसले, तरी ध्वनित झाले आहेत यांत शंका नाही. भाऊसाहेबांच्या बखरीकडे पाहिलें म्हणजे त्यांत घटनांची जुळणी किती पद्धतशीर झाली आहे, याचा अनुभव येतो. ऐतिहासिक सत्याचे निर्णय या बखरींत 'भाऊसाहेब यांस परम आनंद होऊन गर्व बहुत झाला होता. यशाच्या फुंदांत निमग्न जाहाले होते. तों गर्वाचें घर खाली ईश्वरास साहेना'[2] अशा प्रकारच्या वाक्यांत स्पष्टपणें दिसतात. याप्रमाणे बखरींतील घटनोद्भूत सिद्धान्त हे सुभाषितांतून व्यक्त झाले आहेत. सारांश, इतिहासशास्त्राचें अंग बखरींतून अंशतः आढळतें.

इतिहासाचें कलात्मक अंग हें बखरींच्या निवेदनपद्धतींत व्यक्त झालें आहे. बहुतेक बखरी या त्यांतील निवेदनपद्धतीमुळेच उत्कृष्ट झाल्या आहेत. इतिहासलेखनाच्या दृष्टीने निवेदनाचें हें साधन बखरकारांनी अत्यंत कौशल्याने वापरलेलें दिसतें. बखरींतील ऐतिहासिक घटना या निवेदनकौशल्यामुळे आकर्षक झाल्या असून त्यांत जिवंतपणा निर्माण झालेला आहे. बखरींतील इतिहासाच्या शास्त्रीय अंगापेक्षा त्यांचें कलात्मक अंगच डोळ्यांत अधिक भरतें. बखरींतील ऐतिहासिक घटनांचें ज्ञान हें इतिहासशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचें ठरतें, तर त्या ज्ञानाचा कर्तृत्वशाली स्वकीयांच्याबद्दल आदराची भावना वृद्धिंगत करण्याकडे केलेला उपयोग हा इतिहासाच्या कलात्मक अंगाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतो.

बखरींच्या कलात्मक अंगाकडे नजर टाकल्यास इतिहासदृष्ट्या बखरींचें मूल्य कमी होतें खरें; पण त्यांतील सत्यांशाचा विचार करतां व बखरींचें

१. समग्र केळकर वाङ्मय (इतिहास खंड), पृ. ९९१

२. भा. बखर (१९३२), पृ. १०३

प्रामाण्य विशिष्ट मर्यादेपर्यंत मान्य केल्यास बखरींना ऐतिहासिक महत्त्व आहे. बखरींतील इतिहास हा एकांगी असला, तरी परकीय (मुसलमानी) इतिहासकारांच्या विरुद्ध पक्षाचें म्हणणें, या दृष्टीने इतिहासाची एक बाजू म्हणून त्यांना महत्त्व दिलें पाहिजे. पारंपरिक विचार, घटनांची संगति व तपशील हे इतिहासदृष्ट्या बखरींचे विशेष होत.

बखरींत एकाच प्रकारचा इतिहास नसून राजकीय, सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक इत्यादि विविध प्रकारचा असतो. ऐतिहासिक कागदपत्रांत सहसा न येणारा वरील मजकूर बखरींतच अधिक सापडतो. भाऊसाहेबांच्या बखरींत पाणिपतची राजकीय घटना, व मुरदे ओळखून त्यांचीं सार्थकें करण्याच्या सामाजिक व धार्मिक घटना, फाल्गुन मासांत लहानथोर व सर्व मुत्सद्दी यांच्या रंग खेळण्याच्या, तसेंच बळवंतराव मेहेंदळे यांच्या पत्नीच्या शोकाची कौटुंबिक घटना हा सर्व इतिहास आहे. बखरी सर्वस्वी प्रमाणभूत न मानल्या तरी इतिहासरचनेच्या दृष्टीने त्या मार्गदर्शक होतील. समकालीन बखरींच्या ऐतिहासिक प्रामाण्याचा दर्जा हा तत्कालीन कागदपत्राइतकाच महत्त्वाचा ठरतो. बखरींचें अस्सल मूळ हें ऐतिहासिकदृष्ट्या निर्दोष असण्याची शक्यता असते. विविध घटनांचा क्रम लावण्यासाठी बखरीइतकें दुसरें कोणतेंहि साधन उपयुक्त नाही. ऐतिहासिक साधन म्हणून बखरींचें एक स्वतंत्र मूल्य आहे.

वाङ्मय म्हणजे काय ?

बखरींच्या वाङ्मयीन अंगाचा विचार करण्यापूर्वी वाङ्मयशास्त्राचा विचार करणें योग्य होईल. वाङ्मयाची समाधानकारक व्याख्या करणें अवघड आहे; परंतु त्याच्या सर्वसामान्य स्वरूपाविषयी कल्पना मांडतां येईल. ती अशी की, वाङ्मयांत अक्षयी भावनांचें वर्णन असतें. वाङ्मयाचा विषय व त्याची मांडणी हीं चित्तवेधक असतात. वाङ्मयापासून केवळ ज्ञानच नव्हे तर आनंदहि मिळतो. हा आनंद बहुतांशीं स्थलकालनिरपेक्ष असतो.

वाङ्मय ही एक कला आहे. रुक्ष वास्तवसृष्टीला रम्य यक्षनगरीचें स्वरूप प्राप्त करून देणें हें कलेचें वैशिष्ट्य होय. वाङ्मयकलेची सृष्टि कल्पित खरी; पण ती जीवनांतल्या सौंदर्याचें दर्शन घडविते. जीवनांतलें मांगल्य, जीवनां-

तील उदात्तता इत्यादिकांचाहि ती परिचय करून देते. वाङ्मय हें सृष्टींतल्या गूढ तत्त्वाची ओळख करून जीवन अधिक रमणीय करण्यास मदत करतें.

वाङ्मयनिर्मात्याच्या प्रतिभेच्या स्पर्शाने साध्या शब्दार्थांचें सुवर्ण बनतें. वाङ्मयनिर्मितीचा प्रमुख हेतु आनंद असला तरी त्यामुळे जीवन उन्नत होतें. वाङ्मय ही एक बौद्धिक क्रीडा आहे. वाङ्मय म्हणजे भाषेच्या माध्यमाच्या साहाय्याने केलेला जीवनानुभवाचा कलात्मक आविष्कार. वाङ्मयापासून होणाऱ्या आनंदाला संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी 'ब्रह्मानंदसहोदर' असें म्हटलें आहे. हा आनंद स्वानुभवाच्या पुनःप्रत्ययाचा असतो.

वाङ्मयाचे निकष :

वाङ्मयाच्या स्वरूपाचा याप्रमाणे विचार केल्यानंतर त्याचे निकष कोणते हा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. वाङ्मय ही एक कला असल्यामुळे तिचें स्वतःचें म्हणून कांही तंत्र असतेंच. वाङ्मयाचीं भावनिक (Emotional), कल्पनीय (Imaginative) व बौद्धिक (Intellectual) अशीं तीन मुख्य अंगें असतात. या तीन अंगांच्याद्वारे वाङ्मयाचें स्वरूप प्रतीत होतें. भावनाजागृति हें वाङ्मयाचें एक मुख्य कार्य असल्यामुळे वाङ्मयांत भावनेला विशेष महत्त्व आहे. वाङ्मयांत जीवनांतलें सत्य कल्पनेच्या साहाय्याने रमणीय केलेलें असतें. या कल्पनाशक्तीलाच प्रतिभा अशी शास्त्रीय संज्ञा आहे. भावना व कल्पना यांचें नियंत्रण करण्याचें कार्य वाङ्मयांतील बौद्धिक अंग करतें. या दृष्टीने पाहतां भावना, कल्पना व विचार हीं वाङ्मयाचीं त्रिविध अंगें आहेत.

शैली हा वाङ्मयाचा एक प्रमुख घटक मानतात. शैली ही पद्धति आहे, विषय नव्हे. भावनांच्या आविष्काराच्या दृष्टीने शैलीचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. शैली म्हणजे व्यक्तित्व. शैलींत लेखकाचें व्यक्तित्व प्रगट होत असतें. आत्माविष्काराचीं मुख्य साधनें शब्द व अर्थ हीं असल्यामुळे त्या बाबतींत व्यवस्था असणें आवश्यक असतें. हें कार्य शैलीमुळे होतें.

रसात्मकता हा वाङ्मयाचा मुख्य गाभा होय. येथे 'रस' ही कल्पना संस्कृत वाङ्मयांतील नवसापुरतीच मर्यादित नाही. वाङ्मयानंदाचें प्रमुख कारण रसात्मकता हेंच होय. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी रस हा काव्याचा

म्हणजे पर्यायाने वाङ्मयाचा आत्मा मानलेला आहे. भावनानिष्ठ सुंदर कल्पनाकल्लोळ ही रसनिर्माणक्षम असल्यामुळे रसिकाला ती इष्टापत्तीच असते.

विषयाप्रमाणे मांडणी किंवा निवेदन हें वाङ्मयांत महत्त्वाचें मानलें जातें. हें मांडणीचें कौशल्य ज्या प्रमाणांत अधिक असेल त्या प्रमाणांत वाङ्मयाचा दर्जा वाढतो. विषय (Matter), मांडणी (Manner) व परिणाम (Effect) हे वाङ्मयकलेचे तीन प्रमुख घटक होत. या तिहींत मांडणीचें महत्त्व विशेष आहे. 'कौशल्य मोठें रचनेंत आहे' असें म्हणतात तें यामुळेच. याशिवाय सुरुवात व शेवट यांचा आकर्षकपणा, विषयाचा सुसूत्रपणा, प्रमाणबद्धता इत्यादि वाङ्मयाचे विविध गुण आहेत. वाङ्मयाचा दर्जा ओळखण्याचीं हीं गमकें होत.

वाङ्मयाचा हेतु :

वाङ्मयलेखन हें नेहमी सहेतुकच होतें असें नाही. किंबहुना तें पुष्कळदा निर्हेतुकच होतें. तात्यासाहेब केळकर म्हणतात की, 'कवींनी सहेतुक लिहिलेलीं काव्यें थोडीं असतात. पोप कवीचें डनशियड, बटलरचें ह्यूडिब्रास वगैरे काव्यें बोलून चालून विशिष्ट हेतूने लिहिलेलीं होत. पण सामान्यतः कवि काव्य लिहितो तें अहेतुक, म्हणजे काव्यस्फूर्तीच्या समाधानाकरिताच लिहितो.'[1] निर्हेतुक लेखन हें जाणीवपूर्वक केलेलें नसल्यामुळे तें स्वाभाविक होतें. मिल्टनपेक्षा शेक्स्पीयरचें काव्य अधिक स्वाभाविक आहे याचें कारण हेंच.

भावनेच्या आविष्कारांत लेखकाच्या मनावर झालेली जीवनाची प्रतिक्रिया दिसून येते. तो आविष्कार म्हणजे जीवनाचा अर्थ लावण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न असतो. लेखकाची ती जीवनदृष्टि असते. मॅथ्यू अर्नोल्डने कविता म्हणजे संस्कृति टीका (Criticism of Life) अशी जी व्याख्या केली आहे ती याच अर्थाने.

बोधप्राप्ति हा वाङ्मयनिर्मितीचा मुख्य हेतु होऊं शकत नाही. कारण तसा हेतु असेल, तर वाङ्मय सहेतुक होण्याचा संभव आहे व त्यामुळेच त्यांत कृत्रिमता येईल. इच्छापूर्ति किंवा स्वप्नरंजन हा हेतु ध्येयवादी वाङ्मयाच्या दृष्टीने मान्य होण्यासारखा आहे; पण वास्तववादी वाङ्मयासंबंधाने तसें

१. समग्र केळकर वाङ्मय (साहित्यखंड), पृ. २०६

म्हणतां येणें कठिण आहे. जिज्ञासापूर्ति हा वाङ्मयहेतु लेखकापेक्षा वाचकालाच अधिक लागूं पडेल. इतर कोणत्याहि हेतूपेक्षा आह्लादासाठी वाङ्मयनिर्मिति होते, हें सर्वमान्य होण्यासारखें आहे.

बखरींचें वाङ्मयीन स्वरूप :

मराठी बखरींचें लेखन हेतुपुरस्सर झाल्याचें दिसतें; परंतु तें वाङ्मयाच्या भूमिकेने झालें नाही; तरीहि त्यांत वाङ्मयगुण आढळतात हें विशेष.

बखरींचा पहिला गुण म्हणजे वर्ण्य विषयाशीं तादात्म्य किंवा जिव्हाळा हा होय. वर्ण्य विषयाशीं तद्रूपता झाल्याशिवाय कोणतेंहि लेखन जिवंत (परिणामकारक) होऊं शकत नाही हें उघड आहे. कोणताहि बखरकार मग तो सभासदासारखा समकालीन असो किंवा चिटणिसासारखा उत्तरकालीन असो, त्याचें वर्ण्य विषयाशीं (ऐतिहासिक व्यक्ती व प्रसंग) उत्कट तादात्म्य झाल्याचें दिसून येतें. हें तादात्म्य त्या त्या लेखकाच्या वैयक्तिक कल्पनाशक्तीवर अवलंबून असल्यामुळे निरनिराळ्या बखरींतल्या तादात्म्याच्या अंशांत कमी-अधिक प्रमाण आहे. भाऊसाहेबांच्या बखरींत तें उत्कृष्ट स्वरूपाचें आहे, तर सोहनीकृत पेशव्यांच्या बखरींत तितकें नाही. योग्य शब्दांत कोणताहि मजकूर व्यक्त करण्यांत बखरकारांचें अप्रतिम कौशल्य दिसतें. वर्ण्य विषय हा त्यांचा अभिमानाचा विषय असल्यामुळे त्यांच्या लेखनांत साहजिकच उत्कटता निर्माण झाली आहे. वर्ण्य विषयाशीं वाटणाऱ्या त्यांच्या जिव्हाळ्याला प्रामाणिकपणाची अनुपम जोड मिळाली आहे. यामुळेच बखरींतील मजकूर लेखकांनी जाणूनबुजून विपर्यस्त लिहिला नाही.

वर्ण्य विषयाशीं तादात्म्य व निवेदनाचा प्रामाणिकपणा या गुणांमुळे बखरींत रसोत्कटता हा वाङ्मयीन गुण निर्माण झालेला आहे. शौर्यवर्णन हा बखरींचा एकमेव विषय नाही. वीररसाप्रमाणे करुण, अद्‌भुत, भयानक, बीभत्स, रौद्र इत्यादि रसांची उत्कटता बखरींत आढळते. उदाहरणार्थ, भाऊसाहेबांच्या बखरींतील दत्ताजी शिंदे, गोविंदपंत बुंदले, बळवंतराव मेहेंदळे व विश्वासराव यांच्या मृत्यूच्या वर्णनांतील कारुण्य किंवा श्रीमंत नारायणराव पेशवे यांच्या बखरींतील नारायणराव पेशव्यांवरील प्रसंग हीं कोणाहि सहृदय वाचकाच्या हृदयाला पाझर फोडतील. चिटणिसांच्या सप्त-

प्रकरणात्मक चरित्रासारख्या बखरींतील अद्‌भुत वर्णनें ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने दोषास्पद ठरलीं, तरी वाङ्मयदृष्ट्या तीं तशीं ठरणार नाहीत. कारण प्राचीन कालापासून अद्‌भुतचित्रण हा वाङ्मयाचा गुण मानण्याची परंपरा आहे. बखरींतील अद्‌भुतता रसोत्कट असल्यामुळे ती वाङ्मयदृष्ट्या हानिकारक म्हणतां येणार नाही. शृंगार व हास्य या रसांसहि बखरींत स्थान आहे. गोविंदराव खंडेराव चिटणीसकृत श्री शाहू महाराजांच्या बखरींतील शाहूचा द्वितीय विवाहासंबंधी हट्ट व पेशवाईची अखेर या बखरींतील माहुलीच्या वाड्यांत विधवा गंगाबाई राजमाचीकरीण हिच्याशीं दुसऱ्या बाजीरावाने केलेलें दुर्वर्तन यांचें शृंगारिक वर्णन आढळतें. भाऊसाहेबांच्या बखरींतील गोविंदपंत बुंदेले यांचें शीर कापून तें शीर, पत्रें व वकील अहमदशहा अबदालीकडून आल्यावर श्रीमंतांनी त्याला दिलेलें उत्तर, तसेंच हरिवंशाच्या बखरींतील नानास मेजवानी झाली त्या वेळीं पुरुषोत्तम दाजी यांनी केलेली गंमत हीं विनोदाचीं उदाहरणें होत. भाऊसाहेबांनी दिलेल्या विनोदी उत्तरांत कारुण्याची छटा असल्यामुळे तो उत्कृष्ट प्रकारचा झाला आहे. शृंगार व हास्य यांचीं उदाहरणें बखरींत विरळाच सापडतात. रसोत्कटता या वाङ्मयीन गुणाच्या दृष्टीने बखरी उच्च दर्जाच्या आहेत.

निवेदनकौशल्य हा बखरींचा एक वाङ्मयीन विशेष म्हणतां येईल. कथावस्तूची आकर्षक पद्धतीने केलेली मांडणी म्हणजे निवेदनकौशल्य होय. एखाद्या उत्कृष्ट ललितकथेप्रमाणे सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचकाच्या मनांत उत्कंठा व विस्मय निर्माण करून त्याच्या चित्तवृत्ति तल्लीन करण्याचें सामर्थ्य बखरींत आहे. या गुणामुळे भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर इत्यादि बखरी वाचनीय झाल्या आहेत. बखरकारांचें हें निवेदनकौशल्य वर्णनें, संवाद या बखरींच्या अंगाच्याद्वारें प्रकट झालेलें दिसतें. उठावदार व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने चिटणिशी बखरींतील शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू तसेंच भाऊसाहेबांच्या बखरींतील भाऊसाहेब, मल्हारराव होळकर, दत्ताजी शिंदे, बळवंतराव मेहेंदळे व हरिवंशाच्या बखरींतील पुरुषोत्तम दाजी हीं व्यक्तिचित्रें संस्मरणीय आहेत.

उत्कृष्ट भाषाशैली हें बखरींचें एक वाङ्मयीन अंग होय. या दृष्टीने बखरींतील अर्थवाहकता व ध्वनिवाहकता लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

भाऊसाहेबांच्या बखरींत दत्ताजी शिंद्याच्या मृत्यूच्या वर्णनांतील किंवा बळवंतराव मेहेंदळ्यांच्या पराक्रमाच्या वर्णनांतील ओघवती भाषेबरोबरच तिच्या अर्थवाहकतेचाहि प्रत्यय येतो. चिटणिसांच्या शिवछत्रपतींच्या चरित्रांतील अफजल–शिवाजी भेटीच्या वर्णनांत खान व शिवाजी यांच्या परस्परासंबंधी वाटणाऱ्या भावना कलात्मकतेने ध्वनित केलेल्या आहेत. मेहेंदळ्यांच्या पत्नीचा शोक, मराठ्यांचा मुसलमानांशीं सामना, मराठ्यांचा पराभव इत्यादि विविध प्रसंगवर्णनांत भाऊसाहेबांच्या बखरीची भाषाशैली नवीन नवीन स्वरूप धारण करते. भाषाशैलीच्या दृष्टीने अर्थानुकारी किंवा ध्वन्यनुकारी शब्दांची योजना ही आवश्यक असते. उदाहरणार्थ, भाऊसाहेबांच्या बखरींतील ‘ कुतुबशहा याने कमरेचा सुरा ओढून, लाथेने ढकलून, पालथा घालून, दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद केला. ’ हें वाक्य अशा प्रकारचें होय. बखरींतील हा गुण तिच्या यशांत भर टाकणारा आहे. बखरींतील सुंदर भाषाशैलीमुळे लेखकांच्या भाषाप्रभुत्वाची कल्पना येतेच व त्याचबरोबर त्यांच्या अंतरंगांतील विचार-विकारांची स्पष्ट जाणीव होते. बखरलेखकांच्या सौंदर्यदृष्टि, सहृदयता या कलात्मक गुणांची ओळख त्यांच्या भाषाशैलीमुळेच होते. बखरकारांची भाषाशैली ही कोणाच्याहि अनुकरणाने तयार झालेली नसून ती त्यांच्या अंतरंगांतून निर्माण झाली आहे. म्हणूनच ती स्वतंत्र आहे. मराठी बखरींची भाषाशैली ही वैशिष्ट्यपूर्ण आहे यांत शंका नाही.

प्रसाद हा वाङ्मयीन गुण बखरींत आढळतो. या गुणाबरोबरच ओज आणि माधुर्य हे त्याला पोषक असे गुणहि त्यांत आहेत. सुलभ अर्थव्यक्ति म्हणजे प्रसाद. सहजता हा प्रसादाचा अविभाज्य गुण आहे. म्हणूनच प्रसाद हा अर्थगुण मानला पाहिजे. चिटणिसांचीं छत्रपतींचीं चरित्रें, भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर, पेशव्यांची बखर, होळकरांची थैली इत्यादि बखरींची रचना प्रासादिक आहे. प्रसादान्तर्गत एक भाग म्हणजे भाषेचा आवेश—ज्याला आजपर्यंत चुकीने ओजोगुण म्हटलें आहे— तो बखरींत आढळतो. पक्षपातीपणामुळे निर्माण झालेला आवेश हा बखरींचा इतिहास-दृष्ट्या दोष असेल; पण त्यामुळेच बखरींचें वाङ्मयीन मूल्य वाढलेलें आहे. स्वकीयांचें शौर्य, धैर्य तसेंच त्यांचा सात्त्विक व स्वाभिमानी बाणा इत्यादि गुणांचें वर्णन करतांना बखरकारांचा आवेश दिसून येतो. वेंचक शब्दरचनेमुळे

बखरींत या गुणाचा आविष्कार सहज झालेला आहे. सभासद, चिटणीस, रघुनाथ यादव इत्यादिकांच्या बखरी याचीं उदाहरणें होत.

प्रसाद व आवेश या गुणांप्रमाणेच माधुर्य हाहि गुण, भाऊसाहेबांच्या बखरीसारख्या वाङ्मयीन बखरलेखनांत तितक्याच उत्कटपणें आढळून येतो. माधुर्य हा नादमयता निर्माण करणारा शब्दगुण असला, तरी एकच अर्थ विविध कल्पनांच्या साहाय्यानें व्यक्त करणारा अर्थगुण म्हणणें योग्य होईल. बखरींतील नादमाधुर्य व अर्थवाहकता यांचें सौंदर्य आवेश या गुणामुळे वाढलेलें आहे, हें वाङ्मयीन बखरींवरून दिसून येतें. सारांश, आवेश, प्रसाद व माधुर्य या गुणत्रयीमुळे बखरींना वाङ्मयीन तेज चढलेलें आहे.

आत्मविस्मृति हा ललितकथाकारास—विशेषतः नाटककारास आवश्यक असणारा वाङ्मयीन गुण अंशतः बखरींत प्रत्ययास येतो. आत्मविस्मृति याचा अर्थ लेखकाने निर्मिलेलीं पात्रें हीं स्वतंत्र असून त्यांच्यावर लेखकाच्या व्यक्तिविशेषाचा पगडा बसूं न देण्याची कला हा होय. शेक्स्पीयरच्या नाटकांत हा गुण प्रामुख्याने आढळतो. बखरकारांनी रंगविलेल्या व्यक्तींत हा कलागुण कित्येक ठिकाणीं स्पष्टपणें दिसतो. यामुळेच त्या व्यक्ती अमर झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, हरिवंशाच्या बखरींतील पुरुषोत्तम दाजी, वसईच्या रणसंग्रामांतील गंगाजी नाईक व चिमाजी अप्पा, भाऊसाहेबांच्या बखरींतील दत्ताजी शिंदे, बळवंतराव मेहेंदळे व भाऊसाहेब, ब्रह्मेंद्रस्वामींच्या चरित्रांतील ब्रह्मेंद्रस्वामी या व्यक्तींचें चित्रण सुंदर आहे. आत्मविस्मृति या गुणविशेषामुळे बखरींचें वाङ्मयीन मूल्य वाढलें आहे हें निश्चित.

बखरींचे विषय व त्यांची मांडणी हीं वाङ्मयदृष्ट्या आकर्षक आहेत. बखरींतील प्रसंग तात्कालिक स्वरूपाचे असले तरी त्यांत सत्त्व, रज, तम अशा त्रिगुणात्मक मानवी भावनांचें वर्णन दिसतें. बखरींतील विविध ऐतिहासिक प्रसंगांत दिसून येणारें वाङ्मयाचें भावनिक अंग जितकें चांगलें प्रतीत होतें, तितकेंच त्या त्या प्रसंगाला उठाव देण्याच्या दृष्टीने असलेलें कल्पनीय अंगहि आह्लाददायक आहे. बखरकारांची बहुश्रुतता हें बखरींतील बौद्धिक अंग होय. शैली गुणाच्या दृष्टीने बखरी समृद्ध आहेत. निरनिराळ्या प्रसंगांत दिसून येणारी बखरींतील रसात्मकता विलोभनीय आहे. चित्रगुण हा बखरींचा विशेष होय. बखरलेखनांत महाराष्ट्राचा स्वभाव, महाराष्ट्राच्या

भावना व महाराष्ट्राचे गुणदोष हीं असल्यामुळे, तें मराठ्यांचें प्रातिनिधिक वाङ्मय झालें आहे. वाङ्मयाचा मुख्य हेतु म्हणजे आह्लाद. तो बखरींतील उपरिनिर्दिष्ट गुणांमुळे प्राप्त होतो.

प्राचीन मराठी वाङ्मयांत महानुभावीय वाङ्मय अपवादात्मक धरलें, तर गद्यवाङ्मयदृष्ट्या स्वराज्याच्या व साम्राज्याच्या कालांत निर्माण झालेल्या ऐतिहासिक पत्रांबरोबर बखरींचाहि विचार करणें अवश्य आहे. शिवपूर्व-कालापासून अव्वल इंग्रजीपर्यंत म्हणजे सुमारें दोन-अडीचशें वर्षें बखर-लेखनाची अव्याहत परंपरा चालू राहिली. मराठी बखरी हें तत्कालीन मराठी गद्याचें स्वरूप होय. वाङ्मयदृष्ट्या सर्व बखरी सारख्या योग्यतेच्या नसल्या, तरी स्वतंत्र गद्यलेखनाचा प्रकार होण्यास लागणारे त्यांतील साहित्यगुण मान्य केले पाहिजेत. बखरींनी आपल्या वैशिष्ट्याने मराठी गद्यलेखनाला अभिमानास्पद असें वळण लावलें हें कसें नाकारतां येईल ?

निष्कर्ष :

आतापर्यंत बखरींच्या ऐतिहासिक व वाङ्मयीन स्वरूपाची चर्चा केल्यानंतर बखर–इतिहास की वाङ्मय या वादाच्या दृष्टीने विचार करणें इष्ट होईल.

बखरींच्या ऐतिहासिक अंगाचा विचार करतांना त्या आजच्या दृष्टीने प्रत्यक्ष इतिहास नसल्या किंवा ऐतिहासिक सत्याच्या कसोटीला त्या उतरत नसल्या, तरी कांही विशिष्ट मर्यादेपर्यंत त्यांना इतिहास मानणें कसें आवश्यक आहे हें आपण पाहिलें. बखरींना संपूर्ण ऐतिहासिक मूल्य नसलें तरी इतिहासाचें तें एक साधन आहे. शिवाय इतिहासलेखनाच्या भूमिकेनेच बखरींचें लेखन झाल्याचें दिसतें. इतिहासलेखनास आवश्यक असणारे कल्पकता व प्रामाणिकपणा हे गुण बखर-वाङ्मयांत प्रभावीपणें आढळतात. बखर-लेखनांत ऐतिहासिक शास्त्रीय दृष्टि नसली, तरी त्या लेखनासाठी उपलब्ध साधनांचा अधिकाधिक उपयोग केलेला आहे. त्या कालांत ऐतिहासिक साधनें फारशीं उपलब्ध नसल्यामुळे, कित्येक बखरी स्मृतीवर हवाला ठेवून लिहिल्या आहेत. हा कालाचा दोष असेल; पण तो बखरकारांचा नव्हे. इतिहासाच्या लेखनाला लागणारा महत्त्वाचा गुण म्हणजे निवेदनकौशल्य. तो बखरकारांच्या अंगीं आहे यांत मुळीच संदेह नाही. सारांश, इतिहासदृष्टीने बखरींचें महत्त्व सिद्ध होतें. म्हणूनच इतिहासांत त्यांचा अंतर्भाव केला पाहिजे.

बखरींचा वाङ्मयदृष्ट्या विचार करतांना वाङ्मयदृष्टि किंवा कलादृष्टि ही बखरकारांची भूमिका नसूनहि त्या वाङ्मयीन स्वरूपाच्या झाल्या आहेत हें स्पष्ट आहे. वाङ्मयनिर्मितीस आवश्यक असणाऱ्या कांही विशिष्ट गुणांच्या कसोटीला बखरी उतरतात. रसवत्ता या एकाच वाङ्मयगुणाच्या दृष्टीनें पाहिलें, तरी बखरींची गणना वाङ्मयांत करावयास हवी. लेखकाच्या भावनांचा कलात्मक आविष्कार म्हणजे वाङ्मय, ही वाङ्मयाची सर्वमान्य व्याख्या बखरींना यथार्थतेने लागू पडते. या कारणामुळेच बखरींची गणना वाङ्मयांत करणें आवश्यक होय.

सारांश, इतिहास व वाङ्मय या दोन्ही दृष्टींनी बखरींचें महत्त्व आहे. त्यांचें स्वरूप केवळ एकांगी नाही. इतिहास आणि वाङ्मय या दोहोंचा त्यांत सुंदर कलात्मक संगम झालेला आहे. हेंच मराठी बखरींचें वैशिष्ट्य होय.

* * *

३ : बखरी : लेखनकाल, लेखक व नामकरण

प्रस्तुत प्रकरणांत मराठी बखरींच्या लेखनकालासंबंधी तसेंच त्यांच्या लेखकांसंबंधी विवेचन करावयाचें असून बखरींच्या नामाभिधानाविषयीचाहि विचार करावयाचा आहे.

लेखनकाल व लेखक यांचें महत्त्व :

मराठी बखरींचें वाचन करतांना कित्येक बखरींचे लेखनकाल व त्यांचे कर्ते यांच्याविषयी नोंद आढळत नाही. सभासदाचें शिवछत्रपतींचें चरित्र, चिटणिसांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र, भाऊसाहेबांची बखर, नागपूरकर भोसल्यांची बखर इत्यादि बखरींत लेखनकाल व लेखक यासंबंधीची माहिती कटाक्षानें दिलेली आढळते; तर श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर, पटवर्धनी वाका, खर्ड्यांच्या स्वारीची बखर इत्यादि बखरींत ती मुळीच नाही. मराठी बखरवाङ्मयाचा ऐतिहासिक व वाङ्मयीन दृष्टीनें अभ्यास होण्यासाठी बखरींचे लेखनकाल व त्यांचे कर्ते ठाऊक असणें आवश्यक आहे; कारण बखरींच्या लेखनकालावरून त्यांचें ऐतिहासिक प्रामाण्य व त्यांच्या कर्त्यांवरून बखरींतील वाङ्मयीन आविष्कार यांचा अंदाज घेणें सुलभ होईल. जेथें ही माहिती उपलब्ध नाही, तेथें बखरींतील अंतर्बाह्य पुराव्याच्या आधारें बखरींचा लेखनकाल व लेखक हे निश्चित करणें इष्ट ठरेल.

नामकरणाचें महत्त्व :

बखरींच्या नामकरणासंबंधीहि स्वतंत्र विचार होणें अगत्याचें आहे. कित्येक बखरींचें नामकरण उत्तरकालीं झालेलें दिसतें. मग तें नकल करणाऱ्यांनी केलेलें असो, अगर संपादकांनी केलेलें असो. उदाहरणार्थ, काव्येतिहास—संग्रहकार भाऊसाहेबांच्या बखरीसंबंधी लिहितात, "ह्या ग्रंथास शालिवाहन शके १६७५।७६ पासून शके १६८३ पर्यंत हिंदुस्थानांत व दक्षिणेंत मराठ्यांनी ज्या स्वाऱ्या केल्या त्या स्वाऱ्यांची बखर" असें कांही तरी नांव देणें योग्य दिसलें. मी तर 'पाणिपतची बखर' असेंच नांव देणार होतों; पण पुणें येथील प्रतीच्या १२७ व्या बंदाच्या डोकीवर 'बखर भाऊसाहेबांची'

असें लिहिलेलें आहे. खेरीज शेवटील प्रसंगाचा अतिनिकट संबंध श्री. सदाशिवराव भाऊ यांच्या नांवाशींच आहे. अशाकरितां 'भाऊसाहेबांची बखर' हेंच या ग्रंथाचें नांव कायम करून मी तो प्रसिद्ध करूं लागलों."[१] 'पेशवाईची अखेर' या बखरीसंबंधी गो. का. चांदोरकर म्हणतात, 'पेशवाईची अखेर' हें नांव बखरकाराने दिलें नसून सोयीसाठी आम्हीं दिलें आहे. या बखरीचीं आरंभीचीं ११ पानें व अखेरचें कदाचित् एखादें गेलें असल्याने मूळचें या बखरीचें कांही नांव असल्यास तें समजण्यास आता मार्ग राहिला नाहीं.[२]

संपादकीय संस्कार :

विषयानुरोधाने परिच्छेद म्हणजे कलमें पाडून त्यांना दिलेले अंक, अश्लील शब्द आणि वाक्यें यांचें उच्चाटण, प्रचलित पद्धतीचें शुद्धलेखन, परकीय ऱ्हस्वान्त शब्दांचें मराठी रिवाजाप्रमाणे दीर्घान्त लेखन, व्यंजनान्त शब्दांचें स्वरान्त लेखन, 'तर' बद्दल 'तरि,' 'तथापि' बद्दल 'तरी' याप्रमाणे अव्ययामधील भेद, इत्यादि मूळासंबंधीचे फेरफार संपादनाच्या वेळीं झालेले आहेत. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'भाऊसाहेबांच्या बखरीं'त (आवृत्ति सहावी) प्रकरणवार विभाग केलेले असून विषयानुरूप प्रत्येक प्रकरणास स्वतंत्र मथळे दिले आहेत. मध्ययुगीन आंग्ल बखरींप्रमाणे बहुतेक मराठी बखरींचें नामकरण उत्तरकालांत नकलकार व संपादक यांनी केलेलें आहे, असें स्पष्टपणें दिसून येतें. बखरलेखनाचा सामान्यतः पत्रात्मक संकेत, त्याचप्रमाणे मुद्रणकलेचा अभाव या दोन मुख्य कारणांमुळे बखरलेखनकालीं त्यांचें नामकरण झालें नसावें.

आतां प्रत्येक बखरीचा या दृष्टीने विचार करूं.

महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर :

ही बखर अनेक प्रकरणांचा एक ग्रंथ असून त्यांत एकूण सहा प्रकरणें आहेत. यांतील पहिलें प्रकरण – पूर्वपरंपरा – वंशउत्पत्ति – वर्णावर्ण–व्याख्या हें होय. भविष्योत्तरपुराणान्तर्गत सह्याद्रि-खंड या ग्रंथाधारें हें लिहिलें

१. भाऊसाहेबांची बखर (का. ना. साने १९३२), प्रस्तावना

२. पेशवाईची अखेर (गो. का. चांदोरकर १९१८), उपोद्घात

असल्यामुळे तें शक १५०० (इ. स. १५७८) च्या सुमारास केव्हा तरी रचिलें गेलें असलें पाहिजे असें राजवाडे म्हणतात.[1] या प्रकरणाचा लेखक भगवान् दत्त याचा उल्लेख शेवटीं आहे. दुसरें प्रकरण (राज) वंशावळी नामक असून तें शके १३७० (इ. स. १४४८) त रचलें असें प्रकरण समाप्तीवरून दिसतें. याचा कर्ता केशवाचार्य होय. तिसऱ्या प्रकरणास स्वतंत्र नांव नसलें तरी राजवाडे यांनी त्यांत कांही निवाडे व हकीकती असल्यामुळे 'निवाडे व हकीकती' हें यथार्थ नांव दिलें. 'या प्रतिवर ते हि प्रत चढेल' असा दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटीं पुढील प्रकरणासंबंधी म्हणजे तिसऱ्या प्रकरणासंबंधी उल्लेख येतो. या प्रकरणाचा तोच काल म्हणजे शके १३७० व तोच लेखक म्हणजे केशवाचार्य हें मान्य केलें पाहिजे. चौथ्या प्रकरणाचें नांव 'श्रीचिंतामणि कौस्तुभ–पुराण' असें सुरुवातीस दिलें असून भगवान् दत्त हें लेखकाचें नांव शेवटीं येतें. कौस्तुभचिंतामणि ग्रंथाच्या आधारें माहीमचा इतिहास (A Historia de Mahim) इ. स. १५९४ त लिहिला गेला, अशी माहिती The Origin of Bombay या पुस्तकांत आहे (पृ. ११९). म्हणून हें प्रकरण शके १५१६ (इ. स. १५९४) च्या अगोदर केव्हातरी रचलें असावें असें राजवाड्यांचें मत आहे.[2] पांचव्या प्रकरणांत पाठाराज्ञातिवंशावळ दिली असल्यामुळे राजवाड्यांनी तेंच नांव सुचविलें. या प्रकरणाचा लेखनकाल अंतर्गत मजकुरावरून शके १४६० (इ. स. १५३८) च्या सुमारास असावा असा राजवाडे तर्क करतात.[3] याच्या कर्त्याचें नांव उपलब्ध नाहीं. सहावें प्रकरण वंशावळी हें असून त्याचा काल संवत् १५३५ म्हणजे शके १४०० (इ. स. १४७८) असा दिला आहे. यात 'आबाजी नायक' व 'रघुनाथपंत कावळे' याच्या सहीचा उल्लेख असल्यामुळे तेच लेखक मानणें योग्य होईल.

भगवान् दत्ताने प्रकरण २ व ३ या गद्य प्रकरणांना १ लें पद्य-प्रकरण जोडलें व प्रकरण ५ व ६ या गद्य–प्रकरणांना ४ थें पद्य–प्रकरण जोडलें. अशा प्रकारें दोन बखरी निर्माण झाल्या. त्यानंतर दुसऱ्या अनामिक

१. महिकावतीची बखर (वि. का. राजवाडे शके १८४६), प्रस्तावना
२. सदर ३. सदर

संहिताकाराने या दोन्ही बखरींचा एक सलग ग्रंथ तयार केला. 'मत्छापासुनि' हा श्लोक, विजयनगरचा नाश, बाबर इत्यादि शक १४६० (इ. स. १५३८) व शक १५०० (इ. स. १५७८) नंतरचे उल्लेख हे त्याचे होत असें राजवाडे म्हणतात.[1] उपलब्ध बखर ही नकल, शक १७४१ (इ. स. १८१९) प्रमाथिनाम संवत्सरे माहे वैशाख शुद्ध प्रतिपदा रविवासरे' या दिवशींची असून हस्ताक्षर 'वालजी पाटील सिंधे शेषवंशि वसइ बाहादरपुरा' याचें असून राजश्री हीराजी रामजी राऊत सिंधे शेषवंशि वसइ बाहादरपुरा हा मालक असल्याचा उल्लेख आहे.

या बखरींतील प्रकरणें स्वतंत्र रचलीं गेल्यामुळे सर्व सलग ग्रंथाला स्वतंत्र नांव दिलें गेलें नाही यांत आश्चर्य नाही. माहीम प्रांताचा यांत इतिहास असल्यामुळे राजवाड्यांनी दिलेलें 'महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर' हें नांव अन्वर्थक होय. त्यांनी बखरीच्या कर्त्यांचें नांव केशवाचार्यादि असें दिलें आहे. प्रस्तुत बखरीच्या कर्त्यांची चरित्रविषयक माहिती उपलब्ध नाही; पण राजवाडे म्हणतात की, भगवान् दत्त हें सांप्रदायिक नांव असेल, तर दत्त हा भगवान् या गुरूचा शिष्य ठरेल. चौथ्या प्रकरणाच्या सुरुवातीस भगवाननंददत्त असें नांव येतें. त्यावरून असें म्हणतां येतें की, दत्त हा भगवानाचा नंद म्हणजे नंदन ऊर्फ मुलगा किंवा शिष्य होता.[2] हें विधान चिन्त्य होय. प्रस्तुत बखरीचीं दोन प्रकरणें शके १३७० (इ. स. १४४८) मधील असल्यामुळे तिचा लेखनकाल हाच धरला, तरी एकंदर ग्रंथस्वरूपाच्या दृष्टीने तो शक १६०० (इ. स. १६७८) हा मानला पाहिजे. महाराष्ट्र-सारस्वतकार या बखरीचा 'बिंबस्थान'ची ऊर्फ ठाण्याची बखर' असा उल्लेख करून ती तेराव्या शतकांतली मानतात.[3]

शालिवाहनाची बखर :

राजवाड्यांच्या मतें जींत इतिहासाचा कांही अंश सांपडतो अशी अत्यंत जुनी मराठी बखर म्हटली म्हणजे शालिवाहनाची बखर होय. ह्या बखरीच्या सध्या ज्या पोथ्या सापडतात, त्यांची भाषा लेखकांनी परंपरेने आधुनिक

---

१. सदर

२. सदर

३. महाराष्ट्र-सारस्वत (शके १८७३), पृ. ७७८

करून टाकली आहे; परंतु मूळ फार जुनें असावें यांत संशय नाही.[१] हल्ली शालिवाहनाच्या चरित्रात्मक बखरीच्या दोन प्रती उपलब्ध असून त्यांपैकी एक हस्तलिखित असून दुसरी मुद्रित आहे.

हस्तलिखित बखरींत लेखनकालाची नोंद नाही. तिच्या भाषेसंबंधी राजवाड्यांचें मत मान्य करावयास हरकत नाही. तिच्या भाषेवरून इ. स. १७०० ते इ. स. १८०० या कालांत तिचें लेखन झालें असावें. राजवाडे यांनी उल्लेखिलेली शालिवाहनाची बखर हीच असली पाहिजे. सदर हस्तलिखिताचा लेखक 'पो॥ म्हादाजी वीटल, मुकाम पैठण' हा असून त्याने 'राजश्री गणेशपंत नाना स्वस्थान श्रीरामेश्वर स्वामीचे सेवेसी' या आपल्या मालकाला त्याच्या आज्ञेवरून ही हकीगत पत्ररूपाने कळविली आहे. सदर बखरीच्या शेवटीं 'ही बखर येसवत आपाजी पा।' असें असल्यामुळे ही बखर मुळाची नकल असावी. त्यांत बखरीचें नांव नाही; पण 'शालीवान राजा याची उत्पति कसी जाहली ती लिहून पाठविणें' अशी आज्ञा झाल्याचा सुरुवातीस निर्देश आहे. म्हणून 'शालिवाहन राजाची उत्पत्ति' हें नांव अन्वर्थक होईल. नकलकाराने त्यास बखर म्हटलें आहेच.

मुद्रित प्रतीच्या प्रस्तावनेंत 'चालता शक १७६१ पर्यंत (सन १८४० सा पर्यंत)' असा उल्लेख असल्यामुळे, त्याचा लेखनकाल इ. स. १८४० हा मानणें युक्त होईल. सदर चरित्राचा कर्ता रघुनाथशास्त्री दात्ये हा असून त्यास त्याने 'शालिवाहन चरित्र' हें नांव दिलें आहे.

शालिवाहनाच्या बखरीनंतरच्या मानभावांनी लिहिलेल्या सिंघणादि यादवांच्या बखरींचा व हेमाडपंताच्या बखरींचा उल्लेख राजवाडे यांनी केला आहे. त्यांच्या मतें मानभावांच्या बखरीची भाषा जुनी आहे व हेमाडपंतांच्या बखरीची भाषा लेखकांनी आधुनिक केली आहे.[२] या बखरी अनुपलब्ध आहेत.

विजयनगरचा विध्वंस :

प्रस्तुत बखर मूळ कानडीचें संक्षिप्त रूप आहे अशी माहिती डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार देतात.[३] मराठी बखरीचें कानडी वळण असल्यामुळे

१. ऐ. प्र., पृ. ३४८ २. सदर, पृ. ३४९

३. I. H. R. Commission, Vol. VII (1925), P. 55.

हें मत मान्य होण्यास प्रत्यवाय नाही. या बखरींत 'पेस्तर अहवाल नजरे पडालिया बयानवार बखेर पाठउन देऊन आजी तागाईत छ २५ माहे मोहरम रोज च्यारी संदेश (संब्रेस ?) लिहुनु पाठविले' असें म्हटलें असल्याने या बखरीचा लेखनकाल बुधवार २२ ऑगस्ट इ. स. १५६५ हा आहे. 'ही मुळीं शक १४८८ (इ. स. १५६५) त लिहिली असून भाषा बरीच तत्कालीन आहे' असें राजवाडे म्हणतात.[१] महाराष्ट्र–सारस्वतकारांच्या मतें ही लढाई शके १४८६ मध्ये झाली व त्यानंतर थोडेच दिवसांनी ही बखर रचिली गेली. या बखरीची भाषा स्पष्टपणें पंधराव्या शतकांतली आहे.[२] सदर बखरीची नकल वेंकाजी नारायण कुलकरणी याने 'अनंदनाम संवछरे फलगुण सुद बीज' म्हणजे शके १५३६ त (इ. स. १६१४) केल्याचा उल्लेख शेवटीं आहे. ताजा कलम अप्पा (ण्णा) जी जोशी याचा असून त्याचा काल छ ११ माहे जमादिलाखर सन हजार १०९५ म्हणजे शुद्ध १२ शके १६०८ (२५ एप्रिल इ. स. १६८६) असा येतो.

मूळ कानडी बखरीचा लेखक रामजी तिरुमल हा असून तो विजयनगरच्या दरबारांत तालिकोटच्या लढाईच्या शेवटीं होता. रामजी तिरुमल हें महाराष्ट्रीय नांव असून, त्याने प्रचारांत असलेल्या कानडींत हें लेखन केलें आहे. भाषेवरून तो विजयनगरच्या मांडलिक संस्थानिकाचा दरबारी वकील असावा असें डॉ. अय्यंगार म्हणतात.[३] मराठी नकल ज्यावरून झाली आहे त्या प्रतीचा लेखक वेंकटाद्रि तकेल निसीदा प (रगणे) संपगाऊ से (सरकार) हुबेली हा आहे. डॉ. अय्यंगार म्हणतात त्याप्रमाणे मूळ कानडीचा लेखक रामजी तिरुमल हा निश्चित असल्याने वेंकटाद्रीने केलेली मूळ कानडीची नकल होय हें सिद्ध होतें. वेंकटाद्रि हें महाराष्ट्रीय किंवा कानडी व्यक्तीचें नांव आहे हें कळत नाही. मूळ कानडींतलें लेखन परदेशस्थ व्यक्तीने लिहिल्याचा पुरावा म्हणजे त्यांतील परकीय संज्ञा होत, असा अभिप्राय डॉ. अय्यंगार देतात.

महाराष्ट्र–सारस्वतकारांनी याला राक्षसतागडीची बखर असें नांव दिलें आहे. राजवाडेहि त्याच नांवाने उल्लेख करतात. महाराष्ट्र–सारस्वताचे

१. ऐ. प्र., पृ. ३४९

२. म. सा., पृ. ७७९

३. I. H. R. C. (*Ibid*)

पुरवणीकार तालिकोटची बखर असें म्हणतात. मराठी बखरीचा सुरुवातीचा कांही भाग गळलेला असल्यामुळे तिच्या नांवाचा उल्लेख नाही. या बखरीचे संपादक गो. का. चांदोरकर यांनी विजयनगरचा विध्वंस–'तालिकोट' अथवा 'राक्षसतागडी'च्या रणसंग्रामाची हकीगत असें म्हटलें आहे. डॉ. अय्यंगार हिला रामराजाची बखर असें म्हणतात.

ही लढाई तालिकोटला झाली नसून कृष्णा नदीच्या दक्षिण भागीं रामराजाच्या सैन्याच्या तळापासून १० मैलांवर मुडकल या किल्ल्यावर झाली असावी असें सेवेलचें मत आहे.[१] बयापूर किंवा भोगपूर हें लढाईचें ठिकाण असावें असें तो सुचवितो. डॉ. कृष्णस्वामींच्या मतें बखरीवरून मुसलमानी सैन्य तालिकोटला असल्याचें दिसतें. रामराजाचें सैन्य सेवेलने म्हटल्याप्रमाणे तुंगभद्रेच्या उत्तरेस तावरगिरी येथे असून, कांही सैन्य १० मैलांवर राक्षसतागडीस होतें. रामराजा स्वतः राक्षसतागडीकडे चालून गेल्यामुळे लढाई राक्षसतागडीस झाली, हें डॉ. अय्यंगारांचें मत ग्राह्य होण्यासारखें असल्यामुळे हिला, 'राक्षसतागडीची बखर' हें नांव योग्य आहे.

शिवछत्रपतीचें चरित्र :

शिवकालीन विषयावरील कालदृष्ट्या उपलब्ध असलेली पहिली बखर म्हणजे कृष्णाजी अनंत सभासदविरचित शिवछत्रपतीचें चरित्र ही होय. काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या या बखरीच्या शेवटीं तिचा समाप्तिकाल 'ईश्वर संवत्सर–मुक्काम चंदी शालिवाहन शके १६१६' (इ. स. १६९४) असा दिला आहे. काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी ही बखर मुख्यतः प्रतापगड प्रतीच्या आधारें प्रसिद्ध केली. हिच्या सर्व प्रतींत ईश्वर संवत्सर व १६१६ शक असेंच आहे. परंतु संवत्सरावरून पाहतां ही बखर शक १६१९ मध्ये लिहिली असें होतें.[२] ईश्वर संवत्सर शक १६१९ ला येतो असें महाराष्ट्र-सारस्वतकारहि म्हणतात.[३] राजवाड्यांच्या मतें 'सभासदी बखरीच्या सर्व प्रतींत १६१६ असा एकच पाठ असल्यामुळे सभासद यांनी आपल्या बखरीचा प्रारंभ शके १६१६ त केला व तिची समाप्ति शके १६१९

१. A Forgotten Empire (1924), P. 200

२. शिवछत्रपतीचें चरित्र (१८८९), पृ. २

३. म. सा. (श. १८७३), पृ. ७८४

ईश्वरनाम संवत्सरीं केली, अशी संगति जुळवावी लागते.[1] महाराष्ट्र-सारस्वताचे पुरवणीकार हिचा लेखनकाल शके १६१९ मानतात. या सर्वांचा विचार करतां प्रस्तुत बखरीचा लेखनकाल शके १६१९ (इ. स. १६९७) मानणें इष्ट होय.

या चरित्राचा लेखक कृष्णाजी अनंत सभासद असून त्याचें गोत्र काश्यप व उपनांव हिरेपारखी असें होतें. चरित्रकोशकारांच्या मतें हे जुन्नरकर देशपांड्यांचे आप्त दिसतात.[2] सभासद म्हणजे राजसभेंत बसून सल्लामसलत देणारा शिष्ट पुरुष असावा असा राजवाड्यांचा तर्क आहे.[3] हा राजारामाच्या पदरीं असून याला शिवाजीच्या कालाची चांगली माहिती असावी कारण 'तुम्ही पुरातन राज्यांतील माहीत (गार) लोक आहां तरि इस्तकबिलपासून चरित्र लेहून देणें' या राजारामाच्या आज्ञेचा तो सुरुवातीस उल्लेख करतो. याचें घराणें साताऱ्यानजीक वसंतगडचें. त्याचे कांही वंशज हिंदुस्थानांत असल्याचें काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात.[4] कोल्हापुरास आलेल्या यांच्या इतर वंशजांनी त्या राज्यांत मोठमोठीं कामें केलीं. चिटणिशीकडील व कोठीकडील कामें पूर्वी याजकडेच होतीं. चिटणिशीकडील कामें छत्रपतीच्या राज्यांत बहुधा प्रभु माणसांकडे असत. त्यामुळे सभासद हे चिटणिशी दप्तरांतील एक सामान्य पिढीजात कारकून असले पाहिजेत व काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी त्यांचा उल्लेख पंत या नांवाने केलेला असल्यामुळे, ते देशस्थ ब्राह्मण असावे असा राजवाड्यांचा अभिप्राय आहे. रियासतकार लिहितात की, राजारामाने जिंजीस अष्टप्रधानांच्या ज्या नेमणुका केल्या त्यांत कृष्णाजी अनंत सभासद यास मोरेश्वर पिंगळे या पेशव्याचा मुतालिक नेमिलें.[5] चंदी हें प्रस्तुत चरित्राचें लेखनस्थल आहे. सारांश, राजारामाबरोबर जी अत्यंत विश्वासू व निवडक मंडळी जिंजीच्या प्रयाणाच्या वेळीं गेली, त्यांत चरित्रकार कृष्णाजीपंत होते हें विशेष महत्त्वाचें होय.

---

१. ऐ. प्र., पृ. २१७
२. मध्ययुगीन चरित्रकोश, पृ. २६३
३. ऐ. प्र., पृ. २१७
४. शि. च., पृ. १.
५. म. रियासत ४ स्थि. राजाराम (१९३८), पृ. ४१

हा मजकूर पद्यात्मक असून त्यांत ' चरित्र ' असें आरंभीं म्हटलें असलें तरी ' ही बखर संपूर्ण जाहली ' अशी शेवटीं नोंद आहे. शिवछत्रपतीचें चरित्र हें संपादनाच्या वेळीं नामकरण केल्याचें दिसतें. ' सभासदाची बखर ' हें नांव विशेष रूढ आहे.

८ साष्टीची बखर :

वसईच्या रणसंग्रामाची ही हकीगत होय. या प्रसंगाच्या दोन स्वतंत्र बखरी प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी पहिली साष्टी ऊर्फ ठाण्याची बखर या नांवाने काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी इ. स. १८८२ मध्ये प्रसिद्ध केली व दुसरी श्री. गजानन गोविंद नाईक यांनीं इ. स. १९३५ मध्ये प्रकाशित केली. पहिल्या बखरीचा शेवट सालप्याच्या तहाच्या वेळेपर्यंत म्हणजे इ. स. १७८२ पर्यंत आहे व दुसरींत गंगाजी नाईक यांनी अंबरनाथाजवळ तळें खणलें त्या वेळेपर्यंत म्हणजे इ. स. १७४१–४२ सालपर्यंतचा इतिहास आहे. या दुसऱ्या बखरींतील शेवटली मुख्य घटना चिमाजी अप्पाच्या मृत्यूची होय. चिमाजी अप्पाचा काल ता. १७ डिसेंबर इ. स.१७४० रोजीं झाला.

मूळ बखर मोडींत असावी व नंतर तिच्या निरानिराळ्या नकला झाल्या असाव्यात. काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेली बखर ही जास्त भाग जोडलेली आहे. ती काव्येतिहाससंग्रहकारांना म. गो. रानडे यांच्याकडून मिळाली असून, बालबोध लिपींत असल्याचें ते म्हणतात. साष्टीची ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम या नांवाने प्रसिद्ध झालेली दुसरी बखर युद्धप्रसंगानंतर लवकरच लिहिली असून, तिची प्रत ब्याच पुढच्या काळीं तयार झाली.[१] मूळ बखरीच्या लेखनाचा काळ सुमारें शके १६६४ (इ. स. १७४२) असावा. काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी प्रसिद्ध केलेल्या बखरींत इंग्रजांनी मुंबईच्या लगतची साष्टी तीन लक्षांची ठेवली या इ. स. १७८२ च्या सालप्याच्या तहाचा उल्लेख असल्यामुळे, या प्रतीचें लेखन शके १७०४ (इ. स. १७८२) नंतर झालें असावें व याप्रमाणे मूळ प्रतींत हा जादा मजकूर घातला असावा.

या बखरीच्या लेखनकर्त्याची माहिती उपलब्ध नाही; परंतु ' वसईचा दुर्धर धर्मसंग्राम ' या बखरीचे प्रस्तावनाकार म्हणतात--नकलेचा एकंदर झोक

१. सा. ब. (१९३५), प्रस्तावना

पाहतां व ती ज्यांच्याकडे मिळाली त्यांच्याबद्दल विचार करतां कारण राणे हे ठाण्याचे ज्ञाति अधिकारी आहेत. ही नक्कल करणारा इसम पाठारे ज्ञातीचा असावा.'[1] बखरींतील एकंदर तपशीलवार मजकूर पाहतां लेखक हा तत्कालीन असावा. दोन्ही बखरींच्या भाषेचें स्वरूप भिन्न असल्यामुळे त्यांचे नकलकार एक नसून निरनिराळे असावेत.

काव्येतिहाससंग्रहकारांनी प्रसिद्ध केलेल्या बखरीला ' साष्टी ऊर्फ ठाण्याची बखर ' हें नांव नकलकारांनी दिलें असावें व साष्टीची बखर ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम हें दुसऱ्या बखरीला नांव श्री. नाईक यांनी दिलें आहे.

श्री शाहू महाराज यांची बखर :

राजाराम व संभाजी यांची त्रोटक हकीगत देऊन शाहू महाराज यांची सविस्तर हकीगत प्रस्तुत बखरींत दिली आहे. या बखरीच्या लेखनकालासंबंधी पुढील उल्लेख आहे. ' ही व्यवस्था कैलासवासी गोविंदराव खंडेराव चिटणीस यांणीं सांगितल्यावरून लिहिली असे. त्याची नक्कल बाबाजी जनार्दन यांणीं करून घेतली. त्यावरून ही नक्कल केली असे. मित्ती आषाढ वद्य ५ शके १७९८ (इ. स. १८७६) सर्वधारीनाम संवत्सरे संवत् १९३३ मुक्काम छावणी इंदूर. हस्तअक्षर सखाराम महादेव.' म्हणजे ही बखर गोविंद खंडेराव चिटणीस यांनी तोंडीं (?) हकीगत सांगितल्यावर लिहिलेल्या बखरीची नकल होय. ज्या अर्थी यांत शाहूच्या मृत्यूपर्यंतची विस्तृत हकीगत आहे त्या अर्थी शाहूच्या निधनानंतर म्हणजे शके १६७१ (इ. स. १७४९) नंतर हिचें लेखन झालें असावें. ह्या बखरीची भाषा अठराव्या शतकांतील दिसते.

प्रस्तुत बखरीचा मूळ कर्ता गोविंद खंडेराव चिटणीस (इ. स. १७१६–१७८४) हा खंडो बल्लाळ चिटणिसाचा मुलगा होय. विरूबाईमुळे (शाहूची दासी) त्याला चिटणीसपद मिळालें. शाहूची धाकटी राणी सगुणाबाई हिचा त्याच्यावर विशेष लोभ होता. शाहूचा त्याच्यावर अत्यंत विश्वास असे. चिटणिसांचा सल्ला शाहू मान्य करी, म्हणून पेशवेहि त्याच्याशीं चांगलें वागत.[2] ताराबाई विरुद्ध सकवारबाईने केलेल्या राजकारणांत इतर मंडळीं-

---

१. सदर

२. म. रि.–पेशवा बाळाजीराव (१९४४), पृ. १९९

बरोबर चिटणिसासहि धनिणीचा रोष सहन करावा लागला. शाहूच्या मृत्यूच्या वेळीं महाराजाजवळ कोणाचाहि प्रवेश होऊं नये अशी व्यवस्था असतांना, चिटणिसास दगा करण्याचे प्रयोग होत होते. शाहूच्या मृत्यूने हाहाःकार झाल्यावर शाहूची चुलती व राजारामाची पत्नी ताराबाई ही शाहूस पाहावयास आली; परंतु ' रायानें (गोविंदराव चिटणिसाने) तितक्यांत त्यांजजवळ जाऊन विनंती केली की, महाराज आपण धनी, आणि हा प्रसंग पाहूं नये, ...आपण आपले ठिकाणीं चलावें, तेथे आज्ञा करावी, जशी आज्ञा होईल, तसें करण्यास नीट पडेल. ' असें बोलून तेथे नेऊन बंदोबस्त केला.[1] रामराजा खोटा असें देवापुढे शपथा घेऊन ताराबाईने जाहीर केलें. तारीख २६ मे इ. स. १७५७ रोजीं तिने पेशव्यांस लिहिलें की, ' चिरंजीव (शाहू) कैलासवासी जाल्यावर आम्हांस खावंद करून दिला त्याची पूजा आम्ही करूं लागलों, म्हणून अर्ज लिहिला ऐशास याचा विचार तुम्हांसहि कळून गेलाच आहे. प्रथम दिवशींच श्री कोटेश्वरीं साहेबांची स्वारी गेली तेव्हा श्रीच्या देवालयांत पुराणिक व गोपाळराव यादव व गोविंद खंडेराव व बापूजी खंडेराव चिटणीस यांच्या दुवर्गाच्या साहेबींत तत्क्षणींच आज्ञा केली की ही वस्तु खरी नाही. वंशास डाग लागतो तेव्हा दूर करणें. '[2]

ह्या बखरीची सुरुवात ' छत्रपति शाहूमहाराज यांस बालत्वापासोन राज्यप्राप्ति होऊन प्रजापालनादि स्थिति कशी जाली तें विस्तारें करून श्रुत करावें म्हणोन आज्ञापिल्यावरून सेवेसी विदित करतों ऐसाजे ' अशी आहे. ही बखर आज्ञेने लिहिली हें स्पष्ट दिसतें. ' श्रीशाहूमहाराज यांची बखर ' हें नांव भारतवर्षकारांनी दिलें आहे.

धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी ऊर्फ भार्गवबाबा यांचें चरित्र :

प्रस्तुत बखर काव्येतिहाससंग्रहांत इ. स. १८८२ मध्ये प्रसिद्ध झाली. ब्रह्मेंद्रस्वामी हे शाहू महाराज (थोरले), बाजीराव व चिमाजी अप्पा यांचे गुरु होते. या थोर सत्पुरुषाचें यांत जीवनचरित्र आलेलें आहे. ' ही बखर परशुराम भिकाजी भाटे वकील डि. कोर्ट, रत्नागिरी यांनी साताऱ्याहून पाठविली, असें काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात. शेवटील मजकूर कोल्हापूर

१. सदर, पृ. १७७

२. म. रि. पेशवा बाळाजीराव (१९५३), पृ. ५४

प्रतींतला निराळा आहे. 'ही प्रत विष्णुपंत भागवत वीरमाडकर यांनी पाठविली. ही शके १७६९--७० त लिहिली असावी ' असें काव्येतिहास-संग्रहकर्ते लिहितात. कारण यांत शके १७७० (इ. स. १८४८) पर्यंत मजकूर आहे. शाहूच्या मृत्यूनंतर म्हणजे इ. स. १७४९ नंतर लवकरच ही बखर लिहिली असावी. प्रस्तुत चरित्राचा लेखक अज्ञात आहे. कारण त्याचें नांव कोठेहि दिलेलें नाही; परंतु तो स्वामींच्या शिष्यसंप्रदायांपैकी कोणी तरी निकटवर्ती शिष्य असावा.

या बखरीस 'धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी ऊर्फ भार्गवबावा यांचें चरित्र' हें नांव काव्येतिहाससंग्रहकारांनी दिलें. ब्रह्मेंद्रस्वामींची बखर हें नांव मात्र विशेष रूढ आहे. यांतील (कोल्हापूर प्रत) स्वामींच्या निधनाचा मजकूर 'श्री महापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांच्या निधनाची बखर' या नांवानें भारतवर्ष (इ. स. १८९९-१९००) मध्ये प्रसिद्ध झाली आहे. या मजकुरासंबंधी भारतवर्षकार म्हणतात, 'ही बखर स्वामींचे शिष्य जगन्नाथ चिमणाजी भागवत यांचे वंशजाकडून प्राप्त झाली आहे. हींत स्वामींच्या निधनाचीच हकीकत आहे. त्या समयीं हजर असलेल्या कोणी तरी इसमाने ती लिहिली आहे.'[1] काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या स्वामींच्या चरित्रांत हा निधन-वृत्तान्त येतो. त्यांत व यांत विशेष फरक नाही.

शिवाजीमहाराजांची बखर :

ही बखर म्हणजे सभासदी बखरींत अधिक माहिती घालून सुधारलेला अनुवाद होय. प्रस्तुत बखरींत तिच्या लेखनकालाचा साक्षात् उल्लेख नाही. फुलचरी, कलकत्ता इत्यादि नांवें या बखरींत आल्यामुळे व शंभु छत्रपतीच्या पुढे हें लेखन केलें असा उल्लेख असल्यामुळे, प्रस्तुत बखर शक १६८२ (इ. स. १७६०) पासून शक १६९२ (इ. स. १७७०) पर्यंत कोणत्या तरी एका वर्षीं लिहिली असावी असा राजवाड्यांचा तर्क आहे.[2] महाराष्ट्र-सारस्वतकारांच्या मतें चित्रगुप्ताने यशवंतराव शिंद्याच्या पदरीं असतांना शके १७०० (इ. स. १७७८) च्या आधी दहा-पंधरा वर्षें ही

१. भारतवर्ष, नोव्हेंबर १८९९
२. ऐ. प्र., पृ. २१६

बखर लिहिलेली असावी.[1] महाराष्ट्र-सारस्वताचे पुरवणीकार हिचा लेखनकाल शके १६८३ (इ. स. १७६१) हा देतात.[2]

सदर बखरीचा कर्ता चित्रगुप्त हा आहे; कारण तो स्वतःचा 'पाहा हो चित्रगुप्त नामाचि मला श्रीस्वामीने (दीधलें)' असा उल्लेख करतो. शिवाय त्याने 'या बखरीचा (सभासदाची बखर) भावगर्भ चित्तांत संपूर्ण मनन रघुनाथ यादव चित्रगुप्त दिमत राजमंदिर परंपरागत महाराजांचे कारकीर्दीचे सेवक' असें शेवटीं म्हटलें आहे. आपल्या चुलत आज्यास म्हणजे काकाजी प्रभु यास संभाजीने विनापराधें ठार मारलें; असेंहि तो म्हणतो. काकाजी प्रभु म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस (ऊर्फ) चित्रे हा होय असें राजवाडे म्हणतात.[3] व पुढे लिहितात, 'बाळाजी आवजीस चिमणाजी व शामजी हे दोन भाऊ होते. या दोघांपैकी कोणा एकाचा वंशज रघुनाथ यादव असावा हें निश्चित आहे. रघुनाथ यादवाला पुराणिकाच्या थाटावर लिहिण्याची संवय असल्याकारणाने त्याने आपलें आडनांव चित्रे असें साधें न लावतां पौराणिक थाटावर चित्रगुप्त असें लाविलें आहे. यमाच्या दरबारीं जसा साक्षात् चित्रगुप्त चिटणिशी करी, तशी रघुनाथ यादव कोल्हापूरच्या दरबारीं चित्रगुप्ती किंवा चिटणिशी करी. थोरल्या राजाराम महाराजांचा पुत्र व प्रसिद्ध जिजाबाईचा नवरा कोल्हापूर येथील जो संभाजी राजा त्याच्या दरबारीं आपल्या वयाच्या बाराव्या किंवा तेराव्या वर्षापासून पुढे चाळीस वर्षें रघुनाथ यादवाने चिटणिशी केली. १६८२ (इ. स. १७६०) त संभाजी राजे वारले. त्यावरून असें निष्पन्न होतें की, रघुनाथ यादव १६३० (इ. स. १७०८) च्या सुमारास जन्मला असावा, व त्याने चिटणिशी १६४२ (इ. स. १७२०) च्या सुमारास करण्यास सुरुवात केली असावी. संभाजी राजे वारल्यावर रघुनाथ यादवाची चिटणिशी दुसऱ्या कोणी बळकाविली असें दिसतें. तेव्हा चिटणीस मजकुरांच्या कपाळीं देशोदेशीं भणगतीने हिंडणें प्राप्त झालें. हिंडतां हिंडतां चिकोडीस व मनोली ह्या तालुक्यांत राहून शाहूराजाच्या प्रांतांत दंगा करणाऱ्या यशवंतराव

१. म. सा., पृ. ७९८

२. सदर, पृ. १०५३

३. ऐ. प्र., पृ. २१६

शिंद्याचा रघुनाथाला आश्रय मिळाला व त्याच्या पदरीं असतांना त्यानें ही बखर लिहिली.' महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणीकारांनी या बखरीचें लेखन-स्थल तोरगल-चिकोडी (?) हें दिलें आहे.[1]

चित्रगुप्त आपल्या लेखनास 'शिवाजी महाराज छत्रपति जनेश्वर यांचें चरित्र'—'शिव आख्यान' असें म्हणतो. काव्येतिहाससंग्रहकार चित्रगुप्त-विरचित शिवाजी महाराजांची बखर असें नांव देतात. चित्रगुप्ताची बखर हें तिचें रूढ नांव आहे.

शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर :

या बखरीचा विषय शिवचरित्र हा होय. महाराष्ट्र–सारस्वतकारांच्या मतें हल्ली ज्या ऐतिहासिक बखरी प्रसिद्ध आहेत, त्या सर्वांत (९० किंवा) ९६ कलमी बखर ही फार जुनी आहे. ही अरुणोदय वर्तमानपत्रांत व नंतर भारतवर्षांत छापली गेली. या बखरीचा लेखनकाल महाराष्ट्र–सारस्वताच्या पुरवणींत शक १६८२ (इ. स. १७६०) ते १६९२ (इ. स. १७७०) असा दिलेला आहे. भाषेच्या अंतर्बाह्य स्वरूपावरून ती अठराव्या शतकांत लिहिलेली दिसते.

प्रस्तुत बखरीचा शेवट महाराष्ट्र–सारस्वतकार पुढीलप्रमाणे देतात— 'सदरहू आख्यान नव्वद प्रकरणें पुण्यश्लोक राजा ह्याची कथा दत्ताजीपंत वाकेनिवीस त्यापासी तपशीलवार लिहिली होती. त्यापासून संकलित तालीक लेहून घेतली. अनाजी रंगनाथ मलकरे यांचे पुत्र खंडो अनाजी मलकरे यांणी हस्ताक्षरें तालिक लिहिली असे.[2] भारतवर्षाच्या प्रतींत पुढील मजकूर आहे—'याप्रमाणे सविस्तर पुण्यश्लोक राजे यांचें जाहलें तें संकलित लिहिलें असे. हस्ताक्षर अस्सल रायगडास दत्ताजीपंत यांचें असे.' शिवाजीची बखर नामक ९२ कलमी बखरींत उल्लेख आहे तो असा—'हस्ताक्षर खंडो आनाजी मळेकर यांचे वडिलीं संग्रह केला होता. रायगड दप्तरीं संग्रह वंशावली होती. त्याची तालीक वडिलापासी होती. संकलीत लेहून ठेविली होती.'. महाराष्ट्र–सारस्वताचे पुरवणीकार या बखरीच्या कर्त्यांचीं नांवें

१. म. सा., पृ. १०५३.
२ म. सा., पृ. ७८१

दत्ताजी व अनाजी रंगनाथ मलकरे अशीं देतात. या बखरीचा मूळ कर्ता दत्ताजी त्रिमल वाकेनवीस हाच होय.

दत्ताजी त्रिमल हा शिवाजी महाराजांबरोबर आग्र्यास गेला होता. हा त्यांच्या विश्वासांतला एक अधिकारी. हा प्रथम पागेकडे होता. तो मोहिमेवरहि जात असे. रोजची कांही हकीगत खास शिवाजीविषयी घडून येई ती लिहून ठेवण्याचें व खाजगी खात्यावर देखरेख करण्याचें काम याच्याकडे होतें. याने समर्थांचा गुरूपदेश घेतला होता. हा मंत्रिपदावर शाहूच्या आगमनापर्यंत होता.[1] शिवाजी जेव्हा हैद्राबादला गेला त्या वेळीं त्याच्याबरोबर हा होता. शिवाजी आग्र्याहून पळाल्यावर दत्ताजी त्रिंबक, रघुमित्र हे गृहस्थ घोडे सज्ज करून तयार होते, असें रिसायत सांगते.[2] शिवाजीच्या अष्टप्रधानांत दत्ताजी त्रिंबक वाकनीस हे मंत्री असून त्यांचें स्थान सिंहासनाच्या उजवीकडे असे. अनाजी रंगनाथ मलकरे हे पूर्वी पुरंदरचे सबनीस होते. पुढे ते सेनापतीकडील मुजुमदार झाले.

९२ कलमी बखरींत याला 'आख्यान' असें म्हटलें आहे. ९२ कलमी बखर हें तिचें रूढ नांव होय. महाराष्ट्र–सारस्वतकारांनी ज्या ९६ कलमी बखरीचा उल्लेख केला आहे, तिला वाकेनिशी बखर असेंहि म्हणतात. महाराष्ट्र–सारस्वतकार या बखरीस शिवकालीन बखरीमध्ये कालदृष्टया पहिला मान देतात; परंतु सभासदाची बखर ही पहिली शिवकालीन बखर होय.

होळकराची थैली :

पानपतची हकीगत सांगणाऱ्या व मल्हारराव होळकराने रणांगणांतून केलेल्या पलायनाचें समर्थन करणाऱ्या या बखरीचा लेखनकाल तिच्या शेवटीं 'शके १६८२ (इ. स. १७६१) विक्रमनाम संवत्सरे पौष शुद्ध ८ दिवशीं जालें वर्तमान लिहिलें हें विज्ञापना' असा आहे./ यावरून बखरीच्या लेखनाची तारीख १४ जानेवारी इ. स. १७६१ ही येते. म्हणजे मुसलमानी सन सु. ११६१ जखर ६ हा होय. पानिपतच्या युद्धानंतर लवकरच ही लिहिली असावी. राजवाड्यांनी ओझर्ड्यांच्या पिसाळांच्या दप्तरांतील ही बखर तिसऱ्या खंडांत प्रसिद्ध केली आहे.

---

१. म. रि. ३ उग्र० संभाजी (१९३५), पृ. ३३

२. सदर २ शक० शिवाजी (१९३५), पृ. १३०

या बखरीचा लेखक अज्ञात आहे; कारण यांत बखरीच्या कर्त्याचें नांव नाही. सुरुवातीचीं कांही पानें गळालीं असल्यामुळे तोहि मार्ग बंद आहे. मात्र मल्हारराव होळकर स्वतः हकीगत सांगत आहे, अशी बखरीची भूमिका दिसते. महाराष्ट्र–सारस्वतकार हिचा लेखक मल्हारराव होळकर मानतात. तो असेलच असें निश्चित ठरविणें कठिण असलें, तरी त्याच्या सांगण्यावरून ही बखर सजविली असावी. ही बखर समकालीन आहे; कारण शेवटीं 'या उपरि जसें घेतेल तसें सेवेसी श्रुत करूं' असा उल्लेख आहे. पुढील हकीगत लेखक मागाहून लिहिणार आहे असें दिसतें.

या बखरीचें रूढ नांव 'होळकराची थैली' हें होय. राजवाडे तिला कैफियत, बखर हीं दोन्ही नावें देतात.

नाना फडणिसाचें आत्मचरित्र :

स्वतःचें पूर्वचरित्र, पानिपतची लढाई, पानिपतवरून पलायन वगैरे हकीगत नाना या आत्मचरित्रांत देतात. हें आत्मचरित्र संपूर्ण नसून ता. २०-७-१७६१ रोजीं पहिले माधवराव यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं तोंपर्यंत तें आहे. या कारणामुळे हें आत्मचरित्र शके १६८३ आषाढ वद्य ३, ता. २०-७-१७६१ च्या नंतरचें आहे हें मान्य होण्यास प्रत्यवाय नाही. या आत्मचरित्राचा शेवट पुढीलप्रमाणे आहे— 'हें पुण्यश्लोकाचें स्वानुभूत निजहस्तें लिखित प्रकरण चतुर पुरुषांनी संग्रहित परम यत्नें करून संपादिलें, त्याची प्रति श्रीमंत राजश्री मोरोपंत तात्या १००० सहस्रबुद्धे यांचे प्रीतिस्तव केली. मित्ती आषाढ शुद्ध ५ मित्रवासर शके १७७१ (इ. स. १८४९) सौम्यनाम संवत्सरे शिवकिंकर गोपाळ महादेव भोगले, मुक्काम पुणें. वामन बाळकृष्ण दीक्षित लिहितात कीं, 'हा लेख अस्सल कोठे असेल तो असो, परंतु नक्कल मोरोपंत तात्या सहस्रबुद्धे यांचे संग्रहीं होती. तिची नक्कल श्री कृपासागर राजश्री गोपाळ महादेव भोगले पुणेंकर वास्तव्य टोकें, याणीं शके १७७१ सालीं केली ती अस्सल प्रत राजमान्य राजश्री माधवराव सखाराम कुळकर्णी, सोलेगावकर याणीं प्रत घेण्याकरिता आणिली ती त्यांचे बरोबर भागानगरास आली. ती संभाळून ठेवणेविषयी भोगले यांचें पत्र सोलेगावकरांस आलेवरून प्रत पाहिली वाचिली. संग्रहायोग्य दिसल्यावरून

संग्रह केला असे. मि. आश्विन शुद्ध १ भृगुवासर शके १८०० (इ. स. १८७८) बहुधान्यनाम संवत्सरे.'[1]

या आत्मचरित्राचा कर्ता नाना फडणवीस याचा जन्म साताऱ्यास ता. १२–२–१७४२ रोजीं झाला व मृत्यु पुण्यास ता. १३–३–१८०० रोजीं झाला.[2] नानास फडणीसपद ता. २९–११–१७५६ रोजीं मिळालें. त्यानंतर तो भाऊसाहेब यांच्याबरोबर कर्नाटकांत गेला. त्यास एकंदर नऊ स्त्रिया होत्या. मातोश्री व कुटुंब यांसह यात्रा करण्यासाठी भाऊबरोबर गेल्याचा उल्लेख त्याने आत्मचरित्रांत केला आहे. नारायणराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर सवाई माधवराव वारस करण्यासाठी केलेलें बारभाईचें कारस्थान, तळेगावास झालेला इंग्रजांचा पराभव, खर्ड्यांच्या स्वारींत मराठ्यांनी मिळविलेला जय इत्यादि त्याच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या घटना होत. त्यास दौलतराव शिंद्याने कैद करून नगरच्या किल्ल्यांत ठेवलें. नानास राघोबा व दुसरा बाजीराव यांचा विरोध होता. कर्नल ब्रिग्ज यांनी नानाच्या आत्मवृत्ताचें भाषांतर करून तें इ. स. १८२८ मध्ये लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीपुढे वाचलें.

प्रस्तुत बखरीस 'पुण्यश्लोकाचें स्वानुभूत निजहस्तें लिखित प्रकरण' असें नकलकाराने म्हटलें आहे. नाना फडणिसाचें आत्मचरित्र हें नामकरण संपादनाच्या वेळीं झालें.

पाणिपतची बखर :

पानिपतच्या युद्धाचें वर्तमान सांगणाऱ्या या बखरीचा लेखनकाल तिच्या कर्त्याने 'शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे माहे फाल्गुन शुद्ध ५ मंदवासर मुक्काम पुणें' असा दिलेला आहे. या बखरीच्या नागपूर प्रतींत तिचा लेखनकाल शके १६८३ हा असल्याचें काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात.[3] 'हें लेखन या गृहस्थाने १० जानेवारी स. १७६३ ला सुरू करून १८ फेब्रुवारीला संपविलें. युद्धानंतर बरोबर दोन वर्षांनी ही बखर बनली'

१. ऐतिहासिक पत्रें यादी वगैरे (१९३०), पृ. १८०
२. म. रि. उत्तर विभाग ३ (१९३२), पृ. ९७
३. पा. बखर (१८८९) उपोद्घात

असा रियासतकारांचा अभिप्राय आहे.[1] 'रघुनाथ यादव दिमत चिटणीस पेशवे यांचे, यांनी ही श्रीमंत गोपिकाबाईसाहेब, श्रीमंत नानासाहेब यांचें कुटुंब यांच्या सांगण्यावरून...बखर लिहिली.'[2] बखरीच्या सुरुवातीस तसा उल्लेख आहे. शिवाजीची चित्रगुप्त बखर सजविणारा रघुनाथ यादव तो हाच होय. आरंभीं 'दंडवत' असें असल्यामुळे लेखक प्रभू असावा, असें काव्येतिहाससंग्रहकर्ते म्हणतात.

लेखकाने आपल्या लेखनाला 'बखर' म्हटलें आहे. काव्येतिहाससंग्रहकारांनी 'पाणिपतची बखर' हें नांव दिलें आहे. ही बखर मुख्यतः ठाणें आणि पुणें प्रतीवरून काव्येतिहाससंग्रहांत प्रासिद्ध झाली.

भाऊसाहेबांची बखर :

पानिपतच्या रणसंग्रामाची हकीगत देणारी ही एक उत्कृष्ट बखर होय. काव्येतिहाससंग्रहांत प्रासिद्ध झालेल्या बखरीच्या प्रतींत तिचा लेखनकाल 'मिति ज्येष्ठ वद्य ७ शके १७८१ सिद्धार्थीनाम संवत्सरे ते दिवशीं सायंकाळीं लिहिली. लिहिणार विष्णु बापूजी निफाडकर राहणार धोपेश्वर तालुके राजापूर' असा आहे. ही मिति अर्थात् विष्णु बापूजी निफाडकर याने केलेल्या नकलेची होय. या बखरीच्या ज्या अनेक प्रती काव्येतिहाससंग्रहकर्त्यांना उपलब्ध झाल्या त्यांपैकी सर्वांत जुन्या अशा तुंगार प्रतीचा लेखनकाल शके १७१२ (१७१३ ?) विरोधीकृतनामसंवत्सरे मित्ती मार्गशीर्ष वद्य सप्तमी छ २० माहे रबिलाखर हा आहे. काव्येतिहाससंग्रहकर्ते म्हणतात-'सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत राघो मल्हाराने ही (तुंगार) प्रत पुण्यास करविली. यावरून ही बखर लढाई झाल्यावर लौकरच लिहिली असावी असें जें अनुमान, त्यास पुष्टि येते. तसेंच मराठ्यांविषयी बखर रचणाराने कमीपणा अंगीकारून जें इतकें लिहिलें आहे तें ह्या मोहिमेंत झालेला त्यांचा पराभव व नुकसान हीं त्यांच्या अंतःकरणांत ताजीं होतीं म्हणून लिहिलें असावें, हें अनुमानहि वरील अनुमानास पुष्टि आणतें.[3] या बखरींतील तपशीलवार माहितीवरून व 'भाऊसाहेब मृत्य

---

१. म. रि. ६ पेशवा बाळाजीराव (१९५३), पृ. ३८७

२. पा. ब. (१८८९) उपोद्घात

३. भा. ब. (१९३२) प्रस्तावना

पावले हें कोणीं ऐकिलें नाही व पाहिलें नाही. भगवंत–इच्छेकरून त्या कहरांतून पार पडून वांचून हरएक कोठे असले तरि निर्माण होतील' या संशयरूप लेखावरून हिचें लेखन लढाईनंतर लौकरच झालें असावें, असें काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात.[1] राजवाड्यांच्या मतें भाऊसाहेबांचा तोतया निर्माण व्हावयाच्या अगोदर म्हणजे इ. स. १७६३ च्या अगोदर ही बखर लिहिली आहे.[2] रघुनाथ यादवाच्या बखरीप्रमाणे हीहि बखर युद्धानंतर बहुधा दोन वर्षांनी लिहिली असावी असें रियासतकार लिहितात.[3]

या बखरीच्या कर्त्याचें नांव 'पोष्य कृष्णाजी शामराव मुक्काम दिल्ली इंद्रप्रस्थ' असें असून त्याने 'राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री व्यंकापा नाईक दिंडोरे कसबा वेळापूर स्वामींचे सेवेशीं' यास ही हकीगत कळविली आहे. व्यंकापा नाईक दिंडोरे हे पंढरपूरचे बडे सावकार असून बखर लिहिणार कृष्णाजी हा त्यांचा दिल्ली येथील गुमास्ता असें कृ. वि. आचार्य म्हणतात.[4] तुंगार प्रतीचा लेखक पोष्य चिंतामण गोविंद हा असून त्याने आपला स्वामी गणेशपंत याच्यासाठी ही बखर लिहिली. या बखरीचा लेखक शिंद्याचा पक्षपाती असून तो चिंतो कृष्ण वळे हा आहे व तिचें खरें नांव 'शिंदे यांची बखर' हें होय, असें ग्वाल्हेरचे आनंदराव भाऊसाहेब फाळके यांचें मत आहे.[5] हा प्रश्न विवाद्य होय.

या बखरीच्या नामकरणासंबंधी काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी केलेल्या खुलाशाच्या उल्लेख यापूर्वी आला आहे.

श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत :

पानिपतविषयक ही बखर आहे. ही 'कैफत' म्हणजे कैफियत कोणीं कधी लिहिली याचा निर्णय करवत नाही, असें काव्येतिहाससंग्रहकर्ते म्हणतात.[6] रियासतकारांच्या मतें पानिपत युद्धानंतर रघुनाथ यादवाच्या

१. सदर, पृ. १६४
२. ऐ. प्र., पृ. १०८
३. म. रि. ६ पेशवा बाळाजीराव (१९५३), पृ. ३८७
४. भा. ब., पृ. १
५. शिंदेशाही इतिहासाचीं साधनें, भाग ३ (१९३७), पृ. ६, ८
६. श्री. भा. कै. (श. १८०९), पृ. १

बखरीप्रमाणे हीहि बहुधा दोन वर्षांनी लिहिली असावी.[1] या बखरींत कालाचा उल्लेख विशेषतः मित्यांच्या स्वरूपांत आहे. हकीगतीचें साल व लेखनकाल हीं एक असल्यामुळे त्याचा निर्देश केला नसावा. या कैफियतींतील शेवटला मजकूर व भाऊसाहेबांच्या बखरींतील शेवटचा भाग यांत विलक्षण साम्य आहे. त्यांतील भाषेचे शब्दहि बरेच सारखे किंबहुना कित्येक ठिकाणीं तेच आहेत. त्यामुळें एकीची दुसरी नकल असावी अशी शंका येते. ह्या दोन्ही बखरी एकाच कालांतल्या म्हणजे शके १६८४ (इ. स. १७६२) सालच्या असाव्यात.

रियासतकार म्हणतात की, त्रिंबक सदाशिव म्हणजे नाना पुरंदरे पानपतावरून परत गेला त्याने कैफियत लिहिली असावी.[2] या कैफियतीचें लेखन माहितगार माणसाने केलें असावें यांत शंका नाही. या दृष्टीने पाहतां रियासतकारांचें वरील मत चिंत्य आहे.

नाना पुरंदरे हा अंबाजी पुरंदरे याचा पुतण्या असून माधवरावाबरोबर कर्नाटकच्या स्वारींत तो होता. यांचें पूर्ण नांव त्रिंबक सदाशिव पुरंदरे असें होतें. पेशवा व ताराबाई यांचें भांडण असल्यामुळे त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यांस पेशव्याने साताऱ्च्या व्यवस्थेस ठेवून दिलें. रियासतकार लिहितात—ताराबाईचा पेंच कसा निवारण करावा यासंबंधाने नाना पुरंदऱ्याने कित्येक वैकल्पिक मार्ग पेशव्यास सुचविले. फेब्रुवारी ३ स. १७५१ हा (पे. द. ६. १४७) कागद अभ्यसनीय आहे. त्यांतील एक मार्ग म्हणजे ताराबाई खावंद सबब त्या फर्मावतील त्याप्रमाणे सर्व कारभार करणें किंवा दुसरा म्हणजे आपणच सर्व सत्ता चालवून कारभार करावा, म्हणजे बाई अल्पावकाशांत नरम येईल.[3] दमाजी गायकवाड विरुद्ध पेशवे यांच्या युद्धांत साताऱ्याहून नाना पुरंदरे फौज घेऊन शिरवळावर गेले. भाऊसाहेबांस बळवंतराव मेहेंदळे, नाना पुरंदरे, जनकोजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, मल्हारराव इत्यादि मंडळी सुरुवातीला सल्ला देत. नाना पुरंदरे पानपतावरून आल्यावर पेशव्यास भेटला. त्याजकडून पेशव्यास बरीचशी खरी हकीगत

१. म. रि. ६ पे. बा. (१९५३), पृ. ३८७

२. सदर.

३. सदर, पृ. ४२

कळली. त्या वेळीं झांशी–ग्वाल्हेरच्या दरम्यान नाना पुरंदरे यांस व्यवस्था करण्यासाठी मागे ठेवून पेशवा ता. २२ मार्च रोजीं पछोरहून परत फिरला. पेशव्यांशीं हा अत्यंत एकनिष्ठ होता.

सुरुवातीसच हिला 'कैफत श्रीमंत राजश्री सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब व विश्वासराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब' असें म्हटलें आहे. काव्येतिहाससंग्रहकार हिला 'श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत' असें म्हणतात.

सोनपत पानपत येथील मराठे दुराणी युद्ध याविषयी बखर :

इ. स. १७६१ मधील मराठे व दुराणी यांच्या लढाईचा हा वृत्तान्त आहे. याच्या लेखनकालाची नोंद आढळत नाही; परंतु लेखक काशीराज पंडित हा युद्धांत होता. या बखरीच्या शेवटीं तो लिहितो, 'या सर्व गोष्टी घडून गेल्यावर पुष्कळ दिवसांनी आठवणीनें ही हकीकत लिहिली आहे. तरी इजमधे कोणतीहि एखादी गोष्ट राहून गेली असेल असें मला वाटत नाही.'[1] यावरून युद्धानंतर १०–१५ वर्षांनी ही बखर लिहिली असावी.

या बखरीचा कर्ता काशीराज पंडित होय. त्याच्या वडिलांचें नांव शिवदेव. हा महाराष्ट्रीय ब्राह्मण असून प्रथम दिल्लीचा वकील सफदरजंग याच्या नोकरींत होता. त्यानंतर हा सुजाउद्दौलाचा कारभारी झाला. सुजाउद्दौलाची त्याच्यावर मर्जी होती. त्याच्या दरबारांत याचें महत्त्व बरेंच होतें. भाऊसाहेब व विश्वासराव यांचीं प्रेतें हुडकून त्यांची हिंदुपद्धतीप्रमाणे उत्तरक्रिया आपण केल्याचें हा बखरींत लिहितो. त्याने हें वर्तमान पेशव्यास कळविलें.[2] मराठ्यांच्याबद्दल त्याला अभिमान व आपुलकी वाटत होती; कारण तो म्हणतो, 'आणिक सेवा न घडली. ईश्वरें हाच वाटा आम्हास नेमला होता. भगवदिच्छेस उपाय काय?' सुजाउद्दौला व भाऊसाहेब यांच्यामधील बोलणीं याच्यामार्फत होत.[3]

ही हकीगत काशीराजाने फारशींत लिहिली. तिचें इंग्रजी भाषांतर दिनापूर येथील कामदार जेम्स ब्रौन याने इ. स. १७९० सालीं केलें.

---

१. विविधज्ञानविस्तार, डिसें. १८७२
२. म. रि. ६ पे. बा. (१९५३), पृ. ४१०
३. म. च. को. (१९३७), पृ. २३१

तें इ. स. १७९१ च्या फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेस एशियाटिक रिसर्चेस-मध्ये तिसऱ्या भागांत प्रसिद्ध झालें. सदर पुस्तकाच्या इ. स. १८१० मधील पांचव्या आवृत्तीवरून मराठी भाषांतर केलें आहे.[1]

विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेल्या पानिपतच्या ह्या हकीगतीचें नांव 'सोनपत पानपत येथील मराठे दुराणी युद्ध याविषयी बखर' असें नांव आहे; पण हिचें रूढ नांव काशीराजाची बखर हें होय.

भोंसलवंशचरित्र :

तंजावर येथील बृहदीश्वराच्या देवळांतील तंजावरच्या भोंसले घराण्याचा हा इतिहास शिलालेख स्वरूपांत आहे. प्रस्तुत शिलालिखित चरित्राचा लेखनकाल 'शालिवाहन शके १७२५ रुधिरोद्गारी संवत्सर मार्गशीर्ष वद्य अमावास्या भौमवासरीं इंग्रजी सन १८०३ इसवी डिसेंबर १३ तारिखेस लेखनशीमा समाप्त ॥'[2] हा होय.

प्रस्तुत लेखनाच्या कर्त्याची नोंद पुढीलप्रमाणे आहे. 'प्रथमवर्ण महाराष्ट्र जाती भगवंत रायाचे पौत्र विठ्ठल रायाचे पुत्र प्रस्तुत चोळदेशाधिपती श्रीमंत राजेश्री महाराज क्षत्रपती शरफोजी राजेसाहेब यांचे निजसेवक चिटणीस बाबुराय काश्यप गोत्र आश्वलायन सूत्र ऋक् शाखाध्याई याजकडून लिहिजेले' म्हणजे शरफोजी महाराजांच्या आज्ञेने हा लेख त्यांचे चिटणीस बाबुराय यांनी लिहिला. या बखरीचे प्रस्तावनाकार म्हणतात की, खुद्द लेखक महाराजांच्या चिटणिसीवर असल्यामुळे त्यांच्या आज्ञेनेच लिहिला असण्याचा संभव आहे. तसें नसलें तरी त्यांचें अनुमत तरी खचित मिळालें असावें.

तंजावरच्या राजवंशांतील शेवटचे राजे शिवाजी महाराज यांचे वडील श्री शरफोजी महाराज हे होत. यांना तुळाजी महाराजांनी दत्तक घेतलें होतें. तुळाजी महाराजांच्या पूर्वजांपैकी मालोजींचे बंधु विठोजी यांच्या घराण्यांतील हे शरफोजी होते. ते ख्रिस्ती धर्मोपदेशक स्वार्टज, ब्रिटिश रेसिडेंट व तंजावर येथील ब्रिटिश सैन्याधिकारी यांच्या देखरेखीखाली होते. इंग्रजांचा कारभार तेथील कांही लोकांना न आवडल्यामुळे त्यांनी तुळाजी महाराजांच्या

१. वि. वि. डिसें. १८७२

२. भोंसलवंशचरित्र (१९५१), पृ. १०१

अमरसिंग या अनौरस संततीस गादीवर आणण्याचे प्रयत्न केले. अमरसिंगानें शरफोजीस अटकेंत ठेविलें; पण हें त्या धर्मोपदेशकाने ईस्ट इंडिया कंपनीस कळविलें. तिने त्याची सुटका केली.

श्वार्टझ् याच्या मृत्यूनंतर रे० गेरिक याने शरफोजीस मदत केली. अमरसिंग त्या वेळीं लोकांना नकोसा होता. तंजावरचा रेसिडेंट डोरियन याच्या मदतीने कंपनीने शरफोजीस गादीवर बसविलें. शरफोजीने इंग्रजी, मराठी व तामीळ या भाषांचा अभ्यास केला. इ. स. १७९८ मध्ये शरफोजीने नवीन व चांगल्या सुधारणा केल्या. टिपू सुलतानविरुद्ध त्याने इंग्रजांस मदत केली. मॅक्लोड याने शरफोजीशीं पैशाच्या व्यवहारांत केलेल्या घोटाळ्यांत कंपनीने मॅक्लोडविरुद्ध निकाल दिला. त्याने शर्फोजीजवळ दयेची याचना केली. त्याने त्याला दहा हजार रुपये दिले. शर्फोजीने ब्रिटिशांशीं तह केला. ब्रिटिश हद्दींत तहानुसार इंग्रज त्याचा सन्मान करीत. ब्लॅकबर्न या रेसिडेंटने आपल्या प्रेमाचें प्रतीक म्हणून शरफोजीस इंग्लंडहून पुस्तकें, नकाशे इत्यादि वस्तू मुद्दाम पाठविल्या.

यमुनाबाई व अहिल्याबाई या शर्फोजीच्या राण्या होत्या. अहिल्याबाईस सुलक्षणाबाईसाहेब, राजकुमारीबाईसाहेब व बयाबाईसाहेब अशा तीन कन्या होत्या. शरफोजी तीन-चार वेळां यात्रेस गेले. त्यांचें राज्य सुव्यवस्थित असून कोणत्याहि देशाबद्दल व लोकांबद्दल त्यांना द्वेष नव्हता. सर्व लोक सुखी असावे ही त्यांची इच्छा होती. शरफोजीची चरित्रविषयक ही माहिती मूळ बखरींत आढळते.

या बखरीचें संपूर्ण नांव 'तंजापुरी श्री बृहदीश्वरालयस्य शिलालिखित भोंसलवंशाचरित्र' हें श्री. टी. सांबमूर्ति राव यांनी हें चरित्र प्रसिद्ध केल्या वेळीं म्हणजे इ. स. १९०७ सालीं दिलें.

गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचें आत्मचरित्र :

गायकवाडाकडील पेशव्यांच्या दरबारचे वकील गंगाधरशास्त्री यांनी लिहिलेलें हें स्वतःचें चरित्र होय. या आत्मचरित्राचा लेखनकाल यांत दिला नाही. एका ठिकाणीं मात्र पुढील उल्लेख आहे—'रावबाबा याणीं गंतवर्षीं आमचे मुलीचे लग्नास हजार रुपये देऊं होते.' रावजी आपाजी

ता. १८-७-१८०३ रोजीं मरण पावला.[1] यावरून हें आत्मचरित्र इ. स. १८०४ च्या सुमारास लिहिलें असावें.

हें आत्मचरित्र 'मेजर वाकर रेसिडेंट गुजराथ' यांच्या आज्ञेने लिहिल्याचें सुरुवातीस म्हटलें आहे. गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा जन्म इ. स. १७७५ च्या सुमारास झाला.[2] तो मेणवली येथील रहिवासी होता. वयाच्या आठव्या वर्षी तो पेशव्यांकडे कारकून होता. हरिपंत फडक्यांनी त्याचें उपाध्येपण काढलें. त्यानंतर त्याने वाईस वयाचे वीस वर्षेपर्यंत शास्त्राभ्यास केला. सवाई माधवरावाच्या नंतर बाळोजी कुंजराच्या मदतीने याने बाजीरावाची मर्जी संपादन केली. नाना फडणिसाचें व याचें वितुष्ट होतें. नानाच्या भीतीने याच्या वडिलांनी बडोदें गाठलें. तेथील दिवाण रावजी आपाजी याचे या कुटुंबाशीं चांगले संबंध होते. बडोद्याचा रेसिडेंट वॉकर याची त्याच्यावर फार मर्जी होती. वॉकरने ता. २-२-१८०३ रोजीं दरमहा शंभर रुपये पगारावर रेसिडेंटाशीं बोलणें करण्यासाठी गायकवाड सरकारचा दरबार वकील म्हणून त्याला नेमलें.

बाजीरावाने गायकवाडाकडील कर्जाबद्दल तगादा चालू केला. त्याच्या वाटाघाटीसाठी फत्तेसिंगाने रेसिडेंटामार्फत इंग्रजांची जामिनगिरी घेऊन त्याला इ. स. १८१४ त पुण्यास पाठविलें. नाशिकच्या यात्रेस बाजीराव व त्रिंबकजी डेंगळे या उभयतांनी त्यास नेऊन पुढे पंढरपुरास नेलें व तेथे ता. २० जुलै १८१५ रोजीं देवळांत त्याचा खून केला.

रियासतकार म्हणतात की, अलोट बुद्धिचातुर्य आणि खटपटी व साहसी स्वभाव यांच्या योगाने इंग्रजांस जरी त्याचा मोठा उपयोग झाला, तरी हा काय किटाळ उपस्थित करील अशी धास्तीसुद्धा त्यांस सदैव वाटत असे. अर्थात् पुढे त्याचा खून झाला, तेव्हा इंग्रजांस त्याजबद्दल फारसें वाईट वाटलें नाही. त्याच्या कल्पक वृत्तीचा भरपूर उपयोग त्यांनी अगोदरच करून घेतला होता.[3]

---

१. म. रि. उ. वि. ३ (१९३२), पृ. ४६७

२. सदर, पृ. ४६६

३. सदर, पृ. ३८४

शास्त्री याजबद्दल एलफिन्स्टनचा अभिप्राय मार्मिक आहे. तो म्हणतो, ' गंगाधरशास्त्री हा मोठा धूर्त व बुद्धिमान आहे. त्याने बडोदें संस्थानाची व्यवस्था उत्तम ठेवली आहे. येथे पुण्यास तो पुष्कळ खर्च करून मोठ्या मिजाशींत राहतो, व आपली स्वारी झोकांत काढतो, की सर्व शहर त्याच्या कडे पाहत राहतें ! तो जुन्या पद्धतीचा विद्वान् शास्त्री असला, तरी थेट इंग्रज असल्याप्रमाणे राहण्याची ऐट करतो. तुरतुर चालतो. तडतड बोलतो, वाटेल त्याला उलट उत्तर करतो, पेशवा व त्याचे कारभारी यांना 'मूर्ख' म्हणतो. 'डॅम रॅस्कल' हा शब्द त्याच्या तोंडीं फार आहे. बोलतांना मधून मधून इंग्रजी शब्द खूप घुसडून देतो ! '[1]

सदरहू आत्मचरित्र पुणें येथील शास्त्री पटवर्धनांच्या घराण्यांतून रा. पां. न. पटवर्धन यांनी मिळविलें. ' गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचें आत्मचरित्र ' हें नांव पांडोबा पटवर्धनांनी दिलें आहे.

शकर्कर्ते श्रीशिवछत्रपति महाराज ह्यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र :

शिवाजी महाराजांची ही चारित्रात्मक बखर होय. ' राज्याभिषेक शके १३७ म्हणजे इ. स. १८११ सालीं धाकटे शाहू महाराज यांनी हें चरित्र लिहिण्याची आज्ञा केली ' असें चरित्रकार म्हणतात. इतिहासदृष्ट्या हें बरोबर नाही; कारण ' छत्रपति दुसरा शाहू वैशाख शु. ९ ता. ४–५–१८०८ रोजीं मृत्यु पावला, तेव्हा त्याने आज्ञा केली असावी व नंतर चिटणिसांनी १८११ मध्ये आरंभ केला असावा '[2] हें काव्येतिहाससंग्रह-काराचें मत मान्य व्हावयास प्रत्यवाय नाही. महाराष्ट्र-सारस्वताचे पुरवणीकार प्रस्तुत चरित्राचा लेखनकाल शके १७३२ (इ. स. १८१०) व लेखन स्थळ बोरगांव सातारा असें उल्लेखितात.[3] चरित्रकाराचें घराणें बोरगांवचें एवढ्यावरून चरित्र लिहिलें असावें असा पुरवणीकारांचा तर्क दिसतो. या लेखनस्थळाचा चरित्रांत साक्षात् उल्लेख नाही.

चरित्रकार मल्हार रामराव चिटणीस हे सातारच्या धाकटे शाहू छत्रपतीचे चिटणीस होते. ते स्वतःचा उल्लेख 'पुरातन सेवक लेखनाधिकारी'

१. सदर, पृ. ४६७

२. स. च. (१९२४), पृ. ३३

३. म. सा. (श. १८७३), पृ. १०५३

असा करतात. जयतापुर येथे त्यांचें बालपण गेलें.[1] ते पेशव्यांचे सरदार सखाराम हरि गुप्ते आंब्रेगांवकर यांचे जावई असून सुप्रसिद्ध खंडो बल्लाळ चिटणीस यांचे पणतू (खंडो बल्लाळ–जिवाजी बोरगांवकर–रामराव मल्हार-राव) होत. सुरुवातीस हे पुण्यास पेशव्यांची मुख्य चिटणिसी करीत. होळकरांनी पुण्यावर स्वारी केल्यावर, इतरांप्रमाणे यांच्यावरहि एक लक्ष रुपयांची पट्टी बसविली. पुढे होळकरांनी अमृतरावास पेशवे करण्याचा बेत केला. पेशव्यांचीं आज्ञापत्रें चिटणिसांच्या हातून होण्यासाठी त्यांना खड्या पहाऱ्यांत साताऱ्यांत नेलें. चिटणिसांनी आपलें कार्य केलें खरें, पण होळकरास पैका द्यावा लागेल म्हणून त्यांनी बोरगांवकडे पलायन केलें. पुढे रावबाजींनी यांचा सरंजाम जप्त केला. त्यांचे चिरंजीव बळवंतराव यांनी आपलें उत्पन्न सोडविलें. चिटणिसांनी शिवाजी महाराजापासून धाकटे शाहू महाराजापर्यंत एकूण सहा छत्रपतींचीं चरित्रें लिहिलीं. 'खुद्द मल्हार रामराव व त्यांचे पूर्वज हे मोठे हुद्देदार असून महाराजांच्या अतिनिकट वागणारे असल्यामुळे सर्व कागदपत्रें त्यांच्या ताब्यांत होतीं आणि परंपरागत आलेली आंतील बारीक माहितीहि त्यांस इतरांपेक्षा विशेष होती, त्यावरून अशीं चरित्रें लिहावयास ते योग्य होते हें सांगणें नको'[2] असें काव्येतिहाससंग्रहकर्ते म्हणतात. साताऱ्च्या चतुरसिंगाने बंड केलें, त्यावेळीं व्यासराव गोपाळ डबीर बापू कान्हो फडणीस, मल्हार रामराव चिटणीस वगैरे समस्त मंडळी या चतुरसिंगाबरोबर रानोमाळ फिरून कष्ट करूं लागली. ही सर्व मंडळी चतुरसिंगाबरोबर प्रवासांत हिंडत होती.[3] काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी सप्त-प्रकरणात्मक चरित्र हें सातारा व कोल्हापूर प्रतीवरून व संभाजी राजे आणि राजाराम यांचीं चरित्रें पुणें व कोल्हापूर प्रतीवरून प्रसिद्ध केलीं. तसेंच रामराजे व धाकटे शाहू यांचीं चरित्रें चिटणीस व इंदूर प्रतीवरून व थोरले शाहू महाराजांचें चरित्र चिटणीस व कोल्हापूर प्रतीवरून प्रसिद्ध केलीं.

ह्या लेखनाला कर्त्यांने चरित्र असें म्हटलेलें आहे; पण चरित्रांचे मथळे काव्येतिहाससंग्रहकारांनी दिलेले आहेत.

---

१. मनोरंजन (एप्रिल १९११), पृ. २१९
२. संभाजी व राजाराम यांचीं चरित्रें (१८९१), उपोद्घात
३. म. रि. उत्तरविभाग ३ (१९३२), पृ. ५१७

पेशव्यांची बखर :

पेशवे घराण्याचा हा इतिहास होय. काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात कीं, ज्या अर्थी ही बखर पेशवाईचे अखेरीपर्यंत आहे, त्या अर्थी ती त्या राज्याच्या शेवटीं अगर अव्वल इंग्रजींत लिहिली असावी, हें सहज सिद्ध होतें.[1] शेवटले पेशवे यांचे कारभारी श्री. चिंतोपंत देशमुख पावसकर यांचे कृष्णाजीपंत (बखरकार) हे आप्त होते. महाराष्ट्र-सारस्वताचे पुरवणीकार सदर बखरीचा लेखनकाल शके १७४० (इ. स. १८१८) हा देतात.

प्रस्तुत बखरीचे मूळ कल्पक कृष्णाजी विनायक सोहनी हे होत. हीं बखर वैजनाथ (भिवपुरी) गांवीं त्यांनी तोंडीं सांगितली व तेथील लोकांपैकी कांहीनी ती आदरपूर्वक लिहिली. कृष्णाजीपंत पेशवाईत सुभेदार होते. देशमुख पावसकर यांची त्याजवर कृपा होती. कृष्णाजीपंत हे रत्नागिरीकडील सोमेश्वर या गांवचे रहिवासी. यांचा जन्म १७८४–८५ च्या सुमारास म्हणजे सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत झाला.[2] वयाच्या पस्तिसाव्या वर्षी कालचक्र फिरल्यावर, विरक्त होऊन वैजनाथ येथे नदीतीरीं शिवालयांत त्यांनी उत्तर आयुष्य घालविलें. पंत तपस्व्याप्रमाणे आपला काल ईश्वरोपासनेंत घालवीत. काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी त्यांचा मृत्युकाल इ. स. १८५४-५५ चा सुमार असा दिला आहे.

बखरीची सुरुवात 'राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री श्रीनिवासपंत दाजी स्वामींचे सेवेशी, सेवक नारो मेघश्याम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति ' अशी आढळते. यावरून मूळ बखर कृष्णाजीपंतांनी तोंडीं सांगितली; पण बखरीचें प्रत्यक्ष लेखन नारो मेघश्याम याने केल्याचें स्पष्ट दिसतें. कृष्णाजीपंतांनी सांगितलेली माहिती आदरपूर्वक लिहून ठेवणाऱ्यांपैकी नारो मेघश्याम हा एक असावा. मूळ बखर कृष्णाजीपंतांनी सांगितली असल्यामुळे, तिचें कर्तृत्व त्यांच्याकडे जाणें योग्य होय. यांत पेशवे घराण्याची हकीगत असल्यामुळे, व पेशवे घराण्याचा मजकूर तपशीलवार लिहून पाठविण्याबद्दल आज्ञा झाली असल्याकारणाने काव्येतिहाससंग्रहकारांनी तिला पेशव्यांची बखर हें सार्थ नांव दिलें आहे. शेवटीं ' येथून बखर

१. पे. ब. (१९२५) उपोद्घात

२. मनोरंजन एप्रिल १९११, पृ. २२०

समाप्त झाली ' असा उल्लेख आढळतो. म्हणजे लेखकाने त्याला बखर म्हटलें आहेच.

महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणींत बखरींच्या यादींत पेशव्यांची बखर नारो मेघश्याम–शके १७३९ (इ. स. १८१७) व पेशव्यांची बखर— कृष्णाजी विनायक सोहनी–शके १७४० (इ. स. १८१८) या दोन निरनिराळ्या बखरींचा उल्लेख आहे. काव्येतिहाससंग्रहकर्त्यांच्या प्रतींत हीं दोन्ही नांवें येतात. मौखिक व लिखित अशीं या बखरीचीं दोन स्वरूपें असल्यामुळे हे कर्ते भिन्न दिसतात; पण त्यांतील मजकूर एकच आहे. उपरिनिर्दिष्ट दोन्ही बखरी एकच मानल्या पाहिजेत.

श्रीशिवदिग्विजय :

शिवाजी महाराजांचें हें चरित्र होय. प्रस्तुत बखरीच्या लेखनकालाच्या सुरुवातीस पुढील उल्लेख आहे. ' शककर्ते यांचा झाडा तपशीलवार शके शालिवाहनार्क १६४० बहुधान्य नाम संवत्सरे तथा विक्रमार्क संवत् १७७५ विरोधी नामा द्वे (?) नर्मदा दाक्षिण तटे लिख्यते ' यावरून ही बखर शके १६४० (इ. स. १७१८) त म्हणजे शिवाजी महाराजांच्या देहावसानानंतर सुमारें अडतीस वर्षांनी महाराष्ट्रांत लिहिली गेली.

राजवाड्यांच्या मतें ही बखर शके १७४० (इ. स. १८१८) मध्यें लिहिली आहे. कारण ते म्हणतात, ' ह्या बखरीच्या पहिल्या पृष्ठावरील शके १६४० बहुधान्यनाम संवत्सर व संवत् १७७५ विरोधीनाम संवत्सर ह्याबद्दल अनुक्रमें शके १७४० विरोधीनाम संवत्सर व संवत् १८७५ बहुधान्य संवत्सर असें पाहिजे. तिसऱ्या पृष्ठावरील संवत् १७७५ व शके १६४० ह्याबद्दल संवत् १८७५ व शके १७४० असें पाहिजे. चौथ्या पृष्ठावरील १८७० बद्दल संवत् १८७५ पाहिजे व पांचव्या पृष्ठावरील शके १६४० बद्दल १७४० पाहिजे; म्हणजे कलिवर्षे ४९१९ त शक १७४० संवत् १८७५ व फसली १२२८ बरोबर येतात. प्रसिद्ध ज्योतिर्विद रा. शंकर बाळकृष्ण दीक्षित ह्यांनी ही चूक, ही बखर छापली त्या वेळीं दाखवून दिली होती......ह्या बखरींतील भाषा रा. नंदुरबारकर व रा. दांडेकर (संपादक) म्हणतात त्याप्रमाणे शके १७४० तल्या सारखी बिलकुल दिसत नसून तिजवर अठराव्या शतकाच्या पूर्वार्धाची झांक मारीत आहे. मल्हार रामराव

चिटणीस ह्यांनी शके १७३२ त लिहिलेल्या शिवाजीच्या चरित्राची भाषा ह्या बखरीहून अत्यंत भिन्न आहे. इतकेंच नव्हे, तर शके १६८५ त लिहिलेल्या भाऊसाहेबांच्या बखरींतल्यापेक्षाहि ह्या बखरीची भाषा जुनाट दिसते. ह्यावरून असा तर्क काढण्यास हरकत दिसत नाही की, यद्यपि ही बखर शके १७४० त आहे ह्या रूपानें प्रसिद्ध केली गेली. तत्रापि, हिच्यांतील मजकूर पूर्वीच्या एखाद्या जुन्या बखरींतून घेतला असावा. बारनिशी, दाखले, पत्रें, जुने ग्रंथ ह्यांच्या आधारानें आपण लिहीत आहों, असें हा बखरनवीस बखरीच्या आपल्या १४८ व्या व १८८ व्या व ३८१ व्या पृष्ठांवर वारंवार म्हणतो. त्यावरून वरील विधानाला दुजोरा येतो.'[1] पृ. ३८१ वर या बखरींत संतविजय याचा उलेख असल्यामुळे महीपतीनंतर हिचें लेखन झालें असावें व जुन्या बखरीवरून बहुतेक सर्व मजकूर घेऊन क्वचित् तदनंतर झालेल्या ग्रंथांचा व स्थलांचा उल्लेख केला असावा, असा राजवाड्यांचा एकंदर निष्कर्ष आहे. महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणींत ह्या बखरीचा लेखनकाल शके १७४० (इ. स. १८१८) हा दिला आहे.[2]

संपादक लिहितात, ' मालकाच्या तोंडीं माहितीवरून व शोधाअंतीं असें समजतें की, ही बखर शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी म्हणून होते, त्यांचा पुत्र परम स्वामिभक्त खंडो बल्लाळ या गृहस्थानें लिहिली. पृ. १२२ यांतील व इतर ठिकाणच्या मोघम उल्लेखावरून स्पष्ट आहे की, सदर चिटणिसानें राजाच्या बोधार्थ ही बखर लिहिली. त्यानें आणखीहि कांही बखरी व लेख लिहिले आहेत. हें पृष्ठ ४६९ यांतील उल्लेखावरून कळतें. ' यांतील कित्येक प्रसंगांच्या कच्च्या हकीगतीवरून लेखकानें हे प्रसंग स्वतः डोळ्यांनी पाहिले असावे असें वाटल्याविना राहत नाही. राजवाड्यांच्या मते ' चिटणिसांच्या बडोदें येथील घराण्यापैकी कोणी तरी ही बखर लिहिली असावी असा अंदाज आहे किंवा लिहिली असें म्हणण्याऐवजी उतरून किंवा नकल करून किंवा जुळवाजुळव करून घेतली आहे, '[3] महाराष्ट्र-सारस्वतांत हिचें कर्तृत्व खंडो बल्लाळ याजकडे दिलेलें आढळतें.[4]

१. ऐ. प्र., पृ. २१९.
२. म. सा., पृ. १०५३.
३. ऐ. प्र., पृ. २१९
४. म. सा., पृ. १०५३

कर्ता खंडो बल्लाळ व लेखनकाल शके १७४० हे दोन्ही एकत्र उल्लेख मात्र परस्परविरोधी आहेत. या दृष्टीने राजवाड्यांचें मत सयुक्तिक वाटतें.

खंडो बल्लाळ चिटणीस (इ. स. १६६८–१७२६) हा सुप्रसिद्ध बाळाजी आवजी चिटणिसाचा मुलगा. बाळाजीचा चुलता खंडोबा याचें त्यास नांव दिलें. येसूबाईमुळे याला चिटणीसपद मिळालें.[1] संभाजीस गोव्याच्या स्वारीच्या वेळीं याची मदत झाली होती.

महाराष्ट्रांतून निघून जिंजीस जातांना राजारामास जिवास जीव देणाऱ्या मंडळींत खंडो बल्लाळ होता.[2] जिंजीस सुखरूप पोचल्याचें श्रेय खंडो बल्लाळ, प्रल्हाद निराजी इत्यादि एकनिष्ठ सेवकांकडे जातें. संभाजीस पकडण्याच्या वेळेस खंडो बल्लाळ त्याच्याजवळ होता. राजारामाकरिता त्याने अनेक संकटें सोसलीं. खंडो बल्लाळाची पत्नी म्हाळसाबाई हिचें चंदीस देहावसान झालें. राजारामाने यास दाभोळ प्रांताच्या सरदेशमुखीचें वतन वंशपरंपरा दिलें. हें वतन त्याने गणोजी शिर्क्यास देऊन, त्याच्या मदतीने राजारामाची जिंजीहून सुटका करविली. राजारामाने खंडो बल्लाळाची चिटणिसी कायम केली. खंडो बल्लाळाने बाजी सर्जाराऊ जेधे देशमुख यास ता. २२–३–१६९० च्या पत्रांत मुसलमानांच्या आक्रमणाच्या वेळीं 'ईश्वर करितो तरी फत्तेच आहे. लिहिल्याप्रमाणे 'हिंमती धरणें' असें स्वहस्तें लिहिलें. झुल्फिकार-खान याच्याकडे तहाच्या वाटाघाटीसाठी इ. स. १६९७ त खंडो बल्लाळास पाठविलें होतें. शाहू व ताराबाई यांच्या झगड्यांत त्याने शाहूची बाजू घेतली. शाहूने परशरामपंत प्रतिनिधीस कैदेंत घातल्यानंतर, त्याच्या सुटके-साठी खंडो बल्लाळाने आग्रह धरला. इतकेंच नव्हे, तर त्याचे डोळे काढा-वयाचा शाहूचा बेत कळल्यावर खंडो बल्लाळाने धावत जाऊन प्रतिनिधीस वांचविलें. याचें वतन पुढे आंगऱ्यांच्या ताब्यांत गेलें. याचा मुलगा बहिरव खंडो असून मुलगी मुरारबाजीच्या पुतण्यास दिली होती. त्यास पोतनिसाचेंहि वतन होतें. याच्या वडिलास ठार मारलें असूनहि हा छत्रपतीशीं अत्यंत एकनिष्ठ होता हें विशेष होय.

श्रीशिवदिग्विजय हें नांव बखरकाराने दिलेलें दिसतें.

---

१. म. रि. ३ उग्र० संभाजी (१९३५), पृ. १०६
२. म. रि. ४ स्थिर० राजाराम (१९३६), पृ. २४

बापू कान्हो ह्यांचें आत्मवृत्त :

सातारचे महाराज छत्रपति प्रतापसिंह यांचे फडणीस व प्रमुख मुत्सद्दी बापू कान्हो यांची ही आत्मवृत्तात्मक बखर आहे. प्रस्तुत आत्मचरित्र सातारचे रेसिडेंट ग्रँट डफ यांच्या विनंतीवरून बापू कान्हो यांनी इ. स. १८२१ त तयार केलें.[१]

बापू कान्हेविषयी डफसाहेब म्हणतात :

Bapu Kanho is respectable old Brahmin soldier who was the staunch adherent and devoted friend of Chitoor Singh. He was employed in all his negotiations and shared in most of the vicissitudes of his remarkable life. Bapu Kanho was found imprisoned in one of the hill-forts, taken by the British troops in 1818, and on being rescued, joined the Raja of Satara at whose court he now resides. The history of his own times written at my request, is lodged with the Literary Society of Bombay.[२]

बापू कान्हो यांचें उपनांव खांडेकर.[३] त्यांचे पूर्वज गोपाळ महादेव हे कोकणांत राहत असतांना हबशांच्या त्रासामुळे साताऱ्यास येऊन शाहू महाराजांकडे नोकरीस राहिले. शाहूने त्यास कनकाडी (कनकवाडी ? तर्फ देवणें) हें गांव इनाम दिलें. त्याच्या पुत्रास म्हणजे धोंडो गोपाळ यास शाहूकडून फडणिशी मिळाली. त्यांच्या मृत्यूनंतर त्याचे बंधु कान्हो धोंडो यास फडणिशी पद मिळालें. ते ताराबाईस अनुकूल असल्यामुळे नानासाहेब पेशव्यांच्या रोषास पात्र झाले. आत्मचरित्रकार बापू कान्हो हे धाकट्या शाहूकडे होते. ते नाना फडणिसांच्या सल्ल्याने वागत. बाजीरावासंबंधी ज्या भानगडी झाल्या त्यांत सातारच्या छत्रपतीचे प्रतिनिधि म्हणून बापू कान्हो पुण्यास शिंदे यांच्याकडे वरचेवर जात असत. रास्ते पटवर्धन यांनी चतुरसिंगाचा पराभव केल्यामुळे तो इ. स. १७९८ त बाहेर जाऊन बंड करूं लागला. त्याचा कारभारी

१. म. रि. उ. वि. (१९३२), पृ. ५३४

२. History of the Mahrattas, 1st (Ed.) Vol. III, P. 319

३. म. रि. उ. दि. ३ (१९३२), पृ. ५३४

म्हणून बापू कान्हो याची नेमणूक छत्रपतींनी केली. बापू कान्हो, मल्हार रामराव चिटणीस वगैरे सर्व मंडळी चतुरसिंगाबरोबर रानोमाळ भटकूं लागली व त्यांनी फार कष्ट सहन केले. चतुरसिंग सातारकर छत्रपतींची सुटका करण्यासाठी करवीरकर छत्रपति, शिंदे, होळकर, नागपूरकर भोसले यांच्याकडे गेला असतां बापू कान्हो हे त्याच्याबरोबरच होते. इ. स. १८१२ त चतुरसिंग यास त्याच्या सहकाऱ्यांसह त्रिंबकजी डेंगळ्याने दगा करून मालेगांव येथे कैद केलें व नंतर त्यास जीवधन किल्ल्यावर ठेवलें. पेशवाईच्या अस्तानंतर बापू कान्होची सुटका झाली व त्यास प्रतापसिंहाकडून फडाणिशीचीं वस्त्रें मिळालीं. ग्रँट डफ यांस इतिहासाच्या कामांत त्याने फार मदत केली.

इतिहाससंग्रहांत छापलेलें आत्मवृत्त ज्या उपलब्ध असलेल्या अशुद्ध प्रतीवरून प्रसिद्ध केलें ती व ग्रँट डफ साहेबासाठी लिहिलेली बखर एकच असावी. लिटररी सोसायटीच्या ताब्यांतल्या आत्मवृत्ताचें काय झालें तें समजत नाही असें इतिहाससंग्रहकार म्हणतात.[१]

या आत्मचरित्रास लेखकाने 'हकीकत मजकूर राजश्री बापू कान्हो फडणीस' असें म्हटलें आहे. इतिहाससंग्रहकर्त्यांनी त्यास 'बापू कान्हो ह्यांचें आत्मवृत्त' असें नांव दिलें.

नागपूरकर भोंसल्यांची बखर :

नागपूरच्या भोंसले घराण्याचा हा इतिहास आहे. प्रस्तुत बखरीच्या सुरुवातीस असें म्हटलें आहे की, 'श्रीनृपशालिवाहन शके १७४४ फसली सन १२३२ चित्रभानुनाम संवत्सरे या सालीं मिस्तर रिचर्ड जेंकिन्स साहेब आलीशान बाहादुर यांणी मिस्तर वलकिन्सन साहेब बाहादुर यांस सांगितलें की, श्रीमंत राजेश्री सेनासाहेब सुभा यांचा सिलसिला व हें पदप्राप्तीचें कारण काय याचा तपसील, सेनासाहेब यांचे दौलतींत कोण कसे वागले, कोणते वेळेस कोणता मुलुख प्राप्त झाला, याचा बयाण, जे कोणी वाकबगार असतील त्याजला विचारून लिहावा, त्याजवरून त्यांणी विनंती लिहिली ऐसीजे.' ह्यावरून नागपूरचे रेसिडेंट रिचर्ड जेंकिन्स यांच्या आज्ञेने शके १७४४ (इ. स. १८२२) मध्ये ही बखर लिहिली हें स्पष्ट

१. इतिहाससंग्रह फेब्रु. १९१५

आहे. महाराष्ट्र–सारस्वताच्या पुरवणींत हिचा लेखनकाल शके १७४० (इ. स. १८१८) असा दिलेला आढळतो.[१] ही प्रतीवरून तयार केलेली प्रत असल्याचा उपोद्घातांत उल्लेख आहे.

या बखरीचा लेखक काशीराव राजेश्वर गुप्ते हा असून, त्याने आपली माहिती सुरुवातीस पुढीलप्रमाणे दिलेली आहे : 'आमचे चुलते बळवंतराव महिपत गुप्ते यांचेहि तोंडाने ऐकिलें.' बळवंतराव महिपत हे पहिले रघूजी भोंसले यांना सेनासाहेबाचीं वस्त्रें मिळालीं, तेव्हा त्यांच्या बरोबर राजमंडळा-पैकी (साताऱ्च्या छत्रपतीच्या परिवारांतील मंडळी) जी सरदार मंडळी पाठविली त्यांत होते. जेंकिन्सने भोसले घराण्याची सर्व माहिती ग्रँट डफ साहेबासाठी मिळविली होती. बळवंतराव गुप्ते ह्यांनी गंगाधर माधव चिटणीस यांच्या सांगण्यावरून लिहिलेली नागपूरकर भोंसल्यांची बखर काशीरावाने पाहिली असली पाहिजे. महाराष्ट्र–सारस्वताचे पुरवणीकार काशीरावाचें नांव चिटणीस गुप्ते असें देतात.[२]

ही बखर इ. स. १८८५ मध्ये वामन दाजी ओक यांनी तयार करून काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध केली. रावबहादूर काशीनाथ नारायण साने (काव्येतिहाससंग्रहकार) यांनी 'नागपूरकर भोंसल्यांची बखर' हें नांव दिलें.

नागपूरकर भोंसल्यांच्या एकूण सहा बखरी खालीलप्रमाणे आहेत:—

१. पहिली बखर सन १२३० फसली (इ. स. १८२०) त गंगाधर माधव चिटणीस यांनी लिहिली. गुजाबा दादासाहेब गुजर व नारायण गोपाळ पंडितजी यांना रेसिडेंट जेंकिन्स यांनी विनंती केल्यावरून ही रचली.

२. खंडो भगवंत परभू यांनी लिहिलेली. लेखनकाल अज्ञात.

३. लेखक व लेखनकाल अज्ञात.

४. शके १७३८ (इ. स. १८१६) धाता संवत्सरी जेंकिन्स साहेबा-साठी व स्वमित्र मंडळासाठी यजुर्वेदाधिकारी विनायक आनंदराव औरंगाबादकर यांनी लिहिली.

५. शके १७३८ (इ. स. १८१६) मध्ये विनायकराव औरंगाबादकर यांनी लिहिली. हींत सन १८०९ पर्यंत हकीगत दिली आहे.

---

१. म. सा., पृ. १०५५

२. सदर

६. काशीराव राजेश्वर गुप्ते यांनी शके १७४४ (इ. स. १८२२) त जेंकिन्स साहेबासाठी लिहिली. प्रसिद्ध झालेली हीच बखर होय.[1]

होळकरांची कैफियत :

काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या या बखरींत या घराण्यांतील मुख्य पुरुष मल्हारराव होळकरापासून मल्हारराव होळकर (तिसरा) पर्यंत होळकर घराण्याचा इतिहास आहे. यांतील शेवटली घटना म्हणजे 'कारभाराचीं वस्त्रें दामोदर काशी किबे यांसि झाली. त्यांनीहि माहे जमादिलाखर ऊर्फ मार्गशीर्ष मास सन १२३७ पर्यंत वहिवाट केली' ही होय. याप्रमाणे तींत शके १७४९ (इ. स. १८२७) पर्यंत हकीगत आहे. 'दौलतीचा क्रम चालविण्याचा तसा चालतच आहे' या वाक्यावरून लेखक त्या कालांतला असावा. प्रस्तुत कैफियतीचा लेखनकाल शके १७४९ (इ. स. १८२७) असा महाराष्ट्र–सारस्वतांत दिलेला आहे[2] यो योग्यच होय.

या कैफियतीच्या पुढील हकीगतीचा भाग पुरवणी म्हणून भारतवर्षांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत 'सरकारांनी रा. आबाजी बल्लाळ किबे याजला दिवाणगिरीचीं वस्त्रें आषाढमासीं सन १२४८ चे सालांत दिलीं.' असा शेवटच्या घटनेचा उल्लेख आढळतो. यावरून या भागाचा लेखनकाल सामान्यतः शके १७६० (इ. स. १८३८) मानणें योग्य होईल.

प्रस्तुत हकीगतींतील 'या अन्वयें सेवा सेवकत्वाचे संभाग चालतो' ह्या वाक्यावरून कोणी तरी माहीतगार सेवकाने ही हकीगत लिहिली असावी असें दिसतें. आप्पाजी बल्लाळ, नारायणराव पळशीकर, रामराव नारायण या त्या वेळच्या कारभाऱ्यांपैकी कोणी तरी एकाने अगर अनेकांनी ही कैफियत रचली असावी.

या हकीगतीस लेखकाने सुरुवातीस 'कैफियत कैलासवासी मल्हारजी होळकर' असें म्हटलें आहे. काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी ती 'होळकरांची कैफियत' या नांवाने प्रसिद्ध केली. त्यांतील अहिल्याबाई होळकरांच्या कारकीर्दीचा अप्रासिद्ध भाग इतिहाससंग्रहकारांनी प्रसिद्ध केला.

---

१. नागपूरकर भोसल्यांची बखर (१९३६) उपोद्घात

२. म. सा. पृ. १०५५

अगदी अलीकडे (इ. स. १९५४) सालीं श्री. य. न केळकर यांनी होळकरांची कैफियत संपूर्ण प्रकाशित केली; परंतु त्यांत मल्हारराव तिसरे यांच्या कारकीर्दीचा भारतवर्षांत प्रसिद्ध झालेला भाग नाही. श्री. केळकर म्हणतात की, बखर-लेखक हा होळकरांचा पिढीजात नोकर आणि निकटचा विश्वासू मुत्सद्दी असावा असें त्याने बखरींत जे निरनिराळे प्रसंग तपशीलवार वर्णिले आहेत किंवा ज्या खासगत घराऊ बाबी त्याने उल्लेखिल्या आहेत. त्यावरून स्पष्ट दिसून येईल. श्री. केळकर यांच्या मतें ऐतिहासिक पत्रव्यवहार यांतील पत्र नं. ३६७ व पत्र नं. ३९५ या पत्रांचा लेखक व सदर कैफियतीचा लेखक एक असावा. या कैफियतीचा बखरकार हा वयोवृद्ध, जाणता व होळकराचा अभिमानी आहे. विशेषतः त्याचा यशवंतराव होळकराशीं निकटचा संबंध असून त्याच्याविषयी अत्यंत आदर बाळगणारा आहे.[१]

मराठ्यांची बखर :

इ. स. १००० पासून इ. स. १८१८ पर्यंत पेशवाई अखेर हा महाराष्ट्र देशाचा इतिहास आहे. सन १८२६ मध्ये जनरल ब्रिग्ज विलायतेस गेल्यावर (त्याच सुमारास ग्रँट डफ साहेबांचा मराठ्यांचा इतिहास प्रसिद्ध झाला) त्यांनी प्रतापसिंह महाराजास ता. २० ऑगस्ट रोजीं जें एक पत्र लिहिलें, त्यांत या इतिहासाबद्दल उल्लेख केला आहे. रियासतकारांच्या मतें मराठ्यांच्या इतिहासाचें साहित्य येथे तयार करून इंग्लंडांत ग्रँट डफने सर्व भाग व्यवस्थित लिहून पहिली आवृत्ति १८२६ त प्रसिद्ध केली.[२] ग्रँट डफचा इतिहास तीन भागांत आहे. प्रस्तुत ग्रंथाचें मराठी भाषांतर कॅप्टन डेविड केपनसाहेब यांनी बाबा साने यांच्या साहाय्याने सरकार कंपनी इंग्रज बहादर यांच्या आज्ञेवरून करून इ. स. १८२९ त मुंबईत प्रसिद्ध केलें. हीच प्रस्तुतची बखर होय. मराठी भाषांतराच्या एकूण सहा आवृत्त्या निघाल्या. सहावी आवृत्ति इ. स. १९१६ त प्रसिद्ध झाली.

मूळ इंग्रजी बखरीच्या कर्त्याचें नांव जेम्स ग्रँट डफ होतें. त्याचा जन्म बॅफशायर येथे ता. ८-७-१७८९ मध्ये झाला. त्याच्या वडिलांचें नांव जॉन ग्रँट असून आईचें नांव मार्गारेट मिल्न डफ हें होतें. तिची इस्टेट

१. होळकरांची कैफियत प्रस्ता०

२. म. रि. उत्तर विभाग (१९३२), पृ. ५३३

ईडन येथे होती. इ. स. १७९९ त त्याच्या वडिलांचा मृत्यु झाल्यानंतर त्याच्या आईने मुलासह ॲबर्डीन येथे त्यास शिक्षण दिलें. पुढे डफने कॉलेजांत उच्च शिक्षण घेतलें. आपल्या मुलाने ईस्ट इंडिया कंपनींत बहुमानाची नोकरी करावी, अशी त्याच्या आईची उत्कट इच्छा होती. डफ हा महत्त्वाकांक्षी होता. ईस्ट इंडिया कंपनींत कॅडेट पद मिळवून इ. स. १८०५ मध्ये हिंदुस्थानांत आला. पुढे मुंबईस लष्करी शिक्षणाचा अभ्यास केल्यावर बॉम्बे ग्रेनेडियर्स पलटणींत त्याला अधिकारी नेमण्यांत आलें. इ. स. १८०८ त बडोदें संस्थानाच्या सरहद्दीवर लुटारूंचा बंदोबस्त करण्याचें काम त्यानें चांगल्या प्रकारे केलें. त्या वेळीं त्याचें वय एकोणीस वर्षांचें होतें. सरकारी पलटणींत तो दुभाष्याचें काम करी. त्याचा फारसी भाषेचा अभ्यास असून त्यांतील इतिहासाची त्यास विशेष आवड होती.

एल्फिन्स्टनसाहेब पुण्याचे रेसिडेंट झाल्यावर डफची त्यांच्याशीं ओळख झाली. कॅ. पारिंजर व ग्रँट डफ हे राजकारणांत अत्यंत तरबेज असून उभयतांना विद्येचें व्यसन होतें. ता. ५ नोव्हेंबर इ. स. १८१७ रोजीं बाजीरावाने एल्फिन्स्टनवर चढाई केली. त्या वेळीं रेसिडेंटास मदत करण्याच्या कामीं ग्रँट डफचा बराच उपयोग झाला. एल्फिन्स्टन साताऱ्यास छत्रपतीची स्थापना करण्यासाठी गेला असतांना ग्रँट डफचें त्यास साहाय्य होतें. महाराजांचें संरक्षण करण्याचें काम व त्यांची सर्व व्यवस्था ही ग्रँट डफने चोख रीतीने केली. महाराजांनी एक जाहीरनामा काढून राज्याचा कारभार कॅ. ग्रँट डफकडे सोपविल्याचें जाहीर केलें. या वेळीं (इ. स. १८१८) डफची पोलिटिकल एजंट म्हणून साताऱ्यास नेमणूक झाली. त्यास दरमहा दोन हजार रुपये पगार असून इतर खर्चासाठी पंधराशें रुपये मिळत. शनवारवाड्यावर इंग्रजांचा बावटा चढविणारे बाळाजीपंत नातू हे दुय्यम रेसिडेंट होते. एल्फिन्स्टनने ता. ८ एप्रिल इ. स. १८१८ त ग्रँट डफ यास राज्यकारभाराच्या धोरणाची कल्पना दिली. ग्रँट डफने कंपनी सरकारतर्फे छत्रपति प्रतापसिंगाकडे पाठविलेल्या तहनाम्यांत एकुण अकरा कलमें असून तो ता. २५ सप्टेंबर १८१९ रोजीं साताऱ्यास जाहीर केला. त्याच्या इंग्रजी, मराठी व फारसी प्रती काढून त्यांपैकी मराठी व फारसी आपल्याकडे ठेवून इंग्रजी प्रत प्रतापसिंगाला दिली.

ग्रँट डफ इ. स. १८२२ मध्ये गेल्यावर जनरल ब्रिग्ज हे सातारचे रेसिडेंट झाले. रियासतकार म्हणतात की, कनिष्ठ बंधूस आत्मीय भावनेने वागवावें तशी चाल कॅ. ग्रँटने प्रतापसिंगाशीं ठेवली होती.[1] ग्रँट डफने आदर्श राज्यपद्धतीने प्रतापसिंगाकडून राज्य करविलें. इंग्लंडांत गेल्यावर ग्रँट डफ प्रतापसिंगाशीं पत्रव्यवहार करून इकडील माहिती आस्थेवाईकपणाने विचारीत असे. इंग्लंडहून बऱ्याच चांगल्या व उपयुक्त वस्तु ग्रँट डफने प्रतापसिंगास पाठविल्या. ग्रँट डफला मराठ्यांचा पहिला इतिहासकार मानतात; पण त्याच्याहि पूर्वी मराठ्यांचा इतिहास लिहिणारे स्प्रेंगेल हा जर्मन आणि स्कॉट वेअरिंग हा इंग्रज असे इतिहासकार होते.[2]

मूळ इंग्रजी बखरीस History of Mahrattas हें नांव डफने दिलें असून मराठी भाषांतरास 'मराठ्यांची बखर' हें नांव कॅप्टन डेविड केपनसाहेब व बाबा साने यांनी दिलें आहे.

श्रीशिवाजीप्रताप :

शिवछत्रपतींचें हें चरित्र आहे. प्रकाशक म्हणतात, 'ही बखर संवत् १८८६ (इ. स. १८२९) चे सालीं बडोदें येथे लिहिली गेली आहे. कोणीं लिहिली, हें समजण्याचें मात्र कांहीच साधन नाही. एवढें मात्र खरें की, थोरले सयाजीराव महाराज गायकवाड यांनी ही बखर लिहविली आहे. गायकवाड सरकारांनी तत्कालीन चिटणिसाकडून ही तयार करवून घेतली होती.' महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणीकारांनी हिचा लेखनकाल शके १७५१ (इ. स. १८२९) हाच दिला आहे. या बखरींतील भाषेचें वळण कांहीसें अव्वल इंग्रजींतलें दिसतें.

ह्या बखरीचा लेखक हा पिढीजाद सेवक असावा. कारण त्यांतील 'स्वकीय पोषकाची इच्छा जाहल्यावरून श्रुत करितों ऐसी जे' हे शब्द त्या दृष्टीने सूचक आहेत. प्रकाशकांनी म्हटल्याप्रमाणे सेवक आपल्या स्वामीसाठी त्याच्या आज्ञेने लिहीत आहे हें स्पष्ट दिसतें.

प्रस्तुत बखरीची एक प्रत रा. द्वारकानाथ जगन्नाथ कोरडे याजकडून, दुसरी प्रत रा. रामराव नारायणराव प्रधान यांजकडून व तिसरी प्रत

---

१. सदर

२. अर्वाचीन मराठी साहित्य (श. १८५७), पृ. ३२०

रा. कृष्णराव रघुनाथ आंबेगांवकर यांजकडून अशा एकूण तीन प्रती उपलब्ध झाल्याचें प्रकाशक लिहितात. बखरीचें नांव एका प्रकरणाच्या शेवटीं 'शिवाजी राजे यांची बखर' व शेवटीं 'कथा' असें लेखकानें दिलें आहे. संपूर्ण बखरीला श्रीशिवाजीप्रताप हें लेखकानें नांव दिलें असावें.

हरिवंशाची बखर

पटवर्धन घराण्याचा हा इतिहास आहे. हरिवंशाची बखर म्हणजे हरभट पटवर्धनाच्या वंशजांची हकीगत होय. प्रस्तुत बखरीचा लेखनकाल व लेखन यासंबंधी शेवटीं उल्लेख आहे तो असा : 'शके १७६४ शुभकृन्नाम संवत्सरे वैशाख शु. ५ इंदुवारीं हा ग्रंथ लिहिला असे. मु. आंबेनजीक श्रीक्षेत्र पंढरपूर. श्रीभीमातीर. श्रीउत्तरेश्वरसंनिध' म्हणजे हिचें लेखन शके १७६४ (इ. स. १८४२) त आंबे येथे झालें.

ही बखर पटवर्धन घराण्यांतील बाळकृष्णराव हरिहर यांनी आपल्या वंशाचें, विशेषतः आपले आजे पुरुषोत्तमराव कृष्ण ऊर्फ दाजी यांचें पराक्रमपूर्ण चरित्राचें वर्णन करण्यासाठी लिहिली. बखरकारानें आपल्या घराण्याचे मूळपुरुष हरभट याच्यापासून पुढे वंशावळ दिली आहे. बखरलेखक आपला उल्लेख बाळकृष्ण अण्णा असा करतात. हा पेशवाईच्या इतिहासाचा हौशी असून चालीरीतींचा उत्तम माहीतगार होता असें प्रस्तावनाकार वासुदेव वामनशास्त्री खरे म्हणतात.

प्रस्तुत हकीगतीस लेखकानें 'हरिवंशाचा विस्तार व कीर्तीचें वर्णन' असें म्हटलें आहे. 'हरिवंशाची बखर अथवा पटवर्धन सरदारांच्या हकीकती' हें नांव संपादकांनी दिलें असावें.

पटवर्धनी वाका :

श्रीमंत राजश्री चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे तीर्थरूप श्रीमंत कैलासवासी पांडुरंग तात्यासाहेब यांनी इ. स. १७७७ त हैदरखानाच्या फौजेशीं कर्नाटकांतील सावसी कुंदगोळ येथे केलेल्या लढाईचा हा वृत्तान्त इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झाला आहे.[1] 'आमचे खावंद श्रीमंत राजश्री चिंतामणराव आप्पासाहेब यांणी शोध करून वाका लिहिण्याविषयी आज्ञा

१. इ. सं. मे. १९१६

केली व जहाला मजकूर सांगितला असें सुरुवातीस लेखक म्हणतो. इतिहास-संग्रहकार सांगली संस्थानचे अधिपति पहिले चिंतामणराव आप्पासाहेब यांचा काल इ. स. १७७७ ते इ. स. १८५१ असा देतात. 'भगवंता टकल्याकडील, हा तीं।। तात्यासाहेब यांचे आज्ञेवरून शिवराव बाबा घोरपडे यांजबरोबर कपालदुर्गास गेला. (नांव लिहावयाचें विसरून राहिलें. स्मृति राहिली नाही.)......कान्होपंत सरनोबत यास काय दिल्हे त्याचा शोध करून लावावयाचें' ह्या उल्लेखावरून सावसी कुंदगोळच्या युद्धाची घटना घडून गेल्यानंतर बऱ्याच वर्षांनी म्हणजे शके १७७२ (इ. स. १८५०) च्या सुमारास अव्वल इंग्रजींत हा वाका लिहिला असावा.

प्रस्तुत वाक्यांत लेखकाचें नांव नाही. इतिहाससंग्रहकारांच्या मतें चिंतामणराव आप्पासाहेब यांच्या आज्ञेवरून कोणी माहीतगार इसमाने हा वाका लिहिला आहे. पटवर्धनांच्या कारभारी मंडळीपैकी कोणी तरी तो लिहिला असावा, असें त्याच्या लेखनपद्धतीवरून दिसतें.

सुरुवातीस लेखकाने यास 'वाका' असें म्हटलें आहे. पटवर्धनांचा हा इतिहास असल्यामुळे, इतिहाससंग्रहकारांनी त्यास दिलेलें पटवर्धनी वाका हें नांव अन्वर्थक वाटतें. हा वाका सांगली संस्थानचे प्रस्तुतचे अधिपति श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन यांनी आम्हांस इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध करण्या-साठी दिला असें इतिहाससंग्रहकार म्हणतात.

श्रीमंत महाराज भोसले यांची बखर :

छत्रपति भोसले घराण्याची ही हकीगत आहे. यांत शिवचरित्राचा भाग विस्तृत आढळतो. ज्या अर्थी यांत शके १७७६ पर्यंतचा सातारकर घराण्याचा इतिहास आहे त्या अर्थी या बखरीचें लेखन शके १७७६ (इ. स. १८५४) च्या नंतर झालें असावें. महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणींत या बखरीचा लेखनकाल हाच दिला आहे. या बखरीची भाषा स्पष्टपणें १९ व्या शतकांतली दिसते.

प्रस्तावनाकार वि. ल. भावे लिहितात, 'या बखरीचा सजवणार कोणी एकच इसम नसून या कामीं अनेक गृहस्थांनी वेळोवेळीं परिश्रम करून ही बखर निर्माण केली आहे असें ही बखर चाळली असतांहि सहज ध्यानांत

येईल.' या बखरींत तीन निरनिराळीं वळणें स्पष्ट दिसत असल्याने भावे यांचें उपरिनिर्दिष्ट मत सयुक्तिक वाटतें.

सदर बखरीबद्दल भावे म्हणतात की, 'या बखरीची अस्सल प्रत सातारा येथे आहे. त्या अस्सलवरून नकललेली एक प्रत आम्हांस इतिहास-संशोधक रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन याजकडून मिळाली. या संबंधे माहिती कळवितांना रा. रा. पटवर्धन लिहितात की, 'साताराचे शेवटचे छत्रपति श्री शहाजी ऊर्फ आप्पासाहेब महाराज यांनी आपले निधनसमयीं शेडगांवकर भोसल्यापैकी आंबूजी राजे यांचे पुत्र दत्तक घेऊन त्यांचें नांव श्री व्यंकाजी महाराज असें ठेविलें. या आंबूजी राजांचे द्वितीय चि. श्री. बापूसाहेब भोसले शेडगांवकर हल्ली वस्ती सातारा यांचे संग्रहांतील प्रस्तुतची बखर शेट डोसाभाई माणिकजी वकील सातारा यांचे मार्फतीने मिळाली... माथ्यावर संभाजीराजे भोसले शेडगांवकर अशीं अक्षरें आहेत. या बखरीचीं एकंदर ३१३ पृष्ठें आहेत.' [1]

भावे यांनी मराठी दप्तर रुमाल पहिला (१) लेखांक १ या मालेंत ही बखर 'श्रीमंत महाराज भोसले यांची बखर' या नांवाने प्रसिद्ध केली. शेडगांवकर बखर हें तिचें रूढ नांव होय.

खर्ड्याच्या स्वारीची बखर :

मराठे व निजाम युद्धाचा हा इतिहास होय. हिचा लेखनकाल 'सीताराम रावजी गणपत्ये दस्तुर खुद्द मिति मार्गशीर्ष वद्य ४ शुक्रवार (रोज) संवत् १९३५' असा आहे. हिचा लेखनकाल शके १८०० (इ. स. १८७८) हा येतो. ही मूळ बखरीची नकल असावी. 'खर्ड्यांची स्वारी व्हावयाचें कारण काय तें सविस्तर लिहिलें आहे. त्याजवरून निवेदन करावें त्याजवरून लिहिलें जें' ह्या उल्लेखावरून ही बखर आज्ञेने लिहिल्याचें दिसतें.

काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी 'खर्ड्याच्या स्वारीची बखर' हें नांव दिलें आहे. 'माधवराव नारायण पेशवे यांची बखर' असें तिचें दुसरें नांव असल्याचें काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात. तें नकलकाराने दिलें असावें.

१. मराठी दप्तर, रुमाल पहिला (शके १८३९), प्रस्ता०

श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर (कारभारी पक्षाच्या हकीगतीसुद्धा) :

नारायणराव पेशवे यांच्या शनिवारवाड्यांत झालेल्या खुनाची व त्यानंतरच्या बारभाईंच्या कारस्थानाची ही हकीगत होय. त्यांत सवाई माधवरावांच्या मृत्यूपर्यंत पेशव्यांचा इतिहास आहे. काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात, 'हें प्रकरण आम्हांस कै. नारायणराव उकिडवे यांनी बडोद्याहून मूळ प्रतीची नक्कल करून पाठविलें. अस्सल कोठील, कोठे आहे व कोणीं, केव्हा लिहिलें त्याजबद्दल माहिती नाही.' (टीप)

ह्या बखरीला लेखक 'श्रीमंत कैलासवासी नारायणराव यांची हकीगत; मजकूर; कथा' असें म्हणतो. श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर (कारभारीपक्षाच्या हकीगतीसुद्धा) हें नांव काव्येतिहास-संग्रहकर्त्यांनी दिलें आहे.

जावलीकर मोरे यांची छोटी बखर :

जावलीच्या चंद्रराव मोरे यांच्या घराण्याचा हा इतिहास होय. इतिहास-संग्रहकार म्हणतात, 'ही चंद्रराव मोऱ्यांची छोटी बखर आमचे मित्र रा. रा. यशवंत राजाराम गुप्ते, बी. ए. ह्यांनी रा. रा. नरहर मल्हार चिटणवीस ह्यांचे मार्फत मिळवून आमचेकडे पाठविली आहे. ही बखर अस्सल प्रतीच्या नक्कलेची नक्कल आहे. त्यामुळें तींत पुष्कळ अशुद्धें व इतर दोष दृष्टीस पडतात. ही बखर कोणी व केव्हा लिहिली तें समजत नाही.'[१]

प्रस्तुत बखरीच्या शेवटीं लेखकाने 'हकीगतनामा चंद्रराव मोरे यांचा' असें म्हटलें आहे. जावलीकर मोरे यांची छोटी बखर हें नांव इतिहास-संग्रहकर्त्यांनी दिलेलें दिसतें.

अंताजी माणकेश्वराची बखर (हस्तलिखित) :

पानिपतच्या युद्धाचा हा इतिहास होय. या बखरीची सुरुवात 'राजमुद्रा विराजित राजमान्य राजश्री श्री बाळाजी बाजीराव पंतप्रधान व भाऊसाहेब व दादासाहेब व विश्वासराव व माधवराव व नारायणराव पेशवे महाराज यांचे सेवेशीं आज्ञाधारक अंताजी माणकेश्वर तख्त हस्तनापुर दोनी कर

१. इ. सं. मे १९०९

जोडून 'शिरसाष्टांग नमस्कार' अशी आहे. ज्या अर्थी ही बखर नारायणराव पेशवे यांना उद्देशून लिहिली आहे त्या अर्थी त्यांच्या कारकीर्दीत म्हणजे शके १६९४ (इ. स. १७७२) ते शके १६९५ (इ. स. १७७३) या कालांत केव्हा तरी हिचें लेखन झालें असावें.

सदर बखरीचा लेखक अंताजी माणकेश्वर हा पेशवाईतला सुप्रसिद्ध सरदार नसून दुसरा कोणी तरी सामान्य कारकून असावा, असें इतिहास-संशोधक कै. मो. रा. जोशी यांचें मत आहे.[1] अंताजी माणकेश्वर पानिपतच्या लढाईत जखमा झाल्यावर लवकरच जाटांच्या मुलुखांत वारले.[2] ही बखर पुढील कालांतील पेशव्यांना उद्देशून असल्यामुळे, तसेंच अंताजीपंताची नेहमीच्या पद्धतीची म्हणजे पत्राची भाषा यांत नाही व बढाईखोर अंताजी-पंताने स्वतःचा उल्लेख हस्तनापूरचा वकील असा कधीच केला नसता असें जोशी यांनी म्हटल्यामुळे, पेशव्याकडील सरदार अंताजी माणकेश्वर याने ही बखर लिहिली नाही हें सिद्ध होतें. काव्येतिहाससंग्रहकारांनी अंताजी माणकेश्वराने पानिपतच्या लढाईचें वृत्त लिहिल्याचें नमूद केलें आहे.[3]

हस्तलिखितावर 'अंताजी माणकेश्वराची बखर' असें नांव आढळतें.

निष्कर्ष :

बहुतेक बखरींत लेखनकाल शकांत दिला आहे. बाळाजी विश्वनाथाच्या कैफियतीसारख्या बखरींत शक आणि मुसलमानी सन हीं दोन्ही दिलीं आहेत. कैफियत शहाजी भोसले यासारख्या बखरींत केवळ हिजरी सन आढळतो. सरदार पानसे यांच्या घराण्याच्या कैफियतींत इंग्रजी सन आहे व जावलीकर मोरे यांच्या बखरीसारख्या इतिहासांत कालनिर्देश मुळीच नाही. शिवदिग्विजयांत चुकीचे लेखनकाल आहेत. अशा प्रकारचे प्रमाद नकलकारां-कडून झाले असावे.

लेखनस्थलाचा उल्लेख बखरींत फारच कमी प्रमाणांत आहे. बखर-लेखकाचें नांव पाणिपतच्या बखरीसारख्या पत्रात्मक बखरींत विशेषतः

१. अंताजी माणकेश्वराची बखर (भा. इ. सं. मंडळ पुणें, वार्षिक संमेलन इ. स. १९५४)

२. म. रि. ६ पेशवा बाळाजीराव (१९५३), पृ. ४१२

३. पाणिपतची बखर (१८८९) उपो०

आढळतें. कृ. अ. सभासद, रघुनाथ यादव, खंडो बल्लाळ, नाना फडणवीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, मल्हार रामराव चिटणीस, बापू कान्हो, मल्हार गणेश खांडेकर इत्यादि बखरकार तत्कालीन राजकारणाशीं प्रत्यक्ष संबंधित आहेत. सभासद बखरीसारख्या समकालीन बखरींचें प्रमाण अत्यल्प आहे. त्या मानानें चिटणिशी बखरीसारख्या उत्तरकालीन बखरींची संख्या मोठी दिसते. बहुतेक बखरींचें लेखन पेशवाईच्या उत्तरार्धांत व विशेषतः अव्वल इंग्रजींत झालेलें आहे; कारण याच कालांत म्हणजे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत स्वदेशाच्या इतिहासासंबंधी महाराष्ट्रांत बरीच आस्था होती. आंगरे, दाभाडे इत्यादि निरनिराळ्या घराण्यांच्या हकीगती आपलीं वतनें चालू राहावीं म्हणून साहेब लोकांच्या माहितीसाठी तयार झाल्या. राक्षस-तागडीच्या बखरीसारख्या शिवपूर्वकालीन बखरींची संख्या सर्वांत कमी आहे.

अस्सल म्हणजे मूळ बखरी जवळजवळ मुळीच उपलब्ध नाहीत. बहुतेक बखरींच्या नकलाच आहेत. ह्या नकलांवरूनच बखरी प्रकाशित झाल्या. या बखरींचें प्रकाशन करतांना शुद्धलेखन, परिच्छेद इत्यादि संस्कार झाले आहेत. या सर्वांत महत्त्वाचा संस्कार म्हणजे बखरींचें नामकरण हा होय. मुद्रण–पूर्वकालांत बखरी हस्तलिखित स्वरूपांत होत्या. बखरींचें लेखन पत्ररूपात्मक असल्यामुळे त्यांच्या नामकरणाची त्या काळीं आवश्यकता नव्हती; परंतु प्रकाशनाच्या वेळीं गरज होती म्हणून बहुतेक बखरींचें नामकरण संपादकांनी केलें.

* * *

४ : शिवपूर्वकालीन बखरी

शिवपूर्वकाल हा सातवाहनाच्या कालापासून (इ. स. पू. पहिलें शतक) शहाजीच्या जन्मापर्यंत (सोळावें शतक–उत्तरार्ध) सुमारें १७०० वर्षांचा काल येथें अभिप्रेत आहे. हा कालखंड दीड दोन हजार वर्षांचा असला, तरी बखरींचे विषय झालेल्या या कालांतील घटना आपल्याच आहेत. या कालांतील बखरींचे विषय म्हणजे शालिवाहन राजाचें चरित्र, सिंघणादि यादवांचा इतिहास, सुप्रसिद्ध श्रीकरणाधिप किंवा राज्यसूत्रधार हेमाडपंत याची ग्रंथरचना, महिकावती ऊर्फ माहीम प्रांताचा इतिहास व विजयनगरच्या रणसंग्रामाची हकीगत हे होत.

शिवपूर्वकालीन इतिहासाचें स्वरूप :

महाराष्ट्रांत पहिली सत्ता कोणाची होती यासंबंधी विद्वानांत मतभेद आहेत. शिकंदर बादशहाचा समकालीन चंद्रगुप्त मौर्य याने महाराष्ट्रावर प्रथम राज्य केल्याचें रियासतकार म्हणतात.[१] चंद्रगुप्तानंतर त्याचा नातू अशोक याने आपल्या राज्याचा विस्तार पूर्वेकडे व दक्षिणेकडे केला. अशोकाच्या मृत्यूनंतर आंध्रदेशीय लोकांनी खिस्तपूर्व ७३ पासून खिस्तोत्तर २१८ पर्यंत म्हणजे सुमारें तीनशें वर्षे महाराष्ट्रावर राज्य केलें. हे लोक सातवाहन किंवा शालिवाहन या नांवाने प्रसिद्ध आहेत. ते आपणास आंध्रभृत्यहि म्हणत असत.[२] त्यांचा साम्राज्यविस्तार मोठा होता. गोदावरीच्या काठीं असलेलें प्रतिष्ठान ऊर्फ पैठण हें शहर त्यांची राजधानी असून विद्या, संस्कृति व व्यापार यांचें तें एक केंद्र होतें. या शालिवाहन राजांपासून शकगणना सुरू झाली. उपलब्ध असलेलीं या राजांचीं नाणीं, शिलालेख व कार्लें, नाशिक, कान्हेरी इत्यादि ठिकाणचीं लेणीं यांवरून त्यांच्या कालांत उच्च दर्जाची सुधारणा होती असें सिद्ध होतें.

---

१. New History of the Marathas (1946), P. 17.

२. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (१९३२), पृ. ११८

शालिवाहनानंतर म्हणजे सहाव्या शतकाच्या सुरुवातीस चालुक्यांची सत्ता महाराष्ट्रांत होती. त्यांनी सुमारें दीडशें वर्षें राज्य केलें. त्यांची राजधानी विजापूर जिल्ह्यांतील बदामी ही होती. या चालुक्य घराण्यांतील प्रसिद्ध राजा पुलकेशी याने महाराष्ट्राच्या उत्तरेकडील सीमेचें म्हणजे नर्मदेपर्यंतच्या प्रदेशाचें संरक्षण केलें. सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा त्या वेळीं आला असून, त्याच्या प्रवासवर्णनावरून पुलकेशीच्या धोरणासंबंधी व तत्कालीन महाराष्ट्रीय लोकांची माहिती मिळते.

चालुक्यांनंतर राष्ट्रकूटांनी सुमारें सव्वादोनशें वर्षेंपर्यंत महाराष्ट्रावर राज्य केलें. या घराण्यांतील राजे सुविद्य, धर्मशील व अधिकारपदास योग्य असे होते. त्यांची राजधानी मान्यखेत (मालखेड) ही होती. राष्ट्रकूटांनंतर पुनः चालुक्य आले. त्यांनी इ. स. ९७५ ते ११८९ पर्यंत महाराष्ट्रांत राज्य केलें. या वेळीं त्यांची राजधानी बिदरजवळील कल्याणी ही होती. या घराण्यांत त्रिभुवनमल्ल ऊर्फ सहावा विक्रमादित्य हा सर्वांत पराक्रमी राजा झाला.

उत्तर हिंदुस्थानाकडील यादव राजे यांनी चालुक्यांचा पराभव करून इ. स. १२९४ पर्यंत राज्य केलें. त्यांची राजधानी देवगिरी ही होती. या घराण्यांत सिंघण, कृष्णदेव, महादेव व रामदेव हे विशेष प्रसिद्धीस आले. त्यांनी विद्या व कला यांना उत्तेजन दिलें. सुप्रसिद्ध गणिती भास्कराचार्य, श्रीकरणाधिप हेमाद्रि पंडित व वोपदेव पंडित हीं यादवकालांतील विद्वद्रत्नें होतीं. यादवांच्या कालांत महाराष्ट्राची बरीच भरभराट झाली.

पुढील कालांत यादवांच्या राज्यांत अंतर्गत यादवी होती. त्यांच्या दुर्बलतेचा फायदा परकीयांना मिळाला. इ. स. १२९४ त अल्लाउद्दिनाने देवगिरीवर स्वारी करून तें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. अल्लाउद्दिनानंतर त्याचा सरदार मलिककाफूर याने इ. स. १३१२ त यादवांचें राज्य संपूर्ण नष्ट केलें.[१] इ. स. १३२५ पर्यंत महाराष्ट्रांत मुसलमानी आक्रमणाचें काम पूर्ण झालें. रियासतकार म्हणतात की, चंद्रगुप्त मौर्यापासून देवगिरीच्या रामदेवराव यादवापर्यंत सुमारें सोळा–सतरा शतकापर्यंतचें वैभव पाव शतकाच्या आंतच नामशेष झालें.

१. Bombay Gazeteer (Part II), Thana (1882), P. 438.

दक्षिणेंतील कंपली व वारंगळ येथील स्वातंत्र्य-संग्रामांत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या हरिहर व बुक्क या बंधूंनी श्रीशंकराचार्य माधव विद्यारण्य यांच्या आज्ञेने तुंगभद्रेच्या काठीं इ. स. १३३६ मध्ये विजयनगरचें राज्य स्थापन केलें. हें राज्य जवळजवळ दोनशें वर्षें वैभवसंपन्न होतें. पुढे बहामनी राज्याच्या सुलतानांनी इ. स. १५६५ त तालिकोटच्या लढाईंत त्याचा नाश केला.

यानंतर मुसलमानी अंमलाखाली महाराष्ट्र हा सुमारें तीनशें वर्षें होता. या कालांत महाराष्ट्रीयांचा धर्म, त्यांची संस्कृति व भाषा यावर महान् संकट आलें.[1] या कालांत समाजांतील सर्व वर्ग आपलीं कर्तव्यें विसरून गेले होते. अशा परिस्थितींत थंड गोळा झालेल्या महाराष्ट्राला, संतांनी जागें करून कर्तव्यदक्ष केलें. त्याच सुमारास शिवाजीचा उदय होऊन महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन झालें.

आतां ह्या कालांतल्या बखरींचा विचार करूं.

माहिकावतीची ऊर्फ माहीमची बखर :

ह्या बखरींतील सर्वांत जुन्या दुसऱ्या प्रकरणाचा लेखक केशवाचार्य म्हणतो की, आपणांस मालाडचा देसला नायकोराव याने सन्मानाने बोलावून हें लेखन करविलें. यांचें कारण म्हणजे श्रीकुळस्वामीणीने नायकोरावास स्वप्नांत सांगितलें की, महाराष्ट्रधर्माचें रक्षण करण्यासाठी सर्व जातींच्या लोकांना एकत्र करून त्यांना महाराष्ट्रधर्म सांग. त्याप्रमाणे नायकोरावाने मालाड ऊर्फ म्हालजापूर येथे जोगेश्वरीच्या देवळांत जनसमुदाय एकत्र करून त्यांना प्रस्तुत वंशपद्धति कथन केली. असा ह्या बखरीचा मूळ इतिहास होय. प्रतापबिंबापासून (शके १०६०–इ. स. ११३८) फिरंग्यापावेतों (शके १४२२–इ. स. १५००) एकूण सात राजवटींचा इतिहास या बखरींत निवेदन केला आहे.

माहीम प्रांताचा इतिहास हें प्रस्तुत बखरीचें वैशिष्टय होय; कारण ठाणें कोकणचा हा अज्ञात इतिहास प्रथमच ह्या बखरीच्याद्वारें पुढे येत आहे. राजवाडे म्हणतात—'नापत्ता असलेल्या ह्या इतिहासप्रांताच्या आड येणारा पडदा प्रस्तुत बखरीच्या प्रकाशनाने दूर सारला जाऊन इतिहास–रंगभूमी-

१. म. सा. (श. १८७३), पृ. २१३

वरील एक अज्ञात चित्रपट खुला होत आहे.'[1] मूळ बखरीची नकल व तीहि एकच, यामुळे या बखरींतील कित्येक अपपाठ दुरुस्त करण्यास दुसरें साधन नाही, ही एक मोठी अडचण आहे. राजवाडे यांनी आपल्याजवळ असलेल्या बिंबाख्यानाधारें ह्या बखरींतील कांही अपपाठ दुरुस्त केलेले आहेत. उदाहरणार्थ, मरोळ गांवचें उत्पन्न सरकार शिळोत्तर २७५ (पृ. ९२) ऐवजी शिळोत्तर ७५ असें पाहिजे.

यादव व अल्लाउद्दिन खिलजी यामधील देवगिरीच्या युद्धाचें सविस्तर वर्णन प्रकरण ४ मध्ये आहे. इतकें विस्तृत वर्णन अन्यत्र आढळत नाही. देवगिरीच्या पाडावाचा काल शके १२१६ (इ. स. १२९४) हा मानला जातो;[2] पण या बखरींत तो शके १२१० (इ. स. १२८८) असा दिलेला आहे (पृ. ८९). अर्थात् ही चूक नकलकाराची असावी. तसेंच बिंबराजा कोकणांत संवत् ११३५ मध्ये आल्याचें बखर म्हणते (पृ. ६६); परंतु तो संवत् ११२५ हा पाहिजे. अशा प्रकारच्या बऱ्याच चुका राजवाड्यांनी दाखविल्या आहेत.[3] बखरकार अल्लाउद्दिनाचा उल्लेख महमद असा करतो; पण महमद हें नांव इतिहासांत प्रसिद्ध नाही. 'रामरायासी वाधिलें माहामदे' (पृ. ८८) म्हणजे अल्लाउद्दिनाने रामदेवरावाचा वध केला असाहि उल्लेख आहे. त्याला ऐतिहासिक उपोद्बलक पुरावा नाही, कारण रामदेवरावाचा अल्लाउद्दिनाने केवळ पराभव केला होता.[4] यादवाची वंशावळ व यादव सूर्यवंशी होते, ही बखरींतील माहिती चुकीची असल्याचें राजवाड्यांनी दाखविलें आहे.[5]

शिलाहार, अहमदाबादेचे सुलतान व पोर्तुगीज यांच्यासंबंधीचे प्रस्तुत बखरींतले जे उल्लेख आहेत. त्यांना ताम्रपट, तवारीख व टिपणें यांचा बहिःप्रमाणादाखल पडताळा आहे, त्यामानाने तत्पूर्वीचे बिंबादि राजे यांच्यासंबंधी तेवढा बहिःपुरावा नाही असें राजवाडे म्हणतात. त्यांनी प्रस्तुत

---

१. म. ब. (शके १८४६), प्रस्ता. पृ. ६४

२. New History of the Marathas, P. 25.

३. म. ब. प्रस्ता०

४. N. H. O. M., P. 25.

५. म. स. प्रस्ता०, पृ. ७३

बखरींतील सहज लक्षांत येणारे हस्तदोष निर्देशिले आहेत व त्यांची थोडी मीमांसा केली आहे. यावरून एवढें स्पष्ट दिसतें की, नकल करतांना त्यांत काटेकोरपणा हवा होता तेवढा दाखविला गेला नाही. अर्थात् ही चूक मूळ बखरकाराची नसून नकलकाराची मानणें योग्य होईल.

इतिहासदृष्ट्या प्रस्तुत बखरीचें वैशिष्ट्य असें की, कालाची नोंद तींत आहे. कालनिर्देशाची जी अनिश्चिति पुढील कालांतील बखरींत 'तों, इकडे मग, उपरांतिक' इत्यादि शब्दांत आढळते, तशी ह्या बखरींत सहसा दिसत नाही. कालाची नोंद करण्यांत काटेकोरपणा दाखविल्यामुळेच प्रस्तुत बखरींतील ऐतिहासिक घटना खऱ्या मानण्याकडे साहजिकच कल होतो. बखरींतील बरीच हकीगत तवारिखांतील हकीगतीशीं सुसंगत आहे असें राजवाडे म्हणतात.[1] त्यामुळे सध्या माहीत नसलेल्या इतर पुराव्याच्या अभावींसुद्धा प्रस्तुत बखरींतील इतिहास विश्वसनीय मानण्यास प्रत्यवाय नाही. ऐतिहासिक घटना घडल्यानंतर सुमारें तीनशें वर्षांनी या बखरीचीं प्रकरणें इतक्या सूक्ष्मपणें लिहिलीं गेलीं हें विशेष.

प्रस्तुत बखरींत तत्कालीन राज्यव्यवस्था, जमीन मोजण्याची पद्धति, देशाच्या रक्षणार्थ निरनिराळ्या महालांत ठेवलेल्या सैन्यांच्या याद्या, सरदारांच्या याद्या, गावें, नद्या व किल्ले यांच्या याद्या इत्यादि बाबी इतिहासदृष्ट्या महत्त्वाच्या आहेत. पद्यमय इतिहासाला कित्येक वेळां अत्युक्तीचें स्वरूप येणें शक्य असतें. तसा प्रकार ह्या बखरीसंबंधाने झाला नाही. राजवाड्यांच्या मतें प्रस्तुत बखरींतील मजकुराला बहिःप्रमाणाचें पाठबळ मिळेतोंपर्यंत तो मजकूर वास्तविक इतिहासाच्या सदरांत समावेशिण्याची घाई करणें योग्य होणार नाही.[2]

वाङ्मयदृष्ट्या ह्या बखरींतील वर्णनें आकर्षक आहेत. ही बखर मुख्यतः घटनात्मक असून घटनांच्या वर्णनांत व्यक्तिवर्णनहि आपोआप झालें आहे. प्रतापबिंब, महीबिंब, केशवदेव, नागरशा, रामदेवराव यादव, जैतचूरी, भागडचूरी इत्यादिकांचीं व्यक्तिचित्रें सरस उतरलीं आहेत, भागडचूरीविषयी बखरकार म्हणतो—'द्वालिबंद नाईकवडा येशवंत होता. बहुता युद्धांमध्ये

१. सदर (प्रस्ता०), पृ. ७१
२. सदर (प्रस्ता०), पृ. ७७

जयो पावला. म्हणोन रायाने सेनाधिपति केला. तेणे कितीयेक कार्यें रायाचि बहुते प्रकारे उत्तमान्वये यथापुरषार्थी सिद्धि पावविली.'[1]

ह्या बखरींतील स्थलवर्णनें सविस्तर आहेत. दवण, वांळुकेश्वर, महिकावति तसेंच राजा बिंबाने वसाहत केलेले महाल इत्यादींचीं वर्णनें लेखकाच्या सूक्ष्म दृष्टीचीं निदर्शक आहेत. 'माहिम जागा उत्तम रम्य स्थळ'[2] हें माहीमचें वर्णन आटोपशीर आहे.

यथार्थ घटनावर्णन हा ह्या बखरीचा विशेष होय. प्रतापबिंबाचें पैठण-मार्गें दवणास आगमन व भागडचूरीने मालाडचा सोमदेसला याच्या कुटुंबावर केलेला अत्याचार, या प्रसंगांचीं वर्णनें यथार्थ आहेत. प्रकरण दोन मधील चेऊलच्या भोजाने केशवदेवाला पाठविलेले आंब्रे जश्वद्या ऊर्फ जसवंतदेव याने मध्येच जप्त केल्याचें वर्णन जितकें विनोदी तितकें मार्मिक दिसतें. केशवदेवाने जश्वद्याच्या भैसे दुर्गावर स्वारी केल्यावर तो किल्ला हस्तगत होईना. त्या वेळचें वर्णन लेखक करतो 'चिंचवणि खादले खादले। त्या चिंचोऱ्याचे वृक्ष जाले। त्याच्या चिंचा खादल्या। ईतके दिवस राहिले। परि गड हातिं येत नाही।'[3] ह्या वर्णनांत लेखकाची उत्कृष्ट कल्पकता दिसून येते. भागडचूरीने मालाडच्या देसल्यावर केलेला हल्ला व त्यानंतर झालेला भागडचूरीचा मृत्यु (पलायन?), या प्रसंगांचें वर्णन एखाद्या कादंबरीप्रमाणे चित्तवेधक आहे. या वर्णनाची पार्श्वभूमि म्हणून महडदेवीची यात्रा व खाडी यांचा उपयोग लेखक करतो. त्यामुळे हा प्रसंग उठावदार वाटतो. या बखरींतील ढिळ्याच्या अधिकारासंबंधी केलेल्या निवाडयाच्या वर्णनावरून तसेंच नागरशाने कैवर्तकाच्या पंक्तीस बसणाऱ्या व त्याला आपल्या जातींत घेणाऱ्या लोकांचीं जानवीं काढवून टाकलीं, या हकीगती-वरून तत्कालीन सामाजिक चालीरीतींची माहिती मिळते.

वाङ्मयदृष्ट्या राजवंशावळी हें दुसरें प्रकरण महत्त्वाचें होय. या प्रकरणांत लेखकाचें निवेदनकौशल्य दिसून येतें. त्याने प्रसंगांचीं वर्णनें भावनात्मकतेने केलेलीं आहेत. हीं वर्णनें पाल्हाळिक असलीं तरी मनोवेधक वाटतात.

१. सदर, पृ. ९८
२. सदर, पृ. ८९
३. सदर, पृ. ४०

नायकोरावाने माल्हजापुरास केळव्यापासून मुंबईपर्यंत गोत्रिगोत्राचे खलक जमविले, त्या वेळचें वर्णन लेखकाने सविस्तर केलें आहे; परंतु पाल्हाळ होऊं नये याची त्याला जाणीव दिसते. तो म्हणतो–'ते येकयकांचि नांवें सांगतां ग्रंथ वाढेल.' प्रकरण चारच्या शेवटीं 'मी अज्ञान मुढ मंद' असा लेखक भगवान दत्त आपला लीनभाव व्यक्त करतो. प्रकरण पांचवें म्हणजे पाठारा-ज्ञाति वंशावळि हें पद्धतशीर आहे. प्रकरण पाहिलें–पूर्वपरंपरा–वंश उत्पत्ति–वर्णावर्ण व्याख्या हें काव्यमय असून इतिहास व काव्य यांचा मधुर संगम त्यांत झालेला दिसतो. या बखरींतील प्रकरणांची सुसंगत संहिता करण्यांत संहिताकाराचें कौशल्य दिसून येतें, इतिहासाचें गद्याप्रमाणे पद्य हें साधन या बखरींत यशस्वी झालें आहे. मराठींत पद्यात्मक इतिहासाची परंपरा शिवकालांतील पोवाडयापासून मानण्यापेक्षा, तत्पूर्वीच्या ओवीबद्ध इतिहास असलेल्या ह्या बखरीपासून मानणें अधिक योग्य होईल.

प्रस्तुत बखरींतील भाषेविषयी राजवाडे म्हणतात की, प्रकरण दुसरें व तिसरें हीं मूलतः शक १३७० (इ. स. १४४८) त रचिलीं गेल्यामुळे, त्यांची भाषा मुळांत चोंभा कवीच्या भाषेहून किंचित् अर्वाचीन हें उघड आहे. प्रकरण पांचवें व सहावें हीं अनुक्रमें शक १४६० (इ. स. १५३८) व शक १४०० (इ. स. १४७८) तील असल्यामुळे, त्यांची भाषा मुळांत बहिरा जातवेदाच्या भाषेसारखी असली पाहिजे आणि प्रकरण पहिलें व प्रकरण चौथें हीं दोन प्रकरणें शक १५०० (इ. स. १५७८) च्या सुमाराची असल्याकारणाने, त्यांची भाषा मूलतः एकनाथी भाषेसारखी असेल. प्रस्तुत छापील ग्रंथाची भाषा पाहतां ती शक १४०० (इ. स. १४७८ किंवा शक १५४० (इ. स. १६१८) तीलहि असलेली दिसत नाही. प्रत्यय, विभक्तिरूपें व क्रियापदरूपें बहुतेक बरींच अर्वाचीनलेलीं सर्वत्र दिसतात.[1] मूळ बखरीच्या ज्या नकला झाल्या, त्यामुळे हे फरक झालेले असावेत.

ह्या बखरींतील प्रकरण दोनमधील फारसी शब्दांची यादी राजवाड्यांनी दिलेली आहे. त्यावरून तत्कालीन उत्तर कोंकणी भाषेंत या शब्दांचें प्रमाण बरेंच कमी होतें असें दिसतें. 'अगणित–मोजणी न केलेला, 'आमेत'–

१. सदर (प्रस्ता०), पृ. ७

आमंत्रण, 'दुराय'—नम्रीभाव इत्यादि शब्द व 'कस आदरली' इत्यादि प्रयोग जुने आहेत. या बखरींत पंचमीचे होन व होवोन हे प्रत्यय त्याचप्रमाणे पै हीं रूपें आढळतात. प्रकरण दोनमध्ये 'हें स्वप्न सांगविला' असा प्रयोग आहे. विशेषणानंतर नामाची योजना प्रकरण पांचमध्ये केलेली आढळते. उदाहरणार्थ—राया नागरस्याने आनंद फार केला. दुसऱ्या प्रकरणांतील कुळदेवत, अहिनळवाड, कमळचुरि इत्यादि शब्दांतील 'ळ'कार हे तत्कालीन म्हणजे बहामनीकालीन भाषेचे निदर्शक आहेत. यादवकालापेक्षा बहामनीकालांत मराठीचें स्वरूप प्रौढ (संस्कृतनिष्ठ) होतें. ह्याचीं 'सांप्रत, नामाभिधान समागम' हीं उदाहरणें होत. ह्या बखरीच्या पहिल्या प्रकरणाची भाषा प्रामुख्याने संस्कृतनिष्ठ आहे.

प्रस्तुत बखरींतील गद्य हें वाङ्मयगुणाच्या दृष्टीने पद्याइतकेंच सरस वाटतें. ह्यांतील गद्यपद्यात्मक प्रकरणें हीं एकमेकांशीं इतकीं एकजीव झालेलीं आहेत की, त्यांतील लेखकाचा भिन्नपणा हा सूक्ष्म दृष्टीच्या वाचकाव्यतिरिक्त इतरांच्या मुळीचसुद्धा लक्षांत येणार नाही.

आकर्षक निवेदनशैली, निरलंकृत भाषा, घटनांचा सुसूत्रपणा व मनोरंजक वर्णनें हे ह्या बखरीचे मुख्य गुण होत. मराठींतील कालदृष्ट्या पहिली बखर म्हणून प्रस्तुत बखरीचें एक विशिष्ट स्थान आहे.

शालिवाहनाची बखर :

शालिवाहनांचा काल हा इ. स. पू. पहिल्या शतकापासून इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत होता. हा काल म्हणजे मनुस्मृतीचा काल होय.[1] शालिवाहनाच्या बखरीला राजवाडे अत्यंत जुनी मराठी बखर मानतात. शालिवाहनाची एक हस्तलिखित बखर आहे. तिचे एकूण अकरा बंद असून ती मोडी लिपींत शुद्ध देशी कागदावर पत्रात्मक पद्धतीने लिहिलेली दिसते. शालिवाहनचरित्र म्हणून मराठींत दुसरी एक मुद्रित बखर आहे. तिचीं सुमारें २५ पृष्ठें असून सुरुवातीचीं १३ पृष्ठें प्रस्तावनात्मक मजकूर आढळतो. प्रस्तावनेंत कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग या कालविभागाची माहिती पौराणिक पद्धतीने म्हणजे प्रमाणवर्षे अशी दिली असून युधिष्ठिर, विक्रम, शालिवाहन, विजयाभिनंदन, नागार्जुन व कल्की

१. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (१९३३), पृ. ११८

ह्या शककर्त्यांची यादी दिली आहे. यांतील पहिले तीन होऊन गेले असून पुढचे तीन होणार असल्याचें भविष्य वर्तविलेलें दिसतें. ह्या प्रस्तावनेंत महंमद व येशू ख्रिस्त या शककर्त्यांची माहिती आहे.

सदर ग्रंथाचा कर्ता म्हणतो की, हल्ली शालिवाहनाच्या इतिहासाचें पुस्तक पैठणांत मिळालें व बखरीहि पाहण्यांत आल्या त्यावरून हें शालिवाहनचरित्र मराठी भाषेंत केलें आहे. ग्रंथकर्त्यांचें हें म्हणणें जमेस धरलें, तर हें चरित्र ज्या बखरीच्या आधारें रचलें तें त्याचें मूळ होय. शालिवाहनाची जी हस्तलिखित बखर आहे तें या चरित्राचें मूळ असावें. निदान तें चरित्र-कारानें पाहिलें असावें; कारण सदर हस्तलिखिताचें लेखनस्थल पैठण हें असून त्याचा कालहि दोन–अडीचशें वर्षांपूर्वीचा दिसतो.

हस्तलिखित व मुद्रित चरित्र यांत कांही प्रसंग भिन्न आढळतात. इतकेंच नव्हे तर त्यांत कांही व्यक्तींचीं नांवेंहि भिन्न आढळतात. उदा. हस्तलिखिता-मध्ये शालिवाहनाच्या आजाचें नांव नारायणशास्त्री आहे; पण मुद्रित चरित्रांत तें सुलोचन असें आहे. शेषाची कथा दोहोंत जवळजवळ सारखी दिसते. शेषापासून गर्भ राहिल्यावेळीं शालिवाहनाच्या आईचें वय हस्तलिखि-तांत दहा आहे, तर मुद्रित प्रतींत तें साडेचार आहे. यात्रेस जातांना कन्या मागे राहिली तेव्हा शेष अवतरला असा हस्तलिखितांत उल्लेख आढळतो, तर शालिवाहनचरित्रांत सुलोचन कन्येला नदीवर ठेवून तो बहिर्दिशेस गेल्याचा उल्लेख आहे. शालिवाहनाचें मृत्तिकेचें सैन्य व त्याचें विक्रमाशीं युद्ध या गोष्टी दोहोंतहि सारख्या वर्णन केलेल्या दिसतात. शालिवाहन-चरित्रांत मात्र विक्रमाशीं केलेल्या युद्धाचें वर्णन सविस्तर आहे. हस्त-लिखिताचा लेखक शालिवाहन व विक्रम यांच्यांत तह होऊन नर्मदेअलीकडे शालिवाहनाचा शक व नर्मदेपलीकडे विक्रमाचा शक चालतो असें म्हणतो; परंतु शालिवाहनचरित्रांत विक्रमाला मृत्यु येऊन आकाशवाणी झाली की, दक्षिणतीरीं शालिवाहनाचा शक व उत्तरतीरीं विक्रमाचा शक चालेल असें म्हटलें आहे. प्रसंग व व्यक्ती यांच्या बाबतींत हा फरक ह्या दोहोंत असला तरी कथेचें मुख्य सूत्र सारखेंच आढळतें.

शालिवाहन हें सातवाहनाचें रूपान्तर होय. आंध्रभृत्यासंबंधी प्राचीन शिलालेखांत सातवाहन हा शब्द येतो. शातवाहन व शातकर्णी हीं नांवें

एकच आहेत. लीलावतीपरिणय या प्राकृत ग्रंथांत 'शालिवाहन' व 'शालिवाहननरेंद्र' हीं नांवें हाल राजास दिलेलीं आढळतात. शककर्ता शालिवाहन तोच असावा असें कांहींचें मत आहे.[1] संस्कृत वाङ्मयांत शककर्त्या शालिवाहनाचा प्रथम उल्लेख इ. स. १३०० च्या सुमारास आढळतो.[2]

शालिवाहनाच्या बखरीचें हस्तलिखित व मुद्रित शालिवाहनाचें चरित्र हीं दोन्ही पौराणिक पद्धतीने लिहिलीं असल्यामुळे, त्यांत अद्‌भुताचा भाग बराच दिसून येतो. केवळ ऐतिहासिक पुराव्याच्या अभावीं नव्हे, तर शक्यतेच्या दृष्टीनेहि शालिवाहनाचा जन्म, सजीव होणारें त्याचें मृत्तिकेचें सैन्य इत्यादि घटना शुद्ध चमत्काराच्या सदरांत पडतील अशा आहेत. शालिवाहन–चरित्राचा लेखक अद्‌भुत घटनांची कारणमीमांसा करतो की, हेमाडपंत किंवा जैन यांच्या डोंगरांतील कामांना पांडवकृत्यें हें नांव आहे. तसेंच डोंगरांना पूर्वी पंख होते ते इंद्राने कापले अशी लोकांची समजूत आहे. या जशा सर्व अप्रमाण परंपरा आहेत, तद्वतच शालिवाहनाविषयी असंभाव्य दंतकथा आहेत.

ऐतिहासिक दृष्ट्या या बखरींतल्या शालिवाहनाचें पैठणास अस्तित्व व त्याच्या नांवाने चालू झालेला शक या गोष्टी महत्त्वाच्या होत. शालिवाहन आणि विक्रमादित्य यांच्या कालासंबंधी विद्वानांत मतभेद असल्यामुळे ह्या बखरींतील तसेंच पुढील कालांतील चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांतील व शिवदिग्विजयांतील शालिवाहन व विक्रम यांचें समकालीनत्व संशयितच मानलें पाहिजे.

वाङ्मयाच्या दृष्टीने ह्या दोन्ही बखरींतील भाषा साधी पण रसाळ आहे. दोहोंतहि शालिवाहनाची कथा आकर्षक पद्धतीने निवेदन केलेली आढळते. जवल (जवळ), ईस्वरी (ईश्वरी), सीरछेद (शिरच्छेद), प्राईश्चीत (प्रायश्चित्त), तुजी (तुझी) इत्यादि जुनाट रूपें हस्तलिखितांत मुद्रित चरित्राच्या मानाने बरींच आहेत. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे, सदर बखरींची भाषा परंपरेने अर्वाचीन झालेली आहे यांत शंका नाही; पण दोहोंचीहि भाषा आजच्या दृष्टीने अशुद्ध आहे.

---

१. सुलभ विश्वकोश, भाग ६ (१९५१), पृ. २४१३

२. सदर, पृ. २४१२

दोन्ही बखरींत चरित्रनायकासंबंधी लेखकांना वाटणारा जिव्हाळा आढळतो. शालिवाहनाच्या चरित्राचें लेखन करतांना लेखक तन्मय झालेले दिसतात. ह्या भूमिकेमुळेच दोन्ही बखरी वाचनीय झाल्या आहेत. शालिवाहनाच्या कथेचीं आटोपशीर पण रम्य पद्धतीने केलेलीं हीं निवेदनें एका ऐतिहासिक शककर्त्या पुरुषाची नोंद ह्या दृष्टीने महत्त्वाचीं आहेत.

राक्षसतागडीची बखर :

विजयनगरच्या विध्वंसाच्या ऐतिहासिक प्रसंगाची माहिती असलेल्या प्रस्तुत बखरीचा सुरुवातीचा कांही भाग गळलेला आढळतो. मराठी बखरीची सुरुवात मुसलमान पादशहांनी 'अलियेदलशहा'कडे आपल्या कर्नाटकच्या स्वारीचा निरोप कळविला अशी आहे. कानडी बखरीची सुरुवात विजापूरचा महालदार विजयनगरच्या दरबारांत आला अशी आहे; कारण दोन्ही राजांचे संबंध सलोख्याचे होते.[1] आपण रामराजाचे फर्जंद (पुत्र) आहोंत असें आदिलशहाचें म्हणणें होतें, ही मराठी बखरींतील माहिती कानडी बखरीशीं जुळते. विजापूरचा महालदार जालना येथील मुसलमान सुलतानांकडे जाऊन त्यांना विजयनगराविरुद्ध युद्ध करण्यास उद्युक्त करतो, ही कानडी बखरींतील हकीगत मराठी बखरींत नाही. रामराजाचा विजापूर येथील वकील तिम्माजी भिमजी याने रामराजाला युद्धाची बातमी दिली व विशालअप्पा नायक या रामराजाच्या सेनापतीस विजापुरास पाठविलें, असें कानडी बखरकार म्हणतो. मराठी बखर या बाबतींत मुग्ध आहे. रामराजाचे युद्धास तयार होणें, आपल्या मातेचा व पत्नीचा निरोप घेणें व सलोखा करण्याविषयी त्याच्या मातेने त्याला उपदेश करणें इत्यादि गोष्टी दोन्ही बखरींत सारख्याच दिसतात. तसेंच रामराजाने आदिलशहाला विचारलेला जाब व त्याने दिलेलें उत्तर हींहि दोहोंत सारखीं आहेत.

आदिलशहाने किश्वरखान लारी याला विजयनगरास पाठविल्याचें व कुतुबशहा, निजामशहा यांच्याकडे वकील पाठविल्याचें फेरिस्ता म्हणतो.[2] दुसरा एक मुसलमान इतिहासकार इब्राहिम कुतुबशहाने विजापुरास वकील

१. I. H. R. C. Vol. VII (1925), P. 25
२. Brigg's Firishtah III, P. 123

पाठविल्याचें लिहितो.[१] निजामी इतिहासकार सयीदअली याच्या मतें हुसन निजामशहाने विजापुरास वकील पाठविला; परंतु युद्धाची बोलणीं कुतुबशहाच्या वकिलानेच केली.[२] कानडी व मराठी बखरींत ही माहिती नाही. ह्या दोन्ही बखरींत उल्लेखिलेला अकबर पादशहा जलालदीन हा पादशहा नसून तो विजापूरचा मांडलिक होता, असें डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार म्हणतात.[३] इब्राहिम कुतुबशहाने सर्वांवरच्या संकटाची कल्पना करूनच सर्व मुसलमानी सैन्याचें एकीकरण केलें असावें. हिंदु राजा व आपले मुसलमान दोस्त यांच्या बाबतींत आदिलशहाचा अनिश्चितपणा असणें स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणे मुसलमानी इतिहासकारांनी दिलेली उपरिनिर्दिष्ट सुरुवातीची माहिती रामजी तिरुमलच्या कानडी बखरींत नसली, तरी ती त्याला ठाऊक असावी; पण तिचा त्याने उल्लेख केला नाहीं, असेंहि ते म्हणतात.[४]

मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याच्या फारसी बखरीचें जें मराठी भाषांतर प्रसिद्ध झालें आहे, त्यांतील रामराजा व आदिलशहा यांचे परस्पर सलोख्याचे संबंध, कुतुबशहा, निजामशहा वगैरे पादशहांना आदिलशहाची मदत इत्यादि माहिती मराठी बखरीशीं जुळते. सदर फारसी बखरींत विजयनगरच्या युद्धाची विस्तृत हकीगत आहे. रामराजाने आपला भाऊ तिमराज यास मुसलमानांच्या प्रतिकारासाठी पाठविलें व हुसेन निजामशहाने रामराजाचें डोकें धडापासून वेगळें करून तें भाल्याच्या टोकावर ठेवून त्याची हिंदु सैन्यांतून मिरवणूक काढली इत्यादि त्यांत असलेली माहिती[५] मराठी बखरीपेक्षा निराळी दिसते. केंब्रिज इतिहासांत सदाशिवरायाचा शिरच्छेद केल्याचें म्हटलें आहे.[६]

मराठी बखरींतील रामराजाच्या स्वप्नाचा मजकूर हा वेणीसंहार नाटकांतील भानुमतीला पडलेल्या स्वप्नाप्रमाणे फलज्योतिषाच्या दृष्टीने उद्बोधक व

१. Ibid, P. 112
२. Indian Antiquary (1921), P. 143 FF
३. I. H. R. C. Vol. VII (1925), P. 60
४, Ibid, P. 62
५. मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास (१९३४), पृ. २०३
६. The Cambridge History of India, Vol. III (1928), P. 449

कदाचित् महत्त्वाचा मानला, तरी ऐतिहासिक दृष्ट्या त्याला कितपत महत्त्व देतां येईल हा प्रश्नच आहे. बखर हत्तींच्या यादींतील एकूण संख्या ९२ देते. ती चूक असून ९० अशी पाहिजे व प्रत्येक बैलावर कर्नाटकी सैन्याने २८ सच बाण कां लादले याचा स्पष्ट खुलासा नाही, असें संपादक म्हणतात. कदाचित् इतर सामानाबरोबर २८ बाण असावे. त्याचप्रमाणे बखरींतील शिवराई होन हा सदाशिवराय (तुळुव) याच्या नांवाचा असावा.

राक्षसतागडीच्या बखरींत युद्धाचा प्रत्यक्ष काल दिलेला नाही; परंतु रामराजाच्या मृत्यूची तारीख 'रक्ताक्षीनाम संवछरे वैशाख वदि अस्टमी सोमवारी १० वे तासी श्रवण नक्षत्री भिमासीम बख्ती रामराजाने जीव दिल्हे' अशी दिली आहे. म्हणजे ही तारीख २३ एप्रिल इ. स. १५६५ अशी येते. यांत रक्ताक्षी हा उल्लेख गत संवत्सराचा दिसतो. क्रोधन संवत्सर हा त्या वेळीं चालू होता. ह्या युद्धाच्या तारखेसंबंधी विद्वानांत मतभेद आढळतात. राक्षसतागडीच्या रणसंग्रामांत मुसलमानांनी विजय मिळविल्याचा काल जमादिलाखर २ शुक्रवार हि. स. ९७२ म्हणजे माघ शु. ३ शके १४८६ (५ जानेवारी इ. स. १५६५) असा सयीदअलीच्या बुऱ्हान–इ–मआसिरमध्ये दिला आहे.[१] तारीख–इ–महमद–कुत्बशाही ह्या ग्रंथांत ही तारीख जमादिलाखर २० म्हणजे २३ जानेवारी अशी आढळते.[२] फेरिश्ताच्या आधारें रचलेली घोरपड्यांची फारसी बखर हा काल हि. स. ९७२ (र. स. १५६५) असा देते. मराठी बखर गद्यांत हें युद्ध शके १४८६ माघ शु. ५ रोजीं झाल्याचें म्हटलें आहे.[३] केंब्रिज इतिहासांत ह्या लढाईची तारीख ५ जानेवारी इ. १५६५ अशी सापडते.[४] रियासतकार तालिकोटच्या लढाईचा काल ता. २२ जानेवारी इ. स. १५६५ असा देतात, तो सर्वमान्य आहे.[५]

---

१. Indian Antiquary, Vol. L (1921) P. 146,
२. Ibid.
३. मराठी बखर गद्य (१९५२), पृ. १७१
४. The Cambridge History of India Vol. III (1928), P. 448.
५. New History of Marathas (1946), P. 29.

हनुमंतस्वामींच्या बखरींत विजयनगरचा उल्लेख आहे त्यांत 'किष्किंदा नगरीस विद्यानगर नांव ठेवलें. रामराजे श्रीरामेश्वरपर्यंत राज्य करूं लागले. त्यांनी पंढरीच्या पांडुरंगास प्रसन्न केलें. शके १२०० (इ. स. १२७८) त त्यांचें राज्यहरण झालें' ही जी माहिती दिली आहे, तिला ऐतिहासिक आधार नाही. शिवदिग्विजयांतहि विजयनगरची हकीगत आहे. किरीटी रामराजा राज्य करीत असतां ईश्वराने सुवर्णाचा पाऊस पाडला. त्याजवळ यवनाचे मुलगे सहाजण सदोदित सन्निध असत. रामराजाने दाक्षिण मानसास जातांना वैश्य कारभारी यास राज्य दिलें. वैश्याने कारभार केल्यानंतर त्या सहा यवनांनी अनागोंदी, विजापूर, भागानगर, दौलताबाद, अहमदाबाद व नागपूर हीं सहा राज्यें निर्मिलीं, इत्यादि त्यांतील मजकुरास अन्यत्र आधार नाही. मराठी बखरकारांनी किरीटी रामराजा व देवगिरीचा रामदेवराव ह्या नांवांत गल्लत केलेली दिसते. सरदेसाई घराण्याची शके १६०६ (इ. स. १६८४) मधील बखरींतील बेदरचढाईचा उल्लेख म्हणजेच राक्षस-तागडीचा प्रसंग होय असें प्रा. द. वा. पोतदार म्हणतात.[1] मराठी बखरीचे संपादक श्री. गो. का. चांदोरकर म्हणतात, 'ही हकीगत असावी तितकी विस्तृत नाही ही गोष्ट खरी; परंतु आज आपणांस उपलब्ध असलेल्या कोणत्याहि हकीगतीपेक्षा ही जास्त विस्तृत व महत्त्वाची आहे.[2] समकालीन बखर म्हणून प्रस्तुत बखर इतिहासदृष्ट्या महत्त्वाची ठरते.

प्रस्तुत बखरींत राजभुवनचें वर्णन सर्वांत विस्तृत आहे. त्याला पडलेल्या स्वप्नावरचा विश्वास सार्वकालीन हिंदुमनाचा निदर्शक म्हणतां येईल. अनिष्ट स्वप्न पडल्यामुळे घाबरलेल्या राजभुवराचें वर्णन स्वाभाविक वाटतें. स्वप्नाचा अर्थ जोशी, पंडित वगैरे लोकांना विचारतांना त्याच्या हळुवार भावनात्मक मनाचें चित्रण बखरकाराने सुरेख रेखाटलें आहे. युद्धापूर्वी माता व पत्नी यांचा सादर निरोप घेण्यांत त्याचें कौटुंबिक कर्तव्य दिसून येतें. कौटुंबिक वातावरणांतला त्याच्या भावनेचा नाजुकपणा जितका विलोभनीय आहे, तितकाच रणभूमीवरचा त्याचा कठोरपणा आकर्षक वाटतो. अली आदिल-शहास पुत्रवत् मानण्याचें वचन त्याने शेवटपर्यंत पाळलें. ह्या त्याच्या

१. विजयनगर स्मारक ग्रंथ (१९३६-३७), पृ. ३४१
२. भा. इ. सं. मं. द्वि. सं. वृत्त. (श. १८३६), पृ. १७०

गुणामुळे त्याचें व्यक्तित्व उठावदार झालें आहे. अली आदिलशहाच्या स्वभावाच्या दोन्ही बाजू बखरकारानें परिणामकारक रीतीने रंगविल्या आहेत. एकीकडे राजभुवराशीं दोस्ती व दुसरीकडे मुसलमान पादशहांचा आग्रह अशा बिकट परिस्थितींत सापडलेल्या आदिलशहाचें वर्णन अकृत्रिम वाटतें.

व्यक्तिवर्णनाप्रमाणे वस्तुवर्णनहि सदर बखरींत चांगलें साधलें आहे. युद्धापूर्वी राजभुवराने राणीवसामध्ये येऊन थोरली बाईल सत्यभामा व धाकटी बाईल देवचिंतामणी त्रिवेगल या दोघींना त्यानें दिलेल्या अलंकार-वस्त्रादिकांचें वर्णन एखाद्या कादंबरीप्रमाणे रम्य झालेलें दिसतें. युद्धावर चाललेल्या राजभुवराच्या बरोबर असलेल्या पागा, पीलखाना, उस्तरखाना इत्यादिकांच्या सविस्तर वर्णनावरून त्याच्या सरंजामाची यथार्थ कल्पना येते. तसेंच प्रत्यक्ष युद्धांत राजभुवर व मुसलमान पादशहा हे समोरासमोर आल्यावर त्यांच्या फौजेचें केलेलें वर्णन, शेडगांवकर बखरीसारख्या पुढील बखरींत दिसून येणारा प्रत्येक वस्तूचा जमाखर्ची तपशील इत्यादि बाबी लेखकाच्या सूक्ष्म दृष्टीच्या निदर्शक आहेत.

ह्या बखरींतले प्रसंग युद्धपूर्व व युद्धांतले असे दोन प्रकारचे आहेत. युद्धपूर्व प्रसंगांचें वर्णन करतांना घटनांचें पर्यवसान युद्धांत कसें झालें, याची स्पष्ट कल्पना बखरकार देतो. राजभुवराच्या तयारीचें सूक्ष्म वर्णन देऊन त्याच्या शौर्याची कल्पना लेखकाने सूचित केली आहे. सूचकता हा वाङ्मयीन गुण ह्या बखरींत आढळतो. 'राजबिडे पाऊप्यादे हसम झगडा दिल्हे. पहिले तास पासून अकरा तास पावेतो झगडा जहाला रण दुतर्फे पडिलें.'[1] तसेंच 'करनाटकी लस्केर तमाम चिंदीचोल जहाले पलोन हत्ती व घोडे उट बारु गलोले व बाण सुमार व खजाना तमाम लुटालुटी जहाले.'[2] हें लढाईचें वर्णन व राजभुवराने आदिलशहास दिलेलें आव्हान हे प्रसंग इतके उत्कृष्टपणें रंगविले आहेत की, ते चटकन डोळ्यापुढे उभे राहतात. ह्या दृष्टीने चित्रगुण हा वाङ्मयीन गुण या बखरींत आहे.

व्यक्तिवर्णन व घटनावर्णन यासाठी बखरकाराने अनुरूप वातावरणाचा उपयोग केल्याचें प्रस्तुत बखरींत दिसून येतें. आदिलशहाच्या पार्श्वभूमीवर

१. सदर, पृ. १७९
२. सदर, पृ. १८१

राजभुवराचें व्यक्तिचित्र विशेष आकर्षक झालें आहे. युद्धांत होणारा राजभुवराचा पराजय हा तत्पूर्वी त्याला पडलेल्या दुःस्वप्नांच्या पार्श्वभूमीवर अधिक परिणामकारक वाटतो. मुसलमान पादशहांच्या आग्रहाच्या पार्श्वभूमीमुळे आदिलशहाचें व्यक्तिचित्र चित्तवेधक झालेलें दिसतें. राजभुवराच्या सैन्याच्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर मुसलमानांनी विजयनगराच्या केलेल्या लुटीचें वर्णन हृदयद्रावक असलें, तरी तें मनावर ठसणारें झालें आहे. याप्रमाणे वातावरणनिर्मितीचा कौशल्याने उपयोग करण्यांत बखरलेखकाची कलात्मकता दिसते.

व्यक्तिवर्णन व घटनावर्णन हीं लेखकाने तन्मय होऊनच रंगविल्याचा प्रत्यय ह्या बखरींत येतो. लेखकाच्या ह्या वृत्तीमुळे त्याचा आत्माविष्कार आपोआप झाला आहे. राजभुवर, आदिलशहा इत्यादि व्यक्ती व प्रत्यक्ष युद्धांतील घटना या सर्वांचें तपशीलवार निवेदन करण्यांत सहजता आढळते. लेखकाच्या स्वाभाविक आत्माविष्कारामुळे हीं चित्रें जिवंत वाटतात. इतिहासासारख्या वस्तुनिष्ठ वाङ्मयांतहि लेखकाचा आत्माविष्कार कसा प्रभावी असतो, हें सदर बखरीवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

ह्या बखरीचें मूळ कानडी असल्यामुळे, ह्यांतील भाषेचें वळण कानडी असल्याचें स्पष्ट दिसतें. उदा. ' राजभुवराचे माये व तिघीजण बाईला हे खबर ऐकोन माहालासी आगी लावून दिल्हे ''[1] हें वाक्य निश्चित कानडी पद्धतीचें आहे. बखरीची भाषा शिवकालीन दिसते. मूळ कानडी बखर तालिकोटच्या लढाईच्या सुमारास लिहिली असली, तरी तिचें मराठीकरण सतराव्या शतकांतच झालेलें आहे. ' तूं ' ह्या सर्वनामाची तृतीया विभक्ति ' तुवां ', ' घेऊनु ' हें उकारान्त ल्यबन्तरूप, ' होन ' (नाणें) याचें प्रथमेचें अनेकवचन ' होनु ' (हकेरी होनु), ' ओढीत ' याऐवजी ' वोढीत ' हीं रूपें शिवकालीन भाषेचीं स्पष्ट चिन्हें आहेत. ' व ' ह्या उभयान्वयी अव्ययाचा सर्वांत अधिक उपयोग केलेला आढळतो. लस्कर, खबर, तमाम, दिल इत्यादि फारसी शब्दहि बरेच आढळतात. ' ब्यारी संदेस ' यांतील संदेसऐवजी संबेस (बुधवार) असें पाहिजे. वेचक पण परिणामकारक शब्दरचना हा गुण यांत आहे. उदा. ' पाऊप्याद्ये लोक

१ .सदर, पृ. १८१

रोटी पोळी करून घेत होते तो येही जाऊन सभा पडोन खतर केले '[1] हें वाक्य अर्थपूर्ण वाटतें. 'बयानवार बखेर पाठउन देऊन' यांतील 'बखेर' या शब्दाचा केलेला उपयोग हा कालदृष्ट्या इतर बखरींपेक्षा प्रथम दिसतो.

लेखकाची निवेदनपद्धति साधी असली, तरी चित्तवेधक वाटते. यांतील भाषेंत सहजता दिसते. यामुळेच ह्यांतील मजकूर मनाला भिडणारा असा आहे. विरामचिन्हाशिवाय पूर्वी लेखन कसें करीत, याची कल्पना ह्यावरून येते. घटनांचा क्रम स्वाभाविक म्हणजे एका प्रसंगांतून दुसरा प्रसंग आपोआप निर्माण झालेला असल्यामुळे त्यांत कृत्रिमतेला मुळीच थारा नाही. तपशीलवार हकीगत सुसंगतपणें निवेदन करण्यांत बखरकाराने यश मिळविलें आहे. पाल्हाळ न करतां आटोपशीरपणें केलेलीं वर्णनें हा ह्या बखरीचा मुख्य वाङ्मयीन गुण होय. निवेदनाचा प्रामाणिकपणा हाहि गुण प्रस्तुत बखरींत आढळतो. राजकीय बातम्या पूर्वी कशा पाठवीत, राजदूताकरवीं नजरनजराणे करण्याची पद्धति कशी होती, स्त्रियांकडून बलादुरी म्हणजे संकटें नाहीशीं होण्यासाठी ओवाळण्याची रूढि कशी होती इत्यादि तत्कालीन सामाजिक चालीरीतींचा उलगडा ह्या बखरीवरून होतो. चिटणिशी बखरीसारख्या पुढील बखरींत दिसून येणारा साचेबंदपणा ह्या बखरींत नाही. अनुवाद असूनहि हिचें स्वरूप स्वतंत्र दिसतें हें विशेष.

सारांश, माहितीचा बिनचूकपणा, निरलंकृत भाषाशैली, व्यक्ती व घटना यांचें यथार्थ वर्णन इत्यादि इतिहासगुणांनी व वाङ्मयगुणांनी युक्त अशा प्रस्तुत बखरीचें स्थान मराठी बखर-वाङ्मयांत उच्च दर्जाचें आहे. 'मराठी बखरींत, ह्या बखरीला भाषेच्या व विषयाच्या दृष्टीने स्वतंत्र स्थान दिलें पाहिजे' असें प्रा. द. वा. पोतदार म्हणतात.[2]

शिवपूर्वकालीन इतर बखरी :

शिवपूर्वकालीन विषयांवरील आणखी बखरी म्हणजे महानुभावांनी लिहिलेल्या सिंघणादि यादवांच्या बखरी व त्या बखरींच्या बरोबरीचीच हेमाडपंताची बखर असल्याचा राजवाडे उल्लेख करतात. ह्या बखरी उपलब्ध नाहीत.

१. सदर

२. वि. सा. ग्रं., पृ. ३४३

उपरिनिर्दिष्ट बखरीसंबंधी राजवाडे म्हणतात—' शालिवाहनाच्या बखरी-पुढील जुन्या बखरी मानभावांनी लिहिलेल्या सिंघणादि यादवांच्या आहेत. ह्या बखरींपैकी कांहींचीं पानें मीं पाहिलीं असून ह्यांची भाषा जुनी आहे. यादवांच्यां बखरींच्या बरोबरीचीच हेमाडपंताची बखर समजावी लागते. हिचीहि भाषा लेखकांनी आधुनिक केलेली आहे.[1] हेमाडपंताची बखर लोकांच्या वाचनांत अधिक असल्यामुळे तिची भाषा आधुनिक झाली असावी.

चौथ्या खंडांत प्रसिद्ध झालेल्या नारायणव्यवहारशिक्षा ह्या ग्रंथाचा मुख्य उगम हेमाडपंताची बखर होय, असें राजवाड्यांचें मत आहे; पण त्या दोहोंत फरक असा की, हेमाडपंताच्या बखरीपेक्षा नारायणव्यवहारशिक्षा अधिक व्यवस्थित आहे.[2] ह्यावरून असें दिसतें की, हेमाडपंताची बखर हा ग्रंथ शिक्षात्मक असावा. जुन्या संस्कृत वाङ्मयांत नारदनीति, पंचतंत्र, हितोपदेश हे ग्रंथ ज्याप्रमाणे शैक्षणिकदृष्ट्या लिहिले आहेत, तद्वतच हेमाड-पंताची बखर शैक्षणिक असावी. यादवकालांत हेमाद्रिपंडित हा मोठा विद्वान् गृहस्थ मोडी लिपीबद्दल प्रसिद्ध होता. त्याच्या हातून शैक्षणिक विषयावर बखरलेखन व्हावें हें अशक्य नाही. व्यवहारोपयोगी हितोपदेश असलेली हेमाडपंताची बखर उपलब्ध नसली, तरी एका महत्त्वाच्या विषयाची बखर म्हणून तिचा उल्लेख केला पाहिजे.

सिंघणादि यादवांच्या बखरी व हेमाडपंताची बखर यांचा लेखनकाल शालिवाहनाच्या बखरीनंतरचा व राक्षसतागडीच्या बखरीअगोदरचा आहे असें राजवाडे म्हणतात.[3]

निष्कर्ष :

शिवपूर्वकालीन विषयावरील बखरींची संख्या अल्प असली, तरी ऐतिहासिक वाङ्मयलेखनाची गंगोत्री महिकावतीच्या बखरींतील सर्वांत जुन्या प्रकरणाचा लेखनकाल लक्षांत घेतां शिवपूर्वकालीन बखरीपासूनच मानावी लागेल. स्वकीयांचा इतिहास लिहून ठेवण्याची भावना याच कालांत प्रथम

१. ऐ. प्र , पृ. ३४८
२. सदर, पृ. २१३
३. सदर, पृ. ३४९

दिसत असल्यामुळे ह्या कालांतील बखरी त्या भावनेच्या निदर्शक होत. ह्या बखरींत ऐतिहासिक सत्याचे कण कदाचित् विपुल नसले किंवा सर्वसाधारण उत्तम बखरींतून आढळणाऱ्या वाङ्मयगुणांनी ह्या बखरी संपन्न नसल्या, तरी प्रामाणिकपणाने केलेलें इतिहासलेखन ह्या दृष्टीने उपरिनिर्दिष्ट बखरींचा दर्जा स्वतंत्र आहे. प्रमाणच सांगावयाचें म्हणजे वाङ्मयगुणांपेक्षा ऐतिहासिक लेखनाचे गुण त्यांत अधिक आढळतात.

ह्या कालांतील महानुभावीय वाङ्मयाव्यतिरिक्त दुसरें वाङ्मय सापडत नाही, अशी जी आजपर्यंत समजूत होती ती भ्रममूलक होय; कारण अस्सल मराठी गद्यलेखन हें या कालांतील बखरींत दिसतें. मराठी गद्यवाङ्मयाच्या इतिहासांत आरंभीचें गद्यवाङ्मय म्हणून महिकावतीच्या बखरींतील सर्वांत जुना भाग व राक्षसतागडीची बखर यांचा प्रामुख्याने निर्देश करतां येईल.

राक्षसतागडीच्या बखरींत व महिकावतीच्या बखरींतील उत्तर भागांत परकीय शब्दप्रयोग वापरल्यामुळे, मराठी भाषा समृद्ध झाली आहे. ह्या कालांत ऐतिहासिक साधनें आधुनिक पद्धतीने उपलब्ध नसतांना केलेलें हें लेखन महत्त्वाचें ठरतें. त्या कालांतील घडामोडींचा इतिहास आज ह्या बखररूपाने आपणापुढे आहे. ह्या बखरींच्याद्वारा तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीच्या इतिहासाचें व मराठी वाङ्मयाचें दर्शन घडतें. वरील सर्व कारणांमुळे शिवपूर्वकालीन बखरींचें विशेष महत्त्व आहे.

* * *

५ : शिवकालीन बखरी

ह्या प्रकरणांत शिवकाल हा शहाजीच्या जन्मापासून (इ. स. १५९४) तों थोरल्या शाहू महाराजांच्या आगमनापर्यंत (इ. स. १७०८) गृहीत धरलेला आहे. ह्या कालांत अत्यंत प्रभावी व्यक्ती छत्रपति शिवाजी महाराज ही होती. मराठी स्वराज्य निर्माण करण्याची स्फूर्ति शिवाजीला शहाजीपासूनच मिळाली. ह्या दृष्टीने पाहतां शिवाजीच्या कर्तृत्वाचें बरेंचसें श्रेय शहाजीकडे जातें.[1] म्हणूनच येथे शिवकालाची सुरुवात शहाजीपासून मानली आहे. शिवाजीने घालून दिलेल्या मार्गाने पुढील राज्यकर्ते संभाजी आणि राजाराम यांनी जाण्याचा प्रयत्न केला व शिवछत्रपतीची तेजस्वी परंपरा बिकट परिस्थितींतहि चालू ठेवली.

शिवाजीपासून शाहूच्या आगमनापर्यंत मराठेशाही छत्रपतींच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली असून तिची या कालांत सारखी चढती कमान होती. हा काल स्वराज्याचा होता. स्वराज्याचा वृक्ष हळूहळू फोफावत जाऊन त्याचें पर्यवसान महावृक्षांत होत होतें. या कालांत परकीय मुसलमानी सत्तेशीं दोन हात करण्यांत मराठ्यांची सारी शक्ति खर्च होत होती. युगप्रवर्तक व स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराज यांचें ह्या कालखंडाला दिलेलें नांव अन्वर्थक आहे, यांत शंका नाही.

महाराष्ट्राची पूर्वपीठिका :

सहाव्या शतकांत होऊन गेलेला सुप्रसिद्ध ज्योतिषी वराहमिहिर याने महाराष्ट्र असा शब्द वापरला आहे. महाराष्ट्राचाच 'महारठ्ठ' किंवा 'मराठा' असा अपभ्रंश झाल्याचें दिसतें. नवव्या शतकांतला राजशेखर हा संस्कृत पंडित 'मरहट्टी' ह्या संज्ञेचा उपयोग करतो. महाराष्ट्री ही जुन्या प्राकृत भाषांपैकी एक असून, महाराष्ट्र म्हणजे मोठें राष्ट्र अशी प्राचीन कल्पना होती. मौर्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव इत्यादिकांनी महाराष्ट्रावर राज्य केलें. पश्चिमेस अरबी समुद्रापासून उत्तरेस सातपुडा पर्वतापर्यंत

---

१. N. H. O. M. Vol. I (1946), P. 84

तसेंच कोकण, खानदेश, वऱ्हाड व निजामाचा सुमारें एकतृतीयांश मुलूख एवढ्या भागास पूर्वी महाराष्ट्र असें म्हणत.

भोसले घराणें :

भोसल्यांच्या उदयापासून महाराष्ट्राचा खरा इतिहास सुरू होतो. भोसल्यांचें कूळ हें मूळ राजपुतान्यांतील सिसोदे राणा या उदेपूरच्या वंशांतलें होय. कारण इ. स. १३०३ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीनें चितोड काबीज केल्यावर राणावंशांतील सजनसिंह हा भटकत भटकत दक्षिणेंत आला. त्याच्यापासूनच भोसले वंश निर्माण झाला.[1] ह्या वंशांत मालोजी व शहाजी हे पराक्रमी पुरुष होते. ह्यांपैकी शहाजी हा प्रथम अहमदनगर व नंतर विजापूर येथे मुसलमानी दरबारांत राहिला. तत्कालीन राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेऊन त्याने आपलें कर्तृत्व दाखविलें. भावी स्वराज्याची भूमि शहाजीने आधीच तयार केली होती हें वर म्हटलेंच आहे.

शहाजीच्या उत्कृष्ट देखरेखीखाली शिवाजीला उत्तम शिक्षण मिळालें. परकीय आक्रमणाने दुर्बल झालेल्या देशाच्या दुःस्थितीमुळे, शिवाजीला स्वराज्य-स्थापना करण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली व हळूहळू त्याने त्या दिशेने पाऊल टाकलें. शहाजी, जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांची प्रेरणा, स्वतःचा आत्मविश्वास व अनुयायांचें निरपेक्ष सहकार्य यामुळे शिवाजीला बलशाली अशा परकीय सत्तेला तोंड देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना करतां आली. महाराष्ट्राच्या इतिहासांत ही एक मोठीच क्रांति झाली. शिवाजी बारा वर्षांचा असतांना म्हणजे इ. स. १६४२ त स्वराज्याचा प्रथम प्रयत्न सुरू करून पुढील तीस वर्षांत मराठ्यांचें जें स्वतंत्र राज्य त्याने स्थापलें, त्याला नीतीचें व कायद्याचें स्वरूप देण्यासाठी त्याने इ. स. १६७४ त यथाविधि राज्याभिषेक केला.

शिवाजीचा मृत्यु झाल्यानंतर महाराष्ट्रांत कांही काळ अस्वस्थता होती. संभाजीच्या उग्र प्रकृतीमुळे राज्यकारभारांत जितका व्यवस्थितपणा हवा होता, तितका राहिला नाही. शिवाजीच्या वेळच्या स्वामिभक्त व स्वाभिमानी सेवकांचें तेज पडेनासें झालें. ह्याचा फायदा परकीयांस मिळून इ. स. १६८९ मध्ये संभाजी औरंगजेबाच्या हातीं आला. संभाजी हा स्वधर्मा-

१. सदर, पृ. ४६

भिमानी व शूर होता; पण त्याच्या अंगीं विवेक व मुत्सद्देगिरी नसल्यामुळे त्याचा हृदयद्रावक शेवट झाला. त्याचा शिरच्छेद करून कैद केलेली त्याची पत्नी येसूबाई व पुत्र शाहू यांना पादशहाने आपल्या छावणींत ठेवलें.

संभाजीच्यानंतर महाराष्ट्राचा पुढील काल अत्यंत धामधुमीचा गेला. राजाराम व त्याच्या बरोबरची प्रह्लाद निराजी, खंडो बल्लाळ इत्यादि मंडळी निसटून कर्नाटकांत जिंजी येथे इ. स. १६८९ त पोचली. मागे महाराष्ट्रांत संताजी घोरपडे व धनाजी जाधव ही शूर मंडळी पादशहाच्या सैन्यास तोंड देत होती. महाराष्ट्रांतून जिंजीस जातांना राजाराम व त्याच्या बरोबरीच्या मंडळींस अनेक संकटें आलीं; परंतु त्यांनी मोठ्या धैर्यानें तीं सहन करून आपलें कार्य चालू ठेवलें. पुढील अठरा वर्षें मराठ्यांनी गनिमी काव्याने मुसलमानी सैन्याशीं युद्ध करून त्याला जेरीस आणलें. मराठ्यांनी आता बचावाची भूमिका सोडून चढाईची भूमिका घेतली. औरंगजेब पादशहा अत्यंत दुःखी झाला व त्यांतच त्याचा अंत झाला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र अजमशहा हा शाहू व त्याच्या बरोबरीची मंडळी यांना घेऊन दिल्लीस जाऊं लागला. उत्तरेंत बंडाचा नाश करतांना दक्षिणेंत मराठ्यांनी त्रास देऊं नये, म्हणून त्याने इ. स. १७०७ मध्ये शाहूची सुटका केली. शाहू माळव्यांतून खानदेशमार्गें महाराष्ट्रांत आला व राजारामाची पत्नी ताराबाई हिच्या पक्षांतील मंडळींचा खेड येथे पराभव करून त्याने सातारा काबीज केलें व १२ जानेवारी इ. स. १७०८ रोजीं छत्रपतीच्या अधिकाराचीं सूत्रें हातीं घेतलीं.[1] याप्रमाणे शिवकाल म्हणून संबोधलेल्या कालखंडाचा सुमारें एक शतकाचा महाराष्ट्राचा तेजस्वी इतिहास आहे.

सभासदाची बखर :

कालदृष्ट्या शिवकालीन विषयांवरीलच केवळ नव्हे, तर शिवकालांतील ही पहिली बखर होय. या बखरीचा विषय शिवाजीचें चरित्र हा होय. सुरुवातीस शिवाजीच्या पूर्वजांची म्हणजे मालोजी राजे, विठोजी राजे शहाजी भोसले यांची हकीगत देऊन नंतर शिवाजीच्या वृत्तान्ताचें निवेदन ह्यांत केलें आहे. ह्या चरित्रांत शिवाजी महाराजांच्या आयुष्यांतील एकंदर

१. म. रि. ५ पे. बा. वि. (१९४२), पृ. २२

रोटी पोळी करून घेत होते तो येही जाऊन सभा पडोन खतर केले '[1]
हें वाक्य अर्थपूर्ण वाटतें. 'बयानवार ब्खेर पाठउन देऊन' यांतील 'ब्खेर' या शब्दाचा केलेला उपयोग हा कालदृष्ट्या इतर बखरींपेक्षा प्रथम दिसतो.

लेखकाची निवेदनपद्धति साधी असली, तरी चित्तवेधक वाटते. यांतील भाषेंत सहजता दिसते. यामुळेच ह्यांतील मजकूर मनाला भिडणारा असा आहे. विरामचिन्हाशिवाय पूर्वी लेखन कसें करीत, याची कल्पना ह्यावरून येते. घटनांचा क्रम स्वाभाविक म्हणजे एका प्रसंगांतून दुसरा प्रसंग आपोआप निर्माण झालेला असल्यामुळे त्यांत कृत्रिमतेला मुळीच थारा नाही. तपशीलवार हकीगत सुसंगतपणें निवेदन करण्यांत बखरकाराने यश मिळविलें आहे. पाल्हाळ न करतां आटोपशीरपणें केलेलीं वर्णनें हा ह्या बखरीचा मुख्य वाङ्मयीन गुण होय. निवेदनाचा प्रामाणिकपणा हाहि गुण प्रस्तुत बखरींत आढळतो. राजकीय बातम्या पूर्वी कशा पाठवीत, राजदूताकरवीं नजरनजराणे करण्याची पद्धति कशी होती, स्त्रियांकडून बलादुरी म्हणजे संकटें नाहीशीं होण्यासाठी ओवाळण्याची रूढि कशी होती इत्यादि तत्कालीन सामाजिक चालीरीतींचा उलगडा ह्या बखरीवरून होतो. चिटणिशी बखरीसारख्या पुढील बखरींत दिसून येणारा साचेबंदपणा ह्या बखरींत नाही. अनुवाद असूनहि हिचें स्वरूप स्वतंत्र दिसतें हें विशेष.

सारांश, माहितीचा बिनचूकपणा, निरलंकृत भाषाशैली, व्यक्ती व घटना यांचें यथार्थ वर्णन इत्यादि इतिहासगुणांनी व वाङ्मयगुणांनी युक्त अशा प्रस्तुत बखरीचें स्थान मराठी बखर-वाङ्मयांत उच्च दर्जाचें आहे. 'मराठी बखरींत, ह्या बखरीला भाषेच्या व विषयाच्या दृष्टीने स्वतंत्र स्थान दिलें पाहिजे' असें प्रा. द. वा. पोतदार म्हणतात.[2]

शिवपूर्वकालीन इतर बखरी :

शिवपूर्वकालीन विषयांवरील आणखी बखरी म्हणजे महानुभावांनी लिहिलेल्या सिंघणादि यादवांच्या बखरी व त्या बखरींच्या बरोबरीचीच हेमाडपंताची बखर असल्याचा राजवाडे उल्लेख करतात. ह्या बखरी उपलब्ध नाहीत.

---

१. सदर

२. वि. सा. ग्रं., पृ. ३४३

उपरिनिर्दिष्ट बखरीसंबंधी राजवाडे म्हणतात—' शालिवाहनाच्या बखरी-पुढील जुन्या बखरी मानभावांनी लिहिलेल्या सिंघणादि यादवांच्या आहेत. ह्या बखरींपैकी कांहींचीं पानें मीं पाहिलीं असून ह्यांची भाषा जुनी आहे. यादवांच्यां बखरींच्या बरोबरीचीच हेमाडपंताची बखर समजावी लागते. हिचीहि भाषा लेखकांनी आधुनिक केलेली आहे.[1] हेमाडपंताची बखर लोकांच्या वाचनांत अधिक असल्यामुळे तिची भाषा आधुनिक झाली असावी.

चौथ्या खंडांत प्रसिद्ध झालेल्या नारायणव्यवहारशिक्षा ह्या ग्रंथाचा मुख्य उगम हेमाडपंताची बखर होय, असें राजवाड्यांचें मत आहे; पण त्या दोहोंत फरक असा की, हेमाडपंताच्या बखरीपेक्षा नारायणव्यवहारशिक्षा अधिक व्यवस्थित आहे.[2] ह्यावरून असें दिसतें की, हेमाडपंताची बखर हा ग्रंथ शिक्षात्मक असावा. जुन्या संस्कृत वाङ्मयांत नारदनीति, पंचतंत्र, हितोपदेश हे ग्रंथ ज्याप्रमाणे शैक्षणिकदृष्टया लिहिले आहेत, तद्वतच हेमाडपंताची बखर शैक्षणिक असावी. यादवकालांत हेमाद्रिपंडित हा मोठा विद्वान् गृहस्थ मोडी लिपीबद्दल प्रसिद्ध होता. त्याच्या हातून शैक्षणिक विषयावर बखरलेखन व्हावें हें अशक्य नाही. व्यवहारोपयोगी हितोपदेश असलेली हेमाडपंताची बखर उपलब्ध नसली, तरी एका महत्त्वाच्या विषयाची बखर म्हणून तिचा उल्लेख केला पाहिजे.

सिंघणादि यादवांच्या बखरी व हेमाडपंताची बखर यांचा लेखनकाल शालिवाहनाच्या बखरीनंतरचा व राक्षसतागडीच्या बखरीअगोदरचा आहे असें राजवाडे म्हणतात.[3]

निष्कर्ष :

शिवपूर्वकालीन विषयावरील बखरींची संख्या अल्प असली, तरी ऐतिहासिक वाङ्मयलेखनाची गंगोत्री महिकावतीच्या बखरींतील सर्वांत जुन्या प्रकरणाचा लेखनकाल लक्षांत घेतां शिवपूर्वकालीन बखरीपासूनच मानावी लागेल. स्वकीयांचा इतिहास लिहून ठेवण्याची भावना याच कालांत प्रथम

१. ऐ. प्र , पृ. ३४८
२. सदर, पृ. २१३
३. सदर, पृ. ३४९

दिसत असल्यामुळे ह्या कालांतील बखरी त्या भावनेच्या निदर्शक होत. ह्या बखरींत ऐतिहासिक सत्याचे कण कदाचित् विपुल नसले किंवा सर्वसाधारण उत्तम बखरींतून आढळणाऱ्या वाङ्मयगुणांनी ह्या बखरी संपन्न नसल्या, तरी प्रामाणिकपणाने केलेलें इतिहासलेखन ह्या दृष्टीने उपरिनिर्दिष्ट बखरींचा दर्जा स्वतंत्र आहे. प्रमाणच सांगावयाचें म्हणजे वाङ्मयगुणांपेक्षा ऐतिहासिक लेखनाचे गुण त्यांत अधिक आढळतात.

ह्या कालांतील महानुभावीय वाङ्मयाव्यतिरिक्त दुसरें वाङ्मय सापडत नाही, अशी जी आजपर्यंत समजूत होती ती भ्रममूलक होय; कारण अस्सल मराठी गद्यलेखन हें या कालांतील बखरींत दिसतें. मराठी गद्यवाङ्मयाच्या इतिहासांत आरंभीचें गद्यवाङ्मय म्हणून महिकावतीच्या बखरींतील सर्वांत जुना भाग व राक्षसतागडीची बखर यांचा प्रामुख्याने निर्देश करतां येईल.

राक्षसतागडीच्या बखरींत व महिकावतीच्या बखरींतील उत्तर भागांत परकीय शब्दप्रयोग वापरल्यामुळे, मराठी भाषा समृद्ध झाली आहे. ह्या कालांत ऐतिहासिक साधनें आधुनिक पद्धतीने उपलब्ध नसतांना केलेलें हें लेखन महत्त्वाचें ठरतें. त्या कालांतील घडामोडींचा इतिहास आज ह्या बखररूपाने आपणापुढे आहे. ह्या बखरींच्याद्वारा तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितींच्या इतिहासाचें व मराठी वाङ्मयाचें दर्शन घडतें. वरील सर्व कारणांमुळे शिवपूर्वकालीन बखरींचें विशेष महत्त्व आहे.

* * *

५ : शिवकालीन बखरी

ह्या प्रकरणांत शिवकाल हा शहाजीच्या जन्मापासून (इ. स. १५९४) तों थोरल्या शाहू महाराजांच्या आगमनापर्यंत (इ. स. १७०८) गृहीत धरलेला आहे. ह्या कालांत अत्यंत प्रभावी व्यक्ती छत्रपति शिवाजी महाराज ही होती. मराठी स्वराज्य निर्माण करण्याची स्फूर्ति शिवाजीला शहाजी-पासूनच मिळाली. ह्या दृष्टीने पाहतां शिवाजीच्या कर्तृत्वाचें बरेचसें श्रेय शहाजीकडे जातें.[1] म्हणूनच येथे शिवकालाची सुरुवात शहाजीपासून मानली आहे. शिवाजीने घालून दिलेल्या मार्गाने पुढील राज्यकर्ते संभाजी आणि राजाराम यांनी जाण्याचा प्रयत्न केला व शिवछत्रपतीची तेजस्वी परंपरा बिकट परिस्थितींतहि चालू ठेवली.

शिवाजीपासून शाहूच्या आगमनापर्यंत मराठेशाही छत्रपतींच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली असून तिची या कालांत सारखी चढती कमान होती. हा काल स्वराज्याचा होता. स्वराज्याचा वृक्ष हळूहळू फोफावत जाऊन त्याचें पर्यवसान महावृक्षांत होत होतें. या कालांत परकीय मुसलमानी सत्तेशीं दोन हात करण्यांत मराठ्यांची सारी शक्ति खर्च होत होती. युगप्रवर्तक व स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराज यांचें ह्या कालखंडाला दिलेलें नांव अन्वर्थक आहे, यांत शंका नाही.

महाराष्ट्राची पूर्वपीठिका :

सहाव्या शतकांत होऊन गेलेला सुप्रसिद्ध ज्योतिषी वराहमिहिर याने महाराष्ट्र असा शब्द वापरला आहे. महाराष्ट्राचाच ' महारठ्ठ ' किंवा ' मराठा ' असा अपभ्रंश झाल्याचें दिसतें. नवव्या शतकांतला राजशेखर हा संस्कृत पंडित ' मरहट्टी ' ह्या संज्ञेचा उपयोग करतो. महाराष्ट्री ही जुन्या प्राकृत भाषांपैकी एक असून, महाराष्ट्र म्हणजे मोठें राष्ट्र अशी प्राचीन कल्पना होती. मौर्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव इत्यादिकांनी महाराष्ट्रा-वर राज्य केलें. पश्चिमेस अरबी समुद्रापासून उत्तरेस सातपुडा पर्वतापर्यंत

---

१. N. H. O. M. Vol. I (1946), P. 84

तसेंच कोकण, खानदेश, वऱ्हाड व निजामाचा सुमारें एकतृतीयांश मुलूख एवढ्या भागास पूर्वी महाराष्ट्र असें म्हणत.

भोसले घराणें :

भोसल्यांच्या उदयापासून महाराष्ट्राचा खरा इतिहास सुरू होतो. भोसल्यांचें कूळ हें मूळ राजपुतान्यांतील सिसोदे राणा या उदेपूरच्या वंशांतलें होय. कारण इ. स. १३०३ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीनें चितोड काबीज केल्यावर राणावंशांतील सजनसिंह हा भटकत भटकत दक्षिणेंत आला. त्याच्यापासूनच भोसले वंश निर्माण झाला.[1] ह्या वंशांत मालोजी व शहाजी हे पराक्रमी पुरुष होते. ह्यांपैकी शहाजी हा प्रथम अहमदनगर व नंतर विजापूर येथे मुसलमानी दरबारांत राहिला. तत्कालीन राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेऊन त्याने आपलें कर्तृत्व दाखविलें. भावी स्वराज्याची भूमि शहाजीने आधीच तयार केली होती हें वर म्हटलेंच आहे.

शहाजीच्या उत्कृष्ट देखरेखीखाली शिवाजीला उत्तम शिक्षण मिळालें. परकीय आक्रमणाने दुर्बल झालेल्या देशाच्या दुःस्थितीमुळे, शिवाजीला स्वराज्य-स्थापना करण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली व हळूहळू त्याने त्या दिशेने पाऊल टाकलें. शहाजी, जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांची प्रेरणा, स्वतःचा आत्मविश्वास व अनुयायांचें निरपेक्ष सहकार्य यामुळे शिवाजीला बलशाली अशा परकीय सत्तेला तोंड देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना करतां आली. महाराष्ट्राच्या इतिहासांत ही एक मोठीच क्रांति झाली. शिवाजी बारा वर्षांचा असतांना म्हणजे इ. स. १६४२ त स्वराज्याचा प्रथम प्रयत्न सुरू करून पुढील तीस वर्षांत मराठ्यांचें जें स्वतंत्र राज्य त्याने स्थापलें, त्याला नीतीचें व कायद्याचें स्वरूप देण्यासाठी त्याने इ. स. १६७४ त यथाविधि राज्याभिषेक केला.

शिवाजीचा मृत्यु झाल्यानंतर महाराष्ट्रांत कांही काळ अस्वस्थता होती. संभाजीच्या उग्र प्रकृतीमुळे राज्यकारभारांत जितका व्यवस्थितपणा हवा होता, तितका राहिला नाही. शिवाजीच्या वेळच्या स्वामिभक्त व स्वाभिमानी सेवकांचें तेज पडेनासें झालें. ह्याचा फायदा परकीयांस मिळून इ. स. १६८९ मध्ये संभाजी औरंगजेबाच्या हातीं आला. संभाजी हा स्वधर्मा-

१. सदर, पृ. ४६

भिमानी व शूर होता; पण त्याच्या अंगीं विवेक व मुत्सद्देगिरी नसल्यामुळे त्याचा हृदयद्रावक शेवट झाला. त्याचा शिरच्छेद करून कैद केलेली त्याची पत्नी येसूबाई व पुत्र शाहू यांना पादशहाने आपल्या छावणींत ठेवलें.

संभाजीच्यानंतर महाराष्ट्राचा पुढील काल अत्यंत धामधुमीचा गेला. राजाराम व त्याच्या बरोबरची प्रह्लाद निराजी, खंडो बल्लाळ इत्यादि मंडळी निसटून कर्नाटकांत जिंजी येथे इ. स. १६८९ त पोचली. मागे महाराष्ट्रांत संताजी घोरपडे व धनाजी जाधव ही शूर मंडळी पादशहाच्या सैन्यास तोंड देत होती. महाराष्ट्रांतून जिंजीस जातांना राजाराम व त्याच्या बरोबरीच्या मंडळींस अनेक संकटें आलीं; परंतु त्यांनी मोठ्या धैर्यानें तीं सहन करून आपलें कार्य चालू ठेवलें. पुढील अठरा वर्षें मराठ्यांनी गनिमी काव्याने मुसलमानी सैन्याशीं युद्ध करून त्याला जेरीस आणलें. मराठ्यांनी आता बचावाची भूमिका सोडून चढाईची भूमिका घेतली. औरंगजेब पादशहा अत्यंत दुःखी झाला व त्यांतच त्याचा अंत झाला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र अजमशहा हा शाहू व त्याच्या बरोबरीची मंडळी यांना घेऊन दिल्लीस जाऊं लागला. उत्तरेंत बंडाचा नाश करतांना दक्षिणेंत मराठ्यांनी त्रास देऊं नये, म्हणून त्याने इ. स. १७०७ मध्ये शाहूची सुटका केली. शाहू माळव्यांतून खानदेशमार्गें महाराष्ट्रांत आला व राजारामाची पत्नी ताराबाई हिच्या पक्षांतील मंडळींचा खेड येथे पराभव करून त्याने सातारा काबीज केलें व १२ जानेवारी इ. स. १७०८ रोजीं छत्रपतीच्या अधिकाराचीं सूत्रें हातीं घेतलीं.[1] याप्रमाणे शिवकाल म्हणून संबोधलेल्या कालखंडाचा सुमारें एक शतकाचा महाराष्ट्राचा तेजस्वी इतिहास आहे.

सभासदाची बखर :

कालदृष्ट्या शिवकालीन विषयांवरीलच केवळ नव्हे, तर शिवकालांतील ही पहिली बखर होय. या बखरीचा विषय शिवाजीचें चरित्र हा होय. सुरुवातीस शिवाजीच्या पूर्वजांची म्हणजे मालोजी राजे, विठोजी राजे शहाजी भोसले यांची हकीगत देऊन नंतर शिवाजीच्या वृत्तान्ताचें निवेदन ह्यांत केलें आहे. ह्या चरित्रांत शिवाजी महाराजांच्या आयुष्यांतील एकंदर

१. म. रि. ५ पे. बा. वि. (१९४२), पृ. २२

७१ प्रसंग सांगितले असल्यामुळे हें चरित्र ऐतिहासिकदृष्ट्या संपूर्ण नाही; तरीदेखील शिवाजीसंबंधी बहुतेक महत्त्वाच्या घटना त्यांत आहेत. जेधे शकावलि मात्र २४३ प्रसंग देते.

प्रस्तुत बखरींत शके १५८१ (इ. स. १६५९) मागील शिवाजीची हकीगत अगदी त्रोटक स्वरूपांत दिली आहे. किंबहुना राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे ती मुळीच दिली नाही.[1] त्या मानाने पुढील हकीगत विस्तृत दिली आहे. लखूजी जाधवराव व शहाजी यांच्या संबंधाची ह्यांत माहिती नाही. अफजलखानाचा वध, शिवाजीचें दिल्लीस (आग्र्यास?) प्रयाण, शिवाजीचा राज्याभिषेक, शिवाजीची भागानगरास भेट व शिवाजी–व्यंकोजी भेट हे प्रसंग मात्र सविस्तर दिले आहेत.

प्रस्तुत चरित्रांत एक-दोन घटनांखेरीज कोणत्याहि इतर घटनांचा काल दिलेला नाही. ज्या दोन घटनांचा काल ह्यांत निर्दिष्ट आहे, त्या घटना म्हणजे शिवाजीचा राज्याभिषेक दिवस शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासी शुद्ध १३ व शिवाजीचा मृत्युदिन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ रविवार ह्या होत. जेधे शकावलि शिवाजीच्या राज्याभिषेकाची तिथि ज्येष्ठ शुद्ध १२ व त्याच्या मृत्यूचा वार शनवार असा देते. ह्या हकीगतींत कालनिर्देश 'पुढे', 'मग', 'तेव्हा', 'त्याजवरि', 'त्या उपरि', 'ऐशियास', 'तों', 'इतक्यांत' इत्यादि शब्दांनी केलेला आढळतो. निश्चित कालनिर्देश ह्यांत नसल्यामुळे कोणती घटना कधी घडली, ह्याचा अंदाज ह्या चरित्रावरून घेतां येत नाही. एवढें मात्र खरें की, घटनांचा क्रम बखरकाराने शेवटपर्यंत पाळलेला आहे. यामुळे कालनिर्देश नसूनहि इतिहासज्ञानांत अडचण निर्माण होत नाही.

कालनिर्देश ह्या बखरींत नसला, तरी व्यक्तिनिर्देश व स्थलनिर्देश हे ह्यांत बरेच आहेत. अफजलखान, शास्ताखान, दिलेलखान इत्यादि ऐतिहासिक प्रसिद्ध व्यक्तींप्रमाणे उत्तरेंत जातांना महाराजांनी आपणाबरोबर घेतलेल्या निराजी राऊजी शाहाणा, राघोजी मित्रा, त्रिंबकजी सोनदेव इत्यादि कारकून व हुजरे ह्या सर्वांचीं नांवें बखरकार देतो. विजापूर, भागानगर, जावली इत्यादि महत्त्वाच्या स्थलांप्रमाणे परांडे, आवसें इत्यादि मोगलाईतल्या

१. ऐ. प्र., पृ. २१८

अप्रसिद्ध स्थलांचीहि सदर चरित्रांत नोंद आहे. कालनिर्देशाची उणीव व्यक्तिनिर्देश व स्थलनिर्देश यांनी भरून काढलेली दिसते. चंद्रराव मोरे हें व्यक्तिनाम असल्याचें बखर सांगते; पण रियासतकारांच्या मतें तो किताब आहे.[१] शिवाजी राजे दिलीस पावले, असें चरित्रकार सांगतो; पण ते आग्र्यास गेल्याचे जेधे शकावलि म्हणते. अशीं उदाहरणें या बखरींत क्वचितच आढळतात.

घटनांचें विस्तृत वर्णन व अठरा कारखाने, खजीना, शिलेदार, सुभेदार, सरदार, कारकून, हुजरे, जंजिरे, गड, कोट इत्यादिकांचा जमाखर्ची तपशील हीं या बखरीचीं वैशिष्टयें होत. इतिहासदृष्टया यांचें विशेष महत्त्व आहे. शिवाजीने बंगलोरहून 'परत येतांच बारा मावळें काबीज केलीं.'[२] हें बखरकाराचें विधान विजापूरच्या शहानें कान्होजी जेध्याला दि. १ ऑगस्ट इ. स. १६४४ त लिहिलेल्या पत्राशीं (फरमान) जुळतें असें रियासतकार म्हणतात.[३]

अद्‌भुत प्रसंगांचें वर्णन हा शिवकालीन विषयावरील बखरींचा विशेष या चरित्रांत दिसून येतो. कृष्णाजी अनंत शिवाजीच्या अंगांत सहा वेळां भवानी संचारल्याचें लिहितात. याशिवाय मालोजीस शंभू महादेवाचा साक्षात्कार, मृत्युसमयीं शिवदूतांच्या विमानांत बसून शिवाजी महाराजांचें कैलासास गमन व त्यानंतर पृथ्वीकंप, धूमकेतूचा उदय, उल्कापात, रात्रीं जोड-इंद्रधनुष्यांचें दर्शन, तळ्याचें उदक रक्त होणें, पाण्यांतील मत्स्यांचें निर्गमन हे प्रसंग इतिहासदृष्टया प्रमाण मानतां येणार नाहीत. पौराणिक पद्धतीचें निवेदन हा शिवकालीन विषयावरील बखरींचा दुसरा विशेष प्रस्तुत चरित्राच्या फलश्रुतींत दिसतो. राजवाड्यांच्या म्हणण्याप्रमाणे या सर्वांना इतिहास हें बडें नांव देण्याचें धाष्टर्य करवत नाही.[४]

तत्कालीन राजकीय धामधुमीच्या काळांत बखरकाराला आवश्यक तेवढें मनःस्वास्थ्य लाभलें नसावें; म्हणूनच या बखरींतील इतिहास त्रोटक असून

१. म. रि. २ श. शि., पृ. ४२

२. शिवछत्रपतीचें चरित्र (१९१२), पृ. ७

३. N. H. O. M. Vol. I, P. 98

४. ऐ. प्र., पृ. ३५१

उपरिनिर्दिष्ट कांही दोष तींत शिरले असावे. शिवाय बखरकाराने हें लेखन चंदीसारख्या महाराष्ट्रापासून बऱ्याच दूर अशा स्थळीं बहुतांशीं स्मरणानेंच केलें असावें; पण चरित्रकार हा शिवकालीन राजकारणाशीं प्रत्यक्ष संबंधित असून तो जाणूनबुजून सत्याचा अपलाप न करणारा प्रामाणिक व राजनिष्ठ लेखक आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात, 'शिवाजी महाराजांचे पश्चात् १२।१४ वर्षांनीच सभासदासारख्या 'पुरातन माहितगाराने' हें चरित्र लिहिलें यावरून तें विशेष विश्वसनीय असें म्हणण्यास हरकत नाही.' (उपोद्घात) राजवाड्यांच्या मतें शिवाजीचा इतिहास लिहिणाऱ्याला सभासदी बखरीचा उपयोग फार होईल.[1] ऐतिहासिक लेखन-परंपरेचे जनक कृष्णाजी अनंत सभासद हे महाराष्ट्राचे सर टॉमस मोर होत.

यथार्थ व्यक्तिदर्शन हा या बखरीचा वाङ्मयीन गुण होय. पाल्हाळाला अवसर न देतां, लहान लहान वाक्यांत व्यक्तींचें नेमकें वर्णन करण्याचें बखरकारांचें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. उदा. बखरकार अफजलखानाचें वर्णन 'अफजलखान सामान्य नव्हे. केवळ दुर्योधनच जातीने होता. आंगाचा, बळाचाहि तैसाच आणि दुष्टबुद्धीने तैसाच. त्यास एकले भीमाने मारिला. त्याचप्रमाणे [येथे राजाने] केलें[2] असें करतो. 'शिवाजी काय ! चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतों.'[3] या खानाच्या उद्गारांत त्याच्या आत्मविश्वासाबरोबरच त्याचा उद्दामपणाहि दिसून येतो. शास्ताखानाचें वर्णन 'नबाब शास्ताखान म्हणजे पादशहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्वसंपत्तीनिशी दक्षणेस राजियावर चाल करून आला'[4] किंवा 'दिलेलखान म्हणजे मोठा बळकट. एका हत्तीचें बळ किंवा जास्तीच होईल. आणि हत्ती बराबरि खाणें. दररोज हत्ती खातो तेणेप्रमाणे वजनें खाणें. शरीर तरि दुसरा हेडंब राक्षसच ! ऐसा थोर'[5] हें खानाचें

१. सदर, पृ. २१८
२. शि. च. (१९१२), पृ. २५
३. सदर, पृ. १३
४. सदर, पृ. ३४
५. सदर, पृ. ४५

वर्णन सुबक साधलें आहे. पादशहाच्या नजरकैदेंतून महाराज निसटल्यानंतर 'शिवाजी हुन्नरवंत आहे.'[१] हें मार्मिक वाक्य 'औरंगजेबाच्या मनांतील संतापयुक्त अगतिकता व्यक्त करतें. राज्याभिषेकासाठी आलेल्या गागाभट्टाचें वर्णन नमुनेदार आहे. बखरकार लिहितो : 'भट गोसावी, थोर पंडित, चार वेद, सहा शास्त्रें, योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येने निपुण, कल्युगींचा ब्रह्मदेव, असे पंडित.'[२] याप्रमाणे वेचक पण परिणामकारक शब्दांत व्यक्तिचित्रें रेखाटण्याचें चातुर्य लेखकाच्या अंगीं आहे यांत शंका नाही.

आकर्षक वस्तुवर्णन हा या बखरीचा दुसरा वाङ्मयीन गुण आहे. उदा. अफजलखानाच्या भेटीसाठी निघालेल्या शिवाजीच्या पोषाकाचें वर्णन बखरनवीस करतो, 'खासा राजियांनी जरीची कुडती घातली. डोईस मंदील बांधिला त्यांत तोडा बांधिला. पायांत चोळणा घालून कास कसली व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें.'[३] हें वर्णन साधें असलें तरी कलेच्या दृष्टीने त्यांत एक विशिष्ट क्रम दिसून येतो. शिवाय त्यांत वर्णनाचा समतोलपणाहि आहे. खानासाठी राजांनी जी सदर केली तिचें वर्णन 'डेरे बिछाने व असमानगिरी, तिवाशिया व मोतियांच्या झालरी लाविल्या. चित्रविचित्र बाडें व लोडें, गाद्या, पडगाद्या टाकिल्या. सदर सिद्ध केली.'[४] असें केलें असून त्यांतहि हाच क्रम आढळतो. राज्याभिषेकाच्या वेळच्या सिंहासनाचें मनोहर वर्णन करण्यांत सभासदाच्या सूक्ष्म दृष्टीचा प्रत्यय येतो.

घटनांचें चित्तवेधक वर्णन करण्यांत कृष्णाजी अनंताचा हातखंडा आहे. उदा. शिवाजी अफजलखान यांच्या भेटीचें वर्णन पुढीलप्रमाणे आढळतें. 'राजियाने भेटी देतां खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांकेखाले धरिली. आणि हातींची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली. तों आंगांत जरीची कुडती होती त्यावरि खरखरली, आंगास लागली नाही. हें देखोन राजियांनी डावे हाताचें वाघनख होतें, तो हात पोटांत चालवला. खानाने आंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करितांच

१. सदर, पृ. ५४
२. सदर, पृ. ८२
३. सदर, पृ. २०
४. सदर

खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हातचे बिचावियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून, मुंडी आसडून, चौथरियाखाले उडी घालोन निघोन गेले.'[1]

या वर्णनाचा विशेष म्हणजे त्यांत अर्थानुकारी शब्दरचना असून घटनांचा एक निश्चित कालक्रम आहे. हें वर्णन सूक्ष्म व पद्धतशीर असल्यामुळे, या प्रसंगाचें चित्र वाचकांच्या डोळ्यापुढे चटकन उभें राहतें. त्याचप्रमाणे शास्ताखानाच्या डेऱ्यांत शिरल्यानंतर शिवाजीनें केलेला खानाचा पाठलाग, शिवाजीची आग्र्याहून सुटका, शिवाजीचा राज्याभिषेक, भागानगरास शिवाजीची भेट इत्यादि प्रसंगांच्या निवेदनांत चटकदारपणा आहे. त्यांत कलेचा संयम असल्यामुळे तें उठावदार वाटतें.

वर्ण्य प्रसंगाचें कथन करतांना अनुकूल वातावरणाची निर्मिति हें या बखरीचें आणखी एक वैशिष्ट्य होय. अफजलखान शिवाजीवर चालून येत असतांना तुळजापुरच्या भवानीस जात्यांत भरडल्याचा प्रसंग व त्यानंतर झालेली आकाशवाणी, यांचा पुढील वर्णनाच्या दृष्टीनें बखरकार चांगला उपयोग करून घेतो. या पार्श्वभूमीवर अफजलखानाचा उन्मत्तपणा विशेष परिणामकारक होतो. शाहिस्तेखानावर शिवाजीनें केलेल्या चढाईचें वर्णन करण्यासाठी मध्यरात्रीच्या प्रसंगाचा वातावरणाच्या दृष्टीनें किती सुंदर उपयोग करून घेतलेला आहे! म्हणूनच बखरींतले असले प्रसंग वाचकांच्या हृदयाला भिडतात.

ओघवती भाषा हा या चारित्राचा शैलीविषयक गुण सांगतां येईल. चरित्रकाराची लेखनशैली साधी असूनहि प्रसन्न आहे. त्याच्या लेखनांत भाषेचा सैलपणा मुळीच आढळत नाही. उदा. येळूरकोटचें वर्णन करतांना बखरकार लिहितो, 'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही. कोटांत जींत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाही असे. उदकांत दहा हजार सुसरी. कोटाचे फांजियावरून दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुदी. पडकोट तरि चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट.'[2]

१. सदर, पृ. २२
२. सदर, पृ. ९०

ही शब्दरचना चपखल असल्यामुळे भाषेच्या दृष्टीनें ती आकर्षक वाटल्यास नवल नाही.

या बखरीची भाषा संस्कृत, फारसीमिश्रित आहे. जागृति (पृ. ७). दर्शन (पृ. ३८), विकल्प (पृ. ५०), द्रव्य (पृ. ६८) इत्यादि मूळ संस्कृत शब्दांबरोबर दस्त (पृ. ७), बेदिल (पृ. ३८), सबूरी (पृ. ५०), तलफ (पृ. ६८) इत्यादि अस्सल फारसी शब्द बखरकार वापरतो. बारा महाल व अठरा कारखाने यांचीं मूळ फारसी नांवें त्याने दिलीं आहेतच.

प्रस्तुत चरित्रांत कांही ठिकाणीं समर्पक उपमा-दृष्टान्तादि अलंकारांची योजना केलेली आढळते. उदा. स्वारी म्हणजे कलयुगींचा रावणच. जैशी रावणाची संपत्तीची गणना न करवे, तैसाच बरोबरी खजीना बेमोहिन.... ....घेऊन दिल्लीहून निघाला, (पृ. ३४); एक प्रहर टिपरी जैशी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले, (पृ. ७३); बहुत खेद दुःखाचे पर्वत मानिले. (पृ. ८४) क्वचित् स्थळीं 'जितेन (जयेन?) लभते लक्ष्मी' (पृ. १५) यासारखीं औचित्यपूर्ण सुभाषितें वापरल्यामुळे बखरीच्या सौंदर्यांत अधिकच भर पडली आहे. लष्कर जडगिरी मार्गानें जावें अशी तजवीज केली (पृ. ९३) ही मोडी वाचनाची चूक होय; कारण अर्थदृष्ट्या हें वाक्य 'लष्कर जड गिरीमार्गानें जावें अशी तजवीज केली' असें पाहिजे.

प्रस्तुत चरित्रांत भवानीच्या दृष्टान्ताचे अद्‌भुत प्रसंग वर्णन करण्यांत बखरकाराची श्रद्धा दिसते. कठिण प्रसंगीं भवानीचा आशीर्वाद व अभयदान यांचा उल्लेख हा लेखकाच्या मनावर झालेल्या पौराणिक संस्कारामुळे अपरिहार्यपणें आलेला आहे. भवानीच्या तोंडीं 'अरे अफजलखाना नीचा' (पृ. १३) हे शब्द घालण्यांत किंवा 'यशस्वी करीन, चिंता न करणें' (पृ. ४०) या भवानीच्या अभयदानांत लेखकाची राजनिष्ठा व चरित्र-व्यक्तीबद्दल नितान्त आदर हीं दिसून येतात. शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्या व त्यानंतरच्या त्याने केलेल्या वर्णनांत त्याच्या या भावनेने परिसीमा गाठली आहे. चरित्रकाराचें हें लेखन भावनोत्कट असल्यामुळेच वाचकाच्या मनाला त्याची ओढ लागते. त्याच्या निवेदनांत चरित्रनायकाबद्दल त्याला वाटणारी विभूतिपूजेची भावना स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेली दिसते. इतिहासदृष्ट्या हा दोष मानला तरी वाङ्मयदृष्ट्या तो गुणच मानला पाहिजे.

स्वराज्यसंस्थापकाचें मराठींतलें पहिलें समकालीन चरित्र म्हणून ऐतिहासिकदृष्ट्या सभासदाची बखर महत्त्वाची ठरते. त्याचप्रमाणे साहित्य-गुणसंपन्न अशा या बखरीला मराठी वाङ्मयाच्या इतिहासांतहि अढळ असें स्थान प्राप्त झालें आहे.

चित्रगुप्ताची बखर :

शिवचरित्राची ही बखर होय. ही बखर स्वतंत्र नसून सभासदाच्या बखरीचा तो बहुतांशाने अनुवाद आहे. सभासदाच्या बखरींत जो मजकूर आहे, त्याचा यांत विस्तार केलेला दिसतो. मुळांतल्या एकेका वाक्याचीं यांत चार चार वाक्यें केलीं आहेत व प्रसंगीं बखरकाराने काव्याचा भाग स्वतः तयार करून घातला आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या यांत सभासदाच्या बखरीपेक्षा फारसा नवीन मजकूर नाही. बखरकाराने सभासदाच्या बखरींतीलच सर्व प्रसंग घेतले आहेत. मात्र कांही ठिकाणीं सभासदाच्या बखरींत ज्या व्यक्तींचीं नांवें संपूर्ण नाहीत, तीं नांवें चित्रगुप्ताने या बखरींत दिलीं आहेत. उदा. सभासदी बखरींत मोरोपंत, अण्णाजीपंत अशीं नांवें आढळतात तर चित्रगुप्ताच्या बखरींत हीं नांवें मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो अशीं आहेत.[1] चित्रगुप्ताच्या बखरींतील पागेच्या सरदारांची यादी (पृ. १२२) ही सभासदाच्या यादीपेक्षा मोठी आहे. चित्रगुप्ताच्या बखरींतील फुलचरी वगैरे स्थलांचीं नांवें (पृ. १३५) व सिंधुदुर्गाची हकीगत (पृ. १३४) हीं नवीन आहेत.

अफजलखान व शिवाजी यांच्या भेटीचें वर्णन व शिवाजीच्या राज्याभिषेकाचें वर्णन हीं चित्रगुप्ताने सभासदापेक्षा केवळ विस्तृतच नव्हे, तर अधिक डौलदार भाषेंत केलेलीं आढळतात. ह्या बखरीचा लेखक चित्रगुप्त म्हणजे रघुनाथ यादव माहीतगार असल्यामुळे व त्याने आपल्यापूर्वी झालेल्या हकीगतीच्या लेखनाचा उपयोग करणें शक्य असल्यामुळे प्रस्तुत बखर सभासदाच्या बखरीइतकीच विश्वसनीय समजणें इष्ट होईल. 'रघुनाथ यादव माहीतगार इसम असल्यामुळे शिवाजीचा इतिहास लिहिणाऱ्याला त्याचें मत वेळोवेळीं घेणें जरूर पडेल ' असें राजवाडे म्हणतात.[2]

---

१. शिवाजी महाराजांची बखर (१८८८), पृ. १०
२. ऐ. प्र., पृ. २१६

विस्तृत वर्णनें हा या बखरीचा विशेष आहे. कोणत्याहि व्यक्तीच्या, घटनेच्या किंवा वस्तूच्या वर्णनांत लेखकाची कल्पकता व त्याचें भाषाप्रभुत्व दिसून येतें. उदा. गागाभट्टाचें वर्णन बखरकार करतो—

'वेदमूर्ति सकल वेदशास्त्रसंपन्न ...... संपूर्ण पांडित्य समूहाचे अधिपच, द्विजकुलांत दैदीप्यमान, संपूर्ण अमरासहित अमरेंद्र मस्तकें डुलावीत आहे, त्रैलोक्यभुवनीं वंद्य, शापादपि शरादपि, जैसा प्रतिसृष्टिकर्ता विश्वामित्र किंवा वामदेव, वाल्मीक, पराशर, व्यास, भूरिश्रवा, कण्व, मेधातिथि, जयमिनी, वैशंपायन, संजय, कपिल महामुनी, शुक योगेंद्र, गाधिज, मार्कंडेय, गौतम, मांडुक, सौतिक, अगस्तिच दुसरा भूमंडळाचे ठायीं, भारद्वाज, दुर्वास, भगीरथ, मांडव्य, भूतळाचे ठायीं दशग्रंथी, चतुःशास्त्री प्रत्यक्ष श्रीवेदजातच मूर्तिमंत, स्वामीचे अकस्मात् मनोजयप्राय देशावराप्रीत्यर्थ श्रीस्वर्गगामिनी भागीरथी अनुक्रमे मनकर्णिका यमुना श्रीसूर्यकन्यका प्रयागस्थळाहून भट गोसावी महातपो तेजस्वी यांचें आगमन जहालें.'[1]

वरील उदाहरण बखरकाराच्या उपरिनिर्दिष्ट गुणाचें पुरेसें निदर्शक आहे. यावरून त्याचें तपशील भरण्याचें अद्वितीय कौशल्य दिसून येतें.

समासप्रचुर व आलंकारिक भाषा हा या बखरकाराचा दुसरा विशेष सांगतां येईल. या दृष्टीने राज्याभिषेकाच्या वेळचें महाराजांचें वर्णन उल्लेखनीय आहे. बखरकार लिहितो– 'तैसेंच हृदयस्थान प्रशस्थ, बाहु-दंड गजशुंडप्राय व कटी सिंहाकृति, तैसेंच करपल्लव पंकजपुष्पासमान, तैशाच जानुजंघा चरणकमलें आरक्त शेंदूर वर्णातुल्य ऐसे महाराजांचें शरीर स्वयं हस्तकें हर्षोत्कर्षाचित्तें विधिनेच निर्मिलें.[2] समासप्रचुरतेमुळे बखरकाराच्या लेखनांत अस्वाभाविकपणाचा दोष निर्माण झालेला दिसतो. त्यांत त्यांचें पांडित्य असलें, तरी सहजता नसल्यामुळे कृत्रिमपणा निर्माण झालेला आहे.

गद्य मजकुरानंतर मधूनमधून पद्य मजकूर बखरकार घालतो. उदा. शिवाजी व अफजलखान यांच्या भेटींतला त्यांचा संवाद बखरकाराने काव्यांतच दिला आहे. हा संवाद हिंदुस्थानी भाषेंत आहे हें विशेष. अशा प्रकारचा पद्यात्मक भाग संस्कृत, मराठी व हिंदुस्थानी अशा तिन्ही भाषांत

१. शि. ब., पृ. ९६
२. सदर, पृ. १०१

आहे. बखरलेखकाचें भाषा-प्रभुत्व दिसत असलें, तरी प्रसंगाचा कृत्रिमपणाहि दिसतो. अशा प्रकारचें ‘ पिसाळलेलें गद्य ’ (Prose run mad) बखरकाराने घातलें आहे. या प्रकारामुळे बखरीच्या सौंदर्याला बाध येतो.

चित्रगुप्ताची वाणी अस्खलित, जोमदार व भारदस्त आहे. त्याची कथनपद्धति पौराणिक थाटाची दिसते. उपरिनिर्दिष्ट दोष मान्य करूनहि चित्रगुप्ताने सभासदी बखरीचा अनुवाद करतांना आपलें वैशिष्ट्य प्रगट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पृथगात्मता हा वाङ्मयीन गुण या बखरींत निश्चित आहे.

भोसलवंश चरित्र :

तंजावरच्या भोसले घराण्याचा हा इतिहास आहे. ह्या चरित्राच्या सुरुवातीस शिवाजी महाराजांच्या पूर्वीच्या चौदा पिढ्यांची परंपरा सांगितलेली असून, ती पौराणिक कथांतील श्रीनारायण, सूर्यनारायण, मनु, इक्ष्वाकु या सूर्यवंशांतील पुरुषांशीं निगडित असल्याचें बखरकार सांगतो. त्यानंतर शिवाजीचा आजा मालोजी भोसले याच्यापासून ऐतिहासिक माहिती कालगणनेसह दिल्याचें आढळतें. मालोजीपासून धाकट्या शाहू महाराजांपर्यंत महाराष्ट्रांतील भोसल्यांची ही हकीगत असून, तंजावरच्या व्यंकोजीपासून शरफोजी राजे यांच्यापर्यंत तंजावरच्या भोसल्यांचा इतिहास ह्यांत दिला आहे. या चरित्रांत महाराष्ट्रामधील छत्रपतींच्या घराण्याची त्रोटक हकीगत असल्याचें दिसतें. त्या मानाने शिवाजीसंबंधी मजकूर विस्तृत आहे.

या बखरींतील सुरुवातीची सांब सदाशिव शंभू राजाच्या स्वप्नांत आल्याची हकीगत किंवा शरभ राजाच्या स्वप्नांत श्री सोमस्कंद मूर्ति आल्याचा उल्लेख, तसेंच शिवाजीच्या पूर्वजांचा पौराणिक व्यक्तींशीं संबंध हीं ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीय मानणें कठिण आहे.

शहाजीच्या जन्माचा काल शके १५३१ (इ. स. १६०९) साधारण संवत्सर[1] असा यांत लेखक देतो; पण रियासतकार तो शके १५१६ (इ. स. १५९४) जय संवत्सर असा देतात.[2] लखूजी जाधवाचा मुलगा दत्ताजी राजे व विठोजीचा पुत्र संभाजी राजे यांचें युद्ध, त्यांत दत्ताजीचा

१. भोसलवंश चरित्र (१९५१), पृ. ६
२. म. रि. १ शहाजी, पृ. २०

मृत्यु, त्यानंतर यादव व शहाजी यांचें युद्ध, त्यांत शहाजीची मूर्च्छा (पृ.७) इत्यादि प्रसंगांची माहिती नवीन आहे. जिजाई (जिजाबाई) ही शहाजीची दुसरी बायको असल्याचें बखर म्हणते (पृ. १२); पण रियासतकारांच्या मतें ती पहिली होती व तुकाबाई ही शहाजीची दुसरी बायको होती.[1] अफजलखान पडल्यावर त्याचा वकील कृष्णाजीपंत राजावर वार करूं लागला, अशी माहिती यांत दिलेली आहे; परंतु कृष्णाजीपंत हा शिवाजीस अनुकूल असल्यामुळे हें अविश्वसनीय दिसतें.[2] शिवाजी राजाची सूरत तरी लिहून आणावी म्हणून औरंगजेबाने चिताऱ्यास पाठविल्याची घटना नवीन दिसते. या बखरींत आपला घोडा पाणी पीत नाही म्हणून औरंगजेबाने त्यास 'येथेही शिवाजी आला काय कां घाबरा झालास.' (पृ. ४३) असा प्रश्न विचारल्याची हकीगत धनाजी जाधवासंबंधी प्रचलित आहे. शके १६०३ (इ. स. १६८१) मध्ये शिवाजीने 'आपलें स्वराज्य पुणें प्रांताचें तक्त (संभाजीस) देऊन धाकटे पुत्र राजारामास प्रथम चंदीचें राज्य दिलें होतें (पृ. ४७) असें म्हटलें आहे; पण शिवाजीचा मृत्यु यापूर्वीच म्हणजे शके १६०२ (इ. स. १६८०) मध्ये झाला होता.

इतिहासांत सहसा न येणारा आणखी कांही नवीन मजकूर या बखरींत आढळतो. उदा. तंजावरीं गुप्तरूपाने जाऊन तेथे किल्ल्यांत प्रवेश करून नंतर बाहेर पडून शिवाजीने एकोजीस 'अम्ही किल्यांत आलों. तेव्हा येका दुकानांत अमचा शिखा टाकून शिरणी घेतली तो शिखा पाठवणे' (पृ. ४८) असा निरोप पाठविल्याची हकीगत, त्याचप्रमाणे अखंभाबादी सर्व राजपुत्र औरंगजेबाच्या भेटीस गेले तेव्हा संभाजीहि गेला होता. त्याने कुर्निसात न केल्यामुळे बादशहाने त्यास कैद केलें. त्यांतून तो पळाला. पुढे त्यास पकडल्यावर त्याने कुर्निसात करावा (म्हणजे लवावें), म्हणून बादशहाने एक लहान दरवाजा केला व त्यांतून भेटीस बोलावलें; पण संभाजी पुढे पाय सोडून आला (पृ. ४९), ही हकीगत नावीन्यपूर्ण वाटते. शाहूस औरंगजेबाने सोडल्यावर तो साताऱ्यास येऊन शके १६२६ (इ. स.

१. म. रि. २ श. शि., पृ. १७

२. सदर, पृ. ६८

१७०४) तख्तावर बसला असा इतिहास या बखरींत दिला आहे; परंतु त्यास अजमशहाने सोडलें व शाहू दि. १२ जानेवारी इ. स. १७०८ मध्ये गादीवर बसला, असें रियासतकार म्हणतात.[1] शाहूच्या मृत्यूनंतर रामराजास शके १६७४ (इ. स. १७५२) त गादीवर बसविलें, असें बखरकार लिहितो (पृ. ५२); पण रियासतकार हा काल इ. स. १७५० असा देतात.

उपरिनिर्दिष्ट मजकूर हा ऐतिहासिकदृष्ट्या निराळा असला, तरी तंजावर-सारख्या दूरच्या ठिकाणीं हा इतिहास लिहिला आहे हें ध्यानांत घेतल्यास तो तसा होणें स्वाभाविक आहे. या बखरींतील महाराष्ट्रांतील भोसल्यांच्या संबंधीच्या घटना स्थूलमानाने सत्य आहेत. वर उल्लेखिलेला कांहीं नवीन मजकूर हा अन्य पुरावा मिळेपर्यंत संशयितच मानला पाहिजे.

या बखरींतील वर्णनें चांगलीं साधलीं आहेत. यादव आणि शहाजी यांचें युद्ध, अफजलखानाच्या वधाचा प्रसंग, संभाजी व औरंगजेब यांची भेट हे वाचतांना ते आपल्यासमोर घडत असल्याचा भास होतो. बखरकाराने शिवाजीचें वर्णन 'राजा स्वतेव शूर, भाला, वर्ती तरवार वगैरे सकला युद्धाचे हातही राजास चांगले कळताहेत' (पृ. ४२), तसेंच 'शिवाजी राजे वरप्रसादी आणि शूरही कोठे गेल्याही जयच पावणार' (पृ. २१) असें मार्मिकपणें केलें आहे.

अफजलखानाच्या व शिवाजीच्या युद्धाचें वर्णन करतांना बखरकार म्हणतो—

'अफ्जल्खानाने राजास गवसून धरून माजेची कठार काढून राजाचे पोटावरी चालविली, दोन तीन मार चालविले, तरीहीं राजानी अंग्या आंत बारीक बखतर ल्याले होते, ते कोणासहीं कळेना. त्यामुळे राजाचे पोटावरी चालविली कठार व्यर्थ होऊन गेली. इतुक्यांत राजानी वरचेवरी हाताच्या विसव्याने मार दाखवून डाव्या हाती वाघ नंखे होती त्याने अफ्जल्खानाचे पोटावरी मारून ओढिले. तेणेंकरून पोट चिरले जावून चरबी बाहेरी आली तरीहीं खान मजकूर तक्त जाइल्या करितां तेचबी पोटांत आपले हातें भरून दुशालाने पोट ओढून बांधून हाती फरंग घेऊन राजावरी वार करूं लागला. तेव्हा राजानी हाती पट्टा घेऊव (न?) खान मजकूराचे वार येकंदर

१. म. रि. ५ वा. वि., पृ. २२

पट्यावरी आडवून आपण वार करून, तो वार खान मजकूराचे डाव्या भुजापासून उजव्या बाजूच्या बरगड्या पावेतो उतरल्यामुळे खान दुर्घट होऊन खाले पडला.''[1]

या मार्मिक वर्णनावरून सदर प्रसंगाची स्पष्ट कल्पना येते. 'पश्चिम प्रदेशीं विराट देशांत साघपर्वताचे घाटा खाले पश्चिम समुद्रतीरा समीप देश लोहपर्वतप्रातीं प्रतापगडास समीप जयवल्ली नगर आहे ते स्थल बहुत कुबल. तेथे कोणाचाहीं लाग नाही'[2] हें या बखरींतलें सुंदर स्थलवर्णन होय.

वर्णनाला योग्य अशी पार्श्वभूमि किंवा वातावरण निर्माण करण्यांत बखरकाराचें कौशल्य दिसून येतें. उदा., 'औरंगजेबाच्या आज्ञेने संभाजीस भेटीस बोलाविलें. त्या वेळी तो चातुर्याने पुढे पाय सोडून चालला' ह्या वेळचें वर्णन संभाजी ज्या अगतिक परिस्थितींत बादशहाच्या तावडींत सापडला होता, त्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उठावदार झालें आहे.

या बखरींत लेखकाचा आत्माविष्कार बहुतेक प्रसंगांचें वर्णन करतांना झाला आहे. वर जें शिवाजीचें वर्णन आलें आहे, त्यांत तो आत्माविष्कार दिसून येतो. तसेंच अफजलखानाच्या वधाची हकीगत देतांनाहि दिसतो. शिवाजीचेंच केवळ नव्हे, तर भोसले वंशाच्या कोणत्याहि व्यक्तीबद्दल लिहितांना लेखकाचा त्यासंबंधी आदरभाव व्यक्त झाला आहे. प्रस्तुत चरित्राच्या शेवटीं ज्या शरफोजी भोसल्याचा हा बखरकार आश्रित आहे, त्याच्या संबंधानेहि त्याने 'सन्मार्गांतच आहेत' (पृ. १०१) असे गौरवपर उद्गार काढले आहेत. या आत्माविष्कारामुळे हें लेखन भावनात्मक व त्यामुळेच आवेशपूर्ण असें झालें आहे.

उपमादि अलंकारांचा लेखकाने सुंदर वापर केलेला दिसतो. शाहूचें वर्णन करतांना बखरकार लिहितो, 'शाहू राजास चंद्रवृद्धीसारखें विद्याभ्यास परिपूर्तीस बारा वर्षे वयहीं जाहलें' (पृ. ५१); 'गुणरत्न ऐशे कुलदीपक शाहूराजे' (पृ. ५०) इ.

डौलदार शैली, आवेशपूर्ण भाषा, वर्ण्य विषयाचा जिव्हाळा, यथार्थ वर्णनें हे वाङ्मयगुण या बखरींत आहेत. ही बखर शिलालिखित असली, तरी ती

१. भो. च. (१९५१), पृ. ३१
२. सदर, पृ. २५

मुळांत हस्तलिखित असली पाहिजे. तंजावरकडील मराठी वळणाची बखर म्हणून हिला स्वतंत्र महत्त्व देणें योग्य ठरेल.

चिटणीस-विरचित शिवछत्रपतींचें चरित्र :

'श्रीशिवछत्रपति अवतार होऊन (त्यांनी) धर्मस्थापना केली, व राज्य-आक्रमण व अमानुषी पराक्रम केले. त्यांजपासून आजपर्यंत राज्य-उपभोग वंशपरंपरा दक्षिणचे ठायीं कसे केले, पराक्रम काय केले, हें चरित्र पूर्वील दाखले वगैरे लिहून ठेविले असेल त्या अन्वयें लेहून आणावें'[1] अशी धाकट्या शाहू महाराजांची आपणास आज्ञा झाल्याचें लेखक सांगतो व त्या आज्ञेप्रमाणे 'शास्त्राधार विष्णुपुराणादी पुराणांतील दंडनीती, राजधर्म, राजमयूख व रमलशास्त्र व कारकीर्दी वडिलार्जित होत्या, दिनचर्या, पराक्रमकथा (ही होत्या,) त्यांचे आश्रयेंकरून लेहून निवेदन केलें' (पृ. २) असा आपल्या लेखनाधाराचा उल्लेख करतो.

शिवछत्रपतीच्या या चरित्राची एकूण सात प्रकरणें आहेत. यांतील सहावें प्रकरण 'दक्षिण दिग्विजय' हें असून सातवें प्रकरण 'राज्याभिषेक' हें होय. परंतु कालदृष्ट्या 'दक्षिण-दिग्विजय' म्हणजे शिवाजीच्या कर्नाटकाच्या स्वारीचें वर्णन हें 'राज्याभिषेक' या प्रकरणानंतर यावयास पाहिजे; कारण इ. स. १६७४ मध्ये (शके १५९६ आनंद संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १२ शुक्रवार, जेधे शकावलि) राज्याभिषेक झाल्यावर शिवाजीने इ. स. १६७७ मध्ये (शके १५९९ पिंगल संवत्सरे चैत्र मास, जे. श.) कर्नाटकावर स्वारी केली. 'चिटणिसांनी, 'राज्याभिषेक' हा शेवटचा गोड घांस म्हणून तो विषय शेवटीं सप्तम प्रकरणांत ठेविला असावा.' (चरित्र-टीपा, पृ. २९५) हें काव्येतिहाससंग्रहकर्त्यांचें विधान चिंत्य वाटतें.

पहिल्या प्रकरणांत चरित्रकाराने ज्या वंशावळी दिलेल्या आहेत त्या कृत्रिम असल्याचें राजवाड्यांनी सिद्ध केलेलें आहे.[2] त्यांच्या मतें ज्या जुन्या यादीवरून या वंशावळी उतरून घेतल्या आहेत त्यांत ज्या चुका आढळतात त्या या चरित्रांत जशाच्या तशाच आल्या आहेत. या प्रकरणांतील शके ५१२ हें (इ. स. ५९०) हें मुसलमानी राज्यस्थापनेचें वर्ष निराधार आहे.

१. सप्तप्रकरणात्मक चरित्र (१९२४), पृ. १

२. ऐ. प्र., पृ. २२२

तसेंच रुकनदीनने पिठोर राजाचा केलेला पराभव व लक्ष्मणसिंहजीची पत्नी पद्मिनी हे दोन्हीहि उल्लेख अनैतिहासिक होत. शके १०१२ (इ. स. १०९०) त दिल्लीच्या पातशहाने चितोडवर स्वारी केल्याचें वर्णन कालदृष्टया बरोबर नाही. बखरकाराने या घटनेचा काल सुमारें १७५ वर्षें मागे नेला आहे. टॉड आपल्या राजस्थानच्या इतिहासांत हा काल इ. स. १३०३ असा देतो.

दुसऱ्या प्रकरणांत शिर्के यांची कन्या सईबाई हिच्याशीं शिवाजीचें लग्न विजापुरास झाल्याचें चिटणीस लिहितात (पृ. ५८); पण रियासतकार म्हणतात—' पुण्यास असतांना दादाजीने शिवाजीचें लग्न निंबाळकराकडील सईबाई इच्याशीं केलें.'[1] 'दिल्लीमध्ये अलमगीर पादशाही करीत होते. त्यास पुत्र औरंगजेब उत्पन्न शके १५४० (इ. स. १६१८) यांत जाले होते ' (पृ. ५९) असा उल्लेख आहे; पण हें विधान बरोबर नाही. कारण औरंगजेबाचें नांव अलमगीर होतें हें सुप्रसिद्ध आहे. तोरणा अगोदर घेऊन नंतर राजगड बांधल्याचें बखरकार सांगतो (पृ. ६२), याला रियासतकारांचा दुजोरा आहे;[2] पण राजवाडे म्हणतात, ' जर प्रथम तोरणा किल्ला शिवाजीच्या हस्तगत झाला असता, तर राजगड नवीन बांधीत बसण्याच्या खटपटींत पडून शिवाजीनें मेहनतीचा व पैशाचा व्यर्थ व्यय केला नसता.[3] शिवदिग्विजयांत राजगड अगोदर बांधल्याचा उल्लेख आहे. रायगड शके १५६८ (इ. स. १६४६) त घेतल्याचें या प्रकरणांत बखरकार म्हणतो (पृ. ६९); पण शके १५७८ त शिवाजीने रायरी घेतल्याचा उल्लेख जेधे शकावलींत आहे. कोंडाणा व पुरंदर हे किल्ले घेतल्याचें वर्णन तसेंच नगरचा पुरा मारिला (पृ. ७८), या घटनांत कालविपर्यास झाला आहे; कारण शिवाजीने आग्र्याहून आल्यानंतरच कोंडाणा घेतला व दुसऱ्या दोन घटना यापूर्वीच झाल्या होत्या.

महाराजांनी समर्थांची चाफळास गांठ घेतल्यानंतर ते प्रतापगडास निघून गेल्याचें चरित्रकार सांगतात (पृ. ९२); पण ज्या अर्थी राजांची व

१. म. रि. श. शि., पृ. २३
२. सदर, पृ. ३६
३. ऐ. प्र., पृ. २६५

स्वामींची भेट शके १५७१ (इ. स. १६४९) वैशाख शुद्ध ९ स झाली (वाकेनिशी टिपण) व ज्या अर्थी प्रतापगड किल्ला इ. स. १६५६ त बांधला गेला[1] त्या अर्थी शिवाजी महाराज समर्थांच्या भेटीनंतर प्रतापगडास गेले हें ऐतिहासिकदृष्ट्या खरें नाही. राजवाड्यांनी या घटनेची स्वतंत्र चर्चा चौथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत सविस्तर केली आहे.

तिसऱ्या प्रकरणांत राजारामाचा जन्म शके १५८३ (इ. १६६१) त झाल्याचा उल्लेख आहे; पण जेधे शकावलींत ही मिति शके १५९१ (इ. स. १६६९) सौम्य संवत्सर फाल्गुन शुद्ध १५ अशी दिली आहे.

चौथ्या प्रकरणांतील गारद (गारदी), पायदळ, श्रावणमासीं विदोशियांसि द्रव्य यांचीं वर्षासनें, तोफखाना, बैलाच्या माळा, कवायती (पृ. १८४–१८५) हीं वर्णनें कालनिर्देशप्रमादाचीं होत. हीं चिटणिसांच्या काळाला अधिक लागू पडतात.

पांचव्या प्रकरणांत शाहिस्तेखानाच्या स्वारीचा काल 'भाद्रपद मास, कांही पाऊस होता' (पृ. २१२) असा दिला आहे; परंतु 'शके १५८५ (इ. स. १६६३) शोभन संवत्सरे चैत्र शुद्ध ८ शास्ताखानावरी पुणियांत सिवाजी राजे खासा जाऊन छापा घातला' असें जेधे शकावलि म्हणते. चिटणिसांनी उल्लेखिलेली शाहिस्तेखानाच्या पत्नींची शिवाजीस विनंती व उभयतां खान–पतिपत्नींनी घेतलेली कुराणाची शपथ (पृ. २१३) ही माहिती नवीन आहे; परंतु या घटनांना आधार नाही. शिवाजी पातशहास भेटण्यासाठीं दिल्लीस गेला (पृ. २३१) असें चिटणीस म्हणतात; पण ही भेट आग्र्यास झाल्याचें आपण मागे पाहिलें आहे. दक्षिणेंत येतांना शिवाजीने केलेल्या तीर्थयात्रेच्या वर्णनास (पृ. २४१) ऐतिहासिक आधार नाही. 'सुरक्षित वीस बेवीस महिनियांत' पावले (पृ. २४१), असें चिटणीस लिहितात. परंतु जेधे शकावलीवरून हा काल सुमारें नऊ महिन्यांचा निघतो.

सहाव्या प्रकरणांत शालिवाहन शके १५९५ (इ. स. १६७३) प्रमादी-नाम संवत्सरे, चैत्र बहुल त्रयोदशी भौमवारे ते दिवशीं महाराजांचे आंगीं श्रीभवानी अविर्भाव होऊन भविष्य सांगितल्याचें म्हटलें आहे. (पृ. २८७)

---

१. म. रि. श. शि., पृ. ४७

ही हकीगत प्रस्तुत चरित्रांत व्यंकोजीच्या भेटीनंतर दिली आहे. वस्तुतः शिवाजीची व व्यंकोजीची भेट शके १५९९ मध्ये झाली. (जे. श.).

सातव्या प्रकरणांत शिवाजीच्या मृत्यूनंतर झालेल्या दुश्चिन्हांचें वर्णन आहे (पृ. ३६२). तें अर्थातच अनैतिहासिक होय.

ह्या चरित्रांतील घटना ऐतिहासिक पद्धतीने म्हणजे कालानुक्रमाने दिलेल्या नाहीत. घटनानुक्रमाची चूक चरित्रकाराच्या हातून झालेली असल्यामुळे त्यांची संगति नीट जुळवितां येत नाही. सभासदी बखरीप्रमाणेच प्रस्तुत चरित्रांत अनिश्चित शब्दांनी कालनिर्देश केलेला आढळतो.

आतापर्यंत ह्या चरित्रांतील कांही प्रमुख ऐतिहासिक घटनांचा विचार केला. परंतु विस्तृत अशा ह्या चरित्राच्या मानाने ह्यांतील दोष अल्पच म्हटले पाहिजेत. ह्या चरित्राचें लेखन शिवाजीच्यानंतर सुमारें सव्वाशें वर्षांनी झालें हें ध्यानांत घेतल्यास तें संपूर्णतया निर्दोष झालें नसल्यास त्यांत आश्चर्य नाही. एवढें मात्र खरें की, चरित्रकाराजवळ साधनांची अनुकूलता होती; परंतु साधनसामग्रीचा पद्धतशीरपणें उपयोग करण्याचें संशोधनशास्त्र चरित्रकाराच्या कालांत तयार झालें नसल्यामुळे, चरित्रकाराला त्या बाबतींत जबाबदार धरणें उचित होणार नाही. लेखक केवळ ऐकीव किंवा आख्यायिकास्वरूप माहितीवर विश्वास ठेवून लिहीत नाही, हें लक्षांत घेतलें पाहिजे. परंपरागत दाखले व इतर शास्त्रें यांचा आधार घेतल्याचें तो स्पष्टच म्हणतो. शिवछत्रपतीचें हें चरित्र म्हणजे स्वकपोलकल्पित अशी भाकडकथा नव्हे. प्रस्तुत चरित्र लिहितांना लेखकाने श्रम घेतल्याचें दिसतें. ग्रँट डफने या चरित्राला Voluminous असें म्हटलें आहे. या चरित्रांतील दोष मान्य करूनहि राजवाडे म्हणतात, ' मल्हार रामराव चिटणीसकृत चरित्राचा इतिहासकाराला बराच उपयोग होईल. '[१]

चिटणिसांची भाषा साधी, कारकुनी वळणाची आहे. संस्कृत व फारसी मिश्रित असूनहि ती क्लिष्ट नाही हें विशेष. काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात, ' त्यांची भाषानदी सरळ, संथ अशी वाहते. (चरित्र–प्रस्तावरूप निवेदन) मुख्य कथानकाचा ओघ अखंडपणें कायम ठेवून तें गतिमान करण्यांत चरित्रकाराचें अप्रतिम कौशल्य दिसून येतें. प्रसंगानुरूप भाषा हें चिटणिसांचें

१. ऐ. प्र., पृ. २१९

वैशिष्ट्य होय. यथार्थ अर्थव्यक्तीसाठी त्यांनी कांही ठिकाणीं नवीन शब्दयोजना केली आहे. उदा. पांच हजार माणूस खानाचे रणास आणिलें (पृ. १३९); पृथ्वीच्या ठायीं रस–धान्य–उत्पत्ति बहूत. कालाचे कालास वृष्टी होणें, कोणतेंही ईतिभय नाही. (पृ. १९३); त्याजवरून त्याणीं सर्व वृत्त, यांची चाल, महाराजांस लिहिली (पृ. २७५); कर्नाटक प्रांतींचीं चंदीचीं वगैरे स्थळांचीं राजकारणें घेऊन आले, तींहि यथावकाशें श्रवणारूढ केलीं. महाराजास राज्यसाधनाविषयी प्रेमाचा हव्यास (पृ. २७९) या वाक्यांतील शब्दयोजना जितकी नावीन्यपूर्ण आहे तितकीच ती अर्थपूर्ण आहे. क्वचित् 'फौज, सेना, कोश, खजीना (पृ. १९१) यासारखी द्विरुक्ति आढळली, तरी तीमुळे अर्थहानि मुळीच झालेली नाही.

चरित्रकाराची वर्णनपद्धति अद्वितीय आहे. वर्ण्य प्रसंग आपल्या नजरेसमोर घडत आहे, असें वाटावयास लावणारा चित्रगुण त्याच्या लेखनांत आहे. प्रस्तुत चरित्रांत वर्णनीय असा रम्य प्रसंग म्हणजे शिवाजी व अफजल यांची भेट हा होय. चरित्रकार या प्रसंगाचें वर्णन डौलदार भाषेंत पुढीलप्रमाणे करतात :

'चार नजरा होतांच खानांनी वकिलास पुसिलें 'राजे हेच की काय?' कृष्णाजीपंतांनी 'हेच' ऐसे बोललियावरि महाराजांनीहि पंताजीपंतास विचारिलें, 'खान हेच की काय?' त्यांनी 'हेच' म्हणून उभयतांनी उभयतां एकमेकास खरें करून भेटीस पुढे होताच, खान शरिरें करून मोठे उंच दराज होते. महाराज केवळ द्वितीयेचे चंद्रासारखे.' [१]

सप्तम प्रकरणांतील राज्याभिषेकाचें वर्णनहि असेंच हृदयंगम आहे. हें विस्तृत असून काव्यमय आहे. वर्णनाचा बारकावा व कल्पकशक्ति हीं या वर्णनांत दिसून येतात. हें वर्णन म्हणजे काव्यात्मवर्णनाचा आदर्श वस्तुपाठच होय.

चरित्रकाराची भूमिका स्वकीयाचा गौरव व परकीयांचा तिरस्कार करण्याची असल्यामुळे, तिचा त्याच्या निवेदनांत आविष्कार झाला आहे. उदा. खानांनीच अगोदर दगा व पुरुषार्थ केला, फार चांगलें जालें, म्हणून हातांत वाघनखें होतीं त्या हातांनी बहुत जलदी करून पाठीमागून हात पोटावरि चालविला (पृ. १३३); औरंगजेब केवळ दैत्य होय!' (पृ. २२९); या प्रकारेंकरून महाराज पुण्यश्लोक योगियांसही जे गती

१. स. च. (१९२४), पृ. १३३

असाध्य ते चतुर्विध पुरुषार्थ (सुद्धा) साधून मोक्षाचे अधिकारी जाले (पृ. ३६२). प्रस्तुत चरित्रांतील देवीच्या संचाराच्या उल्लेखांत लेखकाचें श्रद्धायुक्त अंतःकरण दिसतें. 'हे कथा श्रवण, मनन, पठण केली असतां सर्व विघ्नें दूर होऊन पुण्य व यश प्राप्त होईल. आणि सर्वगुणसंपन्नता प्राप्त होऊन, सकल ऐश्वर्यलक्ष्मी तत्काळ प्राप्त होईल (पृ. ३६३) ही फलश्रुति बखरकाराच्या राजनिष्ठेची निदर्शक होय. वर्ण्य विषयाशीं तादात्म्य हा वाङ्मयीन गुण प्रस्तुत चरित्रांत आढळतो. यामुळेच चरित्रकाराचें एकंदर लेखन भावनात्मक होऊन जिवंत झालें आहे.

उपमा–दृष्टान्तादि अलंकारांची योजना बखरकाराने चातुर्याने केलेली आढळते. उदा. 'यवन, दीपावर पतंग तसे, क्षयास जातील' (पृ. ९१). अफजलवध झाल्यावर चिटणीस म्हणतात, 'ते समयीं जसा शिशुपाल सभेमध्ये सहज लीलेकरून श्रीकृष्णजीने मारिला त्याप्रकारें या सभेस शोभा येती जाली' (पृ. १३४).

माहीतगार माणसाने आदराने व कौशल्याने लिहिलेलें हें चरित्र ऐतिहासिकदृष्ट्या जसें महत्त्वाचें आहे तद्वतच आकर्षक वर्णनें, भाषेचें विशिष्ट वळण, रचनेची टाकठिकी इत्यादि गुणांमुळे वाङ्मयदृष्ट्याहि महत्त्वाचें आहे. त्यांच्या भाषेची संस्कृतता व सौंदर्य हीं पाहिलीं म्हणजे धाकट्या चिपळूणकरांच्या प्रौढ व उद्दाम लेखनाची आठवण होते असें श्री. भालचंद्र यांचें मत आहे.[1] सामान्य कारकुनी पेशाच्या माणसाने लिहिलेलें हें चरित्र पाहिलें म्हणजे त्याच्या लेखनकौशल्याची चांगली कल्पना येते. शिवछत्रपतीचें इतकें विस्तृत, पद्धतशीर, हृदयंगम चरित्र अन्यत्र नाही. चिटणिसांनी शिवाजीसारख्या ध्येयदर्शी व्यक्तीचें चरित्र लिहून इतिहासाची आवड निर्माण केली ही त्यांची थोर कामगिरी होय.

श्रीमंत छत्रपति संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचीं चरित्रें :

सप्तप्रकरणात्मक चरित्राप्रमाणेच हीं चरित्रें चिटणिसांनी श्रीमंत छत्रपति धाकटे शाहू महाराज ऊर्फ आबासाहेब सातारकर यांच्या आज्ञेने लिहिलीं आहेत. शिवाजीच्या चरित्रापेक्षा हीं चरित्रें लहान आहेत.

१. मनोरंजन, एप्रिल १९११

संभाजी राजे यांच्या चरित्रांत ' सुरेराव काकडे यांस कोणी समजाविल्यावरून मारिलें ' असा उल्लेख आहे;[1] पण सूर्यराव काकडे यापूर्वीच इ. स. १६७४ मध्ये साल्हेरच्या लढाईत पडला होता असें रियासतकार म्हणतात.[2] सभासदाच्या बखरींतहि तसेंच म्हटलें आहे (पृ. ७४). संभाजीचा बादशहाच्या हुकुमाने शिरच्छेद केला असें चिटणीस लिहितात; (पृ. ३५); परंतु रियासतींत असें म्हटलें आहे की, बादशहाने संभाजीचे डोळे काढविले व एक एक अवयव तलवारीने तोडून आणि त्याचें मांस कुत्र्यास देऊन शेवटीं त्याचा शिरच्छेद करण्यांत आला.[3] शेडगांवकर बखरींतहि (पृ. १०८) व मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत (पृ. ६३) संभाजीचे डोळे काढविल्याची हकीगत आहे. संभाजीस तुळापुरीं मारल्याचें चिटणीस सांगतात (पृ. ३५). म. सा. छोट्या बखरींत संभाजीची व बादशहाची दिल्लीस गांठ पडली अशी जी माहिती दिली आहे (पृ ६३); ती अर्थातच बरोबर नाही. रियासतकारांच्या मतें वढू (कोरेगांव) येथे संभाजीस मारलें व बादशहाने संभाजीचें फेकलेलें शीर मराठ्यांनी तुळापुरास आणून भीमा इंद्रायणीच्या संगमावर अग्निसात् केलें. या वेळीं बादशहाची छावणी कोरेगावापासून तुळापुरापर्यंत पडलेली होती.[4]

राजारामाच्या चरित्रांत रघुनाथराव तिमाजी यांस अमात्यपद सांगितल्याचें बखरकार म्हणतात (पृ. ६८); पण तें पद तिमाजी रघुनाथ (हणमंते) यास दिल्याचा उल्लेख रियासतींत आहे.[5] चिटणिसांचा हा हस्तदोष दिसतो. ह्या चरित्रांत निराजी रावजी यास न्यायाधीशपद दिलें असें म्हटलें आहे. (पृ. ६९); पण रियासतकार तें पद बाळाजी सोनदेव यास दिल्याचा संशयात्मक उल्लेख करतात व म्हणतात की, ता. २९-९-१६९९ रोजीं कोन्हेर जगन्नाथ हा इसम न्यायाधिशीवर होता.[6] राजारामाच्या मृत्यूनंतरच्या घटनेंत संताजी घोरपडे ममलकतमदार यांस रवाना

---

१. सं. आणि थो. रा चरित्रें. (१८८२), पृ. १७
२. म. रि. श. शि., पृ. १४५
३. म. रि. उ. सं., पृ. ९९
४. सदर
५. म. रि. स्थि. रा., पृ. ४२
६. सदर, पृ. ४३

केल्याचें चिटणीस म्हणतात; पण संताजीचा मृत्यु इ. स. १६९७ मध्ये म्हणजे राजारामाच्या मृत्यूच्या तीन वर्षें अगोदर झाल्याचें रियासत सांगते.[१] चिटणिसांचा हा कालविपर्यास होय.

उपरिनिर्दिष्ट कांही ऐतिहासिक दोष मान्य करूनहि माहीतगार माणसाने लिहिलेलीं हीं चरित्रें बहुतांशीं विश्वसनीय मानणें योग्य आहे.

वाङ्मयदृष्ट्या यांतील चिटणिसांचीं वर्णनें शिवाजीच्या चरित्राप्रमाणेच रसाळ आहेत. संभाजीच्या वधाची हृदयद्रावक हकीगत, तसेंच राजारामाचा जिंजीचा खडतर प्रवास व त्यानंतर मराठ्यांनी परकीयांशीं दिलेला तेजस्वी सामना या प्रसंगांचीं वर्णनें अत्यंत तन्मयतेने केल्यामुळे तीं उठावदार झालीं आहेत. संभाजीचें वर्णन चिटणीस करतात—' एक कब्जीचें सांगणें मात्र प्रमाण, त्या नादें महाराज चालणार. त्यासच अनुमोदन देणें. मग विचार काय राहिला? तजकरे घ्यावे, घरें बुडवावीं, नागवावें ' (पृ. २६); राजारामाचें वर्णन यांत पुढीलप्रमाणे आहे: ' राजाराम नांव! तसेंच महाराज गंभीर व चतुर, शूर, धैर्यवान् सर्वांस वेध लाऊन मसलत मंत्र करणें याविषयी परम विचक्षण, ऐसें सर्वांस भारून सर्व लोक महाराजांस वश जाले (पृ. ४३). यावरून संभाजी व राजाराम यांच्या स्वभावविशेषांची सुस्पष्ट कल्पना येते. सप्तप्रकरणात्मक चरित्राप्रमाणे यांतहि चित्रगुण आढळतो.

या चरित्रांतील चिटणिसांची भाषा ओजस्वी आहे. उदा. औरंगजेबाच्या तोंडीं पुढील वाक्यें आहेत—' मराठी फौज ही बळावत आहे. अकस्मात् यावें, बक मच्छ उचलून नेतो तसा घाला घालावा, शिपाईगिरीची शर्त करावी, प्रसंग पडल्यास माघारें पळून जावें. खाण्यापिण्याचा दरकार बाळगीत नाहीत. पाऊस, ऊन, थंडी, अंधारी कांही न पहातां घोड्यावरच हरभरे व भाकरी, चटणी, कांदे खाऊन धावतात. त्यास कसें जिंकावें? एक्या मुलकांत फौज आली म्हणोन त्यांजवर (फौजेची) रवानगी करावी, तों दुसरेकडे जाऊन ठाणीं घेतात, मुलुख मारितात. हे आदमी नव्हत, भूतखाना आहे!' (रा. च. पृ. ७९–८०); ' अरेतुरेच्या लढाया पांच वेळा उभे राहून दिल्या ' (सदर पृ. ४८). बादशहाच्या तावडींत सापडलेल्या संभाजीच्या तोंडीं पुढील बाणेदार उद्गार आहेत. ' बाटा म्हणतां तरि हे गोष्ट

१. सदर, पृ. ८३

घडावयाची नाही. ज्या अर्थी कैदेंत आलों, तेव्हा वाचणें तें काय? तुमचे विचारास येईल तें करावें. तथापि तुमची बेटी द्यावी म्हणजे वाटतों. (सं. च., पृ. ३५). उत्कृष्ट भाषाशैलीचे हे नमुने आहेत.

सप्तप्रकरणात्मक चरित्राप्रमाणे हीं चरित्रें ऐतिहासिकदृष्ट्या जशीं महत्त्वाचीं आहेत, तशींच चित्तवेधक वर्णनें, उत्कृष्ट स्वभावरेखन, डौलदार भाषाशैली, प्रमाणबद्ध रचना इत्यादि गुणांमुळे वाङ्मयदृष्ट्याहि तीं उच्च दर्जाचीं आहेत. चिटणिसांच्या बखरी हें मराठी भाषेचें लेणें होय.

श्रीशिवदिग्विजय :

शिवाजीचें हें विस्तृत असें चरित्र आहे. या चरित्रांत चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्राप्रमाणे पूर्वार्धांत युधिष्ठिरापासून पिठोर राजापर्यंत व पुढे शहाबुद्दीनपासून मोगल पादशहापर्यंत वंशावळी दिल्या आहेत. त्यानंतर मेवाडच्या राजघराण्यापैकी काकाजी भोसले हा भोसले घराण्याचा मूळ पुरुष दक्षिणेंत आल्याची हकीगत असून, पुढे शहाजी व शिवाजी यांच्यासंबंधी मजकूर आढळतो. यांत प्रामुख्याने शिवाजीचेंच चरित्र आहे.

या चरित्रांतील वंशावळी विष्णुपुराण रजपुतांच्या राजावली व यवनांच्या तवारिखा यांतून घेतल्या असून, मुळांतच त्या शुद्ध नसल्यामुळे त्या सप्तप्रकरणात्मक चरित्राप्रमाणे कृत्रिम असल्याचें राजवाड्यांनी सिद्ध केलें आहे.[1] यातील शालिवाहन व विक्रम यांच्यासंबंधीची माहिती[2] ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीय मानतां येणार नाही. शालिवाहन शके ५१२ (इ. स. ५९०) मध्ये शहाबुद्दीन घोरी याने पिठोर राजाचा पराभव करून तो दिल्लीपति झाला (पृ. १८), हा इतिहास सप्तप्रकरणात्मक चरित्राप्रमाणे बरोबर नाही. याची चर्चा मागे झाली आहे. 'व्यंकोजी राजे जाले शके १५५३ (इ. स. १६३१) कालयुक्ताक्षी नाम संवत्सरीं' (पृ. ६४) असें बखरकार लिहितो; पण येथे प्रजापति संवत्सर पाहिजे.[3] शिवाजीने शिर्क्यांच्या कन्येशीं शके १५६२ (इ. स. १६४०) त लग्न केल्याचा उल्लेख या बखरींत आहे (पृ. ९९). परंतु ती निंबाळकराकडील होती; हें

---

१. ऐ. प्र., पृ. २३३

२. श्रीशिवदिग्विजय (१८९५), पृ. ३

३. शिवचरित्रप्रदीप (श. १८४७), पृ. २००

आपण मागे पाहिलें आहे. दादोजीचा मृत्यु शके १५६२ (इ. स. १६४०) विक्रमनाम संवत्सरीं झाल्याचें बखर म्हणते (पृ. ११९). या वर्षी विक्रम संवत्सर नाही. शिवाय शके १५६८ (इ. स. १६४६) मधील दादोजीचा एक महजर आहे. त्यावरून बखरकार चुकीचा असल्याचें राजवाडे म्हणतात.[1] प्रस्तुत चरित्रांत मोऱ्यांचा वध शके १५६४ (इ. स. १६४२)त झाल्याचें म्हटलें आहे (पृ. १३२); पण रियासत तो इ. स. १६५६त झाल्याचें सांगते.[2] शके १५७० (इ. स. १६४८) त राजापूर घेतल्याचा यांत उल्लेख आहे (पृ. १५६); परंतु जेधे शकावलि हा काल शके १५८२ (इ. स. १६६०) असा देते. बखरकार अबदुलखान असें म्हणतो (पृ. १५६). पोवाड्यांतहि अबदुल्ल्या हें नांव येतें. एका हुकुमनाम्यावरून खरें नांव अफजलखान असल्याचें राजवाडे म्हणतात.[3]

शास्ताखानाच्या स्वारीचा काल या चरित्रांत शके १५७८ (१६५६) मन्मथनाम संवत्सरी असा दिला आहे (पृ. २१८). जेधे शकावलींत शके १५८५ (इ. स. १६६३) शोभन संवत्सरे चैत्र शु. ८ असें असल्याचें आपण पूर्वी पाहिलें आहे. 'चंदी महाराजांनी शके १५९५ (इ. स. १६७३) प्रमाथी–नाम संवत्सरीं घेतल्याचे बखर म्हणते (पृ. ३०६); पण जेधे शकावलि या कालाचा उल्लेख शके १५९९ (इ. स. १६७७) प्रमादी संवत्सर असा करते. शिवाजीने व्यंकोजीस शके १५९५ (इ. स. १६७३) त पाठविलेल्या पत्राचा काळ हा 'तेरा वर्षें तुम्ही दौलत वहिवाटली' (पृ. ३१५) या संदर्भात बरोबर नाही. कारण पत्राचें सा[illegible]ा. शके १५९९ (इ. स. १६७७) पाहिजे असें इतिहाससंशोधक [illegible] उत्तम[illegible]चा जोशी म्हणतात.[4] रियासतकारांचेंहि हें मत आहे. या बखरींत [illegible]ची उल्लेख व मेवाडच्या घराण्याचा संबंध बाळाजी आवजीने दाखवि[illegible]ल्याचा मेवाडच्या येतो (पृ. ४११). राजवाड्यांनी शिवाजीचा म्हणजे भो[illegible]

१. ऐ. प्र., पृ. २६८
२. म. रि. श. शि., पृ. ४७
३. ऐ. प्र., पृ. २७७
४. शि. प्र., पृ. २०६

शिसोद्याशीं कांही संबंध नाही असें साधार दाखविलें आहे.[1] शिवाजीने संभाजीस शके १५९९ (इ. स. १६७७) मध्ये करवीर प्रांताचा कारभार सोपविला असें बखरकार लिहितो (पृ. ४४५). श्री. शं. ना. जोशी यांच्या मतें हा शक १६०१ (इ. स. १६७९) असा येतो.[2]

प्रस्तुत बखरींतील मजकूर पूर्वीच्या एखाद्या जुन्या बखरींतून घेतला असावा, हें राजवाड्यांचें मत मान्य केल्यास यांतील दोषांची जबाबदारी मूळ बखरकारापेक्षा नकलकारावरच अधिक येऊन पडते. आपण बारनिशी, दाखले, पत्रें व जुने ग्रंथ यांच्या आधाराने लिहीत असल्याचें बखरकार म्हणतो (पृ. १४८, १८८ व ३८१). यावरून बखरकाराची ऐतिहासिक दृष्टि दिसून येते.

उत्कृष्ट वर्णनें हा या चरित्राचा वाङ्मयगुण सांगतां येईल. उदाहरणार्थ, चंद्रराव मोरे यांचें वर्णन करतांना बखरकार लिहितो, ‘जावळी येथे चंद्रराव मोरे विजापुरकरांचे चाकर, जहागीर, महाल, मुलूख खेरीज नेमणूक खाऊन, पुंडपणा करून पंचवीस तीस हजार मावळा ठेवून, जेथपर्यंत हात पोहोंचेल तेथपर्यंत प्रांत मारून खावा; पादशहास करभार सालीना देत जावा; अशा रीतीने होते’ (पृ. १२८). हें मोऱ्यांचें वर्णन उत्कृष्ट आहे.

वस्तुवर्णनाच्या दृष्टीने अफजलखानाच्या भेटीच्या वेळीं त्याच्या मार्गाचें वर्णन पुढीलप्रमाणे आढळतें—‘त्या रस्त्यांनी वापी, कूप, तलाव, उद्यानें, सघनवृक्ष, निबिड छाया, परम सुशीतल, अतिसुंदर, मनेप्सित पदार्थ, [illegible]स्तुमात्र. जागजागीं योजिले’ (पृ. १६४). या वर्णनांत लेखकाची हि[illegible]ष्टि दिसते. बाजी प्रभु देशपांडे यांचें वर्णन ‘जातीने बहुत मर्द, मोठे केलेलें आ[illegible] [illegible]ार, कटाक्ष, सर्व गुणें युक्त’ (पृ. १८२) असें यथार्थ

प्रसंगवर्णना[illegible]

आहे. बखरकार म्हण[illegible]गीने शिवाजी–अफजलखानाच्या भेटीचें निवेदन उत्कृष्ट

‘महाराजांची सुरत उंच[illegible]

हातें खानानी मल्लयुद्धाचा पे[illegible]सडपातळ होती. त्यास भेटीस हात घातला. त्या [illegible] धरून, बगलेंत दाबून कट्यार चालविली.

१. ऐ. प्र., पृ. २३१–२३२
२. शि. प्र., पृ. २०६

महाराज पराक्रमी, धैर्यवंत, अंगांत बख्तर होतें, त्यांत अंग चोरून कट्यार लागू पडूं दिली नाही. हत्यार कारेगार न जालें हें कळोन दुसरा पेच लावावा, तों महाराजांनी चपळता करून, डावा हात पाठीकडून घालून, डावे कुशीवरी नखाचा हात मारिला. त्यायोगें पोटला बाहेर तत्काल निघाला. तो खानानी दडपून धरून, दुसरा हात चालविला. त्याचे पूर्वीच उजवे हातांतील पट्याचे हाताने, वार पायांचे लवणीस लावितांच, महाराज त्याचे हातांतून सुटले व खानानीहि ढकललें. तेणेकरून वार खानाचा निर्फळ जाला. ‘ शिवाजीने मारा ’ ऐसा शब्द गर्जून, मोठ्या घोषें केला. नंतर कोथळा सावरून, समशेर काढून, महाराजांचे डोईवर वार चालविला. तो जिरें डोईस व पागोटें थोर होतें, त्यामुळे तोहि हात कारेगार जाला नाही. गव्हाइतकी माथां जखम लागली. तिची उपमा काय ? स्मश्रू करवितां किंचित् शस्त्र लागतें तद्वत् ती जखम लागली. महाराजांनी पट्याचा हात चालविला, तों उवजे बाहुट्यावरून उरापर्यंत शरीर दोन भाग केले. ’[१]

सारांश, लेखकाचीं वर्णनें इतकीं चांगलीं आहेत की, त्यांतील वर्ण्य व्यक्ति, वर्ण्य वस्तु व वर्ण्य प्रसंग हीं प्रत्यक्ष दिसूं लागल्याचा भास निर्माण होतो.

बखरकाराच्या लेखनांत त्याचा आविष्कार स्पष्टपणें दिसून येतो. उदा. शहाजी अमृतोपम (पृ. ४५); यास्तव महाराज अवतारी. त्यांजला दुष्ट जो शत्रु आणि शिष्ट तोच बंधु (पृ. ७४); सर्वांमुखीं महाराज कीर्तिवंत (पृ. १६४); महाराज यशस्वी; जेथे जावे तेथे विजय व्हावा (पृ. ३५१); या उदाहरणांत चरित्रकाराची भूमिका प्रतिबिंबित झालेली दिसते.

सुंदर उपमादि अलंकार हा या बखरीचा विशेष होय. उदा. उत्तम जनाचा क्रोध व लोभ क्षणैक प्रीति अखंड दंडायमान पाषाणरेषेपरि व मध्यम जनाचें वैर जें तें सिकता म्हणजे वाळूवरील रेषा, तद्वत् लोभहि समान ठेवितात (पृ. ६३); जेथे मनुष्य तेथे द्रव्य, द्रव्य तेथे लक्ष्मी, लक्ष्मी तेथे परमानंद (पृ. १२०); सावित्रीबाई—दुसरी अपर्णाच की काय ? (पृ. ३४८). या अलंकारामुळे बखरीचें सौंदर्य निःसंशय वाढलें आहे.

या चरित्राची भाषा प्रौढ व संस्कृत वळणाची दिसते. चरित्रकाराने प्रसंगानुरोधाने मधूनमधून संस्कृत श्लोक घातले आहेत. त्यामुळे प्रस्तुत

१. शि. दि., पृ. १६९

चरित्राला भारदस्तपणा आला आहे. यांत लहानलहान वाक्यांतून अर्थव्यक्ति परिणामकारक झालेली आढळते. उदा. ‘ शिवाजीनीच आईचें दूध सेविलें, वरकडांनी काय भक्षिलें ? (पृ. ३१३); मराठ्यांची लढाई बाकी, किरकोळ मनुष्य दिसोन नजरेस येत नाही; परंतु कजाखी मोठी करणार (पृ.३३९); चहूकडून ‘ घे घे मार ’ केला. (पृ. ३४९) इ.

चरित्रकाराची एक स्वतंत्र पण मोहक शैली आहे. त्याचा बहुश्रुतपणा, वर्ण्य विषयाशीं तादात्म्य, लेखनाचा प्रामाणिकपणा, भाषाप्रभुत्व इत्यादि गुणविशेषांमुळे या बखरीचा वाङ्मयीन दर्जा उंचावला आहे.

श्रीशिवाजीप्रताप :

या बखरींत पिठोर राजा म्हणजे पृथुपाल राजा हस्तिनापुर दिल्ली याच्यापासून शिवाजीच्या मृत्यूपर्यंत हकीगत दिली आहे. मात्र शिवाजीच्या पूर्वजांची—विशेषतः मालोजी, शहाजी व जाधवराव याच्यासंबंधीची—माहिती सविस्तर आढळते.

इतर बखरींत सहसा न येणारी चतुर साबाजीची हकीगत हें या बखरीचें वैशिष्टय होय. चतुर साबाजीचा मृत्यु झाला असें एकदां सांगून पुढे लगेच त्याच्यासंबंधीचा मजकूर सांगितला आहे.[1] बखरकार अफजलखानाचा उल्लेख अबदुलखान असा करतो (पृ. ७८). तें अर्थातच चूक आहे. या बखरींतला श्री प्रसन्न झाल्याचा उल्लेख (पृ. ८३) ऐतिहासिक दृष्टया प्रमाण मानतां येणार नाही. बखरींत शास्ताखान हा विजापूरचा सरदार असल्याचें लेखक म्हणतो (पृ. ९०); पण तो मोगलाचा म्हणजे औरंगजेबाचा सरदार होता हें प्रसिद्ध आहे. बखरकाराने शिवाजीची प्रथम स्त्री सईबाई, दुसरी पुतळाबाई, तिसरी सईबाई अशीं नांवें दिलीं आहेत. रियासतकारांच्या मतें १. सईबाई, २. सगुणाबाई, ३. सोयराबाई, ४. पुतळाबाई अशीं नांवें होतीं.[2] बखरकाराने शिवाजी–शहाजीच्या युद्धाचा प्रसंग दिला असून नंतर उभयतांची भेट घडवून शिवाजीच्या तोंडीं ‘ ही तरवार घेऊन माझा वध करावा व आपण जावें......आपण वडील, आज्ञा करतील तशी वर्तणूक, यवनास मुजरा करण्याशिवाय, सांगतील तें मान्य आहे ’ असें वाक्य घातलें

१. श्रीशिवाजीप्रताप (१८९५), पृ. ४४

२. म. रि. श. शि., पृ. २०९

आहे (पृ. १२२). ही हकीगत नवीन दिसते. जंजिऱ्याचे प्राप्तीसाठी शिवाजीने केलेलें उपोषण व समुद्राने ब्राह्मणवेषाने स्वप्नांत येऊन दिलेला साक्षात्कार (पृ. १२४) हे प्रसंग ऐतिहासिकदृष्ट्या सत्य मानतां येणार नाहीत.

ही बखर तपशीलवार असल्यामुळे बखरकाराने साधनें मिळवून लिहिली असावी. प्रकाशक म्हणतातः—शिवाजी महाराजांची बाल्यदशा विस्ताराने वर्णिलेली आहे. तसेंच मलिकांबर, जाधवराव व मुरार जगदेवराव याविषयी बरीच माहिती असून दौलताबादकरांचा व विजापुरकरांचा संबंध कसा होता वगैरे गोष्टी यांत स्पष्टतर आहेत. इतर बारीकसारीक माहिती ही हींत अशी आहे की, त्यामुळे श्रीछत्रपतींच्या इतिहासांतील बऱ्याच खाचाखोचा भरून जाऊन, कोणी ह्या महापुरुषाचें चरित्र लिहावयास बसेल, तर सुकर व सुगम होणार आहे (बखरीविषयी दोन शब्द). राजवाडे म्हणतात—' तिची किंमत उपयोगाच्या दृष्टीने फारच थोडी आहे. ....दुसऱ्या बखरींत किंवा कैफियतींत ह्या बखरींतल्यापेक्षाहि ज्यास्त माहिती मिळण्यासारखी आहे. तरी शिवाजीसंबंधी कोणतेंहि चिठोरें विचारार्ह असणारच ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन, ह्या बखरीचा आदर केला पाहिजे '[1] हें विधान मान्य करण्यास प्रत्यवाय नाही.

बखरकाराची वर्णनशैली अप्रतिम आहे. उदा. शिवाजीचें वर्णन तो करतो—' महाराज काबल, मसलतीने व शूरत्वांनी व द्रव्यांनी सर्व गोष्टींनी हुशार (पृ. १००); अफजलखानाचें वर्णन ' खान जुनाट थोर पुरुष, आंगानीही शरीर मातबर' (पृ. ८६). असें समर्पक शब्दांत केलेलें आढळतें. हीं व्यक्तिवर्णनें सुंदर असून बखरकाराच्या कल्पना त्यांत उत्कृष्टपणें व्यक्त झालेल्या आहेत.

वस्तुवर्णनाच्या दृष्टीने पुढील वर्णन उल्लेखनीय आहे—' राजांचे स्वारीपुढे शिवाजी महाराजांची स्वारी, चिमणीं घोडीं, चिमणी पालखी, चिमणेच भोई, चिमणे चोपदार, चिमणे स्वार, कारकून, शिबंदी, चिमणी चिमणीच (पृ. ६२). पेशवाईतील मध्वमुनीश्वर या कवीच्या पदांतहि चिमणा हा शब्द असाच परिणामकारक रीतीने वापरलेला आढळतो.

---

१. ऐ. प्र., पृ. २१८

चरित्रकाराचें निसर्गवर्णन त्याच्या काव्यदृष्टीचें निदर्शक आहे. शास्ताखानाच्या स्वारीच्या वेळचें वर्णन करतांना बखरकार लिहितो--' अरुणोदय वासरमणीपूर्वी जाला, तो नववधू मुखप्रक्षालण करून, भालीं कुंकुमरेषा लाविते, तद्वत् प्रभा तेजःपुंज होऊन, सर्व जीवांची तिमिरांधता दूर जाली. सूर्यप्रभा पडली, लोकदृष्टि उघडली.' (पृ. ९९); इतर बखरींत अशीं निसर्गवर्णनें क्वचितच दिसतात.

शिवाजी–अफजल भेटीच्या प्रसंगाचें वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे डौलदार भाषेंत केलें आहे:—

'ऐन समालिंगनीं उभयतांनी कवी घातल्या. खान जुनाट थोर पुरुष, आंगांनीही शरीर मातबर; महाराज खानाचे खांद्याखाली उंचीस होते. खानानी महाराजास पाहून, लहान बांधा, विशाद काय मनांत आणोन, हातांत पेशस्कब्ज होता, तो चालविला. महाराजांस आवळून धरिलें, मिठी पूर्वी वृकोदर बकासुर दैत्याची पडली तसी या उभयतांची मिठी पडली. महाराज मोठे धैर्यवान्, एवढा थोरला बळकट जबरदस्त; परंतु उजव्या हातांत वाघनखें घातलीं होतीं, तो पंजा पाठीकडून कुशींत चालवून, पोटला बाहेर काढतात, तों लोकांचे ध्यानांत भेटी होती.'[1]

लेखकाचीं उपरिनिर्दिष्ट वर्णनें अत्यंत बहारीचीं असल्यामुळे तीं चित्तवेधक झालीं आहेत.

या चरित्रांत बखरकाराने अलंकारांचा मार्मिक उपयोग केलेला दिसतो. उदा. 'वाघाचे गळयांत शेळी बांधावी तसा पर्याय केलासा दिसतो,' (पृ. ५४). 'जसा गूळ एके ठायीं असला, म्हणजे मुंग्यास व माशांस निमंत्रण न करतां धाऊन, उड्या घालितात, याप्रमाणे लोकांनी जाऊन, तमाम चीजवस्तु लुटून, सरकारांत दाखल केली' (पृ. ८७). 'ते समईचें स्वरूप ज्याणी पाहिलें, त्यास असा भास पडला की, वीरभद्रच दुसरा उत्पन्न जाला की काय?' (पृ. ९६), 'रेणुकेचा अवतार साक्षात् आदिमाता बाईसाहेब होती' (पृ. ११८). इ.

या चरित्राची भाषा संस्कृतनिष्ठ असल्यामुळे कित्येक ठिकाणीं ती कृत्रिम झालेली दिसते. उदा. 'पुत्रोत्पादनादि कथा वर्ततील त्या श्रवण अत्यादरें

१. शि. प्र., पृ. ८६

सुमतीने कराव्या ' (पृ. १०४); हजरतीचे चरणारविंदीं निष्ठ (पृ. १०५). भाषेच्या प्रौढपणामुळे हें चरित्र भारदस्त झालें आहे यांत शंका नाही.

बखरकाराची शैली वैशिष्ट्यपूर्ण असून परिणामकारक आहे. डौलदार भाषा, कौशल्यपूर्ण निवेदन व भावनोत्कटता हे ह्या बखरीचे वाङ्मयीन विशेष होत.

शेडगांवकर बखर :

छत्रपति भोसले घराण्याची ही समग्र हकीगत होय. ह्यांत भोसल्यांचे पूर्वज सजणसिंहजी राणा शिसोदे वंश यांच्यापासून सातारकर छत्रपति प्रतापसिंह यांच्यापर्यंत घडलेल्या घटनांचा इतिहास आहे. ह्या बखरींत शिवाजीचा मजकूर विस्तृत असा आढळतो.

कालनिर्देश म्हणजे शकसंवत्सरादि कालाचा उल्लेख हा ह्या बखरीचा विशेष होय. बखरकार म्हणतो की, दादाजी कोंडदेव शके १५७० (इ. स. १६४८) त बेंगरुळास शहाजीकडे गेला व तेथून परत आल्यावर 'पुढे काही दिवसानी दादो कोंडदेव यास देवआज्ञा जाहली.'[1] परंतु दादोजीचा मृत्युकाल शक १५६९ (१६४७) हा येतो.[2] शके १५७०–७४ (इ. स. १६४८–५२) मध्ये 'मुसलदेव म्हणोन डोंगर होता त्यास वसवीला राजगड नांव सिवाजी राजे यानी ठेवले' असा बखरींत उल्लेख आहे (पृ. १९); पुढे मुसलदेव डोंगरावर बांधकाम करून अफजलखानाच्या वधानंतर आणि प्रथम कोंडाणा घेण्यापूर्वी रायगड केला असें आढळतें (पृ. ३५). म्हणजे ही घटना शके १५८१ (इ. स. १६५९) नंतर व शके १५६९ (इ. स. १६४७) पूर्वी घडल्याचें सांगितलें आहे. पुढे सुरत लुटून कारंजें घेतलें व नंतर रायरी घेतली व राज्याभिषेकाच्या वेळीं रायरी सोन्याची पायरी हें नांव बदलून रायगड असें सरें नांव ठेवल्याचें लेखक म्हणतो (पृ. ७४, ८१). यांतील विसंगति स्पष्टच दिसते.[3] मुसलदेवाचा डोंगर हें नांव बरोबर नसून मुरुमदेवाचा डोंगर हें खरें नांव होय. जेधे शकावलीप्रमाणे शके १५७८ (इ. स.

१. श्रीमंत महाराज भोसले यांची बखर (१९१७), पृ. १८
२. शि. प्र., पृ. २०१
३. सदर,, पृ. २०२-३

१६५६)त रायरी घेऊन पुढे तिचाच रायगड केला. शके १५७४ (इ.स. १६५२)त रणदुल्लाखान रहिमतपूरकर शिवाजीवर चालून आल्याचें लेखक लिहितो (पृ. १९); रणदुल्लाखान तर शके १५६५ (इ. स. १६४३) मध्ये मरण पावला होता.[1]

सईबाई मोहिते यांची कन्या व शिवाजी यांचा रायगडास शके १५७५ (इ. स. १६५३)त विवाह झाल्याचें बखरकार म्हणतो (पृ. २०). रियासतकारांच्या मतें सईबाई निंबाळकरांची कन्या असून पुण्यास तिचें लग्न इ. स. १६४० त झालें.[2] शिवाय रायगड या वेळीं शिवाजीच्या ताब्यांत नव्हता.[3] मोऱ्यांच्या वधाचा काल ही बखर शके १५७५ (इ. स. १६५३) असा देते (पृ. २१). रियासतकार हा काल इ. स. १६५६ असा देतात.[4] अफजलखान पठाण वजीर असा उल्लेख बखरींत आहे (पृ. २४). अफजलखान वजीरी करण्यास विजापुरीं सतत कधीच नव्हता असें राजवाडे म्हणतात.[5] ९२ कलमी बखरींतहि अफजलखान वजीर असल्याचें म्हटलें आहे (पृ. २९). तें अर्थातच बरोबर नाही. या चरित्रांत शके १५८० (इ. स. १६५८) विकारी संवत्सरांत सातारा किल्ला शिवाजीने घेतला असें आढळतें (पृ. ३६); येथें विलंबी संवत्सर पाहिजे.[6] जेधे शकावलींत हा काल शके १५९५ (इ. स. १६७३) असा आहे. बखरकार संभाजीचा जन्म शके १५७९ (इ. स. १६५७) ज्येष्ठ शु. १० असा देतो. (पृ. ३७); परंतु ही तिथि ज्येष्ठ शु. १२ येते.[7] राजारामाचा जन्म शके १५८० (इ. स. १६५८) विलंबी नाम संवत्सरे या सालांत झाल्याचें म्हटलें आहे (पृ. ३७). जेधे शकावलींत तो शके १५९१ (इ. स. १६६९) सौम्य संवत्सर असा उल्लेख आहे. या बखरींतील शिवाजीच्या अंगांत भवानी अवतरून बोलूं लागली (पृ. ४२), तसेंच शिवाजी मृत्यु

१. भा. इ. सं. मं. द्वि. सं. वृ., पृ. २६५
२. म. रि. श. शि., पृ. २३, २०९
३. शि. प्र., पृ. २०१
४. म. रि. श. शि., पृ.४७
५. ऐ. प्र., पृ. २७८
६. शि. प्र.; पृ. २१०
७. सदर, पृ. २०४

पावल्यावर आकाशवाणी झाली व त्याला शिवदूत विमानांत बसवून कैलासास गेले' (पृ. १०५). हे प्रसंग इतिहासदृष्ट्या प्रमाण मानणें कठिण आहेत.

'शिवाजी राजे...दोन महिन्याने दिल्लीस गेले' (पृ. ५१) हें बरोबर नाही. कारण शिवाजी आग्र्यास गेला होता, हें आपण मागे पाहिलें आहे. शके मजकुरी (शके १५९६ इ. स. १६७४) या सालीं कार्तीक व॥ ११ या रोजीं' जिजाईचा मृत्यु झाल्याचें बखरकार म्हणतो. या ठिकाणीं वद्य ९ हवी.[1] राजारामाच्या लग्नाचा काल शके १६०० (इ. स.१६७८) असा आढळतो (पृ. १०१); जेधे शकावलीप्रमाणे तो शके १६०१ (इ. स. १६७९) येतो. शके १६०१ (इ. स. १६७९) मध्ये शिवाजीने व्यंकोजीस पत्र पाठविल्याचें लेखक सांगतो. रियासतकार तें इ. स.१६७७त पाठविल्याचें म्हणतात.[2] या बखरींतील संभाजीने तीन ब्राह्मण कारकुनास जिवंत धरून चुन्याचे भट्टींत घालून ठार केलें (पृ. १०६) व बोडक्या ब्राह्मणास तीर मारून वध केला (पृ. १०७) ही माहिती नवीन आहे. औरंगजेबाने संभाजीस बोलवल्यावर डेऱ्याच्या लहान दरवाजांतून संभाजी अगोदर पाय सोडून बाहेर आला (पृ. १०८) ही हकीगतहि भोंसल वंशचरित्राप्रमाणे नवीन दिसते. तसेंच 'कब्जी अनुष्ठानाचें पाणी शिंपत बसला होता. एका पठाणाने त्याच्या डोक्यांत लोखंडाचा सोटा मारून त्यास ठार केलें. (पृ. १०८) हा मजकूर इतर बखरींपेक्षा अधिक आहे. सरदार, गडकोट इत्यादिकांची माहिती यांत जमाखर्ची पद्धतीने सविस्तर दिलेली आढळते.

(प्रस्तावनाकार वि. ल. भावे यांनी म्हटल्याप्रमाणे ज्या अर्थी या बखरीचा लेखक एकच इसम नसून अनेक गृहस्थ आहेत. त्या अर्थी यांतील उपरिनिर्दिष्ट कांही भिन्न मजकुराची जबाबदारी सर्वांवरच पडते. एक गोष्ट खरी की, अनेक जुने दाखले पाहून ही बखर लिहिलेली दिसते. ही सातारकरांच्या संग्रहांतील बखर असल्यामुळे वरील कांही भाग सोडून ती इतिहासदृष्ट्या विश्वसनीय मानणें इष्ट आहे.)

१. शि. प्र., पृ. २०६
२. म. रि. श. शि., पृ. १८७

वाङ्मयदृष्ट्या प्रस्तुत बखरींतील वर्णनें रम्य आहेत. 'उदा. बाजी पासलकर म्हणजे मोठा युधी, शूर मर्दाना, ज्याच्या मिशा दंडा एवढ्या, मिशास पीळ घालोन केसाचे अग्रावर दोहीकडे दोन निंत्रे ठेवावीं व मनगटा येवढें नाक. असे त्याचे स्वरूप त्रिकाळ, हा दुसरा हेडंब राक्षस असा होता, (पृ. ६५); शिवाजी व अफजलखान यांच्या भेटीच्या स्थलाचें वर्णन करतांना बखरकार म्हणतो, 'दुसरे दिवशी गडाखाली राजे याणी सात कचेऱ्या केल्या व बिछायती व आसमानगिऱ्या व बडे कनाथा व कुल सदरा जरीच्या केल्या लोडे व तीवाशा व मोत्याच्या झालरी लाविल्या. चित्रविचित्र लोडे व गाद्या पडगाद्या टाकिल्या सात सदरा सिद्ध केल्या' (पृ. २८) 'धोंडियाचा तासीव बिडा एक दौलताबाद हा कीला एक पृथ्वीवरी उत्तम परंतु उंचीने थोडका दौलताबादच्या दशगुण हा गड उंच असे (पृ. ७४); शिवाजीने भागानगरास भेट दिली त्या प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे—'मग सुमुहूर्त पाहोन पादशाहाचे भेटीस नगरातून चालिले. तो पादशाहानी नगर सिनगारिले. चौतर्फा कुंकुं केशराचे सडे घातले व गुड्या तोरणे शहरामध्ये लांविल्यां आणि नगर नारी व लोक राजा पाहावयासी उभे राहिले. नारीजन याणी वोवाळून राजियास शहरातील सर्वांनी मन विंधिले आणि सोन्या रुप्याची फुले राजियावरून आलाई बलाई दूर केली. मग राजियाणीहि खैर खैरात द्रव्य व वस्त्रे दिधली आणि राजे सर्व सविन्यासहित तानाशा पादशहाचे दाद माहालास दाखल जाहाले.'[१] हीं वर्णनें वाङ्मयदृष्ट्या सुंदर आहेत यांत शंका नाही.

ह्या बखरींत उत्कृष्ट अलंकारांचीहि योजना केल्याचें आढळतें. उदा. 'रणतुंबळ जाहले जसे महाविर भारती कौरव पांडव कुरुक्षेत्री भांडले' (पृ. ३१); 'परंतु गरीब मुंग्या चिलटासारखे आहेत' (पृ. १०२); 'जसे मुंग्यास पर फोटोन त्याची आवस्था जाहाली त्या प्रमाणे सर्वांची गत जाहाली (पृ. ११५). 'दिल्लेश्वर म्हणजे कलयुगीचा रावण' (पृ. ४२). इत्यादि.

आकर्षक सुभाषितें हें या बखरीचें वैशिष्ट्य होय. उदा. 'लाख मरावे, परंतु लाखाचा पालणारा कायम राहावा' (पृ. ५४); 'ज्याची जसी नेत

१. भो. ब., पृ. ८५

तसी त्यास बरकत ’ (पृ. १०१); संस्कृत सुभाषितांचा बखरकाराने उपयोग केलेला आहे. उदा. ‘ जितेन लभ्यते लक्ष्मीः ’ (पृ. २७). हीं सुभाषितें चरित्रकाराने प्रसंगानुरूप वापरल्यामुळे त्याचें लेखन चित्तवेधक झालें आहे.

वर्ण्य विषयाशीं तादात्म्य हा वाङ्मयीन गुण ह्या बखरींत आढळून येतो. त्यामुळे आपोआपच लेखकाच्या भावनांचा सुंदर आविष्कार झाला आहे. उदा. ‘ शिवाजीराजा साक्षात् शिवाचा आवतार याचे गुण कोठवर वर्णन करावे याच्या पराक्रमास उपमा नाही व मोठा शूर धारिष्टहि ’ (पृ. ३७); ‘ परंतु राजे सवाई जोरावर बळकट तशास गणतेस आणिले नाही ’ (पृ. ४९); ‘ मग जैसिंग बोलला जे हि तो गोष्ट खरी आहे आपण राणे रजपूत व आम्ही एकच जाती आहो तुमच्या अगोदर आमचे शीर जाईल मग तुम्हास काय होणे ते होईल ’ (पृ. ४८).

चरित्रकाराची भाषाशैली डौलदार आहे. लहानलहान सुट्या वाक्यांत इष्टार्थ व्यक्त करण्याचें त्याचें कौशल्य दिसून येतें. उदा. ‘ शिवाजी राजे हे पादशाईस काळ जाहाले ’ (पृ. १६). ‘ अफजलखान......फौजेचा समुद्र घेऊन श्री तुळजापुरावर आपणावर चालुन आला ’ (पृ. २५); ‘ पृथ्वी आकाश एक धुरळा उठला ’ (पृ. ४५); रगताने मातीचा चिखल जाहाला ’ (पृ. ७६); पदरची मंडळी आम्ही गवताने झाकितात हे आश्चर्य वाटते ’ (पृ. १०२); इत्यादि.

बखरीची भाषा प्रौढ व भारदस्त असली; तरी आजच्या दृष्टीने ती व्याकरणशुद्ध नाही. उदा. शेहर (पृ. ३६); पाचशे होन्नाची नेमणुक (पृ. ३९), त्याणी हे परखे लोक पाहून त्याणी शोध केला (पृ. ४३) बखरीचे अनेक कर्ते व त्यांच्या विविध नकला या कारणामुळे हें असें झालें असावें. राक्षसतागडीच्या बखरीप्रमाणे ही बखर विरामचिन्हविरहित आहे, हेंहि तिचें वैशिष्ट्य होय.

भारदस्त भाषा, चित्तवेधक निवेदनकौशल्य, वर्ण्य विषयाचा जिव्हाळा, यथार्थ व्यक्तिदर्शन इत्यादि वाङ्मयीन गुणांमुळे ही बखर चटकदार झाली आहे.

जावलीकर मोरे यांची छोटी बखर :

जावली प्रांताच्या चंद्रराव मोऱ्यांची ही हकीगत आहे.

इब्राहिम आदिलशहाने गोवळकोंडा किल्ला व भागानगर यांची स्थापना कशी केली यासंबंधी या बखरींत दोन हकीगती दिल्या आहेत. पहिली हकीगत तेलंगणाचा सुभेदार असतांना इब्राहिम आदिलशहाने ज्या ठिकाणीं सश्याने कुत्र्याचा पाठलाग केल्याचें पाहिलें, तेथे राहत असलेल्या धनगराच्या (गोलावाडु) नांवावरून गोवळकोंडा किल्ला बांधला[1] अशी असून, दुसरी हकीगत भागम्मा नांवाची एक ब्राह्मणकन्या यात्रा करीत असतां एकदा पाकनिष्पत्ति करीत होती, त्या वेळी शिकारीस गेलेल्या इब्राहिमला भूक लागली असतां तिने जेवूं घातलें म्हणून तिच्या इच्छेप्रमाणे तिचें नांव देऊन त्याने भागानगर बसविलें ही आहे (पृ. २२).

या बखरींत राक्षसतागडीच्या रणसंग्रामाचा व आदिलशाही, निजामशाही राज्याचा त्रोटक उल्लेख आढळतो. एका शिकारींत वाघास ठार केल्यामुळे चंद्रराव मोरे यास बादशहाकडून मुऱ्हे प्रांत आटगांव जावली महाल व राजा हा किताब हे मिळाल्याची हकीगत यांत आहे. पुढे या घराण्यांतील चंद्रराव कृष्णाजी राजे मोरे यास शिवाजीने आपल्या अंकित होण्यास सांगितलें; पण त्याचा उपयोग झाला नाही. नंतर मोऱ्यांशीं शिवाजीचें युद्ध होऊन तह झाला. शिवाजीने त्याचा सन्मान केला व त्यास घेऊन तो चाकणास आला. कृष्णाजी राजे यांनी मुधोळ वेंकाजी राजे घोरपडे पादशाही मनसबदार यांस चोरून पत्र पाठवून आपली सुटका करण्यास कळविलें. शिवाजीने मोऱ्यांचें पत्र पकडलें व पुढे मोऱ्यांचा वध करून जावळीचें राज्य घेतलें. नंतर त्याने जावळीजवळील ढोरपा डोंगरावर प्रतापगड बांधून भवानीची स्थापना केली. ही हकीगत या बखरींत आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या ही माहिती महत्त्वाची मानली पाहिजे. शिवाजीने रघुनाथ बल्लाळ यास मोऱ्यांवर पाठविलें ही इतर बखरींतली (उदा. सभासदी, सप्तप्रकरणात्मक चरित्र, शिवदिग्विजय) व रियासतींतील[2] माहिती यांत नाही. वरील बखरींत हणमंतराव हा चंद्ररावाचा भाऊ असल्याचें म्हटलें आहे; पण या बखरींत तो पुत्र असल्याचें लेखक सांगतो. (पृ. २५) या बखरींत चंद्रराव कृष्णाजी मोरे असें नांव आहे. इतरत्र तें चंद्रराव मोरे

१. इतिहाससंग्रह (मे १९०९), पृ. २२
२. म. रि. श. शि., पृ. ४३

असेंच आढळतें. बखरींतील या नांवावरून चंद्रराव हा किताब असल्याचें स्पष्ट दिसतें. रियासतकारांचेंहि तेंच मत आहे.[1]

वाङ्मयदृष्ट्या या बखरींतील वर्णनें सुंदर आहेत. चंद्ररावाचें वर्णन करतांना बखरकार म्हणतो—

' एकवचनी चंद्रराव हुजूर तेव्हा चंद्रराव अडेल शिपाई, आजदादेघरचा राऊत मर्दाना ' (पृ. २३); चंद्ररायाचें राज्य धर्मात्मा जावलीवर राज्य करीत असतां, राजीयांतील हिस्से एक हिसीयाची शिबंदी पाग्रेहासम, एक हिसीयाचीं अन्नछत्रें व धर्म खैरात, एक हिसीयाचा खाजगी खर्च, तोसीखाना, पागा, सुरतखाना, आदिलखाना, वगैरे; एक हिसा देवस्थलीं देव, शिवालयें, माहाबलेश्वरीं पंचगंगा चंद्ररायाहीं बांधल्या ऐशा सात शिवपुऱ्या चंद्ररायाहीं आपले वंशपरंपरा जेथून जावलीचें राज्य जालें, तेथून संपेल तेथवर, देवस्थली बाकी चालविली. ऐसे धर्मराजे मोरे जाहले ' (पृ. २९).

चंद्ररावाने वाघ मारल्याचें पुढील वर्णन उत्कृष्ट आहे.—

' मग पानाची पट्टी उचलून घेतली. वाघाभोवता लोकांहीं धरसा धरला होता, तो सोडला. वाघ मोकळे जागीं मैदानांत पडला. नीट रोहंक देऊन, पुढील पायें कोल्हेटेंकणीं बैसून शेपूट झाडूं लागला. रागें चूर. तेव्हा चंद्ररायें पादशाहास कुरणीशात करून मुढाळीस ढाल दिधली. चोलिणीयावर काच्या बांधला. शिरीं पगडीस एक झाडाचे फांदियाचा तुरा लाविला. अंगीं विभूतीचें भूषण. मुंढ्यास ढाल देऊन पटीयाचें मेण झाडून टाकलें. मग चंद्ररायें नीट वाघावर चालून घेतलें. ' ऊठ कुतऱ्या. काय बसलास ? तूं आमचे एक कुतरें आहेस ! ' ऐसे बोलून वाघाजवळ गेले. मग वाघ दणाणून उठून चालून आला. वाघाची झडप येतांच, चंद्ररायें पोटीं ढाल देऊन बैठक केली. वाघें नीट झडप टाकतांच, त्याचा लाग चुकून चंद्ररायें माथा खालें करून बसल्या बसल्या आंग लवकिलें. वाघाची झडप त्यास वोलांडून पुढे गेली. तों इतकीयामध्ये चंद्ररायें हुशार होऊन त्याजकडे तोंड फिरविलें. ईश्वरास करणें. वाघ झडप टाकतांच, पुढे खूट वाघास लागतां, चांचरून पुढे पडतांच, गुडगे चालीं चंद्ररायें चालून, वाघ उट खाऊन माघारा फिरता मुंढावर ढालचे वोढीयावर त्याचा मार सांभाळून पटीयाची

१. सदर, पृ. ४२

सीग वाघाचे पोटांत चालविली. वाघ जाया जाहला. त्याच लागांत चंद्रराव उठून घायांत घाय दुसरा हात पटीयाचा चालवून, दुघड वाघ करून मारला. [1]

ह्या बखरींतील पुढील कांही भाषाविशेष उल्लेखनीय आहेत. १. अर्थानुकारी व अनुप्रासात्मक वाक्यरचना. उदा. जावली अवघड वाट, जाळ्या कळकीच्या दाट (पृ. २७). २. समर्पक म्हणी. उदा. पिकेल डोण तर खाईल कोण ? न पिकेल डोण तर राहील कोण ? (पृ. २२); येतां जावली जातां गोवली (पृ. २६); ३. हिंदी व मराठी संमिश्र शब्दप्रयोग. उदा. सुन चंद्रराव (पृ. २४).

आवेशपूर्ण भाषाशैली, उत्कृष्ट निवेदनपद्धति, आकर्षक व्यक्तिदर्शन इत्यादि गुणांमुळे प्रस्तुत बखरीस वाङ्मयीन तेज चढलें आहे.

निष्कर्ष :

शिवपूर्वकालीन बखरींपेक्षा शिवकालीन बखरींची संख्या मोठी आहे. ह्या बखरींत सभासदाच्या बखरीशिवाय समकालीन अशी एकहि मराठी बखर नाही. बहुतेक बखरी उत्तरकालीनच आहेत. ह्या बखरींपैकी निम्म्यापेक्षा अधिक बखरी शिवाजीसंबंधी आहेत. हिंदुपदपादशाही स्थापन करून महाराष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या श्रीशिवछत्रपतीचें चरित्र हा बखरींचा मुख्य विषय होणें स्वाभाविक आहे. शिवाजीचा इतिहास ह्या एकाच विषयावरील निरनिराळ्या बखरींत भिन्नभिन्न मजकूर आढळत असला, तरी त्यांतहि नावीन्य आहेच. जुने दाखले, परंपरेने आलेली माहिती, दंतकथा, कर्णोपकर्णीं ऐकलेली माहिती तसेंच संस्कृत पुराणग्रंथ इत्यादि साधनांच्या आधारें माहीतगार व्यक्तींनी लिहिलेलीं हीं चरित्रें आहेत. कृष्णाजी अनंत सभासद, अनाजी रंगनाथ मलेकर, मल्हार रामराव चिटणीस इत्यादि बखरकारांना तत्कालीन राजकारणाचा साक्षात् परिचय होता. त्यामुळे त्यांच्या लेखनाला इतिहासदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. बहुतेक बखरींत शिवाजीचा जन्म शक १५४९ हा आढळतो. तंजावरकडील भोसलवंश चरित्रांतील १५५१ हा शक मात्र जेधे शकावलीशीं जुळतो. शिवकालीन इतिहासाचें साधन म्हणून कांही विशिष्ट मर्यादेपर्यंत ह्या विषयावरील बखरींची विश्वसनीयता मान्य केली पाहिजे.

१. इ. सं. (मे. १९०९), पृ. २४

ह्या बखरींचें लेखन इतिहासाच्या भूमिकेने झालें असल्यामुळे वाङ्मयदृष्ट्या रचनेच्या कौशल्याकडे त्यांत मुद्दाम लक्ष्य दिलेलें आढळत नाही. तरी पण सभासदाची बखर, चिटणिसांचीं चरित्रें, शिवदिग्विजय, शिवप्रताप, शेडगांवकर बखर, जावलीकर मोऱ्यांची बखर इत्यादि बखरींत वाङ्मयगुण निश्चित आहेत. वर्ण्य विषयाचा जिव्हाळा, प्रामाणिक लेखन, डौलदार व आवेशपूर्ण भाषाशैली, कौशल्यपूर्ण निवेदन इत्यादि वाङ्मयीन गुण त्यांत कमी–अधिक प्रमाणांत आढळतात. त्याचप्रमाणे इतिहासदृष्ट्या व वाङ्मयदृष्ट्या प्रत्येकीचें वैशिष्ट्य दिसून येतें. केवळ नवीन माहिती नव्हे, तर इतिहासाची दुसरी बाजू म्हणून परकीयांनी लिहिलेल्या बुंदेल्याच्या बखरीचें व मुधोळच्या घोरपडे घराण्याच्या इतिहासाचें ऐतिहासिकदृष्ट्या स्वतंत्र स्थान आहे.

ह्या कालांतील विषयावरील बखरींत विशेषतः शिवाजीसंबंधीच्या बखरींत दैवी संचार वगैरे अद्‌भुत वर्णनें व फलश्रुति आहेत. ह्याला अपवाद म्हणजे ९१ कलमी बखर ही होय. कलमवार लेखन व आटोपशीरपणा हा ह्या बखरीचा विशेष आहे. या बखरकारांनी जाणूनबुजून सत्याचा विपर्यास केला नाही. चरित्रव्यक्तीबद्दल लेखकाला वाटणाऱ्या आपुलकीच्या भावनेचा तो निर्हेतुक परिपाक आहे. परकीयांचें अनुकरण करून या बखरी लिहिल्या असल्या, तरी त्या स्वतंत्र असल्याचा प्रत्यय येतो.

बखरलेखनाच्या दृष्टीने शिवकाल अत्यंत महत्त्वाचा होय. कारण शिवपूर्व-कालांत बखरलेखन झालें असलें, तरी शिवकालापासून त्याला एक विशिष्ट वळण लागलें. किंबहुना असेंहि म्हणतां येईल की, बखरलेखनाची खरी सुरुवात सभासदाचें शिवछत्रपतीचें चरित्र या शिवकालांतल्या बखरीपासूनच झाली. स्वराज्याच्या उदयाबरोबर बखरींचाहि उदय व्हावा, ही घटना मोठी सूचक आहे. ज्या पराक्रमाचें क्षेत्र रणांगण होतें, त्या पराक्रमाला या कालांत वाङ्मयाचें चिरंतन क्षेत्र लाभलें. ह्या कालांत बखरीच्याद्वारें राष्ट्रीय भावनेचा परिपोष होऊं लागला व पुढील साम्राज्यासाठी आवश्यक ती मनोभूमिकाहि तयार झाली.

सारांश, ऐतिहासिक व वाङ्मयीन गुणांनी समृद्ध असलेल्या शिवकालीन विषयांवरील बखरींचें मराठी गद्यवाङ्मयाच्या इतिहासांत एक स्वतंत्र स्थान आहे, यांत मुळीच शंका नाही.

* * *

मागील प्रकरणांत शिवकालीन विषयांवरील बखरींची चर्चा केली आहे. आता पेशवेकालीन विषयांवरील बखरींचा विचार करणें इष्ट होईल.

पेशवेकालाची मर्यादा शाहूचें दक्षिणेंत आगमन झाल्यावर ताराबाईशीं त्याने युद्ध करून सातारा राजधानी कबजांत आणल्यावर तो मराठी राज्याचा धनी झाल्यापासून म्हणजे ता. १२ जानेवारी इ. स. १७०८ पासून धूळकोटावर दुसऱ्या बाजीरावास इंग्रजांनी वेढल्यानंतर त्याच्या शरणागती-पर्यंत म्हणजे ता. ३ जून इ. स. १८१८ पर्यंत येथे मुख्यत्वेंकरून अभिप्रेत आहे; परंतु मराठेशाहीचें आस्तित्व साताऱ्च्या छत्रपतींचें राज्य खालसा होईपर्यंत (इ. स. १८४९) असल्यामुळे ह्या पुढील कालाचाहि अंतर्भाव प्रस्तुत कालखंडांत केला आहे.

ह्या कालांतील विशेष महत्त्वाची घटना म्हणजे इ. स. १७६१ मधील पानिपतचा रणसंग्राम ही होय. ह्या युद्धांत मराठ्यांचा पराभव झाला असला तरी शेवटपर्यंत त्यांनी शौर्यधैर्यादि गुणांची शर्थ करून आपलें तेज प्रगट केलें. ह्या लढाईत मराठ्यांची पुष्कळ हानि झाली. पानिपत येथे मराठ्यांची विसकटलेली घडी इ. स. १७९५ त खर्ड्याच्या लढाईत निजामाचा पराभव झाल्यामुळे कांहीशी सावरली गेली. खर्ड्याच्या लढाईत मिळविलेला मराठ्यांचा विजय शेवटचाच ठरला. कारण त्यानंतर मराठ्यांची कर्तृत्व-परंपरा संपली. त्यांतच आपसांत कलह व चुरस हीं वाढलीं. ह्या दुहीचा फायदा इंग्रजांस मिळून पेशवाईचा नाश झाला.

पेशवाईची इतिश्री झाल्यानंतर पर्यायाने सातारकर छत्रपतींचाहि शेवट झाला खरा; परंतु इंग्रजांनी राजकीय धोरणाने छत्रपतींची स्थापना केली. त्या वेळचा छत्रपति प्रतापसिंह होता. पुढे ता. १६ मे १८४९ रोजीं इंग्रज सरकारने जाहीरनामा प्रसिद्ध केल्यामुळे साताऱ्च्या राज्याची परिसमाप्ति झाली.

प्रस्तुत कालखंडांतील बखरींचें विवेचन करूं.

साष्टीची बखर :

उत्तर कोकणांतल्या साष्टी व वसई ह्या प्रांतांवर इ. स. १७३७ ते इ. स. १७३९ या कालांत मराठ्यांनी केलेली स्वारी व फिरंग्यांचा पाडाव करून त्या प्रांतावर त्यांनी बसविलेलें वर्चस्व हा मराठ्यांच्या इतिहासांतील एक महत्त्वाचा प्रसंग आहे. फिरंगी (गोवेकर) पोर्तुगीज यांनी हा प्रांत व्यापलेला होता. हिंदु लोकांचा छळ करून त्यांच्या धर्माचें उच्चाटन करण्याचा निश्चय पोर्तुगीजांनी केला असल्यामुळे, साहजिकच त्याची प्रतिक्रिया तत्प्रांतीय हिंदुमनावर झाली व तेथील लोकांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पेशव्यांची कुमक मागितली. पेशव्यांतर्फे आलेल्या चिमाजी आप्पा यांच्या साहाय्याने त्यांनी आपलें शौर्य दाखविलें व फिरंगाण हस्तगत करून हिंदु धर्माचें राज्य स्थापन केलें.

ह्या प्रसंगाची हकीगत साष्टी ऊर्फ ठाण्याची बखर (काव्येतिहाससंग्रह) व साष्टीची बखर ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम या दोन बखरींत आली आहे. या दोन्ही बखरींत मजकूर जवळजवळ सारखा आहे. काव्येतिहास-संग्रहकर्त्यांच्या साष्टीच्या बखरींत गंगाजी नाईक या वीरपुरुषाचा मजकूर त्रोटक आढळतो व साष्टी वसई प्रांत मराठ्यांनी घेतल्यानंतर पुढील कालांतील हकीगत म्हणजे शके १६९६ (इ. स. १७७४) त इंग्रजांनी ठाणें घेतलें व साष्टीबद्दल मराठ्यांस नऊ लक्षांचा मुलूख दिला येथपर्यंतची हकीगत दिली आहे. वसईच्या धर्मसंग्रामांत गंगाजी नाईक यांच्या हालचालीचें सविस्तर वर्णन असून साष्टीचा पाडाव झाल्यावर गंगाजी नाईक कल्याण येथे राहिले, येथपर्यंतचा मजकूर सापडतो. ह्या दोन्ही बखरींचें मूळ एकच असावें.

ह्या बखरींत मराठे व फिरंगी यांच्या लढाईचें मूळ कारण हिंदूंचा धार्मिक छळ हें दिलें आहे. त्याला रियासतकारांचा दुजोरा आहे.[१] वसईच्या धर्मसंग्रामांत गंगाजी नाईकास दृष्टान्त होऊन कार्यांत यश मिळेल असा साक्षात्कार झाल्याचें जें वृत्त आहे,[२] तें रियासतींत नाही. प्रस्तुत बखरीवरून

१. म. रि. पे. बा., पृ. ३४४

२. साष्टीची बखर ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम (१९३५), पृ. ९

ह्या मोहिमेचें मुख्य श्रेय गंगाजी नाईक ह्या कर्तबगार पुढाऱ्याकडे गेल्याचें दिसतें व चिमाजी आप्पा वगैरे मराठ्यांचें स्थान त्या मानानें गौण असल्याचें आढळतें. या बाबतींत रियासतकारांचा अभिप्राय असा की, गंगाजी नाईक हाच खरें म्हटलें तर पुढील युद्धाचा उत्पादक होय.[1] चिमाजी आप्पानें वसईवर हल्ला चढविला.[2] रियासतींत ही चळवळ मुख्यत्वेंकरून चिमाजीच्या नांवावर आहे. मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत 'आपासाहेब यांनी वसईच्या मसलतीस भगीरथ प्रयत्न करून फिरंगाण हस्तगत करून धर्मराज्य हिंदुधर्माची स्थापना केली' असा उल्लेख आढळतो.[3] सोहनीविरचित पेशव्यांच्या बखरींत खंडोजी माणकर, अंजुरकर व दुल्लबाजी मोरे यांनी अनुक्रमें गुराखी, सुतार व कासार या वेषांनी किल्ल्यांत जाऊन भेद करून किल्ला हस्तगत केला, तसेंच फिरंग्याची बायको धरून श्रीमंतांकडे आणली; पण श्रीमंतांनी तिला साडी चोळी नेसून सोडून दिली असें आहे.[4] फिरंग्याच्या बायकोस धरल्याची हकीगत नवीन दिसतें. वसईचा धर्मसंग्राम या बखरींत खंडेराव दाभाडे याचा उल्लेख आहे (पृ. १४). काव्येतिहाससंग्रहकारांच्या साष्टीच्या बखरींत महादर्जी शिंदे यास बाजीराव व चिमाजी आप्पा यांनी मसलतीस बोलाविल्याची हकीगत (पृ. ७) नवीन आहे.

उत्कृष्ट वर्णनपद्धति हा या बखरीचा विशेष होय. उदा. 'तुमचें उर्जित (करील) तुमचें दारि हति झुलवविल तो बाजीराव असा आहे' (पृ. १९). हें बाजीरावाचें वर्णन समर्पक आहे. फिरंग्यांच्या जुलमाचें वर्णन करतांना बखरकार लिहितो :—

'ठाणे कोकण चिंवस्छान हें राज्य फिरंगी याणे घेतले. घेउन कुबुद्ध धरिलि. जमिदारांचि वतनें बुडविली गावाचा गाव धरून बाटविला किरिस्ताव केले सासष्ट गाव व आगर वसईचा बहुतेक लोक धरून बाटविले. बाप मेला म्हणजे घरात प्रेत असता त्याची पोरें जी असतिल तीं नेऊन वाटवावि. ऐसा उपद्रव महाराष्ट्रासि मांडिला मग लोक कष्टि जाहाले. पलोन

१. म. रि. पे. बा., पृ. ३४४

२. सदर, पृ. ३५२

३. मराठी साम्राज्याची छोटी बखर (१८८९), पृ. २९

. पेशव्यांची बखर (१९२५), पृ. २९

कोण्हि कोण्हि दक्षण प्रांति जाउन राहिले क्रिया कर्मे लोप जाहला देवधर्म बुडाला प्रान्ताचीं तीर्थें क्षत्रें लोपलि देव देवालयें फोड तोड केलि आपलि देवळे फिरंगी याणे बांधलि फिरंगी धर्म चालवावयास लागले. मुलकांत ब्राह्मण फिरता कामा नये कोणी ग्रहस्ताने काहि कार्य होम उद्यापने आरंभिलि म्हणजे ग्रहस्ताचे घर अवघे धरावे सेजारी पाझारी त्या घरांत सांपडले त्यांसहि धरून न्यावे बंदिकष्टि करावे बंदिखानियांत कुजवावे असा अनर्थ मांडिला.'[१]

ह्या वर्णनावरून बखरकार भावनोत्कटतेने लेखन करीत आहे असाच प्रत्यय येतो. त्यामुळे हें वर्णन परिणामकारक झालें आहे. लेखकाने वर्णिलेले यासारखे प्रसंग प्रत्यक्ष डोळयापुढे उभे राहिल्यासारखे वाटतात.

युद्धाचीं तपशीलवार वर्णनें ह्यांत असून बखरकाराने तीं आवेशपूर्ण भाषेंत केलेलीं आहेत. मराठे व फिरंगी यांच्या युद्धाचें वर्णन करतांना बखरकार म्हणतो–

'इकडे श्रृग (सुरंग) कोटाजवळ जात ते फिरंगी वरून मोडतो तोंफा उफराट्या डागून श्रृंगावर (सुरुंगावर) गोळे मारतो वरून लांकडे टाकितो व चंद्रस गंधक टाकून आग करितो व पाणियाचे पनळ वरून सोडतो सुरंग भिडों देत नाहि येक येक सुरंग पाच सात वेळां मोडिले सुरंगाचे काम राहिले चालो देत नाहि मग खालून तोंफा तिस लाउन कवलारि बुरुज व समोरच्या दुसाळी फोडोन साफ केल्या दमदमे दोन जवळ उभे केले त्याजवरून बर(कं)दाजि बुरुजावरून चाललि तेणेकरून फीरग्याचा मार कमि जाला सुरंग आठ कोटास तयार जाले दारुचे बुधले भरून सारि फौज हल्यास तयार जालि सुरंग उडविले कोटावर हला करावा तो सुरंगाने उफराट्या दगाडि येउन माणुस फार जाया जाले उतरेचे कोनाचा सुरंग राणोजी सिंदे याचा उडाला व पश्चमेचा सुरंग ब्रतिवर दगाडि पडोन विझाला बाजे धाकटे सुरंग उडाले पाश्चिमेचे बुरुजावर लगट जाला तंव विभूतरायाचा सुरंग उडाला त्याणे आपलेच लोक खराब केले बाजे लोक कचमोहरे जाले त्याचवेळेस फिरंगी च्यार खोपावर उतरला आग लाविली तेथें कृष्णाजी नाईक आपले लोकानासि धावोन फिरंगी मोडला शिरें पाडून ठाणियास पाठविलि.'[२]

१. सा. ब. (१९३५), : पृ. ३

२. सदर, पृ. ५०

काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी प्रसिद्ध केलेल्या साष्टीच्या बखरीची भाषा वसईचा धर्मसंग्राम या बखरीपेक्षा आजच्या दृष्टीने अधिक शुद्ध दिसते; मात्र वसईच्या धर्मसंग्रामाची भाषा भावनोत्कट असल्यामुळे ती अधिक चित्तवेधक आहे. वाङ्मयदृष्ट्या वसईचा धर्मसंग्राम ही बखर अधिक सरस दिसते.

परिणामकारक भाषा, आकर्षक निवेदन-पद्धति, वर्णनाचा बारकावा व वर्ण्य विषयाशीं तादात्म्य इत्यादि गुणांमुळे साष्टीची बखर वाचनीय झाली आहे.

श्री शाहू महाराज यांची बखर :

या बखरीच्या सुरुवातीस संभाजी व राजाराम ह्यांची त्रोटक माहिती दिली असून पुढे शाहूच्या जन्मापासून त्याच्या मृत्यूपर्यंत सविस्तर हकीगत दिली आहे.

बखरकार शाहू महाराज यास दिल्लीस धरून नेलें असें म्हणतो;[1] परंतु रियासतकारांच्या मतें औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचा दुसरा पुत्र अजमशहा हा शाहू व त्याचा परिवार याजबरोबर उत्तरेची वाट चालूं लागला. झुल्फिकारखानाने ता. १३ मार्च रोजीं बऱ्हाणपूरच्या मुक्कामीं शाहू व अझमशहा ह्यांची भेट करविली. त्या वेळीं शहाने त्यास पोशाख दिला होता. शाहूच्या सुटकेचाच हा उपक्रम होय. भोपाळच्या वायव्य दिशेस दारोहा या गांवीं मुक्काम असतांना शाहू दक्षिणेंत यावयास निघाला. शाहूने दिल्ली शहर कधी पाहिलेंच नव्हतें.[2]

बादशहाच्या व बेगमेच्या सहवासांत शाहू कसा वाढला ही हकीगत या बखरींत बरीच विस्तृत आहे. शाहूचें लग्न सकवारबाईशीं झाल्यानंतर दुसऱ्या लग्नाचा त्याने आग्रह धरला व त्याचें लग्न सगुणाबाईशीं झालें. हीं दोन्ही लग्नें बादशहा व बेगम यांनी करून दिल्याचा बखरींत उल्लेख आहे (पृ. १९). साताऱ्यास बाळाजी विश्वनाथाच्या साहाय्याने शाहूचा जम बसल्यावर त्याने आणखी दोन लग्नें केलीं. एक राणोजी शिर्क्यांची कन्या सकवारबाई व दुसरी मोहित्यांकडील सगुणाबाई असें रियासत म्हणते.[3] शाहू

१. श्री शाहू महाराज यांची बखर (भारतवर्ष फे. मा. १९००), पृ.२

२. म. रि. पे. बा. वि., पृ. २१

३. सदर, पृ.१५१

बादशहाचे जोडे उचली (पृ. १६) व एकदा तर त्याने ते जोडे आपल्या पागोट्यांत ठेवले होते (पृ. १९); शाहू दक्षिणेंत यावयास निघाल्यावर त्याच्या सामानाची याद ह्या बखरींत दिली आहे (पृ. २२). ही माहिती नवीन दिसते. बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूची तीथ चैत्र शु. ७ अशी यांत दिलेली आढळते. रियासतकार ही तीथ चैत्र शु. ६ अशी देतात.[1]

प्रस्तुत बखर ही गोविंदराव खंडेराव चिटणीस यांनी सांगितलेल्या बखरीच्या नकलेची नकल आहे, हें लक्षांत घेतां बखरींतल्या उपरिनिर्दिष्ट कांही ऐतिहासिक मजकुराची जबाबदारी नकलकारावर येऊन पडते.

ही बखर गोविंद खंडेराव चिटणिसासारख्या माहितगाराने लिहिली असल्यामुळे इतिहास दृष्ट्या विश्वसनीय मानण्यास प्रत्यवाय नाही.

ह्या बखरींतील वर्णनें उत्कृष्ट आहेत. शिवाजी व संभाजी यांचें वर्णन करतांना बेगम म्हणते, 'शिवाजी पराक्रमी होऊन आपले सारिख्यास जिगजिग केलें, त्याचा पुत्र संभाजी, तोही स्वरूपवान्, सर्वगुणी, दक्ष, आपल्यास रात्रंदिवस घोर, असा पराक्रमी' (पृ. ८).

संभाजी महाराजांच्या भेटीस शाहू गेला त्या वेळच्या शाहूच्या लवाजम्याचें वर्णन करतांना बखरकार लिहितो—

'महाराजास कळोन खंड्या कुत्र्याचे अंगावर जवाहीर मनमानेसे घालून त्यास भरगच्ची पालखींत बसवून, त्यास पुढे जिलिब्रीचे चोपदार वगैरे देऊन, प्रथम स्वारी पुढे करून मागे खाशी स्वारी पांढरी तुमान व जामा व चादरेचा साधा बिनजरी दुपेटा, डोईस एकेरी पांढरी टोपी आणि तुरा, घोड्यावर साधा सरंजाम, त्याजवर खासा स्वारी बसोन, दरखदार, पदाधिकारी, अमीर, उमराव, तमाम चालले. त्यांच्या मागे हुजुरातीचे लोक व शिलेदार, जमादार व दफेदार व रिसालदार, पांच लोक कोंकणे, मावळे रावराणे इत्यादिक तोफखाना सरंजामसुद्धा जाऊन, कोरबंदी धरली'[2]

शाहूच्या निधनानंतर सकवारबाईच्या सहगमनाचें हृदयद्रावक वर्णन पुढीलप्रमाणे आहे—

१. सदर, पृ. १८५

२. शा. ब., पृ. ५४

' बरें बोलली म्हणोन त्याणी रायास व पंतास येऊन सांगितलें की, सिद्धता करावी, ती गेली तर बरें, न गेली तर आम्ही तिला नेतों. असें बोलल्यानंतर सहगमनाची सिद्धता करून हळदकुंकूं वाणें दिलीं. गोप्रदानादि कित्येक प्रकारचे धर्म केले. अनेक वाद्यें घरोघरीं हळदकुंकूं समारंभें करून माहुलीस मोठ्या गजरांनी दोन लाख मनुष्यें जमा झालीं. सहगमनविधि झाल्यानंतर सर्वांनी स्नानें करून शहरांत येऊन दीपदर्शन घेऊन श्रीचे अवलोकनाने पूनित होऊन घरोघरीं गेले '[१]

शाहूच्या मृत्यूनंतरच्या वर्णनांत बखरकाराची भावनोत्कटता दिसून येते. तो लिहितो—

' सर्व जनास दुःख झालें. त्याचा विस्तार किती लिहावा! मनुष्यमात्र, लहान–थोर, दास–दासी, पदरचे, त्यांचा बाप, प्रतिपाळणकर्ता. तें दुःख स्मरून क्लेश झाले. ते लिहावयास असमर्थता आली! कारण असा प्रभु दयावंत दुसरा झाला नाही. आणि धन्याचे राज्यांत अपराधी झाला तरी हत्यारें करून घ्या परंतु मारा असा शब्द ज्याचे मुखीं आला नाही. आजानुबाहू अजातशत्रू पुत्र मित्र अरी एकरूप व्यवस्थेनी वागावयाचें. कोणास गैर भाषण केलें नाही असा पुण्यश्लोक राजा निधन पावला.'[२]

बखरीच्या लेखनांत आवेश आढळतो. बखरकार म्हणतो— ' मोठाच लौकिक महाराजांचा बाळाजीपंतांनी केला. तदाधिक्य बाजीराव, तरवारबहादूरपणाची पराकाष्ठा, असा पुरुषच नाहीं ' (पृ. ६४). ' परंतु आपाचा मनोदय, महाराजाचे मुखांतून जीं अक्षरें निघालीं तोच माझा मुहूर्त, त्यांत नशीब महाराजांचें, मी हा पदार्थ किती, असें बोलोन आज्ञा घ्यावी म्हणोन रायास सांगितलें.'[३]

ह्या बखरीची भाषा प्रौढ आहे. त्यामुळे एकंदर लेखनाला भारदस्तपणा आलेला दिसतो. त्याचप्रमाणे बखरकाराची निवेदनकुशलता वाखाणण्यासारखी आहे. साधें अखंड निवेदन करूनहि तें गतिमान ठेविलें आहे हें विशेष.

१. सदर, पृ. ८७
२. सदर, पृ. ८५
३. सदर, पृ. ६६

सुंदर वर्णनें, यथार्थ व्यक्तिदर्शन, शैलीदार आवेशपूर्ण भाषा इत्यादि गुणविशेषांमुळे प्रस्तुत बखर वाचनीय झाली आहे.

धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी यांचें चरित्र :

धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी या सत्पुरुषाची ही हकीगत आहे. थोरले शाहू महाराज हे स्वामींना गुरु मानीत होते. पेशव्यांची भरभराट होण्यास स्वामी पुष्कळच कारणीभूत झाले. 'थोड्याबहुत अंशाने स्वामी ही एक त्या वेळीं राजकारण बनविणारी व्यक्ति होती.' असें रियासतकार म्हणतात.[1] या सर्व कारणांमुळे ब्रह्मेंद्रस्वामींना ऐतिहासिक महत्त्व आहे.

प्रस्तुत चरित्रांत स्वामींच्या संपूर्ण जीवनाची माहिती आढळते. चरित्रलेखकाची भूमिका ही सांप्रदायिकाची दिसते. त्यामुळे या चरित्रांत इतिहास दृष्ट्या प्रमाण न मानतां येणारा चमत्काराचा बराच मजकूर आहे. उदा. (१) कोकणांतल्या धामणी सोनगांवच्या रानांत बाळगौळ्याचे हिरवे आंबे पिकण्यास घातले असतां तेथील सर्प चावूनहि स्वामीस विषबाधा झाली नाही.[2] (२) स्वामी शके १६२७ (इ. स. १७०५) मध्ये श्री परशुरामीं देवाजवळ प्रगट झाले (पृ. ४). रियासतकार हा काल इ. स. १६९८ असा देतात.[3] (३) केळीच्या पानावरून खाडींतून तरून परशुराम क्षेत्रीं स्वामी देवदर्शनास जात (पृ. ४). (४) श्रीचा चिमणाजीपंतास दृष्टान्त (पृ. ८). (५) दाभोळच्या बतूसाहेब ह्या यवनीचें जहाजाचें नवस केल्यावर अकस्मात येणें (पृ. ११); (६) श्रीस्वामींचा काल पुढे होणार हें भविष्य स्वामीस आठ नऊ महिने अगोदर कळलें होतें (पृ. १९). (७) शाहू महाराज वाड्यांत भोजनास बसले असतांना स्वामींच्या मठाजवळच्या तळ्यांत अकस्मात् अरण्यांतून मोठें सांबर येऊन त्याने घातलेली उडी (पृ. २३). (८) स्वामी श्रावण शुद्ध प्रतिपदेस वार्षिक पद्धतीने गुहेंत जाऊन समाधीस बसल्यावर बाहेरून दार चिणून टाकलें जाई (पृ. २८). आमच्या मतें प्रस्तुत मजकूर इतिहास दृष्ट्या प्रमाण मानणें कठिण आहे.

---

१. म. रि. पे. बा., पृ. २३९
२. ब्र. च. (१८८२), पृ. ३
३. म. रि. पे. बा., पृ. २३९

प्रस्तुत चरित्रांत शाहू महाराज दिल्लीहून पादशहाची आज्ञा घेऊन साताऱ्यास आले असें म्हटलें आहे (पृ. ५). परंतु शाहू दिल्लीस कधीच गेला नव्हता हें आपण मागे पाहिलें आहे. चरित्रकार लिहितो की, बाळाजी विश्वनाथाने ब्रह्मेंद्रस्वामीस सनसीत अशरीनांत (इ. स. १७२५) पिंपरी हें गांव दिलें (पृ. १३); पण बाळाजी विश्वनाथ हा अगोदरच म्हणजे इ. स. १७२० त मरण पावला होता. राजवाडे म्हणतात की, तें साल सीत अशर म्हणजे इ. स. १७१६ असें पाहिजे.[1] बाजीरावाच्या मृत्यूचा काल शके १६६२ (इ. स. १७४०) वैशाख शुद्ध २ असा यांत दिला आहे (पृ. १९). मराठी रियासत तो वैशाख शु. १३ असा देते.[2]

प्रस्तुत चरित्रांतील स्थूल हकीगती विश्वसनीय मानतां येतील; परंतु त्यांतील उपरिनिर्दिष्ट कांही घटना तशा मानणें अयोग्य होईल. चरित्रलेखकाची भूमिका सांप्रदायिकाची असल्यामुळे इतिहासदृष्ट्या त्यांत दोष असणें स्वाभाविकच आहे.

वाङ्मयगुणांच्या दृष्टीने या बखरींतील कांही वर्णनें चांगलीं आहेत. उदा. स्वामींच्या लहानपणचें वर्णन चरित्रकार पुढीलप्रमाणे करतो— ' अल्पवय, परंतु बुद्धि विशाळ. योगनिष्ठ संसारविषयांत विरक्त जपतप अनुष्ठानाविषयीं परम आसक्त. बारा वर्षांचे झाले तों मातापिता वृद्ध होतीं. दरिद्रें करून परम जर्जर ' (पृ. १). स्वामींच्या समाधीनंतर शाहूची स्त्री सगुणाबाई हिला झालेल्या शोकाचें वर्णन ' हें वर्तमान महालांत कळतांच उभयतां धणींनी बहुत शोक आरंभिला. त्यांत धाकटी सगुणाबाई यांणी फारच आक्रोश मांडिला. प्रत्यक्ष माता पिता यांचा शोक असा कोणी न करी ! ' असें यथार्थ केलें आहे (पृ. ३०). तसेंच सगुणाबाईच्या देहावसानानंतर शाहूच्या अवस्थेचें वर्णन या चरित्रांत पुढीलप्रमाणे हृदयद्रावक आहे. ' उपरांत महाराजांची उदासीन वृत्ति जाहली........एक पळ चित्त स्वस्थ नाही. उभयतांमध्ये अत्यंत प्रीति होती. तो वियोग जाहलियानंतर सदैव मर्जी दिक्क ' (पृ. ३८).

---

१. ऐ. प्र., पृ. १५८

२. म. रि. पे. बा., पृ. ३९९

साधी पण रसाळ भाषा, उत्कृष्ट वर्णनशैली, निवेदनाचा प्रामाणिकपणा, भावनापूर्ण लेखन इत्यादि वाङ्मयीन गुणांमुळे प्रस्तुत चरित्र पुन्हा पुन्हा वाचावेसें वाटतें.

होळकराची थैली :

पानिपतच्या प्रसंगाची हकीगत एका विशिष्ट दृष्टिकोणाने सांगणारी ही बखर आहे. हिचें दुसरें नांव 'मल्हारराव होळकराची थैली' हें होय. रा. निळकंठराव कीर्तने यांनी ह्या बखरीची एक प्रत मिळविली होती. पुढे तिचें काय झालें तें अज्ञात असल्याचें राजवाडे म्हणतात.[1] ओझर्डे येथील पिसाळांचें दप्तर तपासतांना पानिपतच्या लढाईसंबंधी कांही कागद राजवाड्यांच्या हातीं लागले. त्यांतील पहिलीं १९ पृष्ठें गहाळ झालीं असून २० पृष्ठापासून पुढील हकीगतीचीं पृष्ठें सापडलीं. होळकराच्या थैलीचे हे शेवटले बंद असावे असें राजवाडे म्हणतात.[2] कारण मल्हारराव होळकर ह्यांत आपली कैफियत देत आहे असें भासविलें आहे. आपण पानिपतच्या रणांगणावरून लढाई होत असतांना मध्येच निसटून गेलों तें भाऊसाहेबांच्या आज्ञेवरून गेलों, असें ह्या बखरींत मल्हारराव म्हणतो. पानिपतविषयक हकीगत मल्हारराव सांगत असून स्वतःची बाजू मांडीत आहे, असा या बखरीचा एकंदर सूर दिसतो. प्रस्तुत हकीगतीचीं शेवटचीं एक-दोन पृष्ठें नसलीं, तरी उपसंहाराचा बराच मजकूर उपलब्ध आहे.

या हकीगतीची सुरुवात पठाणांनी कुंजपुरा घेऊन मराठ्यांच्या सैन्याभोवती वेढा दिला येथपासून आहे. मलकाजमानीने सुजायतउद्दोला व अबदुलअली यांच्यांत समेट घडवून त्यांना युद्धास प्रवृत्त केलें ही ह्यांतील हकीगत (पृ. १८४) नवीन दिसते. प्रस्तुत बखरींतील इब्राहिमखानाच्या तोफखान्याच्या वर्णनाला (पृ. १८५) रियासतीचा दुजोरा आहे.[3] 'भाऊसाहेबीं आम्हांकडे निरोप पाठविला की, तुम्ही हत्यार न लावणें. आमची व त्यांची तरवार लागली म्हणजे तुम्हीं सहस्रयोगे न विचारतां निघोन जावें. यांत अंतर कराल तर गोब्राह्मण–वधाचें पातक कराल. जीवित्व अथवा मृत्यु

१. म. इ. सा. खं. ३, पृ. १८२

२. सदर

३. म. रि. पे. बाळाजीराव, पृ. ४३९

आम्हास असो. असें शपतपूर्वक सांगोन पाठविलें' (पृ. १९१). आपल्या कुटुंबास म्हणजे पार्वतीबाईस घेऊन जाण्यासंबंधी वरील आज्ञा भाऊसाहेबांनी मल्हाररावास केल्याचे ही बखर म्हणते. रियासतकार म्हणतात की, पार्वतीबाई स्वतंत्रच परत आली, मल्हाररावाने आणली नाही.[1] मल्हारराव होळकरांची ही एकपक्षीय कैफियत दुसऱ्या पुराव्याने म्हणजे शिंद्यांकडील सरदारांपैकी कोणाचें अस्सल पत्र मिळाल्यास प्रमाण म्हणून ठरेल. तोंपर्यंत बखरींतील मल्हाररावाचें म्हणणें संशयितच धरलें पाहिजे, असें राजवाडे म्हणतात.[2]

एक गोष्ट खरी की, पानिपतच्या लढाईतून मल्हारराव ऐन वेळीं दुष्ट हेतूने परतला हा जो त्याच्यावर आरोप आहे, त्याचें निराकरण निदान ह्या हकीगतीने होणें शक्य आहे असें म्हटलें पाहिजे. शिवाय विंचूरकर घराण्याच्या इतिहासांत 'स्वामीस कोणी कांही सांगो परंतु मल्हारराव यांची कोणतेही प्रकारें कसूर नसून युद्धांत त्यांनी कुचराई अथवा फितूर किंवा सरकारचरणीं कोणतेही प्रकारची प्रतारणा केली नाही. इतकें मात्र झालें की, त्यांनी भाऊसाहेबांस हिताची मसलत सुचवावी, परंतु दुर्दैवेंकरून ती त्यांचें मनास मुळीच येऊ नये' हें वाक्य विठ्ठल शिवदेवाच्या तोंडीं घातलें असल्यामुळे[3] वरील हकीगतीस हाहि उपोद्बलक पुरावा आहे. प्रस्तुत हकीगतीचा लेखनकाल इ. स. १७६१ हा असल्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्याहि ही विश्वसनीय मानणें योग्य होईल.

ह्या बखरींत सुंदर वर्णनें आहेत. मलकाजमानीचें वर्णन करतांना बखरकार लिहितो–'तों स्त्रीधैर्य पूर्वीपासून महत् असें शास्त्रींपुराणीं प्रमाण तें दृष्टोत्पत्तीस आले (पृ. १८५); भाऊसाहेबांचें वर्णन 'भाऊसाहेब धैर्याचे मेरु' (पृ. १८९); तसेंच अबदुलअलीचें वर्णन 'अगास्तिसैन्यसागरशोषक' (पृ. १९१) असें समर्पक केलें आहे.

अबदुलअली बेहिम्मत झाल्यावर मलकाजमानीने त्याला कसें उत्तेजन दिलें ही हकीगत यांत पुढीलप्रमाणे दिली आहे :

---

१. सदर, पृ. ४४१

२. म. इ.-सा. खं.३, पृ. १८२

३. विं. घ. इ. (१८८३) पृ. ४९

'मलकाजमानी तयार होऊन अब्दाल्यांचे मागे होती. पठाण फौजेची अधैर्यता पाहून चिंतागत जाली की, मी याजला बहुतप्रकारें तेज दिल्हें, परंतु योग अघटित आहे. मैदानाची लढाई असती तर होणार समर्थ मानून घोडें चालवितें, आतां कित्येक प्रकारें जंगी सरंजाम गलिमाचा, व दुसरा खंदक. यास काय करतील हें मनांत आणून चिंतार्णवीं पडली. हातिणीवर अंबारींत स्वारी होती. ती खाली उतरली. डेरा उभा केला. उजूतवाजू म्हणजे हातपाय धुवून; तमाम चकताईत म्हणजे मोंगल यांचे पातशाहींत; औरंगजेब, महाबली, पातशहा, पुण्यश्लोक, अवलिया, अवतारी, पूर्वी होऊन गेला, त्याचें स्मरण निश्चयपूर्वक करून मान्यता केली. त्याचें पातशाही निशाण काढून सेवकास आज्ञा केली की, फौजेचे अघाडीस घेऊन जाणें. सुजायतदौला व अबदलअली यांस मिठाई, अंगारा प्रसादिक पाठविला. प्रसादस्पर्शानी अधैर्य अधीरपणा होता तो सर्वांचा जाऊन, पुन्हा शत्रुमर्दनाविशीं निष्ठा दृढतर जाली. तमाम सरदार एकत्र होऊन स्वतां इमानें केली.'[1]

मराठ्यांवर शत्रु चालून आल्यावर त्या प्रसंगाचें वर्णन लेखक करतो—

'आम्हांकडील फौजेस ते दिवशीं तेज अधिक, प्राणघातक, असें दिसोन आलें. दिशा, आकाश, पृथ्वी, शोभाविशोभा, उत्कर्ष जाली......आज आमचें आयुष्य तडीस विसरोन दूर ठेविलें. पंचप्राण एकत्र एक विचारें निशीथ मृत्यु अंगणीं उदित केला. परंतु धारातीर्थी प्रायश्चित्तस्नान करून मार्गावलोकन मात्र आहे......ते दिवशींचा समय सर्वांस विचित्र भासला. उपप्लव नाना प्रकारचे होऊं लागले. आकाशमार्गी घंटानाद व पक्षाचे शब्द भयउत्पन्न होऊं लागले. दिशा, आकाश रक्तवर्ण पाहून आम्ही श्रीमंतांजवळ गेलों. तेथेहि सर्वांचीं क्षीण चित्तें देखिलीं'[2]

हीं वर्णनें काव्यमय असून आकर्षक आहेत. ह्या हकीगतींतील भाऊसाहेबांच्या निर्वाणीच्या प्रसंगाचें वर्णन हृदयद्रावक आहे.

प्रस्तुत हकीगतीची भाषा डौलदार आहे. चटकदार वाक्यरचना हें या हकीगतीचें वैशिष्ट्य होय. उदा. मलकाजमानी सुजाउद्दौलास म्हणते, 'तुमचे पिते मनसूरअल्लीखान वगैरे अमीर होते, त्यांची अमर्यादा करून

१. म. इ. सा. खं. ३, पृ. १८८

२. सदर, पृ. १८९

त्यांचे यशश्चंद्री कालिमा कां लावतां ? पुरुषजन्मास येऊन सार्थक काय करावें.......जहर खाऊन मरावें यांत वैकुंठप्राप्ति व तरवारेचे धारेने मरावें यांत नर्क, असें कांही आज तहकीक तुम्हांस कळलें असेल की काय ? सर्व गोष्टींने तुम्ही पढेफाजल आहां व सर्व किताब जाणून अकलपुरे आहां. मी स्त्रीने युक्त विचार सांगावा, हा पदार्थ नाही. तुमचे विचारास जसें येईल तसें करावें. "[1]

सुंदर उपमा-दृष्टान्तादि अलंकार ह्या बखरींत आहेत. उदा. १. जैसा मृत्यूभयें प्राण पळतां काळ पाठीशीं आहे, तैसे तोफांचे गोळे जिकडे जो जाईल तिकडे मागेच आहेत. (पृ. १८५); २. जसे पंकार्त म्हणजे चिखलाने भरून आर्त जाले ते गंगाप्रवाहीं निर्मल होतात, तसे सुजायतदौला कुबुद्धिमलें व्यापिले होते ते मलकाजमानीचे वचनगंगोदकजलें प्रक्षाळून पूर्वीपेक्षा सुशोभित जाले. (पृ. १८६); ३. पूर्वी कृष्णावताराच्या समाप्तींत भिल्लबाणें चरणकमळीं निमित्य करून निजधाम करिते जाले. तसे श्रीमंत विश्वासराव व भाऊसाहेब संनिध करून मायावंत केले (पृ. १८८); ४ म्हणोन मृत्यु-वधूलग्नसाहित्य दाखविलें (पृ. १८७). ह्या अलंकारांतील सौंदर्य लेखकाच्या स्वतंत्र कल्पकतेचें निदर्शक आहे.

सदर हकीगतींत कांही शब्दांची योजना समर्पक व नावीन्यपूर्ण केलेली आढळते. उदा. १. कहीकहीचा कब्जा मोठा घोरंदर जाहाला (पृ. १८४); २. उद्धट पराक्रम करून प्राण सोडिला (पृ. १८४); ३. दोनी फौजा प्रज्वलित जाहाल्या. दाहा हजार पठाण पायउतार होऊन बाहेर पडोन धीरवीर आले (पृ. १८५); ४. मागाहून घोडे वगैरे यांची घटणी फार जाहाली (पृ. १९१) इ.

चटकदार भाषाशैली, यथार्थ व्यक्तिदर्शन, आकर्षक घटनावर्णन, समर्पक अलंकार या गुणांमुळे प्रस्तुत हकीगतीचा वाङ्मयीन दर्जा उंचावला आहे.

नाना फडणिसाचें आत्मचरित्र :

ह्या आत्मचरित्रांतील हकीगत मुख्यत्वेंकरून पानिपत येथे मराठ्यांची दाणादाण उडाल्यावर नाना परत स्वदेशीं येतांना त्याला आलेल्या विविध

---

१. सदर, पृ. १८६

दुःखद अनुभवांची आहे. प्रस्तुत आत्मचरित्रांत दोन मुख्य भाग कल्पितां येतील. पहिल्या भागांत नानाच्या बालपणची व कुलाची हकीगत असून दुसऱ्या भागांत पानपतहून देशीं येत असतां त्याच्यावर ओढवलेल्या प्रसंगांची हकीगत आढळते. याप्रमाणे नाना फडणिसाच्या आयुष्यांतील कांही विशिष्ट भाग ह्यांत असल्यामुळे हें आत्मचरित्र संपूर्ण नाही.

ऐतिहासिक दृष्ट्या प्रस्तुत चरित्रांतील मजकूर विश्वसनीय मानणें अवश्य आहे याचें एक कारण असें की, नाना फडणिसाने त्यांत स्वतःच्या दोषास्पद वर्तनाचा स्पष्ट उल्लेख केलेला दिसतो व दुसरें असें की, पानपतच्या युद्धानंतर हें आत्मचरित्र लवकरच लिहिलें गेलें.

प्रस्तुत चरित्रांतील उल्लेखिलेल्या दोन घटना शंकास्पद वाटतात. १. 'बळवंतराव मातुल...अनास झाले' असा नानाने उल्लेख केला आहे.[१] बळवंतराव मातुल म्हणजे बळवंतराव मेहेंदळे होत. नानाच्या ह्या विधानाला अन्यत्र आधार सापडत नाही. २. 'मातोश्री घोड्यावरून पडून जखम लागून मेली' (पृ. १७८); भाऊसाहेबांच्या बखरींत 'नाना फडणवीस यांची मातुश्री श्रीभागीरथीचे यात्रेस जावयासि आली होती ती गिलचे यांजकडे सांपडली.' असा उल्लेख आढळतो.[२]

या आत्मचरित्रांतील वर्णनें सुरस आहेत. भाऊसाहेबाविषयी नाना लिहितात, 'श्रीमंत अति बुद्धिवान्, धैर्यवान, शूर, कृतकर्मे गर्व मात्र विशिष्ट, परंतु तर्तुद फारच सैन्याची वगैरे केली' (पृ. १७६). प्रवासांत लागलेल्या सेवावन, कुंजवन इत्यादि पवित्र स्थळांचें वर्णन लेखक पुढीलप्रमाणे करतो. 'कुंज कसें की भगवान् लीला करितो असाच भास होत असावा. सर्वहि वृक्ष छत्राकार ठेंगणे भूमिस्थ पल्लव कंटक वृक्षासहि परंतु कंटक नाही हें पाहून आनंदमय होत्साता यमुनातीरीं रेतींत भगवान् जो याणे बालरूपी लीला केली' (१७५).

भाऊसाहेब पेशवे युद्धांत दिसले नाहीत, त्या वेळचें वर्णनहि असेंच आकर्षक आहे.

---

१. ए प. यादी वगैरे (१९३०), पृ. १७६
२. भा. ब. (१९३२), पृ. १५५

'श्रीमंत दिसेनातसे जहाले. तेव्हा ईश्वरें बुद्धी दिली. माघारे फिरलों. पूर्वी युद्धांत बापूजी पंती बोध केला, माघारे फिरावें त्यास उत्तर केलें की, अशा समयीं श्रीमंतांस सोडणें ठीक नाही. परंतु पुढे या प्रमाणे जहाले. लक्ष सैन्य त्यांत मोठे मोठे सरदार असतां एकहि त्या समयीं श्रीमंतांस आप्त न जहाला. बहुत दिवस अन्न भाक्षिलें, कृपा पुत्रवत् केली. तितकें चांगला काळ होता तेव्हां केशास ढका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा. परंतु ईश्वरघटित विपरीत काळ त्यांत सोबती कोण होतो? सर्व सुखाचे सोबती. भोजन आदरें करून करावें. वस्त्रें, जवाहीर, जागिरा द्याव्या. निदानीं इतक असून ज्यांचे देहाचें ठिकाण कोणास ठाऊक नाही. सर्व वाताहत जहाले'[१]

लेखकाच्या वर्णनकौशल्याचीं हीं उदाहरणें आहेत. ह्यांत लेखकाने वातावरणनिर्मितीहि चांगली साधल्याचें दिसून येतें.

प्रस्तुत आत्मचरित्र हें लेखकाने जिव्हाळ्याने लिहिलें असल्यामुळे त्यांत त्याच्या भावनेचा सुंदर आविष्कार झाला आहे. उदा. पादारविंद संबंधी रेणु रजःकण त्याची प्राप्ती मस्तकीं वंदावया करितां ब्रह्मादिक देव इच्छितात. तेथे जाऊन लोळून ती रेती मस्तकावर घेतली' (पृ. १७५). ह्या वर्णनांत लेखकाची ईश्वरविषयक श्रद्धा स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेली आढळते. तसेंच 'भाऊंची ममता विशेष' या वर्णनांतहि त्याची राजनिष्ठा दिसते.

प्रस्तुत चरित्रांतील भाषा प्रौढ व संस्कृतनिष्ठ आहे. विचार यथार्थपणें व्यक्त करण्याचें सामर्थ्य लेखकाच्या भाषेंत निश्चित आढळतें. भाषेंतील अर्थांचा ओघ अप्रतिहत असा वाहतांना दिसतो. सुरुवातीस लेखकाने केलेलें परमेश्वराचें वर्णन या दृष्टीने उल्लेखनीय आहे. लहान लहान अर्थपूर्ण वाक्यें हा ह्या आत्मचरित्राचा विशेष होय.

उत्कृष्ट भाषापद्धति, सुंदर वर्णनशैली, आवेशपूर्ण निवेदन, कलात्मक आविष्कार, सत्यप्रीति इत्यादि गुणांमुळे प्रस्तुत आत्मचरित्र वाङ्मयीन दृष्ट्या आदर्श असें झालें आहे.

पानिपतची बखर

या बखरीचा विषय पानिपतचें युद्ध हा होय. बखरीची सुरुवात शाहू महाराज छत्रपती ह्यांनी नानासाहेब व भाऊसाहेब या उभयतांस सातारचे

१. ऐ. प. यादी वगैरे (१९३०), पृ. १७७

मुक्कामीं बोलावून 'माझे मागे सकल पृथ्वीचें राज्य करणे ते तुम्हांशिवाय राज्यास धणी कोणी दिसत नाही.' असें सांगून महाराज कैलासभुवनास गेले येथपासून आहे.[१]

प्रस्तुत बखरींतील जाटाने भाऊसाहेबास विश्वास दाखवून 'इराणीसुद्धा भारी फौजेनिशी एकाएकीं दिल्लीस आणिलें' (पृ. १४) ही माहिती बरोबर नाही. कारण जाट हा मराठ्यांचा शत्रू कधीच नव्हता. जाटाला मराठ्यांनी नीट वागविलें नसलें, तरी मराठ्यांशीं त्याचें वर्तन मित्रत्वाचेंच होतें. विशेषतः पानिपतच्या रणसंग्रामानंतर मराठ्यांचे हाल होऊं लागले असतां रणांगणांतून परत येणाऱ्या लोकांस जाटाने चांगल्या रीतीने वागविल्याचे उल्लेख भाऊसाहेबांच्या बखरींत व मराठी रियासतींत आहेत. प्रस्तुत बखरींत श्रीमंताकडील व अबदुलअलीकडील पडलेल्या खासे लोकांची यादी दिली आहे हें ह्या बखरीचें वैशिष्ट्य होय.

बखरकार अबदल्लीच्या पुत्राचें नांव तेजूरशहा असें देतो; पण भाऊसाहेबांच्या बखरींत व मराठी रियासतींत तैमूरशहा असें म्हटलें आहे.[२] ह्या बखरींत अबदल्ली यास 'इराणी' असें सर्व सर्वत्र म्हटलेलें आहे व मराठ्यांचा उल्लेख 'बारगे' असा केलेला आढळतो. ह्यांतील विश्वासरावाचें प्रेत दुराण्यांनी आपल्या गोटांत नेलें, ह्या हकीगतीला रियासतकार दुजोरा देतात.[३] ह्या बखरींत भाऊसाहेब व विश्वासराव पडल्यावर नानासाहेब पुण्याहून निघाले असा मजकूर आहे (पृ. ४६); परंतु रियासतकारांच्या मतें ते अगोदर निघाले.[४] प्रस्तुत बखरींत पानिपतच्या लढाईची तीथ मंगळवार पौष शुद्ध २ अशी लेखक देतो (पृ. ४५). भाऊसाहेबांच्या बखरींत ती बुधवार पौष शुद्ध ८ अशी दिली आहे. रियासतकार तीच देतात.[५] दत्ताजी शिंद्यांचें नांव या बखरींत नाहीं हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. जाटाने एक कोट रुपये लष्करांत पावते केले असें बखरनवीस म्हणतो (पृ. १५); पण ते कोठे पाठविले हें ह्यांत म्हटलेलें नाही.

१. पा. ब. (१८८९), पृ. ७
२. म. रि. पे. बा., पृ. ४७७
३. सदर, पृ. ४१४
४. सदर, पृ. ४४७
५. सदर, पृ. ३८१

ऐतिहासिक दृष्ट्या प्रस्तुत बखरीचें विशेष महत्त्व आहे. युद्धानंतर लवकरच म्हणजे दोन वर्षांनी हिचें लेखन झालें व लेखकाने शत्रूकडील व श्रीमंतांकडील या दोन्ही दफात्यावरून हें लेखन केल्याचें तो म्हणतो (पृ. ४८). ही बखर समकालीन आहे व बखरकार हा माहीतगार इसम असून साधार लिहीत आहे, एवढें प्रामाण्य पुरेसें आहे. रघुनाथ यादवाची बखर अव्वल दर्जाची मानण्यास हरकत नाही असें रियासतकार म्हणतात.[१]

ह्या बखरींतील वर्णनपद्धति आकर्षक आहे. भाऊसाहेबांचें वर्णन करतांना बखरकार म्हणतो, 'भाऊसाहेब केवळ परशुराम अवतार, लढाईची या मृत्युलोकीं कीर्ति करून, मोठमोठ्या शत्रूंचीं पारिपत्यें करून, मरणकाळपर्यंत नानासाहेबांची आज्ञा न उल्लंघितां, दररिकिबीस तरवार फत्ते करून, जन्मप्रभृति जय संपादून......अवतार संपविला' (पृ. ४५).

लढाईस निघालेल्या मराठी सैन्याचें वर्णन बखरींत पुढीलप्रमाणे आहे—

'प्रातःकाल होतांच तमाम फौजेसुद्धा सरदार शिलेपोस तयार होऊन आले. एकापरीस एक, भीमार्जुनासारिखे महावीर, दररिकीबीस तरवार गाजविणारे, अंगीं वीरश्रीचीं वारीं, रणांगणाचा शृंगार करून, घुग्या व बखतरें व टोप, चिलखतें, बिन्या व बिरजे व वस्त्रें तकटी व मुक्तमाला व मस्तकीं तुरे व कलग्या व अंगीचे बारा अलंकार व जरीचे अबदागिरें करून शोभायमान, हातीं पट्टे व गुरगुज व फिरंगाणा व बिचवे व कटारा व पेशकब्जे व वाघनखें व भाले व कोयते व परीध व पट्टीश व फरश व गारभांडी व सांगा व बरच्या, व बंदुका कटीतटीस शस्त्रसंभार बांधून आपआपलाले वाहनारूढ होऊन, अंगीं स्फुरणें अतिशय, युद्धास जावयास अति उदित, स्वामिसेवेशीं तत्पर, अशा आवेशाचे पुरुष हजारों हजार सिद्ध झाले.'[२]

हें वर्णन आकर्षक आहे यांत शंका नाही.

सात तासपर्यंत झालेल्या दुसऱ्या लढाईचें वर्णन किती हळुवारपणें केलें आहे तें पाहण्यासारखें आहे. लेखक म्हणतो—

---

१. सदर, पृ. ४३७

२. पा. ब. (१८८९), पृ. २३

'लढाईची हातघाई झाली. भाला व बिचवे व गुरगुरजे व जमदाडा व वाघनखें यांचे चपेटे फार झाले. एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून पुढचे पाय पुढे टाकूं लागले. कोणी मागे फिरेना. सक्रोध होऊन, अवसानें धरून एकमेकांवर पर्जन्यप्राय कोसळूं लागले. मल्लयुद्धाचें मारणेंच कडोविकडीचें परस्परें दाखवूं लागले. या युद्धांत वांचून पुनः दक्षणेंत जाऊन संसार करावा ही अरुता कोणीं ठेविली नाही. कोणी महाकाल, कोणी कृतांत असे भासले. कितीकांस मूर्च्छना येऊन रणभूमीस निचेष्टित पडले. कितीकांचीं शरीरें त्या गर्दीच्या खंदळींत चिरडून गेलीं. कितीकांचे हातपाय तुटून नुसते कोथळे रणांत राहिले. कितीक वीर भंबाळ होऊन भयंकर दिसूं लागले. कितीक वीरांच्या पाठींतून भाला हृदयापार होऊन आपआपले पुण्याने कोणी विष्णुलोकास गेले, कोणी कैलासास गेले, कोणी सत्यलोकास गेले, कोणी इंद्रलोकास गेले.' [१]

लढाईचा प्रसंग डोळ्यापुढे हुबेहूब उभा करण्याचें अद्वितीय कौशल्य ह्या काव्यात्मक वर्णनांत दिसून येतें.

मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड या सर्वांनी मिळून भाऊसाहेबांची जी समजूत घातली, ती तर हृदयाला पीळ पाडणारी आहे. लढाईपूर्वी विश्वासराव व भाऊसाहेब यांनी परस्परांचा निरोप घेतांना बखरकाराने त्यांचें जें संभाषण दिलें आहे, तें व नानासाहेबांना झालेला शोक हींहि अशींच हृदयभेदक आहेत.

ह्या बखरीची भाषा प्रासादिक आहे, हें उपरिनिर्दिष्ट उदाहरणावरून दिसून येईल. मनांतील भाव बखरकार अत्यंत हळुवारपणें व्यक्त करून प्रसंगाची उत्कटता साधतो, त्यामुळें रसपरिपोष चांगला होतो. हें ह्या बखरीचें वैशिष्ट्य होय.

उपमा-दृष्टान्तादि अलंकार या बखरींत औचित्यपूर्ण आहेत. उदा. 'रामचंद्रासाठीं भरताने अयोध्यापूर सोडून नंदिग्रामीं राहून वैराग्यवत् उदास जहाले, तद्वत् रावनानांनी आरंभिलें' (पृ. ४६); 'त्या समयीं भाऊ कसा भासला की, केवळ कल्पान्तींचा आदित्य' (पृ. ३९); 'हजारों हजार त्या कुरुक्षेत्रीं रणमंचकीं निजलेच राहिले' (पृ. ४५)' इ.

१. सदर, पृ. २५

ह्या बखरीची शैली स्वतंत्र आहे. बखरलेखकाच्या अंगीं भाषाप्रभुत्व असल्यामुळे त्याच्या लेखनाला डौलदारपणा आलेला दिसतो. वर्ण्य विषयाशीं त्याचें तादात्म्य झालें असल्यामुळे त्याचें लेखन जिवंत वाटतें.

अप्रतीम वर्णनशैली, उत्कृष्ट कल्पकता व काव्यात्मकता, वर्ण्य विषयाचा जिव्हाळा, अलंकारांची समर्पक योजना, भाषाप्रभुत्व इत्यादि गुणांमुळे प्रस्तुत बखर वाङ्मयदृष्ट्या सरस आहे.

भाऊसाहेबांची बखर :

मराठेशाहीच्या इतिहासांत पानिपतचा रणसंग्राम हा एक अत्यंत रोमहर्षक प्रसंग आहे. काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात—'पाणिपत हें नांव कानीं आलें किंवा त्याची आठवण झाली की, मनाची चमत्कारिक स्थिति होते. दुःख व अभिमान दोन्हीहि जागृत होतात.'[1]

पानिपतच्या मोहिमेंत मराठ्यांचा पाडाव झाला, तरी तींत त्यांनीं पराक्रमाची शर्थ केली यांत सुतराम् संदेह नाही. मराठ्यांचा पानिपत येथील पराक्रम हा केवळ मराठेशाहीच्याच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. ह्या प्रसंगाच्या हकीगती सांगणाऱ्या सुमारें आठ बखरी उपलब्ध आहेत. त्यांपैकी 'भाऊसाहेबांची बखर' ही विस्तृत हकीगत असलेली एक बखर होय.

प्रस्तुत बखरीचा मुख्य विषय जो पानिपतचें युद्ध, त्याने ह्या बखरीचा दोनतृतीयांश भाग व्यापलेला असून पानिपत-युद्धपूर्व मराठ्यांनी उत्तरेंत केलेल्या राजकारणाचा भाग त्यांत सुमारें एकतृतीयांश आहे. याप्रमाणे ह्यांत इ. स. १७५३ ते इ. स. १७६० पर्यंत सात—आठ वर्षांतील हिंदुस्थानांतील मराठे व इंग्रज यांच्या परस्परसंबंधाचें वर्णन आढळतें. ह्या कालांतील अनेक घडामोडींचें सूक्ष्म चित्र बखरकाराने रेखाटलें आहे. ही बखर लढाई-नंतर दोन वर्षांनी लिहिली असल्यामुळे हिला समकालीन बखर म्हणून संबोधणें योग्य होईल. तत्कालीन शिवाय तद्देशस्थ एका माहीतगाराने ही बखर सजविली आहे एवढ्यावरूनहि ह्या बखरींतल्या घटनांची विश्वसनीयता मानण्यास प्रत्यवाय नाही. हा माहीतगार कोणीहि असो, त्याने जातीने हजर राहून ह्या घटना एक तर जवळून पाहिल्या असाव्यात किंवा

१. पाणिपतची बखर—उपोद्घात

त्यास त्या विश्वसनीय माहीतगाराकरवीं कळत असल्या पाहिजेत. कारण ह्या ऐतिहासिक घटनांची साद्यंत हकीगत त्याला जशी ठाऊक होती तशीच त्याने लिहिली आहे.

ह्या बखरीचें समकालीनत्व सिद्ध झालें, तरी इतर ऐतिहासिक पुराव्याच्या आधारें यांतील घटनांचें स्वरूप पाहिलें पाहिजे. लेखक हा माहीतगार असून आपलेपणाच्या भावनेने तो लिहितो. असें असूनहि ह्यांतील कित्येक ऐतिहासिक घटना विश्वसनीय मानणें कठिण आहे.

बखरींतील कुंभेरीच्या वेढ्याची हकीगत बरीच विस्तृत आहे. इतकी विस्तृत हकीगत अन्यत्र आढळत नाही. ह्या बखरींत मारवाड प्रांतीं अबेसिंग व ढोकळसिंग हाडे दोघे भाऊ होते असें बखरकार म्हणतो.[1] मराठी रियासतींत अभयसिंगास ढोकळसिंग म्हणजे विनाशकर्ता हें टोपणनांव त्याच्या कृतीवरून प्रसिद्ध झाल्याचें म्हटलें आहे.[2] बखरींतील जयाप्पाचा खून झाल्यावर 'इंदुरास मल्हारराव यांणी ऐकोन बाह्यार्थ श्रमी जाहाले' (पृ. १९). ह्या वाक्यावरून जयाप्पाच्या मृत्यूस मल्हारराव होळकराने फूस दिली असा ध्वनि निघतो त्यास बिलकूल आधार नाही, असें रियासतकार म्हणतात.[3] मारवाडच्या बिजेसिंगाने शरण येऊन दत्ताजीशीं जो तह केला त्यांत बिजेसिंगाचा पुतण्या रामसिंग ह्यास अजमेर हें ठाणें दिल्याचें बखरकार सांगतो (पृ. २०); परंतु अजमेर शिंद्यास मिळालें असें मराठी रियासत म्हणते.[4] नजीबखान मराठ्यांस सापडल्यावर मल्हाररावाने त्यास दिल्लीच्या किल्ल्यापासून काढून आपणापाशी ठेवला, असें बखरींत म्हटलें आहे (पृ. ३९); पण पुनः दिल्लीच्या भानगडींत पडणार नाही असा करार करून नजीबखान मोठ्या कष्टाने दिल्ली सोडून गेल्याचें रियासतकार सांगतात.[5] 'बचेंगे तो और बी लढेंगे' (पृ. ८२) हे बखरींतले दत्ताजी शिंद्याचे बाणेदार उद्गार मान्य करूनहि रियासतकार म्हणतात—'दत्ताजीच्या

१. भा. व. (१९३२), पृ. ७
२. म. रि. पे. बा. (१९५३), पृ. २७४
३. सदर, पृ. २८१
४. सदर, पृ. २८४
५. सदर, पृ. ३०६

वधाचीं व लढाईचीं रोमहर्षक वर्णनें बखरींत व इतरत्र आढळतात तीं उघड उघड लोकवार्तेनें विकृत बनविलेलीं आहेत.'[१] बखरींत भाऊसाहेबास उत्तरेंत पाठवितांना पेशव्यानें आवेशाच्या भरांत किंवा बायकोच्या शिकवणीवरून तसा प्रकार केल्याचा जो ध्वनि निघतो (पृ. १०७), तो चुकीचा किंवा बाष्कळ असून त्यांत कोणत्याहि बाबतींत पेशव्यांचा गाफिलपणा आढळत नाही, असें रियासत सांगते.[२] राजवाड्यांचेहि असेंच मत आहे. ते म्हणतात– 'बाळाजी बाजीरावानें सदाशिवराव भाऊंची जी निवड केली ती यथायोग्य होती.'[३] रुपये पाडण्यासाठी छत तोडलें म्हणून जाट सोडून गेला, असें बखरकार लिहितो (पृ. ११७); हें खरें नाही. रियासतकारांच्या मतें जाट हा मराठ्यांचा शेवटपर्यंत मित्रच होता.[४] बळवंतराव मेहेंदळ्यांच्या मृत्युअगोदर गोविंदपंत बुंदेल्यांच्या मृत्यूचा मजकूर बखरकार देतो (पृ. १३७). रियासतींत मेहेंदळ्यांच्या मृत्यूनंतर बुंदेल्याच्या मृत्यूची हकीगत आहे.[५] 'भाऊसाहेब याची गत कैशी जाली, हें न कळे' असें बखर सांगते (पृ. १५३); रियासतकार म्हणतात– 'भाऊसाहेब रणांगणावर मृत्यु पावले.'[६] काशीराजाच्या बखरींतहि असेंच म्हटलें आहे. 'नानासाहेब भाऊसाहेबाच्या शोकें निधन पावले' असें लेखक म्हणतो (पृ. १६३); परंतु रियासतकार म्हणतात– 'प्रधानपंत क्षयाची व्यथा होऊन वारले' असें स्पष्ट विधान चिटणिसी बखरींत आहे, तेंच सत्य मानावें लागतें.[७]

प्रस्तुत बखरींत 'तो दिवस शके १६८२ सोळाशे ब्यांयशीं पौष शुद्ध ८ बुधवासर होता. विक्रमनाम संवत्सर होता' (पृ. १४३) व 'शके १६८३ ज्येष्ठ वद्य सप्तमी, मंगळवासरीं (नानासाहेबास) देवाज्ञा जाली' (पृ. १६३) ह्या दोनच कालांचा स्पष्ट उल्लेख आढळतो. बहुतेक ठिकाणीं 'इतरत्र', 'इकडे', 'तों', 'मग', 'इतकियांत', 'दुसरे दिवशीं',

१. सदर, पृ. ३४३
२. सदर, पृ. ३५३
३. ऐ. प्र., पृ. ६४
४. म. रि. पे. बा., पृ. ३६८
५. सदर, पृ. ३९३
६. सदर, पृ. ४१२
७. सदर, पृ. ४५२

' उपरांतिक ', ' यांवर ' अशा शब्दांची योजना करून कालनिर्देश केल्याचें दिसून येतें. समकालीन लेखकास कालनिर्देशाचें महत्त्व न वाटणें स्वाभाविकच आहे. राजवाडे म्हणतात, ' बऱ्याच चुका गाळल्या असतां भाऊसाहेबांची बखर बहुतेक विश्वसनीय आहे. '[१] रियासतकारांच्या मतें ' भाऊसाहेबांची बखर हा लेख अव्वल दर्जाचा मानण्यास हरकत नाही. '[२]

भाऊसाहेबांच्या बखरींत व्यक्तिवर्णन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धतीने केलेलें आढळतें. उदा. ' ते समयीं भाऊसाहेब यांस परम आनंद होऊन गर्व बहूत जाला होता. यशाच्या फुंदांत निमग्न जाहाले होते. तों गर्वाचें घर खालीं. ईश्वरास साहेना (पृ. १०२); आम्ही कांही दक्षण सोडून तुमचे बळावर आलों नाही. आमचे चित्तास येईल तसें करूं (पृ. ११७); ह्यावरून भाऊसाहेबांच्या व्यक्तित्वाची पूर्ण कल्पना येते. ' नजीबखान रोहिला मात्रागमनी ' (पृ. ४६) या वाक्यांत नजीबखानाचा स्वभाव स्पष्टपणें प्रतिबिंबित होतो. ' तुम्ही नजीबखान याचें पारिपत्य कराल तर तुम्हांस पेशवे धोत्रें बडवावयास लावतील' (पृ. ४८) हे मल्हारराव होळकराचे उद्गार त्याच्या स्वभावावर प्रकाश टाकतात. ' बचेंगे, तो और बी लढेंगे ' (पृ. ८२) या दत्ताजी शिंद्याच्या तेजस्वी उद्गारांत त्याचें कर्तृत्व साठविलेलें आहे. ' यश प्राप्त जालें तरिच भाऊस तोंड दाखवावें, नाही तरि तिकडेच मरावें ' (पृ. १३७) हें बळवंतराव मेहेंदळ्यांचें उत्कृष्ट व्यक्तिदर्शन होय. दत्ताजी शिंद्यांच्या मृत्यूनंतर भागीरथीबाईचें तेजस्वी भाषण व जनकोजी शिंद्यांचा पराभव झाल्यावर गौतमाबाईने मल्हाररावास दिलेलें उत्तेजन हीं त्या व्यक्तींचें यथार्थ व्यक्तिदर्शन घडवितात. याप्रमाणे ऐतिहासिक व्यक्तींचें चित्र बखरकाराने कलात्मकतेने रेखाटलें आहे. निरनिराळ्या प्रसंगांतून संवादाच्या द्वारा त्या त्या व्यक्तींचे स्वभावविशेष ह्या बखरींत सूचित झालेले दिसून येतात. यथार्थ व्यक्तिदर्शन हा ह्या बखरीचा एक वाङ्मयगुण आहे.

प्रस्तुत बखरींतील कांही वस्तुवर्णनेंहि उल्लेखनीय आहेत. कुंभेरीच्या किल्ल्याचें वर्णन करतांना बखरकार लिहितो. ' तो दुर्ग असाध्य, सलाबत, मोर्चे चालवून सुरुंग लावावे तरि रान रेतीचें. सुरुंगास यत्न नाही. तोफ

१. ऐ. प्र., पृ. १०८
२. म. रि. पे. बा., पृ. ४३७

नीच धरली तर गोळा रेतींत जातो' (पृ. ३). हें वर्णन इतकें यथार्थ आहे की, त्यामुळे वेढ्याच्या घटनेची कल्पना येऊं शकते. आग्र्याच्या किल्ल्याचेंहि वर्णन असेंच मार्मिक आहे. शुक्रताल व मुचकुंदतीर्थ याचें वर्णन पौराणिक पार्श्वभूमीवर केलें असल्यामुळे तें आकर्षक वाटतें.

व्यक्तिवर्णन व वस्तुवर्णन यांच्याप्रमाणे घटनावर्णन हेंहि उत्कृष्ट झाल्याचें ह्या बखरींत दिसतें. उदा. दत्ताजी शिंद्याच्या मृत्यूच्या हृदयद्रावक प्रसंगाचें वर्णन बखरकाराने इतक्या आवेशपूर्ण भाषेंत केलें आहे की, तें वाचतांना मन क्षणभर विषण्ण झाल्याशिवाय राहत नाही. बखरकार म्हणतो—

"कुतुबशहा याने अंबारींतून खाली उतरून जवळ आला. तों दत्ताजी शिंदे उताणे पडले होते. येथे कुतुबशहा याने जाबसाल केला की, 'पटेल, हमारे साथ तुम और लढेंगे?' म्हणोन पुसलें. दत्ताजी शिंदे सावध होते. त्यास पुरतें उमजलें की, 'हे कांही आपणास वांचवीत नाहीत, मग व्यंग गोष्टी सांगणें हें विहित नव्हे.' म्हणोन दम बांधोन जाबसाल केला की, 'निशा अकताला! बचेंगे तो और बी लढेंगे.' असें ऐकतांच कुतुबशहा याने कमरेचा सुरा ओढून, लाथेने ढकलून, पालथा घालून, दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद केला. राघोबा पागे व राजाराम चोपदार याने बहुत ग्लानता केली की, 'साहेब, इस्को बचाव, क्रोड रुपये पाहिजे तरि देऊं' म्हणोन बोलिले. परंतु त्याने ऐकलें नाही. आपलें महत्कार्य केलें."[१]

बळवंतराव मेहेंदळ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीने केलेल्या शोकाचें वर्णन करतांना बखरकार लिहितो ––

'हें वर्तमान बळवंतराव यांची स्त्री डेरियांत होती, तिने ऐकून तैशीच बाहेर आली. मुडदा पाहून क्षणभर स्तब्ध होऊन बोलती जाली की, 'राव आम्हास टाकून गेले. अतएव अहेवपण हरलें. आता आपण राहाणे उत्तम नाही नाही.' म्हणोन रुदन न करिता मुरदियापाशी बैसली. बळवंत-राव यांचें मुख अवलोकन करून, पूर्व सुख आठवून बोलों लागली की, 'राव! तुम्ही आम्हावर कां रुसला? आमचे हातचा विडा कां घेत नाही? आम्ही तुमचें काय केलें? आम्हाशी बोलून गेलिया एक प्रहर लोटला

१. भा. ब. (१९३२), पृ. ८२

नाही! ईश्वरें आम्हास एवढें निर्वाण कां दाखविलें? राव यांणी सर्व संपत्तीची व आमची आस्था सोडून गेले!'[1]

ह्या शोकाच्या वर्णनाला दुसरी तोड नाही, इतकें तें परिणामकारक झालें आहे.

ह्याचप्रमाणे गोविंदपंत बुंदेल्यांच्या मृत्यूसमयीं दिसून येणारी त्यांची असहायता, लढाईतील बळवंतराव मेहेंदळ्यांचें अनुपम शौर्य, भाऊसाहेबांच्या पश्चात् पार्वतीबाईची अवस्था, मराठ्यांचा पळ व नानासाहेबांचा शोक ह्या प्रसंगाचें वर्णन हृदयाला चटका लावणारें आहे यांत शंका नाही.

भाऊसाहेबांच्या बखरींतील घटनावर्णनाचें वैशिष्ट्य असें की, ज्या घटनांचें वर्णन करावयाचें तें मोजक्या पण परिणामकारक अशाच शब्दांत करून ते प्रसंग वाचकांपुढे निर्माण करावयाचे व त्याला सत्याभासाची अनुभूति आणून द्यावयाची. आकर्षक घटनावर्णनामुळे ह्या बखरींतील मूळ प्रसंगांना गतिमानता आली आहे. त्यामुळेच सुरुवातीपासून शेवटपर्यंत निवेदनाचा ओघ टिकलेला दिसतो. चित्तवेधक घटनावर्णन हा ह्या बखरीचा प्रभावी गुण होय.

वातावरणनिर्मित्तीच्या दृष्टीने बखरकाराने दुय्यम व्यक्तींचा पार्श्वभूमि म्हणून चांगला उपयोग केला आहे. उदा. मेहेंदळ्यांच्या पत्नीच्या शोकाच्या वेळचें वर्णन करतांना बखरकार लिहितो, 'तों जवळ पुत्र आपाराव बळवंत हे मूल होते. बारा वर्षें जालीं होतीं. त्याणी मातुश्रीचे ओटींत शिरून दाटीवोटी धरून बोलूं लागले की, 'आम्हास सोडून राव निघोन गेले. आणि तुम्ही समागमे सहगमन जाऊ म्हणतां तेव्हां आम्ही अन्नपाणी कोणास मागावें? व कोणावर रुसावें? असें ऐकून बाई बोलती जाली की, 'बापा तुम्ही अन्नपाणी ईश्वराजवळ मागावें, आणि ईश्वरावरच रुसावें. आतां आम्हास मिथ्या मायाजाळांत गोवूं नये.' म्हणोन त्यांस ढकलून दिलें.[2] आपाराव याच्या उद्गारामुळे बळवंतरावाच्या स्त्रीच्या शोकाची तीव्रता अधिक वाढून बखरकाराने पुढे तिच्या तोंडीं 'आम्ही प्रपंचाचें रहस्य संपूर्ण अनुभवलें

१. सदर, पृ. १३९
२. सदर, पृ. १४०

आता आस्था कांही राहिली नाही ' हें वाक्य घातल्यामुळे, मूळ शोकात्मक प्रसंगाला अधिक उठाव मिळालेला दिसतो.

दत्ताजी शिंदे पडल्यावर त्यांची पत्नी भागीरथीबाई हिला झालेल्या शोकाची तीव्रता जनकोजी यांनी डोळ्यास पाणी आणून ' बाई, काका कोठे आहेत ? ' या प्रश्नाने अधिक वाढली आहे. ह्या बखरींत भाऊसाहेब, दत्ताजी शिंदे, मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहेंदळे ह्या व्यक्ती नजीबखान, सूरजमल जाट, कुतुबशहा, अबदाली ह्या विरोधी व्यक्तींच्या पार्श्वभूमीवर विशेष प्रभावी दिसतात. शिंदे व होळकर ह्यांच्या पार्श्वभूमीमुळे भाऊसाहेब व बळवंतराव ह्यांचें व्यक्तिचित्रण उठावदार झालेलें दिसतें.

स्वकीयांचा गौरव व परकीयांचा तिरस्कार ही बहुतेक बखरकाराची भूमिका याहि बखरींत आवेशपूर्ण भाषेंत विविध प्रसंगांतून व्यक्त झाली आहे. त्यामुळे बखरीच्या वाङ्मयगुणांत भर पडल्यास नवल नाही.

स्वकीयांसंबंधी अभिमानाची भावना कांही प्रसंगांत नाट्यात्मक पद्धतीने व्यक्त झालेली आढळते. उदा. १. 'त्यासहि मल्हारराव याची मर्जी ठावकीच होती की, मल्हारराव जें बोलेल तें करील, यांत संदेह नाही' (पृ. ४); २. 'सखारामबापू केवळ निधडे मनसबेबाज याणी उत्तर केलें, ' शिंदे याजकडून अशी गोष्ट घडावयाची नाही. घडली असलियास साहेबांचे अनहित करणार नाहीत. ही खातरजमा असो द्यावी ' (पृ. ६). इ.

परकीयांविषयी तिरस्कार पुढील कांही अर्थपूर्ण वाक्यांत दिसून येतो. १. 'नजीबखान रोहिला मात्रागमनी. जन्मस्थानीं लघुशंका करणार (पृ.४६). २. ' दुराणी केवळ कठोर, निर्दय, ' गौ घास खाती, बेजान करो, अल्लाका डेरा दिखलाव ' म्हणोन शिरच्छेद करावा' (पृ. १०१) इ.

पानिपतच्या रणसंग्रामाची हकीगत सांगतांना बखरकार स्वकीयांच्या हालचालींचें प्रामुख्याने निवेदन करतो व स्वकीयांच्या हालचालींना प्रसंगाच्या दृष्टीने पोषक एवढ्याच परकीयांच्या हालचालींना त्याने बखरींत स्थान दिलें आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सुभाषितांची सुंदर पखरण हें या बखरीचें वैशिष्ट्य होय. उदा. १. भाग्य अभाग्य काळपरत्वें येतें जातें (पृ. २१); २. स्त्रीबुद्धिः प्रलयं गता

(पृ. २९); ३. नकटें असावें परंतु धाकटें असों नये (पृ. ५१); ४. मेरे मनमे कछु और । कर्ता के कछु और । उधो माधो कहे । झूटी मनकी दौर। (पृ. ८८). हीं सुभाषितें समर्पक असून तीं प्रसंगानुरूप वापरलीं आहेत. हिंदी दोहऱ्यांचा योग्य उपयोग हा ह्या बखरीचा विशेष सांगतां येईल.

आकर्षक उपमा–दृष्टान्तादि अलंकार ह्या बखरींत आढळतात. उदा. १. दुकाळियास मिष्टान्न मिळतें तसें जाहालें (पृ. २१); २. जसे भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली (पृ. २७); ३. जसा डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली (पृ. ४२); ४. तुपाचे घागरीवर उंदिराचें पिटकुलें बसतें, तैसा प्रकार जाहाला (पृ. ४५); ५. मुरगी मारी बचडे दाणादाण तैसे जिकडील तिकडे पळाले (पृ. १३०) ६. दुधाचे रांजणींत कांज्याचे शिंतोडे (पडतात) किंवा धनलोभियाचें धन जातें, अथवा राजा दशरथास कैकयेचे शब्दबाण, किंवा जानकी-हरणीं राजा रामचंद्र, किंवा रुक्मिणी–सैवराचे समयीं शिशुपाळ राजास जैसी गत अपमान जाला, तैशी गत भाऊसाहेब यांची जाली (पृ. १०३). हे अलंकार औचित्यपूर्ण आहेत ह्यांत शंका नाही.

प्रस्तुत बखरीची भाषा प्रासादिक आहे. उचित संबोधनात्मक शब्दांमुळे लेखकाची भाषा प्रभावी झालेली दिसते. उदा. 'यार हो, आतां जिदेचा मजकूर आहे' (पृ. १३३). फारसी व मराठी भाषांतील शब्दांमुळे ती विशेष परिणामकारक झाल्याचें आढळतें. उदा. १. आजपासून सहा महिन्यांत पादशाहा आदि करून कुल दिल्लीस बंदरका विकार दिखलावूं तरच मिशी बाळगूं ! (पृ. २६) २. यार हो ! भागो मत, मराठियाचे गनिमी काम आहे. अब सायतमे उलट आन पोहंचतात. मारो ! मारो ! (पृ.८४)इ.

बखरकाराने कांही अर्थपूर्ण शब्दांची योजना केलेली आहे. उदा. १. दातनिसकीस येऊन तिकडून घोडे घातले (पृ. ५७); २. ते तिकडेच राणभरी जाहाले (पृ. ७८); ३. हुतुतूची घाई घडीभर जाली. (पृ.१३४) इ. ह्या शब्दप्रयोगांमुळे बखरीच्या अर्थसौंदर्यांत निश्चित भर पडलेली दिसते.

प्रस्तुत बखरीची एक स्वतंत्र शैली आहे. ह्या शैलीचें स्वरूप बखरींतील भाषासौंदर्य व विचारसौंदर्य यांत व्यक्त झालेलें दिसतें. विशेषतः विविध

प्रसंगांतील रसात्मकतेंत ती शैली परिणामकारक रीतीने आविष्कृत झाली आहे. आवेशपूर्ण वक्तृत्व हा ह्या शैलीचा विशेष होय.

भाऊसाहेबांची बखर उपरिनिर्दिष्ट गुणांमुळे उत्कृष्ट झाली आहे. इतर कोणत्याहि बखरीपेक्षां तींत अधिक वाङ्मयगुण आहेत. ही बखर केवळ जुन्या गद्याचा नमुना नसून मराठी भाषेचें वैभव आहे. 'हा ग्रंथ वाचतांना मराठ्यांच्या महाभारताचाच आपण एक पर्व वाचीत आहों असें वाटतें '[1] हें श्री. भालचंद्र यांचें मत मान्य होण्यास प्रत्यवाय नाही. इतिहास आणि वाङ्मय ह्यांचा इतका सुरेख संगम इतरत्र क्वचितच आढळतो.

श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत :

पानिपतयुद्धविषयक ही बखर असून यांत भाऊसाहेब आंबेपडदुराहून निघाल्यापासून पानिपतचें युद्ध होईपर्यंतचा थोडक्यांत इतिहास आहे.

प्रस्तुत कैफियतींत शके १६८२ (इ. स. १७६०) या सालीं विजयादशमीच्या मुहूर्तानें उभयतां (भाऊसाहेब व विश्वासराव) डेऱ्यास दाखल झाले असें म्हटलें आहे.[2] मराठी रियासतींत ता. १ ऑक्टोबर इ. स. १७५९ रोजीं दसऱ्याच्या मुहूर्तानें त्यांनी गारपीरावर डेरे दिले असा उल्लेख आढळतो.[3] शके १६८२ (इ. स. १७६०) च्या पौषांत पानिपत झालें हें मान्य केल्यास कैफियतींत उद्‌गीरच्या लढाईपूर्वीचें दिलेलें साल बरोबर नाही. भाऊसाहेबांच्या खून कटासंबंधी 'ते दिवशीं अक्काजणांची ते समयीं यांचींहि डोचकीं मारिलीं.' असें लेखक म्हणतो (पृ. ३); परंतु रियासतकार म्हणतात, 'खुनी सापडला. त्यांनी नांवें घेतली त्यांसुद्धां एकंदर आठ असामींचीं डोकीं मारिलीं.'[4] कैफियतींत भाऊसाहेबाकडून पेशव्याकडे तीन पत्रें गेल्याचा जो उल्लेख आहे (पृ. १८), त्यासंबंधी रियासतकारांनी साशंकता व्यक्त केली आहे. रियासतकार म्हणतात की, अब्दालीने मराठ्यांच्या छावणीस इतकें घेरून घेतलें की, पत्रें मुळी बाहेर

१. मनोरंजन (एप्रिल १९११), पृ. २१७
२. भा. कै. (श. १८०९), पृ.१
३. म. रि. पे. बा., पृ. १२९
४. सदर, पृ.१२६

जाऊंच शकलीं नाहींत.[1] राजवाड्यांच्या मतें कांही लहानसहान चुका गाळल्या असतां भाऊसाहेबांची कैफियत बहुतेक पूर्णपणें विश्वसनीय आहे.[2] रियासतकारहि असाच अनुकूल अभिप्राय देतात.[3]

ह्या बखरींतील वर्णनें सुंदर आहेत. भाऊसाहेबांविषयी लेखक म्हणतो, ‘शिपाईगिरी भाऊसाहेबांची म्हणावी तैशी जाली की, ज्याचें नांव शिपायागिरी’ (पृ. २३). हें वर्णन यथार्थ आहे. उदगीरच्या लढाईचें वर्णन ‘सर्वत्रांनी हिंमत धरून हल्ल्यास उठले. तोफेची रंजक एक झडली’ (पृ. ५) असें मार्मिकपणें केलेलें आढळतें. पानिपतच्या लढाईचें वर्णनहि ‘मातबर मराठे धर्माची शर्थ करून ठार जाले (पृ. २४) असें अत्यंत समर्पक आहे ‘बहुत जुंज मातबर केलें तें कोठवर ल्याहावें’ (पृ. २४). हा कैफियतकाराचा विनय आदरणीयच म्हटला पाहिजे.

परिणामकारक भाषाशैली हें ह्या बखरीचें वैशिष्ट्य होय. उदा. मारामारी होतां होतां भारी खणाखणी झाली (पृ. २३); जातीनिशी तरवार सीमेपरती केली (पृ. २४); पृथ्वीनें रक्त प्राशन केलें (पृ. २५). आटोपशीरपणें अर्थव्यक्ती करण्याचें लेखकाचें हें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. लेखनांतील हा संयम लेखकाने अथपासून इतिपर्यंत कटाक्षाने पाळलेला दिसतो.

बखरकाराने पानिपतच्या युद्धांत झालेल्या मराठ्यांच्या नाशाची कारणमीमांसा अत्यंत मार्मिकपणें केली आहे. तो म्हणतो, ‘फौजा हटाने कधी केल्या होत्या ? आपल्या लष्करांत भोवता खंदक खाणून कोण राहिलें होतें की काय ? उत्तम प्रकारें गाठ पडली तरि जुंज द्यावे नाही तरि पळोन जावें. हा मराठधर्म पुरातन चालत आला आहे, तेणेकरूनच पृथ्वी जिंकिली होती. तें सोडून अविंधी धर्माचा स्वीकार केला आणि लोक दरोबस्त व घोडीं मारविलीं. ईश्वरसत्ता ! उपाय काय ? नानासाहेब व भाऊसाहेब ईश्वरी अवतार धरून या युगीं चरित्र केलें.’[4] ह्यांत लेखकाच्या भावनेचा आविष्कार उत्कृष्टपणें झालेला दिसतो.

---

१. सदर, पृ. ३९८

२. ऐ. प्र., पृ. १०८

३. म. रि. पे. बा., पृ. ४३७

४. भा. कै., पृ. २६

डौलदार भाषापद्धति, लेखनसंयम, निवेदनकौशल्य व वर्ण्यविषयक जिव्हाळा इत्यादि गुणांमुळे प्रस्तुत कैफियत वाङ्मयदृष्ट्या आकर्षक झाली आहे. रियासतकार म्हणतात, 'भाऊसाहेबांची बखर तर कैफियतीचीच वाढविलेली व भाषेने सजविलेली आवृत्ति म्हणतां येईल.' [1] ह्यावरून ह्या कैफियतीची योग्यता कळून येण्यासारखी आहे.

सोनपत पानपत येथील मराठे दुराणी युद्ध :

विरुद्धपक्षीय माणसाने पानिपतच्या युद्धाची 'चक्षुर्वै सत्यं' ह्या न्यायाने लिहिलेली ही साद्यंत हकीगत आहे.

प्रस्तुत हकीगतीचा लेखक काशीराजपंडित हा ह्या युद्धांत प्रत्यक्ष हजर होता. मराठे आणि नबाब सुजाउद्दौला यांचे पूर्वीचे परस्पर सलोख्याचे संबंध ठेवण्याची कामागिरी तो पार पाडत होता, असें या बखरीवरून दिसतें. सुजाउद्दौला हा मराठ्यांचा अभिमानी व दोस्त असून नजीबखानाच्या दडपणामुळे दुराण्यास मिळाला होता. त्याचें व त्याचा कारभारी काशीराज ह्याचें मराठ्यांशीं वागणें अत्यंत सभ्यपणाचें होतें. आपणांस मिळण्याबद्दल भाऊंनी नबाबास कळविल्यावर त्यासंबंधी बोलणीं करण्यासाठी काशीराजाची योजना झाली होती. [2] लढाईनंतर सुजाउद्दौलाने केलेला भाऊसाहेबांच्या प्रेताचा शोध हा त्याच्या मराठ्यांवरील उत्कट प्रेमाचा निदर्शक होय. भाऊसाहेबांच्या प्रेताला नबाबाने शहाच्या परवानगीने काशीराजाकडून करविलेला अग्निसंस्कार हा त्याच्या उच्च संस्कृतीचा निदर्शक आहे. मराठे व नबाब ह्यांच्या परस्परसंबंधाचें हें वर्णन इतिहासदृष्ट्या महत्त्वाचें होय.

राजवाडे ह्यांनी प्रस्तुत बखरींतील कांही ऐतिहासिक दोषांचें दिग्दर्शन पुढीलप्रमाणे केलें आहे—१. बाळाजी बाजीराव ख्यालीखुशालींत मग्न असे. पण १७३८ पासून १७६१ पर्यंत वर्षांतून आठ नऊ महिने बाळाजी पुण्याच्या बाहेर असे. २. सदाशिवरावाला रामचंद्र मल्हाराची लहानपणापासून शिक्षा होती म्हणून काशीराज म्हणतो; परंतु सदाशिवरावाची व रामचंद्र मल्हाराची गाठ १७५० त पडली. त्यापूर्वी भाऊला बाळाजीची शिक्षा होती. ३. रघुनाथरावाच्या लाहोरच्या स्वारींत जनकोजी

१. म. रि. पे. बा., पृ. ४३७
२. विविधज्ञानविस्तार, डिसेंबर १८७१

शिंदे होता म्हणून काशीराज लिहितो; तेंहि निराधार आहे. ४. उदगीरची लढाई काशीराजाला माहीत नसावी असें दिसतें. ५. भाऊ उद्दाम झाला म्हणून काशीराजाचें म्हणणें आहे; परंतु, भाऊचीं गोविंदपंताला गेलेलीं पत्रें किती सौम्यपणाने लिहिलेलीं आहेत हें पाहिलें म्हणजे उद्दामपणाचा आरोप भाऊंवर आणणें मुष्कील होतें. ६ दत्ताजी शिंदे नजीबखानाशीं युद्ध करीत असतां रणांत पडला व त्या वेळीं अबदाली दूर अंतर्वेदींत होता अशी काशीराजाची माहिती आहे; परंतु ती निराधार आहे. ७. भाऊने दिल्लीस तळ दिल्यावर सुजाउद्दौला अबदालीस मिळाला म्हणून काशीराज म्हणतो; परंतु भाऊ दिल्लीस येण्याच्या अगोदर सुजा अबदालीला मिळाला होता. ८. कुंजपुरा घेतल्यावर भाऊ दिल्ली शहरास परत आला व तेथे दसऱ्यास त्याने आपल्या सैन्याची गणती केली, असें काशीराज लिहितो; परंतु कुंजपुऱ्यास गेल्यावर भाऊ दिल्लीस कधी आलाच नाही. ९. संभाळकिया येथील लढाईंत अबदाली विजयी झाला म्हणून काशीराजाचें म्हणणें आहे; परंतु त्या लढाईंत मराठे शेर झाले म्हणून कृष्ण जोशी लिहितो. १०. गणपतराव (बळवंतराव ?) मेहेंदळ्यांच्या अगोदर गोविंदपंत वारला म्हणून काशीराज लिहितो; परंतु ती चूक आहे.[१] रियासतकारांच्या मतें 'पेला तोंडोंतोंड भरला. एक थेंबही जास्त रहाण्याला जागा नाही. जर कांही होण्याजोगें असेल तर करा. नाहीतर एकदम स्पष्ट उत्तर येऊं द्या. या उपर पत्र लिहिण्याला किंवा बोलण्याला वेळ मिळणार नाही' हा काशीराजाने वर्णिलेला शेवटच्या चिठ्ठीचा प्रकार खरा नाही.[२]

राजवाडे व रियासतकार ह्यांनी दाखविलेल्या वरील चुका तपशीलाच्या आहेत. 'या सर्व गोष्टी घडून गेल्यावर पुष्कळ दिवसांनी आठवणीने ही हकीगत लिहिली आहे तरी इजमध्ये कोणतीहि एखादी मोठी गोष्ट राहून गेली असेल असें मला वाटत नाही' हें बखरींतलें शेवटलें वाक्य लक्षांत घेतल्यास उपरिनिर्दिष्ट चुकांची कारणमीमांसा कळण्यासारखी आहे.

बखरकाराच्या लेखनविषयक प्रामाण्याचें प्रत्यंतर ही हकीगत वाचतांना पदोपदीं येतें. लेखकाच्या चुका मान्य करूनहि राजवाडे म्हणतात– 'त्याने

---

१. ऐ. प्र., पृ. १०८

२. म. रि. पे. बा. टीप, पृ. ४००

स्वदृष्टीने जेवढें पाहिलें तेवढें बहुशः खरें आहे.''[1] ह्या दृष्टीने पाहतां वरील कांही अपवाद सोडून ही ग्राह्य मानणें योग्य होय. विरुद्ध पक्षीय माणसाने लिहिलेली हकीगत म्हणून ह्या बखरीचें स्वतंत्र ऐतिहासिक मूल्य आहे.

सदर हकीगतीचें मराठी भाषांतर इतकें चांगलें झालें आहे की, तें स्वतंत्र वाटावें. भाषेचा सोपेपणा व प्रवाहीपणा हें ह्या भाषांतराचे विशेष होत. ' जे कोणी या सर्व घडामोडी नीट लक्षांत आणून विचार करतील त्यांची खात्री होईल की, परमेश्वराने मराठ्यांचा गर्व व दांभिकपणा हरण करण्याकरिता आमदशहा दुराणी हें एक मध्ये पात्र उत्पन्न केलें, कारण 'ईश्वराला गर्व सहन होत नाही.' हें शेवटचें वाक्य चटकदार असून बखर-लेखकाचा भाव त्यांत स्पष्टपणें व्यक्त झालेला दिसतो. पानिपतच्या महत्त्वपूर्ण घटनेची भाषांतरित बखर ह्या दृष्टीने प्रस्तुत बखरीचें विशेष महत्त्व आहे.

गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचें आत्मचरित्र :

ह्या आत्मचरित्रांत गंगाधर शास्त्र्यांनी पेशव्यांच्या वाड्यांत वयाच्या आठव्या वर्षी (इ. स. १७८३) कारकुनाचें काम केल्यापासून ब्रिटिश रेसिडेंट वॉकर ह्याने त्यांना गायकवाड सरकारशीं बोलणें करण्यासाठी नेमलें तोंपर्यंतची (इ. स. १८०३) हकीगत आहे. अर्थातच हें चरित्र अपूर्ण आहे. कारण गंगाधरशास्त्र्यांचा बाजीरावाशीं इंग्रजांचे मार्फतीने जो पुढे संबंध आला त्यासंबंधी माहिती ह्यांत नाही.

हें आत्मचरित्र प्रामाणिकपणाने लिहिल्याचें दिसतें. चरित्रलेखकाने ' स्मरणांत जो सत्यव्यवहार आहे तो लिहून देतों ' अशी सुरुवातीस प्रतिज्ञा केलेली आहे.[2] पुढे 'बडोद्याहून पत्रें आलीं तीं कोणाचीं तीं माझे स्मरणांत नाही ' (पृ. २१) असेंहि तो म्हणतो. तसेंच 'मेस्तर क्रो साहेब यासी बोलणीं होत होतीं परंतु काय होत होतीं हें आपणांस माहीत नाही' (पृ. ३०) असा उल्लेख आहे. चरित्रकाराने आपले दोष आडपडदा न ठेवतां स्पष्टपणें सांगितले आहेत. लेखक म्हणतो—सिताराम बापु व दिवाण-जीचें बोलणें पडतें की मी मगरूर माझें बोलणें बहुत अमर्यादेचें पडतें (पृ. ४१). प्रस्तुत आत्मचरित्रांत सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतरची

१. ऐ. प्र., पृ. १०८

२. भा. इ. सं. मं. त्रै. (शके १८४४), पृ. १७

पेशवाईची हकीगत ही बरीच विस्तृत आहे. ऐतिहासिकदृष्ट्या प्रस्तुत चरित्र उपरिनिर्दिष्ट कारणांमुळे विश्वसनीय मानण्यास प्रत्यवाय नाही.

ह्या आत्मचरित्रांत लेखकाचें व्यक्तिदर्शन उठावदार झालेलें आढळतें. उदा. 'माझें बोलणें वाजवी पर निश्चित खुशामतीचें पडत नाही' (पृ. ४१); तत्रापि गुलाम हपीसजी अवली यांनी कचेरींत अमर्यादा करून बोलतो तें सर्व बडोद्यास माहीत आहे त्याप्रमाणे तर मी एक शब्दहि बोललों नाही' (पृ. ४१). ह्यावरून चरित्रव्यक्तीच्या ठायीं असलेल्या आत्मविश्वास व सत्यप्रीति या गुणांची स्पष्ट कल्पना येते.

सदर आत्मचरित्राची भाषा घरगुती वळणाची आहे. ह्याचें वाचन करतांना चरित्रकार आपल्याशीं प्रत्यक्ष बोलत आहे असेंच वाटतें. उदा. 'तुम्ही म्हणाल की तुमच्या तीर्थरूपास कर्ज कशाचें' (पृ. २६). शिवाय स्वतःबद्दल थोड्याशा नम्रपणाने लेखक चातुर्याची भाषा वापरतो. उदा. 'आम्हा उभयतांचे ठाई दिवाणजीचा वाकडेपणा असे लोक सांगतात. हें सत्यमिथ्या ईश्वर जाणे' (पृ. ३५). ह्या भाषेंत आवेश असल्यामुळे ती चित्तवेधक झाली आहे.

विषयाचा सुसूत्रपणा व वर्ण्य विषयाशीं तादात्म्य हे दोन वाङ्मयीन गुण ह्या आत्मचरित्रांत आढळतात. चरित्रलेखकाच्या व्यक्तित्वाच्या सर्व बाजू ह्यांत प्रकट झाल्या आहेत. ह्यामुळे हें आत्मचरित्र यशस्वी झालेलें दिसतें. ऐतिहासिक व वाङ्मयीन ह्या दोन्ही दृष्टींनी प्रस्तुत आत्मचरित्रपर बखरीचें स्वतंत्र स्थान आहे.

पेशव्यांची बखर (कृ. वि. सोहनी विरचित):

ह्या बखरींत बाळाजी विश्वनाथापासून बाजीराव रघुनाथपर्यंत सुमारें शंभर वर्षांचा पेशवे घराण्याचा इतिहास आहे.

प्रस्तुत हकीगतींत घटनांचे काल दिलेले नाहीत. 'त्या समयीं' 'नंतर', 'त्याजवर' इत्यादि अनिश्चित कालदर्शक शब्दांनी कालांचे उल्लेख केलेले आहेत. मूळ हकीगत तोंडीं सांगितली गेली व नंतर ती इतरांनीं आदरपूर्वक लिहून घेतली असें असल्यामुळे लेखकाला जशा गोष्टी आठवल्या किंवा

इतरांनी जसें सांगितलें त्याप्रमाणे लेखकाने लिहिलें, अशी याची कारण-मीमांसा आहे.

बाजीराव बल्लाळाच्या कारकीर्दीत मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे ह्यांस फौजेचे सरंजामास हिंदुस्थानांत मुलूख नेमून दिल्याचें ह्या बखरींत म्हटलें आहे (पृ. ३७). येथे जनकोजीच्या ऐवजी राणोजी किंवा जयाप्पा असें पाहिजे. कारण, जनकोजी हा जयाप्पाचा मुलगा असून तो त्या वेळीं लहान असला पाहिजे असें काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात.[1] पानिपतच्या युद्धानंतर दादासाहेबांनी अटकेवर स्वारी केली त्या वेळेस रणजितसिंग शीख त्यांच्याबरोबर असल्याचें लेखक म्हणतो (पृ. ६५); परंतु रणजितसिंग हा बऱ्याच पुढच्या काळांत होता. नानासाहेब पेशव्यांचा मृत्युकाल बखरींत शके १६८३ ज्येष्ठ शुद्ध ८ असा दिलेला आढळतो (पृ. ६५); रियासतकार ही तीथ ज्येष्ठ वद्य ६ अशी देतात.[2] प्रस्तुत हकीगतींत भोंसले व पेशवे यांचा झगडा झाला त्या वेळीं मुधोजी भोसले राज्यावर होते असें म्हटलें आहे. (पृ. ७२). काव्येतिहाससंग्रहकर्त्यांच्या मतें ही बखरकाराची चूक असून तेथे जानोजी असें पाहिजे.[3] दादासाहेब ह्यांनी कल्याणास येऊन राजकारण केल्याचें बखर सांगते (पृ. १०५). ही घटना सुरतेस घडली असें रियासतकार म्हणतात.[4] अलीबहादुर, शिंदे व होळकर ह्या त्रिवर्गांनी गिलचे व इराणी ह्यांचा पाडाव करून त्यांस अटकेपार घालविलें अशी माहिती या बखरींत आहे (पृ. १३१); पण त्यास अन्यत्र आधार नाही. महादजीचा मृत्युकाल बखरलेखक भाद्रपद मास असा देतो (पृ. १५६). सान्यांच्या मतें तो माघ मास होय.[5] रियासतकार ही ता. १२-२-१७९४ असा देतात.[6] हा साने ह्यांच्या मतास दुजोरा दिसतो. अहिल्याबाईने तुकोजीस मांडीवर घेतल्याचें बखर सांगते (पृ. १९४). सान्यांच्या मतें

१. पे. ब. (१९२५), पृ. ३७ (टीप)
२. म. रि. पे. बा., पृ. ४५०
३. पे. ब., पृ. ७२ (टीप)
४. म. रि. उत्तरविभाग १, पृ. २७
५. पे. ब., पृ. १५६ (टीप)
६. म. रि. उत्तरविभाग २, पृ. ४०६

अहिल्याबाईने तुकोजीस थोरले मल्हाररावाचा पुत्र असें म्हणून होळकरांच्या वंशांत घेतलें; आपल्याच मांडीवर घेतलें नाही.[1]

सारांश, ह्या बखरींत कालविपर्यास, व्यक्तिविपर्यास इत्यादि बरेच दोष आढळतात. त्यामुळे ही बखर इतिहासदृष्ट्या प्रमाण मानतां येणार नाही. राजवाडे म्हणतात की, कालविपर्यासाचा दोष अत्यंत जास्त पहावयाचा असल्यास पेशव्यांच्या बखरींत अमूप आहे.[2]

ह्या बखरींतील वर्णनें चांगलीं आहेत. उदा. दुसऱ्या बाजीरावाचें वर्णन बखरकार पुढीलप्रमाणे करतो—'राज्याचा खावंद पेशवे यांचे वंशांत बाजीरावसाहेब यासारखा बेहिमती, दुसऱ्याचा विश्वास नाही, शहाणे मनुष्य जवळ ठेवावयाचें नाही, आंगीं शिपाईगिरीहि नाही, त्याची वर्णना काय करावी!' (पृ. २२३) हें वर्णन समर्पक होय ह्यांत शंका नाही.

वसईच्या रणसंग्रामाचें वर्णन 'मनुष्य फार कामास आलें. नऊ लाख बांगडी फुटली' असें अत्यंत समुचित शब्दांत केलें आहे (पृ. २८). पानिपतच्या युद्धाविषयी लेखक म्हणतो, 'भाऊसाहेब गर्दीत मिळाले. कोठे ठिकाण नाहीसें झाले. साडेतीन लाख फौज तितकीहि तेथे खपली. त्या दिवशीं मोठे उल्कापात झाले. दिवसास तारा पडला. दिवाकर चार घटका असतां अंधःकार पडला. असें युद्ध मानवी मागे झालें नाही व पुढे होणार नाही' (पृ. ६३).

नारायणराव पेशव्याच्या खुनाची हकीगत पुढील शब्दांत दिली आहे:—

'चापाजी टिळेकर याने गारद्यांस सांगितलें, 'अरे! लहान लेकरूं! यास मारूं नका.' असें म्हणून चापाजी श्रीमंतांचे आंगावर पडला. त्या समयीं अगोदर चापाजीस तोडिलें हें पाहून नारोबा फाटक जवळ उभा होता तोहि श्रीमंतांचे आंगावर पडला. तेव्हा फाटक यांचें डोकें उडविलें. नारायणराव साहेब यांची शुद्धि गेली कांही सुचेनासें झालें. मग गारद्यांनी वारावर वार केले. कोथळा फुटून बाहेर पडला अशी मारामार झाली.'[3]

हें वर्णन अत्यंत हृदयद्रावक आहे.

---

१. पे. ब., पृ. १९४ (टीप) २. ऐ. प्र., पृ. ४

३. पे. ब., पृ. ९२

श्रीमंत सवाई माधवराव यांच्या लग्नसमारंभाचें वर्णन रम्य आहे. बखर-कार लिहितो :—

'त्या समयीं जलकुंभ मस्तकीं घेऊन दासी पुढे उभ्या. दहीभात वरून ओवाळून टाकिले. कुळंबिणी घागरी घेऊन उभ्या होत्या त्यांस देणगी देऊन, स्वारी मंडपांत दाखल होऊन वरासनीं बसले. वरकड मंडळी मंडपांत दाखल झाली......नंतर मधुपर्कविधि होऊन पाणिग्रहणविधी झाला त्यासमयीं वाजंत्र्यांचे बाजे, चौघडे व नौबती, अशीं एकदाच सारीं वाजूं लागलीं व तोफांची सरबत्ती झाली. मग विवाहहोम होऊन ब्राह्मणांस दक्षिणा मंडपांत वांटिली. मंडपांत वऱ्हाडी होते त्यांस पानसुपारी, हार, गजरे, तुरे वांटिले. मग सर्वत्र मंडळी सरकारचा निरोप घेऊन निघाली ती आपापले ठिकाणीं गेली. श्रीमंत मात्र राहिले.

दुसरे दिवसापासून सर्वत्र लोकांस मेजवानीचीं आमंत्रणें करून भोजनास बलाविलें. मंडळी तितकीच आली. वाढावयास सर्व कारकून मंडळी नेमिली. तूप वाढावयास शहरचे सराफ नेमिले. एक एका पदार्थास एक एक कारकून नेमिला. सारे कारकून पीतांबर नेसून, शालजोड्या कंबरेस बांधून, वाढा-वयास लागले. चारचार कारकुनांमागे एकेक शिष्या हातीं ओलीं धोत्रें घेऊन वाढणारांचे घाम पुशीत असे. असा रोज समारंभ होत राहिला. ......दीड महिनापर्यंत लग्नाशिवाय कारभार दुसरा झाला नाही.'[1]

सवाई माधवरावांचें रंगक्रीडेचें वर्णन ह्या बखरींत पुढीलप्रमाणे आहे:—

'तेथे रंग खेळावयास प्रारंभ झाला. त्या रंगाची वर्णना किती करावी ? हजारों गुलालगोटे उडूं लागले. रंगाचे बंब चालूं लागले. तसाच गुलाल खंड्याचे खंड्या वाड्यांत उडाला (पृ. १५२).

हीं वर्णनें एखाद्या कादंबरीप्रमाणे चित्तवेधक आहेत.

प्रस्तुत बखरीची भाषा ठसकेबाज आहे. लहानलहान परिणामकारक वाक्यांमुळे ह्या बखरीस चटकदारपणा आलेला दिसतो. वर्णनाचा पाल्हाळ व

१. सदर, पृ. १२३

पुनरुक्ति हे दोष मान्य करूनहि उत्कृष्ट निवेदनपद्धति, वर्णनाचा बारकावा, भावनेचा जिव्हाळा इत्यादि गुणांमुळे ही बखर वाचनीय झाली आहे.

होळकरांची कैफियत :

प्रस्तुत कैफियतींत[1] मल्हारराव होळकर, अहिल्याबाई, तुकोजीराव होळकर, काशीराव ऊर्फ बाळासाहेब होळकर, यशवंतराव होळकर व मल्हारराव होळकर तिसरा ह्या होळकर घराण्यांतील व्यक्तींची हकीगत आहे. भारतवर्षांत प्रसिद्ध झालेल्या ह्या कैफियतीच्या पुरवणींत मल्हारराव (दुसरे) होळकरांच्या कारकीर्दीचा शेवट, मार्तंडरावाचें दत्तकप्रकरण, दरबारी मंडळींतील मतभेद, हरिराव होळकरांचें राज्यारोहण व त्यांच्या राज्यकारभारांतील अंदाधुंदी इत्यादि घटना दिलेल्या आहेत.

ह्या कैफियतींत थोरल्या मल्हाररावांच्या बालपणांतील नागाच्या चमत्काराचें जें वर्णन आहे (पृ. १), तें ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीय मानतां येणार नाही. पानिपतच्या युद्धांत दत्ताजीबाबाचा तर ठिकाणच नाही असें लेखक म्हणतो (पृ. २३); पण लगेच पुढे 'दत्तोजी शिंदे नजीबखांचे गर्दीत कामास आले' असेंहि त्याने म्हटलें आहे (पृ. ३२). प्रस्तुत कैफियतींत गोविंदपंत बुंदेल्याचें डोकें स्नानसंध्या करतांना कापून नेल्याचा उल्लेख आढळतो. (पृ. २४); परंतु रियासतकार म्हणतात—पंतहि घोड्यावर बसून पळत असतां गोळी लागून पडला आणि त्याचें शीर मुसलमानांनी कापून अब्दालीकडे पाठविलें.[2] बुंदेल्यांचें शीर एका फकीराबरोबर श्रीमंत भाऊसाहेबांकडे पाठविल्याचें कैफियतकार सांगतो (पृ. २४). भाऊसाहेबांच्या बखरींत तें वकिलाबरोबर पाठविल्याचा उल्लेख आढळतो. शिरोंजेस नानासाहेबांचा काळ झाल्याचें कैफियत म्हणते (पृ. २९). रियासतकारांच्या मतें तो पर्वतीस झाला.[3] फिरंग्याशीं युद्ध करतांना मल्हारजी होळकर यास 'पायाब होऊन यमुनेने मार्ग दिला' (पृ. ३१). ही घटना इतिहासदृष्ट्या प्रमाण मानणें कठिण आहे. मल्हारराव होळकराचा मृत्यु भाद्रपद वद्य ११ रोजीं झाल्याचें लेखक लिहितो (पृ. ३४). रियासतींत

१. हो. कै. (श. १८०८)
२. म. रि. पे. बा. पृ. ३९३
३. सदर, पृ. ४५०

ही तीथ वैशाख शुद्ध ११ अशी दिली आहे.[१] माहीतगाराने ही हकीगत लिहिली असल्यामुळे उपरिनिर्दिष्ट कांही बाबी सोडल्यास प्रस्तुत कैफियत विश्वसनीय मानणें योग्य होईल.

ह्या कैफियतींतील वर्णनें चांगलीं आहेत. उदाहरणार्थ—१. 'तथापि भाऊसाहेब (यांचा) स्वभाव सडेतोड' (पृ. ६७); २. 'सुभेदार भाग्यशाली, प्रतापवान, जातीने अपेश कोठे आलेंच नाही' (पृ. ३२); ३. अहिल्याबाई म्हणते, 'मी बायको असें मानूं नका. खांद्यावर बासडा टाकून उभी राहीन तेव्हां श्रीमंताचे दौलतीस अवघड पडेल' (पृ. ३६); ४. 'अहिल्याबाई बायको माणूस तर खरीच, परंतु शूद्र होत्साती स्नानसंध्या शिष्टसांप्रदाय ब्राह्मणासारखी. ज्ञातिसंबंध नाहो. दुसरें, मल्हारजी होळकर संपूर्ण पृथ्वीस काळ, त्याचा विश्वास बाईसाहेबांचे ठिकाणीं. सांगेल तितकें पाणी पियावयाचें हा ऋणानुबंध' (पृ. ३८); ५. शिंदे यांनी जागा मैदान पाहून, बिछायत करून, पांच हजार खासा बदिमाख पोशाख येऊन बसले. नंतर महाराजांची स्वारी आली. साठ हजार स्वार, त्यांत महाराजांचे आंगांत दहा शेर रुईचा डगला, सफेत शेल्याचा घाटा, ढाल तलवार, बासडा खांद्यावर, गाठची गाठच (आले) ह्यांत महाराज कोणते हें ओळखूं येईना' (पृ.१०४) इ.

राठोडांशीं होळकरांचें जें युद्ध झालें त्याचें वर्णन करतांना कैफियतकार लिहितो—

"मग बापूसाहेबांनी बाळासाहेबास ठिकाणीं उभे करून, चार हजार स्वार निवडक घेऊन घोडे घातले. रजपूत गोळा छरा संगिन यांत निमे खपलेच होते. निमे राहिले त्यांणी हल्ला बापू होळकराचा गोल उठला हें पाहून पलटणचा मुकाबला सोडून याजवर आले. भेळाभेळ होऊन चार घटका समरंगणीं भाला, बंदुक यांचें काम पडलेंच नाही. एकामेकांचे गळा घालून घोड्या खाली येऊन तरवार, कटार, दांत अशानिशीं रजपूत एक जाऊं न दिल्हा. चार पांचशें रागडे खपूं देऊन आपलेकडील महाळोजी पिंगळे सारखीं दोन–तीनशें नांवाचीं माणसें कामास आलीं. येशवंतराव महाराज, बारा वर्षांचें वय प्रथम तरवार तेथे केली."[२]

१. म. रि. म. बि. ४, पृ. १९९
२. हो. कै., पृ. ५७

आवेशपूर्ण भाषा हें ह्या कैफियतीचें वैशिष्ट्य होय. उदा. १. 'सरदारी करूं म्हणतां, आणि शिपाई यांची बरदास्त या प्रकारची! अशाने वेल मांडवास कसे जातील?' (पृ. ३); २. 'रुपये आपले बापाचे की काय? ज्याजवर रुपया येतो त्याजला जखम लागली असतां हळद फटकू मिळणें कठीण, तेव्हा फौजेची हामराई राहते कशी? राखणाराने काय करावें?' (पृ. ३०); ३. 'खाजगीचे कारकुनाचा कारकून, त्यांत बायकाकडील भाकरी मोजाव्या इतकी आमची बुद्धि. दौलतीचें ओझें आम्हासारिख्याच्या माथा ठेवूं म्हणतां (तेव्हा) थट्टा करितां की काय?' (पृ. ४३) इ.

प्रस्तुत कैफियतीसंबंधी श्री. य. न. केळकर म्हणतात की, उत्तमोत्तम म्हणून प्रसिद्धि लाभलेल्या भाऊसाहेबांच्या बखरीच्या तोडीची ती आहे.[१] हें मत मान्य होणें कठिण आहे. कारण व्यक्तिवर्णन, वस्तुवर्णन, प्रसंगवर्णन, वातावरणनिर्मिति, लेखकाचा आत्माविष्कार, भाषाशैली इत्यादि वाङ्मयीन तंत्राच्या दृष्टीने भाऊसाहेबांची बखर ह्या कैफियतीपेक्षा अधिक समृद्ध आहे. किंबहुना उपरिनिर्दिष्ट प्रत्येक तंत्राच्या दृष्टीनेहि भाऊसाहेबांची बखर हिच्या-पेक्षा सरस आहे. एवढें मात्र खरें की, वर उल्लेखिलेले कांही वाङ्मयीन गुण ह्या कैफियतींत असल्यामुळे ती वाचनीय झाली आहे, ह्यांत संशय नाही.

मराठ्यांची बखर :

प्रस्तुत बखरींत मुसलमानांनी दाक्षिणेंत केलेल्या प्रवेशापासून म्हणजे इ. स. १००० पासून पेशवाई अखेरपर्यंत (इ. स. १८१८) महाराष्ट्राचा इतिहास आहे.

रा. ब. नीलकंठ जनार्दन कीर्तने ह्यांनी ग्रँट डफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका करतांना पुढील अभिप्राय दिला आहे:—

१. परंतु ग्रांट डफ् साहेबांनी......शिवाजीची प्रजा गांजलेली असावी असा जो तर्क केला आहे (पृ. ६५) तो मात्र आम्हास मान्य नाही. त्या वेळच्या सर्व हिंदुस्थानांतील रयतेपेक्षा कदाचित् शिवाजीच्याच प्रजेस जास्ती सुख असेलसें वाटतें.[२] २. बाळाजी विश्वनाथ यापासून रयतेचे सुखाकडे

१. हो. कै. (१९५४) प्रस्ता०

२. मराठ्यांचे बखरीवर टीका (१९२६), पृ. २५

विशेष नजर पोहोंचली. बाळाजी विश्वनाथ तर कारभार शिणाने मेला असें कप्तान ग्रांट डफ साहेबाचे बखरींत आहे[1] (पृ. १४०). ३. चिमणाजी आप्पाचे वर्तणुकीचें विवेचन करितांना ग्रांट साहेबाचे हातून थोडी चूक झाली आहे असें वाटतें. ती ही की, चिमणाजी आपा पोर्तुगीस लोकांशीं लढत असतां त्यास असें वाटलें की, त्यांच्याप्रमाणे शिकविलेलीं पलटणें मराठ्यांचे सैन्यांत असल्यास मोठा उपयोग होईल. याविषयी ग्रांटसाहेब असें म्हणतात की, ही त्यांची मोठी चूक झाली व ही चूक मराठ्यांचेहि लक्ष्यांत न येतां ते त्यास फार कुशल असें मानितात .... मराठे मोठे धीट, चपळ व छातीस छाती देऊन लढण्याचे कामीं अत्यंत कुशल इत्यादि गोष्टी त्यांचे लक्ष्यांत आल्या नाहीत (पृ. १६८). चिमणाजी आपाने चुकी केली असें तर नाहीच; परंतु हें कृत्य त्याचे चाणाक्षपणाची साक्ष आहे असें आम्हांस वाटतें.[2] ४. या लढाईत (पानिपत) मराठे पराभव पावले याचें मुख्य कारण भाऊसाहेबांचें अप्रयोजकपण हें आहे. ग्रांट डफ साहेबांनी या लढाईतील पराभवाचें कारण मराठ्यांचीं शिकविलेलीं पलटणें म्हणून लिहिलें आहे (पृ. १६८). या त्यांच्या म्हणण्यास हा होळकराचा लेख प्रमाण आहे; परंतु हें म्हणणें आम्हांस मान्य नाही; कारण होळकराचे घराण्यास दुरून दुरून लढाई करण्याचें कौशल्य असे; व तो तसेंच करण्यास मसलत देत असतां भाऊसाहेबाने ऐकिलें नाही म्हणून त्याने पलटणावर सर्व दोष दिला आहे असें वाटतें.[3] ५. ग्रँट डफ साहेबाचे बखरींत......आणखी एक व्यंग आहे. कोणत्याहि राजाचे कारकीर्दींत जे मोठमोठे पुरुष झाले त्यांचे स्वभावाचें व वर्तनाचें म्हणण्यासारखें वर्णन नाही. अहिल्याबाईसारखे परोपकारी रत्नाचे वर्तणुकीविषयी ग्रांट डफ साहेबांचे ग्रंथांत पृष्ठ अर्ध पृष्ठापेक्षा जास्त मजकूर मिळणार नाही असें आम्हांस खास वाटतें.[4]

डफच्या इतिहासांतील अनेक चुका विशेषतः इ. स. १७५० ते इ. स. १७६१ पर्यंतच्या कालांतील त्यांचीं भ्रामक विधानें राजवाड्यांनी साधार दाखवून दिलीं आहेत. ग्रँट डफने कित्येक मोहिमा अर्जीबात गाळल्या

१. सदर, पृ. ३७ २. सदर, पृ. ३८
३. सदर, पृ. ३९ ४. सदर, पृ. ४२

आहेत. इतकेंच नव्हे, तर कांही मोहिमांचे काल अलीकडे पलीकडे दिले आहेत. उदा. वरील कालांतील पुढील कांही चुका राजवाड्यांनी दाखविल्या आहेत. १. रघुनाथरावाच्या १७५०, १७५१, १७५२, १७५३ व १७५६ ह्या सालांतील गुजराथ व खानदेश ह्या प्रांतांवरील मोहिमा ग्रँट डफनें अजीबात गाळल्या आहेत. रघुनाथरावाची १७५३ ची अहमदाबादेवरील मोहीम त्याने १७५५ सालांत नेली आहे (पृ. १८७). २. १७५५ सालांत रघुनाथराव दिल्लीस होते हें त्याला माहीत नव्हतें. रघुनाथरावाची १७५४ तील रजपुतान्यांतील स्वारीची (कुंभेरीचा वेढा) व १७५४ तील रोहिलखंड, कुमाऊ ह्या प्रदेशांवरील मोहिमेची हकीगत त्याने दिली नाही. ३. दिल्ली लाहोरवरील मोहिमांचा त्याने त्रोटक व तोहि बराच चुकीचा वृत्तान्त दिला आहे (पृ. २०२). ४. रघुनाथराव वस्तुतः १७५७ त माळव्यांत गेला असून तो १७५६ च्या शेवटीं गेला असें डफ म्हणतो (पृ. २०१); ५. अब्दाली १७५५ (१७५४ ?) त दिल्लीस आला. मथुरा वगैरे शहरें त्याने त्याच सालीं घेतलीं, मग लवकरच काबुलाला तो परत गेला (पृ. २०१) व १७५७ च्या सप्टेंबरांत तो दिल्लीस येऊन बसला (पृ. २०३) इत्यादि भ्रामक विधानें त्याने केलीं आहेत. ६. नागोरचा वेढा १७५५ त चालला होता व जयाप्पा तो वेढा चालला असतांना ज्येष्ठ वद्य ७ मीला म्हणजे ३० जून १७५५ ला मारला गेला, अशी वास्तविक गोष्ट आहे. असें असून ग्रँट डफने जयाप्पाच्या मृत्यूचें साल १७५९ धरलें आहे (पृ. २०२). ७. पुढे १७५३ च्या जानेवारींत, तो म्हणतो, शिंदे होळकर हिंदुस्थानांत गेले व बाळाजी बाजीराव पुण्यास परत आले (पृ. १८६). परंतु हीं दोन्ही विधानें विश्वसनीय नाहीत. शिंदे १७५३ च्या मेपर्यंत देशीं चांभारगोंद्यास राहिले. होळकर मात्र हिंदुस्थानांत गेले. बाळाजी बाजीराव पुण्यास न जातां भालकीहून थेट श्रीरंगपट्टणास गेले. ८. ही स्वारी (श्रीरंगपट्टण) ग्रँट डफने अजीबात गाळली आहे. ९. होळी होन्नूरच्या मोहिमेहून परत आल्यावर (१७५४) रघुनाथरावदादाला बाळाजीने गुजराथेंत पाठविलें म्हणून ग्रँट डफ म्हणतो (पृ. १८६); परंतु १७५४ च्या जानेवारींत रघुनाथराव कुंभेरीच्या वेढ्यास लागले होते.[१]

१. ऐ. प्र., पृ. २३

पानिपतच्या हकीगतीचें वर्णन ग्रँट डफनें बरेंच विस्तृत दिलें आहे. 'ग्रँट डफचा देखील मुख्य आधार काशीराजाचीच बखर आहे.' असें राजवाडे म्हणतात.[1] राजवाड्यांची दुसरी तक्रार अशी की, कान्होजी आंग्र्याच्या उदयापासून संभाजी आंग्र्याच्या मृत्यूपर्यंत (इ. स. १६८० पासून १७४२ पर्यंत) कोकणपट्टींतील राजकारणाचा इतिहास विशेषतः १७२६ पासून १७४२ पर्यंतचा इतिहास ग्रँट डफ वगैरे लेखकांनी अस्पष्ट व भ्रामक रचला आहे. सालवार जंत्री प्रथम तयार करून नंतर ती ग्रँट डफने जर आपल्या इतिहासांत दिली असती तर त्यांचें लेखन टाकाऊ वाटतें तितकें खचित वाटलें नसतें. तसेंच ब्रह्मेंद्रस्वामीच्या पत्रव्यवहाराची त्याने सूक्ष्म चिकित्सा केली नाही.[2] राजवाड्यांच्या मतें कालविपर्यासाचा दोष, मोठमोठ्या मोहिमांचें अज्ञान व सापेक्षदृष्ट्या कोणत्या प्रसंगाला किती महत्त्व द्यावें ह्याची नुमज, इतर मराठी बखरीप्रमाणे ह्याच्याहि इतिहासांत दिसून येते.[3]

ग्रँट डफच्या इतिहासांतील उपरिनिर्दिष्ट दोषांची कारणमीमांसा करतांना राजवाडे म्हणतातः—

'कोणत्याहि राष्ट्राचा सर्वांगांनी संपूर्ण असा राजकीय इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे तो भौतिक व आत्मिक अशा दोनहि पद्धतींनी लिहिला पाहिजे. आतां प्रस्तुतच्या विवेचनाचा विषय जो ग्रँट डफचा इतिहास त्याची पद्धत पाहिली, तर निव्वळ भौतिक आहे हें सर्वत्र ग्राह्य होण्यासारिखें आहे असें वाटतें. आत्मिकरीत्या मराठ्यांच्या इतिहासाचा विचार करण्याच्या खटपटींत पडण्याची आपली इच्छा नाही व योग्य शिक्षण न मिळाल्यामुळे आपल्या अंगीं सामर्थ्य नाही असें ग्रँट डफ आपल्या इतिहासाच्या प्रस्तावनेंत स्वतःच प्रांजलपणें व विनयाने कबूल करितो.'[4]

राजवाडे पुढे म्हणतात :

'इतिहास लिहिण्यांत त्याचा मुख्य हेतु आपल्या देशबांधवांना मराठ्यांच्या संबंधी ठोकळ व त्यांतल्या त्यांत समाधानकारक माहिती देण्याचा होता....

१. सदर, पृ. १०७ २. सदर, पृ. १७७
३. सदर, पृ. २८ ४. सदर

मराठी बखरींच्यापेक्षा त्याचा इतिहास जास्त व्यवस्थित आहे, हें इकडील लोकांसहि मान्य आहे. ग्रँट डफने आपला इतिहास मुख्यत्वें मराठी बखरी, मुसलमानी तवारिखा, सरदारांनी दिलेल्या कैफियती व अशाच स्वरूपाचीं इतर टिपणें, ह्यांची संगति जुळवून तयार केला आहे. ह्या बहुतेक बखरी, तवारिखा व कैफियती कमजास्त प्रमाणाने अविश्वसनीय आहेत....त्याच्या इतिहासाला कीर्तने म्हणतात त्याप्रमाणे, अपूर्ण असा मराठ्यांच्या मोहिमांचा नामनिर्देशात्मक इतिहास असें म्हटलें असतां चालेल. 'मराठ्यांच्या मोहिमांचा इतिहास' असेंहि नांव ह्या इतिहासाला शोभत नाही. ह्या इतिहासाला 'इंग्रजांना मराठ्यांची कांही माहिती देणाऱ्या वृत्तान्तांचें इतिहासवजा पुस्तक' असें नांव दिलें असतां चालेल.'[1]

रियासतकार म्हणतात की, ग्रँट डफ व त्याचे समकालीन माल्कम्, टॉड, जेंकिन्स, वॉकर इत्यादिकांनी लिहिलेल्या हकीगती अद्यापि इतिहासांत उपयोगी पडतात. हे ग्रंथ लिहिण्यास कदाचित् त्यांस वरिष्ठांची सूचना असेल. ह्यांतले कांही ग्रंथ मार्मिक व इंग्रजांना आपल्या पराक्रमाची स्फूर्ति देणारे आहेत.[2]

ह्या बखरीच्या मराठी भाषांतराची भाषा आजच्या दृष्टीने शुद्ध अशी नाही. प्रौढ संस्कृत शब्दांच्या आत्यंतिक वापरामुळे हें भाषांतर कृत्रिम झालें आहे. लेखकाचें व्यक्तित्व त्यांत दिसून येतें हा इतिहासदृष्ट्या गुण मानला, तरी वाङ्मयदृष्ट्या तो दोषच समजावा लागेल. अव्वल इंग्रजींतील मराठी भाषेचा नमुना म्हणूनच प्रस्तुत भाषांतराचें महत्त्व आहे.

डफच्या इतिहासांतील दोष मान्य करूनहि ह्या प्रतिपक्षीय एका व्यक्तीने केलेला इतिहासलेखनाचा प्रयत्न ह्या दृष्टीने त्याला विशिष्ट स्थान दिलें पाहिजे. ग्रँट डफ, स्कॉट वेअरिंग, स्प्रेंगेल इत्यादि पाश्चात्य इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहासाचें लेखन करून एक नवी परंपरा निर्माण केली. त्यांचें लेखन केवळ स्वार्थी बुद्धीचें होतें असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. राज्यकारभारासाठी एवढा प्रचंड उद्योग करण्याची त्यांना आवश्यकता असेल असें वाटत नाही. सरकारी कामें करून उरलेल्या वेळांत त्यांनी हें आवडीचें

१ ऐ. प्र., पृ. २९

२. म. रि. उ. वि. ३, पृ. ५३३

लेखन केलेलें आहे. ही मंडळी मराठ्यांच्याबद्दल आदर बाळगणारी होती. खुद्द ग्रँट डफ याचे सातारकर छत्रपति प्रतापसिंग याच्याशीं जिव्हाळ्याचे संबंध होते. संपूर्ण माहितीचा अभाव, सरकारी दप्तरांतील एकांगी माहिती, उच्च शिक्षणाचें दैन्य इत्यादि अनेक कारणांमुळे ग्रँट डफचा इतिहास निर्दोष होऊं शकला नाही; परंतु स्वकीयांना इतिहासलेखनाची स्फूर्ति त्याच्यासारख्या इतिहासकारांकडूनच मिळाली हें सत्य आहे. पुढील पिढीला स्फूर्ति देणाऱ्या ग्रँट डफच्या इतिहासाचें महत्त्व अनन्यसाधारण म्हटलें पाहिजे. महाराष्ट्रांत डफने एक युग निर्माण केलें ही एकच बाब त्याच्या यशाची साक्ष देते.

हरिवंशाची बखर :

प्रस्तुत बखरींत मुख्यतः पटवर्धन घराण्यांतील कर्तबगार पुरुष पुरुषोत्तमराव कृष्ण ऊर्फ दाजी याचीच विस्तृत हकीगत आहे. पटवर्धन घराण्यांत पुरुषोत्तम दाजीइतका दुसरा कोणीहि पराक्रमी पुरुष झाला नाही. पुरुषोत्तम दाजी यांचा सातारकर थोरले शाहू छत्रपति यांच्याशीं संबंध असून नानासाहेब, थोरले माधवराव व सवाई माधवराव ह्या पेशव्यांच्या कारकीर्दी त्यांनी पाहिल्या होत्या. एवढेंच नव्हे तर, पेशव्यांच्या राज्यकारभारांत पुरुषोत्तम दाजी जातीनें भाग घेत असत. ते पेशव्यांचे अत्यंत विश्वासू सेवक होते. स्वामिनिष्ठा, पराक्रम, धूर्तपणा, निर्भीडपणा, मानीपणा व विनोदी स्वभाव इत्यादि गुण अंगीं असल्यामुळे पेशव्यांना त्यांनी आपलेसें केलें होतें. पेशव्यांचा त्यांच्यावर अत्यंत लोभ असे. पेशवे त्यांना स्वतःच्या कुटुंबांतील माणसाप्रमाणे वागवीत असत. ह्या बखरींत पुरुषोत्तम दाजी यांची मुख्य माहिती असली, तरी त्यांचा ज्या ज्या व्यक्तींशीं संबंध आला त्या पेशवे, गायकवाड, फडणीस इत्यादि घराण्यांतील व्यक्तींची माहिती व तत्कालीन ऐतिहासिक प्रसंगांच्या हकीगती ह्यांत दिलेल्या आहेत. पेशव्यांच्या इतिहासाचा एक विशिष्ट भाग प्रस्तुत बखरींत असल्यामुळे तिला एक प्रकारचें महत्त्व आहे.

ही बखर अस्सल कागदपत्रांच्या आधारें लिहिलेली नसली, तरी ऐकीव पण परंपरागत माहितीच्या आधारें ती लिहिली आहे. कारण बखरकार ' याप्रमाणे ही गोष्ट वडिलांनी सांगितलेवरून लिहिली असे ' असें लेखनांत

वारंवार म्हणतो.[१] परंपरागत ऐकलेली माहिती जशीच्या तशीच देण्यांत लेखकाचा प्रामाणिकपणा दिसतो. जेथे आपल्या माहितीबद्दल त्याला शंका येते तेथे तो स्वतःचें अज्ञान स्पष्टपणें कबूल करतो. उदा. ' परशुरामभाऊ यांची मुंज मात्र जाहली होती किंवा नाही हा मजकूर पक्का माहीत नाही. (पृ. ५)

प्रस्तुत बखरींतील हकीगत ऐकीव माहितीवरून लिहिली असल्यामुळे कांही प्रसंग पुढे मागे झाले आहेत. उदा. दादासाहेब व हरिपंत फडके यांच्या लढाईच्या वेळीं ' हरिपंत फडके याजसमागमें कांही फौज राहिली ती सारी जमा होऊन परशुरामभाऊजवळ जमा जाहले.' (पृ. ५४) खऱ्यांच्या मतें ह्या वेळीं वामनराव मुख्य सरदार असून भाऊ त्यांचे दुय्यम होते (टीप पृ. ५४).

लेखक लिहितो की, पुढे श्रीमंत नारायणरावसाहेब राज्याधिकारी, परंतु श्रीमंत दादासाहेब कारभारांत पुढे जाहले (पृ. ३९); रियासतकार म्हणतात की, नारायणराव हा सखाराम बापूच्याच सल्ल्यानें सर्वथैव चालत होता.[२] दादांनी श्रीमंत गंगाबाईसाहेब यांस पुरंदरास कैद केल्याप्रमाणे ठेवली असें बखर सांगते (पृ. ४५). रियासतकारांच्या मतें पुरंदरावर गंगाबाईच्या नांवाने पेशवाईचा कारभार चालू होता.[३] पुरंदरास मुख्य नाना फडणीस, दुय्यम सखाराम बापू असें बखरकार म्हणतो (पृ. ५१). रियासतींत गंगाबाई मालक, बापू मुख्य व नाना दुय्यम कारभारी असा उल्लेख आढळतो.[४]

बखरकार हा माहीतगार इसम आहे. पटवर्धन घराण्याची हकीगत त्याच घराण्यांतल्या एका व्यक्तीने लिहिणें हें इतिहासदृष्ट्या महत्त्वाचें होय. प्रस्तावनाकार खरेशास्त्री म्हणतात की, बखरींतल्या माहितीच्या योग्यतेचा विचार केल्यास ही बखर लिहिण्यास हाच ग्रंथकार योग्य होता, अशी खात्री पटते. प्रस्तुत बखर इतिहासदृष्ट्या विश्वसनीय मानणें योग्य होईल.

उठावदार व्यक्तिवर्णन हा ह्या बखरीचा विशेष होय. उदा. १. दाजी बोलले जे या स्वारींत निराळी चाकरी करून दाखवीन तरच तुला तोंड

१. इ. ब. (१९०९), पृ. १२ २. म. रि. मध्यविभाग ४, पृ. ३२५

३. सदर, पृ. ३५२ ४. सदर, पृ. ३६२

दाखवीन. नाहीपेक्षा पांढरे कावळे असतील तिकडे जाईन (पृ. ६); २. गोपाळराव व त्यांचे इतर भाऊ यांच्यासंबंधी लेखक लिहितो, 'पांचजण भाऊ म्हणजे भारती वीर' (पृ. ३४). ३. रघुनाथराव दादा परम पुण्यवान्, स्नानसंध्याशील, परंतु स्त्रीचे योगेंकरून अनर्थास पावून अपेश माथां घेतलें (पृ. ४३); ४. दाजी बोलले, 'हे चारशें प्यादे आपण करून दिले हे मारवीन, नंतर आभाळ जरी कडकडून पडलें तरी या मुलावर पालथा पडेन; परंतु पुरुषोत्तमराव जिवंत असोन भलती गोष्ट आपण ऐकणार नाही!' (पृ. ५८); ५. याप्रमाणे पुरुषोत्तम दाजी यांची विश्वासाची चौकी (पृ. ५९); ६. परंतु नाना फडणिसांप्रमाणे कारभारी जाहले नाहीत. आणि जें कृत्य हातीं धरिलें त्यांत यश येऊन शेवटास गेलें असें नानांचें मात्र! नानाप्रमाणे पुरुष मागेहि झाला नाही व पुढेहि होणार नाही (पृ. ८४). प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धतीने उपरिनिर्दिष्ट उदाहरणांतील व्यक्तिवर्णन उत्कृष्ट झालेलें दिसतें.

नारायणरावाच्या खुनाचें वर्णनहि पुढीलप्रमाणे उठावदार आहे—

तों गाडदीहि तेथे आले आणि बोलले की, आता आम्ही यास जिवंत सोडणार नाही. हा वांचल्यास आमचीं रांडापोरें ढाणकास वाटील! सर्पास दुखवून सोडतों की काय? असें म्हणतांच दादासाहेब म्हणाले की, अरे, बाळास मारूं नका! असें म्हणून हात पुढे केला. तों आंत खोलींत तेथेच आनंदीबाई होती तेथून दादासाहेब यास म्हणाली की, आता कांकणें हातांत घाल!' असें म्हणून गाडद्यांस सांगितलें की, उभयतांस मारून टाका!!! तों गाडद्यांनी एक वार टाकिला तो दादासाहेब यांचे हातास लागला. तों तुळ्या पवार आनंदीबाईचा खिसमतगार होता त्याने श्रीमंतांचे पायास धरून दादासाहेब यांचे कमरेपासून ओढिलें. तो चाफाजी टिळेकर श्रीमंत माधवरावसाहेब यांचा खिसमतगार तसाच श्रीमंतांवर पडला. तों गाडदी यांची तलवार चालली तेथे कांही बाकी राहिली नाही! उभयतांचे तुकडे एके ठिकाणीं जाहले. श्रीमंत साखरभात भोजन करून गेले तो पोटांतून तसाच पडला![१]

---

१. इ. ब., पृ.४२

आकर्षक निवेदनकौशल्य हा या बखरीचा एक वाङ्मयीन गुण आहे. बखरकाराची निवेदनपद्धति पौराणिक थाटाची असल्यामुळे हें लेखन रम्य वाटतें. बखरकाराच्या भावनेचा आविष्कार कित्येक ठिकाणीं झालेला दिसतो. उदा. नारायणरावाच्या खुनाची हकीगत सांगतांना बखरलेखक लिहितो– 'हें कृत्य रघुनाथराव दादा यांचे समोर जाहलें........याप्रमाणे जी गोष्ट न व्हावयाची ती झाली' (पृ. ४२); बाप तिकडे, लेक इकडे, मामा इकडे, भाचा तिकडे, चुलते तिकडे, पुतणे इकडे, अशी ही सारी खिचडी आहे (पृ. ६०). ह्या वाक्यावरून लेखकाच्या विनोदी स्वभावाची ओळख पटते. 'तीं सारीं लिहिलीं तर भारतातुल्य ग्रंथ वाढेल आणि तितकें लिहिण्यास माझी योग्यता नाहीं.' (पृ. ५२). यांत त्याचा नम्रपणा दिसतो.

लहानलहान आख्यायिका किंवा प्रसंगात्मक गोष्टी ह्यांमुळे ह्या बखरीला चटकदारपणा आलेला आहे. बखरकाराची भाषाशैली आवेशपूर्ण असून तींत प्रसाद हा गुण आढळतो. वर्ण्य विषयाचा जिव्हाळा हा ह्या बखरीचा वाङ्मयीन विशेष म्हणतां येईल. म्हणूनच हें लेखन जिवंत वाटतें. प्रस्तावनाकार म्हणतात– 'वर्णनाचा सरळपणा हा त्याच्या लिहिण्यांत मोठा गुण आहे. गोष्ट जशी जशी मनांत येते तशी तशी तो अलंकारांची वगैरे कांही एक पर्वा न धरितां भराभर लिहीत सुटतो. गोष्ट वाचकांच्या मनांत भराविण्यास हें एक चांगलें साधन आहे.'

प्रासादिक व आवेशपूर्ण भाषा, यथार्थ व्यक्तिदर्शन, रसाळ वर्णनें, वर्ण्य विषयाचा जिव्हाळा, सुंदर भावनाविष्कार इत्यादि गुणांमुळे ह्या बखरीचें वाङ्मयीन सौंदर्य वाढलेलें आहे.

पटवर्धनी वाका :

हा वाका म्हणजे मराठे आणि हैदरअल्ली यांच्यांत इ. स. १७७७ मध्ये झालेल्या सावसी कुंदगोळच्या मैदानांतील लढाईचा इतिहास होय. ह्याला पटवर्धनी वाका म्हणण्याचें कारण असें की, ह्या लढाईत पटवर्धन घराण्यांतील पांडुरंगराव तात्यासाहेब व कोन्हेरराव ह्या पराक्रमी पुरुषांकडे मराठ्यांचें नेतृत्व होतें. तसेंच तो पटवर्धनांच्या आज्ञेवरून लिहिला आहे.

ह्या वाक्याच्या सुरुवातीस पंतप्रधान नानासाहेबांपासून सवाई माधवरावापर्यंत त्रोटक इतिहास दिला आहे.[1] पुढे इ. स. १७७४ त हैदरने आपला अंमल कसा चालू केला, ती हकीगत आढळते. नंतर दसऱ्याच्या मुहूर्ताने तात्यासाहेब डेरेदाखल झाले. हैदरअल्लीकडील महंमदअल्ली कुमदान ह्याने आपलें सैन्य आणलें व तें सावशीस ठेवलें. तेथे भयंकर रणकंदन होऊन कोन्हेरराव ठार झाले व पांडुरंगराव तात्यासाहेबादि जवळ जवळ पंधरा सोळा असामी जखमी होऊन पाडाव झाले. त्या वेळीं मराठ्यांकडील मंडळींनी फार पराक्रम केला. तात्यासाहेबांचा काल कैदेंतच झाला. बाकीची मंडळी दंड भरल्यावर सुटली. पराक्रम केलेल्या लोकांना बक्षीस मिळालें. अशी ही हकीगत आहे.

ह्या लढाईचा इतिहास उज्ज्वल आहे. तसाच तो हृदयद्रावक आहे. कारण मराठ्यांनी ह्या वेळीं पराक्रम केला तरी त्यांना शेवटीं अपयश आलें. ह्या वाक्याचा उत्तरभाग कोन्हेररावाच्या फौजेंतील कारकून सखो रंगनाथ याने रघुनाथराव दादास लष्करांतून ह्या लढाईचें वर्णन लिहून पत्र पाठविलें त्याने व्यापलेलें आहे.

प्रस्तुत वाक्यांत पांडुरंगराव तात्यासाहेब यांचा मुक्काम सावशीपासून सात कोसांवर होता असें लेखक म्हणतो (पृ. ३१); परंतु रियासतींत तो दोन कोसांवर असल्याचें म्हटलें आहे.[2] नरगुंदकर ह्यांनी जखमी लोकांच्या जखमा बांधल्याचे लेखक सांगतो (पृ. ३७). रियासतकार म्हणतात की, रघुनाथरावाचा साह्यकर्ता बाजीराव बर्वे या वेळीं बंकापुरास हैदराकडे होता. त्याने जखमी मंडळीची थोडीबहुत शुश्रूषा ठेविली.[3] ह्या वाक्यांत कालनिर्देश तिथिवारासह केला आहे हें विशेष होय. माहीतगार माणसाने हा वाका लिहिला असल्यामुळे तो विश्वसनीय मानणें इष्ट होईल.

सदर वाक्यांतील वर्णनें सुरस आहेत. उदा. लढाईचें वर्णन करतांना लेखक सांगतो, ' तात्यासाहेब माघारे फिरण्याची योजना करितात, तों लोकांनी धर टाकिला. फौजेच्या चाका (!) सुटल्या. तेव्हा सरदारानी काय करावें ! कोणास कोणी पुसेनासें जहालें.........तेव्हा सहजच फौज

१. इ. सं. (मे. १९१६)
२. म. रि. उ. वि. १ (१९२९), पृ. ४४८ ३. सदर

कचकरली. तात्यासाहेबांकडून रावसाहेब माघारे जातात, तों पथकांतील लोक भणाण होऊन जिकडील तिकडील पळाले. कोणाचीच गाठ पडली नाही. तात्यासाहेब चार हजार फौजेचे धणी, परंतु तशा समयास तात्यासाहेबांबरोबर पांच लोक नव्हते. असा प्रसंग प्राप्त झाला.''[1]

हें वर्णन हृदयाला पीळ पाडणारें आहे.

प्रस्तुत वाक्यांत लेखकाचा भावनाविष्कार चांगला झालेला दिसतो. उदा. १. ईश्वरइच्छें लढाई बिघडली (पृ. ३२); २. सखो रंगनाथ दादासाहेबास लिहितो—'दादासाहेब कोणती गोष्ट काय म्हणोन लिहूं ? रावसाहेब धारातीर्थी पडले म्हणोन ठीक सांगत आले म्हणोन लिहूं ? किंवा तात्यासाहेब मंडळीसुद्धा शत्रूकडे पाडाव गेले म्हणोन लिहूं ? कोणतेहि गोष्ट तथ्य नये. तेव्हा काय लिहावें म्हणोन भ्रांतींत पडोन शोधास लागलों' (पृ. ३६); ३. रावसाहेब पुण्यवंत, धारातीर्थी मरण पावले. ते देवलोकास गेले. परंतु सर्वांचा घात जहाला ! ईश्वरें एकाएकीं घाला घातला ! (पृ. ३६) इ.

चटकदार भाषा, आकर्षक वर्णनें, उत्कृष्ट भावनाविष्कार, यथार्थ रसपरिपोष इत्यादि गुणांमुळे प्रस्तुत वाक्यांचा वाङ्मयीन दर्जा उच्च झालेला आहे. ह्या एकंदर प्रसंगांचीं पत्रें राष्ट्रीय पराक्रमाच्या दृष्टीने व भाषेचे उत्कृष्ट मासले म्हणून अत्यंत सुंदर आहेत'[2] हें रियासतकारांचें विधान ह्या वाक्यालाहि यथार्थतेने लागूं पडतें.

खर्ड्याच्या स्वारीची बखर :

इ. स. १७९५ मधील पेशवे व निजाम यांचें युद्ध हें मराठेशाहीच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें होय. पानिपतनंतर मराठ्यांनी आपला ढिला झालेला जम पुन्हा बसवून निजामावर स्वारी करून तो अधिक दृढ केला. या लढाईनंतर मराठी राज्याला उतरती कळा लागली व त्यांतच मराठेशाहीचा अंत झाला. पेशवे व निजाम यांचें वैमनस्य फार जुनें होतें. परंतु पेशव्यांचें सर्व लक्ष्य उत्तरेंतील राजकारण करण्यांत लागल्यामुळे निजामाला वठणीवर आणण्याचें काम लांबणीवर पडलें. ह्या लढाईंत सर्व मराठे सरदारांची एकजूट होऊन निजामाचा संपूर्ण पाडाव झाला. रियासतकार

१. इ. सं. (मे १९१६), पृ. ३४
२. म. रि. उ. वि. १, पृ. ४४८

म्हणतात की, खर्ड्याची लढाई हा मराठ्यांचा शेवटचा संस्मरणीय विजय होय.[1]

ह्या उज्ज्वल प्रसंगाची सविस्तर हकीगत ह्या बखरींत दिलेली आहे. खर्ड्याच्या लढाईचें कारण निजामाचा दिवाण मश्रुलमुल्‍ख याने निजामास पेशव्यावर स्वारी केली असतां राज्य हातीं लागेल असें सांगितलें, त्यामुळे निजामाने युद्धाची तयारी केली हें दिलें आहे.[2] पेशव्यांच्या बखरींत (कृ. वि. सोहनीविरचित) नबाबाचे कचेरींत रात्रौ तमाशा झाला, त्यामध्ये मश्रुलमुल्‍ख यांनी श्रीमंत रावसाहेब व नाना फडणीस यांचीं सोंगें आणिलीं, ही बातमी श्रीमंतांना त्यांचे वकील गोविंदराव काळे ह्यांनी कळविली त्यामुळे श्रीमंतांनी स्वारीचा बेत केला असें म्हटलें आहे (पृ. १५७). खर्ड्याच्या स्वारीच्या बखरींत हें सोंगाचें प्रकरण निजाम चालून आल्यावर वाटेंतल्या मुक्कामांत झाल्याचा उल्लेख आढळतो (पृ. ९). रियासतींत याला दुजोरा आहे.[3] ग्रँट डफ म्हणतो की, नानाने निजामाकडे त्याच्याकडे येणे असलेल्या चौतीस कलमांची यादी पाठविली. त्यावर मश्रुलमुल्‍ख सभेंत बोलला की, पेशव्यांनी येथे येऊन त्याचा अर्थ सांगितल्याखेरीज कोणाच्याहि ध्यानांत येणार नाही. ह्या धमकीच्या बोलण्याने मराठ्यांनी युद्धाची तयारी केली.[4] मराठी रियासत सांगते की, हिशेबाचा लढा म्हणजे चौथाई सरदेशमुखीचें ओझें निजामावर होतें. हें लढाईचें आद्यकारण होय.[5] खर्ड्याच्या बखरींत पेशव्यांचा मार्ग गारपीर, कोरेगांव, काष्टी, तांदळी, भिलवाडी असा दिलेला आहे (पृ. ८). मराठी रियासतींत हा मार्ग घोडनदी, मांडवगण, श्रीगोंदा (नगर जिल्हा), कर्जत, मिरजगांव असा आढळतो.[6] निजामाच्या वकिलास पेशव्यांनी कवाईत दाखविल्याची हकीगत (पृ. ८)

१. म. रि. उ. वि. २, पृ.४७९
२. खरड्याच्या स्वारीची बखर (शके १८०७), पृ.१
३. म. रि. उ. वि. २, पृ. ४७९
४. मराठ्यांची बखर (१९१६), पृ. ३१०
५. म. रि. उ. वि. २., पृ. ४५२
६. सदर, पृ. ४६८

तसेंच परशुरामभाऊंनी युद्धांत वाऱ्याची प्रार्थना केल्याचें वृत (पृ. १३) व नबाबाच्या फौजेंत फितूर झाल्याचा मजकूर (पृ. १४) हीं अन्यत्र आढळत नाहीत. श्रीमंतांनी आपल्याकडील प्रत्येक सरदाराच्या छावणींत जाऊन जातीने विचारपूस केली (पृ. १९) ही हकीगत नवीन दिसते.

आकर्षक वर्णनें हा ह्या बखरीचा विशेष होय. उदा. लढाईचें वर्णन करतांना बखरकार लिहितोः—

'मग सखारामपंत पानसे यांणी सतरा तोफा पुढे ओढिल्या. त्या तोफा बहुत मोठ्या होत्या. एक एक तोफेस बैल दोनशें ओढावयास लागत अशा होत्या. त्या तोफा सुरू होत तों अस्तमान जाहला. मग त्या तोफा सुरू झाल्यावर दणाण झाला. तिकडे अस्तमान होतांच मशाला लागल्या. हवयांचा उजेड पुढे बहुत पडला. मग विठ्ठलपंत सुभेदार यांणी बाणाचें छत करून सोडिलें. आणि जशी परजन्य वृष्टि होते, त्याप्रमाणें बाणामागे बाण सोडून एकच मार केला. आणि सर्वांनी एकदाच हरहर महादेव ! करून एकदाच उड्या घातल्या. मोठी लढाई मातबर जाहली. अशी रात्र प्रहर होई तों मोठी ख्याती लढाईची जाहली. जिवबादादा यांणी मोठी मर्दुमी केली. माणसें पडलीं त्याची संख्या त्या वेळेस राहिली नाही.'[1]

परशुरामभाऊंच्या डेऱ्यांतील भोजनाच्या व्यवस्थेचें तपशीलवार वर्णन करतांना लेखक म्हणतोः—

'शंभर पाट सागवानी एकसारखे मांडिले आहेत व तांब्या पंचपात्री दर एक पाटास मांडिली आहे व केळीचीं पानें समग्र मांडिलीं आहेत व प्रत्येक पानापुढे समया तेवत्या आहेत व कोरे पितांबराची घडी दर पाटास ठेविली या प्रमाणे शंभर पाटांवर पितांबराच्या घड्या ठेविल्या.'[2]

श्रीमंत पेशवे पुण्यास परत आल्यावर त्यांच्या मिरवणुकीची हकीगत काव्यात्मक पद्धतीने पुढीलप्रमाणे सांगितली आहेः—

'स्वारी अस्तमान झाल्यानंतर शहरांत आली. नंतर शहरांत चिरकदान्या, हावया, नळे, चंद्रज्योति, स्वारी रस्त्यांतून मिरवत चालली. व लोकांनी आपआपल्या ओट्यांवरून खाशा अंबारींत सोन्याचीं फुलें उधळिलीं. पायदळीं

१. ख. स्वा. बखर (श. १८०७), पृ. १४

२. सदर, पृ. २१

रस्ते सर्व फुलांनी भरले होते. दीडलाख (?) दीडशें आंबारीचे हत्ती खुले. एकून हत्ती स्वारी बरोबर चालत होते. त्या दिवशीं लोकांस असा भास वाटला की श्रीकृष्ण गोपाळ भगवान् याची स्वारी शोभली. मोठ्या समारंभाने स्वारी वाड्यांत आली. सगळे मानकरी शिंदे, होळकर व भोंसले व पटवर्धन व विंचूरकर असे बहुत होते ते किती ल्याहावे.' [1]

या बखरीची भाषा चटकदार आहे. त्यामुळेच ती परिणामकारक झालेली दिसते. उदा. १. 'याप्रमाणे धोत्रे भोजनभाऊ बहुत आहेत. यांणी तरवार काय मारावयाची आहे?' (पृ. ७); २. 'वकील म्हणो लागले की, 'या आगी पुढे कोण ठरेल' (पृ. ८); ३. 'जेथे भाऊंची उडी पडेल तेथे साठ हजारांची उडी पडावी' (पृ. १०); ४. 'तरवार मारावी आणि पालखी मेळवावी!' (पृ. ११) इत्यादि.

ह्या बखरींत मराठ्यांचे स्वभावविशेष चांगले प्रतिबिंबित झालेले दिसतात. उदा. १. श्रीमंत निजामाच्या वकिलास म्हणतात, 'समरंगणीं तुमचे आमचे दोन हात होतील, मग तेथे खंडणी द्यावयाची असल्यास देऊं, अथवा जें होणार तें समरंगणीं होईल' (पृ. ४). ह्यांत मराठ्यांचा आत्मविश्वास दिसून येतो. २. मराठ्यांचे वकील गोविंदराव काळे श्रीमंतांस लिहितात, 'नबाब शरण आले त्यास मरण द्यावयाचें नाही. ह्यांचा आपला भाऊपणा आहे' (पृ. १४) ह्यांत मराठ्यांच्या मनाचा उदारपणा व्यक्त होतो. ३. मश्रुलमुल्ख याचा पेशव्यांनी सन्मान केला (पृ. १८) ह्यांत मराठ्यांचा थोरपणा दिसतो.

वर्ण्य विषयाशीं तादात्म्य हा वाङ्मयीन गुण प्रस्तुत बखरींत आढळतो. बखरकार भावनात्मक अंतःकरणाने लिहीत असल्यामुळे त्याचें लेखन हृद्य वाटतें. 'ही बखर पठण करील त्यास विद्या लक्ष्मी प्रसन्न होईल. तुम्ही मनांत संशय घेऊं म्हणाल तर श्रीमंत मनुष्य होते असें म्हणाल, तरि जो पृथ्वीचा पति आहे तो विष्णूचा अवतार आहे यांत संशय नाही.' (पृ. २२) ह्या फलश्रुतींत लेखकाच्या भावनेचा सुंदर आविष्कार झाला आहे, ह्यांत शंका नाहीं.

१. सदर, पृ. २२

प्रसन्न भाषाशैली, रसाळ वर्णनपद्धति, काव्यात्मकता व भावनेचा जिव्हाळा ह्या गुणांमुळे प्रस्तुत बखर वाङ्मयदृष्ट्या सरस झाली आहे.

श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर :

पेशवे घराण्यांतील नारायणरावाच्या खुनाचें प्रकरण हा एक स्वतंत्र इतिहास आहे. थोरल्या माधवरावांच्या मृत्यूनंतर राघोबा व नारायणराव ह्या चुलत्या-पुतण्यांचे संबंध सलोख्याचे नव्हते. त्याचें पर्यवसान नारायणरावाच्या खुनांत झालें. ह्या प्रकरणांत राघोबाची पत्नी आनंदीबाई इचेंहि अंग होतें, असें म्हणतात. ह्या खुनाच्या प्रकरणामुळे केवळ पेशव्यांच्याच कुळांतील नव्हे, तर एकंदर मराठेशाहींतील फुटीर वृत्ति किंवा भाऊबंदकी जगाला कळून आली. अशा प्रकारचा प्रसंग पेशवाईत पूर्वी कधीच झाला नव्हता. ह्या प्रकरणामुळे पेशव्यांच्या म्हणजेच पर्यायाने मराठेशाहीच्या तेजस्वी कीर्तीला कलंक लागलेला आहे. राघोबाची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा व नारायणरावाचा तिखट नि हट्टी स्वभाव ह्याच्या तीव्र संघर्षाचा परिपाक ह्या खुनाच्या प्रसंगांत झाला. हा इतिहास जितका हृदयद्रावक आहे, तितकाच तो मराठ्यांच्या स्वभावाची ओळख करून देणारा आहे.

प्रस्तुत खुनाच्या प्रकरणाची ही एक स्वतंत्र हकीगत आहे. ह्या बखरींत 'आनंदीबाईने 'ध' चा 'मा' केला. 'मारावा' अशीं आक्षरें स्पष्ट जहाली' असा उल्लेख आढळतो.[१] ह्या दृष्टीने पाहतां आनंदीबाई ही ह्या प्रकरणाची मुख्य सूत्रधार होती, असा लेखकाचा भाव दिसतो. रियासतकार म्हणतात की, बिनतोड पुरावा हातीं आल्याशिवाय, पुतण्याचे खुनाचा गुन्हा आनंदीबाईचे माथीं मारणें अन्यायाचें होईल. निदान संशयाचा फायदा तरी तिला देणें न्याय्य आहे.[२] आख्यायिका, दंतकथा व सदर प्रसंगाची हरिवंशाची बखर इत्यादिकांत ह्या प्रकरणाची जबाबदारी आनंदीबाईची होती असें दिसतें, परंतु इतिहासदृष्ट्या हें प्रमाण मानतां येणार नाही.

ह्या बखरींत नारायणरावाच्या खुनाच्या प्रसंगाचें वर्णन अत्यंत हृदयद्रावक आहे. बखरकार लिहितो :—

१. श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर (शके १८०९), पृ. २
२. म. रि. म. वि. ४, पृ. ३४८

'तों इतक्यांत धावत नारोबा फाटक पुढे आला. त्याजला तोडून टाकतात तों पर्यंत नारायणरावसाहेब जेथे दादासाहेब बसले होते तेथे धावत जाऊन गळ्यांत मिठी घातली. आणि बोलूं लागले की, 'आता मला वांचवावें! इतक्यांत पवार व जमादार जवळ येऊन भिडले. दादासाहेब यांणी 'थांबा' म्हणोन हात केला. मग ते बोलले की, 'आता याला वाचवूं! हा उद्या आमचीं मुलें माणसें ठार मारील. 'मारावा' अशीं अक्षरें तुमचे हातचीं आहेत. आता थांबा कसें म्हणतां? पुढे लोटून द्यावा नाही पेक्षा दोघांस ठार मारूं.' असें बोलून नारायणरावसाहेब याजवर हात टाकिला. तों दादासाहेब याची पागोट्याची कंगणी तुटली. हें पाहून दादासाहेब भयाभीत जहाले. गळ्याजवळचा हात सोडून पुढे लोटून दिला. तों चापाजी टिळेकर याने नारायणराव साहेब यांचा बंदोबस्त करावा म्हणोन आंगरख्यासुद्धा आंगावर पडला. मग बोलला की, 'आधी मला मारावें.' असें म्हणतांच तुळाजी पवार याणे दोघांचेहि तीन तुकडे केले. इतक्यांत राजश्री इच्छाराम ढेरे हुजूरचे पागेदार पुढे आले. त्यास तेथेच ठार मारलें. गर्दी वाड्यांत जाली.'[1]

हें वर्णन नाट्यपूर्ण असून हृदयस्पर्शी आहे. पाल्हाळाचा अभाव हें प्रस्तुत बखरीचें वैशिष्ट्य होय. प्रसंगांचीं वर्णनें करतांना बखरकार अत्यंत समुचित शब्दांत संयमपूर्ण लेखन करतो. ह्या कारणामुळेच प्रस्तुत बखरीला आटोपशीरपणा आलेला असून ती चित्तवेधक झाली आहे.

ह्या बखरीची भाषा आवेशपूर्ण आहे. 'तर याप्रमाणे वचन द्यावें. थोरांचें वचन पाहिजे. थोर आहेत ते वचनाचें बेवचन करीत नाहीत.' (पृ. ८); 'विपर्यास दिसल्यास पारिपत्य करूं. काय चिंता आहे?' (पृ. १०) इत्यादि वाक्यांतला आवेश परिणामकारक आहे. 'पुढे गंगाबाईसाहेब नव मास भरल्यावर प्रसूत जहाली. मुलगा दृष्टीस पडला. त्यावेळेस दुर्गाबाई यास पार्वतीबाई काकूसाहेब यांणी खोलींत आणून दुर्गाबाई यास आणून बसविलें. तों तिच्या देखत अवतार जहाला (पृ. १२). ह्या वाक्यांत लेखकाचा भावनाविष्कार दिसतो.

---

१. ना. बखर, पृ. ४

आवेशपूर्ण भाषा, चित्तवेधक वर्णनें, संयमपूर्ण निवेदन व रसपरिपोष इत्यादि गुणांमुळे प्रस्तुत बखर वाचनीय झाली आहे.

निष्कर्ष : बखरलेखनाचे विशेष -

पेशवेकालीन विषयांवरील बखरींचा विचार करतांना एक गोष्ट प्रामुख्याने नजरेस येते. ती अशी की, ह्या कालांतील बखरींचे विषय विविध स्वरूपाचे आहेत. पेशवेकालांत पराक्रमाचें क्षेत्र व्यापक झाल्यामुळे बखरींचें विषय-दृष्ट्या अनेक प्रकार झालेले दिसतात. प्रसंगात्मक, चरित्रपर, आत्मचरित्रपर, एकेका घराण्याच्या हकीगती किंवा कैफियती, एखाद्या विशिष्ट काळांतील हकीगती, केवळ बातमी म्हणून झालेलें अखबार पद्धतीचें लेखन इत्यादि विविध प्रकारच्या बखरी लिहिल्या गेल्या. ह्यामुळेच पेशवेकालीन विषयांवरील बखरींची संख्या शिवकालीन विषयांवरील बखरींपेक्षा अधिक आहे. एका पानिपतच्या प्रसंगावरील सात-आठ बखरी तरी आहेत.

पेशवेकालीन विषयांवरील बखरी शिवकालीन विषयांवरील बखरींपेक्षा अधिक विश्वसनीय मानण्याकडे कल होतो. पेशवेकाल हा बखरकारांना जवळचा काल होता. तसेंच ह्या कालांत त्यांना जुनीं टिपणें, दफातीं, पत्रें इत्यादि साधनें उपलब्ध होतीं. एवढें खरें की, इतिहासाचें शास्त्रीय शिक्षण नसल्यामुळे इतिहासदृष्ट्या त्यांच्या बखरींचा दर्जा फारसा उंचावला नाही. तथापि त्यांचें प्रामाण्य मान्य केलें पाहिजे.

पेशवेकालीन विषयांवरील बखरींचें वैशिष्ट्य असें की, त्यांत शिवकालीन विषयांवरील बखरींप्रमाणे अद्‌भुत किंवा दैवी वर्णनें नाहीत. शिवकालीन विषयांवरील बखरींचें लेखन पौराणिक थाटाचें झालें असल्यामुळे त्यांत उपरिनिर्दिष्ट गोष्टींना आपोआपच स्थान मिळालें आहे. पेशवेकालीन बखरींत अद्‌भुताचा जवळजवळ अभाव असल्यामुळे त्यांत निर्भेळ इतिहासाचें निवेदन झालेलें दिसतें.

पेशवेकालीन विषयांवरील बखरींत लेखनदृष्ट्या शिवकालीन विषयांवरील बखरींपेक्षा अधिक पद्धतशीरपणा आढळतो. भाषेच्या दृष्टीनेहि ह्या बखरी अधिक समृद्ध आहेत. रेखीव रचना, कल्पनाचातुर्य, निवेदनकौशल्य, विनोद, उपमादि अलंकार हीं ह्या बखरींचीं वैशिष्ट्यें होत. भाषाशैली, वर्णन-पद्धति,

व्यक्तिदर्शन, रसपरिपोष इत्यादि बाबतींत बखरकारांनी विशेष लक्ष्य दिल्याचें दिसतें. इतिहासलेखन करतांना तें मनोरंजक करण्याचा ह्या लेखकांनी प्रयत्न केलेला आहे. अर्थातच प्रत्येक लेखकाच्या वैयक्तिक लेखनगुणाप्रमाणे त्या त्या बखरीचें स्वरूप झालेलें आढळतें. वाङ्मयदृष्ट्या ह्या बखरी अव्वल दर्जाच्या आहेत. पेशवेकालीन विषयांवरील सर्वोत्कृष्ट बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय.

बखरींचा उगम शिवपूर्वकालांत किंवा शिवकालांत झालेला असला, तरी त्यांचा खरा विकास पेशवेकालांतच झालेला दिसतो. विषयाचा चौफेरपणा व योग्य लेखकांची अनुकूलता यामुळे पेशवेकालीन विषयांवरील बखरींना इतिहासदृष्ट्या व वाङ्मयदृष्ट्या एक विशिष्ट स्थान प्राप्त झालेलें आहे. मराठींतील बहुसंख्य बखरी पेशवेकालीन विषयांवरच आहेत. बखर-वाङ्मयाच्या वैभवाचा खरा काल म्हणजे पेशवेकाल होय. इतिहासलेखनाची आस्था ह्याच काळांत निर्माण झाल्याचें दिसतें. मराठी साम्राज्याचा विकास जसजसा होत गेला तसतशी ह्या कालांत बखरलेखनाची परंपरा निर्माण झाली. तरवारीबरोबर लेखणीचें तेजहि पेशवेकालांत तळपतांना दिसतें. ह्या कालासंबंधी प्रा. पोतदार म्हणतात – “ स्वराज्याचें साम्राज्य झालें! व्यवहार अफाट झाला. ‘ राजकारणें ’ दाही दिशांला खेळूं लागलीं! त्यामुळे वाणीला वैभवाचें तेज चढलें. तिला विलासाचीहि चटक लागली व ती अधिक नटवी, लज्जतदार व प्रौढ झाली. ”[१] मराठी बखरवाङ्मयांत केवळ संख्येनेच नव्हे, तर गुणांनीहि पेशवेकालीन विषयांवरील बखरींचा मोठा वांटा आहे.

* * *

१. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार (१९२२), पृ. ६

७ : इतिहासेतर बखरी

इतिहासविषयक बखरींचें लेखन ज्याप्रमाणे झालें, त्याचप्रमाणे इतिहासेतर विषयांवरहि बखरींचें लेखन झालें. इतिहासविषयक बखरींची लोकप्रियता जसजशी वाढूं लागली, तसतशी इतिहासेतर विषयांवरहि बखरी तयार होऊं लागल्या. बखरीची कल्पना मुसलमानी असली तरी हकीगत, माहिती ह्या तिच्या मूळ अर्थाला अनुलक्षून इतर विषयांवर बखरी लिहिल्या गेल्या. इतिहासेतर बखरी मुख्यतः अव्वल इंग्रजींत निर्माण झाल्या असून त्या पौराणिक, सांप्रदायिक व मिशनरी—चळवळविषयक अशा आहेत.

पौराणिक बखरी :

रामायण, महाभारत, भागवत इत्यादि पुराणविषयक ग्रंथांतील लोकप्रिय कथाभाग हा ह्या बखरींचा विषय होय. ह्यांत पुराणपद्धतीने सुरुवातीस देवतांना वंदन करून कथानिवेदनास प्रारंभ केलेला असतो व शेवटीं कथा संपल्यावर पुराणग्रंथाप्रमाणे त्याची फलश्रुति दिलेली असते. त्याला बखर हें नांव दिलेलें असलें, तरी तें गद्यात्मक पुराणच होय. पुराणग्रंथांतील कथा किंवा आख्यानें रसाळ भाषेंत असलेलीं ह्या प्रकारच्या बखरींत आढळतात. अद्‌भुतता, अत्युक्ति, देवकोटींतले नायक इत्यादि पौराणिक कथांचीं वैशिष्टयें त्यांत दिसून येतात. श्रद्धामय अंतःकरण हा ह्या बखरींचा गाभा होय. धार्मिक ग्रंथ म्हणूनच ह्या प्रकारच्या बखरींचें महत्त्व आहे. ह्यापैकी गोपीचंदाच्या बखरीसारख्या कांही बखरींचें लेखन ऐतिहासिक बखरींप्रमाणे कोणाच्या तरी आज्ञेने झालेलें असल्यामुळे त्यांचें स्वरूप पत्ररूपात्मक असल्याचें दिसतें. इतिहासेतर बखरींत पौराणिक बखरींची संख्या अधिक आहे.

सांप्रदायिक बखर :

एका विशिष्ट संप्रदायांतील थोर पुरुषाची हकीगत ह्या प्रकारच्या बखरींत असते. चरित्रव्यक्तीचें कार्य किंवा मोठेपणा सिद्ध करण्यासाठी अद्‌भुत चमत्कारांच्या गोष्टी परंपरागत माहितीच्या आधारें भक्तियुक्त अंतःकरणाने रसाळ भाषेंत सांगितलेल्या असतात. हें सांप्रदायिक बखरींचें

वैशिष्ट्य होय. पौराणिक बखरींप्रमाणें ह्यांत फलश्रुति दिलेली असते. क्वचित् प्रसंगीं ऐतिहासिक उल्लेख त्यांत आढळतात. उपलब्ध सांप्रदायिक बखरींपैकी हनुमंतस्वामीकृत श्रीसमर्थांची बखर व जयरामस्वामी वडगांवकर ह्यांच्या चरित्राची बखर ह्या उल्लेखनीय होत. दामाजीची बखर ही सांप्रदायिक बखर पद्यात्मक आहे.

श्रीसमर्थांची बखर :

ही बखर म्हणजे समर्थांचें चरित्र होय. प्रस्तुत बखरीच्या दोन प्रतींच्या कांही जुन्या नकला सत्कार्योत्तेजक सभा, धुळें ह्या संस्थेच्या संग्रहीं आहेत. त्यांपैकी एक शके १७११ (इ. स. १७८९) मधली आहे. दुसरी शके १६३० (इ. स. १७०८) मधली असून त्याचीच परळीवर शके १६४५ (इ. स. १७२३) त प्रत लिहिली. ह्या दोहोंच्या आधारें शके १७१५ (इ. स. १७९३) मधील प्रत चाफळ संस्थानचे कारभारी रंगो लक्ष्मण मेढे यांच्याकडून तयार झाली.[1]

ह्या बखरीच्या कर्त्यांचें नांव हनुमंतस्वामी असें असलें, तरी स्वामींच्या आज्ञेवरून रंगो लक्ष्मण व मल्हार रामराव चिटणीस ह्यांनी तिची वाढवून दुसरी आवृत्ति शके १७४० (इ. स. १८१८) मध्ये तयार केली. हनुमंतस्वामी हे समर्थांचे बंधु श्रेष्ठ ह्यांच्या नातवाचे नातू होत. समर्थांचे नातू गंगाधरस्वामी होत. त्यांचे चिरंजीव लक्ष्मण गंगाधर यास शाहूने शके १६५७ (इ. स. १७३५) त मठाधिपति नेमलें. त्यांचे पुत्र हनुमंतस्वामी हे पुढे मठाधिपति झाले.

प्रस्तुत बखरीस 'श्रीरामदासस्वामी समर्थांचें चरित्र' असें नांव दिलें आहे;[2] पण श्रीसमर्थांची बखर, विशेषतः हनुमंतस्वामींची बखर हीं नांवें अधिक रूढ आहेत.

प्रस्तुत बखरीची सुरुवात पौराणिक पद्धतीची दिसते; कारण तींत गणेश सरस्वत्यादि देवतांना वंदन केलेलें आहे. आपण हें चरित्र साधार लिहीत असल्याचें बखरकार सांगतो (पृ. ४). बखरींतील हकीगत शके १७०५ (इ. स. १७८३) पर्यंत आहे.

१. प्राचीन मराठी गद्य (१९४९), पृ. १८६

२. श्रीसमर्थांची बखर (१९५०), पृ. १४५

ऐतिहासिक दृष्ट्या प्रस्तुत चरित्रांतील पहिली घटना म्हणजे विजयनगरच्या रामराजाचा उल्लेख हा होय. त्यासंबंधीच्या मजकुरांत बखरकाराने दिलेली शके १२०० (इ. स. १२७८) तील राक्षसतागडीच्या रणसंग्रामाची घटना ही कालदृष्ट्या बऱ्याच अगोदरची आहे. शिवाय रामराजाने पंढरीच्या विठ्ठलास प्रसन्न करून द्राविड प्रांतांत जाऊन राज्य केलें, ह्या घटनेला अन्यत्र दुजोरा नाही, हें आपण मागे पाहिलें.

दुसरी घटना म्हणजे समर्थ–शिवराय ह्यांची भेट ही होय. बखरकाराने ह्या बखरींतील शकतिथींची माहिती समर्थवाकेनिशी ह्या विश्वसनीय टिपणावरून घेतलेली दिसते व बाकीची हकीगत चाफळ मठांतील पूर्वपरंपरेच्या माहितीवरून व कर्णोपकर्णी मिळालेल्या मजकुरावरून घेतली आहे. ह्या बखरींतील अतिशयोक्तीचा भाग सोडल्यास हें वृत्त विश्वसनीय आहे, असें समर्थचरित्रकार स. खं. आळतेकर म्हणतात.[1] राजवाड्यांच्या मतें हनुमंतस्वामींनी सांगितलेल्या मूळ चरित्राच्या आधारें ही बखर जर खरी असेल, तर तिच्यांतील मित्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. ह्या मित्या जंत्रीवरून खऱ्या आहेत, असा हवाला राजवाडे देतात.[2] रियासतकारांनीहि शिव–समर्थ भेटीस वाकेनिशी टिपणाचा आधार दिला आहे.[3] वाकेनिशी टिपणांत शिवसमर्थ भेट शके १५७१ (इ. स. १६४९) शिंगणवाडीचे बागेंत वैशाख शुद्ध ९ गुरुवारीं झाल्याचा उल्लेख आढळतो. वाकेनिशी टिपण व शिवाजीने शके १६०० मध्ये समर्थांना दिलेली सनद इत्यादि महत्त्वाच्या विश्वसनीय पुराव्यावरून ही भेट शके १५७१ त झाली असेंच सिद्ध होतें.

समर्थांच्या भेटीनंतर शिवाजी त्यांची आज्ञा घेऊन प्रतापगडास गेल्याचा ह्या बखरींत उल्लेख आढळतो (पृ. ५६), परंतु या वेळीं प्रतापगड अस्तित्वांत नव्हता ह्याची चर्चा मागे झाली आहे. प्रस्तुत चरित्रांतील ऐतिहासिक प्रामाण्य नसलेला अद्‌भुत घटनांचा मजकूर सोडून माहीतगार व्यक्तींनी लिहिलेलें हें चरित्र विश्वसनीय मानणें इष्ट होय.

---

१. श्रीसमर्थचरित्र (शके १८५५), पृ. ११९
२. ऐ. प्र., पृ. २७१
३. शककर्ता शिवाजी (१९३५), पृ. २०८

ह्या चरित्रांतील शिवाजीने समर्थांचा निरोप घेतला त्या वेळचें वर्णन (पृ. ५६) व समर्थांच्या देहावसानाचें वर्णन (पृ. १३८) हीं वाङ्मय-दृष्ट्या उत्तम वर्णनें आहेत. ह्या वर्णनांत बखरकाराचें निवेदनकौशल्य प्रत्ययास येतें. वर्ण्य विषयाशीं तादात्म्य हा वाङ्मयीन गुण ह्या बखरींत आढळतो. चटकदार भाषा, आकर्षक निवेदन-पद्धति, भावनेचा जिव्हाळा इत्यादि गुणांमुळे ही बखर वाचनीय झाली आहे.

जयरामस्वामी वडगांवकर यांच्या चरित्राची बखर :

समर्थांचे समकालीन एक सत्पुरुष वडगांवकर जयरामस्वामी यांचे गुरु, परमगुरु व त्यांचे शिष्य प्रशिष्य ह्यांच्या चरित्राची हकीगत प्रस्तुत बखरींत दिली आहे.

ह्या बखरीच्या लेखनकालाचा उल्लेख नाही. महाराष्ट्र–सारस्वतकारांच्या मतें जयरामस्वामी वडगांवकरांची बखर शके १७३०–३५ (इ. स. १८०८–१३) च्या सुमाराची प्रसिद्ध आहे.[1] ह्या बखरींत जयरामस्वामींची शिष्यपरंपरा महादेवबाबापर्यंत दिली असून 'शके १७२७ (इ. स. १८०५) कार्तिक वद्य ५ चे दिवशीं महादेवबाबा समाधिस्थ झाले' असा उल्लेख आढळतो (पृ. ४७). ह्यावरून प्रस्तुत बखरीचें लेखन इ. स. १८०५ किंवा त्यानंतर लवकरच झालें असावें, असें दिसतें. हिचा लेखक कोणी तरी सांप्रदायिक असावा.

ह्या हकीगतींत कित्येक अद्‌भुत चमत्कार आहेत. समर्थांच्या बखरींत असलेली समर्थ व जयरामस्वामी जंगीच्या भोकांतून जाऊन मिरजेच्या ठाणेदार खानास शरणागती पत्करण्यास लावलेली अद्‌भुत चमत्काराची हकीगत ह्या बखरींत नाही. ह्यांतील पुढील माहिती महत्त्वाची आहे. १. श्रीभागवतांतील दशम स्कंधावर प्राकृत टीका ओवीबद्ध करून पूर्वार्ध व उत्तरार्ध ह्या नांवाचा ग्रंथ जयरामस्वामींनी लिहिला व सीतास्वयंवर व अपरोक्ष अनुभव हेहि ग्रंथ रचले (पृ. २६). २. महादेवबाबा ह्यांनी पुण्यास नाना फडणीस व महादजी शिंदे यांची गाठ घेतली (पृ. ३५). पौराणिक ग्रंथाप्रमाणे ह्यांत फलश्रुति दिलेली आहे. रसाळ भाषा हा प्रस्तुत बखरीचा मुख्य गुण होय.

---

१. महाराष्ट्र-सारस्वत (शके १८७३), पृ. ७९७

मिशनरी–चळवळविषयक बखरी :

अव्वल इंग्रजींत ख्रिस्ती मिशनरी लोकांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी बायबल, येशूचें चरित्र, धर्मविषयक चळवळ ह्या विषयांवर निरनिराळ्या भाषेंत ग्रंथरचना केली. त्यांपैकी मराठींत ख्रिस्ती मंडळीची बखर, अमेरिकन मराठी मिशन यासंबंधी मंडळ्याची संक्षिप्त बखर हे ग्रंथ झाले. ह्या बखरींचें स्वरूप प्रचारकी असलें, तरी एका विशिष्ट धर्माच्या चळवळीचा इतिहास ह्या दृष्टीने त्यांचें स्वतंत्र महत्त्व आहे.

निष्कर्ष :

इतिहासेतर बखरींचें स्वरूप मुख्यतः धार्मिक आहे. ह्या बखरींनी मराठी बखरवाङ्मयाचें क्षेत्र व्यापक केलें. अव्वल इंग्रजीच्या कालांतील मराठी लेखन विशेषतः गद्य–लेखन बरेंच अल्प आढळतें. तत्कालीन गद्यलेखनांत ह्या बखरींचा बराच मोठा भाग आहे. एक स्वतंत्र विषयावरील लेखन म्हणून ह्या इतिहासेतर बखरींची विशेष योग्यता आहे, यांत शंका नाही.

* * *

८ : बखरींची शैली

वाङ्मयस्वरूप लेखनाचा अभ्यास करतांना शैलीच्या दृष्टीने त्याचा विचार करणें आवश्यक ठरतें. वाङ्मयकृतीचें मूल्यमापन करतांना शैली ही एक मुख्य कसोटी मानली जाते. ह्याचें कारण असें की, त्या वाङ्मयीन कृतीचा इष्ट परिणाम मुख्यत्वेंकरून शैलीवरच अवलंबून असतो. म्हणूनच शैली हा एक स्वतंत्र वाङ्मयीन गुण मानण्याचा संकेत आहे.

शैली म्हणजे काय ?

शैली म्हणजे काय ? ह्या प्रश्नाचें समर्पक शब्दांत उत्तर देणें कठिण आहे. शैली (Style) ह्या संज्ञेत एका विशिष्ट गुणाचा अंतर्भाव होत नाही; कारण तो अनेक गुणांचा परिपाक होय. व्यावहारिकदृष्ट्या शैली म्हणजे योग्य कल्पना योग्य शब्दांत मांडणें, अशी व्याख्या करतां येईल. ही शैलीची स्थूल कल्पना होय.

आधुनिक टीकाशास्त्रांत शैलीचा विचार लेखकाच्या व्यक्तित्वाच्या दृष्टीने केलेला आढळतो. कोणत्याहि कलाकृतींत कलावंताच्या व्यक्तित्वाचें प्रतिबिंब असतें, ही विचारप्रणाली आता रूढ झालेली आहे. लेखकाच्या व्यक्तित्वाची छाप त्याच्या वाङ्मयावर पडते, असा सिद्धान्त आधुनिक टीकाशास्त्रांत प्रस्थापित झालेला दिसून येतो. प्रत्येक लेखकाची शैली ही स्वतंत्र असते. लेखनशैलीवरून लेखक ओळखतां येतो इतकेंच नव्हे, तर त्यावरून त्याच्या मनोभूमिकेची स्पष्ट कल्पना येते हें सिद्ध करण्याचा प्रयत्न पाश्चात्य टीकाकारांनी केलेला आहे. शैली हा केवळ शब्दगुण नसून अर्थगुणहि आहे हें तत्त्व सर्वमान्य दिसतें. 'Style is the man himself'[१] ह्या वचनावरून शैलीचा संबंध लेखकाच्या मनोवृत्तीशीं किती जिव्हाळ्याचा आहे हें दिसून येईल.

---

१. The Problem of Style (J. Middleton Murry 1952), P. 14

शैलीची चर्चा करतांना पुढील कांही गुणांच्या दृष्टीने विचार करणें आवश्यक आहे:—१. विचारसौंदर्य, २. भावनासौंदर्य, ३. रसात्मकता, ४. व्यक्तित्व, ५. वक्तृत्व, ६. सुबोधता, ७. परंपरासाहचर्य, ८. जीवनानुभूतिविषयक आवेश, ९. संयम, १०. उदात्तता, ११. वैचारिक क्रम, १२. पारिभाषिक शब्द, १३. व्याकरणदृष्ट्या रचना ह्या गुणांव्यतिरिक्त इतर गुणांचाहि अंतर्भाव शैलीविषयक चर्चेंत करावयास पाहिजे; परंतु, येथे शैलीच्या किमान गुणांचा विचार केलेला आहे. ह्या गुणांच्या कसोटीवरच मराठी बखरवाङ्मयाचें मूल्यमापन करावयाचें आहे.

विचारसौंदर्य :

विचारसौंदर्य हा शैलीचा एक महत्त्वाचा घटक आहे. विचारसौंदर्य हा लेखनाचा गाभा होय. विचार व्यक्त करण्यासाठी गद्य हें उत्कृष्ट माध्यम असतें. शैलीच्या दृष्टीने विचारसौंदर्याचा विचार करावयाचा म्हणजे लेखनाच्या विषयाची मांडणी अर्थदृष्ट्या कशी झाली आहे, हें पाहणें होय. अर्थव्यक्ति ज्या प्रमाणांत स्पष्ट झाली असेल, त्या प्रमाणांत हा हेतु साध्य झाला असें म्हणावयास हरकत नाही. संदिग्धता हा भाषादोष आहे. ग्रंथनिविष्ट भाषेमध्ये सुलभ अर्थव्यक्ति ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अर्थव्यक्ति हा लेखनाचा प्राथमिक हेतु असला, तरी त्याचा एकमेव हेतु नव्हे; कारण ती अर्थव्यक्ति ज्या कलात्मक पद्धतीने होईल, त्या दृष्टीने त्या अर्थव्यक्तीला विशेष महत्त्व प्राप्त होतें. ‘ कौशल्य मोठें रचनेंत आहे. ’ [१] हें सूत्र अर्थव्यक्तीच्या दृष्टीने अत्यंत सार्थ आहे.

इष्टार्थव्यक्ति ही दोन पद्धतीने होऊं शकते. एक साध्या शब्दरचनेने व दुसरी आलंकारिक म्हणजे कलात्मक पद्धतीने. ह्या दोहोंपैकी वाङ्मयदृष्ट्या ही दुसरी पद्धतीच अधिक महत्त्वाची मानली जाते. कलात्मक पद्धतीने अर्थव्यक्ति करणें हें मोठें कसब आहे.

सूचकता हा अर्थव्यक्तीच्या दृष्टीने एक आवश्यक गुण होय. नादमधुर शब्दरचना, कल्पकता, अर्थानुकारी शब्दयोजना हीं अर्थव्यक्तीचीं अमोघ साधनें होत. उत्कृष्ट भाषाशैलींत ह्या गुणांचें अस्तित्व असतें. साधी कल्पना मार्मिक पद्धतीने सांगितल्यास कलात्मक सौंदर्य निर्माण होतें.

१. काव्यरत्नावलि (मे १८९६)

बखरींचा हेतु इतिहासांतील घटनांचें निवेदन हा होय. ऐतिहासिक घटना साध्या पद्धतीने म्हणजे जंत्रीवजा सांगितल्यास त्यांत सौंदर्य निर्माण होणें कठिण आहे. अशा प्रकारचें इतिहासलेखन हें वाचकाला आनंद देऊं शकणार नाही; पण तें कल्पकतेच्या साहाय्याने, अलंकार–सुभाषितादिकांच्या मदतीने सांगितल्यास त्यांत आपोआप गोडी निर्माण होते.

सभासदाची बखर, पाणिपतची बखर (रघुनाथ यादवकृत), भाऊसाहेबांची बखर, होळकराची थैली, नाना फडणिसाचें आत्मचरित्र, पेशव्यांची बखर (कृ. वि. सोहनीकृत), खर्ड्याच्या स्वारीची बखर इत्यादि ज्या कांही वाङ्मयीन स्वरूपाच्या बखरी आहेत, त्यांत विचारसौंदर्य उत्कृष्ट प्रकारचें दिसून येतें. वृत्तकथन हा बखरींतला विचारच होय. अनुरूप भाषेच्या व अलंकारांच्या साहाय्याने उपरिनिर्दिष्ट बखरींत विचारसौंदर्य निर्माण झाल्याचें आढळतें.

मूळ विषयाला कलेच्या साहाय्याने रमणीयत्व आणतां येतें, याचें प्रत्यंतर वाङ्मयीन स्वरूपाच्या बखरींत दिसतें. सभासदाच्या बखरींतला अफजलखानाच्या वधाचा प्रसंग ह्याच स्वरूपाचा आहे. ह्या प्रकरणाचा विस्तार चित्रगुप्ताच्या बखरींत अत्यंत सुंदर पद्धतीने केलेला आढळतो. कलादृष्ट्या चित्रगुप्ताच्या बखरींतला हा प्रसंग व शिवाजीच्या राज्याभिषेकाचा प्रसंग हे उत्कृष्ट आहेत. पाणिपतच्या बखरींत व भाऊसाहेबांच्या बखरींत पाणिपतच्या घटनांचें निवेदन अत्यंत आकर्षक वाटतें. चिटणिसांच्या छत्रपतींच्या चरित्रांतील घटना ह्या मनोरम पद्धतीने निवेदन केलेल्या असल्यामुळे वाङ्मयाच्या दृष्टीने हीं चरित्रें सुंदर उतरलीं आहेत.

चिटणिसांच्या संभाजी राजे यांच्या चरित्रांतील खंडो बल्लाळाच्या स्वामिनिष्ठेच्या प्रसंगाचें आकर्षक वर्णन पुढीलप्रमाणे आहे:—

‘ तों खंडो बल्लाळ यांणी महाराज कृपा करीत तों पायउतारा स्वारीबरोबर असावें ऐसें व्रत केलें होतें. तसेच पायउतारा पाठीमागे जात होते. तों लोकांनी सांगितलें की, खंडोबा चिटणीस धावत येत आहेत. ते समयीं हाक मारविली. तों धावून येऊन पावले. त्यास जाब लिहून देणे [असें] सांगितलें. तों बसोन लेहून दिल्हे. स्वारी पुढे गेली. पुन्हा धावून निशाण करून दिल्हें. तों रक्त ओकले. (तें) पाहून आस्ताव्यांतून पाणी देवून खासा

घोडा जिलबीस होता तो देऊन बसा म्हणोन सांगितलें. गोव्यानजीक गेलियावरि पालखींतून उतरून घोडियावर स्वार जाले. आणि निकडीने जाऊन आटोपावें म्हणून पोहोचले. तों त्या अवसरीं भरतें प्राप्त झालें. फिरंगी सावध होऊन उभे राहिले. लढाई पडली. फिरंगी मोडिला. लोक फार मारिले असतां पळून गोव्याचे किल्ल्यांत गेले. महाराजांनी खासा घोडियावरून जिनास पाणी लागे तों घोडा घातला. त्याजबराबर खंडो बल्लाळ यांणी घोडा घालून तरवार मारिली. शिपायागिरी केली. गोवेकर सावध जाले. पाणी चढलें तेव्हा माघारे फिरले. तों घोडा पहुणीस लागला. खंडो बल्लाळ यांणी उडी टाकून महाराजांचा घोडा धरून पोहून बाहेर निघाले. ते समयीं बहूत संतोष होऊन पोटाशीं धरिलें, आणि बोलिले जे, 'तुझे वडील निरपराधें लुच्यांचे सांगण्यावरून विचार न करितां मारिले असतां आज चाकरीची शर्त केली! तुझी चिटणिशी महाराजांनी वंशपरंपरेंकरून दिल्ही, निसबतीचे धंदे कारखानिशा जमनिशा ते बहाल आहेत. कैलासवासी महाराज तुमचे वडिलांवरि प्रीती विश्वास ठेऊन करीत होते तें पाहिलें आहे. त्याहून अधिक तुम्हावर प्रीती विश्वास ठेऊन चालवीन. कुलीन खरे!' ऐसे नांवाजून 'आमचे वंशीचा असेल तो परंपरेने तिन्ही धंदे चालवील,' ऐसे पुनः आश्वासन देऊन घोडा बाक्षिस दिला."[१]

वरील वर्णनांतील निवेदन साधें असूनहि तें चित्तवेधक झालें आहे. खंडो बल्लाळाच्या स्वामिनिष्ठेचें दर्शन बखरकाराने सूचकतेने केलेलें दिसतें. ह्या वर्णनांतील घटनेला सूचकतेची पार्श्वभूमि लाभल्यामुळे हें वर्णन उठावदार झालें आहे. शब्दांचें अवडंबर न करतां सरळ पद्धतीने निवेदन केल्यामुळे तें उत्कृष्ट वाटतें.

ह्याप्रमाणेच होळकराची थैली, नानाचें आत्मचरित्र, हरिवंशाची बखर ह्यांतहि विचारसौंदर्य आढळतें. ह्या बखरींचें वाचन करतांना एखाद्या रम्य कादंबरीची आठवण होते. भिन्नभिन्न व्यक्ती व प्रसंग ह्यांचें कलात्मक दर्शन ह्यांत होत असल्यामुळे विचारसौंदर्य हा गुण त्यांत आढळतो. म्हणूनच ह्या बखरींचा वाङ्मयीन दर्जा उच्च झाला आहे.

---

१. श्रीमंत छत्रपति संभाजी महाराज यांचें चरित्र (१९३०), पृ. २५

भावनासौंदर्य :

विचारांप्रमाणे भावनांचेंहि महत्त्व वाङ्मयांत असतें. काव्यांत भावना चांगल्या रीतीने व्यक्त होऊं शकतात हें खरें असलें, तरी गद्यांतहि त्या चांगल्या रीतीने व्यक्त होऊं शकतात. बाणभट्ट, हर्ष, दंडी इत्यादि लेखकांनी संस्कृत गद्यांत भावनाविष्कार केला. मराठी वाङ्मयांत शिवरामपंत परांजपे ह्यांचे 'काळांतील लेख' हें उत्कृष्ट भावनासौंदर्याचें उदाहरण होय.

मराठी बखरींत भावनासौंदर्य हा वाङ्मयगुण विशेष प्रमाणांत आढळून येतो. ह्याचें कारण म्हणजे बखरलेखकांचा वर्ण्य विषयाचा जिव्हाळा होय. एका विशिष्ट भावनेने प्रेरित होऊन बखरींचें लेखन झाल्यामुळे त्यांत बखरकारांची भावना स्पष्टपणें प्रतिबिंबित झाली आहे. ह्याशिवाय प्रसंगानुरूप लेखकांच्या अंतःकरणांतील भावनांची खळबळ बखरींत दिसून येते. सभासदाची बखर, चिटणिसांच्या बखरी, भाऊसाहेबांची बखर, हरिवंशाची बखर इत्यादि ज्या वाङ्मयीन गुणांनी समृद्ध अशा बखरी आहेत, त्यांत भावनासौंदर्य प्रत्ययास येतें.

भावनासौंदर्याच्या दृष्टीने भाऊसाहेबांची बखर ही सर्वोत्कृष्ट आहे. पानिपतसारखा रोमहर्षक प्रसंग, त्यांत मराठ्यांवर आलेलें संकट व त्यामुळे झालेली भीषण परिस्थिति ह्या सर्वांचें वर्णन बखरकाराने अत्यंत भावनात्मकतेने केलें आहे. दत्ताजी शिंद्याच्या वधाच्या प्रसंगाप्रमाणेंच गोविंदपंत बुंदेल्याचा मृत्यु, बळवंतराव मेहेंदळे यांचा मृत्यु ह्या प्रसंगांचीं वर्णनें अत्यंत हृदयस्पर्शी आहेत. नानाच्या आत्मचरित्रांत पानिपतहून पुण्यास येतांना नानावर ओढवलेल्या कठिण प्रसंगाचें वर्णन रोमांचकारक वाटतें. चिटणिसांच्या संभाजीच्या चरित्रांतील संभाजीवर आलेल्या दुःखद प्रसंगाचें वर्णन, तसेंच राजाराम जिंजीस गेल्यावर मोगलांनी केलेल्या मराठ्यांच्या ससेहोलपटीचें वर्णन, पटवर्धनी वाक्यांतील कुंदगोळच्या लढाईचें वर्णन, श्रीमंत नारायणराव पेशवे यांच्या बखरींतील नारायणराव पेशव्यांच्या खुनाचें वर्णन हीं सर्व मनावर परिणाम केल्याशिवाय राहत नाहीत.

भाऊसाहेबांच्या बखरींतील मराठ्यांच्या पळाचें वर्णन पुढीलप्रमाणे आहेः—

'कितीकास दिल्लीचा मार्ग सापडला. त्यांचे मागोमाग दिल्लीस (व तेथून) भिंडीवर आले. वाटेने कितीक जिवें मारिले. कितीएकास लुटून सोडून दिलें. दिल्लीचा मार्ग न सापडला आणि आडमार्गे पायाने (जे) गेले ते फिरत फिरत जातां जातां तीस चाळीस हजार जमले. त्यास पंचवीस पन्नास दांडगे मिळून घोडीं हिरोन घेईत. असा अनर्थ होऊन मातब्बर माणूस पाय-उतारा जाले, बहुतांस अन्न कोठे न मिळे. मग अवघे जमून, मथुरेस येऊन एक दिवस दम खाल्ला. तों हजारों हजार थोर थोर मनुष्य नागवे उघडे केवळ भगंग, कंगाल, अन्नरहित, वस्त्राने रहित, कळाहीन चीलची भाजी खात आले.'[1]

वरील वर्णन अत्यंत सहृदयतेने केलें असल्यामुळे त्यांत भावनासौंदर्य निर्माण झालें आहे व त्यामुळेच तें आकर्षक वाटतें.

मराठ्यांचा इतिहास हा उज्ज्वल आहे. त्यांत राष्ट्रप्रेम, स्वामिभक्ति, स्वधर्माभिमान, स्वाभिमान इत्यादि गुण उच्च कोटीला पोचलेले आहेत. अशा गुणांच्या भावनोत्कट प्रसंगांचें निवेदन बखरकारांनी अत्यंत हळुवारपणें केलेलें आढळतें. मराठी बखरींचें लेखन प्रायः गद्यांतच असलें तरी त्यांतहि विचारसौंदर्याप्रमाणे भावनासौंदर्यहि दिसून येतें. भावनोत्कटता हा बखर-वाङ्मयाचा विशेष होय. इतिहासांतील हर्षामर्षाच्या प्रसंगांत विविध भावनांचीं चित्रें रंगविण्यांत बखरलेखकांचें अनुपम कौशल्य दिसतें. ह्या भावनासौंदर्यामुळे बखरींचें वाङ्मयीन मूल्य निःसंशय वाढलेलें आहे.

रसात्मकता :

रसात्मकता किंवा रसवत्ता हा शैलीचा एक प्रभावी गुण होय. रसाचें कार्य वाचकाच्या मनांत भावनाजागृति करण्याचें असतें. ही भावनाजागृति जितक्या उत्कट प्रमाणांत होईल तितक्या उत्कट प्रमाणांत रसिकास आनंद होईल. उत्कृष्ट वाङ्मयांत ही रसोत्कटता असल्यामुळेच त्यापासून सहृदय वाचकांना ब्रह्मास्वादसदृश असा उच्च दर्जाचा आनंद प्राप्त होतो. रसोत्कटता ही वाङ्मयाची मुख्य कसोटी असल्यामुळे वाङ्मयाचें यशापयश या रसोत्कटते-वरच अवलंबून असतें.

१. भाऊसाहेबांची बखर (१९३२), पृ. १६०

मराठी बखरवाङ्मयांत रसोत्कटता निश्चितपणें आढळते. बखरींचे विषय ऐतिहासिक स्वरूपाचे असल्यामुळे त्यांत प्रायः वीर व करुण हे दोन रस आहेत. थोर ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें लिहिणें किंवा अभिमानास्पद अशा ऐतिहासिक प्रसंगांचें वर्णन करणें हा बखरलेखनाचा हेतु होता. एवढेंच केवळ नव्हे तर समाजाला स्फूर्ति देण्याचा किंवा त्यांत नवचैतन्य निर्माण करण्याचा दुसराहि हेतु होता. स्वदेशाच्या इतिहासाच्या आस्थेनेच बखरी निर्माण झाल्या हें ध्यानांत घेतल्यास ऐतिहासिक वाङ्मयाला आवश्यक असणाऱ्या वीररसाचा प्रकर्ष बखरींत कां दिसून येतो, हें स्पष्ट होईल.

वीररसाप्रमाणे करुणरसहि बखरींत येणें अपरिहार्य आहे. युद्धांतील यशाचें वर्णन करतांना वीररसाचें वर्णन हें ओघाने जसें येतें तसेंच अपयशाचें वर्णन करतांना किंवा युद्धांतील भीषण संहाराची कल्पना येण्यासाठी करुणरसाच्या वर्णनाची आवश्यकता निर्माण होते. अफजलखानाचा वध, वसईचा रणसंग्राम, खर्ड्यांची स्वारी इत्यादि शौर्याच्या प्रसंगांवरील बखरींत वीररसाचा प्रकर्ष दिसून येतो, तर पानिपतचें युद्ध, नारायणराव पेशव्यांचा खून यांसारख्या दुर्दैवी प्रसंगांच्या बखरींत करुण रस आढळतो. पानिपतच्या युद्धाचा विषय असलेल्या भाऊसाहेबांच्या बखरीच्या सुरुवातीस वीररस असून शेवटीं त्याचें पर्यवसान मराठ्यांच्या सर्वनाश झालेल्या परिस्थितींत म्हणजे करुणरसांत झालेलें आहे.

पानिपतच्या युद्धाचें वर्णन करतांना भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक लिहितोः—

'परस्परे गोळागोळीस तोंड लागलें. त्याजकडील तीनशें तोफा व गनिमांकडील दोनशें तोफा, एकदाच सरबत्ती झाली. शिवाय धाकटीं यंत्रें, हस्तनाला व सुतरनाला व जेजाला व बंदुका व रेकले ह्यांस गणित नाही. मोठीशी गर्दी होऊन गेली. धुराचे गर्दीने सूर्यबिंब आच्छादिलें. कोणाची खबर कोणास नाहीशी जाली. त्यांत शूर होते त्यास वीरश्रिया आल्या. भ्याड होते त्यांस ऐसें जालें की, 'धरणी माय दे ठाय' तैसें जालें. धडाकियाखाली घोडे मनुष्यें धुंद जालीं. रणतुरें व रणभेरी व आराबियाचीं वाद्यें यांचा एकदाच कल्होळ जाला. उभय दळें मिळतीं जालीं. तों हुजरातीची फौज, बहुत दिवसांचे खानदान लोक होते, त्याणी कृतसंकल्प केला की,

'बहूत दिवस यांचें अन्न भक्षिलें आहे. त्याची उत्तीर्णता आज आहे.' म्हणोन त्याजवरि हुजरातीने कडनिकड करून घोडे घातले. झुंजास तोंड लावून घाव केला, क्षणभर हुतुतू सारिखे त्यांस मोडूनहि घालविलें. एक वेळ यांसहि मोडून ते माघारें घालवीत. अशा पांच सांत हिरहिऱ्या जाल्या. तों विठ्ठल शिवदेव व यशवंतराव पवार कांहींसे पुढे वाढून गेले. त्यांजवर झुंज पडलें. तेव्हा हे कच खाऊन माघारे तोफखान्यांत येऊन उभे राहिले. दमाजी गायकवाड याजवर गिलच्यांनी येऊन नेट बसविला. तेहि माघारे येऊन उभे राहिले. मुकामीं गोटाचा गोट येऊन उभा राहिला होता, त्याप्रमाणे पथकें उभीं होतीं. त्यांजवर खासा अबदुल अली त्या झुंजावरि डावे बाजूस होता. त्याने झुंज भारी केले. कुल भाऊसाहेब यांजकडील पथकें माघारीं फिरविलीं. हलके बहूत जाले. इभ्राहिमखान गाडदी याजवर खासा दुराणी व रोहिला याणी चालून घेतलें. यांची एक रंजक उडाली. दुराणीकडील लोक बहूत पडले. परंतु जाग्यावरून हालले नाहीत. तैसेच नेट धरून मारीत आले आणि इभ्राहिमखान गाडदी याजवरि चालोन आले. इभ्राहिमखान गाडदी याज-वरिच पडले. कुमक कोणीच केली नाही. तथापि संभाळून येऊन हुजुरातीचे लोक व आपण एक होऊन संधान साधिलें. तोफाहि सुटत होत्या. लढाई मना जाली नव्हती. मातबर एक प्रहरपर्यंत लढाई केली.'[१]

वरील वर्णनांत लेखक वर्ण्य विषयाशीं तन्मय झालेला असल्यामुळे हें युद्धप्रसंगाचें वर्णन सुंदर झालें आहे. या वर्णनांतील बारकाव्यावरून बखर-काराच्या युद्धविषयक ज्ञानाची कल्पना येते. लहान लहान वाक्यांच्या योजने-मुळे वीररसात्मक प्रसंगाचें हें वर्णन चित्तवेधक झालें आहे यांत शंका नाही. 'गर्दी होऊन गेली', 'उभय दळें मिळतीं जालीं' 'हतुतूसारिखे त्यास मोडूनहि घालविलें', 'हिरहिऱ्या जाल्या', 'वाढून गेले', 'झुंज पडलें', 'एक रंजक उडाली', 'संधान साधिलें' इत्यादि समर्पक शब्दप्रयोगामुळे सदर प्रसंगाचें चित्र डोळ्यापुढे स्पष्ट उभें राहतें. ह्या वर्णनांत बखरलेखकाच्या निवेदनशैलीने उच्चांक गाठलेला आहे.

दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर शिंद्यांच्या गोटांतील शोककारक प्रसंगाचें वर्णन करतांना बखरनवीस म्हणतोः—

१. सदर, पृ. १४७

'जनकोजी शिंदे येईत तों पावेतों बायकांस कांही दत्ताजी शिंदे यांची अवस्था ठाऊक नव्हती. बाडांत वर्तमान कळतांच भागीरथीबाई व जनकोजी शिंदे यांची स्त्री काशीबाई अशीं उभयतां मराठधर्म विसरून धावत बाडाबाहेर आलीं. तों जनकोजी शिंदे घायाळ खाटलियावर पाहिले. तोंड उघडून पाहिलें तों जनकोजी शिंदे यांनी डोळियास पाणी आणून चुलतीस विचारिलें की, 'बाई, काका कोठे आहेत?' ते समयीं भागीरथीबाईस पुरतें उमजलें की, पाटील निश्चये रणांत पडले. बाईस मोठा उभडा आला. मागतीं विवेक केला की, 'जात्यांतील रडती आणि सुपांतील हासती! त्यांची गत या रितीची जाली. आणि हा तो घायाळ, याचेंहि जगावयाचें कठीण. दुराणीचा मागे पेंच भारी, आता मी शोक करितें तर याची गत काय?' याविषयी दोहरा आहे.

मेरे मनमें कछु और। कर्ता के कछु और॥
उधो माधो कहे। झूटी मनकी दौर॥

म्हणून उभडा आला तो विषासारिखा घोट्न जनकोजी शिंदे यास जाबसाल केला की, 'बाबा, तूं रांडेसारखा रडतोस काय? जयाजी शिंदे यांचे पोटी चौघी लेकी जाहाल्या, तैशीच तूं एक आणखी जाली असतीस तरि आणिक एक जावई येता. पाटील काय घेऊन गेले? दुनिया, दौलत, महाल, मुलूक, खजिना, हत्ती, घोडे सर्व तुम्हापाशी ठेऊन गेले. तुम्ही हिमत धरून त्याचें सार्थक करावें. आता रडून होणें काय?' म्हणोन हिंमत देऊन बोलताच जनकोजी शिंदे उगेच स्तब्ध राहिले"[१]

उपरिनिर्दिष्ट वर्णनांतील शोक हा त्यांतील गंभीर तत्त्वज्ञानात्मक विचारामुळे अधिकच तीव्र झालेला दिसतो. भागीरथीबाईच्या सांत्वनपर भूमिकेमुळे तिची शोकविषयक भावना उदात्त स्वरूपाची होऊन उठावदार झाल्यास नवल नाही. शोकात्मक भावना व तत्त्वज्ञानात्मक विचार ह्या दोहोंचा कलात्मक संगम प्रस्तुत वर्णनांत आढळतो. यामुळे हा प्रसंग हृदयस्पर्शी झाला आहे.

ह्याप्रमाणे मराठी बखरींत रसोत्कटता असल्यामुळे त्या वाङ्मयदृष्ट्या उत्कृष्ट झाल्या आहेत.

---

१. सदर, पृ. ८८

व्यक्तित्व :

वाङ्मय हें जीवनाचें प्रतिबिंब असतें, तद्वतच तें लेखकाच्या व्यक्तित्वाचें निदर्शक असतें. प्रत्येक लेखकाची एक विशिष्ट मानसिक घडण असते. भोवतालचें वातावरण, आनुवंशिकता, वाचन, निरीक्षण, चिंतन इत्यादि गोष्टींनी लेखकाचें मन तयार होतें. ह्या गोष्टींनी होणारे सामुदायिक परिणाम किंवा संस्कार हे लेखकाच्या कलानिर्मितीला प्रामुख्याने जबाबदार असतात. लेखकाच्या लेखन-वैशिष्ट्याचा विचार केल्यास शब्द, वाक्यें, भाषेची लकब, कल्पनाविचारांची मांडणी इत्यादि गोष्टींत त्याचें व्यक्तित्व दिसून येतें. शैलीचें स्वरूप लेखकाच्या व्यक्तिवैशिष्ट्याप्रमाणे बदलतें. हें व्यक्तित्व किंवा पृथगात्मता म्हणजे कोणत्याहि कलाकृतीचा गाभा होय.

व्यक्तित्व हा वाङ्मयाचा महत्त्वाचा घटक असल्यामुळे त्याच्या स्वरूपावर वाङ्मयाचा परिणाम अवलंबून असतो. वाङ्मयांत व्यक्तित्वाचा ठसा जितक्या उत्कट प्रमाणांत व आकर्षक स्वरूपांत उमटलेला असेल तितक्या प्रमाणांत तें वाङ्मय परिणामकारक होईल. हा वाङ्मयीन संकेत निरपवाद आहे. हें व्यक्तित्व नेमकें कशांत असतें हें सांगणें कठिण असलें, तरी त्याचें स्वरूप अनुभवाने म्हणजे वाङ्मयाचें रसग्रहण करून समजण्यासारखें आहे.

मराठी बखर–वाङ्मयांत हें व्यक्तित्व किती प्रभावी आहे हें त्या त्या बखरींच्या स्वरूपावरून दिसून येतें. बखरी–विशेषत: समकालीन बखरी त्यांतील लेखकाच्या प्रभावी व्यक्तित्वामुळे यशस्वी झालेल्या आहेत. सभासदाची बखर, चिटणिशी बखरी, पाणिपतची बखर (रघुनाथ यादव), भाऊसाहेबांची बखर, नाना फडणिसाचें आत्मचरित्र, पेशव्यांची बखर (कृ. वि. सोहनी), शिव–दिग्विजय, शिवाजीप्रताप, हरिवंशाची बखर इत्यादि वाङ्मयगुणसंपन्न बखरी बखरकारांच्या व्यक्तित्वामुळे आकर्षक झालेल्या दिसतात.

उपरिनिर्दिष्ट बखरींचे बहुतेक लेखक हे तत्कालीन राजकीय जीवनाशीं संबद्ध होते. राजकीय घटनांचें त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केलें असल्यामुळे, त्या घटनांची प्रतिक्रिया त्यांच्या लेखनांत दिसून आल्यास नवल नाही. बखरकारांनी आपल्या मनांत निर्माण होणाऱ्या भावनांना व विचारांना आपल्या लेखनांत वाट दिलेली आहे. त्यांच्या लेखनांत प्रामाणिकपणा

दिसतो. ह्या साऱ्यांचा परिणाम म्हणजे त्यांचें व्यक्तित्व बखरींत ठळकपणें प्रतिबिंबित झालें आहे. प्रत्येक बखरकाराच्या भाषेचा डौल, कल्पनांची भरारी, अलंकारांचें सौंदर्य, वर्णनसामर्थ्य इत्यादि गोष्टी स्वतंत्र आहेत. ह्या दृष्टीने त्याचें व्यक्तित्व स्वयंपूर्ण आहे. त्यांची परस्पराशीं तुलना करणें असमंजसपणाचें होईल.

रघुनाथ यादवविरचित पाणिपतच्या बखरींत स्वकीयांच्याविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळे लेखकाचें व्यक्तित्व किती प्रभावी झालें आहे तें पाहा:—

"अशा प्रकारचीं सर्व समुदायाचीं उत्तरें जिकीरीचीं रायांनी ऐकून घेऊन प्रतिउत्तर दिलें की, 'होणारास उपाय काय? कोणी आपण आपलें अनिष्ट चिंतीत नाही. दैवगतीनें घडून आल्यास उपाय कोणाचा? यश किंवा अपयश महाराज छत्रपतींकडे. आता शरीर तृणप्राय मानून, मर्दुमीचा हिय्या न सोडतां, समशेरीची शर्थ करून दाखवावी. कौरव पांडव सकल सेनेसहित कुरुक्षेत्रीं धारातीर्थी सुस्नात झाले, तदनुरूप आपणहि व्हावें. यापरता पराक्रम कोणता? सर्व सत्ता श्रीकैलासनाथाची! त्याप्रमाणे घडून येतें दूषणें लावितां तीं प्रमाणच. गेल्या गोष्टी पुढे येतात असें नाही. प्रस्तुत पुढची विचारणा चित्तांत आणून यश छत्रपतींचें सांभाळावें. हें यश तुम्हां समस्तांचें आहे! निदानसमयसागरतारक पिनाकपाणी आहे, मग इराणीची तमा ती काय? आतां भय धरल्याने काय होतें? श्रीसांबकृपेने इराणीस मारून गर्दीस मिळवून देऊं. सत्कीर्ती करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे? उद्या सर्वांनी खंदकपार होऊन मारतां मारतां कटून मरावें. या भूषणापरतें दुसरें काय आहे?' हा निश्चय सदाशिवपंतांनी करून सर्वत्रांस विडे देऊन बोळाविलें."[१]

वरील उताऱ्यांत स्वकीयांचा आत्मविश्वास व स्वकीयांची कर्तव्यनिष्ठा ह्याविषयी लेखकाला वाटणारा सार्थ अभिमान व्यक्त झाला आहे. त्याने केलेला स्वकीयांचा गौरव हा त्याच्या व्यक्तित्वाचा एक महत्त्वाचा घटक आहे. लेखकाचें प्रभावी व्यक्तित्व सदर उताऱ्यांतील प्रत्येक वाक्यांत प्रतिबिंबित झालेलें दिसतें.

१. पाणिपतची बखर (१८८९), पृ. ३४

मराठी बखरकारांचें व्यक्तित्व त्यांच्या लेखनांत उत्कृष्ट रीतीने प्रगट होण्याचें प्रमुख कारण असें की, बहुतेक बखर-लेखक हे लेखनकलेंत प्रवीण होते. मनांतील भाव उत्कृष्टपणें व्यक्त करण्याचें कसब त्यांच्या अंगीं होतें. उत्तुंग कल्पनाशक्ति व उत्तम स्मरणशक्ति ह्यांच्या बळावर त्यांना बखरी सजवितां आल्या. ऐतिहासिक घटनांना त्यांनी कल्पकतेची जोड दिल्यामुळे त्यांचें लेखन तेजस्वी झालेलें दिसतें. निवेदन-कौशल्य त्यांच्या अंगीं असल्यामुळे त्यांच्या लेखनांत आकर्षकपणा निर्माण झालेला आढळतो. स्वकीयांचा गौरव व परकीयांची निंदा ही बखरकारांची सर्वसामान्य भूमिका आहे. बखरकारांच्या व्यक्तित्वाचे हे अनेक पैलू आहेत. बखरींच्या यशाचें रहस्य बखरकारांच्या विलोभनीय व्यक्तित्वांत आहे, हें मान्य केलें पाहिजे. वाचकांच्या मनाची जबरदस्त पकड घेणारा हा वाङ्मयप्रकार त्यांत पदोपदीं व्यक्त होणाऱ्या लेखकाच्या प्रभावी व्यक्तित्वामुळे यशस्वी झाला, यांत सुतराम् संदेह नाहीं.

वक्तृत्व :

वक्तृत्व हा शैलीचा अंतर्गत असा गुण आहे. लेखकाला आपलें अंतरंग वाचकांपुढे खुलें करावयाचें असतें. आपणांस प्रतीत झालेल्या विचार-विकारांचा अनुभव वाचकांसहि आणून देण्याचें कार्य लेखकाला करावयाचें असतें. हें कार्य करण्यासाठी वक्तृत्व ह्या गुणाची त्याला चांगलीच मदत होते.

वक्तृत्व हा विशिष्ट असा एक गुण नाहीं. भावनोत्कटता, आवेश, उदात्तता, भाषेचा अखंड ओघ इत्यादि गुणांचा त्यांत अंतर्भाव होतो. वर्ण्य विषयाशीं समरसता किंवा त्यासंबंधी वाटणारा जिव्हाळा हा वक्तृत्वाचा आधारभूत गुण होय. भाषेचा अखंड ओघ हें एक वक्तृत्वविषयक अंग आहे. भाषेचा अखंडपणा हा विचारांच्या निश्चितपणावर अवलंबून असतो. मनांतील विचार जर तर्कशुद्ध असतील, तर त्यांचा अखंडपणा टिकतो. अर्थात् हे विचार व्यक्त करण्यासाठी भाषाप्रभुत्व अवश्य हवें.

अलंकारिक भाषा, कोटिबाजपणा, काव्यमय व नादमधुर शब्दरचना हें वक्तृत्वाचें बाह्यांग होय; पण भावनेचा ओलावा नसलेलें उपरिनिर्दिष्ट बाह्यगुणाश्रयी वक्तृत्व हें परिणामकारक होऊं शकत नाहीं.

लेखनांतहि वक्तृत्वाची अपेक्षा असते, हा वदतो व्याघात नव्हे. भाषण हें जसें निवेदनात्मक असतें तद्वतच लेखन हेंहि निवेदनात्मक असतें. दोहोंत फरक इतकाच की, एकांत वक्त्याशीं साक्षात् संबंध येतो, तर दुसऱ्यांत तो अप्रत्यक्षपणें येतो; पण हेंहि खरें नाही. कारण लेखनांत वक्ता म्हणजे लेखक हा अदृश्य राहूनहि शब्दरूपाने साक्षात् हजर असतो. लेखनांतील वक्तृत्वाचें वैशिष्ट्य असें की, भाषणाप्रमाणे त्याचें स्वरूप तात्कालिक नसून तें चिरंतन आहे. लेखनाचें सामर्थ्य पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेलें असतें.

मराठी बखर-वाङ्मयांत वक्तृत्वगुणाची श्रेणी उच्च दर्जाची आढळते. वाङ्मयगुणसंपन्न बखरींत वक्तृत्वाचा गुण निरपवाद आढळतो. भाऊसाहेबांच्या बखरीचें यश तींत असणाऱ्या वक्तृत्व ह्या गुणांत आहे. प्रस्तुत बखरींत भाषेचा अखंड प्रवाह, आवेश, भावनोत्कटता इत्यादि गुण चढत्या श्रेणीने दिसून येतात. तींत भावनांची व विचारांची साखळी अतूट अशी आहे. कोणताहि प्रसंग पाहा—मग तो दत्ताजी शिंद्याच्या नाशाचा असो, गौतमाबाईने केलेल्या मल्हारराव होळकराच्या निषेधाचा असो किंवा बळवंतराव मेहेंदळ्यांच्या मृत्यूचा असो हे सर्व प्रसंग वक्तृत्वाच्या उत्कटतेने रसरसलेले आहेत. लेखकाने ह्या प्रसंगांचें केलेलें निवेदन नाट्यपूर्ण असून एखाद्या विद्युल्लतेप्रमाणे डोळे दिपविणारें आहे. ह्या बखरीचें वाचन करतांना लेखक हा आपणाशीं प्रत्यक्ष बोलत आहे की काय असा भास होतो. गतकालांतील घटना यांत लेखकाने जिवंत करून दाखविल्या आहेत. वक्तृत्वाचा अभेद्य गुण—आत्मीयता—ह्या बखरींत प्रकर्षाने आढळतो. वक्तृत्व हें लेखनकलेला कसें साहाय्यभूत होतें.याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय.

भाऊसाहेबांच्या कैफियतींतील पानिपतच्या युद्धाच्या वर्णनांत वक्तृत्व कसें दिसून येतें तें पाहण्यासारखें आहे. कैफियतकार लिहितो —

‘ त्याणे (इब्राहिमखान गारदी) जिवाचा निधडा करून शिपाईगिरी म्हणावी तैशी केली, ज्याचें नांव शिपाईगिरी. कितेक गारदी (खेतांत) आले व कितेक ठार जाले. हुजरातीचे लोक जवळचे पळों लागले. तोफखाना बंद जाला. जातीनिशीं तरवार सीमेपरती केली. जाऊन गिलचाचे लष्करांत मिसळला. दहा पांच ठार केले. भोवता वेढा गिलच्याचा पडला. आंगावर जखमा भारी पडिल्या. ऐसे असता लढतच होता. प्रयत्न न चाले तेव्हा

हत्यारें राहिलीं. धरून नेला. तेव्हा हें वर्तमान श्रीमंतास कळलें. मल्हारजी होळकर याचे बाजूवरहि मातबर जुंज जालें. रेटत नाहीसे जाले तेव्हा तेहि बाजू सोडून निघाले. भाऊसाहेबांचें हेंच तोंडीं की, हाणा हाणा हेंच करीत असतां जातीनिशी मोठा हिय्या केला. बहूत जुंज मातबर केलें तें कोठवर ल्याहावें ? सरकारचे मुत्सद्दी तमाम बिलकुल् एकीकडे पळों लागले. सोनाजी भापकर यासि भाऊसाहेब बोलले की, 'सोनजीबाबा हा समय निघावयाचा नव्हे. तुमचा भरवसा बहूत धरला होता. उभे राहावें.' तेव्हा ते बोलले की, 'कुल लोक पळतात त्याजला माघारें फिरवितों. साहेबास टाकून आम्ही कोठे जावें ?' ऐसे म्हणोन लोक फिरवावयास म्हणोन गेला तो तिकडेच गेला. तेव्हा मुकुंदजी शिंदे म्हणों लागले की, 'महाराज, क्षात्र धर्माची शर्त जाली ! याज उपर निघावें हें उत्तम आहे.' तेव्हा भाऊसाहेब बोलले की, 'मुकुंदजी बाबा, आता कोणीकडे जावें ? काय तोंड दाखवावें ? रावसाहेबां-कडे पहावें.' तेव्हा मुकुंदजी शिंदे याणी घोडियावरून उडी टाकिली. जातीने हत्यार करवलें तेथवर केलें. मातबर मराठे धर्माची शर्थ करून ठार जाले. जरीपटक्याचे निशाणाजवळ अगोदर दाटी जाली होती तेव्हा हत्ती-वरून उतरून घोडियावर घातलें होतें. निशाण गुंडाळून पळूं लागले. तेव्हा भाऊसाहेबीं शहाजणें वाजवावयास आज्ञा केली. फत्ते जाली, शहाजणें वाजतात, याजकरिता तरी लोक माघारें फिरतील. या अर्थी शहाजणें वाजवूं लागले. परंतु ज्यांणी पळ काढिला त्यापैकीं कोणी माघारा फिरला नाही. भाऊसाहेब व जनकोजी शिंदे व शेपन्नास लोक व रायाचे मुडद्याचा हत्ती इतकी बाकी राहिली. त्याजभवता वेढा भारी पडला. तेव्हा युद्ध बहूत केलें. पूर्वी भारथी अतिरथी महारथी जुंज जाले. त्याप्रमाणे भाऊसाहेबींहि लढाईची शर्थ केली. पुढे कांही इलाज चालेनासा झाला. त्यानंतर भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गति काय जाली ती कोणी पाहिली नाहीं. रावसाहेबांचे मुडद्याचा हत्ती व भाऊसाहेबांची बसती घोडी ऐशीं सुजातडवला याजकडे गेली.'[१]

वरील वर्णनांत एकसूत्रीपणा असून भाषेचा अखंड ओघ आहे. आवेश व भावनोत्कटता हे गुण त्यांत स्पष्टपणें दिसून येतात. लेखक वर्ण्य विषयाशीं समरस झाल्यामुळे ह्या वर्णनांत वक्तृत्वाचें विलक्षण सामर्थ्य आढळतें.

१. श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत (शके १८०९), पृ. २५

ह्याप्रमाणेच सभासदाची बखर, चिटणिसांचीं छत्रपतींचीं चरित्रें, साष्टीची बखर, नाना फडणिसाचें आत्मचरित्र, गंगाधरशास्त्री पटवर्धन ह्यांचें आत्मचरित्र, पेशव्यांची बखर (कृ. वि. सोहनी), पटवर्धनी वाका, जावलीकर मोरे यांची छोटी बखर इत्यादि बखरींत वक्तृत्व हा गुण विशेषत्वाने प्रत्ययास येतो. त्यामुळेच ह्या बखरी डोळयांत भरण्यासारख्या झाल्या आहेत.

सुबोधता :

सुबोधता म्हणजे स्पष्टार्थ व्यक्त होणारी शब्दरचना. क्लिष्टत्व हें अर्थव्यक्तीच्या दृष्टीने अनुपकारक ठरतें. क्लिष्टता किंवा गूढत्व पांडित्याचें निदर्शक असलें, तरी लेखनाचा प्राथमिक हेतु जो अर्थव्यक्तीकरण त्याला त्यामुळे बाध येतो, म्हणूनच क्लिष्टत्व हा दोष मानला जातो.

सुबोधता हा शैलीचा बाह्य गुण होय. सुबोधता म्हणजे केवळ निरलंकृत रचना नव्हे. अर्थव्यक्तीसाठी अलंकारांचा आश्रय करूनहि अर्थसौंदर्य निर्माण होऊं शकतें. कारण अलंकार हे ' शोभाकरधर्म ' आहेतच. शब्दांच्या अभिधा–शक्तीपेक्षा लक्षणा व व्यंजना ह्या शक्ति अधिक प्रभावशाली असल्यामुळे प्रतिभासंपन्न लेखक त्यांचाच आश्रय करतात.

सुबोधता म्हणजे सरलता अशी कल्पना असली, तरी सरलतेशिवाय इतर गुणांचाहि तींत अंतर्भाव होतो. नादमाधुर्य, अपरिचितार्थ व्यक्तीकरण, कल्पनारम्यत्व हे सुबोधतेचे म्हणजे पर्यायाने अर्थगौरवाचे पैलूच होत. ' इष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ' (काव्यादर्श) किंवा ' रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः ' (रसगंगाधर) हें काव्याचें लक्षण शैलीच्या सुबोधता ह्या अंगाला यथार्थतेने लागू पडतें. अलंकारांचा औचित्यपूर्ण किंवा प्रमाणबद्ध उपयोग ह्या लेखनाला तारकच ठरतो.

मराठी बखरी शैलीच्या दृष्टीने सुबोध आहेत. विषयाचा जिव्हाळा व विचारांची स्पष्टता ह्यांमुळे, बखरकारांच्या लेखनाला साहजिकच सुबोधत्व प्राप्त झालेलें दिसतें. त्यांच्या लेखनांत सुबोधतेचें मुख्य लक्षण म्हणजे सहजता हें स्पष्टपणें आढळतें. ह्याचीं उदाहरणें म्हणजे सभासदाची बखर, चिटणिसाच्या बखरी, भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर (रघुनाथ यादव), भाऊसाहेबांची कैफियत, गंगाधरशास्त्री पटवर्धन ह्यांचें आत्मचरित्र, पेशव्यांची बखर (कृ. वि. सोहनी), पटवर्धनी वाका, हरिवंशाची बखर,

श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर, खर्ड्यांच्या स्वारीची बखर, होळकरांची कैफियत, दाभाडे सेनापति यांची हकीगत, गायकवाड यांची हकीगत, बापू कान्हो यांचें आत्मचरित्र इत्यादि होत.

ह्या बखरींपैकी सभासदाची बखर, चिटणिसांचीं छत्रपतींचीं चरित्रें, भाऊसाहेबांची बखर इत्यादि कांहीं बखरी आज्ञेने लिहिलेल्या असूनहि त्यांत सहजता दिसून येते. ह्या बखरींत लेखनाची जी सफाई दिसते तिचें मुख्य कारण असें की, बखरकारांनी वर्ण्य विषयाशीं तादात्म्य पावून प्रामाणिकपणें लेखन केलेलें आहे. शिवाय बखरलेखन हें दुसऱ्यासाठी असल्यामुळे त्या लेखनांत चटकदारपणा आणण्यासाठी लेखकांना काळजी घेणें आवश्यक होतें.

बखरी वाचनीय होण्यासाठी क्लिष्टत्वाचा दोष टाळून त्या सुबोध करण्याचें बखरलेखकांचें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. हें सुबोधतेचें प्रमाण मराठी बखरींत कमी–अधिक स्वरूपांत दिसतें. उदाहरणार्थ, चिटणिसांच्या बखरीपेक्षा सभासदाची बखर अधिक सुबोध आहे. नानाच्या आत्मचरित्रापेक्षा गंगाधरशास्त्री पटवर्धनांचें आत्मचरित्र किंवा बापू कान्होचें आत्मचरित्र ह्यांत अधिक सुबोधता आढळते. शिवाजीप्रताप व शिवदिग्विजय ह्या बखरींपेक्षा पेशव्यांची बखर (कृ. वि. सोहनी), भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर (रघुनाथ यादव) व हरिवंशाची बखर ह्या अधिक सुबोध आहेत. चित्रगुप्ताची बखर, भोसलवंश चरित्र व सनपुरीची बखर ह्यांत सुबोधपणा दिसून येत नाही. प्रौढ शब्दांमुळे व अलंकारांच्या अमर्याद उपयोगामुळे त्यांत कृत्रिमपणा निर्माण झालेला आहे. नागपूरकर भोसल्यांच्या बखरींत सुबोधत्व असूनहि सहजता आढळत नाही. ब्रह्मेंद्रस्वामींची बखर व शाहूमहाराजांची बखर (गोविंद खंडेराव चिटणीस) ह्यांत सुबोधता फारच कमी प्रमाणांत आढळते. हनुमंतस्वामींची बखर ह्यांसारख्या सांप्रदायिक बखरींत व रामायण–महाभारतांतील आख्यानांच्या पौराणिक बखरींत सुबोधता कटाक्षाने आढळते. त्या मानाने खिस्ती–धर्मविषयक बखरींत ही सुबोधता दिसून येत नाही.

सुबोधतेचा दृष्टीने सोहनीकृत पेशव्यांच्या बखरींतील पुढील वर्णन उल्लेखनीय आहे.

' असे मजल दरमजल दिल्लीस जाउन पोचले. चालतांना वाटेने मुलूख वैराण झाला. फौजेस खर्चास पैसा नाही. त्यासमयीं दिल्लीचें बादशहाचें तख्त फोडून, खजीना काढून, तेथून निघून, कुंजपुरावर येऊन, सारा कुंजपुरा लुटून, पैका मुबलख घेऊन, तेथून स्वारी दरकूच यमुनातीरास येऊन, तेथे मुक्काम केला. पलीकडून, इराणी येत होता, त्याचा रस्ता कोंडून उभे राहिले. तेव्हा त्याची यांची लढाई मोठी होऊन त्या लढाईस भाऊसाहेब जय पावले. इराणी उतरून आलीकडे आला. त्याचेंहि फौजेचा जमाव दोन लक्षांचा होता. त्याच्या यांच्या लढाया मोठया शर्तीच्या झाल्या. त्या समयीं इराणी आपले ठिकाणीं हार मानून भाऊसाहेब यांशीं सल्ल्याचें बोलणें लावलें. परंतु सदाशिवपंत भाऊ कोणाचें ऐकत नाहीसे झाले. आपापल्या मतें सर्व सरदार लहान थोर शिंदे होळकरसुद्धां यांणी विनंती बहुतां प्रकारें केली. परंतु सदाशिवपंत भाऊ यांचें म्हणणें ' एक इराणी राहील किंवा आम्ही राहूं ' असा निश्चय समजला तेव्हा मागती लढाईस उभे राहिले. एकुण चार लढाया मिळून पेशवे याजकडील फौज बहूत खपली. इराणीची खपली. परंतु इराणी याचा पिछा चांगला पाठीमागून होता. त्यामुळे त्याला कुमकेस फौज आणखी नवीन येत गेली. पेशवे यांचा पाठीमागून पुरावा नाही. त्यामुळे सैन्य थोडें राहिलें. तें पांचवे लढाईत बहूत खपलें. शेवटीं विश्वासरावसाहेब यास अंबारींत गोळी कोणी दुष्टाने मारली. त्याणे ते ठार झाले. ते सदाशिवपंत भाऊ यांणी पाहून अगदीं निदान केलें. आता दक्षिणेंत जाऊन काय तोंड दाखवावें ? असा निश्चय करून राहिलें सैन्य समागमें घेऊन मल्हारराव होळकर दहा हजार फौजेनिशी होते. त्यास भाऊसाहेब यांणी सांगितलें की, 'आता तुम्ही सर्वांचे कबिले घेऊन बाजारबुणगे संभाळून माघारें दक्षिणेत जावें. ' तेव्हा नाना फडणीस वगैरे मंडळी होती ती माघारी फिरली व भाऊसाहेब याणी युद्धास आरंभ करून आपण जातीने तीन हजार स्वारानिशी गिलच्याचे फौजेंत मिसळून गेले. त्या समयीं युद्ध मोठें घनचक्र झालें. शके १६८२ पौष शुद्ध ८ मीस भाऊसाहेब गर्दींत मिळाले. कोठे ठिकाण नाहीसें झालें. साडेतीन लाख फौज तितकीही तेथे खपली. त्या दिवशीं मोठे उल्कापात झाले. दिवसास तारा पडला. दिवाकर चार घटका असता अंधःकार पडला. असें युद्ध मानवी मागे झालें

नाही व पुढे होणार नाही. असा लौकिक सदाशिवपंत भाऊ यांणी युद्धाचा मिळविला. मल्हारराव होळकर दाहा हजार फौजेनिशीं माघारें आले ते सर्व खटलें घेऊन पुण्यास पोचले. तेव्हा श्रीमंत नानासाहेब यास सर्व वर्तमान कळतांच भाऊसाहेब व विश्वासरावसाहेब गेल्यामुळे त्या शोकाने नानासाहेब यांची कंबर बसली.' [१]

वरील उताऱ्यांतील वर्णन साधें आहे. लेखक अलंकारांचा आश्रय न घेतां वेचक पण परिणामकारक शब्दरचनेच्या साहाय्याने पानिपतच्या युद्धाचें वर्णन करतो. त्यामुळे त्यांत व्यक्तिवर्णन व प्रसंगवर्णन हीं सुरेख साधलीं आहेत. या वर्णनांत सुबोधता असल्यामुळे तें चित्तवेधक वाटतें.

वाङ्मयीन गुण असलेल्या बखरींत सुबोधता व सहजता हीं प्रायः आढळतात. कित्येक वेळां सुबोधता असूनहि सहजता आढळत नाही, हें आपण पाहिलें. परंतु सहजता हा गुण असला तर सुबोधतेचें साहचर्य त्याच्याशीं बहुशः असतें हें वरील उदाहरणावरून दिसून येतें. सहजता ही भावना व विचार यांच्या उत्कटतेवर अवलंबून असते. सर्वसामान्यपणें मराठी बखरींत सुबोधता आढळते. त्या मानाने सहजता ह्या गुणाचें दर्शन कमी प्रमाणांत होतें; पण भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर इत्यादि बखरींत ती पराकोटीला गेलेली दिसते.

परंपरासाहचर्य (पारंपरीणता) :

एखाद्या भाषेंतील निरनिराळ्या वाङ्मयप्रकाराचें स्वरूप बाह्यतः भिन्न असलें किंवा भिन्न भिन्न कालांतील वाङ्मयाचें स्वरूप निरनिराळें असलें, तरी तें ज्या राष्ट्राचें किंवा समाजाचें प्रातिनिधिक असतें त्या राष्ट्रांतील संस्कृतीचा प्रवाह त्या वाङ्मयांत कमी–अधिक प्रमाणांत वाहतांना दिसतो.

प्रत्येक ग्रंथकाराला स्वतःची अशी एक पूर्वपरंपरा असते. पूर्वसूरींच्या ज्ञानधनाचा वारसा त्याच्याकडे आलेला असतो. नवयुगाच्या एखाद्या प्रवर्तकालाहि आपल्या पूर्वजांचें ऋण मान्य करावें लागतें. पूर्वसूरींच्या ज्ञानाच्या आधारावर आपल्या पिढींतल्या ज्ञानाचें पाऊल पुढे टाकण्याचें कार्य प्रत्येक लेखकाला करावयाचें असतें. ह्या दृष्टीने ज्ञानाचा वारसा हा

१. पेशव्यांची बखर (१९२५), पृ. ६३

पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला असतो. ही परंपरा चालू ठेवणें हें प्रत्येक लेखकाचें नैतिक कर्तव्य होय. जुन्या ग्रीक किंवा रोमन खेळाडूंप्रमाणे पुढील पिढींतील माणसांच्या हातांत त्याला आपला (ज्ञान) दीप द्यावयाचा असतो. एखाद्या द्रष्ट्याचेंहि तसेंच आहे. क्रान्तीची घोषणा करणारे लेखक एका नवीन मार्गाची वाटचाल करतांना दिसतात खरे; परंतु ती वाटचाल करतांना त्यांच्या वैयक्तिक कर्तृत्वाला पारंपरिक मूल्यांचा आधार असतो. किंबहुना त्यांच्या जीवनध्येयाची नौका ह्या मूल्याच्या सुकाणूच्या मदतीने पुढे जात असते.

आता ज्या पारंपरीणतेचा उल्लेख केला, तिचें स्वरूप व कार्य कोणतें ह्याचा विचार करूं.

ही पारंपरीणता एकाच विशिष्ट तत्त्वाची बनलेली नसून धर्म, व्यवहार, राजकारण, अध्यात्मवाद इत्यादि जीवनाला सर्व अंगांनी व्यापणाऱ्या तत्त्वांची मिळून बनलेली असते. ह्यालाच साकल्याने संस्कृति असें म्हणतां येईल. प्रत्येक लेखक एका विशिष्ट संस्कृतींत वाढलेला असतो. त्याच्या मनावर कळत न कळत त्याच्या समाजाच्या संस्कृतीचा परिणाम होत असतो. पारंपरीणता त्याच्या वाङ्मयांत कधी स्पष्ट तर कधी अस्पष्ट अशी व्यक्त झालेली असते. जीर्ण संस्कृतीविरुद्ध जेव्हा एखादा लेखक बंड करतो, तेव्हा त्या संस्कृतीची प्रचलित जीवनाच्या दृष्टीने तो पुनर्निर्मितिच करीत असतो.

पारंपरीणता किंवा परंपरासाहचर्य याचा अर्थ आंधळें गतानुगतित्व नव्हे. स्वतःचें व्यक्तित्व ठेवून गतपरंपरेचें डोळस अनुकरण करणें हीच खरी पारंपरीणता. हें परंपरासाहचर्य वाङ्मयांत विविध प्रकारांनी व्यक्त होतें. जुने अर्थपूर्ण शब्द, जुनी अविच्छिन्न विचारप्रणाली, औचित्यपूर्ण पौराणिक दाखले किंवा सुभाषितें, भाषेचा डौल, बहुश्रुतता इत्यादि स्वरूपांत हें परंपरासाहचर्य दिसून येतें. लेखनाच्या दृष्टीने ही पारंपरीणता कलात्मक असते. याप्रमाणे वाङ्मयाला उच्चतम स्वरूप प्राप्त करून देणाऱ्या पारंपरीणतेचें महत्त्व शैलीच्या दृष्टीने विशेष आहे.

मराठी बखर-वाङ्मयांत परंपरासाहचार्याचें स्वरूप हें अनेक प्रकारें दृग्गोचर होतें. ह्या बाबतींत पहिली गोष्ट नजरेस येते ती म्हणजे निवेदनाची

पौराणिक पद्धति ही होय. सृष्टीच्या उत्पत्तीपासून इतिहास देण्याची पुराणांची परंपरा ही महिकावतीची बखर, नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांतील परमेश्वराच्या वर्णनाचा प्रास्ताविक भाग, चिटणिसाचें सप्तप्रकरणात्मक चरित्र, भोसलवंश-चरित्र, शिवदिग्विजय ह्या बखरींत आढळून येते. सभासदाच्या बखरींत, चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांत व खड्याच्या स्वारीच्या बखरींत फलश्रुति आहे. ही पद्धति पेशवेकालीन विषयावरील बखरींपेक्षा शिवकालीन विषयांवरील बखरींत विशेषेंकरून दिसून येते.

परंपरासाहचार्याचा दुसरा प्रकार म्हणजे पौराणिक दाखले देण्याची बखरकारांची पद्धति होय. उदाहरणार्थ, पुढील कांहीं दाखले पहा :

१. अफजलखान सामान्य नव्हे. केवळ दुर्योधनच जातीने होता...... त्यास एकले भीमाने मारिला. त्याचप्रमाणे (येथे राजाने) केलें. शिवाजी राजाहि भीमच.[१]

२. जैसा धर्मराजें राजसूय यज्ञ संपादिला, किंवा रघुराजे धरादत्त करून संपूर्ण धरा ब्राह्मणास दान दिधली, किंबहुना जनमेजयांनी सर्पसत्र अचंब्र संपादिलें यद्वत् (तद्वत्) कल्युगीं महाराजांनी दानधर्माची निस्सीमताच केली.[२]

३. पुढे भगवान पूर्णब्रह्म राधाकृष्ण याणे सकल लीला केल्या असें जें वृंदावन त्या स्थळास गेलों.[३]

४. पूर्वी जैसे मारामारी रामायणीं राक्षस आणि वानर किंवा भारतीं कौरवपांडव यांचें सैन्य, या प्रकारे समारंभ जाहाला.[४]

५. भगवंते वाट दिल्ही तिकडे गेले.[५]

६ जसा श्री भगवंतें पांडवांचे घरीं उच्छिष्टादि काढिलीं, अश्वांची सेवा, सारथ्य केलें, शेवट सुभद्राहि जाला, असा भक्तकाजकल्पद्रुम, त्याप्रमाणे महाराज या लोकांस दैववशें प्राप्त जाला.[६]

१. शिवछत्रपतींचें चरित्र–सभासद (संपा० का. ना. साने १८८९), पृ. १९
२. शिवाजी महाराजांची बखर–चित्रगुप्त (काव्येतिहाससंग्रह २६), पृ. १०८
३. नाना फडणिसाचें आत्मचरित्र (ऐतिहासिक पत्रें यादी वगैरे. १९३०), पृ. १७४
४. भाऊसाहेबांची बखर (१९३२), पृ. १३४
५. श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत (शके १८०९), पृ. २६
६. श्रीशिवदिग्विजय (शके १८१७), पृ. १२०

७. भगवान गोपाळकृष्ण यांची स्वारी चालली आहे असा भास जाहला.[1]

पौराणिक संस्कारामुळे बखरकारांना हे दाखले देण्याचा मोह टाळतां आला नाही. पौराणिक संस्कारांचा परिणाम बखरलेखकांवर इतका झालेला दिसतो की, शिवकालांतल्या सभासदाच्या बखरीप्रमाणे पेशवेकालांतल्या भाऊसाहेबांच्या बखरींत किंवा चिटणिसांच्या बखरींतहि तो आढळतो. बखरकारांनी ह्या पौराणिक दाखल्यांचा उपयोग संयमपूर्ण व औचित्यपूर्ण केला आहे; म्हणूनच बखरींचें यश निश्चित वाढलेलें दिसतें.

परंपरासाहचर्याचें आणखी एक स्वरूप बखरींत आढळतें, तें म्हणजे संस्कृतनिष्ठ शब्दरचना हें होय. मराठी भाषा ही संस्कृत भाषेपासून साक्षात् जरी निर्माण झाली नसली, तरी इतर कोणत्याहि भाषेपेक्षा तिचा मराठीवर जास्तींत जास्त असा ठसा उमटलेला आहे. संस्कृत भाषेंतील शब्दऋणाचें बखरकारांनी प्रात्यक्षिक करून दाखविलेलें दिसतें. सभासदाची बखर, ब्रह्मेंद्रस्वामीची बखर, होळकराची थैली, नानाचें आत्मचरित्र, भाऊसाहेबांची बखर, चिटणिशी बखरी विशेषतः सप्तप्रकरणात्मक चरित्र, शिवदिग्विजय, शिवाजीप्रताप इत्यादि बखरींतील भाषा संस्कृतनिष्ठ आहे. चित्रगुप्ताच्या बखरीचा क्वचित् अपवाद सोडल्यास, बखरलेखकांनी संस्कृत शब्दांचा वापर संयमानें केलेला असल्यामुळे बखरींच्या भाषेच्या सौंदर्यांत तो भर घालतो.

पारंपरीणतेचें आणखी एक स्वरूप बखरींतील अलंकार व सुभाषितें ह्यांत आढळतें. संस्कृत वाङ्मयांतील उपमा, दृष्टान्तादि अलंकारांचे संकेत बखरकारांनी पाळलेले आहेत. प्रसंगानुरूप संस्कृत सुभाषितें किंवा उद्धरणें यांचाहि चांगला उपयोग केलेला आढळतो. अलंकार व सुभाषितें ह्यांच्या कलात्मक संगमामुळे बखरीचा वाङ्मयीन दर्जा वाढलेला आहे, हें निर्विवाद होय. परंपरासाहचर्य व लेखकाचें व्यक्तित्व ह्यांच्या सुरेख मीलनामुळे बखरींना वाङ्मयीन तेज चढलेलें आहे.

जीवनानुभूतिविषयक आवेश :

इष्ट परिणामाच्या दृष्टीने आवेशपूर्ण लेखन हा शैलीचा महत्त्वाचा भाग आहे. प्रस्तुत प्रकरणांत भावनात्मक सौंदर्याच्या उपयुक्ततेचें विवेचन करून

१. खर्ड्याच्या स्वारीची बखर (शके १८०७), पृ. २१

तें शैलीस कसें आवश्यक आहे, हें दाखविण्याचा प्रयत्न यापूर्वी केलेला आहे. आता भावनात्मक सौंदर्याचा साहाय्यकारी गुण जो जीवनानुभूती-विषयक आवेश त्याचा विचार करूं.

कथनपर लेखनांतील भावनात्मकता व विचारात्मकता ह्यांत जिवंतपणा निर्माण करण्यासाठी आवेश ह्या गुणाचें साहाय्य होतें. आवेश हा भावनान्तर्गत गुण असल्यामुळे भावनांच्या उत्कटपणामुळे तो निर्माण होतो. ह्या दृष्टीने पाहतां आवेशाची निर्मिति भावनांच्या स्वरूपावर अवलंबून असते.

उत्कृष्ट लेखकाच्या प्रत्येक वाक्यांत किंबहुना प्रत्येक शब्दांत त्याच्या अनुभवाचा इतिहास दडलेला असतो. जीवनांतल्या अनुभवांना तो शब्द-रूपाने वाट देत असतो. जीवनानुभूतीविषयक आवेश हा केवळ आत्मनिष्ठ वाङ्मयांतच नव्हे, तर कथावाङ्मयासारख्या वस्तुनिष्ठ वाङ्मयांतहि व्यक्त होतो.

जीवनानुभूतिविषयक आवेश हा शैलीगुण बखर–वाङ्मयांत आढळून येतो. बखरीची कथावस्तु म्हणजे ऐतिहासिक घटना. बखरींत जो आवेश दिसतो तो बखरकाराचा त्याच्या कथावस्तूशीं साक्षात् संबंध असल्यामुळे किंवा तादात्म्यामुळे होय. समकालीन बखरींत आवेशाचें प्रमाण बरेंच आहे. समकालीन घटना बखरकार प्रत्यक्ष किंवा जवळून पाहत असतो. कांही बखरकार तर त्या घटनांशीं संबद्ध असलेले दिसतात. उदाहरणार्थ, शिवछत्रपतीचें चरित्र हें सभासदाने प्रत्यक्ष अनुभवाच्या किंवा माहितीच्या आधारें लिहिलें आहे; कारण बखरकाराचा चरित्रनायकाशीं किंवा तत्कालीन घटनांशीं प्रत्यक्ष संबंध होता. ह्या बखरींत भावनेचा आवेश जो दिसतो त्याचें मूळ कारण हें होय. भाऊसाहेबांच्या बखरींत हा आवेश उत्कट प्रमाणांत आढळतो. सदर बखरींतील घटना लेखकाने जवळून पाहिलेल्या असून ही बखर त्याने पानिपत–प्रसंगानंतर लवकरच लिहिली आहे. बखरकाराचें निवेदनकौशल्य त्यांत इतकें उत्कृष्ट प्रकारचें आहे की, बखर-लेखक हा त्या घटनांशीं प्रत्यक्ष संबंधित आहे असेंच वाटतें. रघुनाथ यादवाची पाणिपतची बखर त्या युद्धानंतर लवकरच लिहिली गेली. बखर-नवीसाने दफात्यावरून ही बखर लिहिली असली, तरी तो माहितगार इसम आहे. म्हणूनच त्यांत आवेश निर्माण झालेला दिसतो. काशीराजाची बखर पानिपतच्या युद्धांत स्वतः काशीराज हजर असल्यामुळे आवेशपूर्ण झालेली

आहे. नाना फडणवीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, मल्हार गणेश खांडेकर व बापू कान्हो ह्यांच्या आत्मचरित्रांत त्यांच्या स्वतःच्या जीवनाचा इतिहास असल्यामुळे त्यांचें लेखन आवेशपूर्ण झाल्यास नवल नाही. नानाच्या व गंगाधरशास्त्री पटवर्धनांच्या आत्मचरित्रांत हा आवेश विशेषत्वानें आढळतो.

समकालीन बखरकारांच्या लेखनकौशल्याला त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांचें पाठबळ असल्यामुळे, त्यांच्या लेखनांतील आवेश कलादृष्ट्या सुंदर वाटतो. उत्तरकालीन बखरींतला आवेश हा लेखकांच्या निवेदन-कौशल्यामुळेच विशेषतः निर्माण झालेला आहे. बहुतेक बखरलेखक हे कथावस्तूशीं इतके समरस झालेले दिसतात की, त्यांचें लेखन हें जीवनानुभवावरच आधारलेलें आहे असा प्रत्यय येतो. वाङ्मयदृष्ट्या बखरकारांचा हा मोठा विजयच होय. ह्या गुणामुळे बखरी वाचनीय झाल्या आहेत.

संयम :

जीवनांत संयमाचें जें स्थान आहे तेंच लेखनकलेंतहि आहे. लेखनांत विचार व्यक्त करण्याचें साधन म्हणजे शब्द होत. एखादा विचार थोडक्या पण अनुरूप शब्दांत जितक्या चांगल्या रीतीने व्यक्त होऊं शकतो, तितका तो पुष्कळ पण अननुरूप शब्दांत व्यक्त होऊं शकत नाही हें स्पष्टच आहे. शब्दांचें अल्पाक्षरत्व हें शैलीदृष्ट्या लेखनाचें महत्त्वाचें तंत्र होय. शब्दांच्या अल्पाक्षरत्वाबरोबर अर्थव्यक्तीची प्रभूतताहि असली पाहिजे; कारण इष्टार्थ-व्यक्तीखेरीज नुसत्या शब्दावडंबराचा काय उपयोग ?

लेखनांतील संयम म्हणून जो म्हणतात, तो केवळ एकाच विशिष्ट बाबतींत असतो असें नाही. शब्दांच्या अर्थव्यक्तीचे अलंकार, व्यक्तिचित्रें, प्रसंगात्मक वर्णनें, रसपरिपोष इत्यादि जे इतर घटक आहेत त्याहि बाबतींत संयम ह्या गुणाची आवश्यकता असते. भाषेला नटविण्याच्या हव्यासामुळे अलंकारांचा अतिरेक होतो ह्यांत मुळीच वाद नाही. अलंकार हे सौंदर्यवर्धक गुण खरे; पण भाषेंतील भावना व विचार ह्यांचा कोंडमारा त्यांच्यामुळे होऊं लागेल, तर असल्या अलंकारांना प्रेतावरील शृंगाराची अवकळा आल्याविना राहणार नाही.

मराठी बखर-वाङ्मयांत संयम हा शैलीविषयक गुण आढळत नाही, असा सकृद्दर्शनी ग्रह होतो. बखरीचें वाचन करतांना बखरकार पाल्हाळानें

लिहीत आहे असें वाटतें खरें; परंतु सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास पाल्हाळाला कांही मर्यादेचे संकेत आहेत असें दिसतें. एखाद्या प्रसंगाचें चित्रण करतांना तें वाचकाच्या हृत्पटलावर जितक्या तऱ्हेने उमटेल, तितक्या तऱ्हेने तें उमटविण्याचा प्रयत्न बखरकार करतांना दिसतो. पुनरुक्ति हा दोष पत्करूनहि बखरलेखक कित्येकदा लेखन करतांना दिसतात; पण त्यांचा हा सारा खटाटोप उगाच नसून इष्टार्थव्यक्ती करण्यासाठी असतो हें ध्यानांत घेतल्यास पाल्हाळ असूनहि बखरी आल्हाददायक कां होतात, ह्याचें रहस्य कळून येईल. बखरींतला आपाततः दिसून येणारा पाल्हाळ हा खरोखर पाल्हाळ नसून विषयाचा कलादृष्ट्या आवश्यक असा विस्तार आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

खरें पाहतां बखरकार संयमाचेंच तत्त्व पाळत असतो. विषयाचें महत्त्व व त्याची मर्यादा ह्या गोष्टी त्याला चांगल्या कळलेल्या असतात. एखाद्या हरिदासाप्रमाणे वाचकाच्या मनाची पकड घेण्याच्या अनेक हिकमती त्याने लढविलेल्या दिसतात. कोणत्याहि घटनेचें निवेदन करतांना शब्दरचना, वर्णनें, व्यक्तिदर्शनें, अलंकार इत्यादि बाबतींत तो सावधगिरी बाळगतो. तो पट्टीचा लेखक असल्यामुळे त्याचें लेखन स्वाभाविक वाटतें. व्यापक विषय आटोपशीरपणें मांडण्याचें एखाद्या कादंबरीकाराचें कसब बखरकाराच्या अंगीं आढळतें.

पाणिपतच्या बखरींत (रघुनाथ यादव) संयम ह्या गुणाचा कसा आविष्कार झाला आहे हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल :—

‘ तेव्हां युद्धास तोंड लागलें, दारुण संग्राम झाला. हवद्यांस हवदे, राऊतास राऊत, एक मेळ जहाला. व सुतरनाले बाणांच्या कैच्या व करोलाच्या गोळ्या व गरनाला व तोफांचा मार एकदाच जहाला. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली. धुरेंकरून दिनमणीचा अस्त झाला असा भास पडला. घे घे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना. पुढचा पाय पुढे. कोणास कोणी हरेना. एकापरीस एक आगळे. इराणीची जात अरबुज, आपपर म्हणावयाची नाही. महाबळी, महापराक्रमी, मोगल, पठाण व रोहिले रांगडे व रजपूत व पंजाबी, बिलंदे, माळवी व काठेवाडी वगैरे नाना जातीचे त्यांनी संग्रामाची सीमा केली. बहुत मराठे दळ खपलें. रक्तोदकाचे पाट रणभूमीस वाहूं लागले. बिभित्स शरीरें दिसों लागलीं.

देहाभिमान कोणांत उरला नाही. चौफेर लढाईची बेहद्द होऊन गेली. थोर थोर अमिरांचे हौदे खाली जहाले. इराणी हावभरी होऊन फिरून नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हा मराठी फौज कच खाऊन माघारी सरली.''[1]

पानिपतच्या युद्धाचें हें वर्णन अत्यंत संयमपूर्ण झालेलें आहे. ह्या वर्णनांत युद्धाच्या प्रसंगाचें चित्र उत्कृष्टपणें रेखाटलेलें दिसून येतें. भावनात्मक लहान-लहान वाक्यांमुळे हें वर्णन परिणामकारक झालेलें आहे. 'रक्तोदकाचे पाट रणभूमीस वाहूं लागले' ह्या एकाच अर्थपूर्ण वाक्यामुळे वरील वर्णनाला शोभा आली आहे. मर्यादित शब्दांत इष्ट अर्थव्यक्ति असल्यामुळे वरील वर्णन आकर्षक वाटतें.

मराठी बखरींत संयमगुणाच्या दृष्टीने सभासदाची बखर, एक्क्याणव कलमी बखर, होळकराची थैली, भाऊसाहेबाची कैफियत, पाणिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर, नाना फडणीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, मल्हार गणेश खांडेकर व बापू कान्हो ह्यांचीं आत्मचरित्रें, पटवर्धनी वाका, खर्ड्याच्या स्वारीची बखर, श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर इत्यादि बखरी विशेष उल्लेखनीय आहेत. ह्या बखरींत क्वचित् पाल्हाळ आढळत असला, तरी तो समर्थनीय आहे; कारण त्यामुळे त्या बखरींची रंजकता वाढलेली दिसते. वाचकांच्या चित्तवृत्ति काबीज करण्याचें धोरण ह्या बखरींच्या लेखकांनी ठेवलें असल्यामुळे, पाल्हाळाचा दोष पत्करूनहि त्यांनी आपलें ईप्सित कार्य यशस्वीपणें पार पाडलें आहे.

उदात्तता :

उदात्तता हा महत्त्वाचा असा वाङ्मयीन गुण मानला जातो. वाङ्मयांत व्यक्त होणाऱ्या विचारांची बैठक उदात्त स्वरूपाची असली पाहिजे. उदात्तता हा वाङ्मयाचा आंतरिक गुण होय. उदात्तता व उत्तानता ह्यांत प्राकृतिक भेद आहे. पहिल्यांत मनाचा सांस्कृतिक उच्च दर्जा असतो, तर दुसऱ्यांत त्याचा अधःपात असतो. उत्तानता क्षणभर आकर्षक असली, तरी तिच्यांत मनाच्या विकृतीचेंच प्रतिबिंब असतें. म्हणूनच ती उच्च अभिरुचीचें दर्शन घडविण्यास असमर्थ ठरते. जीवनांतलें मांगल्य, जीवनांतलें सत्य, जीवनांतलें

१. पाणिपतची बखर (१८८९), पृ. ४०

सौंदर्य हीं उदात्ततेचीं विविध अंगें होत. वाङ्मयाचा पाया उदात्तता हा असून जीवनविकास हा त्याचा कळस होय.

मराठी बखर-वाङ्मयांत उदात्तता हा गुण आढळतो. बखरीचा कोणताहि प्रकार घेतला, तरी तो उदात्त स्वरूपाचा असतो, असेंच दिसून येईल. शिवाजीसारख्या आदर्श ऐतिहासिक वीरपुरुषाचें चरित्र, पानिपतच्या घटनेचा वृत्तान्त, नानाचें आत्मचरित्र, वसईचा दुर्धर संग्राम, विजयनगरचा विध्वंस, खर्ड्यांच्या स्वारीचा प्रसंग हे उदात्त विषय नाहीत असें कोण म्हणेल? बहुतेक बखरींचे विषय हे मुळांत उदात्त स्वरूपाचे असल्यामुळे वाचकाला त्याबद्दल आकर्षण वाटतें.

विषयांच्या उदात्ततेप्रमाणे त्यांची मांडणी किंवा निवेदन हेंहि तितक्याच उदात्तपणाने झालेलें मराठी बखरींत आढळून येतें. मराठेशाहीवर हर्षामर्षांचे जे विविध प्रसंग आले, त्यांचें निवेदन बखरलेखक उदात्ततेची एक विशिष्ट उच्च पातळी ठेवून करतो असें दिसतें. लेखकाच्या अंतरंगांतील विचारविकारांचा आविष्कार होतांना लेखकाच्या रम्य शैलीमुळे त्याचें लेखन भव्य व उदात्त असें झालेलें आहे. लेखकाच्या भावनोत्कटतेला संयमाचें बंधन असल्यामुळे व त्याच्या लेखनांत औचित्य राखल्यामुळे त्यांतील उदात्ततेचें स्वरूप उज्ज्वल झाल्यास नवल नाही. ह्या दृष्टीने पाहतां उपरिनिर्दिष्ट विषयांवरील बखरी विशेष महत्त्वाच्या आहेत.

करुणजन्य विनोदी प्रसंगांतहि उदात्तता कशी आहे, ह्याचें उदाहरण म्हणजे भाऊसाहेबांच्या बखरींतील पुढील उतारा पाहा:—

‘ पुढे एक दोन दिवस जाहले तों इकडे गोविंदपंत बुंदेले यांचें शीर कापून नेलें होतें, (तें) शीर व वकील व पत्रें भाऊसाहेब याजकडे पाठविलीं की, “ तुमचे गोविंदपंत पुढे तुम्हांस स्वर्गी जागा पाहावयास गेले आहेत. आणि तुम्हास न्यावयासि शीर पाठविलें आहे. होय की न होय हें पाहावें. ” म्हणोन तें शीर व पत्रें भाऊसाहेब याजकडे वकील घेऊन आले. रुमालांतून शीर पुढे ठेवून पत्रें हातीं दिलीं. भाऊसाहेबांहीं पत्रें वाचून पाहून त्यांतील गर्भभाव ध्यानांत आणिला. गोविंदपंत बुंदेले यांचें शीर ओळाखिलें. ते समयीं कचेरीस लहान थोर सरदार होते. त्यांच्या मुखश्रिया उतरल्या. तमाम लष्करांत खबर कळतांच फौज थोडीबहुत

हिंमत धरून होती त्यांचीं अवसानें गेलीं. इकडे भाऊसाहेब यांणी पत्राचें उत्तर दिलें की, "तो जागा सर्वत्रांचा आहे. त्याशिवाय दुसरी गती कोणती आहे? प्रस्तुत तुम्ही थोर, खंदारचे पातशाहा, तुम्ही तेथें जाल तेव्हां तुमचे स्वरूपाप्रमाणें मान जाला पाहिजे. म्हणोन तुमचे मेजवानीचे तरतुदीस्तव पुढे गोविंदपंत बुंदेले साहित्यास गेले आहेत." म्हणोन उत्तर दिलें. शीर होतें तें ठेवून घेतलें. त्यास अन्नप्रसाद दिला.'[१]

बखरकाराची लेखनप्रेरणा ही मुळांतच उदात्त असल्याने त्याचें लेखन ह्या उदात्ततेंत न्हाऊन निघालेलें आहे. ह्या बखरीचें पुनः पुनः वाचन करण्याची उत्सुकता तिच्या उदात्ततेमुळेच वाटते.

मराठी बखरवाङ्मय हें उदात्त व भव्य स्वरूपाचें आहे ह्यांत संदेह नाही.

वैचारिक क्रम :

शैलीचें वैशिष्टय म्हणून लेखनांतील वैचारिक क्रमाचें विशेष महत्त्व असतें. वैचारिक क्रम हा लेखकाच्या तर्कपद्धतीवर अवलंबून असतो. प्रत्येक लेखकाची तर्कपद्धति स्वतंत्र असते. त्या तर्कपद्धतीला अनुसरून त्याचें लेखन होत असल्यामुळे तें एका विशिष्ट वैचारिक क्रमाला धरून होतें. ह्याचा अर्थ असा की, प्रत्येक लेखकाच्या लेखनांत विचारांचा एक विशिष्ट असा क्रम असतो. तर्कपद्धति ज्या मानाने निर्दोष असेल, त्या मानाने विचारांचा क्रम हा निर्दोष असतो. एकाच विषयावरील अनेक लेखकांच्या लेखनांत वैचारिक क्रमाचा भिन्नपणा आढळतो. ह्याचें कारण म्हणजे प्रत्येक लेखकाची पृथगात्मता हें होय. ह्या पृथगात्मतेमुळेच त्या त्या लेखनांत नावीन्य निर्माण होतें. ह्या दृष्टीने पाहतां वैचारिक क्रम हा नावीन्यनिर्मितिक्षम आहे. लेखनांतील विचारांची सूत्रता व नावीन्यनिर्मिति ह्यामुळे वैचारिक क्रम हा शैलीगुण मानिला जातो.

बखरींतील वैचारिक क्रमाचा विचार केल्यास असें दिसून येईल की, बखरींचें लेखन हें एकसूत्र आहे. सामान्यतः भावनांच्या उत्कटतेंत व आवेशाच्या गतिमानतेंत वैचारिक क्रम राहणें कठिण असतें; परंतु मराठी बखरी त्याला अपवाद आहेत. भावनांचा तोल सुटूं न देतां विचारांची

१. भाऊसाहेबांची बखर (१९३२), पृ. १३७

एखसूत्रता साधणें ही अत्यंत अवघड कला आहे. मराठी बखरकारांनी या कलेंत यश मिळविलेलें दिसतें. एवढें मात्र खरें की, कित्येक ठिकाणीं घटनांचा पौर्वापर्य न साधल्यामुळे कालविपर्यासाचा दोष निर्माण झालेला आढळतो. विषयाची आत्मीयता व निवेदनाचा प्रामाणिकपणा हे बखरकाराचे गुण मान्य केले, तर पौर्वापर्याच्या क्रमभंगाचा दोष क्षम्य ठरेल.

वैचारिक क्रमाच्या दृष्टीने नाना फडणिसाच्या आत्मचरित्राची सुरुवात उल्लेखनीय आहे.

'श्रीसांबसदाशिवाय नमः जो सांबसदाशिव कसा आहे की, सत्त्वरूप म्हणजे असे चित्स्वरूप प्रकाश अवस्था-त्रय साक्षी जाग्रत कालीं त्यास विश्व स्वप्रकाशी तैजस सुषुप्तीकालीं प्राज्ञ असें ज्यास म्हणतात, जो एकच आत्मा उपाधिभेदें करून नाना प्रकारे भासतो. पाय नसतां चालतो. डोळे नसतां पाहतो. हात नसतां घेतो. कान नसतां ऐकतो. सर्वांतर्यामीं व्यापक हें कशावरून ? व आत्मा आहे हें कशावरून ? तर, दूर कोणी इंगितज्ञ बसला असतो त्याचा याचे आत्म्यांत (आरशांत ?) प्रतिबिंबित होऊन तीच गोष्ट घेतो. व्यापकते व्यतिरिक्त कसें घडेल ? असा आत्मा त्यासच आपणांत विसरून आनंदस्वरूप सोडून दुःखांतील सुख भोगावयाची इच्छा धरितो. हेंच त्या आत्म्याची माया. सत्य म्हणतां नये, असत्य म्हणतां नये. जिचें स्वरूप अनिर्वचनीय सत्त्व, रज, तमोगुणी तिजपासून अहंकार, आकाश, वायु, तेज उदक, पृथ्वी पंचमहाभूतें. महत्तत्व म्हणजे अंतःकरण तदवच्छिन्न जें चैतन्य जो जीव अपंचीकृत पंच महाभूतें करून, तदंशरूपें लिंगशरीरद्वारा जीवास सुखदुःखादि प्राप्ती.' [१]

वरील वर्णनांत विचारांची मौलिकता व विचारांचा क्रम हीं दोन्ही एकजीव झाल्यामुळे त्यांत सौंदर्य निर्माण झालें आहे. ह्या कारणामुळे तें आकर्षक दिसतें.

बखरकार हे जाणीवपूर्वक लिहिणारे लेखक असल्यामुळे वैचारिक क्रमाचें सूत्र त्यांनी पाळण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे ह्यांत शंका नाही. त्यामुळे त्यांच्या लेखनांत प्रमाणबद्धता दिसून येते. म्हणूनच बखरी वाङ्मयदृष्ट्या सरस ठरतात.

१. ऐ. प. यादी वगैरे (१९३०), पृ. १७२

पारिभाषिक शब्द :

शास्त्रीय वाङ्मयांत पारिभाषिक शब्दांचें विशेष महत्त्व असतें. पारिभाषिक संज्ञा जितक्या निश्चित अर्थबोधक असतात, तितके इतर शब्द असत नाहीत; म्हणूनच पारिभाषिक शब्दांचें इतकें महत्त्व. शास्त्रीय वाङ्मयाप्रमाणें ललित वाङ्मयांतहि पारिभाषिक शब्द आवश्यक असतात. पारिभाषिक शब्दांचा पहिला प्रकार म्हणजे परकीय भाषेंतून आलेले व दुसरा प्रकार म्हणजे मुद्दाम स्वतंत्र तयार केलेले. ह्या दोन प्रकारांपैकी पहिल्या प्रकारचे शब्द हे दुसऱ्या प्रकारच्या शब्दांपेक्षा अधिक स्वाभाविक व इष्टार्थव्यक्तिक्षम असतात.

भाषेंतील शब्दसंपत्तीच्या दृष्टीने पारिभाषिक शब्दांचें कार्य फार मोठें आहे. एखाद्या नव्या कल्पनेचा निदर्शक असा पारिभाषिक शब्द भाषेंतील शब्दसंपत्तींत निश्चित भर घालतो. त्यामुळेच भाषा संपन्न होते. पारिभाषिक शब्दांचा स्वीकार करण्याच्या बाबतींत दोन भिन्न मतें रूढ आहेत. त्यांपैकी पहिलें मत असें की, एखाद्या परकीय भाषेंतील कल्पना स्वभाषेंत नव्यानेच येत असेल, तर ती कल्पना ज्या परकीय परिभाषेंत व्यक्त होत असेल तिचा निदर्शक जो पारिभाषिक शब्द त्याचा स्वीकार करणें इष्ट ठरेल. दुसरें मत असें की, परकीय भाषेंतल्या एखाद्या पारिभाषिक शब्दाला स्वकीय भाषेंत जर योग्य प्रतिशब्द तयार करतां येत असेल, तर तो अवश्य केला पाहिजे. ह्या दोन्ही मतांचा समन्वय करून असें म्हणतां येईल की, पारिभाषिक शब्द हे कोणत्याहि भाषेंतील असले तरी ते उच्चारसुलभ व स्पष्टार्थक्षम असतील, तर त्यांचा स्वीकार करावा. सुबोधता किंवा स्वाभाविकता हें शैलीचें खरें स्वरूप असेल, तर तें परकीय पारिभाषिक शब्दांनीहि व्यक्त होतें ह्यांत शंका नाही.

मराठी बखरींचा विचार करतांना परकीय म्हणजे फारसी, अरबी, तुर्की वगैरे भाषांतील कित्येक पारिभाषिक शब्द अर्थव्यक्तीला उपकारक झाल्याचें दिसून येतें. मुसलमानांचा राजकीयदृष्ट्या मराठ्यांशीं जो निकटचा संबंध आला त्याचा इष्ट परिणाम कित्येक परकीय शब्द मराठी भाषेंत रूढ होण्यांत झाला. राज्यशासनांतील कित्येक संज्ञा मराठ्यांनी मुसलमानांपासून घेतलेल्या आहेत, त्यापैकी बखरलेखन हें होय हें आपण मागे पाहिलें आहे. बखर-

लेखनांत राजकीय इतिहास असल्यामुळे, राजकारणांतील विविध कल्पना परकीय पारिभाषिक संज्ञांच्याद्वारें मराठींत येऊन ती संपन्न झाल्याचें दिसतें.

मराठी बखरींत आढळून येणाऱ्या परकीय पारिभाषिक शब्दांपैकी कांही पुढीलप्रमाणे आहेत:—

अर्ज (अ.), अस्मान् (फा.), आराम (फा.), इमान (अ.), कत्तल (अ.), करोल (तु.), काबीज (अ.), किल्ला (अ.), कुमक (तु.), कूच (फा.), खजिना (अ.), खन्दक (अ.), खबर (अ.), गनीम (अ.), गर्दी (फा.), गुलाम (अ.), जखमी (अ.), जरब (अ.), जाबसाल (अ.), जिन्नस (अ.), जिरेटोप (फा.), जिलीब (फा.), जुलुम (अ.), जेर (फा.), नगारा (अ.), नामोहरम (ना + अ), नुकसान (अ.), पागा (फा.), प्यादे (फा.), फितूर (अ.), फौज (अ.), बंदोबस्त (फा.), बहादर (फा.), बिनी (फा.), बुणगा (फा.), बेचिराख (फा.), बेलाशक (अ.), बेहोश (फा.), मनसुबा (अ.), मर्दुमी (फा.), मुकाबला (अ.), मुर्दा (फा.), मेजवानी (फा.), मोर्चा (फा.), मोहीम (अ.), रसद (फा.), शिपाई (फा.), सफेजंग (फा.), स्वारी (फा.), हल्ला (अ.), हुकूम (अ.), हौदा (अ.) इत्यादि.

मराठी बखरींतील विषयवार कांही पारिभाषिक शब्द खालीलप्रमाणे आहेत :—

१. **युद्धविषयक**—अराबा (अ.), चिलखत (फा.), जेजाला (फा.), जंबुरा (फा.), तोफखाना (अ.), दस्ताना (फा.), बख्तर (फा.), सुतरनाला (फा.).

२. **आरमारविषयक**—गलबतें (फा.), गुराबा (अ.), तरांडें (सं.), तारवें (सं.), होडिया (सं.).

३. **दस्तऐवजविषयक**—अखबार (अ.), कैफियत, (अ.), दफातें (अ.), दिनचर्या (सं.), यादी कारकीर्द (फा.), वाका (अ.), सिलसिला (फा.).

४ न्यायमनसुबाविषयक—अर्ज (अ.), कजिया (अ.), कलम (अ.), खि (कि) स्त (अ.), जमानत (अ.), दफा (अ.), दस्तखत (फा.), फैसला (अ.), शाबीत (अ.) हुकूमनामा (अ.) इत्यादि.

शैलीचें एक अंग म्हणून पारिभाषिक शब्दांनी बखरींतील भाषेस एक विशिष्ट वळण लावलेलें आहे. मराठी बखरींचें वैशिष्ट्य असें की, कित्येक परकीय पारिभाषिक शब्द येऊनहि त्यांतील वातावरण शुद्ध मराठमोळ्याचें राहिलें आहे. महिकावतीच्या बखरींत राजवाड्यांनी अशा पारिभाषिक यावनी शब्दांची यादी दिली आहे. ती या संदर्भात उल्लेखनीय होय.

व्याकरणदृष्ट्या रचना :

व्याकरण हें भाषेच्या नियमांचें शास्त्र आहे. शास्त्रशुद्ध बोलण्याने वा लेखनाने भाषेचें स्वरूप शुद्ध राहतें. इतकेंच केवळ नव्हे, तर सुलभ अर्थ-प्रतीति होण्यास शुद्ध भाषेचा फार उपयोग होतो. बोलीभाषेपेक्षा लेखननिविष्ट भाषा ही अधिक चिरस्थायी स्वरूपाची असते. लेखनभाषेचा उपयोग पुढील पिढीलाहि होतो. एका पिढींतलें ज्ञान हें दुसऱ्या पिढीपर्यंत पोचविण्याचें कार्य ग्रंथांच्या द्वारें होतें. ग्रंथभाषा शास्त्रशुद्ध नसेल, तर ती पुढील पिढीला दुर्बोध होईल. ह्या दृष्टीनें पाहतां ग्रांथिक भाषा शुद्ध स्वरूपाची असणें अत्यंत आवश्यक आहे, हें मान्य केलें पाहिजे.

बहुतेक बखरकार हे लेखनकलेंत निपुण होते. राजदरबारीं लेखनाचें काम करण्याची त्यांना सवय होती. नैमित्तिक लेखन त्यांना कारकुनी पेशामुळे करावें लागे. त्यांच्या लेखनाला बहुश्रुतपणाची जोड मिळाली असल्यामुळे तें उत्कृष्ट झालेलें दिसतें. राजकारणांतील दैनंदिन लेखनापेक्षा बखरलेखन हें निराळ्या प्रकारचें असे. कारण ह्या प्रकारच्या लेखनांत त्यांना थोडेंफार वैचारिक स्वातंत्र्य होतें. वर्ण्य विषयासंबंधी वाटणारा जिव्हाळा हा गुण त्यांच्या लेखनांत ह्याच कारणामुळे आढळतो.

ह्या मंडळींनी मराठींत लेखन केलेलें असलें, तरी राजदरबारीं असलेल्या फारसी भाषेचा परिणाम त्यांच्या लेखनावर झालेला स्पष्ट दिसतो. सभासदाच्या बखरींत तत्कालीन फारसी शब्द अपरिहार्यपणें आलेले आहेत. मराठी बखरींत शस्त्रास्त्रांचीं नांवें, लढाईचे पोशाख, हुद्देदारांचीं नांवें इत्यादि

फारसी भाषेंतीलच आहेत. भाऊसाहेबांच्या बखरीसारख्या पेशवेकालीन बखरींत फारसी शब्दांबरोबर संस्कृत शब्दहि आढळतात. चित्रगुप्ताच्या बखरींत संस्कृत सामासिक शब्दांचा उपयोग फारच केल्यामुळे त्यांतील भाषेला एक प्रकारचा कृत्रिमपणा आलेला आहे, ह्याचा विचार आपण मागे केला. बखरकारांच्या भाषेचें वैशिष्ट्य असें की, अर्थनिष्पत्तीच्या दृष्टीने योग्य शब्द – मग ते परके का असेना – वापरले आहेत. मुद्दाम त्यांचें भाषांतर न करतां किंवा त्याऐवजी नवीन शब्द तयार न करतां मूळ शब्द वापरले असल्यामुळे भाषेचा डौल निर्माण झालेला दिसतो.

व्याकरणदृष्ट्या बखरींचे पुढील कांही विशेष आहेत :—

१. तृतीयान्त कर्त्याच्या वाक्याचा कर्तरि प्रयोगांत शेवट. उदा. त्यांणी प्रत्योत्तरें हाजरतीचे मर्जी माफक, हिंदुधर्मास्थित बोलले (शिवाजी प्रताप).

२. प्रथमान्त कर्त्याच्या वाक्याचा कर्मणि प्रयोगांत शेवट. उदा. मग भाऊसाहेब जातीने गोपिकाबाईकडे जाऊन पदर पसरून साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना केली (होळकरांची कैफियत).

३. पंचमीच्या ऐवजी तृतीयेचा उपयोग. उदा. राजगडने रायगडास आले (सप्तप्रकरणात्मक चरित्र).

४. विशेष्यानंतर विशेषणाची योजना. उदा. नारींनी मंगलआर्त्या अगणित उजळून राजियास वंदिलें (सभासदाची बखर).

५. संस्कृतप्रमाणे विशेष्याची विभक्ति सर्वनामांना. उदा. त्यांत राज्यांत बहुत रितीने मर्यादेने पाये घालून चालतात (सप्त० चरित्र).

६. कर्त्या अगोदर कर्माची योजना. उदा. त्याजला त्यांनीं कैद केलें (नागपूरकर भोसल्यांची बखर).

७. एकवचनी कर्ता असून अनेकवचनी क्रियापद. उदा. तात्यासाहेब यांची स्वारी कोलवाडच्या कलबी होसहालीचे वाटेने सावसीजवळ गुंगीहालपर्यंत आले (पटवर्धनी वाका).

८. अनेकवचनी कर्ता असून एकवचनी क्रियापद. उदा. तुम्ही माझे मनांत भ्रांत घालूं नको (साष्टीची बखर).

९. क्रियापदापासून वाक्याचा आरंभ. उदा. न कळे ईश्वराचा महिमा (पाणिपतची बखर).

१०. नावीन्यपूर्ण क्रियापदें. उदा. भाऊसाहेब याणी होकारून. (हो हो थांबा असें म्हणून) पाहिलें (भाऊसाहेबांची बखर).

११. वर्तमानाचा भूतकालार्थी उपयोग. उदा. वाजंत्र्याचे बाजे होतात. चौघडे वाजतात (पेशव्यांची बखर–सोहनी).

१२. वर्तमानाचा भविष्यार्थी उपयोग. उदा. पुढे माधवरावसाहेब मोठे होतात व शिवराम दाभाडेहि मोठे होतात. (दाभाडे सेनापति यांची हकीगत).

१३. शब्दयोगी अव्ययाची शब्दाअगोदर योजना. उदा. सुद्धा फौज व तोफखाना (सरदार गोखले यांची कैफियत).

१४. स्वार्थी प्रत्ययाचा संकेतार्थात्मक उपयोग. उदा. असें करितां तुम्हास कोणी मदत न करी, तरि कांही मोंगलाई मसलत करून तुम्ही यश संपादावें (भा. बखर).

१५. विशिष्ट शब्दाचा विशिष्ट अर्थी उपयोग. उदा. त्यास विठोबा अप्रत्यक्ष (अदृश्य) होवून (श्रीमद् भोसलवंश चरित्र).

उपरिनिर्दिष्ट वैशिष्ट्यांखेरीज कर्त्याशिवाय वाक्यरचना, क्रियापदाशिवाय वाक्यरचना, उभयान्वयी अव्ययापासून वाक्याची सुरुवात, 'की' ऱ्या ठिकाणी 'जे', स्त्रीलिंगी तृ. पु. सर्वनामाच्या ऐवजी नपुंसकलिंगी तृ. पु. सर्वनामाचा उपयोग, प्रथमार्थी तृतीया, षष्ठ्यर्थी चतुर्थी, फारसी शब्दाला संस्कृत प्रत्यय, 'तर, तरी' ह्या अव्ययांचा विरोधार्थक व संकेतार्थक प्रयोग, 'की' व 'म्हणोन' ह्यांचा कारणबोधक उभयान्वयी अव्ययाप्रमाणें उपयोग, विविध अर्थी 'तों' या अव्ययाचा वापर इत्यादि आणखीहि बखरींचे व्याकरणविशेष सांगतां येतील. आजच्या दृष्टीने वरील व्याकरणविशेष अशुद्ध असले, तरी ह्या व्याकरण–विशेषांनीच बखरींचें वैशिष्ट्य निर्माण झालें आहे. अर्थहानि होऊं न देतां ह्या व्याकरणविशेषांनी भाषेचें सौंदर्य अबाधित राखलेलें दिसतें. पांच हजार माणूस खानाचे रणास आणिले (रणांत मारले) अशासारखे कांही नवीन शब्दप्रयोगहि बखरकारांनी तयार केलेले आहेत (सप्तप्रकरणात्मक चरित्र).

मराठी बखरीच्या बाबतींत एक दैवदुर्विलास असा की, बखरींचीं मूळ हस्तलिखितें उपलब्ध नसून त्यांच्या निरनिराळ्या नकला उपलब्ध आहेत. मूळ हस्तलिखितांच्या अभावीं त्यांच्या नकलांवरूनच तारतम्य पाहून बखरींचें वाचन व प्रसिद्धीकरण झालेलें आहे. एका मूळ बखरीच्या पिढ्यानपिढ्या होणाऱ्या नकलांत नकलकारांनी केवळ व्याकरणाच्याच चुका केल्या असण्याची शक्यता नाही, तर कित्येक वेळां मूळ मजकुरांत त्यांनी स्वरचित भागहि घातला असणें शक्य आहे. त्यामुळे कोणत्याहि बखरीचें मूळ समजणें कठिण झालेलें आहे. अशी स्थिति असली, तरी सामान्यतः बखरीवरून तत्कालीन वाक्प्रचार, भाषाप्रयोग इत्यादिकांची कल्पना येते यांत शंका नाही.

निष्कर्ष :

शैलीविषयक प्रत्येक प्रमुख तत्त्वाच्या कसोटीला बखरवाङ्मय कसें उतरतें, हें आपण पाहिलें. त्यावरून शैली गुणाच्या दृष्टीने मराठी बखरवाङ्मय समृद्ध आहे असें दिसून येतें. बखरीचें लेखन हें माधुर्य, ओजस्विता, स्पष्टता, संयमितत्व इत्यादि आंतरिक गुणांनी नटलेलें आहे. निवेदनाचा प्रामाणिकपणा व वर्ण्य विषयाशीं तादात्म्य ह्या गुणांमुळे बखरींचें लेखन जिवंत वाटतें. बखरवाङ्मयांत व्यक्त झालेल्या भावना उदात्त आहेत. ह्यामुळे बखरींचें एकंदर स्वरूप स्फूर्तिदायक व हृद्य असें झालेलें आढळतें.

निवेदनकौशल्याची परिसीमा बखरकारांनी गाठली आहे. बखरींतील घटना किंवा कथावस्तु ह्यांत कलात्मक रंग भरण्याचें कौशल्य बखरकारांच्या ठायीं निश्चितपणें दिसतें. आकर्षक वर्णनपद्धति हें बखरी चित्तवेधक होण्याचें प्रमुख कारण होय. बखरकारांच्या निवेदनांत सुसंगति व वैचारिक क्रम साधल्यामुळे त्यांत प्रसाद हा गुण आपोआप निर्माण झालेला दिसतो. निवेदनाची गतिमानता व भाषेचा प्रवाहीपणा ह्या जोडगुणांमुळे बखरी वाचनीय झाल्या आहेत.

आवेशपूर्ण भावनात्मकता ही बखरलेखनाची मूळ प्ररणा असल्यामुळे तिचें स्वरूप बखरींत स्पष्टपणें दिसतें. कोणतीहि घटना वा कोणतीहि व्यक्ति असो, तिच्यासंबंधी बखरकाराला आत्मीयता वाटते. मराठ्यांचा पिंड हा राजकारणावर पोसलेला म्हणून असो किंवा राजकारणाबद्दल मराठ्यांना पोटतिडीक वाटते म्हणून असो, बखरलेखनांत मराठ्यांच्या स्वभावाचीं

वैशिष्ट्यें प्रतिबिंबित झालेलीं दिसतात. पृथगात्मता, सडेतोडपणा व भावनात्मकता हें मराठी मनाचें वळण होय. ह्या मनाचा आविष्कार मराठी बखर-वाङ्मयांत निश्चित झाला आहे.

केवळ भाषेच्या दृष्टीने विचार केला, तर बखर गद्याने मराठी वाङ्मयाला सुंदर वळण लावलें असें दिसून येईल. परकीय पारिभाषिक शब्द आत्मसात् करून बखरींनी मराठीची प्रकृति सुदृढ केली व अशा रीतीने भाषासमृद्धीस हातभार लावला. मराठी बखरींनी एक स्वतंत्र शैली निर्माण केली आहे. मनांतील भाव कलात्मकतेने कसे रंगवावेत हें बखरींच्या शैलीवरून सहज कळून येतें. वाङ्मयाच्या दृष्टीने लेखनाचा हेतु नसतांहि उत्कृष्ट शैलीचें हें लेखन झालेलें आहे. बखरींचें ऐतिहासिक मूल्य कांहीहि असो, त्या बाबतींत मतभेदाला बरीच जागा आहे; परंतु शैलीगुणांच्या दृष्टीने बखर-वाङ्मय उच्च दर्जाचें आहे ह्या बाबतींत मतैक्यच होईल.

* * *

९ : मध्ययुगीन आंग्ल बखरी

इंग्रजी भाषेंत मराठी बखरसदृश अशा लेखनाचा एक स्वतंत्र प्रकार आहे. ह्या मध्ययुगीन ऐतिहासिक लेखनाला क्रॉनिकल्स व ॲनल्स अशा संज्ञा असून तत्कालीन इतिहासकार त्या फारशा तारतम्याने वापरीत नसत.

आंग्ल बखरी :

Chronicle हा शब्द Chronicon ह्यापासून आलेला असून त्याचा अर्थ कालांतील घटना (events of the times) हा होय.[१] ॲनल्सचा अर्थ प्रत्येक वर्षांतील घटनांची नोंद असा आहे. क्रॉनिकल्समध्ये विषय व शैली ह्या दृष्टीने एक सलग असा मजकूर असतो, तर ॲनल्समध्ये भिन्नभिन्न घटनांची नोंद असते. क्रॉनिकल्समध्ये व्यापक विषय असतो म्हणजे त्यांत जागतिक घडामोडींची नोंद असते; पण ॲनल्समध्ये एखाद्या विशिष्ट स्थलाबद्दल, कालाबद्दल किंवा धार्मिक संस्थेबद्दल मजकूर असतो. ह्यांत सार्वकालीन इतिहास नसतो.

मराठी व आंग्ल बखरींतील साम्य :

मराठी बखरी व आंग्ल बखरी ह्यांचा तौलनिकदृष्ट्या विचार केला असतां चटकन नजरेंत भरणारी गोष्ट म्हणजे कालदृष्ट्या साम्य हें होय. इंग्लंडांत क्रॉनिकल्स किंवा ॲनल्सच्या लेखनाचा काल हा मुख्यत्वेंकरून बारावें तें चौदावें शतक मानण्यांत येत असला, तरी अठराव्या शतकापर्यंत बखरी लिहिण्याची तिकडे प्रथा होती. मराठी बखरलेखनाची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरू होऊन ती अव्वल इंग्रजीपर्यंत टिकलेली दिसते.

दुसरें साम्य म्हणजे पूर्वकालीन–इतिहास लेखनाची परंपरा मराठी व इंग्रजी बखरींत आढळते. चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्राप्रमाणे बीड ह्या इतिहासकाराने परंपरागत इतिहासाचा उपयोग केला आहे.[२] ही परंपरा

---

१. Encyclopaedia Britannica, Vol. 5 (1945), P. 648

२. The Anglo-Saxon Ch · nicle (1917) P. 10

पाळतांना इंग्रजी बखरींत वाङ्मयचौर्य हा एक दोष आढळतो. मराठी बखरींत तसा प्रकार दिसून येत नाही.

चिकित्सक दृष्टीचा अभाव हा दोन्ही प्रकारच्या बखरींत स्पष्ट दिसतो. मराठी व इंग्रजी बखरींत चिकित्सक दृष्टीचा अभाव असण्याचें मुख्य कारण म्हणजे त्या कालांत इतिहासाचें शास्त्र तयार झालें नव्हतें. ह्याशिवाय ऐतिहासिक साधनें दुर्मिळ असल्यामुळे उपलब्ध असलेल्या माहितीची चिकित्सा न होता ह्या बखरी लिहिल्या गेल्या. मराठी बखरींप्रमाणे आंग्ल बखरींचीहि ऐकीव माहिती, आख्यायिका दंतकथा हीं साधनें होत.

मराठी बखरी व आंग्ल बखरी ह्यांचें लेखन हें स्वतंत्र जसें झालें आहे, तद्वतच तें कित्येकदा कोणाच्या तरी आज्ञेने झालेलें आहे. मराठी बखरकारांप्रमाणे आंग्ल बखरकारहि राजाश्रयाखाली किंवा कोणातरी मोठ्या व्यक्तीच्या आश्रयाखाली लिहीत. आंग्ल बखरकार बिशप असर[1] व आर्चबिशप प्लेगमंड[2] हे आल्फ्रेडच्या दरबारांत आश्रित होते. नॉर्मन व अँजेव्हिन कालांत बखरकारांना राजाश्रय असून त्यांना इतिहासलेखनास उत्तेजन मिळत असे. विल्यम ऑफ मॅम्सबरी ह्याने एका मोठ्या सरदाराच्या आश्रयाखाली ग्रंथ लिहिले. विल्यम ऑफ न्यूबर्ग हा दुसऱ्या हेन्रीच्या पदरीं होता. युरोपियन शौर्याच्या कृत्यांचा लेखक सर जॉन फ्रॉईसार्ट हा लंडनच्या फिलिपा राणीचा आश्रित होता.[3] मराठीप्रमाणे इंग्रजींत न्यूजबर्गच्या विल्यमची बखर वगैरे बखरी स्वतंत्रपणें लिहिल्या गेल्या आहेत.

मराठी बखरींप्रमाणे इंग्रजी बखरींतहि प्रत्यक्ष माहितीचें लेखन सापडतें. सॅक्सन बखरींत प्रत्यक्ष पाहिलेल्या घटनांचें निवेदन आहे. बाराव्या शतकांतले इंग्रज बखरकार पाहिलेल्या प्रसंगांचें चित्रण करीत.[4] हेन्री ऑफ हंटिंग्डन हा 'चक्षुर्वै सत्यं' माहिती आपल्या बखरींत देतो. मेनिंग ह्याने पहिल्या एडवर्डच्या कारकीर्दीचा जो इतिहास दिलेला आहे, त्याचें त्याला प्रत्यक्ष ज्ञान होतें.

---

१. The Cambridge History of English Literature, Vol. I (1932), P. 90
२. The Anglo-Saxon Chronicle (1917), P. 12
३. The Chronicler of European Chivalry (1930), P. 62
४. The Anglo-Saxon Chronicle (1917), P. 8

मराठी बखरकारांप्रमाणे इंग्रजी बखरकारांनीहि पौराणिक पद्धतीने निवेदन केलेलें आहे. इंग्रजी बखरींचा सॅक्सन क्रॉनिकल म्हणून जो प्रकार आहे, त्यांत सृष्टीच्या उत्पत्तीचा उल्लेख आढळतो व पुढील कालांतहि हीच पद्धति रूढ होती. इंग्रजींतील रिचर्ड ऑफ डेव्हिजेस ह्याच्या बखरींत पौराणिक दाखले सापडतात. सातव्या शतकांतील नेनियस ह्याच्या बखरींत अद्भुत गोष्टींचें वर्णन आहे.[१] क्रॉनिकल्स ऑफ क्रुसेडस्मध्ये भविष्यकालीं होणाऱ्या नाशाची सूचना दुष्काळ, भूकंप, ग्रहण इत्यादिकांच्या वर्णनांनी सूचित केलेली दिसते.[२] तसेंच स्वप्नांची सत्यता फ्रान्सच्या राजाच्या शिरच्छेदाच्या बातमीने पटविल्याची इ. स. १७९३ मधील हकीगत ॲनल्स ऑफ पॅरिशमध्ये दिलेली आहे.[३]

मराठी बखरींप्रमाणे आंग्ल बखरींतहि स्वपक्षसमर्थन व अत्युक्ति हीं दिसून येतात. फ्रॉईसार्ट ह्याने आपल्या लेखनांत सत्यनिवेदनाची प्रतिज्ञा करूनहि अत्युक्तीपूर्ण वर्णनें लिहिलीं. मराठी बखरींत आढळून येणारे व्यक्ति-विपर्यास व कालविपर्यास हे दोष आंग्ल बखरींतहि आहेत. अल्फ्रेडकालीन बखरींत सिनरिक (Cynric) हा सेर्डिकचा (Cerdic) मुलगा असल्याचें व्यक्तिविपर्यासाचें उदाहरण स्टेंटन ह्यांनी दिलें आहे.[४]

सुभाषितें किंवा तत्त्वज्ञानात्मक वाक्यें ह्यांचा वृत्तकथनासाठी मराठी बखरकारांप्रमाणे आंग्ल बखरकारांनी उपयोग केल्याचें आढळतें. उदा. ॲनल्स ऑफ पॅरिश ह्या बखरींत दैवाच्या प्रबळ शक्तीचें तत्त्वज्ञानात्मक पद्धतीने वर्णन केलें आहे. क्रानिकल्स ऑफ क्रुसेडस् ह्या बखरींत औचित्यपूर्ण सुभाषितें आहेत. मराठींतील चित्रगुप्ताच्या बखरींत अफजलखान व शिवाजी ह्यांचा युद्धपूर्व संवाद पद्यांत दिलेला आहे. त्याचप्रमाणे इथेलरेड ह्या बखरकाराने प्रतिस्पर्ध्यांचीं युद्धपूर्व भाषणें दिलेलीं आढळतात.[५]

---

१. Ibid, P. 4
२. Chronicles of the Crusades (1948), P. 70
३. Annals of the Parish (1911), P. 197
४. The Oxford History of England (Anglo-Saxon England 1943), P. 22
५. The Cambridge History of English Literature Vol. I (1932), P. 161

मराठींतल्याप्रमाणे कांही इंग्रजी बखरींच्या लेखकांचीं नांवें अज्ञात आहेत. गिसबर्न, मार्गन, मेलरॉस व वेव्हर्ली येथील बखरींच्या लेखकांची नोंद नाही.[1] अल्फ्रेडकालीन बखरींत कर्त्यांचीं नांवें नसल्यामुळे तीं स्वतः अल्फ्रेडने लिहिलीं होतीं किंवा नाही, हें ठरविणें कठिण आहे.

मराठी व इंग्रजी बखरींचें नामकरण उत्तरकालीन आहे, हेंहि एक साम्य ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. मध्ययुगीन इंग्लंडांत कोणत्याहि हस्तलिखित स्वरूपाच्या इतिहासलेखनाचा उल्लेख त्याचीं आद्याक्षरें व शेवटलीं अक्षरें ह्यांनीच करण्यांत येई; कारण ग्रंथाचें नामकरण करण्याची पद्धति त्या काळीं नव्हती. कदाचित् नामकरण झाल्यास त्याला ऐतिहासिक पुष्प (Flowers of History) अशासारखें एखादें काव्यमय नांव देण्यांत येई.[2] नामकरण हा मुद्रणकालांतील मुख्य संस्कार होय. एकाच मूळ बखरीच्या अनेक प्रती तयार करण्याची पद्धति मराठी व इंग्रजी बखरींच्या बाबतींत सारखी आहे. विल्यम ऑफ मॅम्सबरी, जॉफ्रे ऑफ् मॉनमाऊथ, रिचर्ड ऑफ डेव्हिजेस मॅथ्यू पॅरिस, मेनिंग ह्यांच्या बखरी वाङ्मयदृष्ट्या उत्तम आहेत. महिकावतीच्या बखरींतील कांहीं पद्यात्मक भागाप्रमाणें रोमन डी रोव्ह व रोमन डी ब्रट ह्यासारख्या कांहीं फ्रेंच बखरी व लेआमन व रॉबर्ट ऑफ ग्लॉसेस्टरसारख्या कांही आंग्ल बखरी पद्यमय आढळतात. त्यांचें वाचन सामुदायिकरीत्या होई.[3]

निष्कर्ष :

इंग्रजी वाङ्मयांत अँग्लो सॅक्सन कालापासून चौदाव्या–पंधराव्या शतकापर्यंत बखरलेखनाची परंपरा अविच्छिन्नपणें टिकलेली दिसते. ह्या परंपरेचें सातत्य विशेषतः ख्रिस्ती मठांत होतें. धार्मिक वातावरणांत इंग्लंडच्या राजकीय इतिहासलेखनाचा विकास झालेला आहे. मराठी बखरींची निर्मिति राजकीय वातावरणांत झाल्याचें स्पष्ट दिसतें.

आंग्ल बखरी लोकप्रिय होण्यासाठी त्यांचा पद्धतशीर प्रचार होई. त्या सरकारकडून प्रसिद्ध होत. निरनिराळ्या ख्रिस्ती मठांत एकाच बखरीच्या

१. The Anglo-Saxon Chronicle (1917), P. 9
२. The Study of Mediaeval Chronicles (1922), P. 9
३. Ibid, P. 21

अनेक प्रतींची जी देवाणघेवाण झाली, त्यामुळे त्या बखरींचा वाचकवर्ग वाढला. राजकीय वातावरणाच्या बाहेर मराठी बखरींचा प्रसार झाला नाही.

आंग्ल बखरकारांपुढे जुन्या ग्रीक व रोमन इतिहासकारांचे आदर्श होते, त्यामुळे त्यांच्या बखरींना राष्ट्रीय इतिहासांत उच्च स्थान प्राप्त झालें आहे. मराठी बखर-लेखनाची मूळ कल्पना मुसलमानी असली, तरी तिचा विकास स्वतंत्रपणें झाला. मध्ययुगांत निर्माण झालेल्या दोन भिन्न देशांतील एकाच वाङ्मयप्रकारांत विलक्षण साम्य आढळतें. मराठी व इंग्रजी गद्य वाङ्मयाच्या इतिहासांत त्या भाषेंतील बखरींची कामगिरी सारखीच उल्लेखनीय होय.

* * *

१० : उपसंहार

प्रस्तुत प्रकरणांत महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनाचा आढावा घेऊन बखरींचें प्रकाशनयुग व बखरींचें कार्य ह्यांचेंहि विवेचन करावयाचें आहे.

परकीय लेखक :

इतिहासलेखनाची कल्पना ह्या देशांत फार प्राचीन असली, तरी पाश्चात्यांच्या संसर्गानेच इतिहासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासून इकडे सुरू झाला. स्प्रेंगेल (इ.स. १७९१) व स्कॉट वेअरिंग (इ. स. १८१०) हे मराठ्यांचे इतिहासकार इंग्रजी अमलाच्या पूर्वी होऊन गेले. इंग्रजी अमदानींतला प्रसिद्ध इतिहासकार कॅप्टन ग्रँट डफ हा असून त्याने मराठ्यांचा इतिहास लिहून इतिहासक्षेत्रांत एक स्वतंत्र युग निर्माण केलें. परकीय माणसाने केलेला पद्धतशीर प्रयत्न ह्या दृष्टीने प्रस्तुत इतिहास विशेष महत्त्वाचा आहे.

ह्यानंतरच्या कालांत इंग्रजी विद्येमुळे इतिहासाची आस्था महाराष्ट्रांत हळूहळू निर्माण होऊं लागली. विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या पदवीधरांपैकी नीळकंठराव कीर्तने ह्यांनी डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी असतांनाच 'ग्रँट डफच्या बखरीवरील टीका' हा निबंध इ. स. १८६७ मध्ये लिहून डफच्या बखरींतील चुका स्पष्टपणें दाखविल्या; मात्र इतिहासाच्या आस्थेला सर्वांत जोराची चालना विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेंतील 'इतिहास' ह्या निबंधाने मिळाली.

बखरींचें युग :

इ. स. १८७८ त चिपळूणकर व त्यांचे साहाय्यकर्ते, शाळिग्राम, का. ना. साने व मोडक ह्यांनीं 'काव्येतिहाससंग्रह' हें मासिक सुरू केलें. ह्या मासिकाचं ध्येय अप्रसिद्ध जुनीं काव्यें तसेंच इतिहासाचीं अप्रकाशित साधनें उजेडांत आणण्याचें होतें. सदर मासिकांत प्रसिद्ध झालेल्या बखरींचें संपादन का. ना. साने ह्यांनी मोठ्या आस्थेवाईकपणाने व अभ्यासूपणाने

केलें असल्यामुळे इतिहाससंशोधनाची खरी सुरुवात ह्यांच कालापासून झाली, असें म्हणावयास प्रत्यवाय नाही. साने ह्यांनी ह्या मासिकांतून प्रसिद्ध केलेल्या बखरींना चिकित्सक प्रस्तावना व टीपा दिलेल्या आहेत. तसेंच त्यांनीं प्रत्येक बखरीच्या जास्तींत जास्त नकला मिळवून तिची शुद्ध प्रत तयार करण्याचा प्रयत्न केला. शिवाय त्यांनी तळटीपेंत बखरींचे पाठभेद दिलेले आढळतात. भाऊसाहेबांच्या बखरींत त्यांनी अनुक्रमणिका, परिच्छेद, नकाशा, फारसी शब्दकोश इत्यादि बाबतींत सुधारणा केल्या. काव्येतिहाससंग्रह हें मासिक एकंदर अकरा वर्षें चालू होतें. त्यांत एकूण तेवीस ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांत मुख्यत्वेंकरून बखरी, ऐतिहासिक पत्रें ह्यांचा समावेश होतो. ह्या मासिकामुळे इतिहासज्ञानाचा प्रसार होऊन स्वदेशाच्या इतिहासाची गोडी निर्माण झाली. ह्याच सुमारास विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक लेखांत काशीराजाची बखर (मराठी तर्जुमा) ही विशेष उल्लेखनीय आहे.

काव्येतिहाससंग्रह बंद पडल्यावर सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक दत्तात्रय बळवंत पारसनीस व हरि नारायण आपटे ह्यांनी पुण्याच्या डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीच्या साहाय्याने शके १८१८ (इ. स. १८९६) मध्ये 'भारतवर्ष' हें इतिहासविषयक मासिक सुरू केलें. हें मासिक दोन–अडीच वर्षें चाललें. ह्या मासिकांत सुमारें दहा–पंधरा बखरी प्रसिद्ध झाल्या. प्रस्तुत मासिकाच्या ध्येयासंबंधी पहिल्या वर्षाच्या अंकांत पुढील मजकूर आहे: —

' हें मासिक पुस्तक या अंकाप्रमाणेच दर महिन्यास चौसष्ट पृष्ठांचें निघेल. त्यांत बत्तीस पानें या पहिल्या अंकांत असलेल्या निबंधाप्रमाणें ऐतिहासिक अगर वाङ्मयात्मक निबंधांत दिलीं जातील. चोवीस पानें जुन्या बखरी, ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे यांच्या प्रकाशनास दिलीं जातील व उरलेलीं आठ पानें जिज्ञासा पत्रांस अगर त्यांच्या उत्तरांस दिलीं जातील. ' [१]

ह्यानंतर न्या. महादेव गोविंद रानडे ह्यांनी ग्रँट डफच्या इतिहासामुळे निर्माण होणाऱ्या गैरसमजाचें निराकरण आपल्या ' Rise of the Maratha Power ' ह्या ग्रंथांत केलें (इ. स. १९००). प्रस्तुत ग्रंथ हा संशोधनात्मक होय. त्यांत त्यांचा स्वदेशाभिमान व व्यासंग हीं उत्कट प्रमाणांत दिसून

१. 'भारतवर्ष', कार्तिक, शके १८१८.

येतात. ' रानडे हे मराठी इतिहासाचे द्रष्टे आचार्य या कोटींत पडण्याजोगे आहेत ' असें प्रा. द. वा. पोतदार म्हणतात.[1]

भारतवर्षानंतर पारसनिसांनी निर्णयसागर प्रेसद्वारा ' इतिहाससंग्रह ' हें मासिक इ. स. १९०८ मध्ये सुरू केलें. ह्या बाबतींत–विशेषतः सातारकर छत्रपति व नाना फडणवीस ह्यांच्या वंशजांकडून महत्त्वाचे ऐतिहासिक कागदपत्रें मिळविण्याच्या बाबतींत–सुप्रसिद्ध पुरुषोत्तम विश्राम मावजी शेट ह्यांचें त्यांना भरपूर साहाय्य मिळालें. इतिहाससंग्रह मासिक सुमारें आठ वर्षें चाललें. त्यांत कित्येक महत्त्वाचे ऐतिहासिक पत्रव्यवहार व कांही बखरी प्रसिद्ध झाल्या. इतिहाससंग्रह मासिकाचें धोरण खालीलप्रमाणे होतें:—

' इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं, अप्रसिद्ध व नवीन माहितीच्या द्वारें उपलब्ध झालेलीं चरित्रें, ऐतिहासिक निबंध, ऐतिहासिक चर्चा वगैरे भिन्नाभिन्न विषय देण्यांत येतील. '[2]

कागदपत्रांचें युग :

महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनाच्या कार्याला इ. स. १८९५ ते इ. स. १९०० ह्या कालांत नवीन वळण लागलें; कारण ह्या कालखंडांत बखरयुग संपून कागदपत्रांचें युग (Age of Documents) सुरू झालें. ह्या सुमारास सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे ह्यांनी ऐतिहासिक स्फुट लेखांचें प्रकाशन केलें व पटवर्धन घराण्याची माहिती देणारी हरिवंशाची बखर प्रसिद्ध केली (इ. स. १९०९). वासुदेवशास्त्री खरे ह्यांच्यासारखीं प्रचंड माहितीचीं माणसें क्वचितच निर्माण होतात, हे राजवाड्यांचे उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत.

ह्या कालखंडांतील दुसरे व्यासंगी संशोधक म्हणजे विश्वनाथ काशिनाथ राजवाडे हे होत. मिशनरीवृत्तीने काम करून त्यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' ह्या ग्रंथाचे बावीस खंड प्रसिद्ध करून कित्येक महत्त्वाचीं कागदपत्रें प्रसिद्ध केलीं. इतकेंच केवळ नव्हे, तर त्या खंडांना ऐतिहासिक सिद्धान्त प्रस्थापित करणाऱ्या विस्तृत प्रस्तावना लिहिल्या. राजवाड्यांच्या तिसऱ्या

१. अर्वाचीन मराठी साहित्य (शके १८५७), पृ. ३२५
२. इतिहाससंग्रह (ऑगस्ट १९०८), प्रास्ताविक लेख

खंडांत चेंऊलची बखर व होळकराची थैली ह्या दोन बखरी प्रसिद्ध झाल्या. त्यांचा चौथा खंड हा बखर-विषयाचा असून त्यांत पेशव्यांची बखर (बाळाजी गणेश कारकूनकृत), पेशवाईच्या अखेरची अखबार (वेंकट बल्लाळविरचित) व शके १७३८ सालांतील हकीगत ह्या बखरी प्रसिद्ध झाल्या. ह्या खंडांत राजवाड्यांनी बखरींची सविस्तर चर्चा केली आहे. सहाव्या खंडांतहि त्यांनी बखरीसंबंधी विवेचन केलें आहे. ह्याखेरीज त्यांनी महिकावतीची बखर कसोशीने संपादून प्रसिद्ध केली. राजवाड्यांच्या प्रस्तावनेवरून त्यांच्या चिकित्सक दृष्टीची व सखोल अध्ययनाची पूर्ण कल्पना येते. ह्याप्रमाणे त्यांनी देशाभिमानाने प्रेरित होऊन सुमारें तीन तपें निष्कांचन परिस्थितींत इतिहाससंशोधनाचें काम केलें व ' इतिहासाचार्य ' ह्या पदवीवर आपला हक्क प्रस्थापित केला. राजवाडे ह्यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने इतिहासक्षेत्रांत ' राजवाडे युग ' निर्माण केलें.

महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे ह्यांनी मराठी दप्तर रुमाल १ व २ ह्या दोन भागांत शेडगांवकर बखर, बापू गोखले ह्यांची कैफियत, भट पेशवे घराण्याची हकीगत इत्यादि बखरी प्रसिद्ध केल्या. राजवाड्यांनी स्थापन केलेल्या भारत इतिहास संशोधक मंडळ (पुणें) ह्या संस्थेच्या त्रैमासिकांतून विजयनगरचा विध्वंस, गंगाधरशास्त्री पटवर्धन व मल्हार गणेश खांडेकर ह्यांचीं आत्मचरित्रें हीं प्रसिद्ध झालीं. ह्याशिवाय सत्कार्योत्तेजक सभा (धुळें) ह्या संस्थेने प्रसिद्ध केलेली हनुमंतस्वामींची बखर, बडोदें येथे प्रसिद्ध झालेल्या शिवदिग्विजय (शके १७४०) व शिवाजीप्रताप (शके १७५१) ह्या बखरी, तंजावर येथे प्रसिद्ध झालेलें भोसलवंशचरित्र, पां. न. पटवर्धन ह्यांनी प्रसिद्ध केलेली बुंदेल्याची बखर (भाषांतरित), तसेंच अलीकडे मुंबईच्या प्रभुज्ञातितर्फे प्रसिद्ध झालेली साष्टीची बखर ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम व हैद्राबाद येथे प्रसिद्ध झालेली सनपुरीची बखर इत्यादि उल्लेखनीय आहेत.

महाराष्ट्रांत आधुनिक पद्धतीने शास्त्रीय इतिहासलेखनाचा पाया गेल्या शतकांत पाश्चात्यांनी घातला, ही विशेष महत्त्वाची गोष्ट होय. पाश्चात्य लेखकांच्या इतिहासांतील माहिती ही बहुशीं सरकारी साधनांच्या साहाय्याने दिलेली असल्यामुळे ती एकांगी झालेली दिसते. ह्यामुळे त्या लेखकांनी काढलेले निष्कर्ष एकतर्फी असणें स्वाभाविकच होय. त्यांचे एकांगी लेखन

व त्या लेखनांतील चुका मान्य करूनहि त्यांची कामगिरी थोर आहे, ह्यांत मुळीच शंका नाही.

युरोपियनांच्या लेखनामुळे महाराष्ट्रांत इतिहास-संशोधनाचें कार्य सुरू झालें खरें; पण न्या. रानडे, तेलंग, रा. ब. कीर्तने, चिपळूणकर, साने, पारसनीस, खरे, राजवाडे इत्यादि मंडळींनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचें संशोधन करून इतिहासाच्या अभ्यासाची एक तेजस्वी परंपरा निर्माण केली, हें एक महत्कार्य होय. विशेषतः पारसनीस, खरे व राजवाडे ह्यांनी ह्या क्षेत्रांत केलेले वैयक्तिक प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे असे आहेत. मराठी भाषेच्या प्रासादांतील हें रिकामें दालन त्यांनी सुशोभित केलें. आपल्या थोर कामगिरीच्या द्वारें त्यांनी इतिहास-संशोधनाचा आदर्श वस्तुपाठच ठेवला. स्वार्थत्यागी वृत्तीने त्यांनी केलेलें हें लोकोत्तर कार्य महाराष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखें झालेलें आहे.

इतिहासाचें शास्त्र

इतिहास हा संशोधनमूलक असतो. खऱ्या इतिहासकाराची दृष्टि निर्विकारी असते. तो सत्यप्रिय असल्यामुळे स्वकीय आणि परकीय असा भेद करीत नाही. ऐतिहासिक व्यक्तींना विभूतिपूजेच्या दृष्टीने महत्त्व दिल्यास खऱ्या इतिहासाचें दर्शन होत नाही. इतिहासलेखनासाठी एखाद्या नाण्याप्रमाणे ऐतिहासिक व्यक्तींच्या किंवा घटनांच्या दोन्ही बाजू तपासणें आवश्यक असतें. सर्वसामान्य व्यक्तींच्या बाबतींत ज्या नैतिक मूल्यांची कसोटी लावली जाते, तीच ऐतिहासिक व्यक्तींना लावणें इष्ट होय. इतिहासाचें क्षेत्र अत्यंत व्यापक असून जगांतील सर्व ज्ञान हें इतिहासस्वरूपात्मक असतें. भाटकाव्याचें स्वरूप प्राप्त झालेल्या मराठी बखरींतील इतिहासाची छाननी शास्त्रीय दृष्टया होण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

बखरींचें कार्य

महाराष्ट्राच्या इतिहासलेखनाची उज्ज्वल परंपरा बखर–स्वरूपांत दिसते. बखरींतील मजकूर पक्षनिष्ठ भूमिकेने लिहिलेला असला, तरी परकीय अशा मुसलमान व पाश्चात्य इतिहासकारांच्या विरुद्ध पक्षाची भूमिका म्हणजे ज्यांचा तो इतिहास आहे त्यांचें म्हणणें काय आहे, ह्या दृष्टीने बखरींचें एक

विशिष्ट महत्त्व मान्य केलें पाहिजे. बखरींत खरा इतिहास नसला, तरी खऱ्या इतिहासाचें तें साधन आहे. त्यांत परंपरेने आलेल्या इतिहासाचें मुख्य सूत्र असल्यामुळे इतिहासरचनेसाठी त्यांचा उपयोग निश्चित होईल. राजकीय इतिहासाच्या ज्ञानाचा प्रसार तसेंच स्वदेश, स्वधर्म ह्यांच्यासंबंधीच्या उदात्त भावनांचा परिपोष बखरींच्या द्वारें झालेला आहे. इतिहासाचा तौलनिक अभ्यास करण्याच्या दृष्टीने बखरींची उपयुक्तता विशेष आहे.

मूळ बखरींच्या ज्या निरनिराळ्या नकला होत. त्यांचा उपयोग हस्ताक्षर सुधारण्यासाठी कित्त्याप्रमाणे फार होई. ह्या पद्धतीमुळे जुन्या इतिहासाचें संरक्षण करण्याची पिढ्यानपिढ्या अखंड परंपरा चालू राहिली. पौराणिक आख्यानामुळे संसारी लोकांना ईश्वरभक्तीची गोडी लागली, त्याप्रमाणे मराठी बखरींनी समाजाला इतिहासाचें ज्ञान प्राप्त करून देऊन करमणूकहि केली. स्वदेशाच्या इतिहासाच्या ज्या आस्थेने बखरींचें लेखन झालें, त्याच आस्थेने त्यांचें वाचनहि झालें.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत गद्य–सारस्वताची एक निराळी शाखा ह्या दृष्टीने बखरींचें स्वतंत्र मूल्य आहे. प्रा. पोतदारांनी म्हटल्याप्रमाणे मराठी गद्याला ह्या बखरकारांनी मोठीच श्रीमंती आणली आहे[1] ह्यांत संशय नाही. मराठी गद्य–सारस्वताचा हा तेजस्वी प्रकार पाहून मायभाषेविषयी उत्कट साभिमान आनंद वाटतो. बखरींनी स्वदेशाभिमानाच्या भावनेचें पोषण केलें म्हणून त्यांना राष्ट्रीय वाङ्मय संबोधणें योग्य होईल. बखरींच्या द्वारें मराठी राज्याच्या पूर्ववैभवाच्या स्मृति जागृत होऊन देशाभिमानाचें वारें अंगांत संचारतें व आत्मसामर्थ्याचा दिव्य साक्षात्कार होतो. मनाला ह्या उन्नत अवस्थेप्रत प्राप्त करून देणाऱ्या बखरी म्हणजे अभिजात वाङ्मय होय. परंपरेने आलेल्या ह्या पैतृक धनाचा उपयोग इतिहास आणि वाङ्मय ह्यांच्या विकासाच्या दृष्टीने करणें हें अगत्याचें आहे. ज्या कालांत मराठी घोडे अटकेपार झेंडे लावीत, त्याच कालांत मराठी भाषावारूने वाङ्मयक्षेत्रांत झेंडे लावले, हा योगायोग होय. बखरींचें रोपटें स्वराज्याबरोबर वाढलें, साम्राज्याबरोबर त्याचा मोठा वृक्ष होऊन त्याला बहर आला व साम्राज्याचा वृक्ष उन्मळून पडल्यावर आपल्या सहकाऱ्याला जणुं कांही साथ देण्याच्या उद्देशाने

१. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार (१९२२), पृ. ७

व त्या लेखनांतील चुका मान्य करूनहि त्यांची कामगिरी थोर आहे, ह्यांत मुळीच शंका नाही.

युरोपियनांच्या लेखनामुळे महाराष्ट्रांत इतिहास-संशोधनाचें कार्य सुरू झालें खरें; पण न्या. रानडे, तेलंग, रा. ब. कीर्तने, चिपळूणकर, साने, पारसनीस, खरे, राजवाडे इत्यादि मंडळींनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचें संशोधन करून इतिहासाच्या अभ्यासाची एक तेजस्वी परंपरा निर्माण केली, हें एक महत्कार्य होय. विशेषतः पारसनीस, खरे व राजवाडे ह्यांनी ह्या क्षेत्रांत केलेले वैयक्तिक प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे असे आहेत. मराठी भाषेच्या प्रासादांतील हें रिकामें दालन त्यांनी सुशोभित केलें. आपल्या थोर कामगिरीच्या द्वारें त्यांनी इतिहास-संशोधनाचा आदर्श वस्तुपाठच ठेवला. स्वार्थत्यागी वृत्तीने त्यांनी केलेलें हें लोकोत्तर कार्य महाराष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखें झालेलें आहे.

इतिहासाचें शास्त्र

इतिहास हा संशोधनमूलक असतो. खऱ्या इतिहासकाराची दृष्टि निर्विकारी असते. तो सत्यप्रिय असल्यामुळे स्वकीय आणि परकीय असा भेद करीत नाही. ऐतिहासिक व्यक्तींना विभूतिपूजेच्या दृष्टीने महत्त्व दिल्यास खऱ्या इतिहासाचें दर्शन होत नाही. इतिहासलेखनासाठी एखाद्या नाण्याप्रमाणे ऐतिहासिक व्यक्तींच्या किंवा घटनांच्या दोन्ही बाजू तपासणें आवश्यक असतें. सर्वसामान्य व्यक्तींच्या बाबतींत ज्या नैतिक मूल्यांची कसोटी लावली जाते, तीच ऐतिहासिक व्यक्तींना लावणें इष्ट होय. इतिहासाचें क्षेत्र अत्यंत व्यापक असून जगांतील सर्व ज्ञान हें इतिहासस्वरूपात्मक असतें. भाटकाव्याचें स्वरूप प्राप्त झालेल्या मराठी बखरींतील इतिहासाची छाननी शास्त्रीय दृष्ट्या होण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

बखरींचें कार्य

महाराष्ट्राच्या इतिहासलेखनाची उज्ज्वल परंपरा बखर–स्वरूपांत दिसते. बखरींतील मजकूर पक्षनिष्ठ भूमिकेने लिहिलेला असला, तरी परकीय अशा मुसलमान व पाश्चात्य इतिहासकारांच्या विरुद्ध पक्षाची भूमिका म्हणजे ज्यांचा तो इतिहास आहे त्यांचें म्हणणें काय आहे, ह्या दृष्टीने बखरींचें एक

विशिष्ट महत्त्व मान्य केलें पाहिजे. बखरींत खरा इतिहास नसला, तरी खऱ्या इतिहासाचें तें साधन आहे. त्यांत परंपरेने आलेल्या इतिहासाचें मुख्य सूत्र असल्यामुळे इतिहासरचनेसाठी त्यांचा उपयोग निश्चित होईल. राजकीय इतिहासाच्या ज्ञानाचा प्रसार तसेंच स्वदेश, स्वधर्म ह्यांच्यासंबंधींच्या उदात्त भावनांचा परिपोष बखरींच्या द्वारें झालेला आहे. इतिहासाचा तौलनिक अभ्यास करण्याच्या दृष्टीने बखरींची उपयुक्तता विशेष आहे.

मूळ बखरींच्या ज्या निरनिराळ्या नकला होत. त्यांचा उपयोग हस्ताक्षर सुधारण्यासाठी कित्त्याप्रमाणे फार होई. ह्या पद्धतीमुळे जुन्या इतिहासाचें संरक्षण करण्याची पिढ्यानपिढ्या अखंड परंपरा चालू राहिली. पौराणिक आख्यानामुळे संसारी लोकांना ईश्वरभक्तीची गोडी लागली, त्याप्रमाणे मराठी बखरींनी समाजाला इतिहासाचें ज्ञान प्राप्त करून देऊन करमणूकहि केली. स्वदेशाच्या इतिहासाच्या ज्या आस्थेने बखरींचें लेखन झालें, त्याच आस्थेने त्यांचें वाचनहि झालें.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत गद्य–सारस्वताची एक निराळी शाखा ह्या दृष्टीने बखरींचें स्वतंत्र मूल्य आहे. प्रा. पोतदारांनी म्हटल्याप्रमाणे मराठी गद्याला ह्या बखरकारांनी मोठीच श्रीमंती आणली आहे[1] ह्यांत संशय नाही. मराठी गद्य–सारस्वताचा हा तेजस्वी प्रकार पाहून मायभाषेविषयी उत्कट साभिमान आनंद वाटतो. बखरींनी स्वदेशाभिमानाच्या भावनेचें पोषण केलें म्हणून त्यांना राष्ट्रीय वाङ्मय संबोधणें योग्य होईल. बखरींच्या द्वारें मराठी राज्याच्या पूर्ववैभवाच्या स्मृति जागृत होऊन देशाभिमानाचें वारें अंगांत संचारतें व आत्मसामर्थ्याचा दिव्य साक्षात्कार होतो. मनाला ह्या उन्नत अवस्थेप्रत प्राप्त करून देणाऱ्या बखरी म्हणजे अभिजात वाङ्मय होय. परंपरेने आलेल्या ह्या पैतृक धनाचा उपयोग इतिहास आणि वाङ्मय ह्यांच्या विकासाच्या दृष्टीने करणें हें अगत्याचें आहे. ज्या कालांत मराठी घोडे अटकेपार झेंडे लावीत, त्याच कालांत मराठी भाषावारूने वाङ्मयक्षेत्रांत झेंडे लावले, हा योगायोग होय. बखरींचें रोपटें स्वराज्याबरोबर वाढलें, साम्राज्या-बरोबर त्याचा मोठा वृक्ष होऊन त्याला बहर आला व साम्राज्याचा वृक्ष उन्मळून पडल्यावर आपल्या सहकाऱ्याला जणुं कांही साथ देण्याच्या उद्देशाने

१. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार (१९२२), पृ. ७

तो नष्ट झाला, हाहि योगायोगच होय. ज्या :वाङ्मयाने परकीय विद्वानांना वेड लावलें त्याची योग्यता काय वर्णावी! महाराष्ट्राचे पहिले इंग्रज इतिहासकार स्कॉट वेअरिंग ह्यांनी मराठ्यांच्या बखरींविषयी खालील धन्योद्गार काढलेले आहेतः—

"Not so the Mahratta histories. Their historians (some will deny them the name) write in plain, simple and unaffected style, content to relate passing events in apposite terms, without seeking turgid imagery or inflated phraseology .... no attempt is made to make the worse appear the better reason. Victory and defeat are briefly related; if they pass over the latter too hastily, they do not dwell upon the former with unnecessary minuteness. They do not endeavour to bias or mislead the judgment, ..."*

ह्यावर अधिक भाष्य पाहिजे काय?

* * *

* History of the Marathas — Scot Waring (1810), Preface IX, X

सूचि

(बखरकार व बखरी)

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२१	१	बखरकाराची भूमिका	बखरकारांची भूमिका
३०	२२	दफत्यास	दफात्यास
५०	शेवटची टीप	स्थि. राजाराम (१९३८)	स्थि. राजाराम (१९३६)
७३	६	बापू कान्हेविषयीं	बापू कान्होविषयी
७३	शेवटची टीप	म. रि. उ. दि. ३	म. रि. उ. वि. ३
८७	टीप	Bombay Gazeteer	Bombay Gazetteer
८९	शेवटची टीप	म. स. प्रस्ता०	म. ब. प्रस्ता०
९९	१९	राजभुवनचें	राजभुवरचें
१४६	शेवटची टीप	. पेशव्यांची बखर	४. पेशव्यांची बखर
१८५	१८	दिसून येतें	दिसून येत नाही
२२३	५	खड्याच्या	खर्ड्यांच्या
२३९	शेवटची टीप	The Anglo-Saxon Ch nicle	The Anglo-Saxon Chronicle

संदर्भ-ग्रंथ

A Forgotten Empire - Robert Sewell, 1924.

A History of Indian Literature - M. Winternitz, Vol. I, 1927.

Encyclopaedia Britannica, Vol. 5, 1945.

Gazetteer of the Bombay Presidency - Thana, 1882.

Indian Antiquary, Vol. L. 1921.

Indian Historical Records Commission, Vol. VII, 1925.

New History of the Marathas, Vol. I. G. S. Sardesai, 1946.

The Cambridge History of English Literature, Vol. I, 1932.

The Cambridge History of India, Vol. III, 1928.

The Study of Mediaeval Chronicles—T. F. Tout, 1942

The Use of History - A. L. Rowse, 1946.

ऐतिहासिक प्रस्तावना–वि. का. राजवाडे, १९२८.

प्राचीन मराठी गद्य–संपादक शं. गो. तुळपुळे, १९४९.

मराठी गद्याचा इंग्रजी अवतार–द. वा. पोतदार, १९२२.

मराठी बखर गद्य–संपादक डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, १९५२.

मराठी रियासत–गो. स. सरदेसाई.

शहाजी १९३५.

शककर्ता शिवाजी १९३५.

उग्रप्रकृति संभाजी १९३५.

स्थिरबुद्धि राजाराम १९३६.

पेशवा बाळाजी विश्वनाथ १९४२.

पेशवा बाजीराव १९४२.

पेशवा बाळाजीराव १९५३.

मध्य-विभाग ४ (१७६१–१७७४) १९२५.
उत्तर-विभाग १ (१७७४–१७८३) १९२९.
उत्तर-विभाग २ (१७८४–१७९५) १९२९.
उत्तर-विभाग ३ (१७९५–१८४८) १९३२.
महाराष्ट्र-सारस्वत–वि. ल. भावे, (आ. ४ थी) शके १८७३.
महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास–शं. दा. पेंडसे, १९३३.
महाराष्ट्रीय ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, विभाग ३, १९२३.
महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग ७, १९२४.
विजयनगर स्मारक ग्रंथ १९३६–३७.
शिवचरित्रप्रदीप (संपादक द. वि. आपटे व स. म. दिवेकर) शके १८४७.

महाराष्ट्राचा

महार



लेखक – बी.ए.

षा भारती प्रकाशन, कुर्ला, मुंबई नं. ३

महाराष्ट्राचा महार

(भाग पहिला)

प्राचीन इतिहास

महार हें एक राष्ट्र होतें....ती एक स्वतंत्र संस्कृति होती !

: लेखक :

श्री. वि. तु. जाधव, बी. ए. (ऑनर्स)

उषा भारती प्रकाशन

किंमत ८ आणे

मुखपृष्ठावरील दुरंगी चित्र महार ज्ञातींतील एक उदयोन्मुख चित्रकार
श्री. एस्. जे. पालवे यांनीं काढलें आहे.

प्रथमावृत्ति डिसेंबर १९५६

: प्रकाशक :
श्री. के. मा. सोनवणे
व्यवस्थापक, उषाभारती प्रकाशन
कासीम हाऊस, सी. एस्. टी. रोड
कुर्ला, मुंबई नं. ३७

: मुद्रक :
श्री. कृ. ना. सापळे,
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
मोरबाग रोड,
दादर, मुंबई नं. १४

महाराष्ट्राच्या तेजस्वी महार समाजांत जन्म घेऊन अखिल भारतीय
दलितांचा भाग्योदय घडवून आणणारे
युगपुरुष



महापरिनिर्वाणगत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या

पुण्यस्मृतीस

—आणि असें घडेल तर....!

दीड हजार वर्षांनंतर महाराष्ट्राचा महार डॉ. बाबासाहेबांच्या दिव्य संदेशानुसार बौद्ध-धर्म स्वीकारीत आहे. हा दीड हजार वर्षांचा काळ म्हणजे एक दीर्घ काळरात्रच होती. या अंधाऱ्या रात्रींत आम्ही हिंदुधर्माच्या खोट्या भूलथापांना भाळलों व ब्राह्मणी धर्माची अखंड गुलामगिरी पत्करली. कदाचित् एका काळीं बुद्धाच्या शिकवणीनें पूनीत झालेला महार पुनः बुद्धमार्गानें जाणार असला तरी गेलीं दीड हजार वर्षें त्यानें ज्या दारुण अवस्थेंत काढलीं त्याची ऐतिहासिक नोंद आपल्या संग्रहीं नको का ? हिंदुधर्माची गुलामगिरी कांहीं साधीसुधी नव्हती. ती मगरमिठी होती. या मगरमिठींतून बाहेर पडण्यासाठीं महारांनीं केलेली धडपड मोठ्या रोमहर्षक प्रसंगानीं भरलेली आहे.

'महाराष्ट्राचा महार' गेल्या पांच वर्षांत माझ्या डोक्यांत सारखा गलका करून आहे. महाराष्ट्रांत किंवा महाराष्ट्राच्या महार जातींतील माझा जन्मयोग म्हणूनच कांहीं नव्हे ! पण इतर अनेक कारणांस्तव महारांचा इतिहास मराठी भाषेंत लिहिला जावा या आकांक्षेनेंच मी महारांच्या इतिहासाचे धागेदोरे शोधीत आहे. त्यांची वीण कशी झाली आहे हें ठरविण्याचा अधिकार वाचकांसच आहे. ज्यांना महार जात हीन म्हणून त्याज्य वाटते त्यांना यांतील स्वारस्य कळणार नाहीं. पण महार जातीची पराक्रमी आणि स्वाभिमानी परंपराच हा इतिहास लिहिण्यास मला उद्युक्त करीत आहे. हा इतिहास धुंडतांना आपलेपणाच्या उर्मी माझ्या मनांत उफाळतात. एक नवीन चेव येऊं लागतो; अन् वाटतें माझ्या महार जातीचा मध्ययुगीन आणि अर्वाचीन इतिहास अधिकाधिक त्वरेनें माझ्या वाचकांपुढें आणावा. माझी ही

महत्त्वाकांक्षा सफल झाली तर मी या प्राचीन इतिहासासारखेच आणखी चार किंव पांच विभाग क्रमशः या प्रकाशनातर्फे सादर करण्याचें योजिलें आहे आणि भविष्यांत कधीं शक्य झालें तर त्याचा एकच ग्रंथ वाचकांच्या हातीं द्यावयाच मानस आहे. मध्ययुगीन व अर्वाचीन कालखंडांतील ही तेजस्वी प्रकरणें ज्या दिवशीं मी माझ्या वाचकांपुढें आणीन तो भाग्यदिनच! आणि असें घडलें तर माझ्या ज्ञाति–ऋणांतून मी मुक्त झालों असेंच मला वाटेल.

प्राचीन इतिहासास आधारभूत झालेला डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा अमोल सिद्धांत या पुस्तिकेंत पुनर्मुद्रित करण्यास उदार अंतःकरणानें परवानगी दिल्याबद्दल डॉ. केतकर यांच्या सुविद्य कन्या सौ. वेरा शर्मा आणि त्यांच्या पत्नी श्रीमती शीलावती केतकर यांचा मी अत्यंत आभारी आहे.



महाराष्ट्राचा महार

झाला महार पंढरीनाथ !

महार....महाराष्ट्राचा महार! हिंदु धर्माच्या अघोरी जातिभेदनीतीमुळें अस्पृश्य बनलेला पण महाराष्ट्राला ललामभूत असलेला महार आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत वसाहत करून आहे. खरेंच, तो वसाहत करून आहे का इतर महारेतर त्याच्याभोंवतीं वसाहत करून राहिले आहेत ? इतिहासकारांनांही पडलेलें हें एक कोडें आहे. इतिहाससंशोधकानांही हतबुद्ध करणारा हा महाराष्ट्राचा महार एरव्हीं आहे तरीं कसा ? एका आधुनिक कवीच्या शब्दांत त्याचें सर्वसामान्य चित्र हें असें आहे:—

झाला महार पंढरीनाथ,
काय देवाची सांगूं मात !
नेसला मळीण चिंगोटी, घेतली हातांमध्यें काठी
घोंगडी टाकिली पाठीं, करी जोहार दरबारांत
झाला महार पंढरीनाथ !
मुंडाशांत बांधली चिठी, फेंकतो दूरून जगजेठी
दामाजीनें विकली जी कोठी त्याचं ध्यावं नाणं पदरांत
झाला महार पंढरीनाथ !
खळखळा ओतिल्या मोहरा, याची मोजून पावती करा
ढीग बघून चमकल्या नजरा, शाह घाली बोट तोंडांत
झाला महार पंढरीनाथ !

दामाजीला दुष्काळासारख्या आपत्तींत यःकश्चित् महार मदत करतो हें स्पष्टपणें सांगणें हिंदुसवर्णीयानां लाजिरवाणें वाटलें. केवळ महाराच्या उपकारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें त्यांच्या धर्ममूल अहंभावाला न रुचल्यामुळेंच विठू महाराला ‘ पंढरीनाथ ’ करून टाकला आणि एका ऐतिहासिक सत्याची दंतकथा बनविली. वरील कवितेंतील महाराचें वर्णन हेंच आजवरचें महाराचें लौकिक स्वरूप आहे. या पलिकडे महार कांहीं असूं शकेल असें बहुसंख्य सवर्ण हिंदूनां तरी वाटत नाहीं. किंबहुना, त्याची खरीखुरी ओळख करून घेण्याइतका मनाचा उदारपणा त्यांनीं गेल्या दीडहजार वर्षांत एकदांही दाखविला नाहीं. त्यांच्या ह्या अनुदारपणामुळेंच महार वरील वर्णनाचा बनला आहे.

हें चित्र खोटें आहे

त्याची ती चिंगोटी, फाटकें मुंडासें व हातांतील काठी ही त्याच्या मध्ययुगीन गुलामगिरीच्या स्थितीचें द्योतक आहे. परंतु त्या कवीला त्याचा उदारपणा, त्याची कर्तृत्वशील ‘ मात ’ पंढरीनाथाच्या नांवीं ढकलावी लागली इतकी त्याची आज हीन स्थिती आहे. पण विठू महाराची किंवा महाराष्ट्राच्या अखिल महारांची एका काळीं सर्वांवर मात होती. त्यांनीं महाराष्ट्राचा महत्त्वपूर्ण इतिहास घडविला, हें आधुनिक इतिहासकारांनीं सिद्ध केलें आहे.

“ महार जातीनें राज्यें स्थापन केलीं, इतरांची धुळीला मिळविलीं आणि राज्यवैभवाचे सुखसोहाळे भोगले; आणि त्यानंतर गुलामगिरीच्या खातेऱ्यांत आयुष्य घालविलें. या जातीचा इतिहास जितका चित्तवेधक, रोमहर्षक आणि स्फूर्तिदायक आहे तितकाच तो हृदयद्रावक आहे. ”

महारांच्या इतिहासाचें सांगोपांग दिग्दर्शन करणारे एक मिशनरी प्राध्यापक ऑलेक्झांडर रॉबर्टसन आपल्या Mahar Folk (**महार जात**) या प्रबंधाच्या प्रास्ताविकेंत म्हणतातः—

"दैवाची वक्रदृष्टी असलेल्या या महार समाजाचा प्राचीन काळीं अभ्यास करतांना त्यांच्या त्या दारुण स्थितीकडे पाहून अंतःकरण व्याकूळ होतें, अंतःकरण दयेनें पाझरलें जातें. ज्या समाजरूढीनें धर्मानें त्याना अशा निघृणतेनें गांजलें त्याबद्दल मनांत आत्यंतिक जळफळाट होतो. ही त्वेषभावना शास्त्रीय निष्कर्षांत अवगुंठित असली तरी माझ्या मनांत उद्भवलेल्या नैतिक जळफळाटाची कारणमीमांसा शास्त्रानें केली पाहिजे. महारांवर सामाजिक अन्याय झाला आहे ही वस्तुस्थिती आहे आणि म्हणूनच त्यांची न्याय्य बाजू मला मांडावीशी वाटते."

आधुनिक कवीनें काढलेलें महाराचें शब्दचित्र कितीहि वास्तववादी असलें तरी त्याच्यावर अन्याय करणारें आहे. त्याच्यावर लादलेल्या दुःस्थितीचें तें विदारक चित्र आहे, हें शहाण्या माणसांनीं विसरतां नये.

महार संस्कृतीचा इतिहास कुठें लोपला ?

महाराची प्राचीन परंपरा याहून मोठी उदात्त आणि वैभवशाली आहे. श्री. वामनराव भट यांनीं आपल्या The Harijans of Maharashtra (**महाराष्ट्रांतील हरिजन**) या पुस्तकांत **महार** हें एक राष्ट्र होतें. असें निर्वेधपणें प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात, 'महाराष्ट्राच्या पठारावर व्यापून राहिलेली **महार** ही मोठी जमात होती, ती एक राष्ट्रच होती, हें दर्शविणारे खूप पुरावे आहेत. ही जमात बहुधा परकीय आक्रमणाखालीं चिरडली जाऊन आपलें सर्वस्व गमावून बसली. शतकानुशतकांची गुलामगिरी त्यांच्या पदरीं आली.

बेडन पॉवेल म्हणतात, "पश्चिम भारतांत महारांचें अधिराज्य होतें. आणि त्यामुळेंच '**महाराष्ट्र**' हें नांव या भूप्रदेशाला प्राप्त झालें आहे. हें खरें असो वा नसो पण एकाकाळीं या प्रदेशांत महार राजे राज्य करीत होतें. त्यांचे कायदे सत्ता चालवीत होते आणि त्यांच्या अशा स्वतंत्र चालिरीती व स्वतंत्र धर्म-संस्कृति होती, हें दाखवून द्यायला

दामाजील आहेत. [महार दिसावयाला धिप्पाड आणि कडवे आहेत. हें स्पष्ट तर हुशार आणि धाडसी आहेत. त्यांच्या स्त्रियाही देखण्या उ कर्तबगार आहेत." (शिवराम जानबा कांबळे चरित्र)

महार ही शासनकर्ती जमात होती तशी त्यांची स्वतंत्र अशी संस्कृति होती. महार-संस्कृतीचा इतिहास त्यांच्या पराक्रमाच्या इतिहासाबरोबरच गडप झाला. महारांचा वैभवकाल **महाराष्ट्री** या प्राकृत भाषेच्या काळांतील असल्यामुळेंच त्या भाषेबरोबरच तो लुप्त झाला. महाराष्ट्री भाषेचें वाङ्मय आज उपलब्ध असते तर महारांचा तेजस्वी राजकीय इतिहास समजला असता असें अनेक प्रमुख इतिहासकारांचें मत आहे.

प्राचीन महाराष्ट्राचा संशोधनात्मक इतिहास लिहिणारे महाराष्ट्राचे माननीय इतिहास संशोधक व कोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं आपल्या संशोधनांत महारांच्या पूर्वपीठिकेसंबंधीं एक निश्चित स्वरूपाचा सिद्धांत आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र-शातवाहनपर्व' या इतिहासग्रंथांत गृहित धरला आहे. या सिद्धांतानें त्यावेळच्या सोवळ्या इतिहासकारांचा भडका झाला असला तरी इतिहास हा सत्यकथनासाठीं असल्यामुळें त्यांनीं आपल्या मताचें निर्भय प्रतिपादन केलें आहे. त्यांचें संशोधन सखोल व विस्तृत आहे. कांहीं ब्राह्मण इतिहासकार इतिहास सांगतांनां आपली जात विसरून जाऊं शकले नाहींत व त्यामुळें सत्यकथन दूषित झालें आहे. परंतु डॉ. केतकरांच्या बाबतींत मात्र त्यांचें ब्राह्मणत्व मुळींच आड आलेलें नाहीं. महारांच्या प्राचीनत्वाबद्दल त्यांनीं मांडलेला सिद्धांत त्यामुळेंच अधिक खरा आणि क्रांतिकारक वाटतो. त्यांचें या सिद्धांतावरील संपूर्ण विवरण येथें दिलें आहे:—

डॉ. केतकरांनीं मांडलेला महारांच्या प्राचीनतेबद्दलचा अमोल सिद्धांत

महाराष्ट्रांत अत्यंत प्राचीन काळीं कोणत्या जाती होत्या, त्याचें पुढें काय झालें आणि जातींची घटना आणि विघटना कशी होते, हा एक

स्वतंत्र विषय आहे. येथें एवढेंच सांगतों कीं, अत्यंत प्राचीन काळीं **कोळी, भोई, महार** आणि **रट्ट** यांची वस्ती महाराष्ट्रांत होती. व त्यामुळेंच स्थलनामें व भाषानामें निश्चित् झालीं आहेत.

भाषेचें नांव, देशनाम त्याचप्रमाणें लोकनामही शातवाहन कालीं निश्चित् झालें होतें, असें उपलब्ध पुराव्यांवरून स्पष्ट म्हणतां येतें.

महारट्ठ हे **मराठे** या शब्दाचें पूर्वरूप असून तें ब्राम्ही लिखाणाच्या काळापासून एक सारखें उपयोगांत आहे. नानाघाट, भाजें, कार्ली व कान्हेरी येथील शिलालेखांतून दान करणाऱ्या पुरुषांच्या नांवाच्या पाठीमागें **महारठि** व स्त्रियांच्या नांवाच्या पाठीमागें **महारठिनी** असें लिहिलेलें असतें. नानाघाट क्रमांक १ शिलालेख यांत **वेदिसिरिस.... महारठिनो** हे शब्द आले आहेत. तसेंच बर्जेस व भगवानलाल यांच्या "पश्चिम हिंदुस्थानांतील लेणीं" यांत पान २४ वर '**महारठिस कोसकीपुतस विण्हुदतस**' (भाजें लेख) आणि '**महाभोय बालिकाय महादेविय महारठिनिय**' (बेंडसें लेणें २) हे शब्द आहेत. तसेंच '**महारठिस गोतिपुत्रस अग्निमित्रणकस**' (कार्लें लेणें आवे. ५ पृ. ८६) असे शब्द आले आहेत. हें सर्व **महारठ** शब्दाचे उपयोग महाराष्ट्राचे देश व लोक या नात्यानें अस्तित्व निःसंशय सिद्ध करतात.

प्रसिद्ध इतिहास संशोधक राजवाडे आपल्या 'महाराष्ट्राचा वसाहत काल' या लेखांत आणि 'राधामाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेंत महाराष्ट्र नांवाची व्युत्पत्ति व महाराष्ट्रीयांच्या पूर्वजांची परिभ्रमणें देण्याचा आणि वंश निश्चित् करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मतें मगध देशाधिपति महाराजांचे जे भक्त ते महाराष्ट्रिक बौद्धक्रांतीला कंटाळून दक्षिणारण्यांत शिरले. त्यांच्या दक्षिण प्रवेशाचा काल राजवाडे यांच्या मतें शकपूर्व सहाशें असा आहे. अशोकाच्या शिलालेखांत उल्लेखिलेले राष्ट्रिक (रिस्टिक) आणि महाराष्ट्रिक अगदीं निरनिराळे होत. या महाराष्ट्रि-

कांनीं नर्मदेपासून पैठणचा प्रांत व्यापिला. कालांतरानें महाराष्ट्रिकांच्या खालच्या भागांतील वैराष्ट्रिक आणि राष्ट्रिक यांचाही समावेश महाराष्ट्रिकांत होऊन या तिघांचें देश मिळून **त्रिमहाराष्ट्रिक** बनलें. सोळाशें वर्षेपर्यंत दक्षिणेंत महाराष्ट्रिकांनीं स्व (?) धर्म–संरक्षणाचें काम केलें. इ० इ०

राजवाडे यांनीं '**महा**' शब्दाचें स्पष्टीकरण '**महार**' शब्दाव्यतिरिक्त करण्यासाठींच मगध महाराजांचा आश्रय महाराष्ट्रीयांच्या पूर्वजांस घडविला काय अशी शंका येते. शिवाय शकपूर्व सहाशें वर्षे या कालाच्या पूर्वी महाराष्ट्रांत मनुष्यवस्ती फारशी नसावी, ही कल्पना त्यांच्या मनांत असल्यामुळें त्यांनां बाहेरचे लोक आणण्याची इच्छा झालीं आणि त्या लोकांना येण्याचें कारण दाखविलें पाहिजे म्हणून मगधाधिपतीच्या भक्तांना बौद्धक्रांतीला कंटाळण्याचें श्रेय राजवाड्यांनीं दिलें आहे. महाराष्ट्रिकांना बौद्धधर्माचा एवढी जुगुप्सा असती तर दक्षिणेंत पुढें मोठमोठे पर्वतीय बौद्ध–विहार कसे उत्पन्न झाले असते? या विषयीं शंका राजवाड्यांच्या मनास शिवली नाहीं, असें दिसतें. अशोकाच्या लेखांतील राष्ट्रीय हेच जर महाराष्ट्रीयांचें आद्यजनक घेतले तर 'महा' शब्दाचें स्पष्टीकरण होत नाहीं. म्हणून मगध महाराजांकडे जावें लागलें. आणि त्यानंतर उत्तरकालीन वस्तुस्थितीशीं म्हणजे पुराव्याशीं विसंगत अशी अनुमान–परंपरा राजवाडे यांस चिकटवावी लागली.

राजवाडे यांनीं आपल्या विधानाला समाधानकारक आधार दिला नाहीं. माझ्या मतें राष्ट्रिकांचें आगमन त्याहूनही अत्यंत प्राचीनकाळीं झालें असावें. 'महाराष्ट्र' हें नांव राष्ट्रिकामुळें आलें असें गृहित धरलें, तर वररुचीच्या काळाच्यापूर्वी अनेक शतकें या प्रदेशांत राष्ट्रिकांचें म्हणजे रठांचें आगमन होऊन त्यांचेंच नांव देशाला मिळावें, इतकें तेथें त्यांचें जुनेपण झालें असलें पाहिजे. **महाभोज** आणि **महारठी** अशीं दोन नांवें दिसतात. या गोष्टीस देखील महत्त्व आहे. दोन्हीं नांवें संयुक्त समाजाचीं

द्योतक आहेत. एका ठिकाणीं **महार** आणि **भोज** म्हणजे भोई यांचें एकत्व होऊन संयुक्त समाज स्थापन झाला असावा. महारांचा उल्लेख हालाच्या सप्तशतींत नाहीं. '**महार**' हेच प्राचीन काळीं **हलिक** या नांवानें प्रसिद्ध असावेत. हलिकांप्रमाणेंच भोई आणि भोईणी यांचा उल्लेख सप्तशतींत आहे. आणि महाभोजांचा उल्लेख अनेक आंकित लेखांत आहे. त्यापैकीं एकाचें अवतरण केलेंच आहे. त्या अवतरणांतील 'भोय' या शब्दाचा अर्थ 'भोई' असा करणें अग्राह्य आहे, असेंही अनेक वाचकांना वाटण्याचा संभव आहे. तथापि येथें केवळ मतनिर्देशापलिकडे जातां येत नाहीं. मतसिद्धीचा उपक्रम पुढें होणारच आहे.

'महारठ' या शब्दाच्या अर्थाविषयीं मतभेद

डॉ. स्टीव्हन्सन व डॉ. भगवानलाल हे दोन अभ्यासक गृहस्थ 'महारठि' याचा अर्थ 'मोठा योद्धा' व 'महारठिनी' याचा अर्थ वीरपत्नी असा करतात. पण याच्याशीं विरोध दाखवून रा. काणे असें दाखवितात कीं, त्यांनीं लावलेल्या अर्थाना पुष्कळ विरोध आहे. पहिली गोष्ट ही कीं, असल्या लहान अर्पणपत्रिकेंत कोणालाहि 'महारथी' म्हणण्याचें प्रयोजन नाहीं. बरें, आतांपर्यंत उपलब्ध असलेले अनेक शिलालेख जर आपण लक्ष्यपूर्वक वाचले तर असें आढळून येईल कीं, दान करणाऱ्या गृहस्थाचें नांव, गांव, त्याचा मानमरातब, धंदा, कूळ व त्याचा इतर लोकांशीं असलेला संबंध याशिवाय कांहींहि नसतें. या दृष्टीनें पाहतां 'महारठि' चा अर्थ महारठांत राहणारा वा त्या जातीचा असा करणें अधिक संयुक्तिक व योग्य आहे. (उदाहरणार्थः महारठ कोसिक) पुनः 'महारठि' हा शब्द ज्या नांवाच्या पाठीमागें लावलेला आहे, ते सर्व-जण या मोठ्या मानास योग्य होते, असें म्हणण्यास आधार नाहीं. उलट त्यांतील पुष्कळ युद्धास अननुरूप पेशाचेच होतें, असें दिसतें. असेंहि दिसून येईल कीं, वरील सर्व शिलालेखांतून दान करणाऱ्याच्या नांवाच्या

पाठीमागें बहुतेक त्याचें रहाण्याचें ठिकाण पंचमी विभक्तींत घातलेलें असतें, किंवा त्यांच्या नांवाबरोबर एकादा सन्मानदर्शक शब्द असतो. रा. काणे यांचा आक्षेप **महारठि** शब्द आलेल्या सर्व ठिकाणीं संयुक्तिक वाटत नाहीं, तरीं तो महत्त्वाचा आहे.

'महाराष्ट्र' हा शब्द इसवी सनानंतर ५०० वर्षांनीं उपयोगांत आला, असें गृहित धरून **महारठि** या शब्दाचा निराळाच अर्थ लावला पाहिजे, असा अनेकांचा आग्रह आहे. हे लोक **महाराष्ट्र** हा देशशब्द या नात्यानें खिस्ती शक ५०० पूर्वी नव्हता ही गृहीत गोष्टच आक्षेपणीय आहे, हें विसरतात.

महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति. महार जातीचा संबंध महाराष्ट्राशीं लावण्याबद्दल पाश्चात्य ग्रंथकारांचा आग्रह आणि देशी ग्रंथकारांचा विरोध.

हिंदूंतील **महार** या अस्पृश्य जातीवरून **महाराष्ट्र** हें नांव पडलें असावें अशा तऱ्हेचा अर्थ मोल्स्वर्थसाहेबांनीं आपल्या मराठी शब्दकोशांत सांगितला आहे. याच अर्थाची पुनरावृत्ति जॉन विल्सन यांनींहि केली. (इंडियन ॲन्टिकेटी ग्रंथ ३, पृष्ठ २२१) आपल्या अर्थाच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं 'गांव तेथें महारवाडा आहे' या म्हणीचा आधार सांगून गुर्जर–राष्ट्र, सौराष्ट्र वा सौर–राष्ट्र (शूरांचें राष्ट्र) या शब्दाशीं तुलना केली आहे; या विद्वानांची अशी समजूत आहे कीं, आजच्या महाराष्ट्राचे मूळचे रहिवाशी म्हणजेच महार. त्यांना उत्तरेकडील लोकांनीं जिंकिलें व त्यांनीं **महार** या मूळ जातीवरून या प्रदेशाला **महाराष्ट्र** असें नांव दिलें. मोल्स्वर्थ व विल्सन यांचें मत आजच्या महाराष्ट्रीयांस रुचकर वाटत नाहीं, यांत शंका नाहीं. तथापि या कल्पनेस जे आक्षेप भांडारकर काणे वगैरे मंडळींनीं घेतले आहेत तेहि समाधानकारक नाहींत.

महाराष्ट्र हा महारांचा देश, ही कल्पना वरील मराठी म्हणीवरून कशी सुचते असें रा. काणे चौकसतात. त्यांना उत्तर असें कीं, ती म्हण महारांच्या वसतीच्या व्यापकतेची सूचक आहे. जेथें अगोदर वसती असतें तिच्या शेजारींच नवीन वसती आहे. जेथें अगोदर वसती असते, तिच्या शेजारींच नवीन वसती येते आणि नवीन वर्ग जेता असला म्हणजे आपली वस्ती हा मुख्यग्राम समजतो. आणि जुनी वसती त्या गांवच्या 'नेटिव्ह कार्टर्स' समजतो, ही गोष्ट आजही दिसत आहे. त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील वसाहतीची स्थिती झालेली आहे. प्रत्येक ठिकाणीं गांव तिथें महारवाडा आहे व तो महारवाड्याच्या शेजारीं वसलेला आहे व त्यामुळें 'जेथें गांव तिथें महारवाडा' या तऱ्हेची म्हण स्वाभाविक आहे. महारांचा महाराष्ट्राशीं संबंध जोडण्यासाठीं जे प्रयत्न झाले आहेत त्यांतील कित्येक दूरान्वयाचे व कांहीं इतिहासाशीं पारखे असणारांचे झाले आहेत. आणि त्यांच्या प्रयत्नांतील दोषांमुळेंच 'महार' शब्दाचा महाराष्ट्राशीं संबंध असावा ही कल्पना बऱ्याच लोकांना हास्यास्पद झाली आहे.

महारांचा संबंध महाराष्ट्राशीं असावा ही कल्पना खोडून काढण्यासाठीं गस्टाव्ह आपर्ट या खुळ्या लेखकाचें मत रा. काणे यांनीं अवतरलें आहे; आपर्टसाहेब महार व मल्ल यांचा संबंध जोडतो व महाराष्ट्राला 'मल्लराष्ट्र' म्हणत, असें सांगतो. पुढें म्हणतो कीं, 'मल्ल व मारा एकच. मारा हें मार किंवा म्हार म्हणून प्रसिद्ध आहेत. म्हार म्हणूनच महार हा शब्द झाला व हे दोन्ही शब्द मराठींत आजसुद्धां प्रचारांत आहेत. म्हणूनच मल्लराष्ट्र व महाराष्ट्र हें दोन्ही शब्द उपयोगांत होते. पाहिला शब्द उपयोगांत येईनासा झाला व पुढें महारांचा पाडाव झाल्यानें महाराष्ट्राचा व त्यांचा संबंध विस्मृत होऊन महाराष्ट्राचा **मोठें राज्य** असा अर्थ निघाला. मल्लांचा व महारांचा देश हें नांव नाहींसें झालें.' (भारतवर्षांतील मूळचे रहिवाशी १८९३ पा. २२ टीप) यापेक्षां

उथळ उतारा सांपडणें शक्य नाहीं. या तऱ्हेनें रा. काणे यांनीं ह्या लेखकाच्या मताची थोडक्यांत संभावना केली आहे.

डॉ. आपर्ट ह्या कल्पनेच्या भराऱ्या मारणाऱ्या आणि लक्ष्य देण्यास निरुपयोगी अशा लेखकाचें जादा विधान खोडलें म्हणजे मूळ विधान खोडलें असें होत नाहीं. रा. काणे पृच्छा करतात– महाराष्ट्रांत महारांचे राज्य होतें याविषयीं डॉ. आपर्टनीं एखादा तरी लेख पुढें आणला आहे काय? भाषाशास्त्रांतील कोणत्या नियमानुसार त्यांनीं मल्ल व म्हार यांचा संबंध जोडला? **मल्ल** हें आजच्या महाराष्ट्रांत रहात होतें, हें दाखविण्यास त्यांनीं कोणत्या जुन्या संस्कृत ग्रंथाचा आधार सांगितला आहे. **आपण मूळचे रहिवासी** असें महार म्हणतात. केवळ त्यावर विश्वास ठेवून **महाराष्ट्र** हें रा. काणे यांनीं प्रतिपक्षावर हल्ला केला आहे. मल्लांशीं असंबंध सिद्ध करण्यापुरती रा. काणे यांची टीका ग्राह्य आहे. पण महारांचें नेतृत्व सिद्ध करण्यास त्यांनीं केलेलें आव्हान स्विकारणें अनवश्य आहे.

महारांचें नांव देशास मिळालें, या विधानास महारांच्या हीन स्थितीचा पुरावा अपकर्षक होत नाहीं.

एखाद्या विशिष्ट लोकांचें अगर जातीचें नांव देशाला पडलें असलें तरी ते लोक त्या देशाचे जेते होते, असें मुळींच होत नाहीं आणि त्यामुळें महारांच्या नेतृत्वास प्रमाण काय असें रा. काणे. पृच्छा करतात. पण हें प्रमाण दाखविण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. उलटपक्षीं जित लोकांचेंच नांव देशास जेत्यांकडून दिलें जातें. हिंदुस्थान हें नांव शेजाऱ्यांनींच हिंदुस्थानला दिलें व तेच इराणी व अफगाण शेजारी पुढें जेते झाले. अमेरिकेमध्यें आज जीं अनेक संस्थानांची नांवें आहेत, ती रेड इंडियन लोकांच्या जातीची नांवें आहेत.उदाहरणार्थ डाकोटा. '**डाकोटा**' या नांवाची एक जात होती किंवा राष्ट्र होतें. त्यावरून **डाकोटा** हें नांव या संस्थानांस

पडलें. अमेरिकेंतील संस्थाननामांखेरीज अनेक स्थलनामें रेड इंडियन जातीचींच आहेत. उदाहरणार्थ, केयूगा, कननडैग्वा वगैरे ज्या देशांत जे लोक प्रमुख असतील किंवा बऱ्याच जमावानें असतील, त्या लोकांचें नांव देशाला पडतें. जेता परका असला तरी तो पुढें तेथील लोकांचाच अग्रणी होतो. संस्कृत वैय्याकरण लोकनामच राजास आहे, असा नियम सांगत आहेत. आंध्र म्हणजे आंध्र जातीचे लोक किंवा आंध्राचा राजा. एवंच महार लोकांचें राज्य तें **महार राज्य** होय. **महाराज्य,** भोज्य असे शब्द ब्राह्मणांत येऊन गेलेच आहेत. महाराज्य म्हणजे महारांचे राज्य; म्हणजे महाराष्ट्र व भोज्य म्हणजे भोजांचें राज्य, असा अर्थ घ्यावयास मला अजून हरकत दिसत नाहीं. संवयीमुळें भोई, कोळी हीं राष्ट्रस्वरूपी जातीचीं नांवें धंद्याचीं नांवें आहेत, अशी बऱ्याच लोकांची समजूत झाली आहे. कोळी या शब्दाचा अर्थ मासे पकडणारे असा होत नाहीं किंवा भोई याचा अर्थ पालखीवाहक असाही होत नाहीं.

महाराष्ट्र हें नांव केव्हां पडलें याचा शोध करतां करतां आपणांस वररुचीच्या काळापूर्वींपर्यंत गेलें पाहिजे. त्या काळांत येथील लोक आपणांस महार म्हणवीत नसतील कशावरून? त्यावेळेस प्रथम महारांची वस्ती असणें व मागाहून भोयांची वसती असणें हा अत्यंत शक्य असा इतिहास वाटतो, महारांखेरीज सर्व महाराष्ट्रभर पसरलेली अशी दुसरी जातच प्राचीनकाळीं नसावी. आज मराठ्यांची जात जरी महाराष्ट्रभर आढळतें, तरी ही जात मूळतः भिन्नवंशीय असून नुकतीच कोठें एकजीव होऊं लागली आहे. 'महारठ' किंवा 'मराठे' हें नांव पुण्याच्या आसपासच्या लेखांत सांपडतें. परंतु या नांवाची व्याप्ति जुन्या काळांत थोडी होती.

मराठे या नांवाची व्यापकता कशी वाढत गेली व आजसुद्धां कशी वाढत आहे, याचे वर्णन अन्यत्र केलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें

म्हटलें म्हणजे असें सांगतां येईल कीं, **महारठी** या नांवाचा एक केंद्रिभूत वर्ग अत्यंत प्राचीनकाळीं म्हणजे शातवाहन कालीं होता, यांत शंका नाहीं. तथापि कुणबी जाती आपणांस पेशानें **कुणबी** (कुटुंबी–प्रतिष्ठित गृहस्थ) म्हणवीत. **महाराष्ट्र** हें कधींच राष्ट्रनाम नसल्यामुळें सर्व कुणबी लोकांनां **महारठ्ठ** म्हणवून घेण्याचा काळ आला नाहीं. सर्व कुणब्यांनीं मराठा म्हणवून घेण्याची चळवळ अलिकडील आहे. **मराठा** हा आतां जातिविषयकच शब्द बनत असून त्याला राजकीय स्वरूप नाहीं. अशा काळाची कल्पना करा कीं, ज्या काळांत महारांचींच वस्ती होती अशा वेळेस भोंवतालचे लोक त्या प्रदेशास काय म्हणणार? अर्थात् **महारांचेंच राष्ट्र** म्हणणार, हें उघड आहे. **महार** हें त्यावेळेस कुटुंबी ऊर्फ कुणबी हें नांव धारण न कारितां हलिक हें नांव धारण करीत असले पाहिजेत. त्यावेळचा सर्व **जानपद वर्ग महारच** असावा. महारांचें सामाजिक स्थित्यंतर शातवाहनोत्तरकाळीं झालें असावें. जे हलिक असतील ते महारच असावेत, ही शक्यता आहे. यासंबंधाचें विवेचन पुढें येणारच आहे. सध्यां एवढें म्हणणें प्राप्त आहे कीं, महारांचें राष्ट्र किंवा महार आणि रठ्ठ हें स्पष्टीकरण नाकारण्यास किंवा विक्षिप्त ठरविण्यास कोणताही महत्वाचा पुरावा अजून झालेला नाहीं. महार आणि रठ्ठ यांच्या संयोगानें झालेल्या शब्दाचें संस्कृतीकरण झाल्यानंतर शब्दाचें अर्थांतर होऊं लागावें यांत नवल नाहीं. **महारांचें राष्ट्र** स्पष्टीकरण कांहीं भोळ्या मंडळीस रुचकर वाटत नाहीं तरी तेवढ्यावरून महारांचा देश शब्दांशीं संबंध असिद्ध होत नाहीं.

महार, मिहिर आणि मैत्रक यांचा असंबंध

रा. काणे हें मिहिर व म्हार यांचा एकमेकांशीं संबंध नाहीं, असें दाखविण्यासाठीं जें लिहितात तें स्वीकारण्याजोगें आहे. महारांना चांगली स्थिती होती हें दाखविण्यासाठीं **महारांचें राष्ट्र** या स्पष्टीकरणाच्या

अभिमान्यांनीं विनाकारण ज्या बाष्कळ कल्पना उत्पन्न केल्या त्यापैकींच मिहीर आणि म्हार यांच्या संबंधाचा आहे. आणि तें मत खोडण्यास रा. काणे यांनीं शब्द खर्च केलें आहेत.

महारांचे मिहिर व मैत्रिक लोकांशी सबंध जोडणारे विद्वान् आहेत, ते मिहिरांच्या गुजराथेंतील विजयी कारकीर्दीचा पुरावा देऊन महाराष्ट्र विजय सिद्ध करूं पाहातात. मिहिर हे लोक हूण जातीचेच घटक होत. त्यांनीं तोरमाण, व मिहिरकूल यांच्या आधिपत्यकाळीं काठेवाडांत वल्लभीच्या गुप्तानां पराजित केलें, व नंतर सेनापती भट्टारकानें त्याच्याशीं सामना दिला. एवढाच ऐतिहासिक पुरावा पुढें आणतात. रा. काणे मिहिराचे गुजराथेंतील विजय मान्य करून त्यावरून महाराष्ट्र विजय सिद्ध होत नाहीं, असें दाखवितात. आणि **महाराष्ट्र** हें नांव त्याच्या नांवांवरून पडणें शक्य नाहीं, असें आपलें मत देतात. मिहिर व मैत्रक लोकांनीं सिंध, राजपुताना व काठेवाड वगैरे प्रांत काबीज केलें याला पुरावा असला तरीं ते लोक महाराष्ट्रांतही आले होतें. असें कोठेंच उल्लेख नाहींत. शिवाय महार हे इतकें उत्तरकालीन असून जर मैत्रकासारखें जेते होते तर ते पुढें समाजांत हीन स्थितीला कसें पोंचलें, हे आपणास दिसत नाहीं. अशा तऱ्हेची टीका करून रा. पांडुरंगपंत सांगतात कीं, **महाराष्ट्र** हें नांव अगोदरच्याच काळांत पडलें त्या अर्थीं महारांचा व मैत्रकांचा संबंध जोडून त्यांच्यावरून **महाराष्ट्र** हें नांव पडलें, हें मत अग्राह्य ठरविण्यास जास्ती कारणें दाखविण्याची गरजच नाहीं. तोरमाण व मिहिरकूल यांच्या हाताखालीं हूण लोकांनीं गुप्तराजाशीं इ. सनानंतर पांचव्या शतकांच्या उत्तरार्धांत लढाई दिली. पण त्याच सुमारास रचल्या गेलेल्या महावंशांत **महारट्ठ** नांवाच्या प्रदेशाचें नांव आलें आहे, हें आपणांस माहित आहे. तोरमाणाच्या अधिपत्याखालीं जेव्हा हूण लोक स्कंधगुप्ताशीं लढत होते, त्याचवेळीं **महाराष्ट्र** हें नांव प्रचारांत होतेंच.

मिहिरांवरून महाराष्ट्र हें नांव निघालें नाहीं, हें रा. काणे यांचें मत ग्राह्य धरूनही महारांचा महाराष्ट्राशीं शब्दोत्पादक संबंध नाकारतां येत

नाहीं. रा. काणे आणखी एक आक्षेप आणतात कीं, दक्षिणेंतील स्वाऱ्यांच्यावेळीं औदिच्यानीं **महारावरून महाराष्ट्र** हें नांव दिलें, हें खरें धरल्यास विंध्याद्रिच्या दक्षिणेकडील प्रदेशावरील उल्लेखांत (प्राचीन) महाराष्ट्राचें नांव आल्यावांचून राहिलें नसतें. पण त्या ऐवजीं **अश्मक** व **दक्षिणापथ** हीं नांवें येतात याला उत्तर एवढेंच कीं, **महाराष्ट्र** हा शब्द **दक्षिणापथ** या शब्दांइतकाच जुना आहे. आणि वररुचीच्या काळीं त्या शब्दाचें अस्तित्व होतें व ज्या कारणामुळें **महाराष्ट्र** हें नांव निर्माण झालें तें कारण म्हणजे **महारांकडून देशाची वसाहत !** हें नांव वररुचीच्या पूर्वीं अनेक शतकें उत्पन्न झालें होतें. अर्थात् इतक्या जुन्या काळचें वाङ्मयच अस्तित्वांत नाहीं. त्यामुळें **महाराष्ट्र** शब्दाच्या जन्मास कारण असलेल्या महारांच्या आगमनासाठीं प्रमाण मागणाऱ्यास **कथं स लक्ष्य प्रभवो भविष्यति,** असेंच उत्तर द्यावें लागेल.

महारांचें प्राचीनत्व आणि त्यांचें नाग, हलिक आणि राष्ट्रिक यांशीं नातें

महाराष्ट्र हा शब्द वररुचीच्या म्हणजे कात्यायनाच्या कालाच्या पूर्वींचा असल्यामुळें त्याचा उगम पहावयाचा झाल्यास बुद्धाच्या पूर्वीच्या काळाची सामाजिक व राजकीय स्थिती लक्षांत आणून त्यावर विचार केला पाहिजे. पण त्या काळाचीं इतिहास साधनें या प्रश्नावर प्रकाश पाडीत नाहींत. त्या काळांच्या इतिहासाचीं साधनें कोणतीं ? असें विचारलें असतां तीनचार साधनांचा उल्लेख करतां येईल. प्राचीनतम वाङ्मयांतील प्राचीनतम आठवणी या काळाच्या इतिहासास साधनीभूत होतील. महाराष्ट्रांतील अत्यंत प्राचीन वाङ्मय म्हणजे **हालांची सप्तशती** होय. तीवरून असें दिसतें कीं, त्यावेळेस प्रमुख जानपद हलिक होतें. गोदातट व विंध्यपर्वत हे दोन्ही प्रदेश वाङ्मयांत येत होते. प्राकृत हें नांव भाषेला अधिक प्रिय होतें. या वाङ्मयांत रठ्ठांचा

कुठेंच उल्लेख होत नाहीं व महारांचाही येत नाहीं. म्हणजे महाराष्ट्र शब्दाचा इतिहास शोधणारास तो सातशें गाथांचा संग्रह फारशी मदत करीत नाहीं. वाङ्मयाशिवाय दुसरें साधन म्हटलें म्हणजे त्याकाळची भाषा. तिचा सामाजिक इतिहासास पुष्कळच उपयोग होतो. पण जुनी मानववंशशास्त्रीय माहिती देण्याइतका महाराष्ट्रीय व इतर प्राकृतांचा अभ्यास वाढलेला नाहीं प्राचीन काळचें साहित्य जेव्हां उपलब्ध नसतें तेव्हां त्या काळचें सातत्य आज ज्या परंपरांत आहे त्या परंपराच्या आजच्या प्रतिनिधीची तपासणी अवश्य होतें. त्या काळच्या लोकांचा आजपर्यंत आलेला वंश याच दृष्टीनें अभ्यासार्ह आहे. त्या दृष्टीनें जातींचें इतिहास महत्वाचे आहेत. पण तें अजून जाति–महत्व–स्थापकांच्या तडाख्यांतून सुटून ऐतिहासिकांच्या कक्षेंत आले नाहींत. अनेक जातींचें सातत्य पांच सहाशें वर्षंपर्यंत अभ्यासतां येतें. पण अधिक पाठीमागें जातां येत नाहीं. भाषेच्या दृष्टीनें पाहतां सर्वांचीच भाषा स्थित्यंतर पावली आहे. **महार** हें इतर जातींप्रमाणें मराठी भाषा बोलणारे आहेत. आणि या दृष्टीनें महारांचें भाषा सातत्य बिघडलें आहे, असें म्हणतां येत नाहीं. **ज्या काळांत महाराष्ट्री ही भाषा होती ती भाषा बोलणारे लोक हे महारच असतील या कल्पनेस बाधक असा पुरावा नाहीं.** महाराष्ट्रीची मराठी कशी व केव्हां झाली हें अजून आपणांस सांगतां येत नाहीं. मराठी चालुक्योत्तर काळीं झाली, असें अर्वाचीन मत आहे. तथापि महाराष्ट्री व मराठी यांच्या दरम्यान अपभ्रंश होता. त्याचा काल कोणता त्याच्या मर्यादा निश्चित नाहींत. पैशाचीचें देखील थोडेसें आक्रमण झालें असेल आणि त्यामुळें प्रतिष्ठित महाराष्ट्री भाषा नष्ट होऊन शातवाहनाच्या काळांत अपभ्रंश भाषेचा उदय झाला असेल अशी शंका उपस्थित होते, व ती होण्याचें कारण शातवाहनांच्या काळीं अपभ्रशांचें अस्तित्व होतें, अशी साक्ष बहत्कथा देत आहे, हें होय.

औदीच्या घराण्याशीं बरींच राजघराणीं संबंध लावतात. तथापि रजपूतांचीं आडनांवें मराठ्यांप्रमाणें महारांतही आढळतात. महारांमध्यें कुलपरंपरा कमी अबाधित राहिली असल्यामुळें आज विधान करणें कठीण जाईल. तथापि एवढें म्हणतां येईल कीं, **महाराष्ट्रांतील अत्यंत प्राचीन लोकांचे वंशज महार असावेत आणि त्यांचा नागांशीं संबंध त्या प्राचीनतेचा द्योतक असावा.** जेत्यांनीं नागास जिंकलें असे उल्लेख वारंवार दिसतात. पुराणांतील नागांचीं कुलनामें महारांत आडनांवें या रूपानें शिल्लक आहेत असें राजवाडे यांनीं **कोकण** व **नागलोक** या इतिहास संग्रहांतील लेखांत दाखविलें आहेच. एवंच अत्यंत प्राचीन वसाहत नागांची म्हणजे महारांची असल्यास **महाराष्ट्र** म्हणजे **महारांचें राष्ट्र** या प्रकाराच्या व्युत्पत्तीस आधिक बळ येईल. यांत शंका नाहीं. महारांची वस्ती अत्यंत जुनी आहे. व नाग म्हणून उल्लेखिलेल्या लोकांचे तेच प्रतिनिधि आहेत.

वर उल्लेखिलेल्या अनेक मतांची येथें केवळ मांडणी केली आहे. त्यांची ग्राह्याग्राह्यता पुढें तपासली आहेच.

महारांचें महाराष्ट्र असें म्हणणें नाकारणारे लेखक आहेत, त्यांत कै. रामकृष्ण भांडारकरांचा समावेश होतो. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, **राष्ट्रिक उर्फ रट्ट** नांवानें प्रसिद्ध असे लोक होते. राष्ट्रिक तेच **रट्ट** व त्यांचेच संस्कृत रूप राष्ट्रिक! **रट्ट** या जातीचें लोकच पुरातन काळापासून दाक्षिणापथाच्या (दक्षिणेच्या) राजकारणांत सर्वापेक्षां जास्ती दृग्गोचर होतात व चालुक्यांच्या उदयापूर्वी त्यांच्या जातींतील एक पोट-जात राष्ट्रकूट या नांवांखालीं या देशावर राज्य करीत होती. तदनंतर रट्ट या नांवाचें राजे बेळगांव जिल्ह्यांतील सुगंधवर्ती किंवा सौंदती येथें राज्य करीत होते. भोजराजे विदर्भ व दक्षिणेच्या इतर भागावर अधिकार चालवीत हें आपणांस माहित आहे........ज्याप्रमाणें भोज आपणांला महाभोज असें म्हणत, त्याप्रमाणेंच हें राष्ट्रिक, रट्टि, रठी अथवा रट्ट लोक

स्वतःला महारट्टि अथवा महारठ असें म्हणत. म्हणून त्यांच्या देशाला **महारठ** असें नांव पडलें. यालाच संस्कृतमध्यें **महाराष्ट्र** म्हणतात." डॉ. भांडारकरांचें म्हणणें स्विकारलें नाहीं. तथापि येथें दिलें आहे. जेव्हां अत्यंत प्राचीन नांवाची उत्पत्ति संशयातींत नसतें तेव्हां भिन्न स्पष्टीकरणें वाचकांपुढें ठेवणें अवश्य आहे. म्हणूनच भांडारकरांचें स्पष्टीकरण दिलें आहे. यावर रा. काणे यांचें भाष्य पुढीलप्रमाणें आहे.

महाराष्ट्र, दंडकारण्य आणि महाकांतर यांचा संबंध

महाराष्ट्र शब्दाची उपपात्ति लावतांना त्याचा राष्ट्रकूटांशीं संबंध जोडण्याची जी पद्धति आहे त्यांतील मुख्य दोष रा. काणे यांच्या मतें कालदूरता मूलक असंबंधाचा होय. राष्ट्रकूट राजे इ. सनानंतर ८०० वर्षांनीं उदयास आलें व **महाराष्ट्र** हा शब्द त्यांच्या आगमनापूर्वीं निदान तीनशें वर्षें लोकांत प्रचलित होता. इ० सनापूर्वीं २०० शें वर्षांपासून ते इ० सनानंतर ७५० वर्षेंपर्यंत अनुक्रमानें नागभृत्य (किंवा शातवाहन) वाकाटक आणि चालुक्यांनीं दक्षिणेंत राज्य केलें मग उत्तरकालीनांचें नांव देशाला कसें चिकटेल? अशी रा. काणे यांच्या मनांतील शंका आहे. महाराष्ट्राशीं राष्ट्रिकांचा संबंध नाकारणारी जी यांची टीका आहे ती आमच्या मतें चुकीची आहे. कारण राष्ट्रिकांचा संबंध देशनामाशीं जोडण्यास राष्ट्रकूटाचें राजत्व आवश्यक नाहीं. केवळ जमावानें अस्तित्व पुरें आहे. शिवाय वरूची पूर्वकाळीं राष्ट्रिक ही राष्ट्रस्वरूप जाति असावी.

डॉ. भांडारकरांचें म्हणणें चूक ठरवून रा. काणे आपलें मत मांडतांना तें दर्शनीय अर्थाचेंच समर्थन करीत आहेत असें दिसतें. तें म्हणतात महाराष्ट्र म्हणजे **मोठें अथवा विस्तृत राष्ट्र**! हाच दर्शनी अर्थ इतिहास सूचक आहे, असें समजून पुढें सांगतात कीं, इतिहासाला ज्ञात असलेल्या अगदीं प्राचीन काळापासून दक्षिणेंत महाकांतार,

दंडकारण्य, अथवा महाटवी हें एक सुप्रसिद्ध अरण्य होतें. हळूहळू या अरण्याचा नाश होऊन तेथें वसाहत झाली. शहरें, गांवें वाढलीं व त्याला **महाराष्ट्र** हें नांव मिळालें. तसेंच त्याला महाकांतारही म्हणत. **रामाच्या वनवासाची माहिती** (Geography of Rama's Exile) या लेखांत पार्गिटर म्हणतो कीं बुंदेलखंडापासून कृष्णेपर्यंत पसरलेल्या सर्व प्रदेशाला **दण्डक** हें नांव लावीत." रा. काणे यावरून अनुमान काढतात कीं, (वनपर्व अ. ८५–४०–४२) मध्याहिंदुस्थान व तापी पयोष्णीं, या नद्यांच्यामध्यें कुठेंतरीं दण्डकारण्य असावें. रामायणांत दण्डकारण्यांतील वैजयन्त या शहराचा पुढील प्रमाणें उल्लेख आला आहे

दिशामास्थाय कैकेयी दक्षिणादण्डकान् प्रति ।
वैजयन्तमिति ख्यातं पुरं यत्र तिमिध्वजः

अयोध्याकांड ९–१२

मार्कंडेय पुराणांत दण्डकाबरोबर विदर्भाचाही उल्लेख आहे. (विदर्भः दण्डकैः सह) हुएनसँग आपल्या प्रवासवृत्तांत कांत्रकिंनापुलो (कोकणपूर) मोहोलाच (महाराष्ट्र) या मधील एका अरण्याबद्दल लिहितो.

महाराष्ट्र हें नांव शातवाहनाच्या राज्यविस्तारामुळें मिळालें या विधानाची अग्राह्यता

दण्डकारण्याचें राष्ट्र पुनः कधीं व कोणामुळें झालें याविषयीं रा. काणे आपली समजूत अशी दाखवितात कीं, बहुत करून आंध्रभृत्य किंवा सातवाहनाच्या वेळींच महाराष्ट्र असें म्हटलें असावें. (म्हणजे इ. सना पूर्वी २०० वर्षें, सातवाहन राज्य बलाढ्य होतें व त्यांचें राज्य कारोमंडल किनाऱ्यापासून पश्चिमेस घाटापर्यंत पसरलें होतें. आणि ज्या अर्थी सातवाहनाचें राज्य म्हणजे राष्ट्र मोठें होतें, त्याअर्थी त्यास **महा** हा शब्द लावणें स्वाभाविकपणेंच आहे. आणि ज्याअर्थीं त्याची राजधानी मराठी प्रदेशांत म्हणजे पैठण येथें होती, त्याअर्थी तोच प्रदेश **मोठें राज्य**

म्हणजे **मोठें राष्ट्र** बनला. **महा** हा शब्द **महाकान्तार** शद्बाकडून वारसा हक्कानें आला आणि जेथें अटवी होती तेथें एका राजकुलाच्या अवधींत मोठें राष्ट्र स्थापन होऊन तें मोठें असल्यामुळें **महा** शब्द तसाच चालू राहिला, असा रा. काणे यांचा आशय दिसतो.

पुष्कळ देशांचें अंत्यपद नेहमीं **राष्ट्र** हा शब्द आहे. पण आद्यपद मात्र नीटसें कळत नाहीं, असे जे दुसरे शब्द आहेत त्यांच्याशीं संगती लावण्याचाही प्रयत्न रा. काणे यांनीं केला आहे. ते सांगतात, फार प्राचीन काळापासून काठेवाडाला **सौराष्ट्र** हें नांव आहे. बौद्धायनस्मृति पाणिनीयशिक्षा व रामायण यांतून सौराष्ट्रासंबंधीं थोडाबहुत उल्लेख आहे. दशरथ राजाचे सहकारी सौराष्ट्र होते, असें सांगितलें आहे.—**प्राचीनान्सिन्धुसौवीरान् सौराष्ट्रयांश्च पार्थिवान्** (१, १३, २७) **द्राविडाः सिन्धु सौवीराः सौराष्ट्रा दक्षिणापथाः** (२, १०, ३०) वगैरे— रा. काणे कबूल करतात कीं, या देशाला सुराष्ट्र असें नामाविधान कां पडलें हें कांहीं आपणांस माहित नाहीं. हा प्रदेश सुपीक व संपन्न म्हणून हें नांव पडलें असावें अशा तऱ्हेची एक कल्पना मांडून सुराष्ट्र शब्द सिद्ध करूं पहातात. आणि महाराष्ट्राच्या शब्दसिद्धीसाठीं दुसरीही एक कल्पना रा. काणे मांडतात. ती अशी कीं, राष्ट्र या शब्दानें ज्या देशाचें अगर राष्ट्राचें वर्णन केलें आहे, अशीं अनेक राष्ट्रें महाराष्ट्रांत समाविष्ट होत होतीं. प्राचीन ग्रंथांतून कर्मराष्ट्र, गोपराष्ट्र, देवराष्ट्र आणि पूर्वराष्ट्र देश दिले आहेत. पण ते कुठें होते तें समजत नाहीं. (चालुक्याच्या दानपत्रांत **कर्मराष्ट्र** असें आलें आहे. गोपराष्ट्र म्हणजे नाशिक असावें. **देवराष्ट्र** हा दक्षिणापथाचा भाग असें लिहिलें. Cor. Ins. I, Vol III P 7) अरंग येथील श्रीमहाजयराजाच्या ताम्रलेखांत पूर्वराष्ट्र हें नांव आढळतें. वरील उल्लेखावरून असें दिसतें कीं, दाक्षिणापथांत हे सर्व प्रदेश मोडत असत. वरील विवेचनावरून **महाराष्ट्र** शब्दाचा मूळ अर्थ **विस्तृत प्रदेश** असाच रा. काणे यांच्यामतें आहे.

महार शब्दाचा महाराष्ट्राशीं संबंध नाकारणाऱ्या दोन मतांचे विवरण झालें. **महाराष्ट्र** शब्दाची आमच्या मताची उपपत्ति देण्यापूर्वी **सौराष्ट्र** या शब्दाच्या स्पष्टीकरणासंबंधानें एक मत व्यक्त करण्याचें धैर्य करतों. सौराष्ट्र याची व्युत्पत्ति **सौर+राष्ट्र** अशी देतां येईल. सौरधर्माचा एकाकाळीं काठेवाडांत फारच प्रचार होता. सुराष्ट्र हा शब्द **सौराष्ट्र** याच्या अगोदरचा समजण्यास बिलकूल आधार नाहीं. **सोरठ** हा प्राकृत शब्द असून त्याचें प्रथम संस्कृतीकरण सौराष्ट्र होऊन नंतर **सुराष्ट्र** या शब्दाची निर्मिती झाली असावी.

महाराष्ट्र या शब्दासंबंधानें वर दिलेली कै. भांडारकर व रा. काणे यांची स्पष्टीकरणें आम्ही मान्य करीत नाहीं. प्रस्तुत वादांत दोन प्रश्न उपस्थित होतात.

एक प्रश्न **महा** या पूर्वभागासंबंधानें आहे, तर दुसरा **राष्ट्र** किंवा **रठ्ठ** यांच्या अर्थासंबंधानें आहे.

महारांचे राष्ट्र या स्पष्टीकरणाला कांहीं मंडळी असा आक्षेप घेतील कीं. राष्ट्र हें सामान्यनाम नाहीं, लोकांचे विशेषनाम आहे. त्याअर्थी **महा** हा शब्द विशेषणार्थी घेतला पाहिजे.

उलटपक्षीं, **राष्ट्र** या शब्दांत विशिष्ट जातींना नाकारणारी रा. काणे यांच्यासारखे लेखक **राष्ट्र**शब्द विशिष्टलोकविषयक न धरतां केवळ सामान्यनाम धरूनही **महा** या शब्दाचा जातिविषयक अर्थ घेण्याचें नाकारतात व तो शब्द विशेषणच धरतात. **महा** शब्दाचें विशेषणत्व नाकारणारा वर्ग थोडा आहे. **राष्ट्र** शब्दात्मक संयुक्त शब्द अनेक होते आणि त्या सर्वांचा महाराष्ट्रांत अंतर्भाव होतो, असें एक वर्ग मानतो आहे. तर राष्ट्र हा शब्द सामान्यनाम नसून विशिष्टनाम आहे. **राष्ट्रिक** नांवाचे लोक होते त्यांसच **रठ्ठ** किंवा रिस्टिक म्हणत असत त्यापासून देशनाम निघाले असावें असें मानणारा दुसरा पक्ष आहे. या दुसऱ्या

पक्षास देखील **महा** हा शब्द जातीवाचक किंवा लोकवाचक शब्दापासून निघाला असेल, ही कल्पना मान्य नाहीं. तथापि **महार** शब्दाशीं **महाराष्ट्र** न जोडण्याला इच्छेपेक्षां निराळें कारण त्यांना दाखवितां आलें नाहीं, राष्ट्र हा शब्द विशेषनाम धरल्यास **महा** हा शब्द विशेषणच केला पाहिजे असें नाहीं. उलट दोन्ही विशेषनामें संयुक्त होऊन देशनाम तयार होऊं शकतें. अनेक राष्ट्रनामें दोन राष्ट्रांच्या किंवा जातींच्या नांवांच्या संयोगापासून निघालीं आहेत. उदाहरणार्थ, **कुरु–पांचाळ**, **कुथ–कैशिक**, **सिंधुसौवीर** इत्यादि नांवें सांगतां येतील. **महाराष्ट्राच्या महार आणि रट्ठ या दोन राष्ट्रजातींच्या नामांचा संयोग होऊन महारट्ठ असें रूप तयार झालें आणि त्याचें पुढें महाराष्ट्रिक–कालांतरानें महाराष्ट्र असें संस्कृतीकरण झालें, असें माझें याविषयीं अंतिम विधान आहे. रट्ठ** या नांवाचे लोक चोहोंकडे हिंडत होते व त्यांच्या भ्रमणांचीं स्मारकें चोहोंकडे आहेत. **सौराष्ट्र** उर्फ **सोरठ**, आरट्ठ वगैरे उदाहरणें रट्ठांच्या भ्रमणांची स्मारकें आहेत. **रट्ठ** या शब्दाचा अर्थ **राष्ट्र** किंवा **लोक** असाच असावा. पुष्कळ राष्ट्रांचीं विशेषनामें तपासून पाहिलीं तर असें दिसून येईल कीं, त्या नामांचा मूळचा अर्थ त्या जातीच्या भाषेंत लोक असाच आहे.

डॉ. केतकरांच्या या एवढ्या विस्तृत चर्चेतून महारांच्या प्राचीन इतिहासावर झगझगीत प्रकाश पडतो. त्यांच्या या सर्वंकष विवेचनांतून **महार** ही महाराष्ट्राची अतिप्राचीन जमात आहे हें सिद्ध झालें असलें तरी महारांच्या जेत्यांनीं त्यांच्यावर अतिनिष्ठुर गुलामगिरी कां लादली आणि ब्राह्मणकालांतील हिंदुसमाजरचनेंत त्यांना चातुर्वर्ण्यांत घुसडून देऊन कायमचें अस्पृश्य कां बनविलें, याचें उत्तर मिळत नाहीं.

महार शब्दांत ' डोंगा ' अर्थ नाहीं

महारांचें प्राचीनत्व सिद्ध करणारा प्राचीन इतिहास उपलब्ध नसतांही डॉ. केतकरांसारख्या खंद्या इतिहास संशोधकानें इतिहासाला लागणाऱ्या

साधनांच्या आधारें महारांचें प्राचीनत्व बऱ्याच अंशानें सिद्ध केलें आहे. त्याच्या संशोधनांला पुरातन ताम्रमट किंवा ग्रंथाधार फारसें मिळालें नाहींत हें खरें. पण प्रज्ञावंत इतिहाससंशोधक त्यावरच अडून बसूं शकत नाहीं. त्याच्या अंगीं अनुभवसिद्ध बुद्धीची परिपक्वता असते. त्या बुद्धीची तेजस्वी ज्योत तो भूतकालाच्या गडद अंधारांत फेंकतो आणि आपल्या परिमाणांच्या आधारें सिद्धांत मांडतो. त्या सिद्धांताला पुनः पुनः कसाला लावतो. आणि म्हणूनच सर्वसाधारण बुद्धीला न पटणारा पण सत्य असलेला इतिहास तो जगापुढें मांडतो. महारांचा प्राचीन इतिहास याच पद्धतीनें त्यांनीं सांगितला आहे. तो खराखुरा आहे याबद्दल शंकाच नाहीं.

कै. राजारामशास्त्री भागवत, राजवाडे आदि इतिहासकारांनीं त्यांच्या सिद्धांताला पोषक अशींच मतें व्यक्त केलीं आहेत. डॉ. भांडारकरां-सारखा वर्णश्रेष्ठत्वाचा दंभत्याग करूं न शकणारा इतिहासकार या सिद्धांताला विरोध करूं शकतो. **गांव तेथें महारवाडा** या नांवावरून महाराष्ट्राचा प्राचीन वारस महार आहे हें सिद्ध होऊं शकत नाहीं; असें त्यांना वाटतें. १९१२ सालीं डिप्रेस्ड क्लास मिशनच्या पुणें येथील अधिवेशनांत सर रामकृष्ण भांडारकर यांनीं **महार** शब्दाची एक निराळीच व्युत्पत्ति सांगितली. मार्कंडेय पुराणांतील एक श्लोक दाखवून त्यांतील **मृतहर** शब्दावरून **महार** शब्दाचा जन्म झाला असें निवेदन केलें. एखाद्या जमातीच्या सांस्कृतिक इतिहासाचा इतका उथळ अर्थ करण्याचें सर भांडारकरांनीं केवळ हेतुपुरस्सर धाडस केलें असेंच म्हणावें लागेल. उच्चारसादृशापेक्षां यांत महार आणि मृतहर याचा सुतराम संबंध दिसत नाहीं. प्रा. रॉबर्टसन यांच्या शब्दांतच या विधानाचें खंडन करावयाचें झालें तर 'याचें उत्तर अगदीं सोपें आहे.' महारां-सारख्या अनेकविध पोट जातींच्या आणि व्यवसायांच्या लोकांना सर्वत्र सर्वसकट **मृतहर** म्हणून संबोधणारा शब्द कसा लागू पडतो ? शिवाय संस्कृत भाषेचा ज्यांना गंध नव्हता अशा लोकांना संस्कृत नामाभिधान

असणें कसें शक्य आहे ? अखिल भारताची संस्कृत ही भाषा होती. असें असतांना केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित असलेल्या जमातीला **मृतहर** ह्या संस्कृत शब्दानें कां संबोधिले जावें ? फक्त महाराष्ट्रांतच कांहीं जनावरें मरत नव्हती. मृत जनावरें वाहून नेण्याचें काम सर्वंत्रच हिंदुस्थानभर चाले. मग भारतभर मृतहरांना महार कां म्हटलें गेलें नाहीं ? प्राचीन काळापासून महाराचें अस्तित्व मराठी भाषेच्या परिसरांतच आहे. डॉ. भांडारकरांचा हा शोध (?) मान्य केला तर संस्कृत भाषा मराठी भाषेमागून आली असें म्हणावें लागेल. असें म्हणणें जितकें विक्षिप्त तितकेंच **मृतहर म्हणजे महार म्हणणें विक्षिप्त** आहे. शिवाय **महार** हा शब्द पंजाब व राजपुताना इकडे प्रचारांत आहे. पंजाब आणि राजपुताना येथील गुजरांना बहुमानार्थी **महार, मिहीर** किंवा **मिर** असें संबोधिलें जातें. महाराना अस्पृश्यत्वानें प्राप्त झालेल्या कनिष्ट स्थितीमुळें महारांचा महाराष्ट्राशीं संबंध लावावयाचा नाहीं हाच एक हेतु या विरोधभूमिकेंत आहे. प्रांजल इतिहासकारांनीं तरी याप्रकारच्या कलुषित वृत्तींचा आपल्या इतिहाससंशोधनांत उपयोग करूं नये.

महारांनां दुर्दशा कां प्राप्त झाली ?

महारांना ही कनिष्ठ स्थिती कशी प्राप्त झाली हें समजून घेणें त्यासाठीं इष्ट आहे.

महाराष्ट्राचा प्राचीन वसाहतकाल निश्चित करणाऱ्या संशोधकांनीं महारांनां आद्यवसाहत करणाऱ्या टोळ्यामध्यें समाविष्ठ केलें आहे. हा वसाहतकाल ख्रिस्तपूर्व १५०० पासून ख्रिस्तपूर्व ५५३ पर्यंतचा आहे, असें डॉ. केतकरानीं गृहीत धरलें आहे. इराणचा पौराणिक काल आणि भारताचा उत्तर पौराणिक काल या कालाला समांतर असा काल होय. या कालांत महाराष्ट्रांत खालील इतिहास घटनांचा क्रम लागतो.

१ कालाच्या आरंभीं कुरुयुद्ध, त्या कालांतील राज्यें.

(१) क्राथ राज्य—राजा देवावृध, (२) वैदर्भराज्य—राजा भीष्मक (३) अश्मक राज्य (४) कुंतल राजा चंद्रहास (५) गोकर्ण आणि अपरांत येथील वसाहती (६) विदर्भावर मागध जरासंधाचें सार्वभौमत्व.

२ **महार आणि रट्ट यांच्या वसाहती.**

३ शकांचा प्रवेश.

४ नरसिंह या प्रतिष्ठान भूपतीची बलाढ्यता आणि त्याजकडून मागधराज विक्रमादित्य याचा पराभव.

५ निदान एकदां शकनिर्दालन.

६ कलिंगराजाची कांहीं काल महाराष्ट्रावर सत्ता.

७ कुंडिनपुर राज्य; तेथील राजघराण्यांतील विवाहांचें सामाजिक व धर्मशास्त्रीय महत्व.

८ नागपूरचा नरसिंह.

९ उदयनकालीं महाराष्ट्राची बलाढ्यता.

१० महाराष्ट्री भाषेचें निदान खि. पू. १००० पासून स्वतंत्र अस्तित्व.

११ वररुचीचें प्राकृत व्याकरण.

वरील कालक्रमावरून भारताच्या उत्तरपुराणकालांत महाराष्ट्रांत महार व रट्ट यांच्या वसाहती प्रस्थापित झाल्या. महारांनीं प्रथम वसाहत केलेल्या महाराष्ट्रांत रट्टादि इतर टोळ्यांनीं प्रवेश करून त्यांना जित केलें व जेत्यांची वसाहत निर्माण केली. वसाहत करणारे नेहमींच मूळ वसाहत करणाऱ्यांच्या आजुबाजूस वसाहत करतात हा सिद्धांत **गांव तेथें महारवाडा** याला पोषक आहे. त्यावरूनच महारवाड्याशेजारीं किंवा सभोंवतालीं इतरांनीं वसाहत करून त्यांच्यावर जेतेंपणाचा अधिकार

चालविला असला पाहिजे असें निक्षून सांगतां येतें. मात्र **महार** मूळ रहिवाशी आहेत ही गोष्ट त्यांना नाकारतां आली नाहीं. याचा पुरावा म्हणजेच महार 'मूळपुरुष' आहे किंवा '**गांवचा थोरला**' आहे असें म्हटलें जातें. त्याच्या प्रथम वसाहत करण्याच्या हक्कामुळेंच जमीनजुमल्यासंबंधींचें त्याचें ज्ञान हें निर्णायक स्वरूपाचें मानलें गेलें व तत्कालीन व त्यापुढेंहि त्याला गांवगाड्यांत अधिक महत्वाचें स्थान मिळालें.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, **महाराष्ट्रांतील महार** जात ही अस्पृश्यांतील प्रमुख जात आहे. महाराष्ट्रांत अस्पृश्य जातींपैकीं फक्त महार जातीची संख्या इतर कोणत्याहि जातीपेक्षां मोठी आहे. महार लोक व हिंदु यांचे संबंध कसे होते हें दर्शविणाऱ्या घटना नमूद करण्यासारख्या आहेत.

१. दरेक गांवांत महारांची वस्ती आहे.

२. महाराष्ट्रांतील दरेक गांवांभोंवतीं कुसव (तट) असून महार लोक कुसवाबाहेर रहातात.

३. महार लोक आळीपाळीनें आणि गांवकऱ्यांच्या वतीनें गांवाची राखण करतात.

४. हिंदु गांवकऱ्यांकडून महार लोक बावन्न हक्क वसूल करतात. या बावन्न हक्कांपैकीं खालील हक्क महत्वाचे आहेत.

(१) गांवकऱ्यांकडून अन्न उकळणें.

(२) सुगीच्यावेळीं प्रत्येक गांवकऱ्यांकडून धान्य गोळा करणें.

(३) गांवकऱ्यांची मेलेला जनावरें ताब्यांत घेणें.

महार लोकांच्या वरील हक्कावरून जो पुरावा सांपडतो तो अर्थातच महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे. अशीच स्थिती हिंदुस्थानांतील इतर भागांत सांपडते काय याचे अजून संशोधन व्हावयाचें आहे. तथापि

अस्पृश्य जमातींतील महार जातीची परिस्थिती ही देशभर वैशिष्ट्यपूर्ण समजली तर कांहीं गोष्टी मान्य कराव्या लागतील त्या अशाः—

" हिंदुस्थानामध्यें असा एक काल होता कीं, परटोळींतील पराजीत लोक हे स्थानिक टोळीवाल्याकडे आले. त्यांनीं स्थानिक टोळीवाल्यांशीं सौदा केला. आणि त्या सौद्यांतील अटीनुसार गांवांबाहेर जित लोकांना राहूं देण्यांत आलें. त्यांच्यावर (पराजितांवर) कामें लादण्यांत आलीं आणि कामाच्या मोबदल्यांत त्यांना कांहीं हक्क देण्यांत आले "

" महार लोक गांवकऱ्यांकडून ५२ हक्क परंपरेनें वसूल करीत आहेत. बेदरच्या मुसलमान राजांचें शिक्कामोर्तब महारांच्या ५२ हक्कांवर आहे. याचा अर्थ हे हक्क **फार पुरातन काळापासून चालत आले असलें पाहिजेत. आणि बेदरच्या मुसलमान राजानीं त्यांच्या अमदानींत केवळ राजमान्य केलें असावेत**, हें यावरून स्पष्ट होतें."

" हा पुरावा तोकडा असला तरीं अस्पृश्य लोक हें अगदीं सुरवातीपासूनच गांवांबाहेर राहात होतें, ह्या सिद्धांताला त्यांचेकडून बरीच पुष्टी मिळते. त्यांना हांकलून देण्यांत आलें नव्हतें, अगर ते अस्पृश्य मानल्यामुळें ते गांवाबाहेर राहात नव्हते. सुरवातीपासूनच अस्पृश्य लोक गांवाहेर राहात होतें, कारण ते **जित** होतें. शिवाय ते स्थानिक टोळींवाल्यांहून भिन्न टोळींपैकीं होते."

डॉ. बाबासाहेबांचें हें अनुमान डॉ. केतकर यांच्या सिद्धांताहून भिन्न असलें तरी **महार जमात प्राचीन आहे**, हें दोन्ही मतांचें सूत्र आहे. गेल्या दीड हजार वर्षांच्या संस्कृती–संघर्षांत आणि नव्या टोळयांच्या वसाहत–प्रस्तरणांत महारांचा मूळ इतिहास आणि संस्कृती नष्ट झाली असली तरीं त्यांचें इतरांहूनचें भिन्नत्व किंवा स्वतंत्र स्वरूप कांहीं अवशेषांवरून सिद्ध होण्यासारखें आहे. महार हे मूळ नागवंशीय होते हें दाखविणारी त्यांच्या नांवांपुढील '**नाक**' ही उपाधि होय. **नाग** याचें

हें अपभ्रष्ट रूपच होय. हा **नाक** प्रत्यय महाराष्ट्रांतील इतर कुठल्याही प्राचीन जमातींच्या व्यक्तिनामापुढें लाविला जात नाहीं. फक्त तो महारांच्या नांवांपुढेंच लावला जातो. याचा एक स्पष्ट अर्थ असा आहे कीं, **महार** हा इतरांहून कांहीं भिन्न आहे, हें ओळखतां यावें म्हणूनच जेत्यानीं आपल्या हुकमतीचें कायम स्वरूपी चिन्ह त्याच्या नांवाला उपाधीरूपानें चिकटविलें. पेशवांईत अस्पृश्यतेचा कडेलोट दर्शविणारें त्यांच्या गळ्यांतील मडकें आणि पुच्छस्थानीं खटारा हें जें महारानां हिणवण्यासाठीं किंवा त्यांचें भिन्नत्व राखण्यासाठीं अमानुष असें 'चिन्ह' पाहिलें तद्वतच **नाक** हा प्रत्यय त्याच्या तत्कालीन कमी लेखलेल्या नागवंशांचें चिन्हही महारांनीं आपल्या नांवापुढें वाहिलें. महारांना मिळालेली प्राचीनकालीन आणि पेशवे-कालीन वागणूक समानहेतू दर्शविणारी आहे. व म्हणूनच तें **नागवंशीय** आहेत हें निश्चित् होय. पराजितांना कमीपणा आणणें हें जेत्यांचें नेहमींचेंच कार्य होय. अर्थात आपल्याहून वेगळे मानल्याखेरीज हा कमींपणा कसा यावा? **नाक** या त्याच्या मूळ वंशनामानें त्यांना वगळून टाकून त्यांचें अस्तित्व वेगळे गखलें व त्या वगळलेल्या—पराभवानें जखमी झालेल्या या पराक्रमी जमातीवर पुढें ब्राह्मणीकालांत अस्पृश्यत्वाचा शिक्का मारला. पराभूततेच्या जखमेवर सामाजिक हीनत्वाचें मीठ चोळलें गेलें.

ब्राह्मणकालीन हिंदुधर्माच्या चातुर्वर्णामध्यें नवीन एका पंचमवर्णाची भर घलून महारादि जमातींना त्यांत सामावून घेतलें तें केवळ त्यांना या चातुर्वर्ण्य चक्रांत गुरफटवून अधिकाधिक हीन बनविण्याच्या सूड बुद्धीनेंच होय. प्रतिपक्षाकडून जेवढा अधिक प्रतिकार होतो, तेवढीच जेत्याची सूड भावना प्रखर होते, हा सर्वसामान्य नियम आहे. या सूड भावनेनेंच महार पंचमवर्णांत समाविष्ठ झाला. पण त्याचें पुरातन ज्ञान उत्तर कालीन वसाहतकारांनां राज्य कारभाराच्या दृष्टीनें उपयुक्त

होतें. आफ्रिकेचा अंतर्गत भाग शोधण्यासाठीं तेथील मूळ निग्रोचा जसा गोऱ्या संशोधकांनीं उपयोग केला तद्वतच महारांना गांवगाड्यामध्यें स्थान देऊन त्यांच्यावर गुलामगिरीचेंच जोखड ठेवलें. कोंकणातील महार हा प्राचीन संस्कृतीशीं आणि रितीरिवाजाशीं निकटवर्ती आहे. त्याचें सातत्य बऱ्याच प्रमाणांत टिकून आहे. इतर ठिकाणच्या महारांच्या मानानें त्यांच्यातील प्राचीन अवशेष उत्कटतेनें दिसतात. याचें मुख्य कारण म्हणजे नव्या आक्रमणापासून आणि मध्ययुगीन अनेक संस्कृतींच्या भेसळीपासून तो बराच दूर होता. मात्र मध्यमहाराष्ट्रांतील महार मूळ संस्कृतीपासून अधिक पारखा झाला. वस्तुतः महार संस्कृतीचें खरें केंद्र नागपूर होय. नागपूर हें नामाभिधान नागवंशीय प्राचीन सत्तेचें दर्शक आहे. आणि या सभोंवतालची महारांची वस्तीही इतर ठिकाणांच्या मानानें अधिक आहे.

महार लोक प्राचीन नागलोकच होय हा राजवाड्यांचा मुद्दा गृहित धरला तर त्यांची संस्कृति उच्च कोटीची होती, हें डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनींही प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात, ऋग्वेदांमध्यें जो नागांचा उल्लेख आढळतो. त्यावरून नागलोक कोणी वन्य किंवा असंस्कृत लोक नव्हतें, हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. नाग लोक आणि हिंदुस्थानांतील राजघराणीं यांचे संबंध विवाहादि बंधनांनीं घनिष्ट होते, असा इतिहासाचा पुरावा आहे........नाग लोकांची संस्कृती उच्च पातळीची होती, एवढेंच नव्हे तर हिंदुस्थांतील बऱ्याच मुलुखांवर त्यांनीं राज्य केलें होतें. महाराष्ट्र हें नाग लोकांचें स्थान आहे हें कुणी सांगावयास नको.

'जोहार' हें महारांचेंच अग्निदिव्य!

पुरातन महार हें मोठें अभिमानी होतें. याबद्दल निराळा पुरावा शोधावयास नको. त्यांचा स्वाभिमान इतका तळपता आहे कीं, दीडहजार

वर्षांच्या दास्यचक्रांत चिरडला जाऊनही महार आपला स्वाभिमान विसरूं शकला नाहीं. आजच्या हिंदुसमाजाचा तो घटक मानला जात असूनही इतर हिंदूहून तो भिन्न दिसूं शकतो. डॉ. बाबासाहेबांच्या अस्पृश्योद्धाराच्या चळवळींत अहमहमिकेनें भाग घेऊन आपली ही अभिमानी वृत्ति त्यानें प्रज्वलित केली आहे. त्यांच्या ह्या वृत्तींचें प्राचीन परंपरेंतून अवशेष राहिलेलें द्योतक म्हणजे **जोहार** ! हा एक प्रभावशाली शब्द आज महारांतच आहे व तो त्यांच्या पुरातन महार संस्कृतींशी निगडीत आहे. रजपुत स्त्रीयांनीं शत्रूच्या हातीं सांपडण्यापूर्वी केलेला '**जोहार**' किंवा अग्निदिव्य हे त्याचे मध्ययुगीन पडसाद आहेत. पण त्याचे पहिले ध्वनि उमटले ते महार संस्कृतीच्या काळांत होय ! जेव्हां आक्रमक टोळ्यांनीं महारांच्या राष्ट्रांवर किंवा वसाहतींवर पहिलें आक्रमण केलें तेव्हां या पराक्रमी महारांनीं त्याला निकरानें तोंड दिलें असलें पाहिजे. महार बाहुबलशालि आहे किंवा योद्धा आहे हें आजही पाहायला मिळतें. त्याचें हें क्षात्रतेज त्यावेळींही त्यांच्या बाहूंत होतें हें इतिहासाच्या कागदी पुराव्यांनीं सिद्ध करण्याची जरूरी नाहीं. या पराक्रमी महारांनीं आक्रमकांशीं रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढा दिला असला पाहिजे. नाहींतर त्यांनीं आपलें सर्वस्व कसें बरें गमावलें असेल ? **राष्ट्र** म्हणून वावरणारी ही जमात यकःश्चित महारवाड्यापुरती कशी बरें मर्यादित होईल ? मराठ्यांचा इतिहास आम्हांला सांगतो कीं, पेशव्यांनीं पानिपतावर लाखों मराठ्यांचे बळी दिले. मराठेशाही भारतभर टिकविण्यासाठीं पानिपतावर ज्याप्रमाणें मराठ्यांच्या एका पिढीनें आपले देह धारातीर्थी ठेवले तद्वतच महारांनीं महाराष्ट्रांत अनेक 'पानिपत' रणांगणें लढवलीं होतीं हें खास अनुमान निघतें. मराठ्यांची एक पिढी पानिपतावर कामास आली पण महारांच्या राष्ट्रांत संपूर्ण महार-राष्ट्र नष्ट झालें, व अशा वेळीं पुरुषांचा होणारा निःपात पाहून त्यांच्या स्त्रीयांनीं शत्रूंच्या हातीं लागण्यापूर्वी जपानी 'हाराकिरी' प्रमाणें **जोहार** करून अग्नि दिव्य केलें.

ही घटना घडली नसेल तर महार–राष्ट्र नष्ट होण्यास दुसरें कारण काय असेल बरें ? महारांचें हें अग्निदिव्य उरल्या सुरल्या महारांच्या काळजांत कायमचें स्मृतिरूप झालें. त्यांनीं एकमेकांनां **जोहार** या शब्दानें अभिवादन करण्याचा प्रघात सुरू केला. सुरू केला म्हणण्याऐवजीं तसें म्हणणें अगदीं उत्स्फुर्त होतें. आणि आजही **जोहार** हा प्रघात **त्यांच्यात** चालू आहे. **जोहार** मागील ही घटना इतक्या उत्कट स्वरुपाची नसती तर कालाच्या प्रस्तरांतून हा शद्ब टिकून राहिला नसता. तो जर महार–संस्कृतींतून चालत आलेला नसता तर त्यांचा इतर जमातीतही सर्रास उपयोग केला गेला असल्याचा पुरावा उपलब्ध झाला असता.

जोहार शब्दाचें महात्म्य याहूनहि भिन्न आहे. **महार** संस्कृतीनंतर ज्या टोळ्यांनीं महाराष्ट्रांत वसाहती केल्या त्यांच्यांत परस्पर अभिवादनाचा प्रघात नसावा. किंबहुना त्यांच्या संस्कृतींत त्यांच्या भावनांना भिडणारा असा प्रसंग किंवा तद्वाचक शब्द नव्हता कीं तो अभिवादन शिरस्ता होऊं शकला असता. अशा प्रकारच्या अभिवादनाच्या शब्दाचें रहस्य शिवाजीच्या कारकीर्दींत रामदासाना जाणवलें. अभिवादन प्रघात फक्त महारांत होता. त्यांच्या सांस्कृतिक ऐक्याची जोपासना करणारा तो प्राचीन दुवा होता, हें रामदासांना पटलें. मोंगलांसारख्या म्लेंच्छांत हा प्रघात असून शिवशाही प्रस्थापित करणाऱ्या मराठ्यांत नसावा ही मोठीच उणीव त्यांच्या लक्षांत आली असावी. आणि म्हणूनच आपलें प्रियतम देवनाम **राम** याचा अभिवादनासाठीं त्यांनीं उपयोग केला, व **रामराम** हें अभिवादन महाराष्ट्रांत रूढ झालें. त्याच्या या अभिवादन शद्बांतील जोरामुळेंच त्यांचें हें **मराठा तितुकाचि मेळवावा** तत्वज्ञान शिवाजीनें उचलून धरलें. पण रामदासाच्या या नवसुधारणेस महारांनीं जुमानलें नाहीं त्यांनीं आपला जोहाराचा प्रघात चालूच ठेवला. ' **मी महारीचा महार जोहार मायबाप जोहार** ! या आपल्या जीर्ण प्रथेला तो स्वाभिमानानें

चिकटून राहिला. गुलामाचा स्वाभिमान जगाला कसा दिसावा! महारांचा हा स्वाभिमान इतिहासकारांना कधींच दिसला नाहीं. **जोहार** शब्दांत केवढा आवेश आणि जोष होता हें यावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. महार ऐक्याची ही घोषणा आजपर्यंत कायम राहिली. महारांनीं '**रामराम**' म्हणूं नये '**जोहार**'च म्हणून अभिवादन करावें असा खोटा भास स्पृश्यांनीं केल्याचें सांगण्यांत येतें. पण तें खोटें आहे. महारानींच 'जोहार' सोडला नाहीं. उलट त्यांनीं **रामराम** प्रघात आपल्यांत शिरूं दिला नाहीं हा महार संस्कृतीचा त्यांच्यावरील विजय होता. पण तो त्यांनीं स्पष्ट कबूल केला नाहीं. सनातन्यांनीं जर महारांवर तसा निर्बंध टाकला असें मानलें तर **मराठा तितुकाचि मेळवावा** हें रामदासांचें प्रचार–तत्वज्ञान महारांपुरतें तरीं निष्फळ ठरलें, असें कबूल करावें लागेल.

मराठी भाषा बोलणारी महार ही एक प्राचीन जमात

मराठी भाषेचें मूळ व शुद्ध स्वरूप अंशतः ज्या जमातींत राहिलें आहे त्यामध्यें महारांचा समावेश अपरोक्षपणें मराठी संशोधन मंडळानें केला आहे; त्यांच्या बोलीचा नमुना हा प्राचीन मराठी बोलीचा अवशेषात्मक नमुना म्हणून श्री. कृ. अ मोडक यांनीं संग्रह केलेल्या **दापोली व खेड तालुक्यांतील महाराची बोली** या मराठी संशोधन पत्रिकेंतील लेखांत दिला आहे. त्यांतील एक नमुना पहा.

मायबापाची ल्येक लाडकी, ल्येक लाडकी ॥ धृ ॥
म्येरू दण्डाचा बनवूनशान् चौरांग् ।
घेत्ला बसायाला खरोखर, ध्येतला बसायाला खरोखर–१
धर्तरीचा करून वज्रिका, घेतली आंग घांसायाला ।
सात् समिंदरांचा पानी आटलां, येक्या आंगोलीला–२
आकास्याची बनवून सारी, ध्येत्ली नेसायाला ।
तरी ती पुरना प्येंचाला–३

धर्‌तरीची बन्‌वून् चोली ध्येतली आगांत् घालायाला ।
तरी ती पुर्‌ना गांठीला—४
चंदार् सुर्याचा पाडुनशान् काजाळ् भरलं डोल्यांत ।
तरी तां पुरना येक्या पाप्‌नींत—५
झाडा—झुडपाचे बन्‌वून् गोडें गुंपिले येनीला ।
पाताळ्—भवनांतील् स्येस नाग गुंपिला खोप्याला—६
इन्दार्—च्यापाची बनूवूनशानी नत् ।
घातली नाकांत् खरोखर, घातली नाकात् खरोखर—७

भाषेच्या दृष्टीनें त्यांचें प्राचीनत्व शोधणाऱ्या भाषा—शास्त्र विषयक संशोधकांस रत्नागिरी जिल्ह्यांतील महारांच्या बोलींत बरेच आधार आढळण्यासारखे आहे. शिवाय कोकणांत महारांच्या ज्या पूर्वापार जमिनी आहेत. या जमिनींच **महारकाठीं** या नांवानें प्रसिद्ध आहेत. मुसलमानांच्या आमदानींत मिळालेला बावन्न हक्कापैकीं बलुतें म्हणून चालत आलेली जमीन आणि **महारकाठीं** म्हणून वहिवाटींत असलेल्या जमिनी यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. मुसलमानांच्या अमदानींत जुन्या ग्रामरचनेंनुसार केवळ गांवांची सेवा करण्यासाठींच मिळणारीं बलुतीं हीं त्यांच्या गुलामगिरीचे वेतन होती. पण **महारकाठीं** हीं त्यांनीं स्वामित्व गाजविलेल्या मालकी हक्कानें चाललेल्या परंपरागत जमिनी होत. अशा जमिनींतून महारांचें एक आद्य देवस्थान स्थापीत झालेलें आहे. हा त्याचा सबळ पुरावा आहे. या देवस्थानाचें नांवसुद्धां **महारदेव** असें आहे. वस्तुतः ज्या महार शब्दाचा इतिहासकार काथ्याकूट करतात आणि मृतहर, मल्ल, महा, अरि इत्यादि विक्षिप्त शब्दाशीं बादरायण संबंध लावून त्याच्या उत्पत्तीची व्युपात्ति करतात तो महार शब्द **स्वयंभू** आहे, हें सिद्ध करणारा हा पुरावा होय! महार हें एका प्रभावशाली वंशाचें नांव आहे आणि तो वंश महाराष्ट्रभूमींत एकाकाळीं सत्तेनें आणि संस्कृतीनेंहि इतका प्रभावी झाला होता कीं, तो **महारदेव** या नांवास पात्र

झाला. कुठल्याहि जमातीच्या नांवाचें एखादें देवस्थान आहे कां ? **महार** मात्र देवस्थान रूप होणारी एक शासन शक्ती होऊन गेली व आज ती एका हीन जातीच्या रूपानें आपल्यांत नामशेष राहिली एवढा त्या शक्तीचा केविलवाणा ऱ्हास झाला.

महारांच्या संस्कृतींत दुसरी अधिक प्रकर्षानें दिसणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या आर्य लोकांहून भिन्न अशा देवता. उत्तरकालीन वसाहती आर्यांच्या होत्या असें इतिहासकार सांगतात. या आर्यसंस्कृतींतील इंद्रादि देवता महारांच्या देवतांहून भिन्न आहेत. त्यांच्या मनावर भूतांखेतांच्या कल्पनेची मोठी पकड आहे. कोणी यांना द्राविडी संस्कृतींतील देवदेवता मानतात. महार मरी आई, खंडोबा, जोतोबा, वेताळ, पांढरी, भादवी अशा देवतांची भक्तिभावानें पूजाअर्चा करतात. ब्राम्हणी धर्माचा जबरदस्त विळखा असतांना मूळ देवाधर्माच्या कल्पना आजपावेतों टिकवून ठेवणारी महार–संस्कृती खरोखरच प्राचीन काळीं प्रभावी संस्कृती असली पाहिजे याबद्दल शंका उरत नाहीं.

महार अस्पृश्य कसे व केव्हां बनले ?

महारांवर आक्रमण करणाऱ्या दुसऱ्या टोळ्यांनीं त्यांना गुलाम बनविलें. पण त्यांच्यावर अस्पृश्यत्व केव्हां लादलें ? हिंदुधर्मांतील अस्पृश्यतेचा उगम शोधून काढणें म्हणजे ऋषीचें कूळ शोधण्यासारखें आहे, असा कांहीं हिंदुधर्ममार्तंडांनीं सर्वांचा समज करून दिलेला आहे. ऋषीचें कूळ शोधून काढलें तर ऋषीच्या विद्वत्तेला कलंक लागण्याची भीती असते, तशी भीती यांच्या मनांत नसेल कशावरून ? अस्पृश्यतेंचें मूळ शोधून काढलें तर ती कुणीतरी त्यांच्यावर लादली आहे असें सिद्ध होईल आणि चातुर्वर्ण्य आणि जाती या ‘ परमेश्वरी ’ आहेत हा त्यांचा खोटा प्रचार उघडकीस येईल, हीच त्यांची खरी भीती आहे. कांहीं विद्वान संशोधकांनींही या भीतीमुळेंच याबाबतींत खरें संशोधन केलें नाहीं. हिंदुधर्मांत

अस्पृश्यता आणणारे कुणी होते, असें जर कुणी प्रतिपादन केलें तर ‘ हिंदुधर्मास हा कलंक ’ लावणाऱ्या नराधमांना आणि त्यांच्या पुरस्कर्त्यांना माना वर करून धर्मपंडितांचा आवेश आणतां आला नसता. आणि अस्पृश्य म्हणून चिरडले गेलेले बंड करून हिंदुधर्मांतून निघाले असते किंवा हिंदुधर्माला गाडून जेते झाले असते. त्यांनीं दुसरा धर्म प्रस्थापित केला असता. पण इतिहास संशोधकांच्या सावधगिरीमुळेंच हिंदुधर्म अजून बदनाम व्हावयाचा राहिला. तरीही कोंबडा झांकल्यानें थोडेंच उजाडायचें थांबणार ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं लिहिलेल्या आपल्या ‘ अस्पृश्य मूळचे कोण ? व ते अस्पृश्य कसे बनले ’ या ग्रंथांत अस्पृश्यतेची जन्मतारीख निश्चित केली आहे. ते म्हणतात “ हिंदुस्थानांत आलेला दुसरा चिनी प्रवासी युआन चँग हा होय. तो इ. स. ६२९ मध्यें आला. सोळा वर्षें हिंदुस्थानांत राहून त्यानें या देशांतील लोकांच्या चालिरीती आणि रूढी यांची व्यवस्थितपणे नोंद करून ठेविलीं आहे. हिंदुस्थानांतील शहरांबद्दल व सर्वसाधारण इमारतीबद्दल तो म्हणतोः—

“ शहरांभोंवतालच्या भींती उंच व रुंद आहेत तर रहदारीचे रस्ते अरुंद व निमुळते आहेत. मोठ्या हमरस्त्यावर दुकानें असून रस्त्यांच्या दोन्ही बाजूस उपहारगृहें आहेत. खाटीक, कोळी, झाडुवाले यांच्या वस्त्या ओळखतां याव्यात म्हणून त्या त्या वस्तीवर भिन्न भिन्न चिन्हें उभीं केलेलीं आहेत. त्यांना सक्तीनें शहराबाहेर ठेवलें आहे. त्यांना गांवांत जातांना डाव्या बाजूनें अंग चोरून व नरमाईनें जावें लागतें.”

“ या उताऱ्यावरून निश्चित् असा कोणताच सिद्धांत बांधतां येणार नाहीं. पण युआन् चंग यानें केलेलें वर्णन चांडाळ व्यतिरिक्त जातीचें आहे, ही गोष्ट महत्वाची आहे. त्यावरून त्याकाळीं अस्पृश्यता होती हें अगदीं स्पष्ट होत आहे.”

" यावरून इ. स. ६०० मध्यें अस्पृश्यता जन्मास आली होती हा सिद्धांत निघतो. उलट इ. स. २०० पर्यंत अस्पृश्यतेचें अस्तित्व देखील नव्हतें असें दिसून येतें."

" हाच अस्पृश्यतेच्या जन्माचा सर्वसाधारण काळ आहे. अस्पृश्यतेची अदमासें जन्मतारीख आपल्याला निश्चित् करतां येणें शक्य आहे काय? मला वाटतें आपण ती ठरवूं शकूं. अस्पृश्यतेचें मूळ गोमांस भक्षणांत आहे. गोमांस भक्षणबंदीपासूनच सुरवात धरली पाहिजे. म्हणजे ज्यावेळीं गोवध व गोमांस भक्षण यावर बंदी घालण्यांत आली त्याचवेळीं अस्पृश्यतेचा जन्म झाला, हें आपोआपच सिद्ध होत होतें. गोवध करणें हा गुन्हा आहे व गोमांस खाणें हें पाप आहे हें जेव्हां ठरविलें गेलें ती अस्पृश्यतेची जन्मतिथी होय! गोवध हा गुन्हा कधीं पासून ठरविण्यांत आला? मनुनें गोमांस भक्षणावर बंदी घातली नव्हती कीं, गोवधास गुन्हा मानलें नव्हतें. मग गोवध करणें गुन्हा कधींपासून समजण्यांत आला? डॉ. बी. आर्. भांडारकर म्हणतात कीं, गुप्त राजांनीं गोवधास देहान्त शासनाच्या गुन्ह्याचें रूप दिलें. तो काळ त्यांच्या म्हणण्याप्रमाणें इ. स. ४०० चा होता. तेव्हां इ. स. ४०० च्या आसपास अस्पृश्यतेचा जन्म झाला असला पाहिजे असें आत्मविश्वासानें आपण म्हणूं शकतों. हा काळ बौद्धधर्म व हिंदुधर्म यांच्या द्वंद्वाचा आहे. अर्थांतच या द्वंद्वांतूनच अस्पृश्यतेचा जन्म झाला."

हाच वर्ग वैदिक ब्राह्मणी धर्माचा द्वेष्टा होता.

वैदिक ब्राम्हणी हिंदुधर्माला कंटाळून बुद्धानें नवीन धर्माचा प्रचार व प्रसार केला हें सर्वश्रुतच आहे. विशेषतः हिंदुधर्मांतील यज्ञयागाच्या खुळ्या कल्पनेखालीं होणाऱ्या हत्येमुळें बुद्धाला आपला नवा धर्म प्रस्थापित करावा लागला हें एक प्रमुख कारण मानलें जातें. तरीही बुद्धाच्या या नव्या धर्माला आणि तत्वज्ञानाला पटकन् आत्मसात करून

घेणारा महाराष्ट्रांतही त्याकाळीं एक वर्ग होता. आर्य संस्कृतीचा त्यांच्या आचारविचारावर केवढा पगडा होता हा या ठिकाणीं चर्चेचा विषय नसला तरीं आर्यांच्या वैदिक धर्माचा द्वेष करणारा किंवा त्यांच्या धर्मामुळें गांजला जाणारा हा वर्ग होता. तो निरनिराळ्या जमातींचा बनला होता. इतिहासकारांच्यामतें हा काळ इ. सनापूर्वी ५०० पूर्वीचा होता. महाराष्ट्रांतील या पुरातन जमाती भ्रमण करणाऱ्या होत्या हें डॉ. केतकरांनीं सांगितलेंच आहे. डॉ. बाबासाहेबांनीं या भ्रमण जमातीचें विवरण आपल्या ग्रंथांत खालील प्रमाणें केलें आहे.

" पुरातन समाज हा फिरता समाज होता याबद्दल कोणालाही शंका नाहीं. परंतु पुरातन समाज हा त्यांच्या स्थलांतरांच्या प्रवृत्तीमुळें फिरत होता किंवा एखाद्या मानसिक स्वभावधर्मामुळें तो फिरत होता असेंहीं नाहीं. त्याचें कारण वेगळेंच आहे. पुरातन काळीं पशुधनाचाच प्रकार मान्य होता. पुरातन समाजाचें धनच (जनावरें) फिरत असल्यानें समाज फिरता राहिला होता. चाऱ्यासाठीं जनावरें एका रानांतून दुसऱ्या रानांत जात. तेव्हां जनावरांच्या धन—लोभामुळें पुरातन समाजही जनावर जाईल तिकडे जाई. मात्र ज्यावेळीं संपत्तींचा वेगळा प्रकार शोधून काढण्यांत आला त्यावेळीं हा पुरातन समाज स्थायिक बनला. हा संपत्तीचा वेगळा प्रकार म्हणजे जमीन. शेतीची आणि मशागतीची कला त्यांना अवगत झाली. त्यावेळीं हें स्थित्यंतर घडून आलें. जनावरांऐवजीं शेतीमध्यें संपत्तीचें रूपांतर झालें. याच बदलामुळें पुरातन समाज हा स्थायिक समाज बनला. "

महाराष्ट्राच्या प्राचीन म्हणून गणल्या गेलेल्या महार, भोई, कोळी या जमातीं अशा तऱ्हेनें स्थायिक झाल्या. परंतु या स्थायिक समाजाला बाहेरून येणाऱ्या दुसऱ्या टोळ्यांच्या आक्रमणाला सतत तोंड द्यावें लागलें. आणि अशा अनेक आक्रमणामुळें व त्यांच्या प्रभावी हल्ल्यामुळें

या मूळ वसाहत केलेल्या लोकांना विस्कटून टाकलें. त्याना पराभूत केलें व **जित** म्हणून वागविलें. डॉ. बाबासाहेब याच लोकांना **जित लोक** (Broken Men) म्हणतात. " पूर्वीच्या टोळ्या एकमेकांशीं संग्राम करीत हा संग्राम सतत चाले. परस्परांतील संग्रामाची ही गोष्ट त्यांच्या नित्याच्या जीवनांतील होऊन राहिली होती. टोळ्यांमधील लढ्यांत सर्वत्र पराभूत टोळया नामशेष होत असें नव्हे. कांहीं टोळ्यांना शरणागती पत्करावयास लावून हुसकावून देण्यांत येत असें. त्यामुळें पुष्कळ वेळां पराभूत टोळ्यांतील लोक सैरावैरा झाल्यानें विभागले जात. याचा परिणाम असा झाला कीं, पराभूत टोळ्यांतील लोक लहान लहान गटानें सांपडेल त्या दिशेनें भटकूं लागले. एका अर्थी ही **तरंगणारी** (Floating) लोकसंख्या होती असें म्हणावयास हरकत नाहीं.

बुद्धधर्मास कवटाळणारा पुरातन महार समाज

महाराष्ट्रांत अशा तऱ्हेनें तरंगलेला व त्याच स्थितींत अस्तित्वांत असलेला **महार** हा एक समाज आहे. व त्याचें अस्तित्व प्रत्येक गांवांत आहे. या समाजांतील लोकांनीं त्यावेळीं बुद्धाच्या धर्मक्रांतीला वाहून घेतलें. आणि बुद्धधर्माचा हिंदुस्थानभर प्रसार केला. त्यानंतर बुद्धधर्माला कांहीं शासनकर्त्यांचा आश्रय-राजाश्रय मिळाल्यानें हिंदुधर्म नामशेष होऊन बुद्धधर्म सर्वत्र फैलावला. यावरून एक गोष्ट निश्चितपणें सिद्ध झाली, ती ही कीं, महार ही पुरातन जमातही एकाकाळीं बौद्धधर्मीय होती. ती बौद्धधर्मीय होती म्हणूनच तिला अस्पृश्यत्व चिकटलें, हें डॉ. बाबासाहेबांच्याच शब्दांत सांगतां येईल.

" जित (Broken Men) बौद्धधर्मीय होते. आणि बौद्ध धर्मावर सनातनी ब्राम्हणी धर्मानें जेव्हां शिरजोरी केली तेव्हां त्यांनीं ब्राम्हणी धर्मांत येण्याचें अगत्य दाखविलें नाहीं. या गोष्टी मान्य केल्या तर ब्राम्हणी धर्म अपवित्र आहे असें अस्पृश्य कां मानतात

आणि ब्राम्हण पुरोहितांकडून आपलीं धार्मिक कार्यें कां करून घेत नाहींत आणि आपल्या वस्त्यांमध्यें प्रवेश देखील ते कां करूं देत नाहींत, याचें हें स्पष्ट उत्तर आहे. **जितांना ' अस्पृश्य लोक '** असें कां संबोधिलें गेलें याचेंही मुख्य कारण हेंच कीं ब्राम्हण लोक बुद्ध धर्माचे शत्रू होते. म्हणूनच अस्पृश्यांनीं ब्राम्हणांचा तिरस्कार केला. आणि **जित लोक** बौद्ध धर्म सोडायला तयार होईनात म्हणून त्यांच्यावर अस्पृश्यता लादण्यांत आली. यावरून असें अनुमान काढतां येतें कीं, बौद्ध धर्मीयांविरुद्ध ब्राम्हणांनीं जो तिरस्कार व द्वेष प्रसृत केला त्यामध्यें अस्पृश्यतेचें मूळ आहे. "

महारसुद्धां याचप्रकारें अस्पृश्य बनले.

आणखी एक सोज्वळ मत

महारांच्या प्राचीनत्वासंबंधीं ' पूजा ' या नियतकालिकांतील एका लेखांत महाराष्ट्राचे एक आधुनिक लेखक श्री. ग. त्र्य. माडखोलकर म्हणतात कीं, महाराष्ट्र समाजाच्या या चार घटक वर्गांपैकी अस्पृश्य हे सुमारें तीस टक्के असून त्यांत महार ही जात बहुसंख्य आहे. भिल्ल कातकरी, ठाकूर, गोंड, वार्ली वगैरे जंगली जातीप्रमाणें महार वगैरे अस्पृश्य हेही आदिवासी समजले जातात. या वन्य जाती आणि अस्पृश्य या दोन घटक समाजांतील फरक हा कीं, वन्यांना स्वतःची संस्कृति किंवा नागर जीवन नाहीं, तर अस्पृश्य हे बहिष्कृत असूनही त्यांच्या मानानें सुसंस्कृत आणि नागर गणले जावेत इतका त्यांचा बौद्धिक दर्जा चांगला आहे. त्यामुळेंच **गांवकींत आणि राजकींत अस्पृश्यांना म्हणजेच मुख्यतः महारांना मानाचें आणि मोक्याचें स्थान मिळालेलें दृष्टांस पडतें.**

महाराष्ट्रांतील मराठा—कुणबी बहुजन समाजाप्रमाणें महार हेही नागवंशीं आणि सोमवंशीं मानले जातात व त्याची आणि मराठा कुणबी

जातीचीं कांहीं आडनांवेंही सारखींच आहेत. आज त्यांचा इतिहास बऱ्हंशीं अज्ञात आहे पण त्यांच्यासंबंधीं जें थोडें बहुत संशोधन झालें आहे, त्याच्यावरून असा निष्कर्ष काढण्यांत येतो कीं अस्पृश्यांपैकीं **महार** ही महाराष्ट्रांतील आदिवासी **राष्ट्र – रूपी जमात** (National Clan) असून दक्षिणेंत आलेल्या आर्य, शक इत्यादि सुप्रगत समाजांनीं तिला पादाक्रांत करून आपलें दास बनविलें. पण जित आणि दास बनविल्यानंतरहि या जमातीच्या बुद्धिमत्ता, शौर्य आणिं इमानदारी या तीन गुणांमुळें तिला गांवगाड्यांत स्थान देणें त्रैवर्णिकांनां आवश्यक वाटलें........!

मानव–वंशशास्त्राचा आधार

मानववंशशास्त्राच्या आधारें महारांची सांस्कृतिक परंपरा पाहतां महारांचें स्थान हिंदुसमाजांत वरचें आहे, हेंहि आतां सिद्ध झालें आहे. अर्थात् अशा प्रकारचा सिद्धांत फार जपून मांडावा लागतो. व्हिस्काऊंट ब्राईस यांच्या मतें "गोंडस मत प्रतिपादन करण्याच्या मोहामुळें ऐतिहासिक संशोधनाच्या बहुतेक शास्त्रांवर त्याचा अनिष्ट परिणाम झाला आहे. मानवी वंशाची उपपत्ति लावणाऱ्या संशोधकांमध्यें तर ही प्रवृत्ति अधिक आहे. विविध मानवी वंशांची घडण अंधारमय इतिहासपूर्वकालांत झाली असल्यामुळें वंशशास्त्र हा विषयच मुळीं मूढ पण संमोहक वाटतो. साहजिकच या विषयाच्या अभ्यासकाला कांहीं प्रमेयें बसविण्याचा किंवा निर्णायक सिद्धांत मांडण्याचा मोह आवरत नाहीं. पण हे सिद्धांत ऐतिहासिक कसाला लावतां येत नाहींत, किंवा त्याचा गृहित पक्षही त्याला खंडन करतां येत नाहीं."

देशस्थ–चित्पावनांच्या रांगेंत महारांचें स्थान

वरील म्हणणें लक्षांत घेतां महारांचा वंशशास्त्र दृष्टया केलेला विचार बऱ्हंशीं तार्किक असला तरीं सत्याकडे झुकणारा आहे. सर हरबट रिझले

यांनीं आपल्या The People of India या पुस्तकांत भारतीयांचा वंश शास्त्र दृष्टया मोठा चिकित्सक अभ्यास करून आपलीं निरीक्षणें मांडलीं आहेत. त्यांत महारांची मापेंही नमूद केलीं आहेत. मराठी विभागांत खानेसुमारी अधिकारी म्हणून काम करणारे श्री. एन्थोवेन त्यांचे महारांसंबंधीचें निरीक्षणात्मक संशोधन पाहून थक्क झाले. खानेसुमारी अधिकारी या नात्यानें संशोधनात्मक लिहिलेल्या त्यांच्या '**मुंबई प्रांतांतील जाती आणि वन्यटोळ्या**' या ग्रंथांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, "सर रिझले यांनीं मराठीं लोकांची जीं मापें घेतलीं आहेत त्यानुसार हे लोक आशियांतील भटक्या टोळ्यांच्या (Scythic) वर्गांत मोडतात, असा त्यांचा एक वेळचा कयास होता. दक्षिण पठारावरील रुंद कपाळाचे लोक त्यांच्या पहाणींत आल्यामुळें त्यांचें हें मत झालें असावें. परंतु या प्रकारच्या प्रमाणपद्धतीनें **महाराष्ट्राचा ब्राम्हण आणि महार हे दोघेही एकाच वंशाचे** ठरूं लागल्यामुळें त्या प्रकारचें मत देतांना ह्या सिद्धांताचा खरेखोटेपणा याहूनही अधिक खात्रीच्या पुराव्यावर पडताळून पाहणें आवश्यक आहे." असें सांगून पुढें श्री. एन्थोवन म्हणतात, "डोक्याच्या ठेवणीनुसार पाडलेल्या पहिल्या वर्गांतच महारांचे स्थान खालच्या क्रमांत लागतें. मुंबई प्रांतांतील कनिष्ट मानलेल्या जातीची खालच्या क्रमानें कां होईना पण देशस्थ, चित्पावन ब्राह्मणांच्या वर्गांत वर्णी लागावी ही सोंवळ्या वंशशास्त्रज्ञांचा गोंधळ उडाविणारी गोष्ट नव्हे कां ? महारांचें वांशिक स्थान अशा अनपेक्षितपणें उच्चवर्णीयांच्या रांगेंत असावें, हें वर्णअहंकारी स्पृश्यांना कसें पटावें ? महार आणि कोळी प्राचीन काळच्या वैशिष्ठ्यपूर्ण जमाती आहेत हें अगदीं भक्कम पुराव्यांनीं सिद्ध झालें आहे. **वंशशास्त्राच्या संशोधनांत महारांची मापें ब्राह्मणांच्या जवळची किंवा देशस्थांहून उच्चतम आहेत**....रिझलेच्या संशोधन तक्त्यांवरून कांहीं निर्णायक सिद्धांत मांडावयाचा झाला तर मुंबईतील श्रेष्ठ आणि कनिष्ठ जाती

इतिहास परंपरा, चालिरिती आणि शरीररचना या सर्वदृष्टींनीं एकमेकांशीं जवळच्या आहेत." (मुंबई प्रांतांतील जाती आणि वन्यजमाती–ग्रंथ १ आवृत्ति पहिली)

वरील प्रकाराच्या प्रतिपादनामुळें पुण्याचे कर्मठ ब्राह्मण एन्थोवेन आणि रिझले साहेबांवर भडकले तर नवल नाहीं. पण सत्य कांहीं फार काळ लपवून ठेवतां येत नाहीं. संस्कृतीवर्धनाचा आणि सुसंस्कृतीचा मक्ता कांहीं ब्राह्मणांकडेच दिलेला नव्हता. **अखिल हिंदुसमाज विविध वंशांच्या रक्त मिश्रणानें झाला आहे,** हें खुद्द पंडित नेहरूंनीं आपल्या '**भारतशोध**' (Discovery of India) या ग्रंथांत सांगितले तें हिंदूनां किंवा स्वतःला उच्चवर्णीय समजणाऱ्या ब्राह्मणांना माहीत नाहीं काय? समाजशास्त्राचा सखोल अभ्यास केलेल्या महाराष्ट्रीय विदुषी डॉ. इरावती कर्वे आपल्या **मराठी लोकांची संस्कृति** या सविस्तर ग्रंथाचा शेवट करतांना म्हणतात, "कुळींच्या अभिमानामुळें व वतनदारीच्या अभिमाना॰ मुळ स्वयंसिद्धता व स्वातंत्र्य प्रियता हे दोन्ही गुण मराठ्यांत व त्यांच्या अनुकरणानें इतर मराठी जातींत दिसून येतात. प्रत्येक पाटील स्वतंत्र व आपल्या गांवचा राजा. त्याला शहाणपणा कोण शिकाविणार? तोच कित्ता इतर जातींनीं उचललेला आहें........आपल्या पेक्षां वरचढ असेल त्यापुढें नमावयाचें हें बाळकडू इतर प्रांतांतील बहुजन समाजाला मिळालेलें दिसतें. या उलट, नमावयाला पाहिजे तिथें ताठ राहावयाचें ही वृत्ती सर्व मराठे जातींत दिसून येतें. त्यामुळेंच शेतकरी जमाती, कारू जमाती, महार वगैरे अस्पृश्य जमाती व ब्राह्मण जमाती या सर्वच स्वतःला फार शहाण्या समजतात व त्याप्रमाणें वर्तन करतात. ह्यामुळेंच मराठी संस्कृतींतील अंगोपांगांत या सर्वांचें कार्य दृष्टोत्पत्तीस पडतें. या संस्कृतीची निर्मिती कोणाही एका जमातीची नसून सर्वांची आहे. तिची जोपासना करावयाची असल्यास सर्वांनीं एक झालें पाहिजे."

मराठी संस्कृतीचा सवतासुभा स्थापून दुसऱ्यांना कमी लेखणाऱ्यांनीं वरील विचारांपासून बोध घ्यावा. सर रिझले किंवा एन्थोवेन यासारख्या सत्यवादी संशोधकांना आपल्या अहंकारामुळें दोष देण्याची जरूरी नाहीं. कारण ती वस्तुस्थिती आहे. " महारांचें महाराष्ट्रांच्या गांव-गाड्यांतील आणि राजकीय इतिहास व साहित्य निर्मिती यामध्यें जें स्थान आहे तें पाहिलें तर सर रिझले यांनीं महारांना वांशिक दृष्ट्या दिलेलें स्थान अगदीं अनुरूपच आहे; महारांना योग्य संधि मिळाली तर ते ब्राह्मणांपेक्षां कर्तबगारींत किंचितही कमी नाहींत,' असें प्रा. रॉबर्टसन यांनीं जें प्रतिपादिलें तें भविष्यकाळच सिद्ध करील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावी मार्गदर्शनाखालीं महार जमात आपल्या सर्वांगीण उद्धारासाठीं झगडत आहे. त्यांची थोर परंपरा त्यांना यश देईल यांत शंका नाहीं. इतिहासाची नेहमीं पुनरावृत्ति होतें असें म्हणतात. पुनः दीड हजार वर्षांनंतर महारांचा विकास ' भारतीय ' संज्ञेखालीं व्हावयाचा आहे. त्यांनीं आपल्या प्राचीन इतिहासाला अनुसरून बुद्धाच्या मार्गानें जाण्याचें ठरविलें आहे. ज्या समाजरचनेशीं झगडतांना गेलीं पंधरा शतकें महारांना प्रतिकूल परिस्थितींत नतमस्तक होऊन कंठावीं लागलीं ती समाजरचना बदलण्याचें सामर्थ्य त्यांना पुनः कशावरून प्राप्त होणार नाहीं ? तसें झालें तर महाराष्ट्राचा—महार भारतालाही ललामभूत होईल.